# आयर्लंदचा इतिहास.

नरसिंह चिंतामण केळकर, बी. ए. एलएल. बी.

संपादक **मराठा**

व

'सुभाषित आणि विनोद,' 'गॅरिबाल्डीचें चरित्र,'

'नवरदेवाची जोडगोळी,' 'सरोजिनी'

या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिला,

तो

पुणें येथें 'भारतभूषण' व 'आर्यभूषण' छा० छा०

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें राखून ठेविले आहेत. )

किंमत १। रुपया.

पुणें येथें

भारतभूषण छापखान्यांत गंगाधर गोविंद गोंधळेकर यांनीं

व

आर्यभूषण छापखान्यांत नटेश अप्पाजी द्रवीड यांनीं छापिलें

आणि

नरसिंह चिंतामण केळकर यांनीं प्रसिद्ध केलें.

# अर्पणपत्रिका.

शके १८३०—सन १९०८.

ह्मणजे

ज्या संवत्सरानें हिंदुस्थानांतील प्रजा व राजा

यांच्या तीव्र रागलोभांचा मासला

परस्परांस दाखविला,

तथापि

ज्यानें हिंदी प्रजाजन व परकीय राज्यकर्ते यांतील

लोकोत्तर व्यक्तींच्या धीरोदात्त स्वभावाची

साक्ष जगास पटविली आणि हिंदी

राष्ट्राचें एक पाऊल पुढें

टाकविलें

त्यास

हें पुस्तक अर्पण केलें आहे.

न० चिं० केळकर.

# प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तकांत 'आयर्लंड' चा संक्षिप्त राजकीय इतिहास, आयरिश लोकांनीं केलेल्या चळवळी, त्यांसंबंधीं तात्विक विवेचन, व राजकारणाचे दृष्टीनें आयर्लंड व हिंदुस्थान या दोन देशांची तुलना हे मुख्य विषय आहेत.

आयर्लंड देशाचा एकंदर इतिहास दीड दोन हजार वर्षांचा आहे. परंतु हिंदुस्थानांतील लोकांच्या नजरेनें पहातां फक्त बाराव्या शतकापासून, म्हणजे जेव्हां आयर्लंड देश इंग्लंडचे ताब्यांत गेला, तेव्हांपासूनचाच त्या देशाचा इतिहास विशेष बोधप्रद भासतो. त्यांतूनही अठराव्या शतकाच्या पूर्वीचा इतिहास समग्र उपलब्ध नाहीं. अर्वाचीन काळीं आयरिश लोकांचे मनांत राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उदय अठरावे शतकांतच प्रथम झाला, व तेथपासूनचाच इतिहास ग्रंथकारांनीं पद्धतशीर लिहिलेला आढळतो. तथापि, या कालाचा इतिहासही समग्र व केवळ बखरीच्या स्वरूपाचा लिहिण्याचा माझा हेतु नसून, आयरिश लोकांनीं केलेल्या राष्ट्रीय चरित्राच्या चित्रास मागें पडद्याप्रमाणें शोभेल इतकीच हकीकत सांगण्याचा माझा उद्देश आहे. मात्र पूर्वापर इतिहासांतील ठळक ठळक गोष्टी व त्यांचा सापेक्ष काल वाचकांच्या ध्यानांत यावा याकरितां प्रारंभीं आयरिश इतिहासांतील मुख्य तारखांची जंत्री दिलेली आहे.

आयर्लंद व हिंदुस्थान यांच्या तुलनेसंबंधानें इतकेंच सांगावयाचें कीं, प्रस्तुतच्या स्थितींत हिंदुस्थानांतील लोकांस आयरिश लोकांचा इतिहास कांहीं कांहीं बाबतींत उपमानादाखल घेतां येण्यासारखा आहे असें माझें मत आहे, व यामुळेंच प्रस्तुतच्या विषय हातीं घेण्यास मी उद्युक्त झालों. या उपमानोपमेयांतील जे साधारण भाव किंवा वैधर्म्याचे मुद्दे माझ्या नजरेस दिसले ते मीं योग्य ठिकाणीं स्पष्ट शब्दांनीं नमूद केलेच आहेत. तथापि, कोणत्याही उपमानोपमेयांतील संबंध अर्थातच अनेक असूं शकतील; त्यांस मर्यादा घालणें अशक्य आहे. यास्तव याच उपमाभूमींतून मला दिसले यांखेरीज इतर ऐतिहासिक मर्मचमत्कार वाचकांस जर दिसले तर तो त्यांच्या स्वतःच्याच कल्पनाशक्तीचा गुण किंवा दोष म्हटला पाहिजे. त्यांचें श्रेय अगर त्यांची जबाबदारी या दोहोंसही मी सर्वथैव पात्र नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांतील सुमारें तिसऱ्या हिश्शाइतकी जागा आयरिश चरित्रमालेनें व्यापिलेली आहे. हीं चरित्रें सुप्रसिद्ध पुढाऱ्यांचीं असून नमुनेदार म्हणून येथें दिलेलीं आहेत. व त्यांमध्यें सत्व, रज, तम या तीनही गुणांची राष्ट्रीय रंगभूमीवरील लीला दिसून येईल. चालू सालीं 'केसरी'तून या पुस्तकांतील कांहीं थोडा भाग अग्रलेखांच्या रूपानें चौदा अंकांत प्रसिद्ध झाला होता. त्यांत क्वचित् फेरफार करून, आणि सोईप्रमाणें लेखांचा क्रम बदलून सदर मजकुराचाही या पुस्तकांत समावेश केलेला आहे.

पुणें, आश्विन शु. १ शके १८३१.
(ता. १५ ऑक्टोबर सन १९०९ ).

नरसिंह चिंतामण केळकर.

# अनुक्रमणिका.

पृष्ठ.


प्रस्तावना ... ... ... ... ... ... ... ...

आधारभूत ग्रंथांची यादी ... ... ... ... ... ...

आयरिश इतिहासांतील तारखांची जंत्री ... ... ... ...

भाग १ ला.–विषयोपन्यास ... ... ... ... ... ... १—७


## इतिहास


भाग २ रा.– प्राचीन इतिहास ... ... ... ... ... ८—१५

भाग ३ रा.– अर्वाचीन इतिहास ... ... ... ... १६—४८


## राष्ट्रीय चळवळी


भाग ४ था.– धर्मस्वातंत्र्याची चळवळ ... ... ... ४९—७२

भाग ५ वा.– शेतकऱ्यांची चळवळ ... ... ... ... ७३—८७

भाग ६ वा.– राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ ... ... ... ८८–११४

भाग ७ वा.– बंडखोरीची चळवळ ... ... ... ...११५–१२३

भाग ८ वा.– सारासार विचार ... ... ... ... ...१२४–१७८

भाग ९ वा.– आयर्लंद व हिंदुस्थान ... ... ... ...१७९–२०७

भाग १० वा.– चरित्रमाला ... ... १–११४

१ अर्ल ऑफ चार्लमॉंट ... ... ... ... ३—८

२ हेनरी ग्रॅटन ... ... ... ... ... ... ८—२३

३ वुल्फटोन ... ... ... ... ... ... २३—२९

४ रॉबर्ट एमेट ... ... ... ... ... ... २९—३०

५ डॅनियल ओकॉनेल ... ... ... ... ... ३०—७३

६ स्मिथ ओब्रायन ... ... ... ... ... ७३—७७

७ आयझॅक बट... ... ... ... ... ... ७७—८१

८ पार्नेल... ... ... ... ... ... ... ८१–११४

# आयर्लंदच्या इतिहासासंबंधीं आधारभूत ग्रंथ.

**'नामूलं लिख्यते किंचित्.'**

**आ**यर्लंदच्या इतिहासासंबंधीं माहिती इकडील वाचकांस फारशी नसते. तथापि, सदरहु इतिहासाचा परिचय करून घेण्याची ज्यांस इच्छा असेल त्यांस पुणें व मुंबई येथील सार्वजनिक ग्रंथसंग्रहालयांमध्यें बरींच साधनें मिळण्यासारखीं आहेत. मुंबई येथील 'रॉयल एशिआटिक सोसायटी'चा ग्रंथसंग्रह तर प्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें, पुण्यास लो० टिळक यांच्या केसरी ऑफिसांत कै० प्रो० जिनसीवाले यांचें स्मारक ह्मणून ठेवलेला, आणि ना. गोखले यांनीं 'भारत सेवकसमाजा'चे दिवाणखान्यांत स्थापन केलेला–अशा या दोन ग्रंथ-संग्रहालयांमध्येंही आयर्लंदच्या इतिहासासंबंधीं बरींच पुस्तकें आहेत. हीं सर्व पुस्तकें समग्र वाचणें हें अर्थातच फार कालावधीचें काम आहे. तथापि, या इतिहासाचा विचार एखाद्या विशिष्ट दिशेनें करणारांस तीं सर्व समग्रच वाचलीं पाहिजेत असें नाहीं. हीं निरनिराळीं पुस्तकें त्यांच्या कर्त्यांनींसुद्धां कांहीं विशिष्ट हेतूनें व विचाराच्या विशिष्ट दिशेनेंच लिहिलेलीं आहेत. ह्मणून या विषयावर या निरनिराळ्या ग्रंथसंग्रहांतील जीं पुस्तकें आह्मीं पाहिलीं व वाचलीं, त्यांचें वर्गीकरण करून साधारणतः कोणत्या पुस्तकांत काय सांपडण्यासारखें आहे हें खालीं देत आहों; व ज्या वाचकांस या विषयाची माहिती करून घ्यावयाची असेल अगर आह्मीं केलेल्या कोणत्याही विधानांचें प्रत्यंतर मूळ पुस्तकांत पहावयाचें असेल त्यांस त्यावरून तसें करणें सुलभ जाईल अशी आशा आहे.

१ **Encyclopedia** जुना भाग XIII व नवा भाग XXIX यांतील आयर्लंदविषयीं भूवर्णनपर व लोकस्थितिवर्णनपर माहिती चांगली आहे. परंतु ऐतिहासिक माहिती त्रोटक असून आयरिश लोकांशीं सहानुभूति नसलेल्या अशा लेखकानें ती लिहिल्यामुळें निःपक्षपाती नाहीं.

२ **Historians' History of the world** VOL. XXI. यांत जुनी ऐतिहासिक माहिती बरी आहे. परंतु गेल्या दोन शतकांतील हकीकत फारच त्रोटकरीतीनें दिलेली आहे.

३ **History of Ireland-by Thomas Moore** VOLS. 4.

४ **History of Ireland-by J. M. Cusack VOLS. 2.**

५ **History of Ancient Ireland-by Standish O'grady.**

६ **The Kingdom of Ireland-by C. J. Walpole.**

आयर्लंदच्या सर्वसाधारण इतिहासावर हीं चार स्वतंत्र पुस्तकें आहेत. नं. ३ व ४ यांत माहिती विपुल असून तीं आयर्लंदशीं सहानुभूति असलेल्या लेखकांनीं लिहिलेलीं आहेत. नं. ३ चा लेखक थॉमस मूर हा आयर्लंदमधील उत्तम कवि व मोठा देशभक्त होऊन गेला. यास्तव सदरहु पुस्तकाचें महत्त्व विशेष आहे. नं.५ मध्यें आयर्लंदचा प्राचीन इतिहास गोष्टींच्या रूपानें सांगितला आहे. परंतु राष्ट्रीय चळवळीच्या दृष्टीनें आयर्लंदचा हा जुन्या काळचा इतिहास फारसा बोधप्रद अगर मनोरंजक नाहीं. नं. ६ मध्यें सुमारें चारशें पानांत आयर्लंदचा संगतवार असा इतिहास थोडक्यांत दिलेला आहे. परंतु या सर्व पुस्तकांत एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभापर्यंत, ह्मणजे आयर्लंद व इंग्लंद यांचा असंमत संयोग होऊन आयरिश पार्लमेंट बरखास्त होईपर्यंतचाच इतिहास दिलेला आहे. आयर्लंदच्या सर्वसाधारण इतिहासासंबंधानें 'ग्रीन'च्या इंग्लंदच्या इतिहासांतही प्रसंगाप्रसंगानें आयर्लंदची माहिती दिलेली आहे. अर्थात् ती त्रोटक आहे, परंतु जी आहे ती इतक्या रसाळ वाणीनें दिलेली आहे कीं, इतर कोणत्याही पुस्तकांत ती तशी क्वचितच सांपडेल.

एकोणिसाव्या शतकांतील आयर्लंदच्या इतिहासासंबंधानें खालील पुस्तकें वाचण्यासारखीं आहेत.

७ **Ireland in 1868-by Gerald-Fitzgibbon** यांत आयर्लंदच्या पूर्वापर स्थितीचें वर्णन आहे.

८ **Ireland since the Union-by Justine MacCarthy.**

हीं दोन्हीं पुस्तकें वाचण्यासारखीं आहेत. पैकीं नं. ८ च्या पुस्तकांत क्रमवार इतिहास असा न देतां गेल्या शतकांत झालेल्या निरनिराळ्या आयरिश चळवळींची स्फुट हकीकत दिलेली आहे. परंतु राजकारणाच्या दृष्टीनें आयरिश इतिहासाचें वाचन करणारास

९ **Ireland in the 18th Century VOLS. 5,-by W. E. H. Leky.**

१० **The English in Ireland VOLS. 3,-by J. A. Froude.** हीं दोन पुस्तकें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. किंबहुना आयरिश राजकारणाची दिशा, आयरिश लोकसमाजाचे गुणदोष व राज्यकारभाराची माहिती ज्यांस हवी असेल त्यांनीं फक्त हीं दोन पुस्तकें वाचलीं असतां चालण्यासारखें आहे. दोन्हींतही फक्त अठराव्या शतकांतील हकीकत दिलेली आहे. मात्र प्रस्तावनेदाखल थोडासा पूर्वेतिहास देऊन शेवटच्या भागांत एकोणिसाव्या शतकांतील इतिहासास व आयर्लंदच्या

भावि स्थितीस अनुलक्षून तात्विक विवेचन केलेलें आहे. नं. ९ चा कर्ता हा आयरिश लोकांशीं खऱ्या सहानुभूतीनें प्रेरित असून मनानें अत्यंत न्यायी व उदार असा लेखक आहे. आयर्लंदला स्वराज्य अगर होमरूल मिळण्यास तो विरुद्ध आहे. तथापि, आयरिश लोकांचे गुणदोष जितक्या प्रेमभावानें त्यानें वर्णन केलेले आहेत, तितका प्रेमभाव दुसऱ्या कोणत्याही ग्रंथकारांत सांपडणें कठिण आहे. नं. १० चा कर्ता हा जवळ जवळ आयरिश लोकांचा द्वेष्टाच आहे असें म्हटलें तरी चालेल. आयर्लंदला स्वराज्य देऊं नये इतकेंच नव्हे तर आयरिश लोकांवर इंग्लंदचा राज्यकारभार थेट हिंदुस्थानांतल्या ताबेदारीच्या व दडपशाहीच्याच पद्धतीनें चालावा, व त्यांतच उभय राष्ट्रांचें कल्याण आहे, असें त्याचें स्पष्ट मत आहे. परंतु आयरिश राष्ट्रीय पक्षाची दुसरी ह्मणजे विरुद्ध बाजू ज्यांना कोठें पहावयाची असेल त्यांस यासारखा ग्रंथ मिळावयाचा नाहीं. Froude हा नामांकित व अत्यंत कुशाग्र बुद्धीचा असा लेखक असून त्यानें प्रत्येक विषयावर केलेलें विवेचन टीका या दृष्टीनें उत्कृष्ट व हृदयंगम आहे.

याशिवाय आयरिश लोकांच्या चळवळीसंबंधानें लिहिलेलीं व स्फुटविवेचनपर अशीं पुस्तकें ह्मटलीं ह्मणजे खालील होत.

११ **Parnellism-by T. P. O'Conor** हा ग्रंथकार स्वतः इंग्लंदमध्यें वर्तमानपत्रकाराचा धंदा करणारा असून आज हयात आहे. आयरिश राष्ट्रीयपक्षाचा तो एक पुढारी आहे. या पुस्तकांत एकोणिसाव्या शतकांतील आयरिश चळवळींची माहिती पार्नेलपर्यंत आणून ठेवलेली आहे. आयर्लंदचे दुष्काळ वगैरेसंबंधानें यांत विशेष विस्तृत माहिती मिळते.

१२ **Ireland and her Agitators-by W. J. O'daunt** हा ग्रंथकर्ता डॅनियल ओकॉनेल याचा एक वेळ प्रायव्हेट सेक्रेटरी असून जिला ( Repeal Movement ) आयर्लंदचा व इंग्लंदचा संयोग तोडून टाकण्याची चळवळ-असें ह्मणतात, तिचा सुमारें दहा वर्षांचा इतिहास या पुस्तकांत त्यानें दिला आहे. ग्रंथकार स्वतः राजकीय चळवळींत पडणारा व त्यानें आयर्लंदचे इतिहासांतील सर्वांत मोठी कायदेशीर चळवळ डोळ्यांनीं पाहिलेली असल्यानें या वर्णनात्मक पुस्तकांत निरनिराळ्या आयरिश पुढाऱ्यांच्या खासगी गोष्टी व इतर हकीकती फारच चित्ताकर्षक रीतीनें सांगितलेल्या आहेत.

१३ **Young Ireland-by Sir Charles Gavan D'uffy** हा ग्रंथकार १८४०-१८५० या दहा सालांत आयरिश राष्ट्रीयपक्षाच्या नवीन निघालेल्या सुप्रसिद्ध ( Nation ) 'नेशन' पत्राचा मुख्य संपादक असून फार उत्तम लेखक होता.

डॅनियल ओकॉनेल यासही मवाळ ह्मणणाऱ्या जहालपक्षाचा हा मुख्य लेखक होय. बंगाल्यांत जसें 'वंदे मातरं' (Bande Mataram) हें पत्र होऊन गेलें तसेंच आयर्लंदमध्यें 'Nation' हें पत्र झालें. किंबहुना Bande Mataram च्या संपादकास या पत्राची मूळ कल्पना 'Nation' पत्रावरून आलेली असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. अर्थात् या पुस्तकांत 'Repeal Movement' व 'Nation' वर्तमानपत्र यांची दहा वर्षांची जी हकीकत दिलेली आहे, तिच्यासारखी विस्तृत व चटकदार हकीकत दुसरी कोठेंही सांपडणें शक्य नाहीं.

१४ **New Ireland** VOLS. 2,-**by A. M. Sullivan.** सुलिव्हन हा वर सांगितलेल्या ग्रंथकर्त्यानंतर 'Nation' पत्राचा मुख्य संपादक होता. व सदरहु पुस्तकांत सुमारें पंचवीस वर्षांतल्या निरनिराळ्या चळवळी, निरनिराळे लोक व निरनिराळे प्रसंग यांचेसंबंधानें वर्णनात्मक माहिती दिलेली आहे. परंतु तारतम्य दृष्टीनें पहातां नं. १३ पेक्षां नं. १४ हा ग्रंथ पुष्कळच नीरस आहे.

१५ **Recollections by William O'brien.** सदरहु ग्रंथकर्ता अद्यापि हयात आहे. तो पार्नेलच्या पूर्वीच्या अनुयायांपैकीं एक असून रेडमंडचा प्रतिस्पर्धी आहे.परवां आयर्लंदांत एके ठिकाणीं मारामारी होऊन सभा मोडली त्या प्रसंगांत या ग्रंथकर्त्याचीच मुख्य भूमिका होती. या ग्रंथांत फीनियन चळवळीपासून तों परवांपर्यंतच्या आयरिश चळवळीच्या निरनिराळ्या प्रसंगांचें चित्ताकर्षक असें वर्णन दिलेलें आहे.

१६ **Irish Ideas-by W. O'brien.** हेंही वरील ग्रंथकर्त्याचेंच पुस्तक असून यांतही आयरिश राष्ट्रीयपक्षाच्या कांहीं प्रमुख सिद्धांतांचें व प्रसंगांचें स्फुट प्रतिपादन आहे.

एकोणिसाव्या शतकांत झालेल्या आयरिश चळवळी, त्यांचा संगतवार इतिहास, आंकडे वगैरे माहिती ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं खालील दोन पुस्तकें अवश्य वाचावीं. व तीं फार महत्त्वाचीं आहेत.

१७ **Fifty years of Concessions to Ireland** VOLS. 2,-**by Barry O'brien.** या पुस्तकांत १८३१ ते १८८१ या सालांतील आयर्लंदांतील जमीनबाबद व स्थानिक स्वराज्यबाबदचे कायदे, धर्मशिक्षण व इतर शिक्षण, पार्लमेंटरी सुधारणा, धर्मखातें वगैरेंच्या इतिहासाची माहिती आंकड्यांसह दिलेली आहे. ग्रंथकार स्वतः आयरिश राष्ट्रभक्त असून विवेचन उत्कृष्ट आहे.

१८ **A consideration of the state of Ireland in the 19th cen-**

| | | |
|---|---|---|
| * बालबोध व्याकरण पुस्तक १ | ( रा. रा. भि. जोशीकृत ) | ०—२—६ |
| * " पुस्तक २ | " | ०—६—० |
| * प्रौढबोध व्याकरण | " | १—८—० |
| बालबोध मराठी व्याकरण | " | ०—५—० |
| * शिक्षणोपयोगी मानसशास्त्र | " | ०—२—६ |
| इंग्लिश कंप्यानियन ( मराठी व्याकरण ) | " | ०—१२—० |
| * कांप्रेहेन्सिव्ह मराठी व्याकरण ( इंग्रजींत ) | " | १—१२—० |
| * पद्यसमुच्चय | " | ०—६—० |
| केकावली सुलभ | " | ०—४—० |
| अलंकारविवेक | " | ०—६—० |
| मराठी शब्दसिद्धि | " | ०—८—० |
| * व्याकरणावरील निबंध | ( कै. चिपळूणकरकृत ) | ०—१२—० |
| * व्यवहारोपयोगी रसायनशास्त्र | ( श्री. बा. मिरजकरकृत ) | ०—१२—० |

## शालोपयोगी पुस्तकें ( डेपोचीं. )

| | |
|---|---|
| * इन्फंट प्रायमर | ०—२—६ |
| * बालबोध पहिलें पुस्तक | ०—२—६ |
| * बालबोध दुसरें " | ०—३—६ |
| * " तिसरें " | ०—३—६ |
| * " चौथें " | ०—७—० |
| * " पांचवें " | ०—८—० |
| * " सहावें " | ०—१०—० |
| * " सातवें " | ०—१४—० |
| * मार्सडेनकृत हिंदुस्तानचा इतिहास | १—०—० |
| * हिंदुस्तानचा रहिवासी | ०—१२—० |

**tury-by Locker Lampson.** या सुमारें सातशें पानांच्या पुस्तकांत सन १८०० पासून १८९३ पर्यंत घडून आलेल्या आयरिश राजकारणाच्या इतिहासांतील प्रमुख गोष्टी विषयवार दिलेल्या आहेत. शिवाय या पुस्तकाच्या परिशिष्टांत अत्यंत महत्त्वाचे उतारे, अवतरणें वगैरे सांपडतात. पुस्तकांत पाल्हाळ फार आहे, व विवेचनांत थोडासा दूरान्वय दिसून येतो. परंतु पुस्तक माहितीनें ओथंबलेलें असें असल्यानें अवश्य वाचनीय आहे.

आयरिश चळवळींच्या इतिहासांत 'होमरूल' Home Rule ची चळवळ अत्यंत महत्त्वाची आहे व त्यासंबंधानें खालील पुस्तकें वाचनीय आहेत.

१९ **Case against Home Rule-by E. Dicey.** या पुस्तकांत आयर्लंदला स्वराज्य कां देऊं नये याचा इंग्लंदच्या दृष्टीनें अत्यंत सोपपत्तिकरीतीनें विचार केलेला आहे. ग्रंथकार हा 'राज्यशासनपद्धती'वर ग्रंथ लिहिणारा ह्मणून प्रख्यात आहे. आणि प्रस्तुत ग्रंथांतील विवेचनही तात्विक दृष्टीनें व अत्यंत समर्पक रीतीनें केलेलें आहे.

२० **The case for Home Rule-by Justine MacCarthy.** हें पुस्तक History of Our Own Times वगैरे ऐतिहासिक ग्रंथांच्या कर्त्यानें लिहिलेलें असून त्यांत वरील ग्रंथास उत्तर आहे.

याशिवाय खालील पुस्तकें स्फुट ह्मणून वाचण्यासारखीं आहेत.

२१ **Irish Nationalism-by the Duke of Argyll.**

२२ **Mill's plan of pacifying Ireland examined by Lord Dufferin.**

हीं दोन्ही पुस्तकें कॉन्सर्व्हेटिव्हपक्षाच्या दोन विद्वान् उमरावांनीं लिहिलेलीं असून आयरिश राष्ट्रीय चळवळ-विशेषतः जमीनबाबद चळवळ-इच्या विरुद्ध कारणें व उत्तरें काय असूं शकतील यांचें सोपपत्तिक विवेचन या पुस्तकांत सांपडेल.

२३ **Ireland under the Land League-by Clifford Lloyd.** या पुस्तकांत लॅन्डलीग या संस्थेची लोकांवर किती भयंकर सत्ता चालत होती व ही चळवळ किती यशस्वी झाली होती यांचें वर्णन प्रतिपक्षानें लिहिलेलें वाचावयास मिळतें.

२४ **Ireland,-Industrial, Social and Political-by J. B. Murphy.** या पुस्तकांत आयर्लंदांतील शेतकी, खानिज संपत्ति व उद्योगधंदे यासंबंधानें पुष्कळ उपयुक्त माहिती दिलेली आहे.

२५ **Ireland in the New Century-by Sir Horace plunkett.** हें पुस्तक अत्यंत वाचनीय आहे. ग्रंथकर्ता मोठा राष्ट्रभक्त आहे. तथापि निव्वळ राजकीय चळवळीनें कोणतेंही राष्ट्र उदयास येत नाहीं, तर स्वावलंबनाचे पद्धतीनें उद्योग करून राष्ट्रीय शील सुधारून व उद्योगधंदे वाढवून प्रथमतः सांपत्तिक स्थिति सुधारली पाहिजे असें त्याचें ठाम मत आहे. या नवीन विचाराची परंपरा आज सुमारें पंधरावीस वर्षें प्रचलित असून तिचें बहुतेक श्रेय त्याजकडेच आहे. जमीन-बाबद १९०३ सालीं जो कायदा झाला व आयरिश शेतकरी आपल्या जमिनीचे मालक होणार अशी आशा वाटूं लागली त्याचें श्रेयही थोडेंबहुत याच ग्रंथकाराकडे आहे. तो अधिकारारूढ असून, शेतकी व उद्योगधंदे यांची वाढ करण्याचें काम हल्लीं करीत आहे. खरें स्वावलंबन ह्मणजे काय असतें याचा एका बाजूचा विचार या ग्रंथांत उत्कृष्ट तऱ्हेनें केलेला आढळून येतो.

आयर्लंदांतील प्रसिद्ध पुरुष व पुढारी यांच्यासंबंधानें चरित्रात्मक अशीं पुस्तकें पुष्कळच आहेत. परंतु त्यांतल्या त्यांत खालील पुस्तकें विशेष वाचण्यासारखीं आहेत.

२६ **Compendium of Irish Biography.** हें पुस्तक आपल्या १० व्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष व आयरिश राष्ट्रभक्त Alfred Webb यांनीं रचलेलें आहे. हा एक चरित्रकोश असून अगदीं पौराणिक कालापासून तो १८८० पर्यंत जो जो ह्मणून प्रसिद्ध असा आयरिश पुरुष होऊन गेला त्याचें चरित्र यांत सांठविलेलें आहे. माहितीच्या दृष्टीनें प्रस्तुत पुस्तक फारच मौल्यवान् आहे.

२७ **Leaders of Irish Public Opinion-by Leky vols. 2.** यांत फक्त तीनच मुख्य चरित्रें दिलेलीं आहेत. तीं ग्रॅटन, प्लड व डॅनियल ओकॉनेल यांचीं होत. परंतु या चरित्रांत अठराव्या शतकाचे अखेरचा आयरिश राष्ट्राचा सर्व इतिहासच जवळ जवळ सांगितला आहे असें ह्मटलें तरी चालेल.

याशिवाय २८ Life of Parnell by Barry O'Brien–vols. 2; २९ Life of Gladstone by John Morley vols. 3; ३० Justine Mac-Carthy यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रांतील चरित्रें इत्यादि वाचण्यासारखीं आहेत. याच विषयासंबंधानें प्रसिद्ध लेखक ३१ Jonathan Swift, ३२ Edmund Burke, ३३ William Pitt आणि ३४ Fox यांचीं चरित्रें वाचण्यासारखीं आहेत. Swift हा प्रसिद्ध आयरिश राष्ट्रभक्त असून त्यानें आपल्या तीव्र, जळजळीत व अत्यंत विनोदपूर्ण अशा लेखांनीं आयरिश लोकांस इंग्रजांशीं कसें वागावें, स्वावलंबन कसें करावें वगैरे शिकवून फार उच्च दर्ज्याची देशसेवा केली होती. Swift याचें Henry Craik यानें लिहिलेलें चरित्र, विशेषतः त्यांतील

वर्तमानपत्र ह्मटलें ह्मणजे Freeman's Journal. हें पत्र बरेंच जुनें आहे, व याचीं मतें मध्यम राष्ट्रीय पक्षाचीं आहेत. तिसरें पत्र Gaelic American हें होय. हें पत्र क्रांतिकारक विचारांच्या आयरिश राष्ट्रभक्तांनीं अमेरिकेंत आज कित्येक वर्षें चालविलेलें आहे. हें पूर्वी हिंदुस्थानांत येत होतें. हल्लीं तें येण्याचें सरकारानें बंद केलेलें आहे.

आयरिश इतिहासाच्या अंगभूत अशा निरनिराळ्या विषयांवर अनेक लहान पुस्तकें ग्रंथसंग्रहालयांमधून आढळतात. उदाहरणार्थ, Swift Macneill याचें ३७ The Irish Parliament या नांवाचें पांचपन्नास पानांचेंच लहानसें पुस्तक आहे. पण त्यांत आयरिश पार्लमेंटचा इतिहास, विशेषतः कायद्यांचे दृष्टीनें तिची घटना वगैर मौल्यवान् माहिती आहे. तसेंच, ३८ Some Arguments for Home Rule या पुस्तकांत आयरिश पुढारी रेडमंड याचीं १९०७ सालचीं भाषणें एकत्र करून छापलेलीं आहेत. परंतु अशा किरकोळ पुस्तकांची यादी करणें कठिण आहे.

वर सांगितलेल्याशिवाय आयर्लंदसंबंधीं इतर आणखीही बरींच पुस्तकें मुंबई-च्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या ग्रंथसंग्रहालयांत आहेत; तथापि त्यांपैकीं कांहीं माझ्या विषयमर्यादेच्या बाहेरचीं अशीं वाटल्यामुळें मीं पाहिलेलीं नाहींत व कांहीं उपयुक्त असावीं अशीं वाटत असतांही योग्य वेळीं माझ्या हातीं आलीं नाहींत. तींही उत्साही वाचकांनीं वेळ असल्यास अवश्य वाचावीं.

तेरावा भाग वाचनीय आहे. Burke ह्याचा सर्व जन्म जरी इंग्लंदांत गेला होता तरी तो पक्का आयरिश राष्ट्रभक्त होता. आयर्लंदासंबंधाचे त्याचे सर्व लेख ३५ Thomas Arnold यानें एकत्र करून छापलेले आहेत व ते वाचले असतां आयरिश राजकारणांत त्याचें मन किती गढून गेलेलें होतें हें कळून येईल. रोमन क्याथोलिक लोकांचा छळ ज्यांच्यायोगानें करण्यांत आला ते कायदे ( Penal Laws ) यांजवर कडक पण सोपपत्तिक अशी टीका वरील पुस्तकाशिवाय इतरत्र वाचावयास मिळणें कठिण आहे. तसेंच, या पुस्तकांतील विविध लेखांत, ज्यांच्यामुळें बर्क हा जगांतील मुत्सद्यांमध्यें वरच्या दर्ज्याचा मानला जातो ते राजकारणविषयक उदार व व्यापक असे तात्विक सिद्धांत जागजागीं नुसते पेरलेले आढळून येतात. William Pitt याचीं चरित्रें दोन तीन आहेत. अठराव्या शतकांतील अखेरच्या भागाच्या आयर्लंदच्या इतिहासाशीं, इंग्लंदचा मुख्य प्रधान या नात्यानें पिटचा अत्यंत निकट संबंध होता. पिटनेंच सन १८०० सालीं आयरिश पार्लमेंट सभा मोडली व ती मोडण्याची त्याची खटपट सुमारें १५ वर्षें चालू होती. अर्थात् पिटच्या चरित्रांत आयरिश इतिहासाची मधून मधून चर्चा आहे व ती इंग्लंदच्या दृष्टीनें लिहिलेली असल्यामुळें मनन करण्यासारखी आहे. William Pitt हा जसा आयर्लंदचा शत्रु तसाच Fox हा आयर्लंदचा मित्र. हे दोघे इंग्लिश राजकारणाप्रमाणेंच आयरिश राजकारणासंबंधानेंही प्रतिपक्षी या नात्यानें आजन्म भांडत होते. शिवाय Fox हा ग्रॅटन वगैरे आयरिश देशभक्तांचा मित्र असून, तो जेव्हां जेव्हां अधिकारारूढ होई तेव्हां तेव्हां आयरिश लोकांस अनुकूळ अशा गोष्टी शक्य त्या करी. यामुळें Fox चें चरित्रही यासंबंधानें वाचल्यास त्यांत आयरिश इतिहासाच्या एका भागाची (१७८०–१८००) माहिती मिळण्यासारखी आहे.

चरित्रांप्रमाणेंच मुत्सद्यांच्या भाषणांचीं पुस्तकेंही इतिहासाच्या दृष्टीनें वाचनीय असतात; व आयर्लंदच्या इतिहाससंबंधानें ग्रॅटन, ओकॉनेल, प्लंकेट, शील, पिट, फॉक्स व ग्लॅडस्टन यांचीं भाषणें अवश्य वाचनीय आहेत. या सर्व वक्त्यांचीं भाषणें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेलीं आहेत. तसेंच, ३६ Speeches from the Dock हें पुस्तकही वाचनीय आहे. यांत बेकायदेशीर चळवळ करणाऱ्या लोकांचीं आत्मसमर्थनपर, कळकळीचीं व वक्तृत्वपूर्ण भाषणें आहेत. आयरिश इतिहाससंबंधानें पहातां मुख्यतः तीन वर्तमानपत्रें प्रसिद्ध असून, त्यांत अर्थातच राजकारणासंबंधीं पुष्कळच माहिती मिळण्यासारखी आहे. १८४० सालीं स्थापन झालेल्या परंतु पुढें कांहीं वर्षांनीं बंद पडलेल्या Nation नांवाच्या राष्ट्रीयपक्षाच्या वर्तमानपत्राच्या जुन्या लेखांचें पुस्तक निघालेलें पहाण्यांत नाहीं.परंतु तें असण्याचा संभव आहे. व मिळाल्यास १९ वे शतकाचे मध्यभागीं राष्ट्रधर्म व देशभक्ति या गोष्टी, डेव्हिस, डिलन व डफी यांनीं आयरिश लोकांस कशा शिकविल्या हें त्यांत पहावयास सांपडेल. दुसरें

# आयर्लंदच्या इतिहासांतील
## मुख्य तारखांची जंत्री.

इ. स. ४३२–५०—सेंट पॅट्रिक हा साधु आयर्लंदांत आला व त्यानें खिस्तीधर्माची स्थापना केली.—४८०–५९० पॅट्रिकच्या अनुयायांनीं व शिष्यशाखेनें आयर्लंदभर मठ, प्रार्थनामंदिरें व विद्यागृहें यांची स्थापना केली.—६५० आयरिश मिशनरी यूरोपांत जाऊन उपदेश करूं लागले.—७९५ नॉर्थमेन (जर्मन) आयर्लंदावर स्वारी करूं लागले.—८४४ नॉर्थमेन यांची आयरिश लोकांनीं कत्तल केली.—८४५–९०० नॉर्थमेन लोकांच्या फिरून स्वाऱ्या.

९०० लेनस्टरचा आयरिश राजा कॉरमॅक याचें राज्यारोहण.—९६८ ब्रायन हा आयरिशराजा मनस्टरच्या गादीवर बसला. १००१ ब्रायनराजा 'तारागड'ची गादी हस्तगत करतो.—१०१४ ब्रायन याचा क्लॉनटार्फ येथील लढाईंत पराभव व मृत्यु.—१०२३ ब्रायनचे दोन मुलगे एकाच गादीवर आरूढ होतात.—१०५१ इंग्लंदचा सॅक्सन राजा हॅरोल्ड हा आयर्लंदांत पळून येऊन आश्रय घेतो.—१०६४ ब्रायनचा नातू टरलो हा सर्व आयर्लंदचा राजा अशी द्वाही फिरवितो.—११३२ मनस्टरचा राजा कॉनर ओब्रायन व कॉनॉटचा राजा टरलो ओकॉनर यांचें युद्ध.—११५१ टरलो ओकॉनर सर्व आयर्लंदचा राजा अशी द्वाही फिरवितो.—११५३ मॅकमरो हा ओरूर्कची बायको पळवून नेतो.

११५४ पोप हॅड्रियन यानें इंग्लंदचा राजा दुसरा हेनरी यास आयर्लंदच्या राज्याची सनद बहाल केली.—११६९ इंग्रजी सरदार (स्ट्रॉंगबो) यानें आयर्लंदवर स्वारी केली.—११७० डब्लिनचा वेढा. डरमॉट मेकमरो याचा मृत्यु.—११७१ हेनरी राजा स्वतः आयर्लंदांत सैन्यासह उतरला.—११८४ आयरिश अमीरउमरावांचें बंड.—१२१६ मॅग्नाचार्टाचे हक्क आयरिश प्रजेस देण्यांत आले.—१२५९ जिराल्डिनची कत्तल.—१२७२ इंग्लंदचे कायदे आपणास लागू करावे असा अर्ज आयरिश लोकांनीं राजा पहिला एडवर्ड यास केला.—१३१४ स्कॉटलंदचा राजा रॉबर्ट ब्रूस इंग्रजांकडून पराभव पावून आयर्लंदांत आश्रयास गेला.—१३१५ आयरिश लोकांचें बंड व एडवर्ड ब्रूसचें राज्याधिरोहण.—१३१८ डनडॉकची लढाई व एडवर्ड ब्रूसचा पराभव.—१३२९ आयरिश लोकांचा इंग्रजी कायदे लागू करण्याबद्दलचा फिरून अर्ज.—१३३० लेनस्टरमधील बंड.—१३३१–१३४८ किलडेर व डेसमॉन्ड यांचीं बंडें.—१३९९ राजा दुसरा रिचर्ड डब्लिन येथें जातो.—१३९९ राजा दुसरा रिचर्ड आयर्लंदवर फिरून स्वारी करतो.—

१४५९ रिचर्ड ड्यूक ऑफ यॉर्क आयर्लंदांत आश्रय घेतो.—१४६७ डेसमॉन्ड याजवर राजद्रोहाचा आरोप व त्याचा शिरच्छेद.—१४८७–९७ पर्किन वॉरबेक व लॅम्बर्ट सिमनेल–तोतये–यांचीं बंडें व त्यांस आयरिश पार्लमेंटची मदत.—१४९५ पॉयनिंग्सचा कायदा पास होऊन आयरिश पार्लमेंटावर इंग्लिश पार्लमेंट व राजा यांचें स्वामित्व प्रस्थापित होतें.—१५१९–१५३० आयरिश संस्थानिकांचीं आपापसांतील युद्धें.—१५३७ लॉर्ड थॉमस फिट्झरल्ड याचें बंड.

१५३७ आयर्लंदांत धार्मिक बाबतींतही राजसत्ता चालावी असा कायदा अमलांत येतो.—१५३८ आयरिश क्याथोलिक लोकांच्या धर्मच्छळास सुरुवात झाली.—१५३९ क्याथोलिक देवळांचा विध्वंस.—१५४१ राजा आठवा हेनरी 'आयर्लंदचा राजा' अशी पदवी धारण करितो.—१५४८ आयरिश संस्थानिकांचीं आपापसांतलीं युद्धें.—१५५९-१५६७ शेन ऑनीलचें बंड.—१५६८-८६ मन्स्टर प्रांतांतील आयरिश सरदारांचीं बंडें.—१५६९ अलस्टर प्रांत खालसा करण्यांत आला.—१५७९ दक्षिणेंतील जिरालडिनचें बंड.–१५८० स्पॅनिअर्ड लोक आयर्लंदवर स्वारी करितात.—१५८६ मन्स्टर प्रांतांत प्रॉटेस्टंट लोकांची वसाहत वसविण्यांत आली.—१५९५ अलस्टर प्रांतांतील संस्थानिकांचा संघ.—१५९८–१६०२ मन्स्टर प्रांतांतलें बंड.—१६०२ इंग्रजी लष्करानें पिकांचा नाश केल्यानें पडलेला बडा दुष्काळ.—१६१० जुने आयरिश कायदे सर्व रद्द करण्यांत आले व क्याथोलिक लोकांच्या छळास सुरुवात झाली.—१६११-२४ अलस्टर प्रांतांत प्रॉटेस्टंट लोकांची वसाहत.—१६३५ कॉनॉट प्रांतांतील जमिनीच्या हक्कांच्या चौकशीचें कमिशन.—१६४१ चार्लस राजाचे तर्फे ऑरमॉन्डचें बंड.—१६४१-१६४८ अलस्टर, मन्स्टर व कॉनॉट प्रांतांतील धर्मविषयक बंडें व प्रॉटेस्टंट लोकांच्या कत्तली.

१६४८ ऑलिव्हर क्रॉमवेलचा आयर्लंदांत प्रवेश व बंडवाल्यांच्या कत्तली.—१६५३ हजारों आयरिश लोकांची हद्दपारी.—१६६१ म्युनिसिपालिट्यांचा कायदा.—१६६६ व्यापारप्रतिबंधक कायदे.—१६८९–९० जेम्सच्या वतीनें टिरकॉनेलचें बंड व विलियम राजाचा विजय.—१६९० बॉईनची लढाई व क्याथोलिक सैन्याचा पराभव.—१६९१ ऑघ्रिमची लढाई व लिमरिकचा तह.—१६९२ रोमन क्याथोलिक लोकांचे छळास उघड सुरुवात.—१६९२ क्याथोलिकांस पार्लमेंटांत बसूं न देण्याचा कायदा.—१६९६ त्यांस शस्त्रें बाळगूं न देण्याचा कायदा.—१६९६ त्यांस परदेशांत शिक्षण मिळूं न देण्याचा कायदा.—१६९६ आयरिश जहाजांविरुद्ध कायदा.—१६९८ क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांच्या लग्नाविरुद्ध कायदा.—१६९८ मोलिनो याचे आयरिश पार्लमेंटच्या स्वातंत्र्यासंबंधीं लेख.—१६९९ आयरिश लोंकरीच्या व्यापाराविरुद्ध, व लोंकरीवर जकात बसविण्याचा कायदा.—१७०१ रोमन क्याथोलिक लोकांस सॉलिसिटर न होऊं देण्याचा कायदा.—१७०४-१७१० त्या लोकांवर पीनल कोडचा अंमल.—१७११ शेतकरी लोकां-

च्या दंग्यास सुरुवात.—१७२४ स्विफ्टचे ड्रेपिअरस लेटरस नामक चळवळीचे लेख.—१७२९ बटाट्याचें पीक बुडाल्यामुळें दुष्काळ.—१७२७ क्याथोलिक लोकांचे मतदार या नात्याचे हक्क काढून घेण्याचा कायदा.

१७५७ क्याथोलिक लोकांना समान हक्क मिळून देण्याकरितां चळवळ करण्यास नेमलेली पहिली ' क्याथोलिक संस्था. '—१७५९ इंग्लिश व आयरिश पार्लमेंट सभा एक करण्याची बोलवा व त्यामुळें दब्लिन येथें झालेला दंगा.—१७६१ व्हाइट बॉईज-लोकांचा शेतकरी दंगा.—१७६२ ओक बॉईज लोकांचा शेतकरी दंगा.—१७६४ क्याथोलिक लोकांस समान हक्क देण्याचें पहिलें बिल आयरिश पार्लमेंटसभेपुढें येऊन नामंजूर झालें.—१७६८ स्टील बॉईज लोकांचा दंगा.—१७७१ जबर जमीनधारा देण्यास नाखुष होऊन अल्स्टर प्रांतांतले पुष्कळ प्रॉटेस्टंट व प्रेसबिटेरेनियन शेतकरी अमेरिकेस निघून जातात.—१७७३ अमेरिकेंतील लोकांच्या स्वातंत्र्य मिळविण्याच्या चळवळीस सुरुवात.—१७७६ अमेरिकन लोक स्वातंत्र्याचा जाहीरनामा लावतात.—१७७८ क्याथोलिक लोकांस समान हक्क देण्याबाबद पहिलें बिल आयरिश पार्लमेंटसभेपुढें येऊन तें मंजूर होतें.—१७७९ आयरिश लोकांची अप्रतिबंधक व्यापाराबद्दल चळवळ.—१७७९ आयर्लंदांत स्वयंसेवक सैनिकांच्या सैन्याची स्थापना. स्पेन व इंग्लंद यांच्या युद्धास सुरुवात.—१७८० आयर्लंदास व्यापारविषयक स्वातंत्र्य देण्यांत आलें.—१७८१ पार्लमेंटचें स्वातंत्र्य मागण्यास आयरिश लोकांनीं सुरुवात केली. अमेरिकेंत इंग्रजांचा ( लॉर्ड कॉर्नवॉलिस यांचा ) पराभव.—१७८२ क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य देण्याचा आणखी एक कायदा पास होतो. दंग्यानान येथें आयरिश स्वयंसेवकांचें प्रचंड संमेलन भरतें. पॉयनिंग्ज ॲक्टची दुरुस्ती होऊन आयरिश पार्लमेंटास स्वातंत्र्याचा पहिला हप्ता मिळतो. पहिल्या जॉर्जराजाच्या कारकीर्दींतील सहाव्या वर्षांतील कायदा रद्द होऊन आयरिश पार्लमेंटास स्वातंत्र्य मिळतें.—१७८३ आयरिश पार्लमेंटचें स्वातंत्र्य ब्रिटिश पार्लमेंट उघडपणें कबूल करितें. आयरिश पार्लमेंटची अंतःसुधारणा करण्याची चळवळ सुरू होते व या बाबतींत लोकमत प्रदर्शित करण्याकरितां आयरिश स्वयंसेवकांचें संमेलन पुन्हां भरतें.

१७८४ शेतकरी लोकांचा दंगा.—१७८७ टाइथकरासंबंधाचा वादविवाद.—१७८९ रीजन्सीबद्दल आयरिश पार्लमेंटांतील वादविवाद. फ्रान्समधील राज्यक्रांति.—१७९१ क्याथोलिक लोकांस स्वतंत्रता मिळण्याबद्दलची चळवळ. युनायटेड आयरिशमेन या संस्थेची आयर्लंदमध्यें स्थापना.—१७९२ क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळण्याचा आणखी एक हप्ता. क्याथोलिक कन्व्हेन्शनची सभा.—१७९३ क्याथोलिक लोकांचे तर्फे कीओघ व टोन हे राजास अर्ज सादर करितात–दडपशाहीचा कायदा–बंडाचा थोडासा प्रादुर्भाव.—१७९४ युनायटेड आयरिशमेन ही संस्था अधिकाऱ्यांनीं बंद केल्यामुळें गुप्त सभांचा प्रादुर्भाव.—१७९५ क्याथोलिक लोकांस संपूर्ण स्वातंत्र्य मिळण्याबद्दल आयरिश पार्लमें-

टमध्यें ग्रॅटन यानें आणलेलें बिल नामंजूर होतें. गव्हर्नर लॉर्ड फिट्झ वुइलियम याचा कल प्रजापक्षाकडे आहे असें पाहून पिट त्यास परत बोलावतो. वुल्फटोन बंड करण्याच्या निश्चयानें अमेरिकेस निघून जातो. क्याथोलिक लोकांविरुद्ध प्रॉटेस्टंट लोक निराळी उचल करितात.—१७९६ टोन पॅरिस येथें येऊन आरमार जमवून आयरिश किनाऱ्यावर येतो.—१७९७ अल्स्टर प्रांतांत लष्करी कायदा सुरू होतो. पार्लमेंट सभेची सुधारणा करण्याविषयींचें ग्रॅटन याचें बिल नामंजूर झाल्यामुळें तो व त्याचे अनुयायी पार्लमेंट सोडून जातात. युनायटेड आयरिशमेन संस्थेचा फैलावा.—१७९८ लॉर्ड एडवर्ड फिट्झरल्ड व टोन यांचें बंड व बंडाचा मोड.—१७९९ आयरिश पार्लमेंट सभा मोडून ब्रिटिश पार्लमेंट सभेस जोडण्याची चळवळ.—१८०० दोन पार्लमेंट सभा एक करण्याविषयींचा कायदा ब्रिटिश पार्लमेंटनें पास केला.

१८०५ पिटकडे क्याथोलिक लोकांचें डेप्युटेशन.—१८०७ क्याथोलिक कमिटीचा अर्ज.—१८०९ ग्रॅटनची पार्लमेंटांतील क्याथोलिक लोकांबद्दल तरफदारी.—१८१० क्याथोलिक लोकांचे पार्लमेंटास अर्ज.—१८१२ कॅनिंग व वेलिंग्टन यांनीं धर्मस्वातंत्र्याचें अभिवचन दिलें.—१८१४ क्याथोलिक सभा कायद्यानें बंद करण्यांत आली.—१८१५ सर हेनरी पार्नेल याची धर्मस्वातंत्र्याची सूचना पार्लमेंटनें नामंजूर केली.—१८१७ आयर्लंद व इंग्लंद यांची तिजोरी एक करण्यांत आली.—१८१७ क्याथोलिक लोकांचा लष्करांत व आरमारांत प्रवेश झाला.—१८२० ग्रॅटनचा मृत्यु.—१८२१ प्लंकेट याचें धर्मस्वातंत्र्याचें बिल लॉर्ड सभेनें नामंजूर केलें.—१८२२ क्यानिंग यानें क्याथोलिक उमरावांना पार्लमेंटांत बसूं द्यावें अशा आशयाचें बिल आणिलें. क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांजमधील डब्लिन येथील मारामारी.—१८२३ प्लंकेट याचें धर्मस्वातंत्र्याचें बिल नामंजूर होतें.—१८२५ आयर्लंदमध्यें क्याथोलिक सभेची चळवळ. सभाप्रतिबंदीचा कायदा.—१८२७ क्यानिंग याची धर्मस्वातंत्र्याची सूचना नामंजूर होते.—१८२८ बर्डेट, ब्राऊहॅम, मॅकिंटॉश यांचें धर्मस्वातंत्र्याचें बिल कॉमन्स सभेंत पास होऊन लॉर्ड्स सभेंत नामंजूर होतें.—१८२९ धर्मस्वातंत्र्याचें बिल पार्लमेंटच्या दोन्ही सभेंत पास झालें.

१८३३ धर्मशिक्षणाबाबद चळवळ.—१८३०-३८ टाईथ कराबाबद क्याथोलिक लोकांचें भांडण व मारामाऱ्या.—१८३२ टाईथ करासंबंधानें चौकशीचें कमिशन. रिपीलबाबद चळवळीचा प्रारंभ. पार्लमेंटबाबद सुधारणेचें बिल.—१८३३ अल्स्टर प्रांतांतील दंगेधोपे. टाईथ कराच्या बाकीबद्दल सरकारी तिजोरींतून कर्ज देण्याचा कायदा.—१८३४ लॉर्ड अॅलथॉर्पचें टाईथ बिल.—१८३५ जमीनबाबदींतील चळवळ व सुधारणेचा प्रारंभ.—१८३६-३७ मॉरपेथचें टाईथ बिल नामंजूर झालें.—१८३८ जनरल इलेक्शन व टाईथ बिल पास होऊन क्याथोलिक लोकांवरील कर उठला.—१८३७ रसेल याचें म्युनिसिपल बिल लॉर्ड्स नामंजूर करतात.—१८४० ओकॉनेल याच्या रिपीलच्या चळ-

वळीची सुरुवात.—१८४१ ‘ राजनिष्ठ राष्ट्रीय रिपील ’ सभेची स्थापना. नेशन नांवाच्या वर्तमानपत्राची स्थापना.—१८४३ ‘ कन्सिलिएशन हॉल’ची स्थापना. लक्षावधि लोकांच्या जंगी जाहिरसभा व ओकॉनेलचा मुकुटदानसमारंभ.—१८४३–४४ ओकॉनेल व इतर चळवळ करणाऱ्या लोकांवर खटले.—१८४६ दडपशाहीचे भयंकर कायदे पास झाले.—१८४७ ओकॉनेल याचा मृत्यु.

१८४८ जमीनबाबद कायदा ( Encumbered Estates Act ).—१८४८ आयर्लंदांतील बंडें, दंगेधोपे व दडपशाही.—१८४८-४९ आयर्लंदांतील दुष्काळ, देशत्याग वगैरे आपत्ति.—१८५० पार्लमेंट सभेबाबद बिल.—१८५८ फीनियन चळवळीस प्रारंभ.—१८६१ डब्लिन येथील फीनियन लोकांचे दंगे.—१८६३ आयरिश पीपल ( Irish People ) नामक क्रांतिकारक वर्तमानपत्राची स्थापना.—१८६६ अमेरिकन फीनियन लोकांची कॅनडा प्रांतावर स्वारी.— १८६७ फीनियन लोकांचें आयर्लंदांतील बंड व अत्याचार.—१८६८ फीनिअन कैद्यांच्या शिक्षा माफ होण्याबद्दल आयझॅक बट व जॉन ब्राईट यांची चळवळ म्युनिसिपालिट्याबाबद बिल.—१८६७-७० दडपशाहीचे कायदे.

१८६९ सरकारी प्रॉटेस्टंट धर्ममंडळ आयर्लंदांतुन उठवून त्याजवरील खर्च कमी करण्याचें ग्लॅड्स्टनचें बिल पास होतें.—१८७० जमिनीबाबद बिल.–१८७६–७७–१८७८ जमिनीबाबद कायदा सुधारण्याचा शारमन क्रॉफर्ड याचा प्रयत्न.—१८७९ दब्लिन येथें रॉयल विश्वविद्यालयाची स्थापना.—१८७९ आयर्लंदांतील भयंकर दुष्काळ.—१८८० पार्नेलचा उदय. पार्नेल अमेरिकेंत व्याख्यानें देण्यास जातो. लँडलीगची स्थापना. कुळांस जमिनींतुन काढल्यास त्यांस नुकसान भरून देण्याचें फॉर्स्टरचें बिल कॉमन्ससभेनें मंजूर केलें; पण लॉर्डांनीं नामंजूर केलें.—१८८१ आयर्लंदाकरितां दडपशाहीचे व हत्याराचे कायदे पास झाले. ग्लॅड्स्टनसाहेबांचें जमिनीबाबद बिल दोन्ही सभांत मंजूर झालें.—१८८२ फिनिक्सपार्क (डब्लिन) येथें झालेले राजकीय स्वरूपाचे खून.—१८८३ पार्नेलचें जमिनीबाबद बिल नामंजूर होतें. आयर्लंदांतील बेसुमार दंगेधोपे.—१८८५ आयरिश स्थानिक स्वराज्याबाबद कायदा.—१८८६ ग्लॅड्स्टनसाहेबांचें पहिलें होमरूल बिल कॉमन्ससभेनें नामंजूर केलें.

१८८७ जमिनीबाबद शेतकऱ्यांची मोठी चळवळ. मिचेलस टाऊन येथील दंगा.—१८८८ पार्नेलवर खुनाच्या कटांत सामील असल्याबद्दलच्या दोषारोपाचा इन्साफ करण्याकरितां स्वतंत्र कमिशनची नेमणूक होते.—१८८९ पार्नेलची दोषमुक्तता व विजय.—१८९० पार्नेलवर घटस्फोटाची फिर्याद व त्याचा ऱ्हास, व त्याच्या पुढारीपणाबद्दलचे तंटे.—१८९० आयरिश पक्षांतील तात्पुरता समेट. आयरिश शेतकऱ्यांस जमीनदारांकडून जमिनी खरेदी मिळण्याबाबद बिल मंजूर होतें.—१८९१ शेतकरी वर्गाची कांहीं भागांतील दाटी मोडून त्यांची सोय करण्याबाबद बिल मंजूर झालें.—१८९२

आयरिश स्थानिक स्वराज्याचें खातें उत्पन्न करण्याचें बाल्फोरचें बिल मंजूर झालें.—१८९३ अल्स्टर प्रांतांतील व्यापाऱ्यांची चळवळ ग्लॅड्स्टनसाहेबांचें दुसरें होमरूल बिल कॉमन्स सभेंत मंजूर परंतु लॉर्डांच्या सभेंत नामंजूर होतें.—१८९६ आयर्लंद व इंग्लंद यांजमधील कराच्या ओझ्याच्या वांटणीची चौकशी करण्याबाबद कमिशन. शेतकी सुधारण्याचें खातें उत्पन्न करण्याची चळवळ व कमिशनची नेमणूक.—१८९८ आयरिश स्थानिक स्वराज्याबाबद कायदा पास होऊन, अधिक हक्क देण्यांत आले.—१८९९ शेतकीचें व धंद्याचें शिक्षण देण्याबाबद कायदा पास झाला.—१९०३ शेतकरी लोकांस जमिनी मालकीहक्कानें घेण्यास सरकारी तिजोरींतून मदत देण्याबद्दल कायदा पास होतो.—१९०६ आयर्लंदांतील राष्ट्रीय पक्षांतील निरनिराळ्या पंथांचें एकीकरण.–१९०७ अधिकारविभागणी ( Devolution ) करण्याबाबद बिरेलसाहेबाचें बिल पुढें येतें; परंतु आयरिश लोकांस तें नापसंत असल्यामुळें माघारें घेतलें जातें. आयरिश पक्षांचा समेट व बडया कन्व्हेन्शनची बैठक.—१९०९ जमीनदार लोकांकडून जमिनी सक्तीनें विकत घेऊन त्या कुळांस मालकीहक्कानें देण्याच्या कायद्याची पुरवणी.

THE harp that once through Tara's halls,
The soul of music shed,
Now hangs as mute on Tara's walls
As if that soul were fled.

So sleeps the pride of former days,
So glory's thrill is over,
And hearts that once beat high for praise
Now feel that pulse no more.

No more to chiefs and ladies bright
The harp of Tara swells,
The chord alone that breaks at night
Its tale of ruin tells.

Thus Freedom now so seldom wakes,
The only throb she gives
Is when some heart indignant breaks,
To show that still she lives.

—*Thomas Moore.*

WHEN he who adores thee has left but the name
Of his faults and his sorrows behind,
Oh, say, wilt thou weep, when they darken the fame
Of a life that for thee was resigned ?

Yes, weep, and however my foes may condemn
Thy tears shall efface their decree ;
For Heaven can witness, though guilty to them,
I have been but too faithful to thee.

With thee were the dreams of my earliest love ;
Every thought of my reason was thine ;
In my last humble prayer to the spirit above,
Thy name shall be mingled with mine.

Oh ! blest are the lovers and friends who shall live
The days of thy glory to see ;
But the next dearest blessing that Heaven can give
Is the pride of thus dying for thee.

—*Thomas Moore.*

# आयर्लंदचा इतिहास.

## भाग १ ला.

### विषयोपन्यास.

सुमारें दोन वर्षांपूर्वी, ह्मणजे सन १९०७ सालच्या नोवेंबर महिन्यांत, सिमला येथें बड्या कायदेकौंसिलांत राजद्रोहक सभांसंबंधाचा कायदा पास करण्यांत आला. सदरहू प्रसंगीं जो वादविवाद झाला त्यामध्यें नामदार डॉ. राशबिहारी घोष यांनीं खुद्द व्हाइसरॉयसाहेबांचे तोंडावर असें स्पष्ट सांगितलें कीं, हिंदुस्थान हें दुसरें आयर्लंदच होऊं पहात आहे, संभाळा ! आयर्लंदप्रमाणें येथेंही दडपशाही कायद्यांच्या जोरावर राज्य करण्याचा सरकारचा इरादा दिसतो. पण त्यांनीं खूप समजून ठेवावें कीं, आयर्लंदावर सुखानें राज्य करण्याचा प्रश्न केवळ निग्रहकारक अशा कायद्यांच्या रीतीनें आजपर्यंत कधींही इंग्रजांस सुटला नाहीं; व त्या उपायानें तो प्रश्न हिंदुस्थानांतही पण सुटावयाचा नाहीं. गेल्या दिसेंबरांत बंगाल्यांतून ज्या हद्दपाऱ्या झाल्या व विशिष्ट गुन्ह्यांची चौकशी विशिष्ट रीतीनें करण्यासंबंधाचा जो नवा कायदा करण्यांत आला त्या प्रसंगीं केसरीनें लिहिलेल्या अग्रलेखास "हिंदुस्थान आयर्लंद झालें" असा मथळा दिलेला वाचकांस स्मरत असेलच. तसेंच, ज्यांना बोलून किंवा लिहून आपले विचार व्यक्त करावयाचे नसतात अशा इतिहासज्ञ विचारी लोकांच्याही मनांत, गेलें सालभर घडून येणाऱ्या अघटित घटना पाहून, आयर्लंदचें स्मरण वेळोवेळीं झालें असेल अशी आमची खात्री आहे. अशा रीतीनें आयर्लंदची आठवण इकडे होण्याचें मुख्य कारण असेंआहे कीं, सन १८८० सालापासून हिंदुस्थानांतील लोकांस राज-

कारणाची विशेष गोडी लागली, व १८८० सालच्या सुमारासच आयर्लंदमधील राजकारणाला पार्नेलच्या कर्तबगारीमुळें तेज आलें होतें. तेव्हांपासून हिंदुस्थानांतील राजकारणप्रिय पुरुषांस सूक्ष्म निरीक्षणाअंतीं आयर्लंदांतील व या देशांतील चळवळींमध्यें एक प्रकारचें साधर्म्य दिसूं लागलें; व हा बिंबप्रतिबिंब भाव आज जवळजवळ तीस वर्षांच्या अनुभवानें दृढच होत गेलेला आहे. पुढें, हिंदुस्थानांतील हकीगती वाचून आयरिश लोकांचेंही लक्ष लवकरच हिंदुस्थानाकडे वेधलें. सन १८९४ सालीं मद्रास येथें भरलेल्या दहाव्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान आलफ्रेड वेब या आयरिश गृहस्थास देण्यांत आलें; व त्यावेळच्या त्याच्या भाषणावरून, आयरिश लोकांस हिंदुस्थानच्या प्रजेविषयीं एक प्रकारचें ममत्व वाटूं लागलें आहे हें चांगलेंच व्यक्त झालें. सुमारें तेरा वर्षांपूर्वी नामदार गोखले हे आयर्लंदास गेले होते त्यावेळीं आयरिश लोकांनीं त्यांचा चांगला परामर्ष घेतला; व मायकेल डेव्हिट, डिलन, वगैरे लोकांच्या व त्यांच्या ज्या गांठी पडल्या त्यांवरून आयरिश लोकांस आमच्या सुखदुःखाच्या गोष्टी ऐकण्यास आवडतात, असें दिसून आल्याचें सर्वश्रुत आहेच. लोकमान्य टिळक यांजवरील राजद्रोहाच्या दोन्ही खटल्यांचे प्रसंगीं आयरिश वर्तमानपत्रांतून जे लेख आले त्यांवरून, हिंदुस्थानांतील राजकारणाचे झगड्यांत ज्यांना दुःख सोसावें लागतें अशांविषयीं आयरिश लोकांस सहानुभूति वाटते, व अशांच्या उद्योगाचें कौतुक करण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते, असेंही दिसून आलें. अशा रीतीनें या उभय राष्ट्रांतील संबंध दिवसें दिवस वाढतच चाललेला आहे.

वास्तविक, आयर्लंद व हिंदुस्थान या देशांमध्यें अर्थाअर्थीं कांहीं एक संबंध नाहीं. दोहोंमध्यें अंतर तीनचार हजार कोस, धर्म वेगवेगळे, व ऐहिक विषयांचे दृष्टीनें पाहतां एकाचें दुसऱ्यावर अवलंबून असें कांहींच नाहीं. केवळ विश्वकुटुंबाचे अवयव या नात्यानें उत्पन्न होणारा दूरान्वय मनांत नेहमीं कसा वागणार ? अर्थात् इंग्लंदच्या उभयान्वयी उपाधीची जोड झाली नसती तर या दोनही राष्ट्रांतील लोकांस एकमेकांबद्दल कधीं कांहींच वाटलें नसतें. ज्यांत आपला कांहीं संबंध नसतो अशा गोष्टी आपल्या कानावर आल्याच तर त्या आपण तेव्हांच विसरतों; किंवा फारच झालें तर

केवळ इतिहास या दृष्टीनें त्या आपल्या ध्यानांत राहतात. परंतु इंग्लंदचें साम्राज्य हें आयर्लंद व हिंदुस्थान या उभय राष्ट्रांस सुखदुःखाचें एक साधारण असें अधिष्ठान किंवा उत्पत्तिकारणच निर्माण झाल्यानें, त्यांपैकीं एका राष्ट्रांत घडणाऱ्या गोष्टी दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांस केवळ इतिहासाहून अधिक चित्ताकर्षक वाटूं लागाव्या हें स्वाभाविकच आहे. गतवर्षीं पार्लमेंटांतील एका वादविवादाचे प्रसंगीं सर हॉवर्ड व्हिन्सेंट नावाच्या सभासदानें जीभ लांब करून, "हद्दपारीच्या ऐवजीं लाला लजपतराय यांस गोळीच कां घातली नाहीं?" असे साहसाचे उद्गार निर्लज्जपणानें काढले; तेव्हां रेडमंड वगैरे आयरिश पुढारी त्याजवर कसे तुटून पडले व ते शब्द त्यांनीं या राजश्रींस परत घेण्यास कसे लावले, हें केसरीच्या वाचकांस स्मरत असेलच. उलटपक्षीं, पार्लमेंटांत आयरिश होमरूल [ स्वराज्य ] चा प्रश्न निघाला असतां हिंदी लोकांचें श्रोत्रेंद्रिय लागलेंच कसें तीव्र होतें, किंवा आयर्लंदांतील लोकांचें दुःख निवारण करणारा अगर त्यांस नवीन हक्क देणारा एखादा कायदा पास झाला ह्मणजे हिंदुस्थानांतील लोकांस स्वाभाविकपणें आनंद कसा होतो, ही ज्याच्या त्याच्या अनुभवाचीच गोष्ट आहे. स्वराज्य, ह्मणजे आपल्या तंत्रानें चालणारें पार्लमेंट, मिळणें हें कित्येक स्वाधीन व कित्येक पराधीन अशा गोष्टींच्या सिद्धीवर अवलंबून असतें. यामुळें तुर्की, इराणी किंवा चिनी अशा पौर्वात्य लोकांस पार्लमेंट मिळालें अगर मिळणार असें ऐकून आम्हीं स्वतः कसें वागावयास पाहिजे याचें जसें आपणांस ज्ञान होतें, तसेंच आयर्लंदच्या स्वराज्याची प्रगति अगर प्रतिगति याविषयीं आपल्या कानावर कांहीं बातमी आली असतां ब्रिटिश सरकारच्या मनाची तब्बेत कशी काय लागलेली आहे याचा अंदाज हिंदुस्थानच्या राजकीय पुढाऱ्यांस बांधतां येतो. कुटुंबांत जी ती व्यक्ति आपलें नशीब आपणा बरोबर घेऊन येतेच; असें असतांही कुटुंबाचें भवितव्य ह्मणून कांहीं एक वेगळेंच असतें. व त्याच्या जाळ्यांत सर्व गुरफटलेले असल्यामुळें, एकमेकांबद्दल एकमेकास अभिमान वाटूं लागतो. तसाच कांहींसा प्रकार हिंदुस्थान व आयर्लंद यांचा झालेला दिसतो. समसुखी जीव जरी एकमेकांबद्दल प्रेमभाव बाळगीत नसले तरी समदुःखी जीव तो भाव बाळगतात यांत शंका नाहीं. व या नात्यानें आयर्लंद व हिंदुस्थान हीं दोन

परावलंबी राष्ट्रें एकमेकांचा वृत्तांत ऐकून ज्याप्रमाणें आपलें दुःख यत्किंचित तरी विसरतील, त्याचप्रमाणें एकमेकांच्या चारित्र्यापासून बोध होऊन विचाराची नवीन दिशाही त्यांस सुचेल. तथापि या दोन राष्ट्रांस परस्परांचा पूर्ववृत्तांत असावा तितका परिचित नाहीं. त्यांतल्यात्यांत आयर्लंदची स्थिति हिंदुस्थानापेक्षां कांहींशी बरी असल्यानें, ह्मणजे राजकारणांत आयर्लंदचें पाऊल हिंदुस्थानापेक्षां पुढें असल्यामुळें, आमचा वृत्तांत सविस्तर कळवून घेण्याची आयरिश लोकांस कदाचित् इतकी गरज वाटत नसेल. परंतु आयर्लंद हें राष्ट्र ज्या कित्येक राजकीय स्थित्यंतरांतून हल्लींच्या पदवीस येऊन पोंचलें आहे त्यापैकीं कित्येकांमधून आह्मांस अद्यापि जावयाचें असल्यामुळें, आह्मांस तरी आयर्लंदचा वृत्तांत समजून घेणें अधिक जरूरीचें आहे.

सदरहू वृत्तांत वाचकांपुढें मांडण्यांत आमचा मुख्य हेतु काय आहे, हें प्रथमच विषयोपन्यासाचे वेळीं सांगितलेलें बरें. हा हेतु ह्मटला ह्मणजे, कांहीं बाबतींत समान स्थितींत असलेल्या अशा एका युरोपियन राष्ट्राचे पांचशें वर्षांचे इतिहासावरून आह्मीं हिंदुस्थानवासी लोकांनीं काय शिकावें अगर आम्हास काय शिकतां येईल याचा बोध करून देणें. हिंदुस्थानच्या स्थितीसारखी ज्याची स्थिति आहे असा देश ह्मटला ह्मणजे एक आयर्लंदच. या दोन राष्ट्रांत वैधर्म्य कांहीं थोडें थोडकें नाहीं; परंतु वैधर्म्याप्रमाणें साधर्म्यही बरेंच आहे. हें या बाबतींत पुढें केलेल्या विवेचनावरून दिसून येईल. व अशा राष्ट्राचा पांच चारशें वर्षांचा इतिहास डोळ्यापुढें आणितां आला तर त्यापासून उपयुक्त असे व्यापक सिद्धांत काढतां येणें शक्य आहे. हिंदुस्थानच्या नवीन परिस्थितींतील इतिहासास हल्लीं नुकताच कोठें प्रारंभ आहे. या इतिहासास खरी सुरुवात होऊन अवघीं ५०।७५ वर्षें झालीं. अर्थात् तेवढ्यावरूनच भावी स्थितीसंबंधानें अनुमानें काढणें प्रायः चुकीचें होईल. इतिहासाचा मुख्य उपयोग भविष्यकथन हा होय; व तें भविष्य खरें ठरण्यास जितक्या अधिक काळाचा इतिहास आधार ह्मणून घेतां येईल तितकें बरें. आयर्लंदच्या इतिहासांतील वादग्रस्त असे जे प्रश्न त्यांपैकीं प्रत्येकाचा इतिहास कमींतकमी १००–१५० वर्षांचा आहे. दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, जेथें खोल व शांत विचाराचा प्रश्न येतो

तेथें स्वतःचा संबंध जिच्यांत कमी अशा प्रकारची विचारसामुग्रीच घेतलेली बरी. शाळेंत मुलांच्या पाट्या एकमेकांकडून तपासवितात हें प्रत्येक विद्यार्थ्यास ठाऊक आहेच. खेळणारापेक्षां पाहणारालाच खेळ अधिक चांगला दिसतो अशी म्हण आहे. मनुष्यास दुसऱ्याचा न्याय जसा करितां येतो, तसा तो स्वतःचा स्वतःला करितां येत नाहीं. वकीलाच्या स्वतःच्या हितसंबंधाचा खटला असला म्हणजे तो दुसरा वकील देतो. डाक्तराच्या घरचें जिव्हाळ्याचें मनुष्य आजारी पडलें तर तो प्रायः दुसरा डाक्तर बोलावतो. त्याचप्रमाणें आपल्या देशासंबंधानें सल्ला देण्यास केव्हां केव्हां आपणापेक्षां दुसरेच लोक अधिक लायक ठरतात. या सर्वांतील मर्म हेंच कीं, अहंकार व ममत्व यांच्या धूमोद्गाराच्या योगानें आपल्या डोळ्यांना एकप्रकारचें अंधत्व येतें. तसेंच कोणतीही वस्तु नीट निरखून तिची परीक्षा करावयाची असली तर ती अगदीं डोळ्यांना भिडवून चालत नाहीं, थोडी अंतरावर धरावी लागते. चितारी चित्र रंगवीत असतां मधूनमधून दूर अंतरावर जाऊन तें पाहतो. त्याचप्रमाणें आपल्या राष्ट्र-पटावर इतिहास-चित्र रंगत असतां, मनानें थोडें दूर जाऊन, त्या चित्राचें प्रतिबिंब उपमानभूत होण्यासारख्या एखाद्या राष्ट्राच्या इतिहासाचे आरशांत आपणास पाहतां आलें तर फार चांगलें. व हिंदुस्थानच्या लोकांस आयर्लंदचा इतिहास आरशाप्रमाणें उपयोगी पडेल असा आमचा समज आहे. दडपशाही कायद्यांच्या दृष्टीनें पाहतां आयर्लंदची आठवण कशी होते, हें ना. राशबिहारी घोष यांच्या उद्गारांवरून वर दाखविलेंच आहे. परंतु हा बिंब-प्रतिबिंब भाव राष्ट्रेतिहासाच्या या फक्त एका अंगावरूनच पटतो असें नाहीं; तर ऐतिहासिक परंपरा, लोकस्वभाव व चारित्र्य, धर्म, समाजरचना, सुखदुःख-कारणें, राष्ट्राच्या मागण्या व आकांक्षा, राज्यकर्त्यांचें धोरण, प्रजाजनांच्या चळवळी व उद्योग, इत्यादि अनेक अंगांनीं आयर्लंदचा दाखला हिंदुस्थानास देण्यासारखा व पटण्यासारखाही आहे.

आयर्लंद देश हें एक बेट आहे. तें इंग्लंदच्या पश्चिमेस सुमारें सत्तर मैलांवर असून दोहोंच्या दरम्यान समुद्र आहे, त्यास आयरिश चॅनल किंवा आयरिश समुद्र ह्मणतात. या देशांत सरोवरें, दलदली, पाणथळी यांची गर्दी असून जिकडेतिकडे प्रांत डोंगराळ, वनश्रीयुक्त, हिरवागार व

व्हावयाची तीही होईनाशी झाली. तारीख २६ फेब्रुवारी रोजीं कोर्टांत हजर राहण्याची त्यास ताकीद होती; परंतु तो हजर झाला नाहीं. त्याचा लेखी कबुलीजबाब मात्र कोर्टांत दाखल झाला; अर्थातच टाइम्सला सदरहु पत्रें बनावट आहेत असें कबूल करून आपले आरोप परत घ्यावे लागले. पिगट याजवर खोटे कागदपत्र केल्याबद्दल वारंट सोडण्यांत आलें, परंतु पॅरिस येथील एका खाणावळींत तो रहात होता, त्या ठिकाणीं वारंट घेऊन बेलिफ जाऊन धडकतांच कपडे करण्याच्या मिषानें तो आपल्या खोलींत गेला व पिस्तुलानें आपल्या डोक्यांत गोळी घालून त्यानें आत्महत्या केली. पिगट याचा सर्व जन्मच देशद्रोही व इतर अनेक प्रकारचीं अधम कृत्यें करण्यांत गेलेला असून लोकांस धमकी देऊन पैसे उकळण्याचा धंदा त्यानें जन्मभर केलेला होता. तेव्हां त्याला मरण आलें तें यथायोग्यच आलें; परंतु राजकीय पुढाऱ्यांवर कोणीकडून तरी गदा आणण्याची सरकारी अधिकाऱ्यांची इच्छा प्रकट होतांच देशद्रोही लोकांची पोळी कशी पिकते, चांडाळ ग्रामकंटकांस पोटापाण्याचा एक नवीन धंदा कसा उत्पन्न होतो, विशेषतः शहाणेसुरते लोकही विकारवश होऊन आपल्या शहाणपणाचें गाठोडें अशा अधमांचे हातीं देण्यास कसे तयार होतात, हें पिगटच्या या हकीकतीवरून लक्षांत येण्यासारखें आहे. दुष्ट कृत्यें करून मनुष्य ज्या प्रकारचें अजरामरत्व मिळवितो तें पिगट यास खचित मिळालेलें आहे.

तारीख १३ फेब्रुवारी १८९० रोजीं कमिशननें आपला रिपोर्ट सादर केला. त्यांत चळवळीसंबंधाचे किरकोळ आरोप शाबीद धरले होते, परंतु ‘फिनिक्सपार्कमध्यें व इतर ठिकाणीं झालेल्या अत्याचारांशीं पार्नेल वगैरे मंडळींचा आंतून संबंध होता व अत्याचारी लोकांस लॅन्डलीगच्या व इतर सार्वजनिक फंडांतून पैशाची मदत ते करीत,’ असा जो मुख्य आरोप होता, तो कमिशननें सर्वस्वी नाशाबीत ठरविला. तथापि, हा निकाल रीतसर प्रसिद्ध होण्यापूर्वीपासूनच पार्नेलवर चोहोंकडून अभिनंदनाचा वर्षाव होऊं लागला होता. मोठमोठ्या मेजवान्यांचे प्रसंगीं त्यास आमंत्रणें येऊं लागलेलीं असून इंग्रजसमाज व लिबरल पक्षाचे मोठमोठे मुत्सद्दी यांजकडून त्याचा गौरव होऊं लागला. अशा रीतीनें सुमारें १५

ह्मणून नेत्रांस रम्य असा दिसतो. आयर्लंदास ‘ पाचूचीं बेटें ’ असें ह्मणतात याचें कारण हेंच होय. या बेटाची लांबी सुमारें तीनशें मैल, रुंदी पावणे दोनशें मैल व क्षेत्र फळ अदमासें बत्तीस हजार चौरस मैल आहे. ह्मणजे विस्ताराचे मानानें पाहतां आयर्लंद देश हा फार तर हिंदुस्थानांतील वऱ्हाड प्रांताच्या दुपटी एवढा भरेल. आयर्लंदची लोकसंख्या इ. स. १९०१ चे खानेसुमारींत ४४,५८,७७५ इतकी भरली. चाळीस वर्षां पुर्वी ह्मणजे १८६१ सालीं ही लोकसंख्या सुमारें अठ्ठावन लक्ष होती; व १८५१–६१ या दहा सालांत आयर्लंदची लोकसंख्या ‘ शेंकडा अकरा ’ इतक्या भयंकर प्रमाणानें कमी झाली. १८४१ सालीं ही संख्या ८१ लक्ष होती. अर्थात् सत्तर वर्षांचे अवधींत आयर्लंदची लोकसंख्या निम्यानें कमी झाली. आणि याचें कारण दुष्काळ व असंतुष्ट आयरिश लोकांचा देशत्याग हेंच होय. अद्यापि दरसाल कित्येक लोक आयर्लंद सोडून अमेरिकेस जातात; कारण स्वदेशापेक्षां तेथें त्यांचें बरें चालतें. आजच्या ४४$\frac{1}{2}$ लक्षांत २५ लक्ष कांहीं सांगण्यासारख्या धंदा न करणारे, ८$\frac{3}{4}$ लक्ष शेतकी करणारे, ६$\frac{1}{3}$ लक्ष उद्योगधंदा करणारे, २ लक्ष घरकामकरणारे, व १$\frac{1}{3}$ लक्ष इतर धंदे करणारे असे आहेत. धर्माचे दृष्टीनें पाहतां या ४४$\frac{1}{2}$ लक्षांपैकीं ३३ लक्ष क्याथोलिक, ५$\frac{3}{4}$ लक्ष प्रॉटेस्टंट, ४$\frac{1}{2}$ लक्ष प्रेसबिटेरेनियन्स, ६२ हजार मेथॉडिस्ट व बाकी इतर किरकोळ धर्मपंथांचे आहेत. लोकसंख्येच्या मानानें पाहतां आयर्लंद इतका लहान प्रांत सर्व हिंदुस्थानांत सांपडणें कठीण. कारण छोटानागपूर प्रांताची किंवा ओरिसा प्रांताचीही लोकसंख्या आयर्लंदच्या संख्येपेक्षां चार पांच लाखांनीं अधिक भरेल. आपल्या मुंबई इलाख्यांतील गुजराथ प्रांतापेक्षां थोडी जास्त, परंतु मध्यप्रांतांतील सहा जिल्ह्यांपेक्षां कमी इतकी काय ती आयर्लंदची लोकसंख्या आहे. लोकसंख्येच्या मानानें पाहतां साताऱ्याएवढे फक्त चार जिल्हे घातले ह्मणजे आयर्लंडची भरती होते. अशा या अल्पप्रमाण देशाविषयीं इतर गोष्टीही फारशा सांगण्यासारख्या नाहींत. तथापि एकदोन गोष्टी सांगण्यासारख्या आहेत, त्या मात्र फार महत्वाच्या आहेत. एक तर आयर्लंदांत शिक्षणाचा प्रसार हिंदुस्थानाचे मानानें पुष्कळ आहे. कारण त्यामध्यें सुमारें १६ कॉलेजें असून चार हजारांवर विद्यार्थी

कॉलेजांतून शिकत असतात. तसेंच एकंदर समाजापैकीं सुमारें शेंकडा सत्तर लोकांस लिहितांवाचतां येतें. आयरिश लोकांचा राजकारणांत प्रवेश याच मानानें आहे. उदाहरणार्थ, हल्लीं मध्यभागातर्फे मुंबईच्या कायदेकौन्सिलांत एक सभासद निवडून दिला जातो, त्याच्याऐवजीं सुमारें तेवढ्याच विस्ताराच्या आयर्लंदच्यातर्फें खुद्द ब्रिटिश पार्लमेंटांत शंभर सभासद निवडून दिले जातात असें सांगितलें, म्हणजे ते लोक राज्यकारभाराचे कामीं आपणापुढें किती आहेत, हें लक्षांत येईल. तर अशा या देशाचा पूर्वेतिहास काय आहे, हल्लीं इंग्लंदचा व त्याचा संबंध कशा प्रकारचा आहे, व त्यानें आपल्या डोळ्यापुढें कोणतें ध्येय ठेवलेलें असून तें मिळण्याविषयीं त्याचा उद्योग कशा प्रकारचा चालू आहे, हें आपण पाहूं.

---

# भाग २ रा.

## आयर्लंदचा प्राचीन इतिहास.

पश्चिम यूरोपांतील लोक समुद्रावर सफरी करण्यांत पटाईत व हौशी असल्यामुळें, अकराव्या शतकाचे अखेरपर्यंत चारही बाजूंनीं दर्यावर्दी रानटी लोकांच्या झुंडीच्या झुंडी या बेटावर येऊन नेहमीं उतरत; व अशा रीतीनें फार प्राचीन काळापासून आयर्लंद हें अनेक जातींच्या लोकांचें वसतिस्थान होऊन बसलें होतें. जुन्या दंतकथा व भाट लोकांच्या तोंडातील पवाडे पाहिले तर त्यांमध्यें आयर्लंदचा इतिहास अगदीं थेट आद्य जलप्रळयापर्यंत नेऊन भिडाविलेला आढळतो. ख्रिस्ती पुराणांत वर्णिलेल्या जलप्रळयांत अवशिष्ट राहून पुढें ज्यानें सर्व जातींच्या प्राण्यांची जगाचे पाठीवर फिरून वस्ती करविली त्या 'नोहा'ची पुतणी 'तुआथ दानान' ही प्रथम आयर्लंदच्या किनाऱ्यावर उतरली व तेथून आयर्लंद देशांतील मनुष्य वस्तीस सुरवात झाली ! त्याच्या पूर्वी पौराणिक कालांत अमानुष योद्धे, राक्षस, मांत्रिक व जादुगार यांचीच काय ती या ओसाड बेटावर वस्ती होती असें या कथांमधून वर्णिलेलें आहे. मनुष्य वस्तीच्या काळांतही प्रथमतः अग्नि व सर्प यांची उपासना व नरयज्ञ इत्यादि अघोरपंथी प्रकार चालू होतेच.

ख्रिस्तीशकाच्या प्रारंभापूर्वी चवदाव्या शतकांत 'मायलेशिअस' नामक एका पौराणिक योद्ध्यानें आयर्लंद हस्तगत करून आपल्या अनुयायांची तेथें एक वसाहत वसविली, व अद्यापिही आयरिश लोकांस काव्यांमधून 'मायलेशियन' हें नांव लावलेलें आढळून येतें. मायलेशिअसचा मुलगा हेबर याजवरूनच आयर्लंदास 'आयबेरिअन' बेटें असें ह्मणतात. पुढें मायलेशिअसचे मुलगे हेबर व हेरीमन या दोघांनीं आयर्लंदचे दोन विभाग करून ते आपापसांत वाटून घेतले. रोमन लोकांनीं ख्रिस्ती शकाच्या प्रारंभाचे सुमारास पश्चिमयूरोपांतलि बहुतेक देश पादाक्रांत करून त्यांमधून आपल्या लष्करी चौक्या बसविल्या होत्या. परंतु आयर्लंदांत त्यां-

चा प्रवेश फारसा झाला नाहीं; व हा देश यूरोपांतील अगदीं एका टोंकास असल्यामुळें रोमन लोकांकडून पीछेहाट पावलेल्या अनेक जातीचे लोक आयर्लंदांत येऊन आश्रयास राहिले होते. या लोकांमध्यें गॉल्स, सेलटस, पिक्टस, स्कॉटस वगैरे प्रमुख होते. कालांतरानें याच लोकांना आयर्लंद हा स्वदेशसा वाटूं लागला; व पुढें मध्ययुगापर्यंत आयर्लंदात झालेल्या अनेक लढायांमध्यें स्वदेशभक्ति व स्वराज्यसंस्थापना हे दोन हेतु मधून मधून झळकलेले दृष्टीस पडतात. मध्ययुगाच्या प्रारंभीं असा एक काळ होऊन गेला कीं त्याकाळीं, इंग्लंदांतलि लोकांपेक्षां आयर्लंदांतील लोकच अधिक सुधारलेले व लढाऊ असल्यानें, त्यांनीं इंग्लंदवर मधून मधून स्वाऱ्याही केल्या. चौथ्या व पांचव्या शतकांत फिडॅक व नियाल या नांवाच्या आयरिश राजांनीं इंग्लंदवर आपलीं सैन्यें उतरविलीं होतीं. व या गोष्टीची साक्ष इंग्लंदच्या पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्याच्या कांहीं स्थळांच्या नांवावरून पटण्यासारखी आहे. मात्र इंग्लंदांत आयरिश लोकांची कायमची अशी वसाहत कधींच झाली नाहीं. प्राचीनकाळच्या आयरिश राजघराण्यांत अनेक वीर पुरुष होऊन गेले; व आयर्लंदमधील लोकांस या पूर्वकालीन वीरपुरुषांचे पोवाडे गाण्यांत अद्यापिही अत्यंत प्रेम वाटतें. मराठे लोकांत जसा शिवाजी, बंगाली लोकांत जसा प्रतापादित्य अथवा इंग्रजांत जसा आलफ्रेड दी ग्रेट, तसेच आयरिश लोकांत कॉरमॅक व ब्रायन नांवांचे वीर होऊन गेले. कॉरमॅक हा राजा जसा शूर तसाच मोठा मुत्सद्दीही होता. त्यानें लष्करी शिक्षणाचीं तीन महाविद्यालयें काढिली होतीं व त्यानें घालून दिलेले कायदेकानू पुढें शेंकडों वर्षेपर्यंत अमलांत राहिले होते. हिंदुस्थानांत जसें पांडवांचें कुल, तसेंच आयर्लंदांत 'ऑनील' या नांवाचे वीरकुल प्रसिद्ध आहे. या कुलांत दर पिढीस एकाहून एक असे पराक्रमी पुरुष जन्मले. मात्र त्यांचें शौर्य देशांतल्या देशांत आपल्या अनेक शत्रूंशीं लढण्यांतच खर्च झालें; त्यापासून इतर उपयोग फारसा झाला नाहीं. मराठ्यांस जसा रायगड, अगर मुसलमानांस जशी दिल्ली, त्याचप्रमाणें आयरिश लोकांस 'तारागड' हें ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचें असें स्थान आहे. या 'तारागडा' वर आयरिश लोकांच्या स्वराज्याचा बाहुटा प्रथम रोंवला गेला व बरेच दिवस तो तेथें फडकतही होता. याच 'तारागडा'

वर स्वदेशी राजांचे राज्याधिरोहण समारंभ थाटानें होत. सहाव्या शतकांत 'तारागडा' वरचें ठाणें कायमचें उठलें; व तें स्थान तेव्हां-पासून अद्यापपर्यंत ओसाड व उदासवाणें होऊन पडलें आहे. पण अद्या-पिही जेव्हां जेव्हां आयरिश कवी अगर देशभक्त यांच्या तोंडून भावी स्व-राज्याबद्दल उज्वलभक्तिप्रेरित असे उद्गार बाहेर पडतात, तेव्हां ते० 'तारागडा' चा प्रेमपूर्वक असा उल्लेख कोणच्याना कोणच्या तरी रीतीन त्यांतून झालेला दृष्टीस पडतो. तथापि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, आयर्लंद हें इतकें लहान बेट असूनही, परकीय राजाच्या अ-मलाखालीं जाईपर्यंत त्यामध्यें एकछत्री असें राज्य कोणाचेंच झालें नाहीं. आयर्लंदला अंतःकलहाचा शापच आहे कीं काय, असें वाटतें! कारण स्वकीयांच्या किंवा परकियांच्या अमलाखालीं आयर्लंदांत शांतता व एकी फारशी नांदली असें कधींच घडून आलेलें नाहीं.

सुमारें पांचव्या शतकांत आयर्लंदमध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रवेश होण्यास सुरवात झाली. पॅलेडिअस, पॅट्रिक, कोलंबा वगैरे अनेक ख्रिस्ती साधू व धर्मोपदेशक आयर्लंदांत होऊन गेले. त्यांच्या परिश्रमानें आयरिश लोक ख्रिस्ती म्हणजे पोपचे अनुयायी बनले; व तेव्हांपासून रोमन क्याथोलिक पंथाचा अंमल आयरिश लोकांवर इतका दृढ बसलेला आहे कीं, प्रॉटेस्टंट पंथास आयर्लंदांत केव्हांही वाव मिळाला नाहीं. आयर्लंदच्या उत्तर भागांत इंग्रजी राजांकडून वेळोवेळीं हर प्रयत्नानें प्रॉटेस्टंट वसा-हती वसविण्यांत आल्या असतांही आजमित्तीस तेथें शेंकडा ७५, व दक्षिणभागांत तर शेंकडा ९० लोक रोमन क्याथोलिकच आहेत. स्कॉटलंद, इंग्लंद वगैरे आसपासच्या देशांनीं धर्ममतांतर सर्रास केल्यानें प्रॉटेस्टंटपंथा-ची त्या देशांमध्यें कायमची स्थापना झाली. परंतु आयरिश लोकांनीं पोपचे स्वामित्व केव्हांही टाकून दिलें नाहीं, एवढेंच नव्हे तर मनानें मानिलेल्या धर्माकरितां त्यांनीं आजपर्यंत अनेक प्रकारच्या हालअपेष्टा व राजकीय छळ सोसलेला आहे. सेंट पॅट्रिक हा एक विख्यात सिद्ध पुरुष होऊन गेला. आ-यरिश राजा 'नियाल' यानें ज्यावेळीं फ्रान्सवर स्वारी केली त्यावेळीं 'बोलोन' शहरांत पॅट्रिक [ बॅट्रिशियस ] या नांवाचा एक मुलगा आयरिश शिपा-यांचे हातीं लागला. अर्थात् त्यास आयर्लंदांत नेऊन गुलाम म्हणून विक-

इतकें वैराग्य त्यास एकदम आलें. व ग्लॅड्स्टनसाहेबांस पत्र लिहून त्यानें असें कळविलें कीं, मला सार्वजनिक कामाचा वीट आलेला आहे व पार्लमेंटमधील आयरिश सभासदांच्या पुढारीपणाचा राजीनामा देण्याचं मीं योजिलें आहे. परंतु ग्लॅड्स्टन, चेंबरलेन वगैरे गृहस्थांनीं त्यास सहानभूतिपूर्वक असें कळविलें कीं अशा वेळीं राजीनामा देणें युक्त नाहीं; कारण त्यापासून गैरसमज मात्र होण्यासारखा आहे. सबब राजीनाम्याचा बेत रहित करावा.

तारीख ६ मे रोजीं पार्नेल, डिलन व डेव्हिट या तिघांनीं आपल्या सहीनें एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो एकंदर आयरिश लोकांस उद्देशून लिहिलेला होता. त्यामध्यें खुनांचा अत्यंत तिरस्कारपूर्वक निषेध करून असें म्हटलें होतें कीं, ' गेल्या पांचपन्नास वर्षांत आयर्लंड्मध्यें सामाजिक व राजकीय अस्वस्थता जरी माजलेली होती, तरी असला नीच प्रकारचा गुन्हा कोणींही केला नव्हता. गुन्हेगारांचा पत्ता लागून त्यांस कडक शासन होईपर्यंत एकंदर आयरिश लोकांच्या तोंडास लागलेला काळिमा कशानेंही पुसला जाणार नाहीं.' ता० ८ मे रोजीं पार्नेल पार्लमेंट सभेमध्यें आला त्या वेळीं तो अत्यंत खिन्न, उदास व निस्तेज असा दिसत होता. त्यानें लहानसें भाषण करून खुनांचा निषेध तर केलाच; परंतु असेंही प्रांजलपणें बोलून दाखविलें कीं, अशा गुन्ह्यांच्या योगानें अधिकाऱ्यांस जर सक्तीचे उपाय योजावे लागले तर त्यांत नवल वाटण्यासारखें कांहीं नाहीं. खुनांच्या योगानें ग्लॅडस्टन व पार्नेल या दोघांसही खालीं पहावें लागलें. फॉर्स्टर यास आपला माथा उजळ झाला असें वाटलें. व लार्ड कपर यास दडपशाहीचें धोरण सुरू करणें सुलभ झालें. सर वुइल्यम हारकोर्ट यानें राजकीय गुन्ह्याबाबतचा एक नवीन कायदा पार्लमेंटपुढें आणला, परंतु त्यांतील कांहीं कलमें अन्यायमूलक असल्यामुळें आयरिश सभासदांनीं तें बिल पास होण्याचे कामीं अडवणुकीची शिकस्त केली. कित्येक रात्रीच्या-रात्री वादविवादांत खर्ची पडल्या; व अठरा आयरिश सभासदांना पार्लमेंटची शिस्त मोडण्याच्या गुन्ह्याबद्दल अध्यक्षानें ' सस्पेंड ' केलें; तथापि ग्लॅड्स्टन यानें मोठ्या धैर्यानें अशा स्थितींतही शेतकऱ्यांच्या साराबाकीच्या फेडीसंबंधाचें बिल पुढें आणलें. व अखेर तें जुलई महिन्यांत

ण्यांत आलें, व तेथें वयाच्या बावीसाव्या वर्षापर्यंत आपल्या धन्याचीं गुरें पाळण्याचें काम तो करीत असे. नंतर एक दिवस पळून जाऊन त्यानें आपली सुटका करून घेतली. व 'मला ईश्वराचा दृष्टांत होऊन ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याची आज्ञा झाली आहे' असें सांगत तो फिरूं लागला. लवकरच त्याच्या मागें शिष्यांची गर्दी होऊं लागली, व ज्या आयर्लंदांत गुलामगिरीमध्यें पूर्वीं आपले दिवस गेले त्याच देशांत जाऊन धर्मोपदेशाचे काम करण्याची महत्वाकांक्षा त्यानें धरली. इ. स. ४४५ सालीं तो आयर्लंदचे किनाऱ्यावर येऊन उतरला व त्या काळीं धर्माध्यक्षांचे स्थानीं असलेल्या ड्रुईड लोकांस चमत्कार दाखवून, अखेरीस नियाल राजाचा मुलगा लिओदर यास त्यानें ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. क्रमाक्रमानें बहुतेक जमातींच्या पुढाऱ्यांनीं त्याचें शिष्यत्व पत्करलें, व अशा रीतीनें थोड्याच काळांत तो सर्व आयर्लंदचा धर्मगुरू बनला. जुन्या रानटी ड्रुईड लोकांचीं ठाणीं उठून त्यांचे जागीं सुसंस्कृत अशीं ख्रिस्तीधर्ममंडळें स्थापलीं गेली. या मंडळांस क्रमाक्रमानें उत्पन्नाच्या जमिनी मिळाल्या, या उत्पन्नावर पोसलेल्या धर्मोपदेशकांनीं शाळा घातल्या, व थोडयाच काळांत देशामध्यें शिक्षणाचा फैलाव होऊन धर्मजागृतीही इतकी झाली कीं, आसपासच्या राष्ट्रांत धर्मोपदेशक पाठवून, त्यांना धर्मदीक्षा देऊन पावन करून घेण्याचें काम आयर्लंदकडे आलें. या कालीं जेथें तेथें ह्मणून ख्रिस्तीधर्माचा प्रसार होई तेथें तेथें रोम येथील धर्मगुरु [ पोप ] चें स्वामित्व कबूल होत असे. परंतु आयर्लंदांत पोपचा प्रत्यक्ष असा अंमल पुढें बरींच शतकें पर्यंत बसला नाहीं; स्थानिक धर्मगुरूंनीं एकप्रकारचें स्थानिक स्वराज्यच भोगलें.

आठव्या व नवव्या शतकांत आयरिश लोकांच्या धार्मिक चरित्रास अत्यंत उज्वळ स्वरूप प्राप्त झालें होतें. तें इतकें कीं, आयरिश धर्मगुरु व उपदेशक परकीय देशांत जाऊनही कीर्ति व यश मिळवूं लागले. धर्म व विद्या यांची जोडी सर्व देशांत अखंड आढळून येते. ज्याप्रमाणें भरतखंडातले ऋषि त्याचप्रमाणें ख्रिस्ती देशांतील धर्मगुरु. दोघांनींही प्राचीन काळीं व मध्ययुगांत धर्माचें रक्षण व विद्येचें पालनपोषण सारख्याच उत्साहानें केलें. आयर्लंदमध्यें या दोन शतकांत मठवासी धर्मोपदेशकांचा

वर्ग फार वाढला. पूर्वी बौद्ध धर्माचे प्रसाराचे वेळीं हिंदुस्थानांत गृहस्थाश्रम मार्गे पडून पुरुष व स्त्रिया जोगी व जोगिणी बनून धर्माचा फैलाव करण्याकरितां देशांतल्या देशांत व परदेशांतही प्रवास करूं लागल्या, तीच स्थिति या काळीं आयर्लंदची झाली होती. याच सुमारास आयर्लंदांतील 'डरो' व 'आरमा' येथील विश्वविद्यालयांची कीर्ति दिगंत पसरली; आणि युरोपखंडांतील विद्याभिलाषी व स्वातंत्र्यप्रिय लोक तेथें विद्यार्जनाकरितां येऊन राहूं लागले. रानटी युरोपियन लोकांनीं आपल्या बाहुबलपराक्रमानें आयरिश लोकांवर जय मिळविला होता खरा; परंतु धर्म, सुधारणा व विद्या यांच्या बलानें, जित आयरिश लोकानीं आपल्या जेत्यांवर उलट जय मिळवून त्यांना आपले दास बनविलें. परंतु दुर्दैवानें ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं.

आठव्या शतकापर्यंत आयर्लंदमध्यें धर्माच्या वाढीबरोबरच अंत:कलहांची वाढ सुरूं होती. आठव्या शतकांत नॉर्थ मेन, ज्यांना डेन्स असें ह्मणतात, त्यांच्या स्वाऱ्या आयर्लंदवर सुरूं झाल्या. हे लोक ख्रिस्ती नव्हते, व आयर्लंदांत उतरल्या बरोबर त्यांनीं ख्रिस्ती धर्ममंडळावर शस्त्र चालवून जाळपोळ, लूटमार, छळ व भ्रष्टाकार यांची कमाल करून सोडली. या बाह्य संकटामुळें आयरिश लोकांचे डोळे जरासे उघडले, व त्यांनी आपआपसांतली यादवी थांबवून व एकी करून डेन्स लोकांविरुद्ध बंड केलें आणि त्यांचा एक दोन ठिकाणीं मोडही केला. परंतु ही एकी थोडा वेळ टिकली. फिरून डेन्स लोकांचीं आणखीं जहाजें आयर्लंदच्या किनाऱ्यावर उतरलीं. व या परकी लोकांनीं फिरून आपलीं ठाणीं चहूंकडे बसवून देश पादाक्रांत केला. ही स्थिति शंभर वर्षेपर्यंत टिकली. व नंतर ब्रायन व मेलॅक्लिन या नांवाच्या स्वदेशी शूर राजांनीं पुढाकार घेऊन डेन्स लोकांचे पराभव व कत्तली करून त्यांचा कायमचा पाडाव केला. पण लवकरच ब्रायन व मेलॅक्लिन यांजमध्यें चुरस उत्पन्न होऊन फिरून यादवी सुरूं झाली. अखेर ब्रायन याचा विजय होऊन सन १००१ सालीं सर्व आयर्लंदचा राजा या नात्यानें तारागडावर त्यास राज्याभिषेक झाला. डेन्स लोकांनीं फिरून एकवेळ उचल करून पाहिली. सन १०१४ सालीं क्लॉटॉर्फ येथें मोठी लढाई झाली, व लढाईंत डेन्स लोकांचा पराभव झाला. ते समुद्रकिनाऱ्याकडे निघून गेले व आयरिश लोक विजयी झाले. परंतु शूर राजा ब्रायन हा मारला

गेला. व यामुळें त्याच्या पश्चात् आयर्लंदांत फिरून यादवी सुरू झाली. क्रमाक्रमानें त्यांच्या धर्माचेंही स्वरूप मलीन झालें, व विशेषतः अंतः-कलहरूपी दुष्ट पिशाच्चानें पछाडलेल्या आयरिश लोकांनीं आपसांत यादवी सुरू केल्यानें त्यांचें सर्व वैभव व सुख यांचा लोप झाला; आणि कोणाही नवीन शत्रूस, या यादवीचा फायदा घेऊन त्यानें आयर्लंदवर स्वारी केली असतां, तींत यश मिळण्याचे कामीं शंका घेण्याचें कारणच उरलें नाहीं. अशा स्थितींत बाराव्या शतकांत इंग्लंदचा व आयर्लंदचा प्रथम संबंध जडला; व तो जो त्यावेळीं एकदां जडला तो पुढें आठशें वर्षेंपर्यंत ह्मणजे आजतारखेपर्यंत आयर्लंदनें वाटेल तें केलें तरी तोडतां आला नाहीं.

बाराव्या शतकाचे प्रारंभीं आयर्लंदांत अलस्टर, लेनस्टर, मनस्टर व कॉनॉट अशीं चार निरनिराळीं राज्यें असून त्या सर्वांत अलस्टरची गादी मुख्य होती. परंतु या चारही राज्यांचे राजे आपआपसांत नेहमीं भांडत असत. या अस्वस्थतेंत पापकर्मांची भर पडली. परस्त्रीचा अभिलाष हा इतिहासामध्यें मोठमोठ्या राष्ट्रीय घडामोडींस अनेकवेळां कारणीभूत झालेला आढळतो. व बहुधां असें एकही महाकाव्य सांपडणार नाहीं कीं, ज्यांतील मुख्य कथानकाचा सर्व भर परदाराहरणपाप व त्याचें प्रायश्चित या गोष्टीवर पडलेला नाहीं. लेनस्टरचे संस्थानचा राजा मॅकडरमॉट मॅकमरो हा अत्यंत दुष्ट, दगलबाज व क्रूर होता. त्यानें इ. स. ११५३ सालीं रोरुर्क नांवाच्या सरदाराची स्त्री पळवून नेली. बिचाऱ्या नवऱ्यानें थरलो ओकॉनर या नां-वाच्या सामंताधिपाचा आश्रय व मदत मागितली; आणि उभयतांनीं मिळून मॅकडरमॉट यास आयर्लंदांतून पळवून लावलें. अशा रीतीनें अनीतिप्रवृत्त झालेल्या मॅकडरमॉट राजाला कोठेंही थारा मिळावा हें न्याय्य नव्हतें, परंतु आयर्लंदच्या कमनशिबास इंग्लंदच्या लोभाची जोड मिळाली. मॅकडरमॉट हा भटकत भटकत इंग्लंदला गेला (इ.स.११६७); व तेथील राजा दुसरा हेनरी यास नवीन मुलूख मिळवून देण्याचें आमिष दाखवून त्यानें त्याजकडून मदत देण्याचें वचन घेतलें. हा काळ इंग्लंदच्या भरभराटीचा होता. देशांत शांतता नांदत असून, लष्करी पेषाच्या व वाढत्या अंगाच्या नव्या पिढीस आपल्या बाहूंचा कंडू जिरविण्यास व तरवार गाजवून कीर्ति मिळविण्यास स्वदेशांगण पुरेसें नव्हते. मुलुखगिरी व साहसी कर्में करण्यास शिकारीचीं

नवीन रानें तरुण इंग्लिश सरदारांस हवींच होतीं. यामुळें आयर्लंदवर स्वारी करण्याकरितां हेनरी राजास स्वतंत्र सैन्य पाठविण्याचें कारण पडलें नाहीं. त्यानें कुल फरमान काढून लोकांस असें कळविलें कीं, वाटेल त्यानें बरोबर फौज घेऊन व आयर्लंदवर स्वारी करून मॅकमरो याचें साहाय्य करावें; व असें करणारावर दरबारची कृपा होऊन त्यास सरदारकी दिली जाईल. या फर्मानाचा फायदा घेऊन अनेक तरुण इंग्रज योद्धे आयर्लंदांत लष्कर घेऊन उतरले. मूळ ज्याच्याकरितां हा सर्व खटाटोप घडून आला त्या पापी मॅकमरोचा या सुमारास अंतही झाला तरी, इंग्रजांचा पाय जो आयर्लंदच्या भूमीवर पडला तो कायमचाच पडलासा झाला. हेनरी राजाला स्वतःकरितां नवीन राज्य मिळविण्याची हौस होतीच. व याशिवाय याच सुमारास रोमच्या गादीवर चौथा हॅड्रियन नांवाचा इंग्रज पोप होऊन बसलेला होता त्यानें, रोमन क्याथोलिक पंथाचा प्रसार व्हावा आणि खजिन्यांतही भर पडावी, या हेतूनें आयर्लंद आपल्या ताब्यांत घेण्याचा हेनरी राजास विशेष आग्रह केला होता. यामुळें पुढें गेलेल्या तरुण इंग्रज सरदारांनीं आयरिश राजाशीं युद्ध करून त्यांस जेरीस आणल्यानंतर कांहीं दिवसांनीं खुद्द हेनरी हा बरोबर मोठें सैन्य घेऊन आयर्लंदांत उतरला. कारण 'फ्यूडल' पद्धतीप्रमाणें पदरच्या सरदारांनीं जिंकलेल्या मुलखावर राजाचेंच स्वामित्व रहावयाचें असतें. हिंदुस्थानांतही पेशवे, शिंदे, होळकर वगैरे सातारच्या राजाच्या पदरच्या सरदारानीं स्वाऱ्या करून जो मुलुख मिळविला त्याचा कारभार व सुभेदारी जरी या सरदारांकडे राहत असे तरी मुख्य धनीपणाचा मान सातारचे गादीकडे होता हें प्रसिद्धच आहे.

हेनरी राजानें आयर्लंदांत फक्त नांवाचाच दिग्विजय केला. कारण त्यानें कोणा राजाकडून खंडणी, करभार वगैरे वसूल केला नाहीं; व यामुळें त्याचें नुसतें कोरडें स्वामित्व कबूल करण्यास आयरिश राजमंडळानेंही फारशी हरकत घेतली नाहीं. परंतु हेनरी स्वदेशास परत निघून जातांच खुद्द डब्लिन शहर व त्याच्या आसपासचा थोडासा मुलख याखेरीज कशावरही इंग्रजांचें खरें स्वामित्व राहिलें नाहीं. या लहानशा टापूंत इंग्रजी अंमल व बाहेर सर्व देशांत स्वदेशी राजांचा अंमल अशी स्थिति पुढें कित्येक वर्षेंपर्यंत चालू राहिली; व अलस्टरच्या राजानें तर बरेच दिवसपर्यंत

आपलें स्वामित्व इतर राजांवर पूर्वीप्रमाणेंच चालविलें. डब्लिनचा ‘ लॉर्ड डेप्यूटी ’ अथवा सुभेदार जसा असेल, अगर खुद्द इंग्लदांत राजकारणास जशा प्रकारचा रंग येत असेल त्यामानानें आयर्लंदांत इंग्रजांच्या प्रभुत्वास भरती अगर ओहोटी येइ. एखादा सुभेदार शूर व पराक्रमी असला तर त्यानें आसपास स्वाऱ्या करून अंमल बसवावा व खंडण्याही घ्याव्या; व तसें नसलें ह्मणजे मग आयरिश लोकांनींच इंग्रजांच्या वसाहतींच्या थेट सीमेपर्यंत स्वाऱ्या करून त्यांना भंडावून सोडावें, असें अनेक वर्षेपर्यंत चाललें होतें. या काळांत त्यांच्यामध्यें केव्हांही एकजूट झाली असती तर त्यांनीं इंग्रज सुभेदारास समुद्राचें पाणी पीत पीत केव्हांच इंग्लंदला परत धाडला असता. परंतु आयर्लंद हा आपला देश व त्याच्या हिताकरितां आपण आपआपसातील वैमनस्य विसरून जावें, अशी कल्पना त्या लोकांस केव्हांही आली नाहीं. आयरिश लोक व्यक्तिशः इमानी आहेत. परंतु ज्याचें निमक ते खातात त्या साडेतीन हात देहधारी मूर्त व्यक्तीला त्यांचें इमान, त्यांची निष्ठा व त्यांची तरवार वाहिलेली असते. फारच झालें तर या इमानाची मजल एखाद्या घराण्यापर्यंत जाते; व ते पिढयानपिढया ठराविक अशा एकाच घराण्याचे ऋणानुबंधी मित्र अगर बंदे गुलाम होऊन राहिलेले आढळतात. यामुळें ज्यांना एखाद्या घराण्याचें बंधन नाहीं असे शेंकडो लढाऊ आयरिश लोक फक्त पैसे दिले असतां परकीयांकरितां स्वकीयांशीं लढण्यास मिळत; व आजपर्यंत इंग्रज प्रभूचा आयर्लंदवरील अंमल पुष्कळ अंशीं अशा प्रकारच्या आयरिश शिपायांच्याच तरवारीवर राखला गेलेला आहे. पण हें असें कसें ह्मणून हिंदुस्थानांतील लोकांनीं आश्चर्य करण्याचें कारण नाहीं. शिवाय ही स्थिति त्याकाळीं फक्त आयर्लंदांतच होती असेंही नाहीं. स्कॉटलंदमध्यें स्कॉट लोक इंग्रजांकरितां लढलेले आहेत; इंग्लंदांत कांहीं सॅक्सन लोकांनीं प्लांटेजनेट राजांचे वतीनें हत्यार उपसलें होतें; फ्रान्समध्यें जुलियस सीझरनें कित्येक फ्रेंच सरदारांची मदत घेऊनच रोमचा अंमल प्रथम बसविला; व स्पेनमध्यें मूरलोकांच्या झेंडयाखालीं कित्येक लढवय्या ‘सिड’ लोकांनीं लढून स्वदेश परकीयांच्या ताब्यांत देण्यास मदत केली होती.

# भाग ३ रा.

## आयर्लंदचा अर्वाचीन इतिहास.

आयर्लंदवर ब्रिटिश अंमल बसल्या नंतर नॉरमन लोकांच्या नेहमींच्या सढळ व उदार राज्यपद्धतीनें राज्यकारभार सुरू झाला असता तर आयर्लंदचा भावी छळ टळता. परंतु आयर्लंदांतील इंग्रजी अधिकाऱ्यांनीं इंग्लंदांतील अधिकाऱ्यांस नेहमीं असें भासविण्याचा क्रम ठेवला कीं, नॉरमन राज्यकर्त्यांच्या नेहमीच्या पद्धतीस अनुसरून जर कां आयरिश लोकांना सवलती मिळाल्या व उभयतांचा एकजीव होऊं दिला तर इंग्रज लोकांस तो संबंध फारच अहितकारक होईल. यामुळें इंग्रजांच्या खास अंमलाखालींही असलेल्या आयरिश लोकांस बहिष्कृत लोकांप्रमाणें वागविण्याची पद्धत पडली. आयर्लंदांत यावयाचें तें फक्त जमिनी अगर पैसा मिळविण्याकारितां; कायम राहण्याच्या हेतूनें यावयाचें नाहीं असा इंग्रज सरदारांनीं पायंडा घातला. आयर्लंदांत राहून तेथील लोकांशीं संसर्ग ठेविल्यानें आपल्या श्रेष्ठ चालीरीतीस बट्टा लागेल व कालांतरानें त्यांतील शुद्ध बीज नाहींसें होईल अशीच जणूंकाय त्यांस भीति वाटत होती ! यास्तव असेल ती रोकड घेऊन त्यांनीं स्वदेशास परत जावयाचें, व जमिनजुमला मिळाला असेल त्याचे वहिवाटीस आपल्या जातीचे मुनीम नेमून त्यांजकडून काय येईल तो वसूल घेऊन स्वदेशांत चैन करावयाची. हीच पद्धत आयर्लंदास अखेर अत्यंत घातक झाली. कारण तिच्याच योगानें देशांतील पैशास ओहोटी लागली, व सर्व धनसंपत्तीचें मूलस्थान जी जमीन ती हळूहळू परक्यांचें हातांत जाऊन तिची सुधारणा न होतां केवळ उपरी कुळांकडून तिची मशागत होऊं लागली.

जे इंग्रज लोक कायमची वसाहत करून आयर्लंदांत राहिले त्यांना आयरिश लोकांशीं निरंतर फटकून वागणें अर्थातच कठीण होतें. परंतु आयर्लंदांतील राजकारणी धोरणाचीं सूत्रें इंग्लंदांतून हालत असल्यामुळें,

व खुद्द इंग्लंदांत आयरिश लोकांबद्दल अनादर असल्यामुळें इंग्रजी वसाहतवाल्यांचें कांहीं चालेना. आयरिश लोकांशीं स्नेह ठेवावा, त्यांजवर ममता करावी, संकटसमयीं त्यांस मदत द्यावी व आपल्या चांगल्या चाली-रीती त्यांस शिकवून त्यांच्या चालीरीती आपण शिकाव्या असें एखाद्या वसाहतवाल्यास केव्हां केव्हां वाटे. परंतु तसें न करण्याबद्दल इंग्लंदांतून सक्तीचे हुकूम येत; व तसें करणारास शिक्षा देण्याकरितां कायदेही केले जात! उदाहरणार्थ, इ. स. १३६६ सालीं तिसऱ्या एडवर्ड राजाच्या कारकीर्दीत असा एक कायदा करण्यांत आला कीं, ‘ जो कोणी इंग्रज आयरिश भाषा शिकेल अगर बोलेल, आयरिश नांव आपल्या मुलास ठेवील, आयरिश स्त्रीशीं विवाह करिल, आयरिश दाईकडून आपल्या तान्ह्या मुलास पाजील, आयरिश वस्त्राचा अगर आयरिश तऱ्हेचा पोषाख करील, किंवा आयरिश चालीरीती अंगीकारील, त्यास फांशीची शिक्षा दिली जाऊन त्याची सर्व मालमिळकत सरकारजमा करण्यांत येईल ! ’ खुद्द आयरिश लोकांना वागविण्यासंबधानेंही असेच अन्यायाचे कायदे करण्यांत आलेले होते. आयरिश लोकांनीं तटबंदीच्या शहरांत राहतां कामा नये; आयरिश लोकांनीं इंग्रजी वसाहतवाल्यांचा अपराध केला असतां त्यांस फांशी द्यावें; परंतु इंग्रजांनीं आयरिश लोकांस मारिलें असतां त्यांस फांशीची शिक्षा देण्याचें कारण नाहीं. कां कीं, ते बोलूनचालून ‘ आयरिशच ’! आयरिश लोकांची मिळकत बळकावून घेतली, अगर आयरिश शेतकऱ्याचे शेतांत इंग्रजी लष्कराचा तळ पडून पिकाचा सत्यानास झाला व सगळ्या वर्षाची मेहनत एका रात्रींत फुकट गेली, तरी त्याला कोर्टांत दावा आणितां येत नसे ! या सर्वांचें कारण असें होतें कीं, आयरिश लोक हे खरोखरच रानटी आहेत, असा इंग्लंदांतील लोकांचा ग्रह होऊन बसला होता. इंग्रज लोक हे आधींच परके; व त्यांना आयरिश लोक रानटी असे वाटत यामुळें ते आयरिश लोकांशीं संबंध ठेवीत नसत. व कालांतरानें आयरिश लोकांस नाहींसे करून आपणच या नव्या भूमीचे रहिवासी मालक बनूं असें इंग्रजांस वाटे. शिवाय ज्या परकी लोकांचा अमल आयर्लंदांत चालू झाला होता त्यांचा राजा इंग्लदांत असे; व आयर्लंदचा स्वतः राजा असा कोणीच नव्हता; यामुळें या दोन लोकांचीं वैमनस्यें विकोपास जात अ-

सून त्यांस आळा घालणारा असा कोणीच नव्हता. अर्थात् एकदां लढाई जुंपली कीं ती संपेपर्यंत व संपल्यावरही अनन्वित कृत्यें एकसारखीं चालत. आयरिश लोकांचे पुरुषच काय पण बायका व मुलें हीं जरी इंग्रजांच्या हातीं लागलीं तरी त्यांस ते सर्रास व पद्धतशीर रीतीनें कापून काढीत. लढाई नंतर इंग्रजी शिपायांच्या टोळ्या 'बिजन' करण्यास निघत, आणि मग कोसच्याकोसपर्यंत जो ह्मणून जिवंत प्राणी सांपडेल त्याची कत्तल कर असा क्रम चालत असे. पण एका स्वारींत काम व्हावें तितकें फत्ते होणार नाहीं, व लोक पळून जाऊन तेवढ्यापुरते आपले प्राण वाचवूं शकतील, ह्मणून इंग्रजांनीं बिजन करण्याची दुसरी एक युक्ति काढली होती ती अशी कीं दरवर्षी ठराविक भागांमध्यें शिपाई शिरून दाणागोटा वैरणकाडी वगैरे जें कांहीं सांपडेल तें जाळून टाकीत असत. व यामुळें शिपायाच्या तरवारी पासून जरी लोकांनीं आपला बचाव केला तरी, भुकेनें हाल हाल होऊन कालावधीनें ते मरत. प्रसिद्ध इंग्रज कवी स्पेन्सर हा आयर्लंडांत असतांना त्याच्या नजरेस ज्या गोष्टी पडल्या त्याचें त्यानें भयंकर व हृदयद्रावक असें वर्णन केलेलें आहे. तो ह्मणतो—"जिकडे जावें तिकडे अरण्याच्या व रानाच्या कान्याकोंपऱ्यांत हातापायांवर खुरडत व रांगत असे लोक बाहेर पडतांना दिसत. त्यांना नुसते उभे राहण्यालाही त्राण नसे. तीं मृत्यूच्या दरबारांतून आलेलीं माणसें दिसत; व स्मशानांतील थडग्यांतून भुतानीं बोलावें त्याप्रमाणें खोल आवाजानें तीं बोलत. कच्चें मांस कोठें दिसलें न दिसलें कीं त्यावर आधाशीपणानें झडप घालून तीं तें तोडतोडून खात. व शेवटीं भुकेमुळें एकमेकांच्या अंगाचे चावे घेत." होलिन शेड यानें असें लिहून ठेवलें आहे कीं, ' नुकत्याच झालेल्या लढाई नंतर सुमारें शंभर मैलपर्यंत, मोठ्या गांवाखेरीज इतरत्र जिवंत मनुष्यचसें काय, पण श्वापदसुद्धां मला आढळून आलें नाहीं. स्त्रिया भुकेनें मरणोन्मुख होऊन पडलेल्या असून त्यांचीं पोरें त्यांना बिलगून त्यांच्या अंगचें मांस तोडीत असलेलीं कित्येक प्रवाशानीं पाहिलीं आहेत. '

जॉन राजपुत्राच्या कारकीर्दीत आयरिश राजेरजवाड्यांस आपण इंग्रजांकडून आतां खरेच जिंकलों गेलों अशी खूण पटूं लागली. कारण जॉन हा विक्षिप्त व अर्वाच्य होता. त्यानें आयरिश राजेरजवाड्यांच्या दाढ्या

उपटाव्या, व त्यांचीं सोंगें आणून थट्टा करावी असा क्रम सुरू केला. त्याच्यानंतर राजा दुसरा रिचर्ड हा गादीवर येईपर्यंत आयर्लंदकडे इंग्रजांचें दुर्लक्ष झालें व तेवढ्या अवधींत वसाहतवाल्या इंग्रजांचें आयर्लंदांत चांगलें बस्तान बसलें. वर सांगितलेले कायदे वसाहतवाल्यांस मनापासून आवडत नव्हते,व ते होतांहोईंतों त्या कायद्याचें उल्लंघनच करीत. यास्तव रिचर्ड राजानें फिरून एकवार ( इ. स. १३९४ ) शिस्त लावण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचें कांहीं एक चाललें नाहीं. नंतर सातव्या हेनरीनें या कामीं विशेष लक्ष घातलें. आयर्लंदांतील वसाहतवाल्यांनीं यापूर्वींच आपलें स्वतंत्र पार्लमेंट स्थापिलें होतें. या पार्लमेंटास तेराव्या शतकांतच सुरवात झाली होती, व चौदाव्या शतकामध्यें ती संस्था नांवारूपास व भरभराटीस आली होती. वसाहतीचें क्षेत्र बोलून चालून लहान होतें खरें; तथापि इंग्रज लोकांस पार्लमेंटच्या संस्थेचें एकप्रकारें बाळकडूच असल्यामुळें, वसाहतवाल्यांनीं त्या लहानशा क्षेत्रांतच आपल्या सभेची व्यवस्थित मांडणी केली होती; व तिजकडून पास झालेल्या कायद्याचा अंमल त्या क्षेत्रांत होत असे. परंतु या पार्लमेंटकडून लॅम्बर्ट सिमनेल ( इ. स. १४८७ ) व पर्किन वॉरबेक ( इ. स. १४९२ ) यासारख्या तोतयांस चिथावणी मिळे व इंग्लंदच्या राजांस त्यापासून त्रास होई. यामुळें या छोटेखानी पार्लमेंटचा कायदे करण्याचा हक्क नियमित करून त्या सभेचें महत्व कमी करण्याकरितां इंग्रजी सुभेदार सर एडवर्ड पॉइनिंग यानें 'पॉइनिंगस ऍक्ट' या नांवाचा कायदा पार्लमेंटाकडून करवून घेतला ( इ. स. १४९४ ). या कायद्यानें असें ठरलें कीं, विलायतेंतील राजा व त्याचे मांत्रिमंडळ यांची प्रथम संमति घेतल्यावांचून आयरिश पार्लमेंटनें कोणतेंही बिल पुढें आणूं नये; ही पार्लमेंट भरावयाची तीही राजाचे हुकुमावांचून भरूं नये; व ही पार्लमेंट पास करील त्या कायद्यास इंग्रजी राजाचा शिक्कामोर्तब झाल्याशिवाय कायदेशीरपणा आला असें मानूं नये. तथापि या कायद्यानें वसाहतवाल्यांच्या व्यावहारिक स्वातंत्र्यास फारसा धोका आला नाहीं. जे थोडे अमीर उमराव कायमची वसाहत करून राहिले होते त्यांना आयर्लंद हा स्वदेशासारखा वाटूं लागला होता व त्यांच्या स्वामिभक्तीचीं बंधनें शिथिल झालीं होतीं. आयरिश लोकांचे व त्यांचे व्यावहारिक संबंध दिवसेंदिवस दृढ होत चालले होते.

येवढयाशा आयर्लंदांत या वेळीं कमींतकमी साठ आयरिश संस्थानिक होते व ते आपलीं युद्धें, तह वगैरे गोष्टी स्वतःच्या जबाबदारीवर स्वतंत्रपणें करीत. तसेंच वसाहतीच्या क्षेत्रांतही तीस इंग्रज सरदार नांदत असून त्यांच्या अंगांत स्वातंत्र्याचें वारें खेळत होतें. हे सर्व जरी आपआपसांत भांडत तरी त्यांपैकीं कोणीही इंग्रजी राजाचें सार्वभौमत्व आपखुषीनें व कायमचें कबूल करण्यास तयार नव्हता. यामुळें या सुमारास इंग्रजी सार्वभौमाचें आयर्लंदावरील वर्चस्व अत्यंत निकृष्टदशेस आलें होतें. इंग्रजी वसाहतीच्या मुलखावर आयरिश लोक वारंवार स्वाऱ्या करीत; व ज्यानें परसत्तेचा पाय आयर्लंदांत प्रथम घुसविला त्याच डरमॉट मॅकमरो राजाचा एक वंशज या स्वाऱ्या करण्यांत कर्मधर्मसंयोगानें प्रमुख होता! परंतु आठवा हेनरी इंग्लंदचे गादीवर आल्यापासून ( इ. स. १५०९ ) फिरून पारडें फिरलें. त्यानें बहुतेक आयर्लंदावर आपला ताबा बसविला एवढेंच नव्हे; तर रोमन क्याथोलिक धर्माचा उच्छेद व त्याचे ठिकाणीं प्रॉटेस्टंट धर्माची स्थापना करण्याचा संकल्प करून, त्यानें आयर्लंदांत प्रॉटेस्टंटपंथी वसाहतवाल्यांचा भरणा करण्यास व क्याथोलिक लोकांच्या जमिनी काढून घेऊन त्या त्यांच्या स्वाधीन करण्यास सुरुवात केली. हेनरी निग्रही होता, पण तसाच थोडासा शहाणाही होता. त्यानें आयरिश राजेराजवाड्यांची खुशामत करून, इंग्रजी पदव्या व लांचलुचपत देऊन, त्यांना आपलेसें केलें; आणि उत्तम तऱ्हेच्या राजदरबारच्या चालीरीती व इंग्रजी विश्वविद्यालयाचें उच्च शिक्षण यांचा लाभ घेण्याकरितां आयरिश अमीरउमरावांनीं आपलीं मुलें इंग्लदांत पाठवीत जावीं, इंग्रजी भाषा वापरावी, इंग्रजी पेहराव करावे, असा त्यांचेकडून करार करून घेतला.

परंतु आयरिश लोकांच्या धार्मिक छळास येथपासून सुरुवात झाली. आजपावेतों रोमन क्याथोलिक धर्मोपदेशकांनीं विद्या, कला वगैरेंचें पालन पोषण केलें होतें त्यांवर गदा आली; क्याथोलिक लोकांचे मठ उध्वस्त होऊं लागले; त्यांतलें मौल्यवान् सामान लुटलें गेलें; मठवाशांची हकालपट्टी होऊं लागली; ज्यांनीं प्रतिकार केला त्यांस तुरुंगांत घालण्यांत आलें; क्याथोलिक–पंथी लोकांच्या मूर्ति, प्रतिमा व पवित्र वस्तु या भर चवाठ्यावर

आणून जाळल्या किंवा विकल्या जाव्या असें होऊं लागलें ! यामुळें अर्थात् आयरिश लोकांस इंग्रजी अंमलाचा कंटाळा येऊं लागला. परंतु या छळापासून प्रॉटेस्टंट पंथाचा प्रसार मात्र व्हावा तसा झाला नाहीं. मेरी राणीच्या कारकीर्दींत रोमन क्याथोलिक पंथास क्षणभर तेजी आली होती, परंतु ती लवकरच नाहींशी झाली. एलिझाबेथ राणीचे कारकीर्दीपासून इंग्लंदांत प्रॉटेस्टंट धर्माचा फैलाव होऊन त्यास कायमचा राजाश्रय मिळाला आणि तेव्हांपासून राजकारणास धर्मवेडाची जोड मिळून इंग्रज लोक व आयरिश लोक यांच्यामधील बेबनावास दुजोरा आला. स्कॉटलंदप्रमाणें आयर्लंदच्या लोकांच्या मनांत राजकीय मतापुरतीच तेढ असती तर ती कालांतरानें निघाली असती. परंतु धर्माची तेढ कोणत्याही देशांत अधिक जाचते; व त्यांतून आयरिश लोक धर्माचे बाबतींत अत्यंत निग्रही व हट्टी होते यामुळें ती त्यांस फारच जाचली.

एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीपासून ( इ. स. १५५८ ) पुढें कांहीं काळपर्यंत आयर्लंदास इंग्लिश राजकारणामध्यें एका विशेष प्रकारचें महत्व आलें. याचें कारण असें होतें कीं, या काळांत इंग्लंद व यूरोपांतील इतर कित्येक राष्ट्रें यांचीं युद्धें जुंपलीं. हीं युद्धें बहुधा धर्ममूलक होतीं; व इंग्लंदच्या रोमन क्याथोलिक शत्रूंना आयरिश लोक हे ऋणानुबंधी असे वाटूं लागले. आयर्लंद व इंग्लंद यांमध्यें फक्त सत्तर मैलांचें अंतर असल्यानें, इंग्लंदवर स्वारी करण्याचा प्रसंग आला असतां, परकी आरमारांस आयर्लंदच्या बंदरांचा आश्रय अत्यंत उपयोगी पडण्यासारखा होता. यामुळें फ्रान्स, स्पेन व हॉलंद यांचें लक्ष आयर्लंदकडे स्वाभाविक रीतीनें वेधलें, आणि इंग्लंदचें शत्रुत्व हा समानधर्म असल्यामुळें त्यांस तो देश प्रियही वाटूं लागला. अर्थात् इंग्लंदच्या प्रधानमंडळास आयर्लंदची काळजी पडली. व इ. स. १५६९ पासून पुढें कित्येक वर्षें त्यांनीं आयरिश रोमन क्याथोलिक लोकांवर करडी शिस्त धरून आयर्लंदचा लष्करी बंदोबस्तही अधिक केला. येथूनच आयर्लंदनें स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं केलेल्या युद्धास प्रथम प्रारंभ झाला. आयर्लंदच्या आधुनिक इतिहासांत जीं कित्येक नांवें कीर्तितेजानें झळकत आहेत तीं येथून पुढें ऐकूं येऊं लागलीं. या युद्धाचा प्रारंभ, आयर्लंदांत वसाहत केल्यामुळें तो

स्वदेश असें ज्यांस वाटूं लागलें होतें अशा एका इंग्रज सरदारानेंच आपल्या धर्ममतांच्या अभिमानाखातर केला (इ. स. १५७९). त्याचें नांव जिराल्डिन असें होतें. त्यानें मनस्टर प्रांतांत बंडाचा झेंडा उभारला. यावेळीं त्याचे साहाय्यास उत्तरेकडील आयरिश राजेरजवाडे गेले असते, तर इंग्लंदची सत्ता आयर्लंदांत राहती किंवा नाहीं हें संशयात्मकच आहे. परंतु मागें एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें अंतःकलहाचें वरदान आयरिश लोकांस फार जुन्या काळापासूनचें आहे. एलिजाबेथ इला फार चांगली राणी ह्मणतात; परंतु तिच्या कारकीर्दींतील या युद्धामध्यें जितकी निरपराधी आयरिश प्रजा प्राणास मुकली तितकी, दुष्टपणाबद्दल व क्रूरपणाबद्दल जिच्या नांवाचा इतिहासानें डांगोरा पिटलेला आहे अशा मेरी राणीच्या कारकीर्दींतही मुकली नव्हती. परंतु प्राणहानीपेक्षांही दुसरा एक घोर परिणाम झाला तो हा कीं, राजद्रोहाचे आरोपावरून मनस्टर प्रांतांतलि क्याथोलिक लोकांची कमींत कमी पांच लक्ष एकर इतकी जमीन सरकारजमा होऊन ती एलिझाबेथ राणीचे प्रॉटेस्टंट शिपायांस व सरदारांस वांटून टाकण्यांत आली!

जिराल्डिनचे बंडानंतर लवकरच दुसरें एक बंड झालें (इ. स. १५९८). यावेळीं उत्तरेकडील संस्थानिक उठण्याची पाळी असून त्यामध्यें ओनील व ओडॉनेल, अलस्टरमधील मांडलीक, हे पुढारी होते. ह्यू ओनील यानें इंग्रज सैन्याचा दोन लढायांमध्यें पराभव करून सर्व उत्तरभाग आपल्या ताब्यांत आणला; व असें झाल्यामुळें पूर्वी जिराल्डिनच्या बंडांतले जे लोक अवशिष्ट राहिले होते तेही त्यास येऊन मिळाले. परंतु या बंडाचा मोड शांततेच्या उपायांनींच झाला; व बंडवाल्यांच्या जमिनी खालसा न होतां त्यांस वरती इंग्रजी पदव्याही देण्यांत आल्या! जेम्सच्या कारकीर्दींत (१६०३–२५) आयरिश लोकांचा छळ झाला नाहीं, ही गोष्ट खरी. तथापि जित राष्ट्रांचें राष्ट्रीयत्व व स्वातंत्र्य–प्रेम नष्ट करण्याचे कामीं तरवारीपेक्षां राजदरबारच्या लेखणीचा उपयोग किती अधिक होऊं शकतो, हें आयरिश लोकांस कळून आलें. पाणीदार तरवार ज्यावेळीं चालत नाहीं अशा वेळीं गोड पण विषारी जीभ ही प्रसंगविशेषीं तितकेंच घातुक काम करूं शकते. उघड लढाई थांबली व कत्तल करण्याची मनाई झाली, तथापि दगलबाज मारेकऱ्यांस वावरावयास मोकळीक असतेच; आणि अशा दगल-

बाजपणानेंच, जे कित्येक पाणीदार आयरिश मांडलिक त्रासदायक व राजद्रोही असे वाटत होते त्यांचा वध करण्यांत आला. कित्येक मैत्रीच्या पाशांत सांपडून जन्माचे कैदी झाले; कित्येकांच्या काळजावर विषप्रयोगानें घाला पडला; कित्येक तर घरीं बोलाविलेल्या व पाहुणचार खाणाऱ्या पाहुण्याचे हातूनच गारद झाले ! ओनील व ओडॉनेल यांस पदव्या देऊन त्यांच्या जमिनी राखिल्या हें वर सांगितलें आहे. पण हें वैभव शाश्वत टिकणारें नव्हतें. डब्लिन येथील अधिकाऱ्यांनीं त्यांजवर फिरून गुप्त कटाचा आरोप लादून दरबारांत काम चालविलें, व राजद्रोही गुन्हेगार ह्मणून त्यांच्या नांवाची द्वाही फिरविल्यामुळें त्यांना देशत्याग करून परदेशांत आश्रय घ्यावा लागला. अलस्टर प्रांतांतील त्यांच्या व इतरांच्याही सुपीक जमिनी आतां मात्र कायमच्या खालसा करण्यांत येऊन त्यांच्यावर वसाहत करण्याकरितां इंग्लंदांतून तरुण सरदार, शेतकरी व बलुतेदार पाठविण्यांत आले. आयर्लंदांत इंग्रजांची कायमची वसाहत झाल्याखेरीज बंडखोर लोकांवर दाब राहणें शक्य नाहीं, अशी सल्ला लॉर्ड बेकन यानें दिल्यामुळें त्या गोष्टीचा येथून जोरानें उपक्रम झाला. एकंदर वीस लक्ष एकर जमीन खालसा झाली. त्यापैकीं उत्तम सुपीक व सोईची अशी पांच लक्ष एकर जमीन इंग्रज वसाहतवाल्यांस बहाल केली; व जी पंधरा लक्ष एकर जमीन रेताड, डोंगराळ अगर दलदलीची अशी उरली ती आयरिश लोकांस परत देण्यांत आली.आयर्लंदांत घुसलेले हे नवीन लोक शूर, साहसी व कल्पक होते यांत शंका नाहीं. शिवाय त्यांच्याजवळ उत्तम सामुग्री होती व त्यांस राजाश्रयही मिळालेला होता. यामुळें थोड्याच दिवसांत त्यांनीं त्या जमिनीची सुधारणा केली, ताली घातल्या, बंधारे उभारले, फळझाडें लाविलीं, आणि स्वतःकरितां घरें व देवळें बांधलीं. एकीकडे या बागाइतीच्या हिरवळींतून वर डोकें काढणारीं पांढऱ्या गच्चीचीं शुभ्र घरें व देवळांचे मनोरे डोळ्यांना रम्य दिसत खरे; परंतु अशा ह्या सौख्यनिधानापासून मैल अर्ध मैलाच्या अंतरावरच, भिकार खोपट्या घालून डोंगरकठाडीचा किंवा दलदलीच्या कांठाचा आश्रय करून, गुरांचे कळप पाळून निव्वळ त्यांच्या दूधदुभत्यावर उदरनिर्वाह करणारे व आपल्याच देशांत परकी झालेले आयरिश लोक कसे तरी दिवस कंठीत. व त्यांस पाहून कोणास वाईट वाटलें नसतें ?

जेम्सच्या कारकीर्दींत ज्याप्रमाणें अलस्टर प्रांतांत वसाहत वसविण्यांत आली, त्याचप्रमाणें त्याचा मुलगा चार्लस ( १६२५–१६४९ ) याचे कारकीर्दींत कॉनॉट प्रांतांत एक वसाहत वसली. या वसाहतीकरितां जमीन पाहिजे होती, ती लोकांच्या राजद्रोहाची ठराविक सबब यावेळीं न मिळाल्यामुळें न्यायमनसुब्याचा फार्स (इ. स. १६३५) करून व लोकांच्या हक्कावर गदा आणवून मिळवावी लागली. या न्यायमनसुब्याच्या कामीं ज्या ज्यूरर लोकांनीं सरकारास मदत केली त्यांचें कोटकल्याण झालें व ज्यांनीं विरुद्ध मतें दिलीं त्यांना दंड ठोठावण्यांत आले. एवढेंच नव्हे तर अशा बेलगामी ज्यूरर लोकांस मुळीं ज्यूरीवर नेमल्याच्या गुन्ह्याबद्दल शेरिफला मरेपर्यंत तुरुंगवास भोगावा लागला! परंतु पुढें लवकरच गांजलेले आयरिश लोक हत्यारें घेऊन उठले; व ओनीलच्या वीरवंशापैकीं सर फेलीम ओनीलचा पुढाकार त्यांस मिळाल्यामुळें त्यांनीं वसाहतींचा विध्वंस करून आपल्या जमिनी फिरून आपल्या ताब्यांत घेतल्या व प्रॉटेस्टंट लोकांची कत्तल केली (इ.स. १६४१). याला पोपिश बंड असें इंग्रजांकडून नांव देण्यांत आलें; परंतु हें धर्माकरितां बंड नसून नाहक जमिनी खालसा करणारांवर आयरिश लोकांनीं घेतलेला हा सूड होता. योग्य संधी मिळाली असतां नॉर्मन लोकांविरुद्ध सॅक्सन लोकांनीं, स्पॅनिश लोकांविरुद्ध डच लोकांनीं व फ्रेंच लोकांविरुद्ध सिसिलियन लोकांनीं जें केलें तेंच यावेळीं आयरिश लोकांनीं इंग्रजांविरुद्ध केलें. आयरिश रहिवाशांच्या हातून गेलेल्या जमिनी त्यांस परत मिळाल्या, ही न्यायाचीच गोष्ट झाली. परंतु पहिलें बंड, जसें, दुसरें बंड, व तें मोडतांना अमलांत आणलेले कडक उपाय, या सर्व व्यवहारांत उभयपक्षांकडून जीं अनन्वित कृत्यें घडलीं, तीं मात्र ईश्वराच्या घरीं कधींही रुजू होणें शक्य नाहीं. कोणी तरी प्रथम चूक करतो; व कुलागत लागून एकदां का रक्तस्राव झाला ह्मणजे मग वणवा पेटल्यासारखा होऊन सूड, त्यावर प्रतिसूड अशी परंपरा सुरू होते, ती कांहीं केल्या थांबत नाहीं. असो; इंग्लंदमध्यें राज्यक्रांति होऊन चार्लस राजाचा समाचार घेऊन नंतर ऑलिव्हर क्रामवेल हा आयरिश बंडवाल्यांकडे वळला (इ. स. १६४८). त्यानें ड्रॉघेडा व्रेक्सफर्ड वगैरे ठिकाणीं आयरिश लोकांची खुशाल कत्तल करविली; हजारों लोकांस गुलाम करून अमेरिकेस पाठ-

विलें; व हजारो लोक आपण होऊन देशत्याग करून फ्रान्स, स्पेन व अमेरिका या देशांत जाऊन परकी राजाच्या पदरीं नोकरी धरून राहिले. दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दीत ( १६६०–८५ ) आयर्लंदचे दिवस थोडेबहुत शांततेचे गेले. परंतु दुसऱ्या जेम्सच्या कारकीर्दीत ( १६८५–८८ ) फिरून अस्वस्थता माजली. इंग्रज लोकांनीं बंड करून जेम्सला पदच्युत केल्यावर तो फ्रान्सला पळून गेला व तेथून थोडीबहुत कुमक घेऊन आयर्लंदांत उतरला. या वेळीं टिरकॉनेल नांवाचा क्याथोलिक गव्हर्नर आयर्लंदांत होता. त्यानें राजाचा आदरसत्कार करून त्यास डब्लिन येथें गादीयर बसवून त्याचे नांवाची द्वाहीही फिरविली; व त्याजकडून आयरिश पार्लमेंट सभा बोलाविली. क्रॉमवेलनें ज्यांच्या जमिनी हरण केल्या होत्या त्या त्यांच्या त्यांस या पार्लमेंटनें परत दिल्या. पण लवकरच ( इ. स. १६९० ) तिसरा विलियम हा जेम्सच्या पाठोपाठ आयर्लंदांत आला, व बॉईन येथील लढाईत त्यानें आयरिश लोकांचा व जेम्सच्या पक्षाचा पराभव केला. यावेळीं लिमरिक येथील किल्लेदार सार्सफिल्ड यानें, 'क्याथोलिकांना प्रॉटेस्टंट लोकांप्रमाणेंच मी समबुद्धीनें वागवीन' असें राजाकडून वचन घेतल्यावर तह होऊन लढाई थांबली. व सार्सफिल्ड आपल्या शूर शिपायांसह फ्रान्सला निघून गेला. त्याची पाठ फिरतांच इंग्रजांस मुळींच दहशत न राहिल्यानें लिमरिकच्या तहाचीं कलमें धाब्यावर बसवून विलियमच्या प्रधानांनीं रोमन क्याथोलिक लोकांच्या जमिनी काढून घेऊन प्रॉटेस्टंट लोकांस फिरून परत दिल्या; व क्याथोलिक लोकांचें मतस्वातंत्र्य हिरावून घेऊन त्यांजविरुद्ध कायदे करण्यास सुरवात केली. तिसरा विलियम हा स्वभावतः उदार व शहाणा होता असें ह्मणतात; परंतु इंग्लिश प्रॉटेस्टंटलोकांच्या मदतीनें तो राजा झालेला असल्यामुळें त्याला आपली सदसद्विवेकबुद्धि गुंडाळून ठेवावी लागत असे. लिमरिक शहराचें नांव उच्चारतांच अजूनही आयरिश लोकांस इंग्रजी लोकांनीं केलेल्या विश्वासघाताची आठवण होते, व ते जळफळूं लागतात. विलियमच्या हातून सुमारें दहा लक्ष एकर जमिनींचा बेवारा झाला. त्यानें आपल्या रखेल्या औरतेपासून तों मोठमोठ्या अमीरउमरावांपर्यंत क्याथोलिक लोकांच्या जमिनींची खैरात केली. तसेंच ज्या लोकांस खुषामतीखातर

पेनशनें व देणग्या द्याव्याशा त्याला वाटल्या त्या सर्व त्यानें आयर्लंदच्या महसुलांतून देण्याचा सपाटा चालविला. एवढेंच नव्हे, तर वुड नांवाच्या एका मानसपुत्रास त्यानें आयर्लंदांत नवीं नाणीं पाडण्याची सनद दिली. या सनदेप्रमाणें सुमारें दहा लक्ष रुपयांचे हाफ पेन्स व फार्दिंग पाडावयाचे होते; व या सर्व व्यवहारांत जो चार लक्ष रुपये नफा उरला असता तो स्वतः वुड आणि डचेस ऑफ केंडाल नांवाची विलियम राजाची एक रांड या उभयतांनीं मिळून वांटून घ्यायाचा होता. या सर्व पाजीपणावर डीन स्विफ्ट यानें आपल्या " ड्रेपियरचीं पत्रें " नामक उत्कृष्ट लेखांत कडक टीका केली. व यामुळें तो कपटाचा गोंधळ उघडकीस येऊन वेळींच थांबला.

क्याथोलिक लोकांचे भयंकर छळास तिसऱ्या वुइलियम राजाचे कारकीर्दीपासून खरी सुरवात झाली. इकडे हिंदुस्थानांत धर्मांचे बाबतींत इंग्रजांचा जो संबंध आला त्यावरून पाहतां, ते अत्यंत सहिष्णु अशी जी त्यांची कीर्ति इतिहासकार गातात ती अगदीं खरी आहे, असें मानण्यास बरेंच सबळ कारण आहे. विशेषतः त्यांच्यापूर्वी या देशांत जे पोर्तुगीज व दच वगैरे युरोपियन लोक आले होते, त्यांच्या धर्मसंबंधीं वर्तनांत व इंग्रजांच्या वर्तनांत जमीनअस्मानचें अंतर आहे यांतही शंका नाहीं. परंतु ही कीर्ति अगदीं अलीकडची व फक्त हिंदुस्थानापुरतीच आहे. हिंदुस्थानांत त्यांनीं धर्मछळ कधींही केला नाहीं. व सरकारी खजिन्यांतून प्रजेचा थोडाबहुत पैसा जरी अद्यापि ख्रिस्ती धर्ममंडळ पोसण्याकडे खर्च होतो, तरी त्याचबरोबर पूर्वीच्या देशी राजांनीं चालविलेलीं बरींच वर्षासनें व देवस्थानेंही ते अद्यापि चालवीत आहेत. यामुळें धर्मांचे बाबतींत आयरिश लोकांचा त्यांचे राज्यकर्त्यांकडून जो छळ झाला त्याची कल्पना आह्मां हिंदुस्थानांतील लोकांना करतां येणें कठिण आहे. आयर्लंदांत मात्र त्यांनीं धार्मिक बाबतींत राज्यकर्ते या नात्यानें वर्तन केलें तें सर्वस्वीं गर्हणीय होतें. धर्मवेडानें डोकें फिरलेल्या एखाद्या व्यक्तीनें अत्याचार केला तर ती गोष्ट निराळी. परंतु राज्यकर्त्यांनीं जुलमी कायदे करून व ते कडक रीतीनें बजावून प्रजेचा धार्मिक बाबतींत नाहक छळ करणें हें अत्यंत लांछनास्पद होय. आयरिश लोकांनीं आपल्या धर्ममतांची चिकाटी सोडली नाहीं, व केव्हां पोपचा पक्ष तर केव्हां रोमन क्याथोलिक पं-

थीय इंग्रजी राजांचा पक्ष धरून त्यांनीं बंडें केलीं होतीं, हें खरें आहे. तथापि, सदरहु बंडें मोडून गुन्हेगारांस कडक शिक्षा होऊन शांतता प्रस्थापित झाल्यावरही त्यांचा जो छळ झाला तो निवळ नाहक झाला. धार्मिक बाबतींत इंग्रज राज्यकर्त्यांचें आयरिश लोकांशीं वागण्याचें जें धोरण होतें त्यांतील मुख्य हेतु हा होता कीं, हरएक उपायांनीं आयरिश रोमन क्याथोलिक लोकांचा पाडाव होऊन त्यांना आधार असा कोणताच उरूं नये; व सर्व बाजूंनीं गांजून जाऊन त्यांनीं प्रॉटेस्टंट धर्म स्वीकारावा. या दृष्टीनें त्यांचेविरुद्ध वेळोवेळीं ( इ. स. १६९२–१७२७ ) जे अनेक कायदे करण्यांत आले त्यांस 'पोपरी लॉज' असें ह्मणतात; व त्यांतील एकंदर मथितार्थ खालीं लिहिलेप्रमाणें होता.

इंग्लंदांत व आयर्लंदांत सर्वत्र 'प्रायमोजेनिचर' या कायद्याच्या तत्त्वाचा प्रसार असे. या कायद्याचे योगानें मयताचे इस्टेटीस, विशेषतः स्थावर मिळकतीस, फक्त त्याचा थोरला मुलगा वारस होत असतो. आपल्या इकडे वतनें व जहागिरी यांस हाच कायदा लागूं आहे; व समाजाचे दृष्टीनें पाहतां असा निर्बंध असण्यांत एकप्रकारचा फायदाही असतो. परंतु रोमन क्याथोलिक लोकांपुरता हा कायदा बदलून टाकून असें ठरविण्यांत आलें होतें कीं, मयताच्या मिळकतीस सर्व मुलगे सारखेच वारस असून दर डोईस मिळकतीची वांटणी करितां यावी. असें झाल्यानें जीं घराणीं पूर्वीं धनसंपन्न व बलाढ्य होतीं त्यांच्या वांटण्यावर वांटण्या होऊन प्रत्येक कुटुंब व व्यक्ति निर्बल होई व कंगाल बने. बरें, अशा रीतीनें निःसत्व व निर्बल झालेल्या कुटुंबांच्या पुढाऱ्यांनीं नवीन संपत्ति मिळवावी ह्मटलें, तरीही इंग्रजी कायदा त्यांचे मार्गांत आडवा येई. कारण या कायद्याप्रमाणें, रोमन क्याथोलिक लोकांना मृत्युपत्रानें किंवा लग्नांत आंदण म्हणून अथवा इतर देणगीच्या प्रकारानें मिळकत मिळूं नये असें ठरविलें गेलें होतें. त्यांनीं कोणास कर्ज दिलें असतां त्याबद्दल त्यांना ताराणादाखल स्थावर मिळकत खरेदी अगर गहाण लावून घेतां येत नसे. रोमन क्याथोलिक बापाचा मुलगा अगर नवऱ्याची बायको यांस धर्मांतर करण्याची परवानगी होती; इतकेंच नाहीं तर धर्मांतर करण्यापासून त्याचा अगर तिचा प्रत्यक्ष ऐहिक फायदा

व्हावा, अशीही योजना कायद्यानें करण्यांत आली होती. बापास ज्याप्रमाणें मुलाला स्वसंपादित मिळकतीपैकीं कांहीं एक न देतां घरांतून घालवून देतां येतें, त्याचप्रमाणें आयर्लंदांत रोमन क्याथोलिक बापांस वागविण्याची त्यांच्या प्रॉटेस्टंट मुलांस परवानगी दिलेली होती. मुलग्याची प्रतिकूलता असेल तर त्याचे मताविरुद्ध आपली मिळकत बापास विकतां अगर त्यावर बोजा उत्पन्न करतां येत नसे. तसेंच कोर्टांत वेळोवेळीं बापावर फिर्यादी करून त्याजकडून शपथेवर त्याच्या मिळकतीची नोंद त्यांस दाखल करवून घेतां येई; व अशा रीतीनें बापाकडून सक्तीनें पोटगी अगर हिस्सा मुलास मिळवितां येई. अगर बाप आपली मिळकत उधळून टाकील किंवा तिचा नाश करील अशा खोट्या सबबीवर मुलाच्या हिताकरितां ह्मणून न्यायकोर्टास वाटेल तेव्हां ती जत करून कोर्टाचे ताब्यांत ठेवण्याचा हुकूम करितां येई. कोणच्याही कारणानें बापाच्या ताब्यांतील मिळकतीची वाढ झाली आहे, अशी सबब प्रॉटेस्टंट मुलास पुढें आणतां येण्यासारखी असल्यास दाव्याचें नवीन कारण घडलें असें समजून मुलाला आपल्या क्याथोलिक बापास फिरून वाटेल तेव्हां कोर्टापुढें ओढतां येई. बाप रोमन क्याथोलिक असतां आईनें धर्मांतर करितांच तिला आपलीं मुलें नवऱ्याचे ताब्यांतून काढून आपल्या ताब्यांत मागण्याचा हक्क येत असे; व त्यांच्या शिक्षणाकरितां व पालनपोषणाकरितां वाटेल तेवढी रक्कम त्याच्या मिळकतींतून तिला देण्यांत येई. धर्मांतर करण्याच्या सबबीवर बायकोस नवऱ्याकडून भरपूर पोटगी मागतां येई व मिळे. मग तिनें जरी त्याचे अनेक अपराध केले असले व केवळ गैरवर्तणुकीकरितां तिला वेगळें रहावयाचें असलें तरी तिला न्यायकोर्टांतून पोटगी देण्याचा हुकूम होई. सर्वांत मुख्य मुद्याची गोष्ट ह्मटली ह्मणजे ही कीं, रोमन क्याथोलिक पक्षकारांचा न्याय प्रॉटेस्टंट लोकांकडूनच केला जाई !

रोमन क्याथोलिक लोकांस या कायद्यामुळें दुसऱ्याकडून मिळकत मिळण्याची आशाच नव्हती. परंतु स्वतः कामधंदा अगर रोजगार करून द्रव्य मिळविणें हेंही मुष्किलीचें झालें होतें. सरकारी नोकरी त्यांस मिळणें तर अर्थातच अशक्य होतें. सर्व खात्यांतून त्यांस 'मज्जाव' होता. परंतु

वकिलीसारखे खाजगी कायदेशीर धंदेही त्यांस करण्याची परवानगी नव्हती. प्रॉटेस्टंट वकील व ब्यारिस्टर यांस आपल्या पदरीं रोमन क्याथोलिक पंथाचा कारकूनही ठेवणार नाहीं, अशी शपथ घ्यावी लागत असे. रोमन क्याथोलिक लोकांनीं खाजगी शाळा घालून शिक्षकाचा धंदा करणें हेंही कायद्यानें निषिद्ध ठरविलें होतें; फार काय पण खाजगी रीतीनें कुटुंबांत रोमन क्याथोलिक शिक्षक ठेवणें हा गुन्हा मानला जाई! बरें, रोमन क्याथोलिक लोकांनीं परकी देशांत जाऊन शिक्षण मिळवावें असें ह्मटलें तर तिकडूनही बंदोबस्त करण्यांत आला होता. परकी देशांत असतां, केवळ अज्ञानावस्थेंत व कायद्याचें ज्ञान नसल्यानें चुकूनमाकून केव्हां रोमन क्याथोलिकपंथी शाळेंत शिकल्याचा जर पुढें मागें कोणावर आरोप शाबीत झाला, तर लागलींच त्याची सर्व मिळकत जप्त करितां येत असे; व तो गुन्हेगार कायद्याच्या संरक्षणास बाह्य मानिला जाई. बरें, एकदां देशत्याग केल्यावर कायमचेंच बाहेर रहावें पण शिक्षण मिळवावें असें ह्मटलें तर अशा कामीं देशांतून बाहेर पैसे पाठविणारावर खटला होत असे. रोमन क्याथोलिक शाळेंत शिकणें हा जेवढा गुन्हा तेवढाच गुन्हा अशा शिक्षणास द्रव्याची मदत करणें हा होता. कोणी आपला मुलगा परदेशांत शिक्षणाकरितां पाठविणार आहे अशी वर्दी लागतांच त्यास कोर्टापुढें खेंचून आणून त्याजकडून जामीन मागतां येत असे; व एखाद्याचा मुलगा नुसता परदेशांत गेला इतकें शाबीत झालें ह्मणजे मग, तो विद्यार्जनाकरितां गेला नसून इतर कामाकरितां गेला आहे हें सिद्ध करण्याचा बोजा त्याजवर टाकिला जाई. एखाद्यानें परदेशांत शिक्षणाकरितां पैसे, हुंडी वगैरे पाठविल्याचें सिद्ध झालें तर त्यास जबर दंड होई, व त्याच्या विरुद्ध ज्यानें चहाडी केली असेल त्या चहाडखोरास त्या दंडापैकीं निम्में बक्षीस मिळे! कोणच्याही राज्यांत हत्यारेंपात्यारें जवळ बाळगण्याची परवानगी निवळ धर्ममतांवर अवलंबून नसते. परंतु आयर्लंदांतला प्रकार कांहीं वेगळाच होता. तेथें रोमन क्याथोलिक लोकांत अगदीं शांतता नांदत असतांही जवळ हत्यारें बाळगण्याची परवानगी नव्हती; व शस्त्रें जवळ बाळगल्याच्या सबबीवर त्यांच्या घरांची हवी तेव्हां झडती घेण्याची मोकळीक अधिकाऱ्यांस असे!

या छळाचें मुख्य कारण इंग्लंदचें धर्मवेड होय. परंतु धर्मवेडास व्यापारविषयक आप्पलपोटेपणाची ही भर पडली; व या दुहेरी छळामुळें अठरावे शतकांत आयरिश लोकांच्या दुःस्थितीचा कडेलोट झाला. देशांत परस्परांस पाण्यांत पाहणारे असे दोन वर्ग होते. पैकीं क्याथोलिक हे एकंदर लोकसंख्येपैकीं शेंकडा नव्वद व प्रॉटेस्टंट वगैरे शेंकडा दहा. परंतु या नव्वदांचे हातांत लागवडीच्या एकंदर जमिनीपैकीं फक्त एकदशांश जमीन असून इतर दहांचे हातीं बाकीची नऊदशांश जमीन होती. अर्थात् पहिल्या वर्गास ती पुरत नसे व दुसऱ्यास तिचें काय करावें हें सुचत नसे. आयर्लंदांत दलदली फार, शेतांतून नहर काढून दिल्याखेरीज पीक पिकण्याची मुष्कील. पण हें पडलें खर्चाचें काम; व कर्ज काढून तें करावें ह्मटलें तर क्याथोलिक लोकांस जमीन गहाण ठेवतां येत नसे. पिकाचे जमिनींत बटाटे व ताग यांचें तेवढें पीक चांगलें पिके. पण बटाट्यांस रोग पडण्याचा संभव फार व एखादे वर्षी रोग पडला ह्मणजे नुसता दुष्काळ. तागाचें पीक बरें होई; परंतु ताग व तागाचें कापड परदेशांत पाठविण्यास फार प्रतिबंध. ज्या जमिनींत पीक होण्यासारखें नसे त्या जमिनींत उत्तम गवत उगवे. अर्थात् शेतकरी लोक गुरांचे कळप पाळीत, व आपल्या गरजेपेक्षां अधिक गुरें उरतील तीं बाहेर विकावयास पाठवीत. पण इंग्लंदांतील शेतकऱ्यांचें यामुळें नुकसान होई, ह्मणून आयर्लंदांतून गुरें इंग्लंदांत पाठवूं नये असा कायदा करण्यांत आला! मग आयरिश लोक शिलकीं गुरें मारून खारलेल्या मांसाचा व्यापार करूं लागले. यालाही प्रतिबंध करण्यांत आला. तेव्हां गुरांचे कळप पाळण्याचें सोडून देऊन आयरिश शेतकरी मेंढ्या पाळूं लागले. लवकरच त्यांस उत्तम फर्मासीची लोंकर तयार करतां येऊं लागली, व देशांत लोंकरी कापड विणण्याचे शेंकडों कारखाने उभारले गेले. हें पाहून इंग्लिश व्यापाऱ्यांचे पोटांत फिरून दुखूं लागलें. त्यांनीं गिल्ला करून १६९९ सालीं पार्लमेंट सभेकडून कायदा करवून घेतला, त्याच्या योगानें आयरिश लोकांस लोंकर अगर लोंकरी कापड देशाबाहेर पाठविण्याची मनाई झाली; आणि हा उत्कृष्ट व जगप्रसिद्ध व्यापार बसत चालला. इतर व्यापारासंबंधानेंही तीच गोष्ट. आयरिश जहाजांवर एक प्रकारचा बहिष्कार घालण्यांत येऊन, त्यांतून आलेला

माल इंग्लंदच्या किनाऱ्यावर उतरूं देऊं नये, असाही नियम कांहीं दिवस अंमलांत होता. बरें, परदेशांशींच व्यापार करावा व इंग्लंदचा त्रास समूळ चुकवावा ह्मटलें, तर आयर्लंद व सर्व युरोपखंड यांच्या दरम्यान इंग्लंद हातपाय पसरून बसलेलें. यामुळें निर्गत व आयात दोन्ही प्रकारच्या व्यापारास इंग्लंदाकडून अडथळा होई; व केवळ कायदा मोडून दंडेली केल्याशिवाय आयरिश लोकांस परदेशांशीं परस्पर असा कोणताच व्यवहार करितां येईनासा झाला. इंग्लंद हें ब्रिटिश राज्याचें पुढचें दार व आयर्लंद हें त्याचें परडें, अशी स्थिति असल्याप्रमाणें व्यापारविषयक कायद्याचें सर्व धोरण इंग्रजांनीं आपल्या हातीं ठेविलें होतें. सर्व व्यवहारांत फायदा पुढील दारानें वागणाऱ्या यजमानाचा; व परसांत राहणाऱ्या या आयरिश राष्ट्रानें इंग्लंदच्या मर्जीप्रमाणें वागून त्याचें कवडीचेंही नुकसान न होईल अशा रीतीनें आपला व्यवहार ठेवला पाहिजे अशी कायद्यानें सक्ती करण्यांत आली होती. आधींच आयर्लंद देश दगडी कोळसा वगैरे खनिज संपत्तीच्या अभावामुळें उद्योगधंद्यांस अनुकूल असा नव्हता; व सर्व भिस्त शेतकीवर असे. परंतु इंग्लंदनें शेतकीची ती तशी व व्यापारधंद्यांची ही अशी वाट लावल्यानें आयर्लंद हें अगदीं कंगाल राष्ट्र बनलें. वास्तविक आयर्लंदांत उद्योगधंद्याची शक्य तितकी वाढ होऊं दिल्यानें आयरिश लोक सधन झाले असते व सधनतेमुळें संतोष आपोआप उत्पन्न होतो. परंतु इंग्रजी व्यापाऱ्याला आपल्या ताळेबंदापलीकडे कांहीं दिसत नाहीं. त्याच्या तात्पुरत्या फायद्याकडे नजर देऊन मुत्सद्यांनींही आयरिश लोकांच्या व्यापारांत हात घातला; व आपण जित लोक आहों सबब आमच्या जेत्यांनीं वाटेल त्या कामांत आपला हट्ट चालविला तरी तो आह्मांस चालूं देणें भाग आहे असें त्यांनीं आयरिश लोकांस शिकविलें. ब्रिटिश पार्लमेंटनें व्यापारविषयक कायदे केल्याचें वर सांगितलेंच आहे. परंतु तेच कायदे आयरिश पार्लमेंट सभेकडून मंजूर झाल्याशिवाय त्यांचा अमल होणें शक्य नव्हतें, सबब ते कायदे मंजूर करण्याबद्दल इंग्लिश प्रधानमंडळाकडून आयरिश पार्लमेंट सभेला जरूरीचे व नेटाचे हुकूम सुटले. वास्तविक हे कायदे आयरिश पार्लमेंटनें मंजूर करण्यास सांगणें ह्मणजे एखाद्या मनुष्यास आपल्या हातानें आपल्या गळ्यावर सुरी ठेवून आत्मह-

त्या करण्याचा हुकूम करण्यासारखेंच चमत्कारिक व क्रूरपणाचें होतें. परंतु इंग्रजी प्रधानमंडळास असा हुकूम करण्यास लज्जा वाटली नाहीं. इतकेंच नव्हे तर आश्चर्याची गोष्ट ही कीं, हा हुकूम अमान्य केला असतां आपल्या अस्तित्वावरच गदा येईल या भीतीनें आयरिश पार्लमेंटनें तो हुकूम अक्षरशः अमलांतही आणिला. हा चमत्कारिक व अमानुष हुकूम करितांना नेहमींच्या त्यांच्या वहिवाटीप्रमाणें इंग्रजी प्रधानमंडळानें आयरिश पार्लमेंटच्या तोंडास एक मधाचें बोट लावून ठेवलें होतें. तें असें कीं लोंकरीच्या व्यापारास प्रतिबंधक असा कायदा आयरिश पार्लमेंटनें केला असतां, आयर्लंदांतील तागाच्या व कापसाच्या व्यापारास आपण मदत करूं व उत्तेजन देऊं असें त्यांनीं अभिवचन दिलें होतें. व या मधाच्या बोटास तें अमृतरसाचेंच बोट आहे असें मानून, आयरिश पार्लमेंटनें पुढें आलेला विषाचा पेला कसा तरी तोंड वाईट करून प्राशन केला. परंतु विषानें आपलें काम बिनचूक केलें; प्रधानमंडळाच्या वचनांतील अमृत मात्र एकदम गुप्त झालें. आयरिश पार्लमेंटसभेनें कायदा करून देशांतून बाहेर जाणाऱ्या लोंकरीच्या कापडावर इतकी भारी जकात बसविली कीं ती देऊन बाहेर कापड विकावयास पाठविणें मुळींच फायदेशीर होऊं नये. व अशा रीतीनें शब्दांनीं नाहीं तरी कृतीनें आपला लोंकरीचा व्यापार आयरिश लोकांनीं आपल्या हातानें बंद केला. पण प्रधानमंडळानें जो मोबदला देण्याचें वचन दिलें होतें त्याची वाट काय झाली हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या वचनाप्रमाणें आयर्लंदांत ताग व कापूस यांच्या कापडास उत्तेजन देण्याचें बाजूसच राहिलें; परंतु उलट स्कॉलंदांतील व इंग्लंदांतील या कापडाचा व्यापार करणाऱ्या लोकांस इंग्लंदनें पैशाची मदत देऊन आयरिश व्यापाऱ्यांस एक नवीन सवत मात्र उत्पन्न केली. शिवाय खुद्द आयर्लंदास बाधक होईल अशा रीतीनें, इंग्लंदांत परदेशाहून येणाऱ्या कापडावर जकात बसविली. इंग्लंदनें केलेले हे व्यापारविषयक कायदे धर्मविषयक कायद्याइतकेच अन्यायाचे होते. आयर्लंदच्या जमिनींत भौतिक संपत्ति व मौल्यवान द्रव्यें जरी फारशीं नव्हतीं, तरी होतीं तेवढ्याचा फायदा जर आयरिश लोकांस अबाधितपणें घेतां आला असता तर त्यांची स्थिति साधारणतः बऱ्या प्रका-

रची राहिली असती. आयर्लंदास चारही बाजूंनीं समुद्रकिनारा व त्यामध्यें बरींचशीं बंदरें असून, खाड्यांच्या तोंडांतून आंत पुष्कळ दूरवर व्यापारी गलबतें व महागिऱ्या जाऊं शकतात. व इंग्लंद, फ्रान्स, अमेरिका वगैरे देश फारसे दूर नसल्यामुळें या लहानशा देशांतील व्यापाऱ्यांस व्यापाराचे कामीं पुरून उरण्याइतका वाव सहज मिळाला असता. परंतु सुमारें १६६३ पासून इंग्रजी मारवाड्यांची करडी नजर आयर्लंदवर फिरली. व पुढें सुमारें ३०।३५ वर्षांत, कोळी जसा माशीस आपल्या धाग्यांनीं वेढून टाकून तिची हालचाल बंद पाडतो त्याप्रमाणें, ब्रिटिश पार्लमेंट सभेनें कायद्यांवर कायदे करून व अन्यायाच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या काढून आयर्लंदच्या व्यापाराचा सांगून सवरून व दिवसाढवळ्या खून केला ! डीन स्विफ्ट यानें आपल्या एका लेखांत असें ह्मटलें आहे कीं, ' आयर्लंदला इतकीं बंदरें खुलीं असतांना इंग्लंदनें तीं असून नसल्यासारखीं केलीं; डोळस मनुष्याचे डोळे बांधून, त्याच्या कानांत गुडद्या घालून, तोंडांत बोळा बसवून व त्याचे हातपाय बांधून तुरुंगांत टाकण्याप्रमाणें इंग्लंदनें आयर्लंदची अवस्था केली ' ! देशांतील सुपीक जमीन परक्यांचे हातीं गेल्यामुळें आयरिश प्रजा आधींच निःसत्व झालेली होती, व तशांतून व्यापारविषयक कायद्यांच्या योगानें एकट्या लोंकरीच्या धंद्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या सुमारें ५०००० कुटुंबांची वाताहत होऊन गेली ! प्रजा निर्धन झाल्यानें व तिला नुसत्या शेतकीवर अवलंबून रहावें लागल्यानें दुष्काळाची पीडा वारंवार होऊं लागली. कर देण्याचें त्राण प्रजेमध्यें राहिलें नाहीं. सरकारी तिजोरी रिकामी पडूं लागली. यामुळें लोकोपयोगी खर्चांत काटकसर करणें भाग झालें. सर्व देश जावें तिकडे उदासवाणा भासूं लागला. व या देशांत मनुष्यवस्ती खरोखरीच आहे काय ? या देशांत धर्म, कायदा या गोष्टींचीं नांवें तरी लोकांस माहीत आहेत काय ? अशी शंका परक्या प्रवाशांस क्षणभर उत्पन्न होते,अशा अर्थाचे तत्कालीन लेख सांपडतात. अठराव्या शतकाच्या पहिल्या दहा वीस वर्षांत तागाच्या व्यापारास पुनरुत्तेजन देण्याचे थोडेबहुत प्रयत्न झाले; परंतु कोणताच धंदा सुधारून नांवारूपास येण्यास देशांत भांडवल राहिलें नव्हतें; व कोणास हौसही उरली नव्हती. आयरिश पार्लमेंट सभेनें इ. स. १७०३, १७०५ व १७०७ या सालीं सर्वानुमतें ठराव

मंजूर करून लोकांस असें जाहिर केलें कीं, आयर्लंदांतील लोकांनीं फक्त आपल्या देशांत तयार झालेलीं वस्त्रप्रावरणें वापरावीं व आपल्या घरच्या सामानसुमानांत, स्वदेशांत तयार न झालेला असा कोणताही पदार्थ ठेवूं नये. कारण स्वदेशी मालास उत्तेजन दिल्याचे योगानें गरीब लोकांस पोटास मिळतें व राजकीय दृष्टयाही राज्याचा त्यांत फायदा असतो. सन १७०७ सालीं तर या ठरावास अनुसरून परकीय मालावर बहिष्कार घालण्याच्या निश्चयाप्रमाणें स्वतः वर्तन करण्याविषयीं पार्लमेंटच्या सभासदांनीं उघडपणें शपथाही घेतल्या. व ही शपथ आह्मी पाळूं तरच आह्मी नांवाचे आयरिश खरे, असा इकरार त्यांनीं केला. याच सुमारास डीन स्विफ्ट यानें देशाच्या सद्यःस्थितीस अनुलक्षून तीव्र व जळजळीत असे लेख प्रसिद्ध केले. आयर्लंदांत बहिष्काराचा उपदेश असा त्यानेंच प्रथम आरंभिला. तो जसा विनोदी तसाच उपरोधिक लिहिण्यांत अत्यंत कसलेला असा विद्वान लेखक असल्यामुळें त्याचे लेख इंग्रजांस फार झोंबले. परंतु देशांतील लोकांच्या स्वाभिमानास उत्तेजन देण्याचें मोठें कार्य त्यानीं केलें. तथापि या असल्या प्रयत्नांचा उपयोग एकदम होऊं शकत नाहीं; व अर्थातच आयरिश लोकांस अठराव्या शतकांतील पहिलीं पांच पन्नास वर्षेंपर्यंत दारिद्र्यरूपी अग्नींत होरपळावें लागलें. सन १७२८ सालीं शेरिडन नांवाच्या एका लेखकानें असें लिहून ठेवलें आहे कीं, ' आयरिश लोकांच्या दारिद्र्याचा खरोखर कळस झाला. त्यांच्या घरांत व उकिरड्यांत फरक दिसून येत नाहीं. व आपल्या गुरांचें रक्त व शेतांतील झाडपाला यांजवर त्यांचा उदरनिर्वाह चालतो' ! अठराव्या शतकाच्या मध्यभागाच्या सुमारास दारिद्र्य, दुष्काळ व तापाच्या भयंकर साथी इत्यादि आपत्तींनीं आयर्लंदची सुमारें चार लक्ष प्रजा मृत्युमुखीं पडली. गांवच्या गांव उजाड व बेचिराख झाले. अशा प्रसंगीं साधारण ज्यांच्या जवळ थोडाबहुत द्रव्यसंचय आहे अशांनाच तो पुरण्याची पंचाईत, मग त्यांतून गरिबांस साहाय्य देऊन त्यांचे प्राण वांचविणें त्यांच्या हातून कितपत होणार ? शेतकीच्या कामीं इंग्रज लोक क्याथोलिक लोकांचे दावेदार होतेच; पण व्यापार व उद्योगधंदे यांचे कामीं त्यांनीं प्रॉटेस्टंट लोकांचेही पोटावर पाय आणला. आपण प्रॉटेस्टंट लोकांच्या वसाहती आयर्लंदांत मुद्दाम होऊन वसविल्या, व त्यांचे हातून क्याथो-

लिक लोकांवर दाब बसविण्याचा जो आपल्या पूर्वजांचा मूळचा हेतु तो साध्य होण्यास निदान प्रॉटेस्टंट वर्गांत तरी संतोष व समाधान राखणें जरूर होतें, ही गोष्ट अगदीं साध्या तारतम्याच्या मनुष्यासही कळण्यासारखी होती. परंतु कालांतरानें इंग्रज लोकांची दृष्टि कोती झाली, व क्याथोलिक लोकांप्रमाणें प्रॉटेस्टंट वसाहतवाले हेही त्यांस शत्रू असे वाटूं लागले. अशा रीतीनें द्रव्यदृष्टीचा व आप्पलपोटेपणाचा पगडा मुत्सद्दिगिरीवर बसून इंग्रज लोकांनीं आयर्लंदच्या हिताकडे काडीइतकेंही लक्ष न पुरवितां हात साधला तेथवर आयरिश लोकांस जुलमाच्या घाण्यांतून रगडून काढलें. व यामुळें अठराव्या शतकाच्या मध्यभागीं आयरिश लोकांस जितकी हीन दशा प्राप्त झाली होती तितकी, या सुधारलेल्या ह्मणविणाऱ्या राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं, दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रास केव्हांही आलेली इतिहासांत आढळून येत नाहीं.

पण व्यक्ति काय किंवा राष्ट्र काय, त्याच्या दुःखाचा कळस झाला ह्मणजे भावी सुखाचा उदय होण्याची वेळ जवळ आली असें हटकून समजावें. " नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण " ही केवळ अद्भुत कविकल्पना नव्हे, तर जगाच्या दररोजच्या अनुभवाची गोष्ट आहे. जगांतील स्थित्यंतरें घडवून आणण्याची विधात्याची अशी एक विचित्र योजना असते कीं, सुखाचें मूळ दुःखांत व दुःखाचें मूळ सुखांत गोंवलेलें असतें. प्राणिमात्र जन्मास आला कीं, पुढें त्याचा मृत्यू घडवून आणणाऱ्या रोगाचें बीज त्याच्या शरीरांत जन्माबरोबरच उत्पन्न होतें; व एक प्राणिवर्ग मृत्यु पावून त्याच्या देहाचें पृथक्करण होण्याचा अमंगल प्रसंग हा दुसऱ्या एखाद्या प्राणिवर्गाच्या जन्माचा सुमुहूर्त असतो. सुखदुःखात्मक स्थित्यंतरांची ही अशी गुंतागुंत झालेली असते, व राष्ट्रांचे इतिहासांत ती फार उत्कृष्ट तऱ्हेनें पाहण्यास सांपडते. आयर्लंदच्या लोकांशीं वागतांना केवळ आपल्या हिताकडे पाहून इंग्रजांनीं जे कायदे केले त्यांचा परिणाम असा झाला कीं, शेवटीं ते कायदेच निरुपयोगी होऊन रद्द करावे लागले; व छळल्यामुळें आयरिश लोक चिरडून गेले तरी सर्वस्वी नष्ट न होतां त्यांच्यामध्यें राष्ट्रीयत्व उत्पन्न होण्यास मदतच झाली. धर्मछळामुळें शेंकडों आयरिश घराणीं उघळून देशोधडीस गेलीं व त्यामुळें

प्रथम आयर्लंदचें प्रत्यक्ष नुकसान झालें ही गोष्ट खरी. परंतु देशत्याग केलेल्या या घराण्यांस अमेरिका, फ्रान्स वगैरे परदेशांत सुख मिळालें. आपल्या अंगच्या गुणांचा विकास करण्यास त्यांस तेथें वाव मिळाल्यामुळें ते लोक सधन झाले. आणि शिपाईगिरी व मुत्सद्दीगिरी इत्यादि बाबतींत नांवलौकिक मिळवून त्यांनीं स्वदेशाचें मुख परदेशांत उज्ज्वल केलें. पण त्याहूनही महत्वाची अशी एक गोष्ट होती ती ही कीं, परदेशांत राहून या लोकांनीं स्वदेशाची निरंतर काळजी बाळगिली; राष्ट्रीय स्वातंत्र्याविषयीं खुल्या दिलाचे उद्गार स्वदेशांतील लोकांचे कानांवर नित्य घालून त्यांचें धैर्य कायम राखिलें; व हरएक प्रकारच्या स्वदेशी चळवळींस द्रव्याचें भरपुर साहाय्य केलें. देशत्याग केलेल्या या आयरिश लोकांचें प्रस्थ परदेशांत कालांतरानें इतकें माजलें कीं, त्यांच्यामुळें इंग्लंदवर परचक्र येण्याची अगर आयर्लंदावर परकी राजाची स्वारी होऊन तो देश इंग्रजांचे हातून जाण्याचीही भीति उत्पन्न झाली. जे हजारो क्याथोलिक लोक फ्रान्स व अमेरिका यांमध्यें जाऊन आश्रय घेऊन राहिले होते ते कांहीं गप्प बसलेले नव्हते. तिसऱ्या जॉर्ज राजाच्या कारकीर्दींत या दोन्ही राष्ट्रांचें व इंग्लंदचें वैर माजलें तेव्हां, असंतुष्ट व दुःखी अशा आयरिश क्याथोलिक लोकांनीं या देशांमध्यें जो द्वेषाचा विषवृक्ष लाविला होता त्याचीं फळें इंग्लंदास चाखावीं लागलीं. अमेरिकेंमध्यें इंग्रजी अंमलाच्या विरुद्ध बंड होऊन अमेरिकन लोकांनीं पूर्ण स्वतंत्र असें स्वराज्य स्थापिलें (इ. स. १७७६), त्या कामीं आयरिश लोकांनीं यथाशक्ति हातभार लाविलेला होता. तीन चार पिढ्यांपर्यंत ज्यांची अमेरिकेंत वसाहत झाली होती, व ज्यांना पूर्ण स्वातंत्र्य व समान हक्क यांचें सुख अबाधित मिळालें होतें, त्यांना अमेरिका ही आपली दुसरी मातृभूमीच असें वाटूं लागावें यांत कांहीं नवल नाहीं. परंतु इंग्रजांविरुद्ध अमेरिकन लोकांस मदत करण्यांत आयरिश लोकांचा दुसराही एक हेतु होता; व तो हा कीं, अमेरिकेचें उदाहरण पाहून आयरिश लोकांनींही आयर्लंद स्वतंत्र करण्यास उद्युक्त व्हावें व अमेरिकन लोकांनींही कृतज्ञपणानें त्यांस मदत देऊन मित्रऋण फेडावें. अमेरिकेंत स्वातंत्र्याकरितां युद्ध झाल्यानंतर लवकरच फ्रान्समधील राज्यक्रांति घडून

आली, व नेपोलियन बोनापार्टच्या सैन्यांत पुष्कळ आयरिश लोकांनीं नोकऱ्या धरल्या. या दोन्ही चळवळींचा परिणाम आयर्लंदावर झाला.

देशांत राहून ज्या क्याथोलिक लोकांनीं "पीनल कोडाचा" छळ सोसला त्यांचीं मनें त्या छळाचे योगानें सकस व खंबीर झाली. ज्यांच्या योगानें प्रजेस दहशत वाटूं लागेल असा अदमास होता, त्या कायद्यांनीं कांहीं दिवसांनीं धैर्यच शिकविलें; व कायदेकानूंबद्दल साधारणतः भीतिमूलक असा जो आदर उत्पन्न व्हावा तो जाऊन त्याचे जागीं, एकंदरीनें त्यांची हेटाळणी व अवमानना करण्याचीच बुद्धि उत्पन्न झाली. ज्यांच्या योगानें न्यायास मदत होते अशा कायद्यांविषयीं जसा आदर उत्पन्न होतो, तसाच ज्या कायद्यांच्या योगानें अन्यायास उघड मदत होते त्यांबद्दल अनादर वाटावा हें स्वाभाविकच आहे. आयरिश पीनल कोडाचा एक उद्देश क्याथोलिक लोकांस प्रॉटेस्टंट करण्याचा होता; परंतु तो न साधून उलट असें झालें कीं, ते भाविक लोक क्याथोलिक पंथाचे अभिमानीच अधिकाधिक होऊन धर्मगुरूंच्या कह्यांत पूर्वींहून जास्त गेले. ही धर्मनिष्ठा पाहून प्रॉटेस्टंट लोकांस क्याथोलिक लोकांबद्दल आदर वाटूं लागला व कित्येक प्रॉटेस्टंट लोकांनीं क्याथोलिक पंथ पत्करला. धर्मोपदेशकाचा धंदा करणें हा पीनल कोडानें गुन्हा ठरविला होता; परंतु क्याथोलिक लोक आपल्या धर्मोपदेशकांना प्राणापलीकडे जपूं लागले. व सर्वांत गमतीची गोष्ट ही कीं, ज्यांना क्याथोलिक लोकांवर चौकीदार किंवा पाहारेकरी ह्मणून नेऊन बसविलें होतें, त्या प्रॉटेस्टंट लोकांच्या मनांतच क्याथोलिक लोकांबद्दल सहानुभूति उत्पन्न झाली. प्रॉटेस्टंट पंथांतील सुसंस्कृत मनाच्या पुढाऱ्यांना आपल्या धर्माचा योग्य अभिमान होता; आणि अशा रीतीनें अन्यायानें व जुलमानें धर्ममतांतर करविणें हें कायदे करणारांना जसें लाजिरवाणें आहे, तसेंच अशा सक्तीनें धर्मांतर करून प्रॉटेस्टंट पंथांत लोक सामील झाल्यानें त्या धर्मास अधिक भूषणही नाहीं व बळही येणार नाहीं, अशा बुद्धीनें त्यांनीं उघडपणें पीनल कोडावर टीका करण्याचा उपक्रम केला. याच सुमारास व्यापारविषयक कायद्यांचाही जाच होऊं लागला. व्यापारधंद्यांस प्रॉटेस्टंट लोकांना क्याथोलिक लोकांची गरज भासूं लागली, व इंग्लंदांतील व्यापाऱ्यां-

च्या मत्सरास आपण उभयतां सारखेच बळी पडत आहों, असें त्यांच्या प्रत्ययास येऊन समदुःखीपणामुळें सहिष्णुतेस अधिक जोर आला. रोमन क्याथोलिक लोकांबद्दल जरी सहिष्णुता उत्पन्न झालेली होती, तरी त्यांना सर्वस्वी बंधमुक्त करून बरोबरीचे हक्क द्यावे किंवा नाहीं, याविषयीं प्रथम प्रॉटेस्टंट पुढाऱ्यांमध्यें बराच मतभेद होता. लॉर्ड चार्लेमांटसारखे मुत्सद्दी प्रॉटेस्टंट व प्रेसबिटरेनीयिन यांचे दरम्यानचा भेदभाव मोडून दोघांस सारखे हक्क असावे असें ह्मणण्यास तयार होते, परंतु क्याथोलिक लोकांस हक्क देण्याची त्यांची तयारी नव्हती. परंतु ग्रॅटनसारख्या दूरदर्शी देशभक्तांची अशी खात्री होऊन चुकली होती कीं, नागरिकत्वाच्या हक्का-संबंधानें क्याथोलिक काय, प्रॉटेस्टंट काय व प्रेसबिटेरेनियम काय-सर्वांस सारखे हक्क असल्याशिवाय राष्ट्रीयत्वाच्या खऱ्या कल्पनेच्या परिपाक होणें शक्य नाहीं. कारण, मूठभर प्रॉटेस्टंट लोक इकडे क्याथोलिक समाजास आपला वैरी करून इंग्रजांशीं कसे झुंजणार? ग्रॅटन यास राष्ट्रीयत्वाची खरी कल्पना आलेली होती. या कल्पनेचा उदय झाला असतां किरकोळ भेदभाव नाहींसे होतील अशी त्याची खात्री होती. व रोमन क्याथोलिक लोकांस नागरिकत्वाचे हक्क देण्याचे कामीं प्रॉटेस्टंट लोक पुढारीपण घेतात, अशीं उदाहरणें हळूहळू दिसून येऊं लागलीं. याप्रमाणें कारणानें कारण बळावत चाललें. व्यापाराविषयक कायदे व पीनल कोड हे दोन्ही कायदे रद्द व्हावे, असें प्रॉटेस्टंट व क्याथोलिक या दोघांसही वाटूं लागलें. परंतु आयर्लंदांतील पार्लमेंट अगदीं नादान बनलें होतें. त्याचीं सर्व सूत्रें प्रधानमंडळाच्या हातीं होतीं. तीं इतकीं कीं, ढळढळीत आय-रिश लोकांच्या हिताविरुद्ध असणाऱ्या गोष्टीही हें प्रधानमंडळ या पार्लमेंटा-च्या हातून घडवून आणी. या गोष्टीचा प्रॉटेस्टंट लोकांस वीट आला, व आयर्लंदांतील उभयवर्गांच्या सर्व सुखदुःखांचें मूळ आयरिश पार्लमेंटच्या पारतंत्र्यामध्यें आहे, अशी त्यांची खात्री झाली. पण या पार्लमेंटमध्यें फक्त प्रॉटेस्टंटच असत; क्याथोलिक लोकांस सभासद होण्याचा अधिकार नव्ह-ता. अर्थात् पार्लमेंट सभेचें स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याची जबाबदारी प्रॉ-टेस्टंट लोकांवरच पडली. व अशा रीतीनें अठराव्या शतकाचे अखेरीस आयरिश लोकांच्या दुःखांधकाराचा कडेलोट होऊन, धर्मसहिष्णुतेच्या

अरुणोदयानें दिशा उजळण्याचे संधीस, राष्ट्रीय चळवळीचें पुढारीपण वसाहतवाल्या प्रॉटेस्टंट लोकांकडेच गेलेलें पाहिलें ह्मणजे दैवाच्या अघटित घटनापटुत्वाचें कौतुक करावें तितकें थोडें, असेंच वाटूं लागतें !

यावेळीं परचक्र येऊन आयर्लंद हातचा जाण्याची इंग्लंदास इतकी कांहीं भीति वाटूं लागली होती कीं, खुद्द आयर्लंदांतील प्रॉटेस्टंट लोकांकडून शिपाईगिरीची मदत न झाली तर, केवळ इंग्रजी सैन्य व आरमार यांचे योगानें परचक्र टाळणें व रोमन क्याथोलिक लोकांचें बंड मोडणें शक्य नाहीं, अशी इंग्लंदची खात्री झाली. यास्तव प्रॉटेस्टंट लोकांस स्वयंसैनिकांचीं पथकें तयार करण्यास अधिकाऱ्यांकडून हुकूम मिळाला, व त्याचा फायदा घेऊन प्रॉटेस्टंट लोकांनीं खास आपलें असें पन्नास हजार लढाऊ लष्कर सजविलें. या स्वयंसेवक सैनिकांच्या चळवळीचा फायदा या वेळीं आयर्लंदास बराच झाला. वास्तविक परचक्राची भीति केव्हांच फारशी खरी ठरली नाहीं, परंतु देशांतल्या देशांत आपणांस पन्नास हजार स्वयंसेवकांचें सैन्य वाटेल तेव्हां उभारतां येतें, ही जाणीव पटल्यामुळें आयरिश प्रॉटेस्टंट लोकांच्या मनांत स्वातंत्र्यबुद्धीचा अंकूर सहजच उमटला. या प्रॉटेस्टंट लोकांस ज्याप्रमाणें क्याथोलिक लोकांना आपल्या ताब्यांत ठेवावें असें वाटत होतें, त्याचप्रमाणें इंग्रजी अंमलापासून स्वतंत्र व्हावें असेंही वाटत होतें. आयरिश लोकांचें ह्मणून एक जें पार्लमेंट आयर्लंदांत होतें त्यांत प्रॉटेस्टंट आयरिशांचेंच बहुमत असल्यामुळें हें पार्लमेंट स्वतंत्र करून आपणच आपलें राज्य चालवावें, व ' पॉइनिंगस ॲक्टानें ' इंग्रजी पार्लमेंटाचें जें वर्चस्व स्थापित करण्यांत आलें होतें तें नाहींसें करावें, अशी त्यांस बुद्धि उत्पन्न झाली. या सुमारास चार्लमॉट, ग्रॅटन, फ्लड वगैरे मुत्सद्दी आयरिश पार्लमेंटचे नेते असल्यामुळें त्यांनीं स्वयंसैनिकांचा फायदा घेऊन आयरिश स्वातंत्र्याचा हक्क नेटानें पुढें मांडिला. अमेरिकेंतील ताजें उदाहरण डोळ्यापुढें ढळढळीत उभें असल्यामुळें आयरिश लोकांचा हक्क नाकबूल करण्याचे वाटेस इंग्रजी प्रधानमंडळ गेलें नाहीं. व अखेर सन १७८२ सालीं, आयरिश पार्लमेंट ही स्वतंत्र असून आयर्लंदचा सर्व राज्यकारभार आपल्या अखत्यारीवर करण्याचा तिला अधिकार आहे, असें इंग्लिश पार्लमेंटनें ठरविलें.

अनेक प्रकारांनीं आयरिश लोक इतक्या अवनत स्थितीस आलेले असतांही लौकरच त्यांचें पारडें जड कसें झालें, याचीं एक दोन बाह्यकारणें वर सांगण्यांत आलेलींच आहेत. परंतु या कार्याचीं अंतस्थ कारणेंहीं मनन करण्याजोगीं आहेत. यावेळीं आयरिश समाजाच्या एका भागांतील स्थिति जरी शोचनीय होती, तथापि पुढारी होण्यास लायक असा दुसरा जो भाग समाजाचा होता, त्याची स्थिति चांगली होती; व एका भागाच्या अवनत स्थितीमुळें सुस्थिति असलेला हा दुसरा भाग त्याप्रमाणानें अधिक खुलून दिसे. या पूर्वी नुकतेच स्विफ्ट बार्कले वगैरे प्रख्यात लेखक व तत्ववेत्ते व पार्नेल सारखे कवि आयर्लंदांत होऊन गेले; प्रख्यात हेनरी ब्रूक हा डब्लिन येथेंच वर्तमान पत्राचा धंदा करी. डब्लिन येथील तत्वज्ञानप्रसारक मंडळ आपल्या कीर्तीच्या कळसास याच वेळीं जाऊन पोहोंचले होतें. शिवाय १७३१ मध्यें व १७४४ मध्यें विद्यावर्धक अशा आणखी दोन मंडळ्या स्थापित झाल्या. पैकीं एकीचें नांव डब्लिन सोसायटी असें होतें; व तिनें आयर्लंदांतील शेतकी, उद्योगधंदे व ललितकला यांची सुधारणा करण्याविषयीं अत्यंत परिश्रम घेतले. फ्रान्समध्यें राज्यक्रांतीचे आधीं हरएक प्रकारचें ज्ञान मिळविण्याविषयीं ज्या प्रकारची अत्युत्कट इच्छा जनसमाजामध्यें दिसून आली, त्याचप्रकारची इच्छा आयरिश लोकांमध्यें सन १७५० च्या सुमारास दिसून येऊं लागली होती. अठराव्या शतकाचे पहिल्या पांच पन्नास वर्षांत आयर्लंदमध्यें चित्रकलाही उदयास आलेली असून त्या काळच्या लंडन येथील चितार्‍यांत एक आयरिशमनच प्रमुख होता. देवालयें व घरें बांधणें हीं कामें या सुमारास बेसुमार वाढून त्यांतील कामावर आयर्लंदांतील स्वदेशी अशा शिल्पकलेचा छाप दिसून येत होता. देशांतील उद्योग धंदे स्वावलंबनाचे तत्वावर वाढविले पाहिजेत व आयरिश उद्योगधंद्यास दडपून टाकणारे असे कायदे असतांही त्यांतून आपलें डोकें वर काढलेंच पाहिजे, असें तत्ववेत्ता बार्कले हा मोठ्या कळकळीनें याच सुमारास प्रतिपादन करूं लागला. व लोकांनाही त्याचा उपदेश आवडूं लागला. धार्मिक बाबतींत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांच्यामध्यें व तशीच प्रॉटेस्टंट व प्रेसबीटरेनीयन्स यांच्यामध्यें जरी फूट होती तरी शिक्षणाबद्दलची काळजी व कळकळ सर्वांमध्यें सारखीच दिसून येई.

आयर्लंदच्या राज्यकारभाराचा खर्च इंग्लंदच्या राजानें आपल्या उत्पन्नांतून करावा असें होतें; व हा खर्च जोंपर्यंत उत्पन्नांतून भागत होता, तोंपर्यंत आयरिश पार्लमेंट सभेस धाब्यावर बसविण्याची प्रवृत्ति राजाची सहजच असे. परंतु हा खर्च जेव्हां उत्पन्नांतून भागेनासा झाला तेव्हां आयरिश लोकांवर कराचा बोजा वाढविण्याचें कारण पडूं लागलें. व आजपर्यंत पार्लमेंटसभा होतां होईतों न बोलवावयाची, असा जो प्रघात होता, तो बदलून जाऊन सभेच्या बैठकी वरचेवर भरविण्यांत येऊं लागल्या. कारण, आयर्लंदांत झालें तरी लोकनियुक्त पार्लमेंट सभेनें कोणताही कर बसविल्याशिवाय त्याचा वसूल करणें हें बेकायदेशीर मानलें जात असे. अर्थात् नवीन कर मंजूर करणें अगर न करणें ही पार्लमेंट सभेच्या हातची एक कायदेशीर सत्ता असल्यामुळें आपली स्थिति सुधारणें व आपलें गमावलेलें स्वातंत्र्य परत मिळविणें या कामाकडे राजाविरुद्ध या सत्तेचा उपयोग करावा, अशी सभेंतील लोकांस व आयरिश मुत्सद्यांस सहजच इच्छा उत्पन्न होऊं लागली. आयरिश लोक व इंग्रज लोक याजमध्यें असलेल्या स्वाभाविक हितशत्रुत्वाचे नवीन नवीन मुद्दे लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं लागले. आयरिश लोक जे कर देत त्यांतील पुष्कळ पैसा पुष्कळशा रिकामटेकड्या इंग्रजांस अगर इंग्रजी अधिकाऱ्यांस पेनशन अगर देणगीदाखल दिला जात असे. सरकारी हुद्याच्या व पगाराच्या मोठमोठ्या जागांसंबंधानें हिंदी लोक व इंग्रज यामध्यें जशाप्रकारचा तंटा आहे, तशाप्रकारचा तंटा आयर्लंदांत अठराव्या शतकांत माजला होता. इंग्रजी अधिकाऱ्यांची सत्ता पुष्कळ बाबतींत प्रॉटेस्टंट वसाहतवाल्यास जुलमाची वाटे. व ही सत्ता नियमित केली पाहिजे व हें भांडण भांडण्यास क्याथोलिक लोकांस सवलती देऊन त्यांची मदत घेणें अगत्याचें आहे, असें त्यांस वाटूं लागलें. आपण दोघें एकाच नावेंत आहोंत त्याअर्थी नावेंत बसून एकमेकाशीं न भांडतां दोघांसही इष्ट व प्रिय असा जो स्वातंत्र्याचा किनारा त्याजकडे ही नाव दोन्ही धर्मांच्या लोकांनीं वल्हवीत नेऊन तडीस लाविली पाहिजे, असे विचार उभयपक्षांच्या मनांत येऊं लागले. यामुळें या सुमारास क्याथोलिक व प्रॉटेस्टंट दोन्हीही धर्मांचे लोक राष्ट्राच्या स्वातंत्र्याविषयीं सारख्याच उत्सुकतेनें बोलूं व लिहूं लागले.

या वेळीं आयरिश राष्ट्रास कांहीं थोडाकालपर्यंत उज्ज्वल स्वरूप प्राप्त झालेलें होतें. सन १७८२ सालीं आयरिश पार्लमेंटसभेस स्वातंत्र्य मिळण्याच्या पूर्वींचा संधिकाल व तें मिळाल्यानंतरचीं पहिलीं पांच दहा वर्षें आयर्लंदचा यशोदुंदुभी चोंहोंकडे वाजत होता. केवळ क्षणभर टिकणारी अशी ही विजेची चमक होती; परंतु तिनें पाहणाराचे डोळे दिपवून टाकले होते यांत शंका नाहीं. देशामध्यें विद्या, कला, उदारमतें, बंधुप्रेम, धैर्य, धाडस व वक्तृत्व हे सर्व ग्रह एकसमयावच्छेदेंकरून उच्चीचे आल्यासारखे भासत होते ! या कालावधीस 'ग्रॅटनची पार्लमेंट' हें नांव सर्व इतिहासकारांनीं दिलेलें आहे व तें यथार्थही आहे. ग्रॅटन हा कशाप्रकारचा मुत्सद्दी होता हें पुढें चरित्रमालेंत दिलेल्या त्याच्या चरित्रावरून वाचकांस दिसून येईलच. येथें इतकेंच सांगितलें असतां पुरे होईल कीं, त्याच्यासारखे निर्मळ व सतेज मुत्सद्दी खुद्द इंग्लंदांतही फार थोडे झाले. या दहा वीस वर्षांत आयर्लंदमध्यें भाग्योदयाची जी लाट चहूंकडून आली होती तिच्या डोक्यावर ग्रॅटन हा एखाद्या ताऱ्याप्रमाणें चमकत होता. तसेंच त्याच्या बरोबरीचे जरी नव्हेत तरी त्याच्या खालोखाल फ्लड, हाचिन्सन्, पॉनसनबी वगैरे नांव घेण्यासारखे इतर मुत्सद्दीही या वेळीं आयरिश पार्लमेंटमध्यें होते. आणि पिट् व फॉक्स यांसारखे मुत्सद्दी याच वेळीं ब्रिटिश पार्लमेंटमध्यें असतां तिचें तेज अधिक किंवा आयरिश पार्लमेंटचें तेज अधिक असा भ्रम लोकांच्या डोळ्यांस कांहीं वेळ पडला ! पार्लमेंट स्वतंत्र झाल्यावर तिची सुधारणा करणें, ह्मणजे देशांतील सर्व वर्गांच्या प्रजेस प्रतिनिधित्वाचा फायदा यथाप्रमाण मिळवून देणें, रोमन क्याथोलिक लोकांस प्रॉटेस्टंट लोकांबरोबर समान हक्क देणें, व देशास सांपत्तिक सुस्थिति येईल अशा प्रकारच्या कायद्यांचें प्रवर्तन करणें, हें कर्तव्य आयरिश पुढाऱ्यांवर ओघानेंच येणार होतें. हें काम पुढें सुमारें सोळा वर्षें चालू राहिलें. परंतु दरम्यान इंग्रज व आयरिश लोक यांच्या हितसंबंधांमध्यें विरोधाचे असे अनेक प्रसंग उत्पन्न झाले, व आयरिश पार्लमेंटांतील बरेच सभासद स्वार्थपरायणतेमुळें इंग्रजी प्रधानमंडळाचे लगामीं असल्यामुळें फार बखेडा होऊं लागला. स्वयंसेवकांचीं पलटणें तयार होऊन बसलेलीं होतीं, त्यामुळें इंग्लंदास कायमची भीति मनांत उत्पन्न झाली होती.

पार्लमेंटचें स्वातंत्र्य त्यांनीं मागितलें व त्यांस दिलें; परंतु या स्वातंत्र्याचा फायदा घेऊन आयरिश लोकांनीं पहिली गोष्ट केली ती ही कीं, त्यांनीं व्यापारास प्रतिबंध करणाऱ्या कायद्यांवर गदा आणली. त्याच्या मागून पार्लमेंटची अंतःसुधारणा—ह्मणजे आयरिश मताचें प्राबल्य व आजपर्यंत आयर्लंदच्या पैशावर खुशाल चरण्याची सवय झालेल्या धष्टपुष्ट इंग्रजांच्या खुराकावर हल्ला, हाही वाढून ठेवलेलाच होता. धर्मस्वातंत्र्याच्या गोष्टी लोक बोलूं लागलेच होते. अशा स्थितींत स्वयंसेवकांचें सैन्य आपल्या तरवारीच्या जोरावर काय वाटेल तें मनांत आणील व काय वाटेल तें करील, अशी भीति आयर्लंदांतील इंग्रजी अधिकाऱ्यांस पडली. पण खड्गदेवतेचें आवाहन जितकें सोपें असतें तितकें विसर्जन सोपें नसतें. व आयर्लंदांत या काळीं अधिकाऱ्यांनीं आपल्या खुषीनें व स्वतःच्या हुंकारमत्रानें खड्गदेवतेची प्राणप्रतिष्ठा केलेली असल्यामुळें तिचें विसर्जन करण्यास तिजवर अक्षता टाकण्याचें धैर्य त्यांस एकदम होईना. हळू हळू हें धैर्य त्यांस प्राप्त झालें; व स्वयंसेवक सैनिकांच्या बाजारबुणग्याचा उत्साहही कमी झाला. तथापि उपसलेली तरवार रक्ताचा नैवेद्य मिळाल्याखेरीज फिरून म्यानांत जात नाहीं, व अखेर आयर्लंदांत रक्तपात होण्याची वेळ लवकरच आली. इंग्रजी पार्लमेंटचा अंमल आयर्लंदावर विनाकारण राहणें हेंच सर्व कटकटीचें मूळ आहे, व तें मूळ उच्छेदून टाकीपर्यंत आयरिश पार्लमेंटची सुधारणा होणें शक्य नाहीं, अगर त्याच्या स्वातंत्र्याचा फायदा पूर्णपणें घेतां येणार नाहीं अशा बुद्धीनें वूल्फटोन या नांवाच्या तरुण, तरतरीत व धाडसी देशभक्तानें 'युनायटेड आयरिशमेन' या नांवाची संस्था काढून तिच्या शाखा अमेरिका व फ्रान्स यांमध्यें स्थापून, अखेर सन १७९८ सालीं फ्रेंच लोकांची मदत घेऊन बंड केलें, व आयर्लंदमध्यें प्रजासत्ताक—राज्य स्थापण्याचा घाट घातला. परंतु त्या बंडाचा वेळींच मोड झाला; व ही संधि साधून वुइल्यम पिट या इंग्रजी मुख्यप्रधानानें आयरिश पार्लमेंटांतलि लोकांस पदव्या व पैसा यांचा यथास्थित लांच चारून, आयरिश पार्लमेंट मोडून तें इंग्रजी पार्लमेंटास जोडण्याचा ठराव पास करून घेतला. पिटचा डोळा आयरिश पार्लमेंटवर पहिल्यापासूनच होता. त्याला ती अस्तनीं-

सर्व देशभर रोग पडून भयंकर दुष्काळ सुरू झाला. व जे देशभक्त पार्लमेंटचें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां व कागदीं घोडे नाचविण्याकरितां आकाश पाताळ एक करीत होते त्यांना, आपल्या देशबांधवांची आपत्ति व उपासमार दिसत असतांही गरीबांस अन्न देऊन त्यांचे प्राण वांचविण्याची बुद्धि होत नाहीं असें पाहून, 'धिःकार असो तुम्हांला व तुमच्या चळवळीला' असें शेतकरी लोक म्हणूं लागले. ओकॉनेलच्या पक्षाचे धिंडवडे होण्याचें आतां बाकी राहिलें नव्हतें. परंतु दैवदुर्विपाक परिपूर्ण व्हावयाचा होता म्हणूनच कीं काय, ओकॉनेलच्या वजनाचें दडपण कमी होतांच निंदकांची हलकी जिव्हा स्वैरपणें नाच करूं लागली. कोणी त्याचेवर 'रिपील' सभेचे पैसे खाल्ल्याचा आरोप करूं लागले; कोणी त्याला म्हातारचळ लागून चेष्टा आठवूं लागल्या असें म्हणूं लागले. खरोखर निंदकांनीं तरी काय करावें? जें दिसे तें ते बोलत. ओकॉनेलला याच सुमारास थोडेंसें वेड लागल्यासारखें झालें होतं व ही गोष्ट पुढें दोन वर्षांनीं उघडकीस आली. त्याचा मगज बिघडून त्याच्या हातून एरव्हीं सहसा न होतील अशा गोष्टी होऊं लागल्या. शेवटीं तो आयर्लंड सोडून इंग्लंडास गेला. या खेपेस त्याची छाप पार्लमेंटमध्यें मुळींच पडली नाहीं. त्याच्या तोंडांतून शब्द स्पष्ट उमटत नाहींसे झाले. प्रथम प्रथम जरी लोक गंभीरपणानें त्याचें बोलणें ऐकण्याचा प्रयत्न करीत, तरी पुढें लवकरच त्याचे बोलण्याचा त्यांस कंटाळा आला. मग कांहीं दिवस तो पारिस येथें व नंतर रोमला गेला. त्याचे मनांत रोमची यात्रा करण्याची इच्छा होती, ती सफळ झाली. रोमहून परत आल्यावर जिनोआ शहरीं ता० १५ मार्च सन १८४७ रोजीं त्यास मृत्यु आला. मृत्युपत्रांत त्यानें आपलें काळीज कापून काढून रोम येथील पवित्र भूमींत पुरावें असें लिहिलें होत, त्याप्रमाणें करण्यांत येऊन त्याच्या मुलांनीं त्याचें शरीर आयर्लंडास परत नेलें व मोठ्या जंगी समारंभानें त्याचा दफनविधि करण्यांत आला. पुढें १८६९ सालीं आयरिश लोकांनीं वर्गणी केली व १६५ फूट उंचीचा एक सुंदर मनोरा त्या जागेवर बांधून त्याचें त्यांनीं स्मारक केलें.

ओकॉनेलच्या स्वभावांत गुणदोषांची सरमिसळ झालेली होती; तथापि याच्या एकंदर चरित्रावरून पाहतां त्याचे दोष आठवण्यापेक्षां किंवा उगा-

तल्या निखाऱ्याप्रमाणें त्रासदायक होई; व ती मोडून टाकण्याची संधी तो लक्ष लावून पाहत होता. ही संधी दुर्दैवानें वुल्फटोन याच्या बंडामुळें त्याला मिळाली. तथापि खुद्द आयरिश पार्लमेंट सभेनें आत्मघातास प्रवृत्त होऊन स्वतःस विसर्जन करून घेण्याचा ठराव करणें जरूर होतें. कारण, तसा ठराव होईपर्यंत ब्रिटिश पार्लमेंट सभेनें केलेल्या ठरावास कायद्याच्या दृष्टीनें कांहींच किंमत नव्हती. यामुळें आयरिश पार्लमेंटमधील लोक आपल्या बाजूस आणून या आत्मघाती ठरावास ते अनुकूल मत देतील असें करणें भाग होतें. वास्तविक हा मोठा बिकटच प्रश्न होता. परंतु पिट यानें तो अखेर सोडविला. आयरिश उमरावांच्या सभेबद्दल त्याला काळजी नव्हती. कारण, तिच्यांतील सर्व सभासद आगाऊच त्याच्या मुठींत होते. आयरिश हॉऊस ऑफ कॉमन्स सभेमध्यें त्यास बहुमत मिळवावयाचें होतें, व या सभेंतील सभासदांस त्यानें हरएक प्रकारेंच आमिष दाखविण्यास कमी केलें नाहीं. यावेळीं मतांचा नुसता लिलांव झाला. परंतु पिट यानें हातीं घेतलेलें कार्य भारी किंमतीचें असल्यामुळें जो कोणी आपल्या मतास जी किंमत मागेल, ती त्यानें दिली. परंतु नुसतें पार्लमेंटमध्यें बहुमत मिळवून काम भागण्यासारखें नव्हतें. देशांतील लोकमत अनुकूल व्हावयास पाहिजे होतें, व याकरितां रोमन क्याथोलिक लोकांस धर्मस्वातंत्र्याचें आमिष दाखवून निम्म्या शिम्म्या क्याथोलिक पुढाऱ्यांस त्यानें वश करून घेतलें. आणि अशा रीतीनें सन १८०० सालीं, आयर्लंदचें स्वातंत्र जे सुमारें अठरा वर्षांपूर्वीं बहुतेक पदरांत पडलें होतें, तें, दुर्दैवानें उलट खाल्ल्यामुळें, नाहींसें झालें !

आजपर्यंत आयरिश लोकांना जीं दुःखें भोगावीं लागलीं तीं ह्या दोन पार्लमेंटसभा एक झाल्यानें नाहींशीं होतील, व आयरिश लोकांस इंग्रजी लोकांचें सर्व हक्क मिळून इंग्रजी पार्लमेंटाच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं त्यांची भरभराट होईल, असा युक्तिवाद त्यावेळीं करण्यांत आला होता. परंतु पुढील शंभर वर्षांचा अनुभव वेगळ्याच प्रकारचा ठरला. या कालावधींतील, ह्मणजे एकोणिसाव्या शतकाचा, आयर्लंदचा इतिहास हा कांहीं विशिष्ट चळवळींचाच इतिहास असें ह्मटलें असतां फारसा बाध येणार नाहीं. पहिल्या तीस वर्षांत मुख्य चळवळ झाली ती रोमन

क्याथोलिक लोकांना प्रॉटेस्टंट लोकांशीं समान हक्क मिळवून देण्याची झाली; व सन १८२९ सालीं डॅनिअल ओकॉनेल या प्रसिद्ध आयरिश देशभक्ताच्या परिश्रमामुळें तिला यश आलें. तेथून पुढें रोमन क्याथोलिक लोकांस सुस्थिति येण्यास सुरवात होऊन, क्याथोलिक व प्रॉटेस्टंट हा जो धर्ममूलक भेद आयर्लंदास शेंकडों वर्षें जाचीत होता तो आजमित्तीस बहुधा नाहींसा झाला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. यानंतरची दुसरी मोठी चळवळ ह्मटली ह्मणजे प्रॉटेस्टंट जमीनदार लोकांच्या ताब्यांत आयर्लंदांतील बहुतेक सर्व जमीन गेल्यामुळें क्याथोलिक लोकांस जी विपत्ति प्राप्त झाली होती, तिच्या निवारणासंबंधाची होय. जमीनदारांच्या कुळांस कायमच्या धाऱ्याचा फायदा मिळावा, ते धारा देत आहेत तोंपर्यंत त्यांस जमिनींचे मालक असें समजावें, केवळ जमीनदारांच्या मर्जीखातर कुळाचें वतन नाहींसें करतां येऊं नये, कुळानें आपल्या खर्चानें जमिनीची सुधारणा केल्यास त्या सुधारणेमुळें धाऱ्यामध्यें वाढावा होऊं नये, व त्यास जमीन सोडावी लागली असतां त्यानें केलेल्या सुधारणेबद्दल त्यास नुकसान भरून मिळावें वगैरे गोष्टींबद्दल मुख्य खटपट असून, त्या सर्व अद्यापि पदरांत न पडल्यामुळें ती खटपट चालूच आहे. परंतु या सर्वांहूनही अधिक महत्वाची खटपट 'होमरूल'संबंधाची होय. सन १८०० पासून १८३० पर्यंत आयरिश पार्लमेंट स्वतंत्र करण्याची खटपट ह्मणण्यासारखी झाली नाहीं. परंतु आयर्लंद, इंग्लिश पार्लमेंटच्या देखरेखीखालीं गेल्यापासून, एखादें मूल सावत्र आईच्या ताब्यांत गेल्यामुळें जसें क्षीण होत जातें तसें, क्षीणच होत गेलें. रोमन क्याथोलिक लोकांस समान हक्क देण्याचें बिल ब्रिटिश पार्लमेंटांत पास झाल्याबरोबर डॅनिअल ओकॉनेल यास आयरिश पार्लमेंटच्या प्रश्नास हात घालण्याची हुरूप आली. परंतु या बाबतींत दहा बारा वर्षें एकसारखी चळवळ होऊन तो प्रश्न ब्रिटिश पार्लमेंटापुढें अनेक रीतींनीं आणला गेला तरी त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. ओकॉनेल यास व राष्ट्रीय पक्षाच्या लोकांस कैदेंत जावें लागले ( इ. स. १८४४ ), एवढेंच नव्हें तर ओकॉनेल यानें किंचित् धोरण बदलल्याबरोबर जन्मभर मिळविलेली त्याची लोकप्रियताही नाहींशी झाली. या चळवळीस

'रिपील'ची चळवळ असें ह्मणतात. हीच चळवळ होमरूल या नांवानें १८७४ पासून पुढें प्रसिद्धीस आली. प्रथम लँड लीग व नंतर नॅशनल लीग या संस्था अस्तित्वांत आल्या; व आयर्लंदभर बहिष्काराचें बंड माजून सर्व सत्ता लँड लीगच्या चालकांचे हातीं कित्येक वर्षें गेली. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें जे आयरिश सभासद होते त्यांस अडवणुकीची गुरुकिल्ली मिळाल्यामुळें त्यांनीं तिचा उत्तम उपयोग करून ब्रिटिश पार्लमेंटमध्यें इतका बखेडा माजविला कीं, आयर्लंदला स्वतंत्र पार्लमेंट दिलेलें पुरवलें पण हा त्रास नको, असें इंग्रज लोकांस वाटूं लागलें ! होमरूलच्या चळवळीचें सर्व श्रेय प्रसिद्ध आयरिश पुढारी पार्नेल यासच आहे. त्याच्या उद्योगामुळें व कर्तृत्वामुळें ग्लॅडस्टनसारख्या मुत्सद्यानें तो प्रश्न हातीं घेऊन १८८६ सालीं पहिलें होमरूल बिल पार्लमेंटपुढें आणिलें. होमरूलचा प्रश्न पुढें सरासरी सात आठ वर्षें पार्लमेंट समोर होता; व सन १८९३ सालीं हाऊस ऑफ कॉमन्स सभेंत होमरूल बिल पासही झालें. परंतु लॉर्डांच्या सभेनें तें नामंजूर केल्यामुळें त्याचा प्रत्यक्ष फायदा आयर्लंदास कांहीं मिळाला नाहीं. तेथपासून हा प्रश्न फिरून मागें पडला तो पडलाच. अलीकडे लॉर्ड डनरेव्हनच्या खटपटीनें 'डेव्होल्यूशन' ह्मणजे अधिकारविभागणीच्या रूपानें होमरूलचा थोडासा भाग फिरून लोकांपुढें चर्चेकरितां आला आहे. परंतु असल्या अर्धवट देणगीस आयरिश लोक नाकबूल असल्यामुळें अधिकारविभागणीचें बिल लिबरल प्रधानमंडळास मागें घ्यावें लागलें.

या शतकांत मोठीं बंडें अशीं झालीं नाहींत. वूल्फटोनच्या १७९८ च्या बंडानंतर त्याच्याच मंडळीपैकीं रॉबर्ट एमेट यानें १८०३ सालीं बंड केलें; तें फसून एमेट यास फांशीं देण्यांत आलें. पण पुढें एकोणिसाव्या शतकांत आयर्लंदच्या सांपत्तिक स्थितींत फार मोठमोठीं स्थित्यंतरें घडून आलीं. आयरिश पार्लमेंट सभा ब्रिटिश पार्लमेंट सभेस जोडल्यापासून पन्नास वर्षेंपर्यंत कर्मधर्मसंयोगानें आयर्लंदांत एक प्रकारची सुबत्ता दिसत होती. या अवधींत लोकसंख्याही बेसुमार ह्मणजे ५० लक्षांपासून ८५ लक्षांपर्यंत वाढली ! व आयर्लंदच्या सुस्थितीचें हें एक द्योतक असें सांगण्यांत येतें. परंतु लोकसंख्येबरोबरच जर तिच्या निर्वा-

ह्याचीं साधनेंही वाढलीं नाहींत तर भयंकर प्रसंग ओढवतो व मग देशाची खरी स्थिति कशी काय आहे हें कळून येतें. सन १८०० पासून १८४५ पर्यंत आयरिश लोकसंख्या वाढली, परंतु याच अवधींत धान्याचे दर स्वस्त झाल्यामुळें शेतकऱ्यांचा तोटा होऊं लागला. इकडे हातमागाचे जागीं यंत्रें आल्यामुळें विणकर वगैरे लोकांच्या पोटावर पाय आला. इतक्यांत १८४४–४५ सालीं भयंकर दुष्काळ पडण्यास सुरवात झाली. लोकसंख्येच्या वाढीचें सर्व इंगित बटाट्यावर अवलंबून होतें. बटाट्याची भाजी, गाईचें दूध, व डुकरांचे मांस यांवर आयरिश लोकसंख्या हां हां ह्मणतां उकिरड्यासारखी वाढली. पण बटाट्याच्या पिकावर रोग पडूं लागल्यानें बटाटे तर गेलेच, पण शेतीच्या सुबत्तेवर अवलंबून राहणाऱ्या ज्या गाई व डुकरें त्यांचाही संहार झाला. यामुळें लोकसंख्येचें सर्व अजीर्ण इतक्या जलदीनें मोडलें कीं आतां आयर्लंदांत लोकवस्ती शिल्लक तरी राहते कीं नाहीं अशी शंका येऊं लागली ! अर्थातच अशा आपत्तीनीं लोकांचीं मनें खिन्न व असंतुष्ट झालीं; व या आपत्तीस मूळ कारण ह्मणजे ब्रिटिश सरकार असेंच त्यांस वाटूं लागलें. दुसरें असें कीं, दोन पार्लमेंट सभा एकत्र करितांना क्याथोलिक लोकांना धर्मस्वातंत्र्य देण्याविषयीं पिट यानें जें अभिवचन दिलें होतें त्याप्रमाणें ब्रिटिश पार्लमेंट कडून कृति घडून येण्यास तीस वर्षें लागलीं व मनस्वी यातायातही पडली. यामुळें ब्रिटिश मुत्सद्यांच्या वचनावरचा आयरिश लोकांचा भरंवसा उडाला. तसेंच ह्या दोन राष्ट्रांचा संयोग घडवून आणण्याचेवेळीं, तसें केल्यानें आयरिश लोकांवरील करांचे ओझें कमी होईल अशी त्यांची समजूत घालण्यांत आली होती. पण त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. उलट प्रतिवर्षी करांचा बोजा वाढत गेला व इंग्लंदच्या मानानें आयर्लंदच्या राष्ट्रीय कर्जाची रकमही अधिक फुगली. सुमारें दहा वर्षांत इंग्लंदचा कराचा बोजा शेंकडा फक्त १७ नीं वाढला होता, तो आयर्लंदचा जवळ जवळ शेंकडा ५० नीं वाढला. तात्पर्य, कोणच्याही रीतीनें पाहतां हीं दोन राष्ट्रें एक झाल्यापासून आयर्लंदला सुख झालें असें ह्मणतां येणार नाहीं, असें आयरिश पुढाऱ्यांच्या मनानें ठाम घेतलें. देशांतील आपत्तीरूपी दारूवर स्वातंत्र्याच्या इच्छेची ठिणगी पडतांच भडका उडाला; व आयर्ले-

दांत दर पन्नास वर्षांनीं बंड होतें अशी जी एक समजूत होती, तिला नवीन प्रत्यंतर पुरावा मिळाला. कारण राज्यक्रांत्याकरितां इतिहासांत प्रसिद्धीस आलेल्या १८४८ सालीं सर्व युरोपखंडभर बंडांचें व राज्यक्रांत्यांचें पीक पिकलें त्या वेळीं आयर्लंदमध्येंही उचल झाली. परंतु तेव्हांही फारसें निष्पन्न झालें नाहीं. यानंतर एकोणीस वर्षांनीं ह्मणजे १८६७ सालीं केरी, लिमरिक व टिपरारी या प्रांतांत किरकोळ बंडावा झाला. परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. मात्र १८५८ पासून पुढील ३०।३५ वर्षेंपर्यंत आयर्लंदांत 'फीनीअन' पक्षाच्या लोकांनीं गुप्त कट, मारामारी, खून, वगैरेंची गर्दी आणि एकसारखा असंतोष व भीति उत्पन्न करून सोडली होती. या शतकांत बंडें जरी थोडीं झालीं तरी किरकोळ राजकीय गुन्हे मात्र अतोनात झाले. शेंकडो लोक फांशीं गेले, व शेंकडों काळ्यापाण्यावर पाठविण्यांत आले. आजमित्तीस पाहिलें तरी आयर्लंदमध्यें शांतता व संतोष हीं मुळींच नाहींत. फीनीयन लोकांच्या चळवळीचा मोड झाल्यानंतर ब्रिटिश पार्लमेंटमध्यें शिरून तेथें स्वराज्याची चळवळ करण्याच्या हौसेचा उमाळा फिरून १८७२ चे सुमारास आयरिश लोकांस आला. व तो पंधरा वर्षें टिकला. परंतु पार्नेल वगैरेंची पंधरा वर्षांचीं खटपट फुकट गेल्यामुळें लोकमतानें घड्याळाच्या लंबकाप्रमाणें हल्लीं फिरून उलट गति घेतलेली आहे. आयरिश पार्लमेंट सन १८०१ सालीं नष्ट झाल्यापासून तिची फिरून प्राणप्रतिष्ठा करण्याची खटपट शंभर वर्षें करून निरुपाय झाल्यावर, निदान इंग्रजी प्रजेशीं समान हक्क व आयर्लंद देशास पूर्ण न्याय हीं इंग्रज लोकांच्या हातून मिळण्याची निराशा झाल्यावर, कित्येक आयरिश लोक स्वावलंबनाचे मार्गानें, ह्मणजे इंग्रजी राज्यावर शक्य तितका सर्व बाजूंनीं बहिष्कार घालून आपल्या मनगटाचे व मनाचे जोरावर आपली सांपत्तिक व राष्ट्रीय सुधारणा घडवून आणण्याचे राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्याचे खटपटीस लागले आहेत. या लोकांस 'सिनफेनर्स' असें ह्मणतात. तथापि पार्नेलचा शिष्य रेडमंड हा, ब्रिटिश पार्लमेंट सभेंत आयर्लंदचे तर्फे जे सुमारे शंभर सभासद आहेत त्यांचा पुढारी असून, पार्लमेंटांत भांडून व वादविवाद करून होमरूल मिळविण्याची त्याची आशा अद्यापि नष्ट झालेली नाहीं.

# भाग ४ था.

## आयर्लंदांतील राष्ट्रीय चळवळी.

**मा**गील दोन भागांत आह्मीं आयर्लंदचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास अगदीं साररूपानें सांगितला. त्यावरून राष्ट्रीयत्वाचे मीमांसेच्या दृष्टीनें पाहतां, या इतिहासास सुमारें सतराव्या शतकापासून विशेष महत्त्व व मनोरंजकत्व प्राप्त झालें आहे असें दिसून येईल. चळवळ केल्याशिवाय आयर्लंदास कधींही कांहींएक मिळालें नाहीं; आणि सतरा, अठरा व एकोणिस या तीन शतकांतील आयर्लंदचा इतिहास हा त्या राष्ट्रांतील प्रजाजनांनीं केलेल्या चळवळींचाच इतिहास होय. या चळवळी मुख्यतः चार हेतूंनीं झाल्या होत्या. ( १ ) धर्मस्वातंत्र्य मिळविण्याची चळवळ; ( २ ) शेतकरी लोकांस जमिनीवर मिरासी हक्क मिळवून देण्याची चळवळ; ( ३ ) होमरूल ह्मणजे 'स्वावलंबी पार्लमेंट'च्या द्वारें राष्ट्रीय 'स्वराज्य' मिळविण्याची चळवळ; व ( ४ ) इंग्रज लोकांस घालवून देऊन निर्भेळ स्वातंत्र्य मिळविण्याची चळवळ. या चार हेतूंनीं केलेल्या राष्ट्रीय चळवळींचें स्वरूप काय होतें, व त्यांची हकीकत कशी काय घडली हें पुढील चार भागांत थोडक्यांत सांगण्याचें आह्मीं योजिलें आहे.

### धर्मस्वातंत्र्याची चळवळ.

आयर्लंदला सुस्थिति येण्यास प्रारंभ झाल्यानंतर इंग्रजांकडून आयरिश लोकांस सन १८२९ सालीं एका मोठ्या गोष्टींत प्रथम न्याय मिळाला; व आयर्लंदच्या अलीकडील इतिहासाचा विचार याच गोष्टीपासून सुरू करितात. ही गोष्ट ह्मटली ह्मणजे रोमन क्याथोलिक लोकांवर पार्लमेंटच्या कायद्यानें जो उघड बहिष्कार घालण्यांत आलेला होता, त्यापासून त्यांची मुक्तता ही होय. या भयंकर बहिष्कारास प्रथमतः आठव्या हेनरी राजाच्या कारकीर्दींत सुरवात झाली. या राजाच्या कारकीर्दीपर्यंत इंग्लंदमध्यें बहुधा रोमन क्याथोलिक धर्माचाच अंमल होता. परंतु तोंपर्यंत आयर्लंदवर

इंग्लंडचा ताबाही चांगलासा स्थापित झालेला नव्हता. इंग्रजी राजांपैकीं प्रथमतः आठव्या हेनरीनें पोपची सत्ता झुगारून देऊन नवीन ह्मणजे प्रॉटेस्टंट धर्माची राज्यांत सुरवात केली; व या नव्या धर्माच्या अनुरोधानें ' सद्धर्मसंरक्षक ' अशी आपल्यास पदवी घेऊन, इंग्रजी राजपदास धर्मगुरुत्वाच्या पदाची ही जोड करून दिली. कर्मधर्मसंयोगानें याच राजाच्या कारकीर्दीत आयर्लंद देश इंग्लंदच्या पुरा ताब्यांत येऊन हेनरीनें आपणास आयर्लंदचा राजा अशीही पदवी घेतली. हा काळ सर्व युरोपच्या इतिहासांत ' धर्मच्छलाचें युग ' अशा नावानें प्रसिद्ध आहे, व आयर्लेंदांतलि लोकांच्या धर्मच्छलास आणि सामाजिक व राजकीय अवनतीस याच सुमारास सुरवात झाली. या अवनतीचा मध्यकाल तिसऱ्या विलियम राजाच्या कारकीर्दीत ह्मणजे सुमारें सन १६९० सालापासून १७२० पर्यंत मानावयास हरकत नाहीं; व या अवनतीच्या ग्रहणाचा मोक्षकाळ १७८० सालापासून सुरू झाला. या ग्रहणाच्या स्पर्श व मोक्षकालांतलि अंतर सन १५४० पासून सन १७८० पर्यंत ह्मणजे सुमारें अडीचशें वर्षें भरतें. हा काल आयर्लंदांतील लोकांस सर्व प्रकारच्या विपत्तीचा गेला. इंग्लंदांतील लोकांप्रमाणें त्यांनीं प्रॉटेस्टंट पंथाचा स्वीकार केला असता तर, त्यांचा इतिहास कांहीं वेगळाच झाला असता. परंतु निरनिराळ्या मानसक्षेत्रांत धर्मबीजाचें पीक निरनिराळ्या प्रकारचें पिकतें. पंधराव्या शतकांत प्रॉटेस्टंट पंथाचा उदय होऊन आज पांच शतकेंपर्यंत त्याची एकसारखी वाढ होत आहे, तथापि अद्यापिही युरोपखंडांत आयर्लंद, फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, इटली व रशिया वगैरे देशांमध्यें बहुधा रोमन क्याथोलिक पंथच चालू आहे. दरम्यान फ्रान्स व आयर्लंदमध्यें जशा प्रॉटेस्टंट लोकांच्या कत्तली झाल्या, तशा हालंद वगैरेमध्यें क्याथोलिक लोकांच्याही झाल्या. शिवाय या कालांत निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें धर्मद्वेष–मूलक युद्धेंही झालीं. परंतु धर्ममताची मनुष्यमात्राच्या मनावर कांहीं विलक्षण चिकाटी असते; व हालअपेष्टा, छळ व प्राणहानि यांनींही ती सुटत नाहीं. आयरिश लोकांवर ते चंचल मनाचे असतात अशा प्रकारचा एक आक्षेप करण्यांत येतो; परंतु धर्ममताचे बाबतींत त्यांनीं मनाची जी स्थिरता आजपर्यंत दाखविलेली आहे ती लक्षांत घेतली असतां वरील

आरोप केवळ निर्मूल आहे, निदान सकृद्दर्शनीं दिसणाऱ्या त्या चंचलतेचा खुलासा कांहीं निराळ्या रीतीनें करितां येण्यासारखा असेल, असें मानण्यास बरीच जागा आहे. आयर्लंदमध्यें सन १६३५–४० पासून प्रॉटेस्टंट लोकांचीं भरती होण्यास सुरवात झाली. व तेथून पुढें तीन शतकेंपर्यंय आयर्लंदांतील क्याथोलिक प्रजेस एक प्रकारची ओहटी लागून हजारों कुळें व घराणीं देशत्याग करून चालतीं झालीं. तथापि आजमित्तीस आयर्लंदमध्यें सुमारें शेंकडा ७५ इतके लोक रोमन क्याथोलिक पंथाचेच आहेत. व आयर्लंद हा कोणाचा देश असा प्रश्न केला असतां तो आयरिश रोमन क्याथोलिक लोकांचा असेंच उत्तर कोणासहि दिलें पाहिजे. असें असतां केवळ धर्ममताखातर इंग्रजी प्रॉटेस्टंट लोकांनीं, व त्यांच्या हिताकरितां इंग्लंदच्या राज्यकर्त्यांनीं, दोन अडीचशें वर्षेंपर्यंत क्याथोलिक लोकांचा जो नाहक छळ केला, तो पाहून जुन्या पिढीच्या इंग्रजांच्या न्यायबुद्धीचें किंबहुना मनुष्यस्वभावाचें कौतुक करावें तेवढें थोडेंच वाटतें !

धर्ममताचा विरोध हें आयरिश लोकांचा छळ होण्याचें मुख्य कारण तर खरेंच, परंतु दुसरी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे ती ही कीं, प्रॉटेस्टंट इंग्लिश लोकांनीं आयर्लंदच्या भूमीवर वसाहत न करितां हिंदुस्थानाप्रमाणें केवळ दुरून ताबा चालविला असता तर इतका छळ न होता. परंतु आयरिश रोमन क्याथोलिक लोकांवर कायमचें दडपण पडलेलें रहावें ह्मणून, व त्यांनीं यत्किंचित् डोकें वर केलें असतां तत्काळ तडाका मारून त्यांचें डोकें खालीं करावयास लावण्याकरितां, राज्यकर्त्यांच्या तर्फे कोणी तरी आयर्लंदांत रहावयास पाहिजे होतें. आणि याकरितां मूळ प्रॉटेस्टंट वसाहतीची कल्पना निघाली. वसाहत करावयाची तर वसाहतवाल्यांस जमीन पाहिजे, व परदेशीं जाऊन स्वदेशाचें हित साधण्याचे श्रम करणारास तर विशेष सवलत दिली पाहिजे. याकरितां रोमन क्याथोलिक लोकांच्या लाखो एकर जमिनी काढून वसाहतवाल्यांस देण्यांत आल्या वगैरे मागें सांगण्यांत आलेंच आहे. या वसाहतवाल्यांच्या दोन तीन पिढ्या आयर्लंदांत होतांच तो त्यांस स्वदेशासारखा सहजच वाटूं लागला. वसाहतवाल्यांचे पाय आयर्लंदांत रुजण्यास इंग्लंदच्या राजाचा आश्रय हेंच वास्तविक मुख्य कारण, परंतु वसाहतवाल्यांची कृतज्ञताबुद्धि लवकरच लयास

गेली. व ते लोक आयरिश क्याथोलिक लोकांच्या प्रमाणानें पाहिले तर जरी केवळ मूठभर होते, तरी त्यांस आयर्लंद हें आपलें वतन व रोमन क्याथोलिक लोक हे आपले दास, असें वाटूं लागलें. प्रथम प्रथम जरी इंग्रजी राजांचा अंमल ते प्रांजलपणें मानीत, तथापि पुढें पुढें तो अंमल त्यांस दुःसह वाटूं लागला, फार काय पण रोमन क्याथोलिक लोकांच्या विरुद्ध इंग्रजी राजांकडून मदत होण्याचा जितका संभव असेल, तितक्या-पुरताच तो अंमल मानावयाचा व चालूं द्यावयाचा अशी पद्धति त्यांनीं पाडिली. देशांतील सर्व सत्ता व सर्व संपत्ति आपल्या हातीं रहावी, असें या मूठभर प्राटेस्टंट लोकांस वाटूं लागल्यामुळें उभयतांच्या हितसंबंधांत विरोध उत्पन्न झाला. एका म्यानांत दोन सुऱ्या नांदणें अशक्य आहे, आणि आयरिश क्याथोलिक व वसाहतवाले या दोघांमध्येंच जर भांडण राहातें तर क्याथोलिक लोकांनीं वसाहतवाल्यांस हाकून देऊन, अगर त्यांचा नाश करून आपली भूमि आपल्या हातांत परत आणिली असती. व मग जरी राजकीय अंमल इंग्लंदच्या राजाकडे राहिला असता तरी फारसें बिघडतें ना. परंतु क्याथोलिक आयरिश लोक हे मूळचे रहिवासी व संख्येनें अतिशय प्रबळ, आणि दुसरेपक्षीं वसाहतवाले संख्येनें थोडे तरी बहुतेक जमीन त्यांचे हातीं; व इंग्लंदांतील संपत्ति, सत्ता, शहाणपण, लोकमत, लष्कर व राजाश्रय हीं सर्व त्यांचे बाजूस—अशी स्थिति असल्यामुळें सुमारें दोनशें वर्षेंपर्यंत आयर्लंदामध्यें अंतःकलह सारखा धुमसत राहिला. परंतु क्याथोलिक लोक चहूंकडून नाडले गेले होते तरी, त्यांचें मनुष्यत्व, अर्थात् बुद्धि व स्वाभिमानादि गुण नाहींसे झाले नव्हते. यामुळें संख्येनें विषम परंतु उपाधि कारणांनीं जवळ जवळ समबल असे हे दोन पक्ष परस्परांशीं एकसारखे झगडत राहिले.

क्याथोलिक लोकांविरुद्ध केलेले कायदे आठव्या हेनरीपासून सुरू झाले हें मागें सांगितलेंच आहे. या कायद्यांचा अंमल दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दींत क्षणभर कमी झाला होता. परंतु तिसऱ्या विलियम राजाच्या कारकीर्दींत तो अंमल अधिक करडा झाला व त्यांजवर नवीन बंधनेंही घालण्यांत आलीं. विलियम राजाच्या कारकीर्दींत क्याथोलिक लोकांनीं बंड केलें. त्यांचा पुढारी पॅट्रिक सार्सफील्ड

यानें लिमरिक किल्लयाचा आश्रय घेऊन लढण्याची शिकस्त केली, परंतु निरुपायास्तव त्यास तह करून किल्ला इंग्रजी सैन्याधिपतीच्या स्वाधीन करावा लागला. या तहांत मुख्य कलम असें होतें कीं, आयर्लंदच्या पार्लमेंटनें केलेल्या कायद्याशीं विरोध न येईल अशा रीतीनें क्याथोलिक लोकांस शक्य तितकें धर्मस्वातंत्र्य द्यावें. याप्रमाणें पहातां दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दींत जितकें स्वातंत्र्य त्यांस प्रत्यक्ष अनुभवावयास मिळालें होतें तितकें तरी यापुढें मिळणें जरूर होतें, व तह होतांच पार्लमेंट भरवून अशा अर्थाचा कायदा स्पष्टपणें मंजूर करवून घेण्याचें विलियमनें अभिवचन दिलें होतें. सार्सफील्ड यास तह करून शस्त्र खालीं ठेवण्यास हेंच अभिवचन कारणीभूत झालें व राजाच्या वचनावर विश्वास ठेवून तो किल्ला सोडून निघून गेला. पराभव झाला खरा; परंतु त्यांतल्यात्यांत स्वधर्मीय लोकांस येवढी तरी सवलत मिळाली या विचारानें त्याचें दुःख हलकें झालें. परंतु राजवचन ह्मणजे पाण्यावर लिहिलेलीं अक्षरें अशी प्रतीति जगाच्या इतिहासांत अनेकवेळां आलेली आहे; त्यांतीलच हाही एक प्रसंग होता! १६९२ सालीं आयरिश पार्लमेंट भरतांच राजानें दिलेल्या वचनाप्रमाणें सवलतींचा कायदा होण्याचें एका बाजूला राहून प्रॉटेस्टंट सभासदांनीं क्याथोलिक सभासदांचा छळ करण्याची नवीनच युक्ति काढली. त्यांनीं बहुमत करून शपथ घेण्याचा एक नवीन नमुना उर्फ संकल्प मंजूर करून घेतला. व हा संकल्प क्याथोलिक लोकांस अत्यंत अपमानास्पद असल्यानें, लॉर्ड व कॉमन्स सभेंतील क्याथोलिक लोक रागानें सभागृह सोडून चालते झाले. पुढें १६९५ सालीं व्हाइसराय कॅपेल यानें पार्लमेंटसभा भरविली व लिमरिकच्या तहानें जीं जीं आश्वासनें क्याथोलिक लोकांस दिलीं गेलीं होतीं, तीं तीं एक एक घेऊन व पार्लमेंटचे ठराव करून त्यानें रद्द करून टाकिलीं. या ठरावांचे योगानें शिक्षण, लष्कर, व धर्म या खात्यांतून क्याथोलिक लोकांची पुरी हद्दपारी झाली. ज्याप्रमाणें खडे निवडून काढावे अगर शिकारीच्या रानांत कुत्रे व फासेपारधी घालून शिकारीचीं जनावरें नाहींशीं करून टाकावीं, तशाच प्रकारें सामाजिक व राजकीय संसारांतून क्याथोलिक लोकांस हांकून लावितां येईल अशाप्रकारचे कायदे कॅपेलच्या पार्ल-

मेंटानें मंजूर केले. या कायद्यांस पहिल्या व तिसऱ्या जॉर्ज राजाचे कारकीर्दींत भर पडून अठराव्या शतकाचे प्रारंभीं क्याथोलिक लोकांच्या बहिष्काराचा कडेलोट झाला. त्यांस या पुढें पार्लमेंटच्या वरिष्ठ अगर कनिष्ठ गृहाचे सभासद होतां येत नसे. पार्लमेंटच्या निवडणुकींत त्यांस मत नसे. लष्कर अगर आरमार यांमध्यें त्यांना नोकरी मिळत नसे; त्यांना वकील अगर न्यायाधीश होतां येत नसे; त्यांस म्याजिस्ट्रेट अगर म्युनिसिपालिटीचे सभासद होतां येत नसे; त्यांस ज्यूरर नेमतां येत नसे; त्यांस शेरिफ अगर यःकश्चित् पोलिस शिपाईही होतां येत नसे; शिक्षण देणें व घेणें या दोनही गोष्टी त्यांस वर्ज होत्या; शिक्षणासाठीं परदेशास त्यांना जातां येत नसे; प्रॉटेस्टंट धर्माच्या उपासनेच्या मंदिरांत हुकुमाप्रमाणें ते न गेल्यास त्यांस दर महिन्यास साठ पौंडपर्यंत दंड करितां येत असे; प्रॉटेस्टंट पंथ तरी स्वीकार नाहीं तर आपली मालमिळकत वारसाच्या नांवानें करून देऊन तूं कफल्लक हो, असा क्याथोलिकावर जुलूम करण्यास दोन 'जस्टिस ऑफ दी पीस'नीं मनांत आणलें तर त्यांस तसें करितां येत असे; चार 'जस्टिस ऑफ दि पीस' एकत्र मिळाले व त्यांनीं संगनमत केलें तर प्रॉटेस्टंट धर्माच्या देवळांत उपासनेला जाण्याचा हुकूम तोडल्याबद्दल त्यांना कोणाही क्याथोलिकास जन्मभर हद्दपार करतां येत असे; क्याथोलिक धर्मोपदेशकानीं उघडपणें धर्मोपदेश केला तर त्यांस फांशीची शिक्षा ठेवलेलीच; व त्यांच्या मिळकतीही जप्तींत जात. जमिनी देण्याघेण्यासंबंधानें कशाप्रकारचे निर्बंध होते हें मागें एक ठिकाणीं सांगितलेंच आहे. क्याथोलिक जमीनदारानें फाळ्याच्या एकतृतीयांशाहून अधिक नफा स्वतःस घेतला असें कोणाही प्रॉटेस्टंटनें सिद्ध करून दिलें तर त्या क्याथोलिकाची जमीन जप्त होऊन त्या प्रॉटेस्टंटांस मिळे; फार काय पण कोणाही प्रॉटेस्टंटनें स्नेहभावानें अगर दया येऊन कोणाही क्याथोलिकास 'बिनामी' व्यवहार करून मदत केली असें दिसून आलें तर त्याची सर्व शोभा तो स्वतः क्याथोलिक असल्याप्रमाणेंच होई. क्याथोलिक लोकांच्या सामाजिक व्यवस्थेंत कायद्यानें कितपत हात घातला होता हें मागें थोडेंबहुत सांगण्यांत आलेंच आहे. रोमन क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांजमध्यें

लग्न होणें अर्थातच अशक्यच होतें. व धर्मांतराच्या खऱ्या अगर खोट्या सबबीवर एकानें काडी मोडून मागितली असतां ती अवश्य देण्यांत येई.

अशा तऱ्हेची स्थिति असतां या लोकाचें राष्ट्र कसें बनणार ? परंतु वर सांगितल्याप्रमाणें क्याथोलिक लोकांनीं विलक्षण चिकाटी व करारीपणा दाखविला. नवीन पिढीस शिक्षण नीट मिळणें हें सर्व समाजव्यवस्थेचें मूळ आहे; व शिक्षणावर तर हा असा कडक बहिष्कार घातलेला. शाळांत किंवा देवळांत क्याथोलिक धर्माचा उपदेश होत आहे अशी नुसती बातमी कानावर आली कीं पुरे, शिपाई लोक धावून गेलेच. व शाळागृहांच्या खुर्च्यांवर अगर देवळांतील व्यासपीठांवर मारामार होऊन रक्तस्रावानें हीं पवित्रस्थळें दूषित व्हावीं असले प्रकार वारंवार घडत असत. तथापि या सर्व बंधनांस न जुमानतां क्याथोलिक लोकांनीं तरुण पिढीस शिक्षण देण्याचें काम नेटानें चालविलें होतें. शाळा घालून थाट करून बसणें अर्थातच धोक्याचें होतें. यास्तव रस्त्याच्या बाजूच्या बखळी, टेंकड्याच्या पोटांतली जागा, खंदक व तळघरें, रानांतल्या झोंपड्या व पडक्या इमारतीचे सोपे, फार काय पण शेतांतलीं कुंपणें—तात्पर्य सांपडेल त्या एकांतवासाच्या जागेचा आश्रय करून त्या शाळा चुटकीसरशी भरत, व दगा असा वाटला कीं चुटकीसरशी मोडत. आणि दरम्यान सांपडेल त्या वेळांत, लष्करांत घस्त बदलतांना खुणेचा शब्द एकानें दुसऱ्यास कानांत सांगावा त्याप्रमाणें क्याथोलिक धर्माचीं तत्वें, राजनीति व सर्वसाधारण शिक्षणाचा ओनामा क्याथोलिक गुरु आपल्या शिष्यांस पढवून, जिकडचे तिकडे पसार होत. विद्यार्थीही तसेच तयार झाले होते. आणि गुरु व शिष्य या उभयतांकडून शिक्षणाचें काम इतक्या शिताफीनें पार पडलें नसतें तर नवीन कायदे सुरू झाल्यापासून थोड्याच काळांत क्याथोलिक लोकांची नवीन पिढी अक्षरशून्य बनली असती. सामाजिक व्यवस्थेंतही तोच प्रकार दिसून येत असे. कायद्यानें कितीही आमिष दाखविलें तरी क्याथोलिक लोकांचीं लहान मुलेंबाळें अगर अज्ञ स्त्रिया यांनींहीं स्वधर्माचें उल्लंघन बहुधा कधीं केलें नाहीं. व यामुळें बाहेर कायद्यानें कितीही जाच झाला तथापि निदान घरांत तरी क्याथोलिकलोकांस सौख्य मिळे !

सबंध अठरावें शतक क्याथोलिक लोकांनीं अशा हालांत काढलें.

सन१७५०नंतर प्रॉटेस्टंट लोकांमध्यें कोठें थोडी समबुद्धि दिसूं लागल्याचा भास होऊं लागला. परंतु क्याथोलिक लोकांवरचा हा बहिष्कार काढून टाकावा असें उघड प्रतिपादन करण्याचें फार थोड्यांस धैर्य होत असे. अठराव्या शतकाच्या अखेरच्या पंचवीस वर्षांत आयर्लंदांत स्वदेशप्रीतीची लाट आली, व आयरिश पार्लमेंट स्वतंत्र करून तें सुधारण्याची महत्वाकांक्षा प्रॉटेस्टंट राष्ट्रभक्तांस उत्पन्न झाली; त्यावेळीं क्याथोलिक लोकांस दास्यांत व अंधकारांत ठेऊन कसची कपाळाची स्वतंत्रता मिळणार व सुधारणा होणार ? असें प्रॉटेस्टंट पुढाऱ्यांच्या सुसंस्कृत मनास वाटूं लागलें हें मागें सांगितलेंच आहे. व यामुळें, इतर राजकीय बाबींबरोबर क्याथोलिक लोकांच्या मुक्ततेचा प्रश्न उघडपणें सभांतून, पत्रांतून, व क्वचित् प्रसंगीं पार्लमेंट सभेमध्येंही बोलण्यांत येऊं लागला.

सन १७५० चे सुमारास आयर्लंदांतील प्रॉटेस्टंट लोकांचे मनांत धर्मसहिष्णुता उत्पन्न झाल्यानंतर सन १७६४ सालीं क्याथोलिक लोकांस समान हक्क देण्याविषयींचें पहिलें बिल आयरिश पार्लमेंट सभेपुढें आलें. यापूर्वी सात वर्षे ह्मणजे १७५७ सालीं ‘क्याथोलिक कमिटी’ नांवाची सभा स्थापन झालेली होती; व वरील बिल हें या कमिटीच्या उद्योगाचें व चळवळीचें पहिलें फळ होय. व यानंतर क्याथोलिक लोकांवरचीं बंधनें ज्या मार्गांनें येऊन पडलीं त्या मार्गानेंच तीं निघण्यास सुरुवात झाली. १७६३ सालीं क्याथोलिक लोकांना जमिनी गहाण घेऊन व्याजबट्टा करण्याची मोकळीक देण्याबद्दल आयरिश पार्लमेंट सभेमध्यें एक बिल आणण्यांत आलें. परंतु त्याचा विचार करण्याचें काम वर्षभर लांबणीवर पडून पुढील सालीं तें नामंजूर झालें. पुढील तीन वर्षे तामसी स्वभावाचे क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांचे दरम्यान बरेच ठिकाणीं मारामाऱ्या होऊन समाजांत मोठी खळबळ उडून गेली. ‘फादर शीही’ नांवाच्या क्याथोलिक धर्मोपदेशकास प्रॉटेस्टंट लोकांच्या आकसावरून अन्यायानें फांशी देण्यांत आलें. परंतु तो नाहक फांशी गेला, अशी सर्व समाजाची खात्री झाल्यानें १७६८ सालीं क्याथोलिक लोकांचें दुःख निवारण करण्याकरितां आयरिश पार्लमेंट सभेपुढें आलेलें एक किरकोळ बिल सर्वानुमतें पास झालें. परंतु इंग्लंदकडून त्यास मंजुरी मिळाली नाहीं. पण सन १७७४

सालीं रोमन क्याथोलिक लोकांकडून जी शपथ घ्यावयाची तिजमध्यें त्यांच्या धर्मसमजुतीस अनुसरून थोडासा फेरफार करण्यासंबंधाचें बिल पार्लमेंटनें मंजूर केलें. सन १७७८ सालच्या कायद्यानें क्याथोलिक लोकांस ९९९ वर्षेंपर्यंतच्या करारानें खंडानें जमिनी करतां येऊं लागल्या; व प्रॉटेस्टंट लोकांप्रमाणेंच क्याथोलिक लोकांमध्येंही जमिनीसंबंधानें मागच्या पिढीचा वारसा पुढच्या पिढीस मिळण्यास हरकत नाहीं असें ठरलें. त्याच-सालीं क्याथोलिक लोकांनीं अमुक ठिकाणीं रहावें अगर राहूं नये, अधि-काऱ्यांपुढें आपण कशाप्रकारें शपथ घेतली याचा खुलासा करावा, प्रॉटे-स्टंट पंथाच्या मनुष्यानें पांच पौंड दिले असतां वाटेल त्या क्याथोलिक मनुष्यानें आपला घोडा त्यास विकत दिला पाहिजे, असल्या किरकोळ बाबतींतील पूर्वीं झालेले कायदे रद्द करण्यांत आले. दुसऱ्या एका काय-द्यानें, क्याथोलिक लोकांनीं आपल्या धर्माच्या लोकांपुरत्या खासगी शाळा वगैरे घालून मुलांना शिक्षण देण्यास हरकत नाहीं असें ठरविलें. सन १७९२ सालीं क्याथोलिक लोकांच्या चळवळीस बराच जोर आला; व जॉन कीओघ व वुल्फ टोन या दोघांच्या प्रयत्नामुळें खुद्द राजास क्याथोलिक लोकांच्या वतीनें डेप्युटेशन व अर्ज पाठविण्याचें ठरलें. पुढें लवकरच वकिली वगैरे धंदे करण्याची त्यांस परवानगी मिळाली. आणि क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांचे दरम्यान लग्नें होण्यास जो प्रतिबंध होता तो निघाला. शिक्षणाकरितां परदेशीं जाण्यास कायद्यानें जो प्रतिबंध करण्यांत आलेला होता, तोही काढून टाकण्यांत आला. १७९२ सालीं क्याथोलिक लोकांची एक मोठी परिषद् भरली. व चालू असलेले किरकोळ प्रयत्न करीत न बसतां एकाच कायद्यानें सर्व 'पीनलकोड' रद्द व्हावें, अशी मागणी करण्यांत आली. १७९३ सालीं राजा तिसरा जॉर्ज यानें क्याथोलिक लोकांचा अर्ज घेतला; व पार्लमेंट भरण्याचे पुढच्याच प्रसंगीं, आयरिश पार्लमेंट सभेनें क्याथोलिक लोकांच्या मागण्यांचा योग्य विचार करावा, अशी राजानें आपल्या भाषणांत शिफारस केली. याच सालीं स्थानिक स्वराज्याच्या निवडणुकींत मतें देण्याचा अधिकार क्याथो-लिक लोकांस आयरिश पार्लमेंटनें दिला. व येथून पुढें म्युनिसिपालिट्यां-तून क्याथोलिक लोक निवडून येऊं लागले. कांहीं अटीवर हत्यारें जवळ

बाळगण्याची त्यांस परवानगी देण्यांत आली. नंतर विश्वविद्यालयाच्या पदव्या त्यांस देण्यास हरकत नाहीं, असें ठरलें. व 'मेनूथ' या ठिकाणीं क्याथोलिक लोकांचें एक कॉलेजही स्थापण्यांत आलें.

तथापि अद्यापि ग्रहण बरेंच सुटावयाचें होतें. सरकारी अधिकाराच्या मोठमोठ्या जागा, ज्यूरींत बसून न्याय निवडण्याचा हक्क, पार्लमेंट सभेचा सभासद होण्याचा हक्क, वगैरे क्याथोलिक लोकांच्या मागण्या अद्यापि मिळावयाच्या होत्या. व १८०५ ते १८२९ पर्यंतची क्याथोलिक लोकांची चळवळ हे वरिष्ठ हक्क मिळविण्याकरितां चाललेली होती. सन १८०७ सालीं या कार्याकरितां क्याथोलिक लोकांनीं अर्ज वगैरे करण्यास एक नवीन कमिटी नेमिली. परंतु तिच्या कामास बरेंच दिवसपर्यंत यश आलें नाहीं. तथापि या कमिटीच्या प्रयत्नानें पंधरा वर्षांपूर्वीं आयरिश पार्लमेंट सभेमध्यें क्याथोलिक लोकांच्या हक्कासंबंधानें जशी चळवळ उडून गेली होती, तशी यापुढें इंग्लिश पार्लमेंट सभेमध्यें होण्यास सुरवात झाली. व येथून पुढें १८२९ पर्यंत बहुधा असें एकही वर्ष गेलें नाहीं कीं, ज्यामध्यें ठराव, वादविवाद, अगर कायद्याचा मसुदा यांपैकीं कोणच्या ना कोणच्या तरी रूपानें क्याथोलिक लोकांचा प्रश्न लोकांपुढें चर्चेस निघाला नाहीं. क्याथोलिक लोकांचा अभिमान बाळगणाऱ्या एखाद्या आयरिश सभासदानें अगर सहानुभूतिपूर्ण व उदारमतवादी अशा इंग्रज सभासदानें कोणच्या ना कोणच्या रूपानें चर्चेस सुरुवात करावी, चर्चेंत भांडणेंही व्हावीं, खडाजंगी उडावी; परंतु त्या योगानें मुख्य प्रश्नाची पीछेहाट न होतां त्याचें पाऊल एक एक पुढेंच पडत जावें, अशी स्थिति झाली. व अखेर क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाचें आयरिश स्वरूप जाऊन तो इंग्रजी राजकारणाचा व पक्षाभिमानाचा विषय होऊन बसला.

आयरिश पार्लमेंट सभा नष्ट झाली त्यावेळीं प्रसिद्ध मुत्सद्दी व राजमंत्री पिट यानें दोन पार्लमेंटसभा एक करण्यास जीं अनेक प्रकारानीं मधाचीं बोटें आयरिश सभासदांच्या जिभेला लावलीं त्यांपैकीं क्याथोलिक लोकांना धर्मस्वातंत्र्य देण्याचें अभिवचन हेंही एक होतें. परंतु तिसऱ्या विलियमप्रमाणें पिट यानेंही विश्वासघातच केला. दोन पार्लमेंटें मोडून एक होतांच पिटनें आपला मोहरा पालटला व ज्या गोष्टीचें वचन दिलें ती

एकदम साध्य होणें शक्य नाहीं अशी सबब तो सांगू लागला. आपणास वचनभंग करावा लागला या सबबीवर सकृत् दर्शनीं त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला. परंतु पिटपेक्षां राजा तिसरा जॉर्ज हा स्वतः क्याथोलिकांस स्वातंत्र्य देण्यास अधिक प्रतिकूल असल्यामुळें १८०४ सालीं प्रधानमंडळाची फिरून तवकल झाली त्यावेळीं, जॉर्ज राजानें पिटकडून असें स्पष्ट वचन घेतलें कीं क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न पुन्हां ह्मणून मी उपस्थित करणार नाहीं. व असें वचन घेतल्यावर मग त्यानें त्याची मुख्य प्रधानाचे जागीं नेमणूक केली. क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न पुढें मागें येणार असें पाहून, व आपल्याहातीं इतके दिवस राहिलेल्या सत्तेचा अंश क्याथोलिक लोकांच्या हातीं जाण्याचा संभव आहे असें जाणून प्रॉटेस्टंट पंथांत जे अत्यंत ज्वलत् धर्मनिष्ठ होते त्यांनीं 'ऑरेंज सोसायटी' नांवाच्या गुप्तमंडळ्याच्या कामास याच सुमारास सुरवात केली. या मंडळ्यांचा हेतु क्याथोलिक लोकांचा छळ व स्वातंत्र्यास होईल त्या तऱ्हेनें आडकाठी करणें हा होता. १७८८ सालीं या मंडळ्या अगर सभा स्थापण्यास प्रथम सुरुवात झाली होती. व त्यांच्या सभासदांना खालीलप्रमाणें शपथ घ्यावी लागत असेः—"मी अ–ब–अशी प्रतिज्ञा करितों कीं माझ्या हातून होईल तितका क्याथोलिक लोकांचा मी नायनाटच करीन, व जोंपर्यंत राजा क्याथोलिक लोकांस प्रतिकूळ राहील तोंपर्यंतच त्याचा अमल मी मानीन." या सभांचे सभासद व क्याथोलिक धर्माचे लोक यांचे नित्य झगडे उडत.

परंतु कोणच्याही गोष्टीची अखेर ही व्हावयाचीच. व क्याथोलिक लोकांच्या दुःखाचीही अखेरची वेळ आतां आल्यामुळें प्रतिकूळ गोष्टींचें कांहीं न चालतां, नदीच्या प्रवाहाप्रमाणें दिवसेंदिवस या न्यायाचे कार्यास अधिकच जोर येऊं लागला. लोकमत बनण्याचें काम कठीण असतें; परंतु एकदां तें बनलें ह्मणजे मग त्याच्या मार्गांत कोणी येत नाहीं व आलें तरी तें टिकत नाहीं. ऑरेंज सोसायटीप्रमाणेंच 'क्याथोलिक–प्रजा-दुःखनिवारक' या नांवाची एक सभा आज बरेच दिवस अस्तित्वांत होती. व तिला हालचाल करण्याची प्रेरणा झाल्यानें बरेंच कार्य झालें. या हालचालीच्या पूर्वीपासून विलियम पिटनें क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य

देण्याचे बाबतींत कायदा करण्याकरितां बिलाचा एक मसुदाही करून ठेवला होता असें ह्मणतात. परंतु त्याच्या दृष्टीनें अजून खरी वेळ आलेली नव्हती. क्याथोलिक कमिटीनें डब्लिन येथें सभा भरवून एक अर्ज तयार केला व मुख्य प्रधान पिट याजकडे डेप्युटेशन धाडण्याचें ठरविलें. पिटनें या डेप्युटेशनची मुलाखत घेऊन मोठ्या गौरवपूर्वक व गोड शब्दांनीं अर्जास उत्तर दिलें. परंतु अर्जास उत्तर देतांना वाटाण्याच्या अक्षता लावून असें सांगितलें कीं या बाबतींत पूर्वीपासून दिलेलीं वचनें व आश्वासनें जरी मला मान्य आहेत व स्वतःची माझी जरी पूर्ण सहानुभूति आहे तरी योग्य वेळ अद्यापि आली नसल्यानें मला या बाबतींत कांहीं करितां येणें शक्य नाहीं. अशाप्रकारें निराशा झाल्यावर या डेप्युटेशननें विरुद्ध पक्षाचा पुढारी चार्ल्स जेम्स फॉक्स याची मुलाखत घेतली. फॉक्सनें मदत देण्याचें कबूल करून हा वादग्रस्त मुद्दा पार्लमेंटपुढें वादविवादास आणला. वादविवाद कडाक्याचा झाला; परंतु प्रचंड बहुमतानें फॉक्सची सूचना नामंजूर झाली. ग्रॅटन हाही यावेळीं पार्लमेंटांत आयरिश मेंबर या नात्यानें हजर होता; परंतु फॉक्स व ग्रॅटन यांचें कांहीं चाललें नाहीं.

परंतु याच सुमारास युरोपांत चाललेल्या इतर घडामोडींचा फायदा या प्रश्नास मिळाला. १८०५च्या दिसेंबरांत नेपोलियन बोनापार्ट यानें 'आस्टरलिडझ्' ची लढाई जिंकली; व त्यामुळें सर्व युरोपखंड त्याचे हातीं जाणार आणि इंग्लंद रसातळास पोंचणार अशी भीति उत्पन्न झाली. पुढीलसालीं पिटनें मुख्य प्रधानकीचा राजीनामा दिला व लवकरच तो वारला. व तेव्हांपासून या प्रश्नास चांगले दिवस आले. क्याथोलिक लोकांचा हितशत्रु पिट मरण पावला व त्यांचा खरा मित्र फॉक्स हा प्रधानमंडळांत शिरला, याचा प्रथमच परिणाम असा झाला कीं, आयरिश लोकांस पाण्यांत पाहणारा व्हाइसरॉय लॉर्ड हारविक हाही आपली जागा सोडून परत गेला. त्याचे जागीं डयूक ऑफ बेडफर्ड हा व्हाइसरॉय झाला. क्याथोलिक लोकांनीं त्याजकडे डेप्युटेशन पाठविलें. तेव्हां त्यानें भाषणांत असें दर्शविलें कीं, क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळण्याची बाकी सर्व तऱ्हेनें सिद्धता झाली आहे. परंतु राजाचें मन वळविणें हें फक्त फॉक्सच्या हातीं आहे, व त्यानें राजाची अनुकूलता मिळविल्यावर मग, क्याथोलिक लोकांनीं आजपर्यंत धिमे-

पणानें जे कष्ट केले व हाल सोसले त्याचें फळ पदरांत पडण्यास एक दिवसाचाही विलंब लागणार नाहीं. परंतु राजा व फॉक्स यांचें विळ्याभोपळ्या इतकें सरळ असल्यामुळें त्याला राजाचें मन वळविणें अशक्यच होतें. पुढीलसालीं ( इ. स. १८०६ ) फॉक्स हाही मरण पावला, व रोमन क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न त्याच्या बरोबरच जमिनींत गाडून जातो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली! त्याच्या पश्चात् हा प्रश्न कोण हातीं घेतो ? अशी चिंता वाटूं लागली. क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य देणें हें न्याय्य असेल खरें, परंतु त्याच्यावांचून इंग्लंदच्या लोकांचें काय अडलें आहे ? ती अप्रिय गोष्ट, तें जळकें लांकूड हातीं धरून स्वतःच्या अंगावर ठिणग्या कोणीं उडवून घ्याव्या ? विनाकारण आपल्या नांदत्या घरावर कोणीं विस्तव ठेवावा ? असें ज्या त्या इंग्रजी मुत्सद्यास वाटे. लष्करांत व आरमारांत तरी क्याथोलिक लोकांचा प्रवेश करण्यापासून कोणाचें नुकसान नाहीं अशा बुद्धीनें एका प्रधानानें तशा अर्थाचें बिल पुढें आणलें, तोंच जॉर्ज राजानें प्रधानमंडळावर एवढे डोळे वटारले. परंतु लाजेकाजेनें राजाची भीड गुंडाळून ठेवून त्यांनीं कॉमन्ससभेंत तें मंजूर करून घेतलें. परंतु त्यांस लगेच राजीनामा द्यावा लागला. व नंतर स्पेन्सर पार्सिवल यास बोलावणें पाठवून त्याजकडून ठराविक वचनें घेऊन राजानें त्यास मुख्य प्रधान नेमलें. अशा रीतीनें निराशा झाली असतांही क्याथोलिक कमिटीनें आपले अर्ज करण्याचें व लोकमत जागृत करण्याचें काम चालू ठेवलें होतें. व अखेर डॅनिअल ओकॉनेल हा पुढारी त्यांस लाभून त्याचे हातून पूर्ण धर्मस्वातंत्र्य मिळण्याचें काम १८२९ सालीं पार पडलें. ओकॉनेलसारखा पुढारी लोकांस एखाद्या शतकांत एखादाच लाभतो. त्याचें चरित्र आह्मीं पुढें चरित्रमालेंत दिलेंच आहे. येथें येवढेंच सांगावयाचें कीं, ओकॉनेलसारख्या चळवळ्या देशभक्तानें पुढाकार घेतल्यापासून या वादग्रस्त प्रश्नास नवीनच वळण मिळालें. कांहीं त्याच्या अंगच्या गुणाचा व कांहीं वेळेचा परिणाम–कसेंही असलें तरी ओकॉनेलनें या प्रश्नावर आयर्लंदचसें काय पण इंग्लंदही गदगदा हालवून सोडलें. तो पार्लमेंटचा सभासद होऊन जाण्यापूर्वीच त्याची ख्याति इंग्लंदांत पसरलेली होती. १८२८ सालीं ‘ क्लेअर ’ नांवाच्या भागाकडून त्याची पार्लमेंटमध्यें

निवडणूक झाली. तो प्रथम पार्लमेंटमध्यें बसण्यास गेला तेव्हां सर्व सभागृह त्याला पाहण्याच्या उत्सुकतेनें भरून गेलें होतें. त्यातूनही मागें सांगितलेली अपमानास्पद शपथ (पान ५३ पहा) अद्यापि अमलांत होती ती घेण्याचें त्यानें नाकारल्यावरून मोठाच बखेडा झाला. पार्लमेंटचे अधिकारी त्यास ठराविक शपथ घेतल्याशिवाय जागेवर बसूं देईनात. व तो शपथ घेईना. सभेंत दोन दिवस वादविवाद झाला. ओकॉनेल यानें मोठें वक्तृत्वपूर्ण भाषण केलें. परंतु त्याला शपथ घेतल्याशिवाय सभेंत बसण्याची परवानगी न मिळून क्लेअर कॉउंटीकडून नवीन सभासद निवडण्याकरितां हुकूम सुटले. परंतु आयर्लंदांत लोकमत या प्रश्नावर दृढ झालें असल्याकारणानें क्लेअरच्या मतदारांनींही फिरून ओकॉनेल यासच निवडून दिलें ! यापुढें मात्र या प्रश्नानें माघार खाल्ली नाहीं. व पुढीलसालीं पार्लमेंट सभेचा कायदा होऊन क्याथोलिक लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेणारा कायदा सर्वांगानें रद्द होऊन त्यांस इंग्रजी प्रजाजनांचे हक्क देण्यांत आले.

क्याथोलिक लोकांवर दोनशें वर्षेपर्यंत झालेल्या या जुलमाचें समर्थन वास्तविक कोणत्याच रीतीनें करितां येण्यासारखें नाहीं. ' फ्रूड ' वगैरे ग्रंथकारांनीं पक्षपातबुद्धीमुळें हें समर्थन करण्याचा थोडाबहुत प्रयत्न केला आहे, तथापि तो अगदीं पोकळ आहे. फ्रूड याच्या मताप्रमाणें अशा तऱ्हेच्या कायद्यांचें समर्थन दोन तऱ्हांनीं करितां येतें. पहिलें असें कीं, इतर देशांत क्याथोलिकपंथी लोकांनीं प्रॉटेस्टंट पंथी लोकांवर अशाच प्रकारचा जुलूम केलेला होता. व दुसरें असें कीं तो काळच असा असहिष्णुतेचा होता कीं प्रॉटेस्टंट लोकांस क्याथोलिक हे असुरी सैतानाचा धर्म शिकविणारे असे खरोखर मनापासून वाटत. परंतु या दोनीही प्रकारच्या समर्थनांत कांहीं अर्थ नाहीं. या प्रश्नाचा विचार सुधारणेच्या दृष्टीनें करावयाचा असतो. व या दृष्टीनें पाहतां जें वाईट तें वाईटच. मग दुसरा तिसरा कोणी तसेंच करतो ही सबब फारशी उपयोगीं पडूं शकत नाहीं. नाहीं ह्मणावयास एक कारण थोडेंसें सयुक्तिक दिसतें तें हें कीं, सतराव्या शतकाचे अखेरपर्यंत क्याथोलिक लोकांनीं बंडखोरीस बरीच मदत केली होती. प्रत्येक बंडांत त्यांचें थोडेंना थोडें तरी अंग असेच. परंतु एक तर क्याथोलिक लोकांस अ-

संतुष्ट राहण्यास त्यांच्या जमिनी हरण करणें वगैरे बरींच पूर्वीचीं कारणें होतीं. व ते जीं बंडें करीत तीं केवळ प्रॉटेस्टंट लोकांच्या शत्रुत्वामुळें नसत तर आपल्या जमिनी वगैरे परत मिळतील या हेतूनें; निदान फारच झालें तर आपल्या जमिनी हरण करणारावर सूड ह्मणून. शिवाय ही गोष्ट लक्षांत घ्यावयास पाहिजे कीं, ज्या कायद्यांचे योगानें क्याथोलिक लोकांस कह्यांत ठेवण्याचा प्रॉटेस्टंट इंग्रजांचा विचार होता, त्या कायद्यांच्या योगानें, शरीरांत जीव व मनांत मनुष्यपण यत्किंचित्‌ही शिल्लक असेपर्यंत असंतोष कमी न होतां उलट तो वाढणें हेंच स्वाभाविक आहे, व अखेर तसा अनुभव आयर्लंदांत आलाही.

क्याथोलिक लोकांस धर्ममतांचे बाबतींत स्वातंत्र्य मिळाल्यावर, त्याचे पाठोपाठ धर्ममतमूलक असा दुसरा एक प्रश्न उपस्थित झाला. आठव्या हेनरीच्या कारकीर्दीपासून आयर्लंदांत प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकांचा प्रवेश झालेला होता. व त्यांस सरकारांतून पगारी जागा वगैरे देण्यांत येत असत. परंतु 'बिशप' वगैरे लोकांचा प्रतिष्ठित संसार मुख्यतः जमिनीच्या उत्पन्नावर अवलंबून असे. त्यांना व त्यांच्या देवळांना मोठमोठाल्या जमिनी तोडून दिलेल्या असत. व इतर जमीनदारांप्रमाणें त्यांनींही आपल्या जमीनदारींत राहून जमिनीची व कुळांची सुधारणाकरून आपला व त्यांचा संसार सुखाचा करावा, तो न करतां ते वाटेल त्या ठिकाणीं रहात; प्रायः आयर्लंद सोडून इंग्लंदांतच असत, व आपल्या गुमास्त्यांकडून जमीनदारीची वहिवाट करवीत. बिशपहून खालच्या प्रतीचे ह्मणजे 'रेक्टर' 'व्हिकर' वगैरे जे धर्मोपदेशक असत त्यांचा चरितार्थ त्यांच्या गावांतील कुळांकडून वसूल केलेल्या 'टाईथ' नांवाच्या करावर अवलंबून असे. हा कर वसूल करण्यास गावानिहाय नेमलेले अधिकारी असत, त्यांस 'प्राक्टर' हें नांव असे. हाही एक प्रकारचा गुमास्ता अगर दलाल असे. यानें कुळांकडून टाईथ वसूल करावा, व रेक्टरची ठराविक रकमेची भरती करून द्यावी, असा स्वतः एक प्रकारचा त्याच्याकडे मक्ता असे. व अशारीतीनें मुख्य मालक जो बिशप व जमील कसणारें क्याथोलिक कुळ यांजमध्यें तीन किंवा चार पायऱ्या असत. कुळांस बिशपचें कधीं दर्शनही होणें नाहीं, मग उच्च प्रतीचा

धर्मोपदेश तर दूरच. मात्र त्याचे नांवावर प्रॉक्टर, प्रॉक्टरचे नांवावर मक्तेदार, मक्तेदाराचे नांवावर पोटमक्तेदार, अशारीतीनें जमिनीचा फाळा व देवळाचा कर वसूल करण्यास सर्व मालक असत. वसुलीचें काम मक्त्यानें दिलें असतां त्यांत अन्याय व जुलूम होणें हें स्वाभाविकच आहे. एक तर रेक्टर, व्हिकर वगैरेंची ठराविक रक्कम भरण्याची जबाबदारी मक्तेदारांवर असल्यामुळें त्यांस कुळांवर सक्ती करावी लागेच. व त्यांतूनही आपला खिसा गरम करण्याचा लोभ त्यांना असल्यामुळें व विचारता पुसता कोणी नसल्यामुळें या सक्तीची मजल जुलमापर्यंत जाई. टाईथ हा कर प्रायश: गरीब कुळांवरच पडे. व तो त्यांस वेळेवर देतां न आला ह्मणजे त्यांजकडून वाटेल तसे कर्जरोखे लिहून घेतले जात; व मग ते मक्तेदाराचे निरंतरचे गुलाम बनून रहात; तो त्यांना वाटेलतसें बिगारीस धरीत. त्याची जमिन फुकट नांगरून देत; व कर्जरोख्याची अमलबजावणी होऊं नये ह्मणून त्याला खुष ठेवण्याकरितां अगर नाइलाज ह्मणून ते हरतऱ्हेचे अपमान सोशीत.

अशारीतीनें वरपासून खालपर्यंत हें धर्मोपदेशक मंडळाचें प्रस्थ गरीबगुरीब कुळांकडून जुलमानें वसूल केलेल्या करभारावर पोसलें जात असे. परंतु याहून अधिक अन्यायाची अशी एक गोष्ट होती ती ही कीं, ज्या कुळांकडून हा कर वसूल केला जाई, त्यांपैकीं बहुतेक सर्व लोक रोमन क्याथोलिक पंथाचे असून त्यांच्या पैशांवर प्रॉटेस्टंट पंथी धर्मोपदेशकांचा खुराक चाले. व वसुलाची सक्ती अगर जुलूम याहूनही वरील गोष्टीमुळें हा करभार देणाऱ्यांस अधिक चीड व त्वेष येण्यास कारण होई. हा टाईथचा कर घेऊन धर्मोपदेशकांनीं प्रॉटेस्टंट पंथाचा उपदेश करावयाचा व प्रॉटेस्टंट पंथीय उपासनामंदिराचा खर्च चालवावयाचा ही गोष्ट क्याथोलिक कुळांच्या काळजास तीक्ष्ण शल्याप्रमाणें बोचत असे. व या अन्यायाच्या कराची पैन्पै देतांना, त्यांस दर पैगणिक आपल्या अंगांतील रक्ताचा एकेक थेंब पापकर्म करविण्यास खर्चीं घातला असें वाटे. बिशप, रेक्टर, व्हिकर यानीं मोठमोठीं प्रार्थनामंदिरें बांधून ठेविलीं होतीं व त्यांत सगळा संच सजवून ठेवलेला असे; परंतु प्रार्थनेच्या वेळीं पहावें तों देवळामध्यें शुकशुकाट. धर्मोपदेशकास शिरस्त्याप्रमाणें वेळ-

त्यावेळीं जाऊन व्यासपीठावर उभें रहावें लागे. परंतु त्याचे समोर एकादुसरा श्रोता असला असला नसला नसला अशीच स्थिति बहुधा असे. कारण सक्तीमुळें जरी कराचे पैसे त्यांना द्यावे लागले तरी प्रार्थनामंदिरांत जाऊन प्रार्थना ऐकण्याची सक्ती त्यांजवर करितां येणें शक्य नव्हतें. या ओस पडलेल्या परंतु शोभिवंत अशा देवालयांच्या आसपास दुसरा एक चमत्कार मात्र दृष्टीस पडे. प्रॉटेस्टंट देवळांत शून्याकार, व जवळच पहावें तों क्याथोलिक पंथी लोक उघड्या मैदानांत शेंकडों हजारों जमलेले असून क्याथोलिक धर्मोपदेशकाची प्रेमळ उपासना भाविकपणें ऐकण्यांत गढून गेलेले असत. व आपण एकाद्या देवळांत आहों अगर रानांत खुल्या जागेवर बसलों आहोंत, आपल्या डोक्यावर ऊन, वारा, पाऊस यांचें निवारण करण्यास आच्छादन आहे अगर नाहीं, याचें त्यांना भानही नसे. अर्थात् या दोन देखाव्यांतील भेद कोणाही प्रेक्षकास दुःसह वाटण्यासारखाच होता. व आपल्या निढळाच्या घामानें मिळविलेल्या पैशांवर ‘ चंडाळ व पाखंडी ’ प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकांची चैन चाललेली पाहून क्याथोलिक लोकांचा तर अंगाचा तिळपापड होई. सिडने स्मिथ या नांवाच्या प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकानें या संबंधानें असें लिहून ठेविलें आहे कीं, ‘ टाईथच्या कराच्या बाबतींत आयर्लंदमध्यें जो जुलूम झाला, तसा निर्दय जुलूम सर्व यूरोप, आशिया, अगर आफ्रिका या तिन्हीही खंडांत केव्हांही झाला नसेल. हा कर खरोखरच इतका बेशरमपणाचा होता कीं, ग्रॅटननें एके प्रसंगीं ह्मटल्याप्रमाणें, तो मक्तेदाराकडून डोळ्याआड परस्पर वसूल होत असे ह्मणून गोष्ट निराळी; परंतु खुद्द धर्मोपदेशकानेंच स्वतः जातीनें कुळाकडून त्याचे समक्ष तो मागवून घ्यावा असा जर कायदा असता तर धर्मोपदेशकानें लाजेनें तोंडच फिरविलें असतें; व अशारीतीनें हा कर वसूल होण्याचें आपोआपच बंद झालें असतें. ’ परंतु मक्तेदारास ही लाज कोठून येणार ! वास्तविक धर्मोपदेशक हा प्रेमळ मेंढपाळासारखा असावा; त्यानें गांवांतील लोकांच्या सुखदुःखाचा परामर्ष घेऊन मेंढपाळ आपल्या कळपांतील कोंकरांना जसें जिवापलिकडे जपतो तसें जपावें. धर्मोपदेशक व लोक यांच्या संबंधाची ही खरी उपपत्ति होय. परंतु आयर्लंदांत या काळांत धर्मोपदेशक हा मेंढपाळ नसून पूर्वजन्मींचा जसा कांहीं दावेदारच असे. त्याचें

तोंड लोकांस दिसत नसे. कारण तो कुळांकडून आलेल्या पैशांवर खुशाल चैन चालवित निरुद्योगी बसे, व तो होऊन लोकांस तोंड दाखवावयास गेला तरी स्वधर्मनिष्ठ क्याथोलिक लोक त्याला सैतानासारखा समजून त्याचें तोंड चुकवीत. मात्र त्याचा करभार वसूल करणाऱ्या मक्तेदाराचें तोंड त्यांना चुकवितां येत नसे. व धनगरी कुत्र्याचें कातडें पांघरलेल्या लांडग्याप्रमाणें या कळपावर तो हवा तसा खुशाल ताव मारी ! !

परंतु अशा तऱ्हेची ही दुःसह स्थिति किती दिवस टिकणार ! या स्थितींतील अन्यायाचें बीज लक्षांत घेऊन राज्यकर्त्यांनीं योग्य वेळीं, योग्य कायदेकानू करून ती स्थिति सुधारावयास पाहिजे होती. परंतु दुर्दैवानें तसें न झाल्यामुळें क्याथोलिक कुळांना आपला न्याय आपणासच करावा लागला. प्रथम कित्येक वर्षें क्याथोलिक लोकांचा द्वेष व क्रोध पोटांतल्या पोटांत धुमसत राहिला. परंतु कालांतरानें तो अनावर होऊन दंगेधोपे सुरू झाले; उभय पक्षीं प्राणहानी होऊं लागली; उपासनामंदिरें आजपर्यंत नुसतीं निर्जन होतीं तीं यापुढें उध्वस्त होऊं लागलीं; व क्याथोलिक लोकांचे गुप्त कट होऊन केव्हां केव्हां निरपराधी धर्मोपदेशक व त्यांचीं बायकामुलें यांचीही कत्तल होऊं लागली. यावर अधिकारी लोक एका खुनास दहा खून घेऊं लागले. ही स्थिति सुमारें १७८० पासून १८३६ पर्यंत ह्मणजे सुमारें पन्नास वर्षें सतत चालू राहिल्यामुळें सिडने स्मिथ ह्यानें एकेठिकाणीं अंदाज केल्याप्रमाणें या टाईथ कराचे वसुलीचे बाबतींत उभय पक्षीं मिळून जवळ जवळ दहा हजार मानवी प्राण्यांचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें संहार झाला असेल. या कराच्या वसुलीचे कामीं लोकांकडून प्रथम सन १७८६ च्या सुमारास उघडपणें चळवळ सुरू झाली. क्याथोलिक कुळें गांजून गेलीं होतीं; त्यांस उपाय सुचेना. तेव्हां कांहीं धाडसी तरुण लोकांनीं मक्तेदार लोकांस दहशत घालण्याचें काम आपल्या अंगावर घेतलें. व राजकीय असंतोषाची जोड धर्मद्वेषास मिळून प्राणहानीचें अपवित्र काम त्यांचे हातून सुरू झालें. ही चळपळ 'केरी' नांवाच्या जिल्ह्यांत प्रथम सुरू झाली. अमुक एक रकमेहून जास्त टाईथचा कर द्यावयाचा नाहीं, असें लोकांनीं ठरवून प्रांतानिहाय सर्व लोकांकडून तसें करण्याच्या शपथा घेण्यास सुरुवात झाली. व त्याजबरोबर प्रॉटेस्टंट लोकांस त्रास देण्याचें व

इतर अत्याचाराचें कामही सुरू झालें. पार्लमेंट उघडली ह्मणजे ही बेकायदेशीर चळवळ थांबे; व अधिकाऱ्यांस स्वस्थता झाली असें वाटे. परंतु पार्लमेंट संपतांच ती चळवळ पुन्हां सुरू होई. या चळवळींत प्रथमतः फक्त क्याथोलिक लोकच सामील होते. परंतु प्रॉटेस्टंट पंथामध्यें ही 'डिसेंटर्स,' 'प्रेसबिटरेनियन्स' वगैरे इतर कांहीं पंथ असे होते कीं, राजदरबारीं स्थापित झालेला विशिष्ट पंथ त्यांस मान्य नव्हता, आणि त्यामुळें टाईथचा कर देणें हें क्याथोलिक लोकांप्रमाणें त्यांसही संमत नव्हतें. व हळू हळू या पंथांतील लोकही क्याथोलिक लोकांस सामील झाले. यामुळें कराचा वसूल मंदाऊं लागला. बेकायदेशीर चळवळीविरुद्ध ठराविक असे 'दडपशाहीचे' कायदे पार्लमेंटनें पुष्कळ केले. परंतु त्यामुळें वसुलास मदत होईना. आकारणी झालेला कर न दिल्याबद्दल अगर न देण्याचा कट केल्याबद्दल दंड, फटके, खोडे वगैरे शिक्षा भराभर देण्यांत येऊं लागल्या; परंतु वसुलाची भरती कांहीं केल्या होईनाशी झाली. कांहीं कांहीं प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकांना खरोखरच उपासमार होण्याची वेळ येऊन पोहोंचली. कुळानें कर न दिला तर त्याचे जमिनीवरील जंगम मिळकत विकून तो कायदेशीर रीतीनें वसूल करावयाचा; परंतु कुळाची जंगम मिळकत व गुरें ढोरें जप्त करून तीं जाहीर लिलांवास काढिलीं तर तीं कोणीही घेऊं नये, असा लोकांचा कट असल्यामुळें जप्ती करून न करून सारखीच होई. शिवाय जप्ती करावयास मक्तेदार किंवा धर्माधिकारी जाऊं लागला ह्मणजे त्याला लोक अडथळा करीत; अडथळा झाला ह्मणजे तो पोलीसची मदत बोलावी; पोलीस येऊन जबरदस्ती करूं लागले ह्मणजे कुळाची दया येऊन व सहानुभूति वाटून दर पोलिसागणिक पांच पन्नास लोक त्याच्या मदतीस येत; असा जमाव जमला ह्मणजे अपशब्दाची सलामी होऊन दोन्ही पक्ष हातघाईवर येत; तसें झालें ह्मणजे लोकांचीं दंडुकीं, व पोलीसचीं हत्यारें यांचा उपयोग होई; त्यानंतर खटले, दंड, शिक्षा, वगैरे ओघानेंच येत; एक ठिकाणच्या दंग्याची बातमी शंभर ठिकाणीं पसरून सर्वत्र चित्तक्षोभ होऊन अस्वस्थता उत्पन्न होई; व या सर्व गोष्टी पार्लमेंटमध्यें वादविवादास निघून अधिकारीवर्ग व लोकांचे पुढारी यांची चकमक झडून

अग्निकणांचा वर्षाव होई. हा असा पद्धतशीर क्रम या अन्यायी कराच्या पायीं आयर्लंदमध्यें कमींत कमी पांच पंचवीस वर्षें चालू होता. व प्रत्येक वर्षी या कराची वसूल बाकी अधिकाधिकच थकूं लागली. कोणास कांहींच उपाय सुचेना. कारण कर जरी सर्वस्वीं अन्यायाचा होता, तरी तो कित्येक पिढ्या चालू होता. व धर्मोपदेशक मंडळाचा सर्व चरितार्थ त्याजवर अवलंबून असल्यामुळें तो चालू ठेवणें अगर बंद ठेवणें या दोहोंचीही सारखीच पंचाईत वाटूं लागली. हा लढा संपे-पर्यंत कित्येक वर्षें, सर्व हिंदुस्थान राखण्यास जितकें सैन्य इंग्रजांस ठेवावें लागतें, तितकें लहानशा आयर्लंदांत ठेवावें लागलें. एका १८३३ सालांत हें जादा लष्कर पोसण्यास दहालक्ष पौंडांहून अधिक खर्च लागला. आणि टाईथ कराचे बाराहजार पौंड वसूल करण्यास सव्वीस हजार पौंड खर्च करावे लागले ! आयरिश पार्लमेंटांत सन १८०० सालापूर्वी सुमारें पंच-वीस वर्षें हा वाद चालूच होता, व पुढें खुद्द ब्रिटिशपार्लमेंटांत हा वाद आल्यावर त्याचा निकाल लागण्यास आणखी अडतीस वर्षें लागलीं. पण अखेर टाईथचा कर बंद झाला; धर्मोपदेशकांचें नुकसान भरून काढ-ण्यास त्यांस सरकारी तिजोरींतून मदत द्यावी, व उगाच ओढत आलेली कराची लाखो रुपयांची बाकी वसूल करितां येत नाहीं सबब ती माफ क-रावी असें ठरविलें जाऊन या वादाची अखेर करण्याचें श्रेय लॉर्ड जॉन रसेल या मुख्य प्रधानास व त्याचप्रमाणें प्रजापक्षीय पुढारी ओकॉ-नेल यास मिळालें.

रोमनक्याथोलिक लोकांविरुद्ध केलेले कायदे रद्द होऊन त्यांस स्वातंत्र्य मिळालें; व टाईथसारख्या करांचा वसूल थांबून, पावलोंपावलीं आयरिश क्याथोलिक लोकांच्या डोळ्यांत सुया टोंचत होत्या त्या निघाल्या. तथापि आयर्लंद हें मुख्यतः क्याथोलिक लोकांचें राष्ट्र या दृष्टीनें पाहतां त्यांस होणाऱ्या अन्यायाच्या सर्व बाबी संपल्या नव्हत्या. यांपैकीं मुख्य बाबी दोन अद्यापि उरल्या होत्या. पैकीं पहिली अशी कीं, आयर्लंदचे लोक क्याथोलिक असतां आयर्लंदच्या तिजोरींतल्या पैशानें प्रॉटेस्टंट धर्मा-धिकारी व धर्मोपदेशक पोसले जात. ‘ टाईथ ’ कराच्या व या प्रश्नांत मुख्य भेद असा कीं, तो कर व्यक्तिशः क्याथोलिक लोकांच्या खिशांतून

द्यावा लागत असे; परंतु तिजोरींतील पैसे खर्च होत ते अमुक एका व्यक्तीचे असे नसल्यामुळें टाईथसंबंधानें जितका प्रत्यक्ष जाच व्यक्तिमात्रास होई तितका या दुसऱ्या बाबीमुळें होत नसे; व यामुळें ही बाब लोकांच्या असंतोषास कारणीभूत होण्यास जरा अधिक दिवस लागले. तिजोरींतील पैसा सर्व रयतेचा व कर देणाऱ्या प्रजेचा मिळून; व तींतून अनाठायीं खर्च झाला तरी त्याबद्दल व्यक्तिशः वाईट कोणास वाटणार ? परंतु तो पैसा प्रॉटेस्टंट धर्मावर खर्च होत होता, हें क्याथोलिक लोकांस केव्हांही पसंत पडण्यासारखें नव्हतें. व १८२९ सालीं क्याथोलिक लोकांची मुक्तता करण्याचा व १८३८ सालीं टाइथचा कर बंद करण्याचा असे दोन कायदे क्याथोलिक लोकांनीं केवळ आपल्या चळवळीच्या जोरावर ब्रिटिश पार्लमेंटकडून मिळविले असल्यामुळें या नवीन प्रश्नासंबंधानेंही त्यांस आशा वाटूं लागली होती. दरम्यान फीनीअन लोकांचें बंड होऊन त्यांचा पाडाव झाला होता; तरी त्याचे योगानें, ‘ आयरिश लोकांस असंतुष्ट राहण्यास खरोखरच कांहीं सबळ कारण असलें पाहिजे, एरवीं अशीं साहसाचीं कर्में करून प्राण खर्ची घालण्यास त्यांना बुद्धि होणार नाहीं,’ अशी सुसंस्कृत व विचारी इंग्रजी मुत्सद्यांची पुरी खात्री झाली होती. यामुळें बंडाचा मोड झाल्यावर, ‘ काय केलें असतां आयरिश लोकांचें समाधान होईल ? त्यांना कशानें बरें वाटेल ? ’ हा प्रश्न सोडविण्याकडे त्यांचें लक्ष लागून राहिलें होतें. व अशा वेळीं प्रॉटेस्टंट धर्ममंडळ पोसण्याकडे आयरिश तिजोरींतून जो विनाकारण खर्च होई त्या प्रश्नाकडे आयरिश पुढाऱ्यांनीं इंग्लंदचें मन वळविलें.

ज्यावेळीं इंग्लंदचें व आयर्लंदचें पार्लमेंट एक करण्यांत आलें, त्यावेळीं झालेल्या पार्लमेंटच्या कायद्यांत असें एक कलम घातलेलें होतें कीं, इंग्लंदचें व आयर्लंदचें धर्ममंडळ हीं दोन्ही एकत्र करून त्यांस संयुक्त धर्ममंडळ असें नांव द्यावें; त्याचा कारभार व व्यवस्था पूर्वीच्या इंग्लंदच्या धर्ममंडळाप्रमाणेंच चालावी. अर्थात् इंग्लंदमध्यें ज्याप्रमाणें सार्वजनिक खजिन्यांतला पैसा प्रॉटेस्टंट धर्ममंडळावर खर्च होत असे त्याचप्रमाणें आयर्लंदच्या खजिन्यांतला पैसाही प्रॉटेस्टंट धर्ममंडळावर खर्च व्हावयाचा होता. परंतु जीं कारणें टाइथच्या कराला व्यक्तीच्या दृष्टीनें प्रतिकूळ होतीं तींच

आयरिश तिजोरींतील पैसा प्रॉटेस्टंट धर्माधिकारी मंडळावर खर्च होण्यासही सार्वजनिकदृष्ट्या लागू होतीं. हा खर्च असा पुष्कळ वर्षें होत होता; तो खर्च होणें हें आयर्लंदमध्यें प्रॉटेस्टंट लोकांचें जें वर्चस्व आज दोन तीनशें वर्षें चालू होतें त्याची एक खूण होती; व हा खर्च पुढें बंद केला असतां राजपक्षीय प्रॉटेस्टंट लोकांचा राग होऊन ते बंडही करण्यास प्रवृत्त होतील अशी भीति होती. तथापि, या बंडाच्या भीतीपेक्षां क्याथोलिक लोकांच्या असंतोषाची, व वादग्रस्त बाबदींत होत असलेल्या अन्यायाची भीति इंग्लंदच्या मुत्सद्यांस त्यावेळीं विशेष वाटली. या नवीन प्रश्नास ‘ धर्ममंडळ-विघटने ’ ची चळवळ असें ह्मणतात.

आयरिश पार्लमेंट स्वतंत्र असतां, ह्मणजे सन १८०० च्या पूर्वीं, हा प्रश्न आयर्लंदांत कधीं उपस्थित झाला नव्हता. लोकांना त्याचा अन्याय भासत नव्हता असें नाहीं; परंतु रोमन क्याथोलिक लोकांना पशूप्रमाणें वागविणारे कायदे जोंपर्यंत अमलांत होतें तोंपर्यंत असल्या किरकोळ बाबी दुरुस्तीकरितां हातीं कोण घेणार ? व घेतल्यावरही नगाऱ्यापुढें टिमकीचा आवाज कोणास ऐकूं जाणार ? परंतु सन १८५८ सालच्या फीनिअन लोकांच्या बंडानंतर या प्रश्नास आपोआपच महत्त्व आलें. प्रॉटेस्टंट धर्म-मंडळावर खजिन्यांतले पैसे खर्च केल्यानें फायदा कोणाला होणार ? या प्रश्नास ‘ फक्त शेंकडा दहा वीस लोकांना ’ असेंच उत्तर कोणासही द्यावें लागे. व ‘ दहा वीस विधर्मी लोकांच्या फायद्याकरितां क्याथोलिक प्रजेनें दिलेल्या करभारापैकीं पैसा काय म्हणून खर्च व्हावा ? ’ असा प्रश्न केला असतां ‘ असें करणें अन्याय्य आहे ’ असेंच उत्तर देणें भाग होतें. प्रॉ-टेस्टंट धर्ममंडळ पोसून क्याथोलिक लोकांचे प्रॉटेस्टंट बनवायचें ह्मटलें तर, जे लोक तीनशें वर्षें असंख्य दुःखें सोसूनही धर्मभ्रष्ट झाले नाहींत ते मूठभर प्रॉटेस्टंट धर्माधिकाऱ्यांना निर्जन देवळांत नांदूं दिल्यानें आपला धर्म कधीं तरी सोडतील काय ? असें कोणासही वाटे. व सक्तीनें धर्ममतां-तर करविण्याचे दिवसही निघून गेले होते. एकोणीसाव्या शतकाच्या उत्त-रार्धांत इंग्रजांचे मनांत धर्माचे बाबदींत सात्विक सहिष्णुतेचा पुरा सं-चार झालेला हाता; व धर्ममंडळ पोसण्यासारख्या पोरकट हट्टाकरितां आ-यर्लंदांत असंतोष धुमसत ठेवावा, व ब्रिटिश साम्राज्य विकलांग करावें

हें कोणासही पसंत पडण्यासारखें नव्हतें. हें धर्ममंडळ बुडवून टाकावें, अर्थात् त्याजवरचा सार्वजनिक खर्च बंद करावा अशी सूचना पार्लमेंट सभेंत सन १८६८ सालीं मार्च महिन्यांत जॉन फ्रान्सीस मॅग्युअर यानें आणली त्यावेळीं पुष्कळ वादविवाद झाला. लॉर्ड मेयो, हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय, हे तेव्हां आयर्लंदचे स्टेट सेक्रेटरी होते. त्यांनीं सदर सूचनेस अर्धवट अनुकूळ असें मत दिलें. परंतु ती सूचना कोणा पुढारी मुत्सद्यानें अंगीकारिली नाहीं तर नामंजूर होणार, असा रंग दिसतांच नामदार ग्लॅडस्टन हे पुढें झाले व त्यांनीं त्या सूचनेचा अंगीकार केला. ग्लॅडस्टन साहेब स्वतः प्रॉटेस्टंट होते व परम धार्मिकही होते. इंग्लंदांत धर्ममंडळावर सरकारी तिजोरींतून पैसा खर्च व्हावा असें त्यांचें मत होतें. तथापि क्याथोलिक लोकांचा पैसा प्रॉटेस्टंट धर्ममंडळावर खर्च व्हावा ही गोष्ट अन्यायाची आहे असें त्यांना वाटलें; व त्यांनीं हा प्रश्न हातीं घेतल्यापासून त्यास तेज आलें. ग्लॅडस्टन साहेबांनीं पुढें आणलेले ठराव बहुमतानें पास झाले. नंतर पार्लमेंट मोडून नवीन निवडणुकी झाल्या, तथापि या वादग्रस्त प्रश्नावर देशांत बहुमत मिळून नव्या पार्लमेंटमध्यें बिल येऊन पूर्वी पास झालेल्या ठरावांस कायद्याचें स्वरूप मिळालें. ही गोष्ट १८६८ सालीं घडून आली. या कायद्याचे योगानें आयर्लंदांत सरकारी धर्ममंडळ असें राहिलें नाहीं. खासगी प्रॉटेस्टंट धर्ममंडळ शिल्लक राहिलें, परंतु त्यास सरकारी तिजोरींतून पैसा देऊं नये असें ठरलें. आयरिश प्रॉटेस्टंट बिशप, 'हाउस ऑफ लॉर्डस्' मध्यें आजपर्यंत हक्कानें बसत असत त्यांचा तो हक्क नष्ट झाला. आयर्लंदमधील धर्माधिकाऱ्यांकडे न्यायकोर्टाप्रमाणें इनसाफाच्या कांहीं बाबी दिल्या होत्या, त्याही काढून घेण्यांत आल्या, व प्रॉटेस्टंट लोकांनीं खासगी रीतीनें निवडणुकी करून जर धर्ममंडळ स्थापिलें तर त्यास प्रॉटेस्टंट लोकांपुरत्या अधिकाराची सनद द्यावी; परंतु त्याचा क्याथोलिक लोकांवर अंमल चालूं नये असें ठरलें. क्याथोलिक लोकांच्या दृष्टीनें हा त्यांस मोठाच जय मिळाला व तो मिळविण्याचे कामीं क्याथोलिक लोकांपैकीं सर्व पक्षाच्या लोकांनीं खांद्याला खांदा भिडवून व आपसांतील खासगी वैमनस्यें विसरून खटपट केली, त्यामुळें मिळाला असें ग्रंथकारांचें मत आहे.

दुसरी धर्मविषयक किरकोळ बाब ह्मटली ह्मणजे शिक्षणासंबंधाची. आयर्लंद ही क्याथोलिक लोकांची जन्मभूमि असतां, तिजमध्यें क्याथोलिक लोकांना त्यांच्या मताप्रमाणें शिक्षण मिळण्याची कांहीं सोय असूं नये ही त्यांस वाईट वाटण्यासारखी गोष्ट होती. १८७३ पर्यंत आयर्लंदांत फक्त दोनच विश्वविद्यालयें होतीं. परंतु त्यांत धर्मशिक्षण मुळींच देत नसत. यामुळें आयर्लंदांत एक नवीन विश्वविद्यालय स्थापून त्यांत धार्मिक ( क्याथोलिक ) शिक्षण देण्याची व्यवस्था झाली पाहिजे असें आयरिश लोकांचें ह्मणणें होतें. परंतु या मागणीस इंग्लंदांत फारच प्रतिकूळता होती. एक तर क्याथोलिक धर्मच मुळीं इंग्लदच्या लोकांस पसंत नव्हता; व दुसरें असें कीं ज्या कारणाकरितां प्रॉटेस्टंट धर्ममंडळावरचा खर्च कमी करणें न्यायाचें होतें त्याच कारणाकरितां क्याथोलिक विश्वविद्यालय मुद्दाम नवें स्थापून त्यावर प्रॉटेस्टंट लोकांनीं दिलेल्या करभारापैकीं पैसा खर्च करणें हें अन्यायाचें झालें असतें. परंतु आजपर्यंत क्याथोलिक लोकांस झालेल्या अन्यायाचे मानानें हा अन्याय ह्मणजे कांहींच नाहीं, व शिक्षणाची नवीन व्यवस्था करणें जरूर आहे अशा विचारानें, ग्लॅडस्टन साहेबांनीं १८७३ सालीं फेब्रुआरी महिन्यांत एक बिल पुढें आणिलें. परंतु मार्चच्या ११ व्या तारखेस अत्यंत कडाक्याचा वाद होऊन बिल नामंजूर झालें. कॉनझरव्हेटिव्ह व आयरिश अशा दोन बांजूंनीं प्रतिकूलता उत्पन्न झाल्यानें ग्लॅडस्टन साहेब प्रधानगिरीचा राजीनामा देण्यास तयार झाले. व तेव्हांपासून हा प्रश्न आतांपर्यंत अनिश्चित स्थितींत पडलेला आहे. सन १८२९ सालापासून क्याथोलिक लोकांस प्राथमिक व दुय्यम प्रतींच्या शाळांतून जाऊन शिक्षण मिळवितां येऊं लागलें खरें; परंतु विश्वविद्यालय हा कोणत्याही राष्ट्रांतील शिक्षणाचा पाया नसलाच तरी निदान आधारस्तंभ तरी आहे हें खास. व अद्यापही आयरिश क्याथोलिक लोक जेथें जाऊन हौसेनें शिक्षण मिळवितील असें विश्वविद्यालय आयर्लंदांत निर्माण न झाल्यानें क्याथोलिक लोकांची शिक्षणाविषयक तक्रार आहे तशीच आहे.

# भाग ५ वा.

## शेतकऱ्यांची चळवळ.

जमिनीबाबद आयरिश लोकांची जी तक्रार आहे तिचें स्वरूप खालीं वर्णन केल्याप्रमाणें आहे. इंग्लंदचे टयूडर व स्टुअर्ट राजे आणि ऑलिव्हर क्रॉमवेल यांचे कारकीर्दींत लाखो एकर जमिनी क्याथोलिक लोकांचे ताब्यांतून काढून प्रॉटेस्टंट इंग्रज लोकांचे ताब्यांत देण्यांत आल्या, व विलियम राजाचे कारकीर्दींत जमिनी खालसा करण्याचें कारस्थान पूर्णतेस पावलें हें पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. या वेळेपर्यंत इंग्रजी राजनीतीचें धोरण असें होतें कीं, जित आयरिश राष्ट्रास पूर्णपणें सर्व तऱ्हेनीं जेर करून त्यावर एकदां नांगर फिरवावा आणि बंडखोरपणा व अराजनिष्ठा यांची मुळीनमुळी उपटून काढावी ह्मणजे मग सुधारणेचें बीं त्या जमिनींत घातलें तर चांगलें रुजेल. या हेतूनें वसाहतवाल्यांनीं विलियम राजाला आपलें वचन मोडावयाला लावून आयरिश लोकांच्या धर्मावर व त्यांच्या घरांदारांवर नांगर फिरविण्यास सुरवात केली. सर्व जमिनी हस्तगत झाल्यावर त्या कशा पिकवाव्या असा प्रश्न प्रॉटेस्टंट जमीनदारांस उत्पन्न झाला. तेव्हां त्यांनीं स्कॉटलंदांतून प्रॉटेस्टंट कुळें, खंडकरी, धारेकरी वगैरे आणून त्यांजकडून जमिनींची लागवड करण्याचा प्रयत्न केला. परंतु जमीनदारांनीं या कुळांकडून जबर धारा मागण्यास हळू हळू सुरवात केल्यामुळें बरींच कुळें नाराज होऊन अमेरिकेस निघून गेलीं. व शेवटीं देशांतील आयरिश क्याथोलिक कुळांकडूनच आपल्या जमिनी कसणें त्यांना भाग पडलें. क्याथोलिक शेतकऱ्यांस झालें तरी तें हवेंच होतें. त्यांचा सर्व उदरनिर्वाह जमिनीवर; यास्तव कागदोपत्रीं मालक कोणीही असला तरी निदान पीक मिळविण्यापुरत्या जमिनी त्यांच्या ताब्यांत राहिल्यामुळें त्यांचें मुख्य काम झालें. या जमिनी अबाधितपणें त्यांच्या ताब्यांत राहत्या तर ठीक होतें. परंतु जमीनदारास हवा तितका धारा मिळाला नाहीं

ह्मणजे तो आपली जमीन वाटेल त्या कुळास देई; व असें केल्यामुळें हातची जमीन गेल्यानें कूळ निराधार होऊन पडे. शिवाय जमिनींत काय पिकवावयाचें, एखाद्या खात्यांतली किती जमीन कोणत्या कामाकडे लावावयाची, या बाबतींत कुळाचें व जमीनदाराचें पटत नसे. यामुळें कुळाला कोणत्याही प्रकारची शाश्वती वाटत नसे व तंटेही होत. हा प्रकार अठराव्या शतकाचे प्रारंभीं आयर्लंदांतील चार पंचमांश इतक्या जमिनीचा होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु अशी स्थिति फार काळ टिकणें शक्य नाहीं. व लिमरिकच्या तहानंतर सुमारें ७० वर्षांनीं ह्मणजे १७६० चें सुमारास जमिनीचे बाबतींत क्याथोलिक कुळें व प्रॉटेस्टंट जमीनदार यांचे दरम्यान उघड तंटा सुरू झाला; व तो पुढें सुमारें १२० वर्षें, ह्मणजे १८८० मध्यें ग्लॅडस्टन साहेबांचा जमिनीबाबद कायदा होईपर्यंत चालला होता. १७६१ सालीं इंग्लंदांत गुरांवर रोग पडून आयरिश गुरांना किंमत फार येऊं लागली. तेव्हां आयर्लंदांतील जमीनदारांनीं खिल्लारें पोसण्याकरितां चांगल्या पिकांच्या जमिनीही पड पाडून त्यांचीं कुरणें केलीं. आयर्लंदांत गवत फार पिकतें व ती जमीन गुरांचा व्यापार करणारांस फार उपयोगी आहे. परंतु पिकांच्या जमिनी पड पाडणें ह्मणजे गुरें जगवून मनुष्यें मारणें असें होय. व लवकरच जमीन कसण्याचा धंदा हातचा जाऊन भुकेनें संतापलेले आयरिश शेतकरी बेफाम होऊन जमीनदारांवर उठले. त्यांनीं शेंकडों कुरणांचीं कुंपणें मोडून जाळून टाकलीं; गुरें हाकून लावलीं व जखमी केलीं. आणि अशा रीतीनें जमीनदारांच्या अडवणुकीस त्यांनीं प्रारंभ केला. त्यांचें मागणें इतकेंच होतें कीं, गांवच्या पिकाच्या जमिनी कुळांस सोडून द्याव्या, धारा कमी करावा, काढून लावलेल्या कुळांस फिरून जमिनी द्याव्या, व त्यांस अन्नास लावावें. जमीनदार लोक हें कबूल करीनात. तेव्हां या तंट्यांत अत्याचार व अनन्वित कृत्यें होऊं लागलीं. बेफाम झालेल्या शेतकऱ्यांस त्यांच्यांतीलच तरुण पुढारी मिळून त्यांनीं जमीनदारांचे अंगावर हात टाकण्यास सुरवात केली. पुष्कळ जमीनदार गुमास्त्यांमार्फत जमिनीची व्यवस्था करीत, व या गुमास्त्यांपैकीं पुष्कळ लोक आडदांड, खाबू, अविचारी व जुलमी असे असत. यामुळें खुद्द जमीनदार जातीनें हजर असतां जे प्रकार झाले नसते ते प्रकार गुमा-

त्यांकडून होत. अशा रीतीनें उभयपक्षीं हा तंटा विकोपास चालला. शेतकऱ्यांचे जमाव, गुप्तमंडळ्या होऊं लागल्या; त्यांचे कट बनून जमीनदारांविरुद्ध ते एकमेकांस मदत करूं लागले.

शेतकीची जमीन पिकास निरुपयोगी झाल्यामुळें दोन वाईट परिणाम झाले. पुष्कळ शेतकरी लोकांस मोलमजुरी मिळेना, व जरा कां पीक खराब झालें कीं, दुष्काळ पडून लोकांच्या प्राणाशीं गांठ येई. यामुळें शेतकरी लोक देश सोडून परदेशास जाऊं लागले. परदेशीं गेले त्यांचें बरें झालें; परंतु जे राहिले त्यांना फार त्रास सोसावा लागला. कांहीं लोक असे हाल काढीत असतां, इतर कांहीं लोक कुरणाच्या गवतांत मेंढ्या चारून नफा मिळवीत, व मेंढ्या पाळण्याचा धंदा फार श्रमाचा नसल्यानें तो वर्ग हळूं हळूं आळशी बनत चालला. आळसामागें दुर्गुणपरंपरा ही ठेवलेलीच असते. भिकारी लोकांचा वर्ग वाढत चालला. व त्याचे पाठोपाठ गुन्हेही वाढूं लागले. तात्पर्य, शेत जमीन ह्मणजे देशांतील सत्व किंवा सार असें असतां, तिचा फायदा, तिच्या उपयोगाप्रमाणें दुरुपयोगाचाही फायदा, देशाबाहेर ह्मणजे मुख्यतः इंग्लंदमध्यें राहणाऱ्या जमीनदारांस मिळूं लागला; व या स्थितीचे सर्व तोटे मात्र आयरिश लोकांच्या पदरीं पडूं लागले. स्विफ्ट, बार्कले, प्रायर, डॉब्स, वगैरे विचारी व देशाभिमानी गृहस्थांनीं व लेखकांनीं जमीनदारांस परोपरीनें बोध करून पाहिला; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. व शेतकऱ्यांच्या दुःखास सीमा नाहींशी झाल्यामुळें त्यांनीं अखेर आपल्या हातीं कायदा घेतला. आपल्याइकडे सावकार व जमीनदार यांचा जुलूम असह्य झाला ह्मणजे असाच प्रकार होतो हें आपण पाहतोंच. पुणें जिल्ह्यांत १८७६ सालीं दंगे झाले त्यांस कारण सावकाराचें व्याज हें जसें झालें, त्याचप्रमाणें आयर्लंदांत अठराव्या शतकांत जमीनदाराचा जुलूम हा अनर्थास कारण झाला. मनस्टर प्रांतांत ‘ व्हाईट बॉईज ’ व अलस्टर प्रांतांत ‘ ओक बॉईज, ’ तसेच ‘ राईट बॉइज, ’ ‘ थ्रेशर्स, ’ ‘ रिबनमेन ’ ‘ हार्टस ऑफ स्टील ’ ‘ व्हाईटफीट ’ ‘ ब्लॅकफीट ’ ‘ रॉकाईट ’ अशीं अनेक नांवें धारण करणारे बंडखोर उठले. व त्यांनीं अंगावर शहारे येण्यासारखीं अनन्वित कृत्यें केलीं. आयरिश शेतकरी लोक बोलून चालून अडाणी व रानवट, आणि त्यांतून त्यांचे

बरेच दिवस दास्यत्वांत गेलेले. यामुळें त्यांच्या बंडखोरपणास भयंकर स्वरूप आलें. दास्यत्वांत ज्यांचे दिवस जातात अशा लोकांच्या दंग्याधोप्यांत सुमार राहत नाहीं, हा अनुभव प्राचीन स्पार्टन लोकांपासूनचा आहे; व तोच अनुभव आयर्लंदांत या वेळीं इंग्रजी जमीनदारांना आला. या दंग्याधोप्यांस राजकारणाचें नसतें स्वरूप देण्याचा अधिकाऱ्यांनीं ठराविक प्रयत्न केला, व कित्येक पुढारी या राजकीय कटांत सामील आहेत अशा आरोपावरून फांशीही देण्यांत आले ! परंतु हा सर्व त्रास जमीनदारांच्या जाचामुळें होत आहे हें पुढें लवकरच दिसून आलें. व धर्माचा अथवा राजकारणाचा या दंग्यांत कांहीं एक संबंध नव्हता असें सर्व इतिहासकारांचें मत आहे. निवळ शेतकऱ्याला राजकारण खरोखर कळतच नाहीं. राजा कोणीही असो; त्याच्या जमिनीचा तुकडा त्याला राहिला आणि तो पिकून त्याला आपल्या बायकापोरांचा गुजारा करितां आला ह्मणजे मग तो संतुष्ट असतो. परंतु त्यांत व्यत्यय आला ह्मणजे मग मात्र त्याचें पित्त खवळतें; व ज्या कोणाशीं त्याचा प्रत्यक्ष संबंध येतो त्याजवर तो हात टाकतो.

१७७८ सालच्या सुमारास क्याथोलिक लोकांवरील कायद्यांचें बंधन कमी होऊं लागलें व त्याचा प्रथम अनुभव जमिनीचे बाबदींत आला. क्याथोलिक लोकांस आजपर्यंत जमीन मालकी हक्कानें घेण्यास परवानगी नव्हती; परंतु १७७८ सालीं कायदा पास होऊन त्यांस ९९९ वर्षांचे करारावर जमीन घेतां येऊं लागली. व ९९९ वर्षांचा ताबा ह्मणजे अर्थात् कायमचीच मालकी. १७८२ च्या कायद्यानें त्यांस जमीन कायमची विकत अगर गहाण ठेवतां येऊं लागली. व असें झाल्यानें शेतकरी लोक प्रॉटेस्टंट जमीनदारांच्या हातून थोडथोडे सुटूं लागले. यामुळें पुढें सन १८०७ पर्यंत देशांत स्वस्थता होती. पण १८०७ सालीं फिरून दंग्यांस सुरवात झाली, व ते राहून राहून १८३५ पर्यंत चालू होते. यावेळीं शेतकऱ्यांना धाऱ्यांत सूट पाहिजे होती; व कुळास विनाकारण शेतांतून काढूं नये, व त्यास मोलमजुरी अधिक द्यावी असें त्यांचें मागणें होतें. परंतु जमीदार स्वतः आयर्लंदांत राहत नसत. व त्यांना कुळांचीं सुख दुःखें व तक्रारी समक्ष पाहण्यास न सांपडल्यानें ते त्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष करीत. अशा वेळीं सरकारानें लक्ष घालून मध्यस्थी केली पाहिजे, व जरूर

तर कायदे करून त्यांच्या अंमलबजावणीनें आप्पलपोट्या जमीनदारांस न्यायबुद्धीचें प्रत्यक्ष शिक्षण दिलें पाहिजे. हिंदुस्थानांत ही गोष्ट सरकारानें अनेक वेळां केली आहे. व आजकाल हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांत जमीनदार लोकांचें प्रस्थ सरकारी कायद्यानें मोडलें आहे, इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं प्रांतांत, जमीनदार व सावकार यांचा तोटा करून शेतकऱ्यांस सवलतीही दिल्या जात आहेत. खुद्द आयर्लंदांतही असले कायदे पुढें करण्यांत आले व जमीनदारांच्या हावरेपणास आळा घालण्यांत आला. परंतु या सर्व गोष्टी शेतकरी लोकांनीं स्वत: तीनशें वर्षें कष्ट सोसून दोनशे वर्षें सावकारांस व अधिकाऱ्यांस कष्ट दिल्यावर मग घडून आल्या. आयरिश शेतकऱ्यांनीं अगदींच माणुसकी सोडली होती असें नाहीं; पुष्कळ प्रवाशांच्या हकीकतींवरून पाहतां ते मनानें मायाळू व शरीरानें कष्टाळू असे असून आल्यागेल्याचा परामर्ष घेत, गरिब अनाथांस दया दाखवीत, व वरिष्ठांस आदरानें वागवीत. परंतु जेव्हां जमीनदारांचा जुलूम असह्य होई तेव्हां ते बेफाम होऊन देहभान विसरून जात व त्यांच्या हातून अशीं कृत्यें होत कीं त्यांचा त्यांसही पुढें पश्चात्ताप होई.

जमीनदारांना या गोष्टी खरोखर कळाव्या. परंतु सरकारचा त्यांस आश्रय असल्यामुळें त्या ते मनावर घेत नसत. सन १८१६ सालीं सर जॉन न्यूपोर्ट नांवाच्या सभासदानें पार्लमेंट सभेंत असें बोलून दाखविलें कीं अगदीं शांततेच्या काळांतही ज्या अर्थीं आयर्लंदांत २५००० सैन्य ठेवावें लागतें त्या अर्थीं लोकांच्या असंतोषास खरोखर कांहीं प्रबळ कारण असलें पाहिजे. व या कारणाची चौकशी व्हावी अशी सूचना त्यानें आणली. परंतु पिट यानें तिचा निषेध केला. सन १८२० सालीं शेतकऱ्यांच्या स्थितीसंबंधानें चौकशी करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें. त्याचें काम सात वर्षें थोडथोडें चालू होतें. १८२७ सालीं या कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. त्यावरून असें उघड दिसून आलें कीं मोठमोठ्या व जाणत्या लोकांनीं कमिशनपुढें दिलेल्या साक्षींत शेतकरी वर्गाचें दारिद्र्य, त्यांजवरील कराचा बोजा, जमीनदारांच्या गुमास्त्यांचा जुलूम, दडपशाही कायद्यांचा त्रास, आणि न्याय कोर्टीचा पक्षपात व कडकपणा इत्यादि दंग्यांचीं व अस्वस्थतेचीं मुख्य कारणें

असून, त्यांचा राजद्रोह वगैरे राजकीय कल्पनांशीं कांहीं एक संबंध नाहीं. पण अधिकाऱ्यांना ही गोष्ट सहसा पटत नाहीं. शेतकरी जरी दंगा करीत तरी लगेच त्याचें प्रायश्चित्त त्यांस देतां येई. सरकारी पोलिस व सैन्य यांपुढें शेतकऱ्यांचा कितीसा निभाव लागणार? दंगाधोपा विशेष झाला ह्मणजे जमीनदारलोक पार्लमेंटकडून अधिकाऱ्यांस नवे अधिकार देण्याचे कायदे करवीत, व अधिकारी त्या अधिकारांचा कसून उपयोग करीत. व अशारीतीनें शेतकरी वर्गावर अखेर बरेच दिवसांनीं त्यांना जरब बसवितां येई. १८००–१८३५ या ३५ वर्षांत फक्त अकरा सालीं तेवढे दडपशाहींचे कायदे अमलांत नव्हते. बाकी २४ वर्षें आयर्लंदांतील राज्यकारभार अशा कायद्यांच्या जोरावरच चालला होता. उदाहरणार्थ, या काळांत खालीं दाखविल्याप्रमाणें निरनिराळ्या कायद्यांचा अंमल होता.

१८००–१ बंडाच्या कायद्याचा अंमल.
१८०३–४ ,,
१८०७–१० ,, व लष्करी कायद्याचा अंमल.
१८१४–१७ ,,
१८२२–२४ बंडाचा कायदा.
१८२५–२९ क्याथोलिक संस्था मोडण्याचा कायदा.
१८३१–३२ हत्यारांचा कायदा.
१८३३–३५ ‘ कोअरशन ’ उर्फ दडपशाहीचा कायदा.

परंतु या ३५ सालांत शेतकऱ्यांचें दुःख निवारण कोणत्या उपायानें होईल याचा विचार अधिकाऱ्यांनीं प्रथम शांतपणानें केला नाहीं. व याचें कारण हें कीं, आयर्लंदांतील राज्यकारभार व इंग्लिश पार्लमेंटांतील बहुमत हें सर्वस्वी जमीनदारांचे हातींच होतें, व त्याचा उपयोग ते केवळ आपलें हित साधण्याकडे करीत. पण हळूहळू ही गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांसही कबूल करावी लागली. दडपशाहीच्या कायद्यांच्या योगानेंही जेव्हां देशांतील अस्वस्थता मोडेना, तेव्हां जमीनदार लोक सरकारासच नांवें ठेवूं लागले. ‘ अधिकारी बंदोबस्त चांगला ठेवीत नाहींत, ते जमीनदारांस द्यावी तशी मदत देत नाहींत व कायद्यांचा अंमल बरोबर रीतीनें करीत नाहींत ’ असा दोषारोप करून आपल्या माथ्यावरचें पाप शेतकऱ्यांबरोबर सरकारच्या

माथ्यावर ते लादूं लागले. तेव्हां अधिकाऱ्यांनीं हा हल्ला परतवून जमीनदार लोकांना खरी स्थिति काय आहे हें स्पष्ट सांगून त्यांनीं त्यांची कानउघाडणी केली. या सुमारास थॉमस ड्रमंड ह्मणून उदार मनाचा थोर मनुष्य आयर्लंदच्या चीफ सेक्रेटरीच्या जागीं होता. (इ. स. १८३८) त्यानें आपल्या एका वट हुकुमांत असें लिहिलें आहे कीं, 'जमीनदार लोक जमिनीचें उत्पन्न मात्र खातात, परंतु आपल्या हक्कांप्रमाणेंच आपलें कर्तव्य काय आहे हें ते जाणत नाहींत. देशांत दुष्काळ पडून लोकांची उपासमार चालली असून, धान्य महाग झालें व मजुरी मिळत नाहीं अशा स्थितींत आधींच दरिद्री असलेल्या कुळांस खंड न दिल्याबद्दल काढणें व त्यांचे ताब्यांतून जमीन हिसकावून घेणें हें न्याय्य नाहीं. व असल्या कृत्यामुळेंच दंगे होत असून, केवळ कितीही कडक कायदे केले तरी त्यांच्या योगानें ते थांबतील असें समजणें चूक आहे. अशा गरीब लोकांस जमीनदार व अधिकारी दोघांनींही सदयतेनेंच वागविलें पाहिजे.' थॉमस ड्रमंड हा नुसता बोलका मनुष्य नव्हता. त्यानें आयरिश लोकांशीं सहानुभूतिपूर्णपणें वागून त्यांचा त्रास शक्य तितका कमी केला. हिंदुस्थानांत लॉर्ड रिपन यांच्या नांवास जो मान आहे तो आयर्लंदमध्यें थॉमस ड्रमंड याच्या नांवास आहे. त्यानें जमीनदारांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घातलें व त्याच्या दक्ष पण सुविचारी अशा अमलांत दंगेधोपे व गुन्हे बरेच कमी झाले. पण ड्रमंडच्या मृत्यूनंतर सन १८४२ पासून फिरून दंगे सुरू झाले. १८४४ सालांत शेतकऱ्यांचे असे एक हजार गुन्हे झाले. १८४५ सालीं ही संख्या तीन हजारापर्यंत गेली. १८४८ सालीं तर बंडेंच झालीं. व अशारीतीनें १८४२ सालापासून सात आठ वर्षें फिरून सर्व प्रकारच्या दडपशाहीच्या कायद्यांचें व अत्याचारांचें साम्राज्य झालें.

सन १८१९, १८२३, १८२४, १८२५ यासालीं ज्या कमिट्या नेमून आयर्लंदच्या शेतकीसंबंधानें चौकशी करण्यांत आली होती. त्यांनीं शेतकऱ्यांच्या दीनास्थितीचें वर्णन करून त्यांस मदत देणें जरूर आहे अशी शिफारस केली होती. परंतु तिचा उपयोग कांहींच झाला नाहीं. १८२९ सालीं पडजमिनी परत घेऊन त्या शेतकऱ्यांस देण्याबद्दल पार्लमेंट पुढें बिल येऊन कॉमन्स सभेनें मंजूर केलें. परंतु लॉर्डाच्या सभेंत तें नामंजूर झालें.

नंतर सुप्रसिद्ध ग्रॅटन याचा मुलगा पार्लमेंट सभेंत होता त्यानें बरीच खटपट केल्यावर १८३१ सालीं लॉर्ड अलथॉर्प याचे सूचनेवरून आयर्लंदांत लोकोपयोगी कामावर खर्च करण्याकरितां पन्नासहजार पौंडाची देणगी पार्लमेंट सभेनें मंजूर केली. १८३४ व १८३७ या सालीं आयरिश शेतकऱ्यांचा जमिनीवरील जवळजवळ मालकी वजा असलेला हक्क स्थापित करण्यासाठीं स्क्रॉप व शार्मन क्रॉफर्ड यांनीं पुढें आणलेलीं बिलें नामंजूर झालीं. परंतु पुढें १८४२ सालीं 'पाटबंदस्ती'चा कायदा पास झाल्यानें पडजमिनी उपयोगांत आणण्यास थोडीशी मदत झाली. १८४३ सालीं 'डीव्हॉन' कमिशन नेमण्यांत आलें. त्याजपुढें मुख्य प्रश्न अलस्टर प्रांतांतील जमिनीवर असलेल्या कुळांच्या मालकी हक्कांसंबंधाचा होता. व १८४५ सालीं प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या रिपोर्टांत, 'हा मालकी हक्क शाबीत होत नाहीं परंतु एक कूळ जाऊन दुसरें कूळ आपसांतील व्यवहारानें त्याचे जागीं यावयाचें असतां त्यास पहिल्या कुळाला फाळ्याच्या दहा वीसपटींइतकें स्वामित्व द्यावें लागतें' असें त्यांनीं कबूल केलें. इतके पैसे देणाऱ्या कुळास अर्थातच मालकी हक्क मिळतो अशी समजूत व अशी चाल असल्यास त्यांत वावगें कांहींच नव्हतें. परंतु डीव्हॉन कमिशनमधील अधिकारी बहुधा जमीनदारांचे वर्गापैकींच होते, व अशा लोकांनीं कुळांचा मालकीहक्क कबूल करावा अशी आशा करणें हें, डॅनियल ओकॉनेल यानें ह्मटल्याप्रमाणें, कसायानें मांसभक्षण निषेधावर व्याख्यानें द्यावीं अशी आशा करण्यासारखें होतें. जमीनदार शेताच्या ज्या दुरुस्त्या कुळास करून देणार नाहीं पण ज्या अधिकाऱ्यांस योग्य अशा वाटतील त्या कुळानें आपल्या खर्चानें कराव्या, व पुढें जमीन सोडावी लागली असतां कुळास तो खर्च भरून मिळावा अशा अर्थाचीं बिलें सन १८४५, १८४७ व १८४८ या सालीं स्टानले व शार्मन क्रॉफर्ड यांनीं पार्लमेंटपुढें आणलीं परंतु त्यांचा उपयोग झाला नाहीं. १८४९ सालीं जमीनदारांना कर्जमुक्त करून त्यांच्या जमिनी मोकळ्या करण्याचा कायदा पास झाला. पण त्याच्या योगानें कुळांस कांहींएक फायदा होण्याचा संभव तर नव्हताच, परंतु पुष्कळ जमिनी एकदम विकावयास निघून जमीनदारांचें उलट नुकसान मात्र झालें. सन १८४८ सालीं आयर्लंदांतील पहिला शेतकरी संघ स्थापित

झाला, व१८५०सालीं त्याची दुसरी आवृत्ति निघाली. परंतु लवकरच या संस्थेंत दोन पक्ष झाले. आणि१८६०पर्यंत कांहीं कार्य घडून आलें नाहीं. १८६१सालीं 'डीसीज' ॲक्ट नांवाचा जमिनीबाबद एक कायदा पार्लमेंटनें पास केला. त्यांतील मुख्य तत्व असें होतें कीं, शेतकरी हा नुसता खंडकरी मानण्यांत येऊन त्याजकडून जमीनदारानें खंड किती घ्यावा, त्यास कसें वागवावें, अगर खंडचिठ्ठी रद्द कशी करावी, याविषयीं उभयतांमध्यें जो करार असेल त्याचाच अंमल करण्यांत यावा. परंतु केवळ करारावर भिस्त ठेविल्यानें शेतकऱ्याचा तोटा होत असे. श्रीमंत आणि गरीब यांजमध्यें जे लेखी करार होतात ते प्रायः श्रीमंताच्या फायद्याचेच होतात. कारण, गरीब गरजू असतो, व केवळ अडचणीमुळें त्यास वाटेल तो करार लिहून देणें भाग पडतें. आपण आपल्या गैर फायद्याचा असा करार लिहून देत आहों, हें शेतकऱ्यास माहीत नसतें असें नाहीं. परंतु त्याचाही डाव असा असतो कीं,कोणीकडून तरी शेतजमीन आपल्या ताब्यांत राहिली व तिजवर वर्षभर पोट चाललें ह्मणजे झालें. येऊन जाऊन वर्षा अखेर खंड देण्याचे वेळीं अगर खंडचिठ्ठीची मुदत संपण्याचे वेळीं कायती भानगड उपस्थित होणार. परंतु शेवटीं तो जमीनदार, तो करार, तें न्यायकोर्ट, आणि तो परमेश्वर काय करतील तें खरें, अशा प्रकारच्या दैववादावर त्याची भिस्त असते. यामुळें 'पुढचें पुढें' असें ह्मणून जमीनदार लिहून घेईल तसा करार शेतकरी खुशाल लिहून देतो. दुसरे कित्येक शेतकरी भाविक असतात व पुढें मागें बखेडा होईल ही कल्पनाही त्यांना नसते, यामुळें केवळ भोळेपणानें ते वाटेल तसे करार लिहून देतात. अर्थात् कराराचा लेख झालेला असल्यामुळें जमीनदाराची बाजू बळकट होते, व न्यायकोर्टास खुषीनें अगर कायद्याच्या सक्तीनें जमीनदाराप्रमाणें निकाल द्यावा लागतो. परंतु हे निकाल अमलांत आणण्याचे वेळींच काय तो खरा त्रास उत्पन्न होतो. जमीनदाराच्या हातीं जबर खंड वसूल करण्याचा अगर कुळास जमिनींतून काढण्याचा हुकूम असतो. परंतु कुळास तो खंड देण्याची ऐपत नसते ह्मणून त्याचीं भांडींकुंडीं बाहेर निघतात, त्याच्या उपजीविकेचें साधन नष्ट होतें, व त्याची ही आपत्ति पाहून कायदा एका बाजूस राहतो आणि सूक्ष्म न्यायतत्त्वाच्या अनुरोधानें बनणारें लोकमत व सहानुभूति कुळाच्या

बाजूस जाते. उलटपक्षीं कुळ स्वतः आडदांड, मगरूर किंवा तामसी असेल तर तें कायदा व न्यायकोर्टाचा निवाडा बाजूस ठेवून केवळ दंडेलीनें आपला न्याय आपणच करण्यास प्रवृत्त होतें;व मग मारामाऱ्या, घातपात वगैरे होतात. या दोन्ही प्रकारांनीं कायद्याच्या अंमलबजावणीस आळा पडतो व प्रतिबंध होतो. आणि करार व सूक्ष्म न्यायतत्त्व यांजमधील विरोध बेसुमार झाला ह्मणजे सरकारास मध्यें पडून जो पक्ष कमकुवत असेल त्यास थोडाबहुत न्याय द्यावा लागतो, व याकरितां कायदाही बदलावा लागतो.

वर सांगितलेल्या कायद्यानें आयरिश शेतकऱ्यास मदत न होतां हा विरोध अधिकाधिकच वाढूं लागला. कुळास वाटेल तेव्हां काढण्याचा हक्क जमीनदारास असल्यामुळें कुळानें जमीन दुरुस्त करण्याकरितां केलेली मेहनत व खर्चलेले पैसे फुकट जातात. व आयत्या बिळांत नागोबानें शिरावें याप्रमाणें जमीनदार एका कुळाचें ठिकाण हस्तगत करून आपल्यास अधिक नफा मिळेल अशा रीतीनें दुसऱ्यास तें लावितो. या स्थितीचा कडेलोट होऊन १८७० सालीं पार्लमेंटला नवीन कायदा करावा लागला. या कायद्यानें असें ठरलें कीं, कूळ जेव्हां ठरलेली खंडाची रकम देणार नाहीं, व केवळ या कारणाकरितां जमीनदार त्यास ठिकाणांतून काढून लावील, तेव्हांच मात्र त्यास जमीनदारानें नुकसानीची भरपाई करून द्यावयाचें कारण नाहीं. परंतु खंड न देण्याखेरीज इतर कोणचीही एखादी शर्त कुळानें मोडली अगर करार पाळला नाहीं, व या कारणाकरितां जर त्यास जमिनींतून काढिलें तर मग त्यास जमीनदारानें नुकसानीची भरपाई करून दिली पाहिजे असेंही ठरलें. ह्मणजे कुळानें ठिकाणांत शेतकीसंबंधानें घरगोठा बांधिला असेल, अगर बांधताली घातल्या असतील, अगर जमिनींत विशेष खतमूत टाकिलें असेल, अगर पाणी मिळवून बागाईत केलें असेल, तर त्यास जो खर्च व जी मेहनत करावी लागली असेल, तिजकरितां नुकसानीदाखल जमीनदारानें कुळास पैसे द्यावे तेव्हांच त्यास ठिकाणांतून काढावें असें ठरलें. परंतु एवढ्यानेंही भागेना. कारण आयर्लंदांत हिंदुस्थानाप्रमाणें दुष्काळ नित्य पडतो; व दुष्काळ पडला ह्मणजे अर्थातच कुळास खंडाची रकम देतां येत नाहीं. अतिवृष्टि किंवा अनावृष्टि होऊन पीक बुडालें तर त्यांत

कुळाचा काय दोष ? व दुष्काळ पडला असतां कुळानें खावें काय व जमीनदाराला द्यावें काय ? अर्थात् खंड वेळीं न दिल्यामुळें कुळास नुकसान भरून न देतांना काढतां यावें असेंही १८७० च्या कायद्यांत जें कलम होतें तें शेतकरी वर्गास फार जाचूं लागलें. १८७९ चे सुमारास धान्याचे भावास अतिशय मंदी आली आणि दुष्काळची पीडाही फार झाली. तेव्हां पूर्वीं १८६० सालीं जशी अस्वस्थता माजली होती, तशीच फिरून एकवार माजली. यामुळें शेतकीबाबद राजकीय चळवळ सुरु झाली. या सालीं आगष्ट महिन्यामध्यें मायकेल डेव्हिट यानें 'लँड लीग' नांवाच्या संस्थेची स्थापना केली व लवकरच पारनेल हा या संस्थेचा अध्यक्ष झाला. देशांतील जमीनदाराचें बंड मोडलें पाहिजे, हें लँड लीगचें मुख्य तत्त्व होतें. व पूर्वीं फीनियन चळवळींत सामील असलेले लोक हातीं घेऊन डेव्हिट व पारनेल यांनीं सर्व आयर्लंदभर या संस्थेच्या शाखा पसरल्या. अमेरिकेंतूनही या कामास चार लक्ष रुपयांची कुमक मिळाली. व हळूहळू लँड लीगचें काम इतकें फैलावलें कीं, शेतकऱ्याच्या दुःखाखेरीज दुसरे कोणी कांहीं बोलतनासे झाले.

पुढील सालीं ग्लॅडस्टन हा मुख्य प्रधान झाला व त्यानें ही सर्व स्थिति पाहून स्टेटसेक्रेटरी फॉरस्टर यास आयरिश शेतकऱ्याची स्थिति सुधारण्याचे कामीं मदत केली. लिबरल प्रधानमंडळानें लवकरच पार्लमेंटमध्यें एक नवीन बिल पास करून असें ठरविलें कीं, खंड चुकता न करणाऱ्या कुळास जमीनदाराला काढतां यावें, परंतु त्यास काढण्यापूर्वीं जमिनीची सुधारणा करण्याकरितां त्यानें केलेला खर्च व मेहनत हीं जमीनदारानें भरून दिलीं पाहिजेत. परंतु लॉर्डांची सभा या बिलाच्या मार्गांत आडवी आली, व कॉमन्स सभेनें पास केलेल्या कायद्यांचा अंमल करितां येईना. हें पाहून आयरिश लोक खवळून गेले. व आपला न्याय आपल्या हातानें करून घेण्याची स्वावलंबनाची पद्धत त्यांनीं अमलांत आणली. ती अशी कीं, जमीनदारानें एखाद्या कुळास ठिकाणांतून काढलें ह्मणजे तें ठिकाण दुसऱ्या कोणीही कुळानें खंडानें घेऊं नये. अर्थात् ठिकाण मोकळें पडल्यानें जमीनदाराचा तोटा होणार, व अशा रीतीनें पहिल्या कुळास काढण्याचे कामीं आपण

अन्याय केला अशी प्रतीति त्यास येणार. परंतु एवढ्यानेंच भागलें नाहीं. एक कुळ काढल्यामुळें ठिकाण मोकळें पडलें ह्मणजे बहुधा तें रिकामें राहतच असे, परंतु यदाकदाचित् कोणी लोकमतास न जुमानतां तें ठिकाण पतकरलें तर त्यावर लोकांनीं सर्वस्वीं बहिष्कार घालावा असें लँडलीगच्या प्रवर्तकांनीं ठरविलें. १८८० सालीं सप्टेंबर महिन्यामध्यें या विषयासंबंधानें एके ठिकाणीं बोलतांना पारनेल असें बोलून गेला कीं, 'लोकमतास न जुमानतां जो कोणी पडित ठिकाण पत्करील त्यास समाजानें एखाद्या महारोग्याप्रमाणें दूर ठेवून त्याच्याशीं सर्व व्यवहार बंद करणें हाच जमीनदारांचा जुलूम बंद करण्याचा उत्तम उपाय आहे.' या सुमारास लोकमताचें रान जमीनदारांच्या जुलमानें आधींच अतिशय तापून गेलेलें होतें, व त्यामध्यें पारनेलसारख्या पुढाऱ्याच्या प्रखर शब्दाची ही ठिणगी पडल्याबरोबर आग एकदम भडकली. व बहिष्काराचा वणवा सर्व देशभर पेटला. तापदायक जमीनदारांस अगर त्यांच्या गुमास्त्यांस अगर हस्तकांस भर समाजांत राहून समुद्रांतल्या एखाद्या निर्जन व ओसाड बेटांत पडल्याप्रमाणें दुःख व आपत्ति भोगाव्या लागल्या. जमिनींत पीक पिकलें तरी तें काढून आणण्यासही त्यांस मदत मिळेनाशी झाली, व एकेठिकाणीं तर शेताच्या कापणीस मोठ्या प्रयासानें मिळवून पाठविलेल्या ५० कामकऱ्यांचें संरक्षण करण्याकरितां त्यांजबरोबर ९०० हत्यारबंद शिपायांचें सैन्य पाठवावें लागलें. अधिकारी हट्टास पेटल्यामुळें, केवळ कायद्याचें समर्थन आपणास करितां येतें, एवढें सिद्ध करण्याकरितां हत्यारबंद शिपाई पाठवून जरी एखाद्या शेताची कापणी त्यांस करितां आली तरी त्याची फलश्रुति तेवढ्यापुरतीच. एकंदर जमीनदार लोकांच्या लाखों एकर शेतीची नांगरणी, खुरपणी, पेरणी, कापणी, या सर्व गोष्टी हत्यारबंद शिपाई रक्षणास देऊन करणें हें जमीनदारास व सरकारासही अर्थातच अशक्य होतें.

अशी स्थिति येऊन पोंचल्यावर तिच्या निराकरणाचे ठराविक उपाय अमलांत आणण्यास अधिकाऱ्यांनीं सुरवात केली. त्यांचा मुख्य कटाक्ष लँड लीगवर होता; व या संस्थेचे उत्पादक व प्रवर्तक तुरुंगांत पाठवितां आले ह्मणजे आपलें निम्में अधिक काम होईल असें त्यांनीं

ठरविलें. व त्याप्रमाणें पारनेल वगैरे लोकांवर खटले झाले. १८८१ सालीं जानेवारीमध्यें ज्यूरींत मतभेद होऊन पारनेल हा निर्दोषी ठरला व यामुळें त्याची सत्ता पूर्वींहून एकदम दसपट वाढली. अधिकाऱ्यांनींही दडपशाहीचे नवीन कायदे केले; परंतु अखेर १८८१ सालीं जमिनीबाबद एक नवा कायदा लिबरल प्रधानमंडळास करावा लागला. या नवीन कायद्याचें मुख्य तत्त्व असें होतें कीं, जमिनीसंबंधानें कुळाला आपला हक्क विकतां यावा, कुळास जमीनदाराला केवळ आपल्या लहरीप्रमाणें काढून टाकतां येऊं नये, व त्याजकडून खंड घेणें तो जमिनीच्या मगदुराप्रमाणेंच घ्यावा. कुळानें योग्य खंड न दिला तर मात्र त्यास ठिकाणांतून काढतां यावें, एरवीं काढतां येऊं नये. तसेंच खंडाची रकम ठरविणें ती पंचमार्फत अभावणीनें ठरवावी. आपापसांतील चढाओढीनें खंडकरी खंड देऊं करतील त्यावर भिस्त ठेऊं नये. तथापि हें बिल कांहीं कारणाकरितां पारनेल यास पसंत नव्हतें, व तें पास होण्याचे वेळीं ३५ अनुयायांसह पारनेल पार्लमेंटमधून उठून गेला. जमिनीवर शेतकरी वर्गाची मालकी आहे असें उघड ठरवावें असें पारनेल याचें ह्मणणें होतें. व खंडाची योग्य रकम ठरविण्याकरितां जी पंचायत नेमावयाची तिची रचना हवीतशी नसल्यामुळें या पंचायतीमार्फत कुळांनीं आपले निकाल करून घेऊं नये, असा लँड लीगच्या वतीनें लोकांस उपदेश करण्यांत येऊं लागला. फिरून एकवेळ पारनेलवर खटला झाला, व त्यास तुरुंगांत पोहोंचविण्याची अधिकाऱ्यांची हौस यावेळीं भागली. इकडे पारनेलनेंही जाहिरनामा काढून लोकांस असें सांगितलें कीं, तुह्मी जमीनदारांस खंड देऊं नका. परंतु हा जाहिरनामा बेकायदेशीर ह्मणून अधिकाऱ्यांनीं ठरवून टाकिला. १८८१ सालीं शेतकरी लोकांचे दंगे वाढले व एका सालांत सुमारें पांच हजार गुन्हे अधिक झाले. जमीनदारांचीं गुरें मारण्याचा सपाटा सुरू झाला व लँड लीगच्या हजारो शाखा पसरून स्त्रिया व मुलेंही लँड लीगच्या उपदेशकाचें काम करूं लागलीं. अशा रीतीनें केवळ दडपशाहीचा उपयोग होत नाहीं असें ठरल्यामुळें ग्लॅडस्टन साहेबांना निराळें धोरण अंगिकारावें लागलें. त्यांनीं पारनेल, डिलन वगैरे लोकांची किलमाइनहॅम येथील तुरुंगांतून सुटका केली, व नवीन कायदा करून कुळांकडे वसूलबाकी थकली होती ती

माफ केली. इतकें झाल्यावर पारनेल यानें लँड लीगची संस्था सोडून नॅशनल लीग नांवाची नवीन संस्था स्थापली. या लीगनें न्याय इनसाफ इ० कामें करण्याचा आविर्भाव अंगीं आणून लोकमताविरुद्ध जीं कुळें वागतील त्यांस सामाजिक शिक्षा करण्याचें काम चालविलें. इकडे प्रधानमंडळानेंही शेतकरी लोकांची स्थिति सुधारण्याचें थोडेंबहुत काम चालविलें होतें. कामकरी लोकांस राहण्याची वगैरे सोय नसे, यामुळें त्यांजकरितां स्वस्त दराचे भाड्याच्या झोंपड्या बांधून देणें, त्यांस मोलमजूरी मिळवून देण्याचे कामीं मदत करणें इत्यादि गोष्टी करण्यांत आल्या. पुढें 'अॅशबर्न अॅक्ट' नांवाचा कायदा झाला, त्याच्या योगानें कुळांना जमिनीवर मालकी हक्क मिळवून देण्याचे कामीं पन्नास लक्ष पौंड वेगळे काढून ठेवण्याचें ठरलें; परंतु या कायद्याचा अंमल जितका व्हावा तितका झाला नाहीं. नंतर १८९१ सालीं बालफोर यानें अॅशबर्न अक्टाची दुरुस्ती करण्याचें बिल पुढें आणिलें. या बिलाचा हेतु असा होता कीं, कुळास जमीनदाराकडून आपल्या जमिनी विकत घेऊन स्वत: मालक बनण्याचे कामीं मदत करण्याकरितां सुरुवातीस तीन कोट रुपयांचा फंड काढावा; असें केल्यानें या कामास सुरुवात होऊन पुढें मालक बनल्यावर हीं कुळें घेतलेलें कर्ज परत देतील, त्याच्या योगानें इतर कुळांसही पैशाची मदत करितां येईल, व अशा रीतीनें हळू हळू सर्व शेतकरीवर्ग आपापल्या पुरता जमिनीचा मालक होईल. जमीनदार लोकांस जी किंमत मालकी हक्क विकत घेण्याकरितां द्यावयाची तीही बेताचीच ठरविण्यांत आली होती. या कायद्याचा मात्र बराच उपयोग झाला. या कायद्यामुळें, पैसे घेऊन कुळास जमिनी सोडून देण्याचे कामीं जमीनदारावर एक प्रकारची सक्तीच झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि जमीनदारांस पुरून उरण्या इतक्या जमिनी असल्यामुळें एकंदरीनें त्यांचें नुकसान झालें असें ह्मणतां येत नाहीं. या कायद्याखेरीज बालफोर यानें इतरही कित्येक गोष्टी शेतकरी लोकांच्या सोईच्या केल्या. त्या अशा कीं, लहानसान रेलवेसंबंधीं कायदा करून पश्चिम आयर्लंदांतील लोकांस कामधंदा उत्पन्न करून दिला, व या मागसलेल्या भागांतील शेतकऱ्यांचें पूर्व व उत्तरेकडील भागांशीं दळणवळण वाढल्यानें त्यांची स्थिति थोडीशी सुधारली. यानंतर १८९६ सालीं फिरून जमिनीबाबद एक

कायदा करण्यांत आला. पूर्वीच्या कायद्यामध्यें शेतकरी लोकांचीं गाऱ्हाणीं जीं शिल्लक राहिलीं होतीं तीं या कायद्यानें काढून टाकिलीं. १८९९सालीं शेतकी व औद्योगिक शिक्षणासंबंधीं एक नवीन खातें व बोर्ड उत्पन्न करण्यांत आलें. व या खात्याचा अध्यक्ष या नात्यानें 'सर होरेस प्लंकेट' यानें स्वावलंबनाचे तत्त्वावर शेतकीची सुधारणा करणें, शिक्षण देणें, चांगलीं गुरें पोसणें, दूधदुभत्याचे कारखाने काढणें वगैरे गोष्टींचा उपक्रम केला. ज्या भागांत वस्ती फार होऊन शेतकरी दरिद्री झाले होते त्या जागेंतून गर्दी कमी करून शेतकरी लोकांस दुसरे भागांत नेऊन त्यांची तेथें सोय करून देण्यांत आली. परंतु शेतकरीवर्ग जमिनीचा मालक बनविण्याचें जें मुख्य काम तें व्हावें तितकें झपाट्यानें न होऊन पैशाची कमतरता पडूं लागली. थोड्या वर्षांपूर्वीं बालफोर हा मुख्य प्रधान असतां व 'वुइंडहॅम' हा आयर्लंदचा स्टेट सेक्रेटरी असतां ह्मणजे, १९०३ सालीं नवीन कायदा करण्यांत आला, व फिरून सरकारी खजिन्यांतून या कामास पैशाची मदत करण्यांत येऊन शेतकरी कुळें मालक करण्याचें काम सुरू झालें. या कायद्याचे योगानें जमीनदार लोकांकडून जमिनी विकत घेऊन कुळास देण्याकरितां दहा कोट रुपये सरकारी खजिन्यांतून खर्च करण्याचें ठरलें. मात्र हे दहा कोट रुपये आयर्लंदास कर्जादाखल दिले असून त्यांची फेड कालांतरानें हळूहळू होण्याची आहे. शिवाय सुमारें सव्वा कोट रुपये याच कामाकरितां केवळ देणगीदाखल ह्मणून आयर्लंदास या कायद्यानें देण्यांत आले. सन १९०७ सालीं शेतकऱ्यांस सहानुभूतिपर असा एक कायदा हाउस ऑफ कॉमन्स सभेनें पास केला. या कायद्याचे योगानें अधिकाऱ्यांना पडजमिनींत घुसून जमीनदाराचे मर्जीविरुद्धही ती जमीन कुळास लागणीस देतां येते. या सर्व गोष्टी आयरिश शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास निःसंशय उपयोगी असल्यामुळें त्यांचे योगानें जमीनीबाबदची चळवळ जवळजवळ थांबली. व पुष्कळ वर्षांनंतर शेतकरीवर्गांत आज थोडीबहुत शांतता नांदत आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

# भाग ६ वा.

## राष्ट्रीय स्वातंत्र्याची ( होमरूलची ) चळवळ.

आयरिश पार्लमेंट ब्रिटिश पार्लमेंट सभेस कोणच्या प्रकारांनीं जोडण्यांत आलें याचें वर्णन वर आलेंच आहे. ( पान ४४ पहा. ) या दोन सभा जोडण्यांत आल्यापासून आयर्लंदचें हितच झालें असें इंग्रज लोक ह्मणतात. आयरिश लोकांत या बाबदींत दोन पक्ष आहेत. एक पक्ष असें ह्मणतो कीं, या संयोगापासून आयर्लंदचें अत्यंत नुकसान झालें आहे. दुसरा या नुकसानीसंबंधानें आपलें स्पष्ट मत देत नाहीं; मात्र असें ह्मणतो कीं, ' आयर्लंदचें हित झालें असो अगर नसो, राष्ट्रीयत्वाचे दृष्टीनें पाहतां, आयरिश पार्लमेंट स्वतंत्र असून तिचें अधिनिवेशन आयर्लंदांतच व्हावयास पाहिजे; तसेंच इंग्लंदच्या हातून या संयुक्त पार्लमेंटच्याद्वारें आयरिश लोकांचें जें अनहित झालें असेल त्यापेक्षां स्वतंत्र आयरिश पार्लमेंटाचे हातून तें कमी होईल, व जें हित झालें असेल त्याहून स्वतंत्र पार्लमेंटच्या हातून अधिक हित होईल.' या वादाचे साधक बाधक गोष्टींत प्रथम न पडतां, फक्त पार्लमेंटचें नष्ट झालेलें स्वातंत्र्य परत मिळविण्याचे कामीं आयरिश लोकांनीं कोणकोणते प्रयत्न केले व या वादाची आज तारखेची स्थिति काय आहे हें आपण पाहूं.

आयरिश पार्लमेंट स्वतंत्र असतां तिच्या हातून कितीही चुका झाल्या असोत, व ती बुडविल्यानंतर आयर्लंदचें कितीहि हित झालेलें असो, फिरून स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याची आयरिश लोकांची महत्त्वाकांक्षा गेल्या सबंध शतकांत कधींही नष्ट झाली नाहीं. व विशेषतः ध्यानांत धरण्याची गोष्ट ही कीं, आयरिश पार्लमेंट बुडविण्याचे वेळीं आयरिश प्रॉटेस्टंट सभासद पिटच्या लांचलुचपतीस कितीही बळी पडले असले तरी,

क्याथोलिक व प्रॉटेस्टंट या उभय पंथांच्या बहुतेक लोकांच्या मनांत पार्लमेंट नष्ट झाल्या दिवसापासून फिरून तिची प्राणप्रतिष्ठा करण्याची जी उत्कट इच्छा उत्पन्न झाली ती अद्यापिही कायम आहे. आयरिश लोक, मग ते क्याथोलिक असोत वा प्रॉटेस्टंट असोत, स्वतंत्र आयरिश पार्लमेंट ही आयरिश राष्ट्रीयत्वाची मुख्य खूण अशी मानितात; व आयरिश राष्ट्रीयत्वाची त्यांची कल्पना दिवसेंदिवस प्रबळच होत असल्यानें तिच्याबरोबर स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याची कल्पनाही बळावत आहे.

सन १८०० नंतर पहिलीं तीन वर्षें बंडाच्या दडपशाहीच्या धामधुमींत गेलीं. पुढें क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याचा व नंतर 'टाईथ'च्या कराचा प्रश्न विशेष पुढें आला. व अशा रीतीनें पार्लमेंटच्या स्वातंत्र्याचा प्रश्न मागें पडला होता. परंतु डॅनिअल ओकॉनेल यास वरील दोन बाबदींतील चळवळींत जें आपणास यश आलें तेंच या तिसऱ्या बाबींतही येईल अशी आशा वाटूं लागल्यामुळें, लोकांस थोडाबहुत विसर पडलेल्या या चळवळीस त्यानें हातीं घेतलें. व त्याच्या या नवीन चळवळीस १८४० सालीं खरी सुरवात झाली. इला इंग्रजींत 'रिपीलची चळवळ' असें ह्मणतात. या चळवळीस त्यावेळीं आयर्लंदांत सर्वांत पुढें व सर्वांत प्रसिद्ध असलेल्या पुढाऱ्याचा व वक्त्याचा पुरस्कार मिळाला होता खरा; परंतु एखादा सार्वजनिक हिताचा प्रश्न सर्व वेळ सारख्याच महत्त्वाचा असला तरी त्यास सर्ववेळ सारखीच लोकमताची अनुकूलता असते असें मात्र नाहीं. प्रत्येक चळवळीची वेळ यावी लागते; व याचा अर्थ असा कीं, तिच्यासंबंधीं लोकमत अत्यंत उत्कटतेनें अनुकूल होण्यास ज्या अनेक अवश्यक गोष्टींचे एकसमयावच्छेदेंकरून साहचर्य असावें लागतें त्यांपैकीं कांहीं गोष्टी कमी पडल्या असतां, ती चळवळ कितीही महत्त्वाची असली तरी तिजबद्दल व्हावी तशी उचल होत नाहीं. या नवीन चळवळीची गोष्ट प्रथम प्रथम अशीच झाली. तिचा पुरस्कार ओकॉनेलनें केला खरा; परंतु एक तर त्याच्या स्वतःबद्दल लोकांत या वेळीं थोडेंसें मत बदललें होतें. पूर्वी १८३२सालीं धर्मस्वातंत्र्याच्या बाबतींत जय मिळतांच पार्लमेंटचा प्रश्न त्यानें हातीं घेतला होता; त्या सालीं विलायतेंतील पार्लमेंटच्या निवडणुकींत आयर्लंदांतून जे सभासद निवडून गेले त्यांपैकीं निदान निम्मे लोक

तरी स्वतंत्र पार्लमेंटास अनुकूल असेच निवडले गेले होते; परंतु या शुभ प्रारंभाचा ओकॉनेल यानें घ्यावा तसा फायदा न घेतां त्यानें ती चळवळ शिळी होऊन मागें पडूं दिली, याबद्दल लोकांचा त्याजवर राग झालेला होता. यानंतर लवकरच ओकॉनेलचा मुलगा व त्याचा जांवई यांनीं सरकारी बहुमानाच्या व पगाराच्या नोकऱ्या पत्करल्या, आणि स्वतंत्र पार्लमेंटला अनुकूल असलेल्या कांहीं आयरिश सभासदांनींही तोच मार्ग स्वीकारला. यामुळें लोकांत ओकॉनेल व त्याचे अनुयायी यांजबद्दल वाईट ग्रह झाला होता. कित्येक अशी तक्रार करूं लागले कीं, ओकॉनेल हा इंग्लंदांतील 'व्हिग' म्हणजे 'लिबरल' पक्षांतील लोकांशीं वाजवीहून फाजील स्नेह व सलोखा ठेवितो. १८३२ चे सुमारास 'आयरिश मित्रमंडळ' या नांवाची संस्था त्यानें काढली होती ती लवकरच मोडली तेव्हां पुढें 'प्रास्ताविक' नांवाची मंडळी त्यानें काढली. तिचा उद्देश असा होता कीं, आयर्लंदांतील लोकांस जर न्याय मिळाला नाहीं, म्हणजे जर त्यांस इंग्लिश लोकांबरोबरचे हक्क मिळाले नाहींत, तर झालेली चळवळ ही केवळ प्रस्तावनेदाखल समजून पुढील चळवळीची मजल स्वातंत्र्यापर्यंत न्यावयाची. परंतु लोकांना हें असें अटीचें मागणें पसंत नव्हतें. व न्याय मागण्याच्या भानगडींत पडून ओकॉनेल यानें आपलें अंतिम ध्येय सोडून दिलें असा तर्क लोक करूं लागले. या गोष्टीमुळें स्वतंत्र पार्लमेंटाची चळवळ ओकॉनेलनें फिरून १८४० सालीं सुरूं केली, त्यावेळीं त्या चळवळीस पुष्कळ अनुयायी मिळतील अशी आशा दिसत नव्हती. दुसऱ्या एक दोन चळवळी नुकत्याच होऊन गेल्यामुळें लोकांत थोडीशी शिथिलताही आली होती. क्याथोलिकांस नुकतेच सर्व प्रकारचे हक्क मिळाल्यामुळें व त्यांना हुद्याच्या जागा देण्यांत येऊं लागल्यामुळें त्या पत्करण्याकडे त्यांची प्रवृत्ति होऊं लागली, व इंग्लंदबद्दल कृतज्ञतेची ऊर्मि आजपर्यंत कधीं न उठलेली या वेळीं त्यांचे मनांत उठूं लागली. क्याथोलिक लोक दरिद्री झालेले असून नुकताच त्यांचे डोक्यावरून दुष्काळ गेलेला होता. व यामुळें लोकांत त्राण राहिलें नव्हतें. पूर्वी ग्रॅटनच्या वेळीं पार्लमेंटच्या स्वातंत्र्याकरितां भांडण्याचे कामीं १७७९ सालीं व्हॉलंटीयर लोकांची चळवळ झाली, तिजमध्यें दब्लिन शहरांतील धनिकवर्ग अघाडीस होता;

परंतु पुढें व्हॉलंटीयर लोकांची निराशा व नापत झाल्यामुळें त्यांच्या उत्साहानें माघार घेतली होती. ओकॉनेलचें वर्चस्व ब्रिटिशपार्लमेंटांत व ब्रिटिश मुत्सद्दीवर्गांत दहा वर्षांपूर्वी होतें तें हल्लीं कमी झालें होतें. इत्यादि कारणांमुळें नवीन चळवळ यशस्वी होईल किंवा नाहीं याबद्दल लोकांच्या मनांत अप्रत्यय उत्पन्न झाला.

परंतु ओकॉनेलचे अंगीं उद्योग, धैर्य, धिमेपणा, उत्साह वगैरे गुण पूर्वीसारखेच असल्यामुळें त्यानें मात्र माघार घेतली नाहीं. एक गोष्ट त्याला सर्वस्वीं अनुकूल होती, व ती ही कीं, दोन पार्लमेंट सभा एक झाल्यानें झालें तें आयर्लंदचें नुकसानच झालें ही जी लोकांची समजूत होती तीच कायम असून दिवसेंदिवस दृढच होत चालली होती. ते ह्मणत:—'जो काय फायदा झाला तो इंग्लंदासच झाला; इंग्रजी व्यापाराच्या मालास कायमचें गिऱ्हाईक मिळालें; व्यापारांत आयरिश लोक आयात मालावर कर वगैरे बसवून हात घालतील अशी भीति उरली नाहीं; ब्रिटिश सैन्याची भरती करण्यास लागणारे लोक मिळण्याची आयतीच सोय झाली; कर, कर्ज व इतर अनेक प्रकारची जबाबदारी यांजमध्यें इंग्रजांस सहज एक वांटेकरी मिळाला; आयर्लंदमध्यें पार्लमेंट असतांना थोड्याबहुत इंग्रज जमीनदारांना तरी आयर्लंदांत जातीनें कांहीं दिवस रहावें लागे, व यामुळें आयर्लंदांत जो थोडाबहुत तरी पैसा खर्च होई तोही तेथें होण्याचें कारण या पुढें न राहून उलट आयर्लंदकडूनच दरसाल सुमारें पन्नास साठ लक्ष पौंड इतकें द्रव्य फाळ्याच्या उत्पन्नाच्या रूपानें इंग्लंदांत येऊं लागलें; सर्व प्रकारची सत्ता आणि हुद्याच्या, मानमरातबाच्या व पगाराच्या जागा फक्त इंग्रज लोकांस देण्याचें साधन इंग्लंदांतील प्रधानमंडळाचे हातीं पूर्वीं जें निमेंशिमें होतें, तें आतां सर्व आलें; आयर्लंदमधील कारागीर व धंदेवाले यांची संख्या कमी होऊं लागली, व कित्येक गिरण्याही बंद झाल्या; सरकारी तिजोरींतून जो खर्च व्हावयाचा त्याजवर स्वतःच्या पार्लमेंटाच्याद्वारें पूर्वीं आयरिश लोकांची नजर रहाणें शक्य होतें ती नजर यापुढें नाहींशी झाली; संस्थानचें कर्ज वाढलें; लष्करी खर्च बेसुमार होऊं लागला; आयर्लंदच्या खजिन्यांतून, अनेक रीतींनीं केवळ इंग्लंदास उपयोगीं पडलेल्या व आयर्लंदचें

अहित केलेल्या लोकांसही तनखे व पेनशनें सुरू झालीं; खर्चाच्या इतर बाबदींत एकाचा पैसा दुसऱ्यानें खर्च करण्यांत जो अव्यवस्थितपणा होतो तो या ठिकाणीं सर्रास होऊं लागला; पार्लमेंटला प्रतिनिधि निवडून देण्याच्या आयरिश लोकांच्या हक्कामध्यें हात घालण्यांत येऊन मतदारांची संख्या व प्रतिनिधींची संख्या दिवसेंदिवस कमी होईल अशी योजना करण्यांत आली; व ब्रिटिश लॉर्डांची सभा हें आयर्लंदच्या हितास नवीनच गंडांतर उत्पन्न झालें.' या सर्व गोष्टींची खात्री होऊन सन १८०० सालीं झालेला असंमत संयोग रद्द करून आयर्लंदला पूर्वीप्रमाणें स्वतंत्र पार्लमेंट मिळावें असें आयरिश लोकांस वाटत होतें.

ओकॉनेलनें नवीन चळवळ यशस्वी करण्याचा सर्व भर या मुद्यांवरच ठेविला होता. आपण अंगीकारलेला सत्पक्ष असून न्याय आपल्या बाजूस आहे, या गोष्टीवर त्यानें सर्व भिस्त ठेविली. प्रथम प्रथम या नवीन चळवळीच्या सभेस फारसे लोक जमेनात, व चळवळीस लागणारी वर्गणीही बेताबाताचीच मिळत असे. परंतु 'कॉर्न-एक्सचेंज' नांवाच्या लोकप्रिय संस्थेच्या दिवाणखान्यांत नवीन चळवळीच्या सभा दर आठवड्यास भरावयाच्या व वर्गणी गोळा करावयाची असा क्रम त्यानें अव्याहत सुरू ठेविला. दहा वर्षांपूर्वीच्या निवडणुकींत स्वतंत्र पार्लमेंट असावें असें ह्मणणारे जे चाळीस लोक निवडले गेले होते त्या ऐवजीं नवीन निवडणुकींत त्यांची संख्या बारांवर येऊन ठेपली होती व दब्लिन येथील निवडणुकींत त्याचा स्वतःचा पराभव होऊन त्यास दुसरीकडून निवडून यावें लागलें होतें, तरी याही गोष्टींनीं तो निराश झाला नाहीं. व अशा रीतीनें दाखविलेल्या निश्चयाचें फळ त्याला लवकरच मिळालें. डेव्हिस, डिलन, डफी, वगैरे 'तरुण आयर्लंद' नांवाच्या संस्थेचे लोक, तसेंच कांहीं प्रॉटेस्टंट पुढारी, स्मिथ ओब्रायनसारखे वजनदार लोक, बॅरिस्टर व वकील लोकांच्या तरुण पिढींतील उत्साही व तरतरीत मंडळी या वृद्ध मुत्सद्यास मिळाली. सन १८४३ सालीं या चळवळीच्या सभा सर्व आयर्लंदभर होऊं लागल्या, व स्वयंसेवकांमार्फत दर आठवड्यास सुमारें तीनशें पौंड इतकी वर्गणी या चळवळीप्रीत्यर्थ जमूं लागली. त्या सालच्या फेब्रूवारी महिन्यांत दब्लिन येथील म्युनिसिपालिटीच्या सभेंत ओकॉनेलनें हा प्रश्न मुद्दाम

वादविवादास काढविला. व त्यावर वादविवाद होऊन अखेर 'आयर्लंदास स्वतंत्र पार्लमेंटच पाहिजे' असा ठराव पास झाला. आयरिश राष्ट्रांतील राजधानीच्या शहरीं स्थानिक स्वराज्याच्या प्रमुख संस्थेनें अशा प्रकारचा ठराव केल्यामुळें आयरिश लोकमताचा ध्वज पद्धतशीर रीतीनें व उघडपणें रोंविला गेला असें होऊन, अर्थात् अर्धवट मताचे लोकही या झेंड्याखालीं येऊन उभे राहूं लागले. जाहीरसभांतून हजारों व केव्हां केव्हां लाखों लोकही जमत, आणि सभांमधून लोक व स्वयंसेवक एक प्रकारचा लष्करी थाट व लष्करी पद्धति मुद्दाम ठेवीत. अशा सभांतून तरुण वक्ते उत्साहपूर्ण भाषेनें आयर्लंदला स्वतंत्र पार्लमेंट मिळालेंच पाहिजे अशाविषयीं वक्तृत्वपूर्ण विवेचन करीत. अर्थात् अशा वेळीं आयर्लंदचें पूर्वीचें वैभव व हल्लींचीं दुःखें यांचा उल्लेख होऊन राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेची कमान चढे, व लोक स्वदेशभक्तीनें तल्लीन होऊन जात. ओकॉनेलचें वक्तृत्व पूर्वीसारखेंच अद्यापिही होतें. त्यांतील ओजस्विता, आवेश, व कडकपणा यांस त्याच्या वृद्धपणानें विशेष मदतच होई; व तो बोलूं लागला ह्मणजे, पूर्वी ज्यानें क्याथोलिक लोकांना स्वातंत्र्य मिळवून देऊन लोकांकडून 'उद्धारकर्ता' अशी पदवी संपादन केली, तो स्वतंत्र पार्लमेंटही खचित मिळवून देईल असें त्याचें भाषण ऐकत असतां श्रोत्यांस वाटे. प्रस्तुत विषयावर बोलतांना कायदेशीरपणावर तो वारंवार जोर देई. व 'आह्मी कायदेशीर वागणारे आहोंत, आमचें मागणें व चळवळ हीं दोन्ही कायदेशीर आहेत, आमच्या सभांस लाखो लोक जमले तरी कायदेशीर वर्तन करण्याचाच त्यांचा इरादा असतो, कायदेशीर चळवळ करणारानें अधिकाऱ्यांना केव्हांही भिण्याचें कारण नाहीं, परंतु इतकें असतांही अधिकारी जर अविचारानें चळवळींत हात घालतील व स्वतः बेकायदेशीर वर्तन करून लोकांस आत्मरक्षणाकरितां बेकायदेशीरपणानें वागणें हें बिनतोड भाग पाडतील, तर मग लोकांच्या कृत्याबद्दलची जबाबदारी लोकांवर राहणार नाहीं,' हें त्याच्या भाषणांतील ठराविक पालुपद असे.

ही चळवळ अशी चाललेली पाहून अधिकाऱ्यांस भीति वाटली. पार्लमेंट सभेमध्यें प्रश्नोत्तरें सुरू झालीं. 'या घातुक चळवळीची गय

तुह्मी किती दिवस करणार?' असें त्यांस विचारण्यांत येऊं लागलें. 'ओकॉनेल व त्याचे अनुयायी यांची मागणी पूर्वीच्या कायद्याविरुद्ध असल्यामुळें ती मान्य करतां येणार नाहीं, व हे चळवळे लोक आपल्या मर्यादेचें उल्लंघन करतील तर हातीं असलेल्या सर्व अधिकारांचा उपयोग करून व जरूर तर नवीन अधिकार घेऊनही कायद्याचा अंमल रीतसर करण्यांत येईल,' अशी उत्तरें मंत्रिमंडळ देऊं लागलें. व हातघाईवर प्रथम कोण येतो हें पाहण्यास तिऱ्हाईत लोक उत्सुक झाले. पार्लमेंटमध्यें वादविवाद सुरू झाल्यापासून चळवळीस एक प्रकारचा नवीन जोम आला, व देशांतील प्रत्येक मोठमोठ्या शहरीं व इतिहासप्रसिद्ध स्थानाच्या भूमीवर लाखो लोकांच्या जाहीरसभा भरविण्याचें काम जारीनें सुरू झालें. अशा प्रकारची सभा ह्मणजे एक जत्राच असे. सभेच्या नेमलेल्या दिवशीं पहावें तों चहूं वाटांनीं सर्व दिवसभर रीघ नसे. मोठमोठ्या शहरास पुरवठा करतील इतकी दुकानें व फड येऊन सभास्थानाच्या आसपास लागत, व एकाद्या सबंध लष्करास पुरतील इतकीं वाद्यें बेंडबाजे, वगैरे जमत. सर्वश्रोतृसमाजांस ऐकूं जाईल असें भाषण करणें अशक्य असल्यामुळें एका सभेंतच दहा पांच सभा होऊन ठराविक ठराव पास होत. व लाखो लोकांच्या टाळ्यांचा गडगडाट व वाद्यांचा ध्वनि ह्यांच्या योगानें या प्रचंड सभेची संमति जगजाहीर होई. कधीं कधीं सभेच्या हेतूंची पसंती दर्शविण्याकरितां कित्येक मैलपर्यंत गांवोगांव टेंकड्यावरून आगट्याही पेटवीत!

इकडे अधिकाऱ्यांनींही आपल्या बंदोबस्तास सुरुवात केली होती. तारागड, म्यालो वगैरे ठिकाणीं अशा प्रकारच्या सभा भरल्यानंतर क्लॉनटार्फ येथें अशाच प्रकारची सभा रविवार तारीख पांच आक्टोबर सन १८४३ रोजीं भरविण्याचें ओकॉनेल ह्यानें जाहीर केलें. अधिकाऱ्यांनींही आजपर्यंत स्वीकारलेला तटस्थपणा टाकून देऊन उघडपणें अशा सभा थांबविण्याचें धोरण अमलांत आणण्याचा निश्चय करून क्लॉनटार्फ येथील सभा बंद करण्याचा जाहीरनामा अगदीं आयत्यावेळीं ह्मणजे शनिवारीं संध्याकाळीं प्रसिद्ध केला. तहकुबीचा जाहीरनामा उद्यां लागणार असें एका वर्तमानपत्रानें शुक्रवारीं संध्याकाळींच प्रसिद्ध केल्यामुळें

पुढें चोवीस तासपर्यंत जाहीर सभा हा एकच विषय सार्वजनिक चर्चेस होऊन राहिला, व जाहीरनामा लावल्यावर ओकॉनेल काय करणार याज-कडे लोकांचे डोळे लागले. ओकॉनेलच्या भाषणांत आत्मसंरक्षण, काय-देशीरपणा वगैरे शब्द जरी वारंवार ठासून येत तरी प्रकरण हातघाईस आल्यावर, लाखो लोकांची मदत असतां दोन हात केल्याशिवाय तो मागें पाऊल टाकील असें खरोखरीच लोकांस वाटत नव्हतें. व असा आयत्या वेळीं जाहीरनामा लावून अधिकाऱ्यांनीं लोकपक्षास आपलें बळ व आपला करारीपणा दाखविण्यास उघड आव्हानच केलें असल्यामुळें जाबास जाब बरोबर देणें जरूर आहे, व अशावेळीं पाऊल माघारी घेतल्यानें राष्ट्राची नामोषी होईल असा सल्लाही ओकॉनेलच्या कित्येक अनुयायांनीं दिला. परंतु जाहीरनामा मान्य करून सभा बंद ठेवावी ह्मणजे अधिकाऱ्यांचा बेकायदेशीरपणा व लोकांचा कायदेशिरपणा यांतील अंतर जगाच्या नजरेस येऊन देशाबाहेरही चळवळीस लोकमत अनुकूल होईल, असा युक्तिवाद करून ओकॉनेलनें 'उद्यांची सभा बंद केली आहे तरी लोकांनीं जमूं नये, परत जावें.' अशा अर्थाचे जाहीरनामे छापून, ते रातोरात क्लॉनटार्फच्या आसपास दहावीस मैलपर्यंत जागजागीं डकविले. दुसरे दिवशीं हजारों लोक हे जाहीरनामे पाहून गोंधळून गेले. कित्येक जागींच थबकले. कित्येक अधिक निश्चयानें सभास्थानापर्यंत गेले, परंतु सभेचे चालकच तेथें नाहींत असें पाहून निराशेनें परत फिरले. ओकॉनेल हा लाखों लोकांच्या मनांतून एकदम उतरला व यावेळीं त्याची लोकप्रियता खचली ती कांहीं केल्यानें फिरून पूर्वस्थितीवर आली नाहीं.

ओकॉनेलनें जाहीरसभा बंद केली व जाहिरनामा पाळला या गोष्टीनें अधिकाऱ्यांचा संतोष व्हावा पण झाला नाहीं. त्यांनीं ही सभा बंद करण्याकरितां जय्यत लष्करी तयारी केली होती. सभास्थानाच्या आसपास लष्करी पलटणें उभीं केलीं असून व जवळच एक माऱ्याची जागा पाहून तेथें तोफा व दारुगोळा आणून ठेवला होता. व ओकॉनेलनें सभा आपण होऊन बंद केली नसती तर सभास्थानीं रक्तपात झाल्याशिवाय राहताना. ओकॉनेलनें माघार घेतली ती कोणत्याही कारणानें असो, अधिकाऱ्यांनीं असा तर्क केला कीं, 'तो निवळ बडबड्या असून जाहीरसभांचें त्यानें

विनाकराण स्तोम माजविलें होतें. सभेंत तो जी दटावणी दाखवीत होता, त्यांत कांहीं एक अर्थ नव्हता; व लोकांस व्यर्थ मोहांत घालून सरकाराशीं त्यानें जें उद्दामपणाचें वर्तन केलें त्याबद्दल त्यास व त्याच्या साथीदारांस न्यायासनापुढें ओढून एकदां शिक्षा ठोठावली ह्मणजे मग फिरून तो असल्या फंदांत पडणार नाहीं; व अधिकाऱ्यांविरुद्ध वटवट करणें किती निष्फळ व घातुक आहे हें त्यास व इतरांस चांगलेंच कळून येईल.'

क्लॉनटार्फची सभा बंद झाल्याच्या दुसरे दिवशीं ओकॉनेलनें कॉर्न एक्चेंजमध्यें आठवड्याची सभा भरविली. या सभेस हजारों लोक जमले होते व तेथें त्यानें आपण सभा कां बंद केली याचा खुलासा केला. 'सरकारनें काढलेला जाहीरनामा बेकायदेशीर होता, परंतु तो काढण्याची बुद्धि कायदेशीर होती; वस्तुतः कायद्याविरुद्ध कां होईना, परंतु कायद्याचे नांवानें, व कायदेशीरपणाचें निदान ढोंग करून तरी जाहीरनामा काढणें हें वेगळें; व आगाऊ जाहीरनामा वगैरे न काढतां एकदम शिपाई सभेंत घुसवून सभा उधळून लावणें हें वेगळें; व तसें केलें असतें तर मात्र सरकारचें कृत्य, हेतु व वस्तुस्वरूप या दोहोंतही बेकायदेशीर ठरलें असतें; व मग लोकांनींही आत्मरक्षणार्थ कायदा हातीं घेऊन आपल्या शक्तीचा उपयोग करणें रास्त झालें असतें,' असा कोटीक्रम लढविण्यास त्यानें सुरवात केली. परंतु त्यानें लोकांचें फारसें समाधान झालें नाहीं. इकडे खटला करण्याची जय्यत तयारी होऊन आक्टोबरच्या १४ व्या तारखेस ओकॉनेल, त्याचा मुलगा जॉन, त्याचे तिघे मदतगार, 'फ्रीमन'चा संपादक जॉन ग्रे, 'नेशन'चा संपादक गॅवन डफी, टिरेल व टिअरने हे दोन क्याथोलिक धर्मोपदेशक, वगैरे लोकांस पकडण्यांत येऊन त्यांना जामीनावर सोडलें. १८४४चे जानेवारीचे १५ तारखेस खटला सुरू झाला. व ज्यूरीच्या नेमणुकींत अधिकाऱ्यांनीं कपटानें बरीच घालमेल व सांवळागोंधळ करून फक्त प्रॉटेस्टंट ज्यूरीच निवडली जाईल अशी खटपट केली. व ती साध्यही झाली. सर्व आरोपींवर सरकारास भेडावण्याचे हेतूनें सभा भरविण्याकरितां कट केल्याचा मुख्य आरोप असून अन्य दहावीस प्रकारचे आरोप ठेवण्यांत आले. उद्देश हा कीं, कोणच्याना कोणच्या तरी आरोपाकरितां

शिक्षा ही झालीच पाहिजे. ओकॉनेलनें आपला 'डिफेन्स' आपणच दिला. परंतु इतर आरोपींकरितां प्रमुख प्रमुख बॅरिस्टर काम चालवीत होते. चौकशीचें काम पंचवीस दिवस चालून अदमासाप्रमाणें प्रॉटेस्टंट ज्यूरीनें सर्व आरोपींवर 'दोषी' असा शेरा मारिला. परंतु शिक्षा सांगण्याचें काम तीन महिने तहकूब पडलें. दरम्यान ओकॉनेल हा इंग्लंदला गेला व त्यास तेथें मानपत्रें व मेजवान्या यांची गर्दी उडाली. खटल्यासंबंधानें, विशेषत: ज्यूरीचे बाबतींत झालेल्या कपटकृतीबद्दल, पार्लमेंटांत मनसोक्त वादविवाद झाला. ता. ३० मे रोजीं आरोपींस कोर्टापुढें हजर राहण्यास बोलाविलें व निकाल सांगण्यांत आला. ओकॉनेल यास एक वर्ष कैद, दोन हजार पौंड दंड, व सात वर्षेंपर्यंत चांगल्या वर्तणुकीबद्दल पांच हजार पौंडांचा जामीन व जातमुचलका अशी शिक्षा फर्मावण्यांत आली. इतर आरोपींसही किरकोळ शिक्षा दिल्या गेल्या. परंतु पुढें लॉर्डस् सभेकडे अपील झालें, व अपील-कोर्टानें खालील कोर्टाचा ठराव रद्द करून ओकॉनेल यास दोषमुक्त करून सोडून दिलें. क्लॉनटार्फच्या सभेनंतर व खटल्याचे पूर्वी चळवळ सुरू होतीच. मात्र मोठमोठ्या सभा एके ठिकाणीं न भरतां, एकाच दिवशीं निरनिराळ्या शेंकडों ठिकाणीं लहान लहान सभा आगाऊ योजनेनें भरवाव्या अशी युक्ति ओकॉनेलनें काढली. शिवाय सर्व आयर्लंदचे तीनशें भाग कल्पून, पुढें पार्लमेंट मिळाली असतां तिजमध्यें जशा रीतीनें सभासद निवडून दिले गेले असते तशाच रीतीनें निवडलेल्या तीनशें लोकांची एक सभा स्थापन केली होती. तिला 'त्रिशतक' ( तीनशें लोकांची सभा ) असें ह्मणत, व तिनें आपलें काम चालू ठेवलेंच होतें. परंतु पुढें आयरिश लोकांत फुटाफूट व फळ्या झाल्या. कोणी एकतर कोणी दुसरेंच कांहीं सुचवावें असें होऊं लागलें. व पूर्वीं जम बसला होता तो विसकटला. स्वतंत्र पार्लमेंट मागणारांची मागणी अशी होती कीं १७८२ सालीं हेनरी ग्रॅटनच्या खटपटीनें जे ठराव पास झाले व जे कायदे होऊन आयरिश पार्लमेंट स्वतंत्र झाली, तशीच स्वतंत्र पार्लमेंट आयर्लंदास मिळाली पाहिजे. परंतु शार्मन क्रॉफर्ड वगैरे लोकांनीं निराळा पक्ष उत्पन्न केला. या पक्षाचें असें ह्मणणें होतें कीं स्वतंत्र पार्लमेंट न मागतां फक्त आयर्लंद पुरते कायदे करण्याचा अधिकार असलेले पार्लमेंट मागावें. पहिल्या

७

पक्षाचे ध्येयास नुसतें 'रिपील' व दुसऱ्या पक्षाचे ध्येयास 'संमत-संयोग' असें ह्मणतात. ओकॉनेल परदेशांत थारे पालट करण्यास गेला होता त्यानेंही आपलें पहिलें ध्येय सोडून हें दुसरें ध्येय आपण पत्करण्यास तयार आहों असें पत्रद्वारें आयरिश लोकांस कळविलें. परंतु पूर्वींच्या त्याच्या अनुयायांस हें पसंत पडलें नाहीं. इतर कित्येक गोष्टींतही ओकॉनेलनें माघारें पाऊल घेतलें असें त्यांस वाटूं लागलें. व मागें १८३४ सालीं ओकॉनेल केव्हां केव्हां 'आह्मांला ब्रिटिश पार्लमेंटकडून न्याय मिळाला ह्मणजे झालें मग आमचें कांहीं ह्मणणें नाहीं.' असें ह्मणत असे, तेथपर्यंतही हळू हळू त्याची मजल लवकरच जाईल असें ते उघड बोलूं लागले. 'संमत-संयोगा'च्या ध्येयामध्यें राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस पोषक असें कांहींच नाहीं सबब तें आपणास मुळींच पसंत नाहीं असें ते जाहीर करूं लागले. व 'नेशन' पत्राच्या संपादक मंडळानें, आजपर्यंत त्यांनीं ओकॉनेलचा पुढारीपणा मानिला असतांहि, त्याच्या पिछेहटीचा उघड निषेध केला. या भांडणाचा फायदा इंग्रज लोकांस चांगलाच मिळाला. इंग्रजी पत्रांनीं, टोरी व व्हिग दोघांनींही, आयरिश लोक, ओकॉनेल व राष्ट्रीयत्वाचा उपदेश करणारीं वर्तमानपत्रें यांजवर शिव्याशापांचा भडिमार चालविला. इकडे 'संमत-संयोग' चळवळीच्या पुढाऱ्यांचें व ओकॉनेलचें सख्य होण्याचें दिसेना; कारण त्यांचा ओकॉनेलवर विश्वास बसेना. तो आपलें ध्येय स्पष्ट सांगत नाहीं, उगीच घोंटाळा करितो, व या करितां त्याला 'संमत-संयोग' पक्षामध्यें न घेतां ती चळवळ चालविली तरच बरें असें शार्मन क्रॉफर्ड वगैरे ह्मणूं लागले. क्रॉफर्ड यानें आपल्या रीतीनें राष्ट्रीयत्वाची कल्पना पुढें आणण्याचें काम चालूं ठेविलें होतें; व त्यास प्रत्यही नवीन अनुयायी मिळूं लागले होते. अशा वेळीं ओकॉनेलला आपल्या सभेंत मिसळूं दिल्यानें आपणास येऊन मिळणारे अनुयायी बिथरतील या हेतूनें तो ओकॉनेलपासून दूर राहण्यास इच्छीत होता. क्रॉफर्डची ही वृत्ति पाहतांच ओकॉनेल त्याजवर एवढेंच नव्हे तर 'संमत-संयोगा'च्या ध्येयावरही तुटून पडला व फिरून दोघांचा समेट होण्याची आशा राहिली नाहीं. ओकॉनेलनें पीछेहाट केल्यामुळें 'रिपील'ची कल्पना मागें पडली नाहीं, परंतु चळवळ मागें पडली. लोक

ओकॉनेलवर कितीही नाखुष झाले तरी तो गेल्यावर त्याची जागा भरून काढण्यासारखा दुसरा कोणी माणूस तयार नव्हता, व यामुळें ज्याचे त्याचे तोंडीं ‘ रिपील ’ हा एकच विषय असतांही राष्ट्राच्या कृतींत मात्र शिथिलता स्पष्टपणें दिसून येऊं लागली.

राष्ट्रीयपक्षावर इतरही संकटें याच सुमारास आलीं. हीं संकटें ह्मणजे राजकीय पक्षांतील पुढाऱ्यांप्रमाणें इतर व्यक्तींचीं व्यक्तिविषयक भांडणें. ओकॉनेलचा मुलगा जॉन हा आपल्या बापाबरोबर राहून त्यास राजकीय चळवळींत मदत करी; परंतु तो स्वतः मंदबुद्धि असून नवीन पक्षाचे तरतरीत संपादकांचा तो हेवा करी. त्यानें डफी, डेविस व इतर तरुण लोकांची हस्तेंपरहस्तें नालस्ती करण्याचा क्रम चालविला. ते धर्मलंड आहेत; ओकॉनेलची जागा घेऊन त्यास पदच्युत करण्याचा त्यांचा बेत होता; फ्रान्समधील अनियंत्रित तत्त्वांचा प्रसारच त्यांना आयर्लंदांत करावयाचा आहे; असे एक ना दोन शेंकडो वृथा आरोप त्यांजवर आणण्यांत येऊं लागले. ओकॉनेलच्या शागीर्दपेशांत लुंग्यासुंग्या लोकांची खोगीरभरती पुष्कळ असे. त्यांचा व्यवसाय ह्मटला ह्मणजे अद्वातद्वा बोलून ओकॉनेलच्या मतांचा आपल्या बुद्धीनें प्रसार ह्मणून करावयाचा. परंतु ओकॉनेलचीं मतें ग्राह्य कोणचीं व अग्राह्य कोणचीं, त्याचीं खरीं मतें अशीं कोणतीं व दुराग्रहानें व विकारवशतेनें त्याच्या मनावर येणारे तरंग कोणते, याचा विवेक करण्याची त्यांस स्वतःस अक्कल नसे; व त्याजबरोबर वाद करून त्या दोहोंतील भेद समजावून घेण्याचें त्यांस धैर्य नसे. ते नुसती त्याची हांजी हांजी करून तो बोलेल तें प्रमाण मानून त्याविरुद्ध कोणी ब्र काढला कीं त्याची नालस्ती करीत. दुर्दैवानें अशा अनुयायांवर ओकॉनेलनें ठेवावा तितका दाब ठेवला नाहीं. उलट, पार्लमेंट व वर्तमानपत्रें यांशीं संबंध असल्यामुळें प्रतिष्ठा पावलेल्या कित्येक नीच लोकांस त्यानें आपला आश्रय दिला होता. या लोकांनीं व वर सांगितलेल्या अनुयायांनीं ‘ नेशन ’ वगैरे पत्राचे संपादकमंडळाची एकसारखी नालस्ती चालविली. राष्ट्रीय पक्षांतील या भांडणाचा परिणाम राष्ट्रकार्यावर फारच वाईट झाला.

याच सुमारास अशीही बातमी पसरली कीं आयरिश लोकांचें कांहींतरी प्रिय करून त्यांचें प्रेम संपादावें अशी मुख्य प्रधान पील यास इच्छा उत्पन्न झाली आहे. खऱ्या प्रेमळ मनुष्याच्या मनांत रागामागून अनुराग येणें स्वाभाविक आहे; व आयरिश लोकांचे पाठीवर कोरड्यावर कोरडे ओढल्यानंतर त्यांचें सांत्वन करण्याकरितां त्यांचें कांहीं तरी प्रिय केल्यासारखें होईल अशा देणग्या त्यांस देण्याचें पीलच्या मनांत कदाचित् आलें असल्यास नवल नाहीं. या देणग्यांचे आशेवर कितपत भिस्त ठेवावी याचा आयरिश पुढाऱ्यांस विचारच पडला. परंतु पार्लमेंटमध्यें वेळीं काय निघेल व काय न निघेल याकरितां पार्लमेंटमध्यें आपण हजर तरी रहावें असें ओब्रायन, ओकॉनेल वगैरेंनीं ठरविलें. पार्लमेंट उघडलें व पील यास खरोखर कांहींतरी आयर्लंदचें प्रिय करावयाचें होतें असें दिसून आलें. त्यानें क्याथोलिक शिक्षण संस्थांची देणगी वाढवून कायम केली. जमीनधाऱ्याच्या पद्धतीची चौकशी करण्यास कमिशन नेमून त्याच्या रिपोर्टाप्रमाणें बिल तयार केलें. या देणग्या फार मोठ्या आहेत व आयरिश लोकांच्या चळवळीस भिऊन त्या देण्यांत येत आहेत, असा टोरी लोकांनीं अर्थात् गिल्ला केला. पार्लमेंटमध्यें या देणग्यांवरील वादविवादांत ‘ रिपील ’ही बद्दल वाद निघाला. तेव्हां सरकारतर्फे ‘ रिपील ’ चा निषेध व आयरिश सभासदांकडून पुरस्कार होऊन बरीच खडाजंगी झाली. याच वादविवादांत प्रथमतः ग्लॅडस्टन साहेब यांनीं आयर्लंदविषयीं आपली सहानुभूति प्रदर्शित केली; व तेव्हांपासून आयर्लंदचें पार्लमेंट सभेमधील पुरस्कर्तृत्व त्यांचेकडे गेलें.

‘ रिपीलसभा ’ या नांवाचा लोकांस आतां कंटाळा येऊन ‘ ब्यांयशीक्लब ’ या नांवाची नवीन सभा स्थापन करण्यांत आली. याही सभेचा उद्देश स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचाच होता; परंतु नांव बदलल्यानें नवीन लोक येऊन उघडपणें मिळतील असें वाटून तसें करण्यांत आलें. या क्लबाचा अध्यक्ष ओकॉनेल हा क्याथोलिक असून पांचांपैकीं तीन उपाध्यक्ष प्रॉटेस्टंट होते. व वरपासून खालपर्यंत सभेच्या अधिकारीवर्गांत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांची सरमिसळ केली होती. धर्मद्वेष आतां लयाला गेला होता. या नवीन ‘ क्लबांत ’ देशांतील व पार्लमेंटांतील बहुतेक

सर्व पुढारी सामील झाले होते. या सभेचें 'व्यांयशी' हें नांव, १७८२ सालीं ग्रॅटनच्या परिश्रमानें आयरिश पार्लमेंटास स्वातंत्र्य मिळालें होतें, सबब त्या वर्षावरून ठेवलें होतें. या क्लबाचे सभासद हिरव्या रंगाचा राष्ट्रीय पोषाख घालून जमत व हातांत राष्ट्रीयकल्पनाद्योतक निशाणें धरीत. परंतु या क्लबाकडून प्रत्यक्ष राजकीय असें काम फार झालें नाहीं. ललितकला, वाङ्मय वगैरेंच्याद्वारें राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचें पोषण कसें करितां येईल याविषयींचा मुख्य विचार या क्लबाकडून होत असे. पण चळवळीची एकदां घडी बिघडली ती कायमचीच बिघडली. ओकॉनेलला पार्लमेंटमध्यें १०० आयरिश सभासदांपैकीं पंचवीसांहून अधिक मानीतनासे झाले. व पुढें पुढें हळूहळू 'रिपील'चें नांवही ऐकूं येईना. १८४६ व १८४७ सालीं आयर्लंदांत भयंकर दुष्काळ पडला व या दुष्काळापुढें राजकीय चळवळ हटली. परंतु दुष्काळाची पीडा पाहून, ह्या सर्वांस कारण इंग्लंद असें वाटून कित्येक तरुण आयरिश लोक बेफाम झाले. त्यांनीं दुष्काळाची पीडा हटविण्याची खटपट करावी ती केली नाहीं; कारण त्यांच्या मतें मूळ गड्डयाला हात घातल्याशिवाय, मूळ रोगाचा नायनाट केल्याशिवाय नुसतीं रोगचिन्हें घालविण्यांत काय अर्थ ! आजपर्यंत 'नेशन' वर्तमानपत्र हें ज्या पक्षाचें पुढारी होतें, त्यानें इंग्लंदविरुद्ध प्रत्यक्ष बंड करावें असें कधींही उघड प्रतिपादिलें नव्हतें. परंतु 'नेशन'च्या संपादक मंडळीपैकीं जॉन मिचेल यानें स्वतंत्र वर्तमानपत्र काढून त्यांतून उघडपणें बंडाचा उपदेश आतां सुरू केला. तसेंच, 'कुळांनीं जमीनदारांस फाळा देऊन स्वतःच्यां बायकापोरें मारण्यापेक्षां फाळा न देण्याचाच निश्चय करावा व तो निश्चय अमलांत आणण्याचे कामीं जरूर तर मरावें, कारण त्यांतच राष्ट्राचा फायदा आहे' असेंही तो सांगूं लागला. अर्थात् त्याजवर खटला होऊन त्यास चौदा वर्षांचें काळेपाणी मिळालें. आपणावर खटला होऊन तुरुंगांत जाण्याची वेळ आली असतां लोक बंड करतील अशी मिचेल यास फार आशा होती, परंतु व्यर्थ. लोक आपापल्या ठिकाणीं दबून राहिले होते. त्यांनीं पुष्कळ वाट पाहिली परंतु सुधारणा होण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां शेवटीं डिलन, डफी, ओब्रायन वगैरे ज्या

पुढारी लोकांनीं आपल्या मनाशीं पुष्कळ दिवसपर्यंत या बाबदींत झगडा केला होता, त्यांनींच नाइलाजास्तव बंडाच्या आततायीपणाचा मार्ग पत्करला. या बंडांत त्यांस यश येईल असें वाटत नव्हतें, पण आजपर्यंत केलेल्या खटपटीचा शेवट होण्यास दुसरा मार्ग नाहीं, व आपण बंडांत सामील झालों नाहीं तर आपण तोंडची वाफ आजपर्यंत व्यर्थ दवडली, असें वाटून ते नाइलाजास्तव बंडास प्रवृत्त झाले ! त्यांनीं त्याप्रमाणें लहानसें बंडही केलें, परंतु सर्व पकडले जाऊन त्यांस काळेपाण्याची शिक्षा झाली. १८४८, १८५८ व १८६७ ही तीनही सालें बंडाचीं होत. व या दरम्यानचा काळ आयर्लंदास फारच वाईट असा गेला. दुष्काळ, कुळें व जमीनदार यांमधील तंटे व मारामाऱ्या, बंडें व पार्लमेंटचे आपमतलबी सभासद यांच्या फेऱ्यांत, ‘ राष्ट्र ’ असें कोणास दिसेचना. व ब्रिटिश अधिकाऱ्यांचा नुसता उद्योग कायदा बजावणें हा होऊन बसला. १८६७ सालीं बंडखोरपणाच्या या वीस वर्षांच्या अवधीचा कळस झाला.

पण इतिहासांत निरनिराळ्या गोष्टींचे सांधे कसे जुळत असतात हें पाहण्यासारखें आहे. १८६७ नंतर तीन वर्षेंपर्यंत आयर्लंदमध्यें कसलीही चळवळ झाली नाहीं. परंतु लगेच १८७० सालीं आयर्लंदच्या नवीन चरित्रक्रमास सुरुवात झाली. या सालच्या मे महिन्यांत डब्लिन येथें एका प्रतिष्ठित भोजनगृहांत आयरिश पुढाऱ्यांची एक सभा भरली. या सभेस सर्व प्रकारचे परंतु विशेषतः कॉनझरव्हेटिव्ह मताचे लोक आले होते. ग्लॅडस्टन साहेबांनीं प्रॉटेस्टंट धर्ममंडळ नुकतेंच मोडून टाकल्यामुळें कॉनझरव्हेटिव्ह व प्रॉटेस्टंट लोकांस ब्रिटिश पार्लमेंट सभेचा तिटकारा वाटूं लागला होता. आयरिश लोकांच्या सुखदुःखासंबंधीं कायदेकानू करण्याचीं सर्व सूत्रें इंग्रजांच्या हातीं गेलीं व ते तीं चालवितील तसें आयरिश लोकांनीं नाचलें पाहिजे याविषयीं कॉनझरव्हेटिव्ह लोकांसही वाईट वाटूं लागलें. क्याथोलिक लोकांना ग्लॅडस्टन साहेबांची ही विशिष्ट कृति पसंत होती; परंतु ओकॉनेलनें व त्याच्या अनुयायांनीं स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याची खटपट बरींच वर्षें केल्यानें, आयर्लंदला स्वराज्य हवें अशाबद्दल क्याथोलिक लोकांमध्यें एकमत होतें व अशा निरनिराळ्या कारणांकरितां का होईना परंतु स्वतंत्र पार्लमेंटच्या बाबतींत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांच्या मताचा याक्षणीं

मिलाफ झाला होता. [वर सांगितलेल्या सभेंत कॉनझरव्हेटिव्ह मताच्या लोकांचाच विशेष भरणा होता; व आयझॅक बट, ओकॉनेलचा नेमस्त प्रतिपक्षी, त्या सभेस हजर होता. परंतु वेळेचा गुण कांहीं चमत्कारिक असतो. या प्रसंगीं बट यासच स्वतंत्र पार्लमेंटबद्दल स्फूर्ति उत्पन्न होऊन त्यानें सभेचा पुढाकार घेतला, व त्याच्या सूचनेवरून त्या सभेनें 'होमरूल' मागण्याविषयीं ठराव पास केले. या ठरावांत असें मागणें मागितलें होतें कीं,—"आयरिश राष्ट्रापुरते जे कायदे करावयाचे ते करण्याचा अधिकार असणारें एक स्वतंत्र पार्लमेंट ह्मणजे हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ लॉर्डस आयर्लंदला देण्यांत यावें; या आयरिश पार्लमेंटची सत्ता आयर्लंदांतील अधिकारीवर्गावर चालावी; इंग्लंदचा जो राजा तोच आयर्लंदचाही राजा असावा; आयर्लंदांत कर बसविणें अगर उठविणें याविषयींचा अधिकार फक्त आयरिश पार्लमेंटास असावा,—मात्र आयर्लंद हा ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग असल्यानें साम्राज्य चालविण्याबाबद जो समाईक खर्च करावा लागेल त्याचा योग्य हिस्सा आयर्लंदवर बसेल तो आयर्लंदच्या तिजोरींतून इंग्लंदला मिळावा; परराष्ट्राशीं तहनामे, करारनामे वगैरे करणें ते सर्व ब्रिटिश पार्लमेंटनें करावे व तसेंच साम्राज्यासंबंधाचे सर्व कायदेही ब्रिटिश पार्लमेंटनें करावे." होमरूलबद्दल पुढें आयर्लंदांत व इंग्लंदांत जी मोठी चळवळ झाली तिचा पाया या ठरावांवर रचलेला आहे.

आयझॅक बट हा ब्रिटिश पार्लमेंटांत ओकॉनेलचा प्रतिपक्षी या नात्यानें काम करीत होता हें वर सांगितलेंच आहे. व ओकॉनेलच्या मृत्यूपर्यंत कॉनझरव्हेटिव्ह लोक बटची मनधरणी करून त्यास मान देत. परंतु ओकॉनेलच्या मृत्यूपासून पुढें ते त्यास मानीनातसे झाले. शिवाय त्यांची आयर्लंदविषयीं पुरी अनास्था पाहून त्यांच्या कच्छपीं यापुढें लागण्यांत अर्थ नाहीं असें बटच्याही मनानें पुरें घेतलें. अर्थात् अशा रीतीनें होमरूलबद्दलची मागणी करण्यास तो प्रवृत्त झाल्यामुळें, कर्मधर्मसंयोगानें ओकॉनेलच्या खुद्द प्रतिपक्षाचे हातूनच, त्यानें चालविलेल्या 'रिपील'चे चळवळीचा झेंडा या सभेंत उभारला गेला. आणि १८७४ सालीं पार्लमेंटच्या नव्या निवडणुकी झाल्या तेव्हां होमरूलच्या चळवळीला अनुकूल असे चौसष्ट सभासद आयर्लंदांत निवडून आले. परंतु आयझॅकबट याचें वय साठी जवळजवळ

आल्यामुळें त्याचे हातून पार्लमेंटमध्यें जो कार्यभाग व्हावा तो नीट होईना. अशावेळीं सुदैवानें प्रसिद्ध आयरिश देशभक्त पार्नेल हा पुढें सरसावला. १८७५ सालीं मीथ शहराकडून पारनेलची पार्लमेंटांत निवडणूक झाली. पार्नेल कायदेशीर चळवळीचा भोक्ता असून पार्लमेंट सभेंतील कामकाज करण्याची पद्धती त्याला आवडे, व अशा सभेंत काम करण्यास तो सर्वस्वी योग्यही होता. पार्लमेंट सभेचे नियम त्याला मुखोद्गत असत; त्यांचा अन्वय लावणें व मीमांसा करणें यांत तो पुरा निष्णात होता. व पार्लमेंटच्या नियमांच्याच साहाय्यानें सूचना उपसूचना आणआणून व भाषणें करकरून त्यानें व त्याच्या अनुयायांनीं मंत्रिमंडळास जीव नकोसा करून सोडला. हें सर्व करण्यांत पार्नेल याचा मुख्य उद्देश इतकाच होता कीं, कोणीकडून तरी आयरिश लोकांच्या तक्रारींकडे पार्लमेंटच्या सभासदांचें लक्ष वेधावें. प्रधानमंडळ कोणच्याहि पक्षाचें असो, त्याच्यामागें बहुमताचा पाठपुरावा असावयाचा; व त्याच्या जोरावर इंग्रज लोकांच्या सुखदुःखासंबंधाच्या कायद्याचें दळण मात्र वाटेल तितके दिवस घातलें जाई. आयरिशहित पाहणारे सभासद फार तर ८० अगर १०० असावयाचे, तेव्हां त्यांच्या भाषणांकडे अगर सूचनांकडे लक्ष कोण देतो ! आयरिश लोकांच्या सुखदुःखाकडे कानाडोळा करून पार्लमेंटचा गाडा हवा तसा त्यांना हांकतां येत असे. परंतु पार्नेलच्या या युक्तीनें प्रधानमंडळाच्या नित्यक्रमास अडथळा येऊं लागला. हा मार्ग आयझॅकबट यास पसंत नव्हता. त्याचा सर्व जन्म शिष्टपणाच्या संथपणांत गेला होता. पार्लमेंटच्या कामास विनाकारण अडथळा केल्यापासून स्वतःस नफा न होतां ब्रिटिश प्रधानमंडळाचा विनाकारण राग मात्र होणार व गोडीगुलाबीनें एकादे वेळीं त्यांजकडून जें थोडेंबहुत मिळण्याची आशा तीही नाहींशी होणार असें त्याचें मत होतें. परंतु पार्नेल हा तरुण, उद्योगी व उत्साहपूर्ण असल्यामुळें त्याचेपुढें कोणाचें कांहीं चालेना व बट हा पार्लमेंट सोडून आयर्लंदमध्यें जाऊन राहिला, व १८७९ सालीं मरण पावला. पार्नेलला बिगर, मायकेल डेव्हिट, शॉ, वगैरे लोकांची मदत मिळाली. १८८० सालीं पार्लमेंटच्या नव्या निवडणुकी झाल्या, त्यांमध्यें आयर्लंदांतील सर्व पक्षांनीं मिलाफ करून लिबरल पक्षास मदत केली. व लिबरल पक्षाचे

पुढारी ग्लॅडस्टन साहेब यांच्या मनांत पार्नेलबद्दल आदर उत्पन्न होऊन तो कर्ता व वजनदार पुरुष आहे अशी त्यांची खात्री झाली. नवीन पार्लमेंटांत लिबरलपक्ष चारच वर्षें अधिकारूढ राहिला. दरम्यान जमिनीच्या बाबदींत आयरिश कुळांचें नुकसान भरून देण्यासंबंधानें वगैरे प्रश्न निघाले, व आयरिश लोकांस थोडेबहुत अनुकूळ असे कायदेही झाले. परंतु 'होमरूलचें' असें बिल पुढें येण्यास आणखी दोन वर्षें लागलीं.

१८८५ सालीं लॉर्ड कॅरनॉरव्हन हा आयर्लंदचा व्हाईसरॉय होता त्यावेळीं त्यानें पार्नेल वगैरे पुढाऱ्यांच्या गांठी घेऊन होमरूलबद्दल अर्धीमुर्धीं अभिवचनेंही दिलीं. परंतु ग्लॅडस्टन साहेबांसारखा नेटाचा पुढारी पुरस्कर्ता होईपर्यंत होमरूलच्या चळवळीस विशेषसें स्वरूप आलें नाहीं. अखेर तारीख १८ एप्रिल १८८६ रोजीं आयर्लंदला स्वतंत्र पार्लमेंट देण्यासंबंधाचें बिल ब्रिटिश पार्लमेंटपुढें आलें. या बिलास होमरूलबिल असें न ह्मणतां 'आयर्लंदच्या राज्यकारभाराचें बिल' असें नांव देण्यांत आलें. तरीही बिलामुळें इंलंदांत फारच गवगवा झाला. कॉनझरव्हेटिव्ह पक्षानें विकारवश अशा इंग्लंदच्या लोकांस चेतवून ग्लॅडस्टन साहेबांविरुद्ध काहूर केलें. मागें चार्लस राजाच्या कारकीर्दीतील 'क्याव्हेलिअर' व 'राउंड हेड' या दोन पक्षांमध्यें ज्याप्रकारचें वितुष्ट पडलें त्याच प्रकारचें वितुष्ट होमरूलास अनुकूळ व प्रतिकूळ असणाऱ्या लोकांमध्यें पडलें. मात्र प्रत्यक्ष लढाई झाली नाहीं इतकेंच काय तें. कोणीं कोणाचें तोंड पाहूं नये; एकमेकांच्या क्लबांत एकमेकांस घेऊं नये; प्रतिपक्षाच्या तसबिरी घरीं टांगलेल्या असतील तर त्या काढून फेकून द्याव्या. येथपर्यंत मजल आली. ग्लॅडस्टनच्या बाजूस राहून नेहमीं त्याचें साहाय्य करणारे ब्राईट, लॉर्ड हारटिंगटन, चेंबरलेन वगैरे मुत्सद्दी प्रधानपदाचा राजीनामा देऊन घरीं बसले. परंतु ग्लॅडस्टन मुख्य प्रधान, व जॉन मोर्ले, आयर्लंदचे स्टेट सेक्रेटरी, यांनीं आपला निश्चय सोडला नाहीं. या बिलानें आयर्लंदास वेगळें पार्लमेंट मिळावयाचें होतें. त्यापैकीं हाऊस ऑफ लॉर्डसमध्यें २८ निरंतरच्या हक्काचे सभासद, व ७५ इतर ह्मणजे दहा वर्षांकरितां कांहीं विवक्षित उत्पन्न असलेल्या मतदारांनीं निवडून देण्याचे

सभासद असावे; व हाऊस ऑफ कॉमन्स सभेमध्यें पांच वर्षेपर्यंत निवडून दिलेले २०४ सभासद असावे, अशी योजना होती. हें बिल आयरिश होमरूलपक्षास मान्य होतें. परंतु ता० ७ जून रोजीं होमरूल बिलाविरुद्ध ३० मतांनीं बहुमत होऊन ग्लॅडस्टन साहेबांचा पराभव झाला व त्यांनीं आपल्या मुख्य प्रधानकीचा राजीनामा दिला. आणि पुढील महिन्यांत नव्या निवडणुकी झाल्या त्यांमध्यें होमरूल नको ह्मणणाऱ्या लोकांचेंच बहुमत झालें. परंतु पुढील सात वर्षांत होमरूलला अनुकूळ असें लोकमत हळूहळू वाढूं लागलें. आयर्लंदांत दंग्यावर दंगे होऊं लागले. बालफोर हा स्टेट सेक्रेटरी असून त्यानें दंडपशाही कायद्यांचा अंमल सक्तीनें चालविला होता. परंतु त्याच्या योगानें आयरिश लोक तर गप्प बसले नाहींतच, पण त्यांचा पुढारी पार्नेल यानें होमरूलला प्रतिकूल असलेली लिबरल मंडळी ही अनुकूळ करून घेतली. 'पार्नेल हा खून करण्यास उत्तेजन देणाऱ्यांपैकीं आहे, व१८८२सालीं फिनिक्सपार्कमध्यें बर्क व कॅव्हेंडिश या अधिकाऱ्यांचे जे खून झाले त्यांस त्याची संमति होती' असा दोषारोप पार्नेलवर सन १८८८ सालीं करण्यांत आल्यावरून कमिशनमार्फत त्या आरोपांची चवकशी झाली. व ज्या पत्रांच्या आधारावर तो आरोप करण्यांत आलेला होता तीं बनावट आहेत असें ठरलें व पत्रें बनविणारानें आत्महत्याही केली. कमिशनपुढें पार्नेल निर्दोषी ठरून त्याचें व अर्थात् त्याचेबरोबर होमरूलपक्षाचें वजन वाढलें. परंतु पुढें लवकरच पार्नेलवर, कॅपटन ओशिआ नांवाच्या गृहस्थाची बायको काढून नेल्याबद्दल दिवाणी फिर्याद होऊन त्याचें लोकांतलि वजन एकदम कमी झालें; ग्लॅडस्टन साहेबांनीं पार्नेल यानें होमरूलपक्षाचा पुढारीपणा सोडावा असा आग्रह धरला; पार्नेल तें कबूल करीना; त्याच्या पक्षांत तंटे होऊन त्यास पुढारीपणाच्या जाग्यावरून काढण्यांत आलें; व पुढील निवडणुकींत पार्नेलच्या पक्षाचे असे रेडमंड वगैरे फक्त नऊ सभासदच कायते पार्लमेंटमध्यें निवडून आले. या गोष्टींनीं होमरूलच्या कार्यास फिरून बराच धक्का बसला.

परंतु अशा या संकटाचे वेळीं ग्लॅडस्टन साहेब मात्र आपल्या मनास स्मरून खंबीरपणानें वागले. १८९३ च्या फेब्रुवारी महिन्यांत ग्लॅडस्टन साहेबांनीं आपलें दुसरें होमरूल बिल पार्लमेंटपुढें मांडिलें. पहिल्या बिलांत लोकांस

नापसंत झालेलीं कलमें यांतून काढून टाकिलीं होतीं; व नवीन योजना अशा प्रकारची केलेली होती कीं, आजपर्यंत ब्रिटिश पार्लमेंट सभेंत १०३ आयरिश सभासद बसत असत ते यापुढें फक्त ८० रहावे; परंतु केवळ ग्रेटाब्रिटनच्या हितसंबंधाचे जे प्रश्न चर्चेस निघतील त्यांच्या चर्चेंत त्यांनीं कांहीं बोलूं नये अगर मत देऊं नये; व आयर्लंदला पूर्वीप्रमाणें नवीन पार्लमेंट द्यावें. सप्टेंबर महिन्याचे पहिले तारखेस ३४ मतांनीं हें बिल हाऊस ऑफ कॉमन्स सभेंत पास झालें. पण लॉर्ड लोकांची सभा त्यास तिळांजळी देण्यास सिद्ध होऊन बसलीच होती, व ४१९ विरुद्ध ४१ मतांनीं त्यांनीं तें बिल नामंजूर केलें ! अशा रीतीनें ग्लॅडस्टन साहेबांचे आठ वर्षांचे, व पार्नेलचे सुमारें पंधरा वर्षांचे प्रयत्न फुकट गेले. तारीख ३ मार्च १८९४ रोजीं ग्लॅडस्टन साहेबांनीं उतारवय झाल्यामुळें मुख्य प्रधानकीचा राजीनामा दिला. व लॉर्ड रोजबरी यांनीं प्रधानपद स्वीकारलें. परंतु होमरूलच्या बाबदींत त्यांनीं पिच्छेहाट केली. त्यांनीं असें जाहीर केलें कीं पार्नेलसारखा पुढारी फिरून आयरिश लोकांस मिळे-पर्यंत हा प्रश्न उपस्थित होणें शक्य नाहीं. व पुढें पुढें तर त्यांचीं मतें होमरूलला प्रतिकूळच झालीं. त्यांचेनंतर सर हेनरी कँपबेल बॅनरमन हे मुख्य प्रधान झाले व हल्लीं मि० ॲसक्विथ हें मुख्य प्रधानाच्या जागीं आहेत व हल्लींच्या प्रधानमंडळांत लॉर्ड मोर्ले, जेम्स ब्राईस, आग-स्टाईन बिरेल, हरबर्ट ग्लॅडस्टन, लॉइड जोन्स, विंटसन चर्चिल वगैरे मंडळी ग्लॅडस्टन साहेबांचे भक्त व अनुयायी आहेत. परंतु त्यांपैकीं एकाच्याही मनांत होमरूलबद्दल आपल्या परलोकवाशी गुरूइतका उत्साह नाहीं. इंग्लंदमध्यें लोकमताचा प्रवाह अद्यापि आयरिश होमरूलच्या विरुद्ध वाहत आहे. आणि कॉनझरव्हेटिव्ह लोक अधिकारारूढ असतांही त्यांनीं जमिनीच्या व स्थानिक स्वराज्याच्या बाबदींत आयरिश लोकांस मान्य असे कायदे केल्यामुळें त्यांच्या न्यायबुद्धीबद्दल आयर्लंदांत किंचित् आदरही उत्पन्न झाला आहे. पण सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं फिरून आयरिश लोकांमध्यें चळवळीच्या मार्गाच्या गुणदोषांसंबंधानें दुमत होऊन, एक पक्ष ह्मणजे रेडमंड याचा पक्ष, पार्लमेंटमधील चळवळीवर भिस्त ठेऊन वागणारा असून, दुसरा पक्ष ‘ ग्यालिक अमेरिकन ’ वगैरे वर्तमानपत्रांचा आहे. या दुस-

ऱ्या पक्षाचे ह्मणणें असें कीं ब्रिटिश सरकार व राष्ट्र यांजवर सर्वस्वीं बहिष्कार घालून, पार्लमेंटमध्यें बसण्याचें सोडून देऊन केवळ स्वावलंबनाचे तत्त्वावर भिस्त ठेऊन सर्व बाजूंनीं राष्ट्राची सुधारणा आयरिश जनतेनें आपली आपणच करावी. अर्थात् या पक्षामध्यें होमरूलबद्दल मुळींच उत्साह नाहीं; व वेताळ पूर्वपदावर आल्याप्रमाणें, हा 'होमरूल'चा व पर्यायानें 'रिपील'च्या चळवळीचा प्रश्न आयझॅकबट काय किंवा ओकॉनेल काय किंवा ग्रॅटन काय, यांच्या वेळीं ह्मणजे सुमारें १९ व्या शतकाचे प्रारंभीं जसा होता तसाच आज आहे. ही शंभर वर्षांची चळवळ फुकट गेली असें स्पष्ट ह्मणण्याचें कोणाचेही जिवावर येईल. परंतु तिचे अवांतर गौण, व अप्रत्यक्ष असे जरी शेंकडो उत्तम परिणाम झाले आहेत तरी होमरूलची किंवा रिपीलची चळवळ शंभर वर्षे खटपट करून आजवर तरी फुकट गेली असेंच ह्मणणें भाग पडतें.

आयरिश राष्ट्रास 'होमरूल' देणें ह्मणजे १७८२च्या स्वतंत्र पार्लमेंटपेक्षां पुष्कळ कमी अशा प्रकारची देणगी देणें यांत शंका नाहीं. असें असतां त्यावर एवढीं रणें कां पडतात याचें पुष्कळांस आश्चर्य वाटेल. परंतु एकदां माशानें गिळलेलें माणिक परत मिळणें जसें कठिण असतें, तसेंच राजकीय स्वातंत्र्य एकदां हातचें गेलें ह्मणजे तें परत देणें व मिळविणें देणारास व घेणारास कठिण होतें. मागणारास तर कारणांची वाण केव्हांही नसतेच; परंतु तें देण्याचा प्रसंग ज्यावर येतो त्यास हीं अथात् न देण्याची कारणें सुचूं लागतात; व झालें तें होऊन गेलें, आतां पुढें काय तें बोला, असें सामान्य लोक ह्मणूं लागतात. ग्लॅडस्टन साहेब हे मात्र सामान्य कोटींतील पुरुष नसल्यामुळें त्यांस हा भोळ्या भावाचा युक्तिवाद पसंत पडला नाहीं; व आपल्या तरुणपणीं आयर्लंदला हातीं धरून त्यांनीं त्या निराश्रित राष्ट्राकरितां भांडण्याचा जो संकल्प केला तो आपल्या आयुष्याचे अखेरपर्यंत त्यांनीं नेटानें चालविला. परंतु ग्लॅडस्टनसारख्या पुढाऱ्याचे हातूनही प्रतिकार न होण्यासारखें बळ होमरूलच्या प्रतिपक्षांस केवळ कालाच्या गतीनें आलें होतें, व या कालाच्या गतीमुळें, 'आहे तीच व्यवस्था बरी आहे व ही राखूनच आयर्लंदला काय न्याय द्यावयाचा तो द्यावा' असें लोक ह्मणूं लागले. आज मित्तीस होमरूलचा प्रश्न वादग्रस्त प्रश्नांपैकींच एक आहे. व

इकडे कॉनझरव्हेटिव्ह पक्षाचा जोर जरी कमी झाला नाहीं तरी पुढें जोरावर येणाऱ्या 'रॅडिकल' व 'सोशिआलिस्ट' पक्षाची पूर्ण अनुकूलता होमरूलला आहे. कांहीं थोड्या दिवसांपूर्वी अधिकारविभागणीच्या रूपाचें एक बिल बिरेल साहेबांनीं पार्लमेंटपुढें आणिलें होतें; परंतु आयरिश राष्ट्रीयपक्षास पुढें मागें प्रत्यक्ष होमरूल मिळण्याची आशा वाटूं लागल्यानें त्यांनीं सगळ्या भाकरीच्या आशेवर या अधिकारविभागणीच्या अर्ध्या भाकरीचा त्याग केला. मात्र आतां ही सगळी भाकरी त्यांच्या पदरांत पडते अगर कांहीं अघटित घटना होऊन ही अर्धीही त्यांच्या हातून जाते हें पाहावयाचें आहे! आयरिश इतिहासांत वाचकांची दिशाभूल करून टाकण्यासारखे चमत्कार अनेक वेळ घडून आले आहेत. व होमरूलसंबंधानेंही असाच एखादा चमत्कार घडून येतो कीं काय या प्रश्नाचें खरें उत्तर काळाच्या उदरांत सांठविलेलें असणार! त्याविषयीं नुसते तर्क करण्यांत फारसा अर्थ नाहीं. तथापि वाचकांस आपापले तर्क स्वतंत्र रीतीनें काढतां यावे या हेतूनें होमरूलसंबंधीं साधक व बाधक विचार खालीं देण्यांत येत आहेत.

होमरूलला अनुकूल असा युक्तिवाद करणारे निःपक्षपाती लोक खालीलप्रमाणें कारणें पुढें आणितात. ते ह्मणतातः—सन १८०० सालीं आयरिश लोकांचें पार्लमेंट मोडून तें ब्रिटिश पार्लमेंटांत सामील करण्यांत आलें, व या व्यवस्थेनें विनाकारण एका राष्ट्राचा पाय दुसऱ्या राष्ट्राच्या पायांत अडकविला गेला. बरें, हा पाय काढून पूर्वीप्रमाणें अगदीं स्वतंत्र असे पार्लमेंट आयर्लंडला द्यावयाचें नाहीं, व अनायासानें झालेल्या एकीची बेकी करावयाची नाहीं असें ह्मटलें तरी दोहोंच्या मधला असा कांहीं तरी मार्ग काढलाच पाहिजे, एरवीं दोहोंसही सुख व्हावयाचें नाहीं. आयरिश लोकांना त्यांचें असें स्थानिक पार्लमेंट न उरल्यामुळें, केवळ स्थानिक महत्त्वाच्या प्रश्नांबद्दलही ब्रिटिश पार्लमेंटपुढें बिलें आणून ब्रिटिश सभासदांच्या वेळेचा विनाकारण अपव्यय करावा लागतो. आयरिश व ब्रिटिश या दोन राष्ट्रांच्या चालीरीती, त्यांची रुचि, त्यांची आवडनिवड, त्यांच्या प्रगतीचें धोरण व नियम हीं सर्व वेगळीं असल्यामुळें ब्रिटिश सभासदांचा हात स्थानिक कारभारांत काय ह्मणून पडावा? व अशा

पांचशें परकी सभासदांच्या गैरसमजामुळें अगर दुराग्रहामुळें अशा किरकोळ बाबतींतही आयर्लंदचें नुकसान कां व्हावें ? इंग्रज लोकच जर स्थानिक अधिकारावरही देखरेख करणार, तर मग आयरिश लोकांना आपलीं कामें आपण करण्यास व संभाळण्यास अवश्य असें शिक्षण कधीं व कसें मिळावें ? व फार दिवसपर्यंत हीं कामें परक्यांच्या हातीं गेल्यानें तीं करण्याची सवय आयरिश लोकांची कायमचीच नाहींशी होऊन ते दुबळे बनणार नाहींत कशावरून ? किरकोळ व स्थानिकमहत्त्वाचें काम ज्याचें त्यानें केलें तरच तें हवेंतसें चांगलें होतें. बरें, इंग्लंदला त्यापासून फायदा आहे ह्मणावें तर तेंही नाहीं. कारण आयरिश हिताहिताचें कोणचेंही बिल पुढें आलें कीं पार्लमेंटमध्यें रिकामा वितंडवाद अगदीं वाढून ठेवलेला असतो; व त्यांत पुष्कळ वेळ गमावला जाऊन खुद्द इंग्रज लोकांच्या हिताहितांचीं बिलें मागें पडतात. ब्रिटिश राज्याचें संरक्षण करण्यास किती लष्कर व आरमार पाहिजे, त्यावर किती खर्च करावा, वगैरे गोष्टी उभयतांच्या हिताच्या असल्यामुळें त्या गोष्टीचा मात्र विचार उभयतांनीं मिळून करावा हें ठीक आहे. परंतु आयर्लंदांमध्यें एका कोपऱ्यांतल्या एखाद्या म्युनिसिपालिटींत सरकारी अगर लोकनियुक्त सभासद किती असावे, अथवा सर्व आयर्लंदांत एकंदर दवाखाने अगर इस्पितळें किती असावी, वगैरे गोष्टी व्यापक अशा नियमांनीं आयरिश लोकांनीं आपल्या आपण ठरविण्यास कोणी कां हरकत घ्यावी? जगांतील सुधारणेचें धोरण पाहिलें तर ज्याचें काम त्यास करतां यावें अशा तत्त्वाकडे आहे. मग आयरिश लोक तें काम करण्यास मागत असतां त्यांस काय ह्मणून नकार द्यावा ? कांहीं थोड्या बाबदींत एकदां स्वातंत्र्य दिलें ह्मणजे मग ते बाकीच्या गोष्टींतही हळू हळू मागूं लागतील या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण पुढें आयरिश लोक अयुक्त अशा मागण्या मागतील या सबबीवर आज त्यांना जें देणें युक्त आहे तेंही त्यांस नाहीं ह्मणणें हा कांहीं न्याय नव्हे. उलट कांहीं न दिल्यानें आज जो असंतोष व जी निराशा आहे, ती कांहीं थोडें दिल्यानें उद्यां जाऊन, अधिक मिळविण्याच्या आशेनें ते संतोषच दाखवूं लागतील. जगांत इतर ठिकाणीं स्वराज्य दिलें असतां लोक संतुष्ट राहून राजनिष्ठ बनतात

असेंच आढळून येतें. व आयरिश लोकही तसेच होतील, कारण निर्भेळ स्वातंत्र्य मिळविण्याचे मार्गांत काय काय अडचणी असतात हें त्यांस चांगलेंच कळून आलेलें आहे! कांहीं नियमित स्वतंत्रता ही प्रत्येक राष्ट्राचे अभिवृद्धीस व संपन्नतेस आवश्यक असते. व स्वातंत्र्याचे योगानें इंग्रजी वसाहती जशा संतुष्ट व संपन्न होऊन इंग्रजी साम्राज्याचें हितचिंतन करून त्याच्या संरक्षणास आज मदत करूं लागल्या आहेत, तसेंच आयर्लंदही करणार नाहीं ह्मणून कशावरून? आयरिश पार्लमेंटला एकदां तिचे अधिकार आंखून दिले ह्मणजे दोन्ही राष्ट्रांस सुख होईल, कोणाचा पाय कोणाच्या पायांत गुंतून राहणार नाहीं, शिवाय ब्रिटिश पार्लमेंट व आयरिश पार्लमेंट यांजमध्यें विरोध उत्पन्न होण्याचें कारण समूळ नाहींसें होईल. फक्त आयरिश पार्लमेंट आज निराळी करितांना, पूर्वीच्या स्वतंत्र अशा पार्लमेंट सभेच्या रचनेंत जे दोष होते ते काळजीपूर्वक टाळले ह्मणजे झालें. आयर्लंदांत निरनिराळ्या पंथाचे लोक आहेत ही गोष्ट जरी खरी आहे, तरी तेथें पूर्वींपेक्षां अलीकडे धर्मसहिष्णुतेचा प्रसार अधिक झालेला आहे, आणि शिवाय धर्ममतांचा विरोध नाहींसा होण्यास त्यांस सर्वांचें साधारण हित ज्यांत आहे असें काम करण्याची संधि अधिकाधिक आणून देणें हाच उत्तम मार्ग होय. देशहिताचें काम करण्याचें काम जोंपर्यंत तिऱ्हाइतांनीं विनाकारण आपल्या हातीं ठेवलेलें आहे तोंपर्यंत ‘ रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी ’ या ह्मणीप्रमाणें आयरिश लोक आपआपसांत भांडत व वैर वाढवीत राहिले तर त्यांत कांहीं नवल नाहीं. एकी होण्यास रिकामपणापेक्षां कामाचें दडपणच अधिक उपयोगीं पडतें. व्यक्तिविषयक विचारापेक्षां अधिक व्यापक व अधिक महत्त्वाचें असें कांहीं तरी काम लोकांच्या हातीं मिळेल व राहील तरच मतभेदांतील गुण राहून दोष निघून जातील. बरें होमरूल न दिल्यानें इंग्लंदास तरी सुख आहे कां? नाहीं. असंतुष्ट अशा देशांत राजकीय सत्ता फक्त शिपायांच्या तरवारीवर अवलंबून असावयाची; परंतु इंग्लंदची आयर्लंदवरील सत्ता नुसत्या तरवारीवर कधींही टिकणार नाहीं. उलट होमरूल दिल्यानें आयरिश लोक संतुष्ट राहतील; देशांत शिक्षण व उद्योगधंदे वाढविण्यास त्यांस हुरूप येईल; लोकांचें दारिद्र्य

कमी होऊन ते इंग्लंदचा माल अधिक घेऊं लागतील; संकटसमयीं ते इंग्लंदचें साहाय्यच करितील; आज देशत्याग करून लोक बाहेर जातात ते जातनासे होतील; इंग्रज जमीनदार इंग्लंदांत राहतात ते आयर्लंदांत राहण्यास परत येतील; देशांतील लोकसंख्या व अर्थात् शक्तिही वाढेल; शंभर वर्षांत आयर्लंदच्या आंगचें मांस इंग्लंदनें तोडून खाल्लें आहे असा जो इंग्लंदवर आज आरोप येत आहे तो खरा असोवा खोटा असो, तो तरी यापुढें टळेल; आपल्या हातानें आपली उन्नत्ति करण्याची संधि आयर्लंदला दिल्याचें श्रेय इंग्लंदला मिळून त्याच्या भावी स्थितिबद्दलची जबाबदारी इंग्लंदवर राहणार नाहीं; व आज आयरिश लोकांचे तोंडीं नुसते शिव्याशाप आहेत तें ऐकण्याचें टळून सुधारलेलें राष्ट्र या नात्यानें इंग्लंदनें आपलें कर्तव्य बजावलें असें जग ह्मणूं लागेल.

होमरूलला प्रतिकूळ असणाऱ्या लोकांची विचारसरणी खालील प्रकारची आहे. ते ह्मणतातः—राज्यव्यवस्था कोठेंही एकतंत्री असण्यांतच सुख आहे. होमरूल दिल्यानेंच खरोखर पायांतपाय अडकविल्यासारखें होणार आहे. कारण कायदेकानू करण्याचें काम धड ना आयर्लंदांत धड ना इंग्लंदांत असें होईल. वसाहती या प्रथमपासूनच पृथक् असतात; त्यांना स्वराज्य दिल्यानें त्यांची साम्राज्यनिष्ठा दृढ होते व अशा रीतिनें त्यांच्यामध्यें व इंग्लंदामध्यें एकीकरणाचें एक नवीन बंधन तयार होतें. परंतु आयर्लंदास होमरूल देणें ह्मणजे आहे तें बंधन तोडून टाकण्यासारखें आहे. सर्व बाजूंनीं भिन्नता असलेल्या अशा दोन राष्ट्रांत स्वतंत्र पार्लमेंट सभा ज्याची त्यास मिळाल्यावर मग स्नेहभाव राहण्यास काय कारण उरणार? वसाहतवाल्यांस स्वराज्याचे हक्क आयरिश लोकांपेक्षां अधिक आहेत याचें कारण असें कीं, त्यांच्यातर्फे ब्रिटिश पार्लमेंट सभेंत कोणी सभासद असत नाहींत; आयर्लंदचे प्रतिनिधी पार्लमेंटांत शंभराहून अधिक असल्यावर मग त्यांची कुरकुर कां रहावी? शंभर लोकांना आपलीं स्थानिक गाऱ्हाणीं पार्लमेंटपुढें मांडण्यास मुळींच त्रास पडूं नये. वसाहती कदाचित् स्वराज्याचा दुरुपयोग करून स्वतंत्र झाल्या असें मानिलें तरीं त्यांत इंग्लंदचा प्रत्यक्ष असा तोटा नाहीं. १८ व्या शतकांत अमेरिका स्वतंत्र झाली, तथापि त्यापासून इंग्लंदास कमीपणा आला नाहीं. परंतु

होमरूलचा दुरुपयोग करून जर आयर्लंद उद्यां स्वतंत्र झालें तर आपल्या दारासमोर आपल्या हाडवैऱ्याला घर बांधून दिल्याप्रमाणें इंग्लंदला पश्चात्ताप पावावें लागेल. 'चॅनल आयर्लंदस' व 'आइल ऑफ मॅन' या क्षुद्र बेटांसही स्वतंत्र पार्लमेंट आहे खरें. पण तीं बिचारीं टीचभर बेटें आपल्या शक्तीचा दुरुपयोग करून इंग्लंदचें काय नुकसान करणार ? पण आयर्लंद त्रासदायक होण्याइतकें मोठें आहे. होमरूल देतांना आयरिश पार्लमेंटच्या अधिकाराच्या बाबी ठरवून टाकाव्या हें ह्मणणें सोपें आहे, परंतु प्रत्यक्ष तसें करूं गेलें असतां खऱ्या अडचणी समजतात. स्थानिक कार्य कोणचें, व साम्राज्यसंबंधीं कोणचें याची सरहद्द खुद्द ग्लॅडस्टन साहेबांसही नीट ठरवितां येईना, व त्याबद्दल आयरिश लोकांतही मतैक्य होईना. स्थानिक बाबदींतही तत्वाचे प्रश्न ब्रिटिश पार्लमेंट सभेनें ठरविणेंच जरूर आहे. आयरिश पार्लमेंटनें आपले कर आपण बसवावे व ठराविक रकम दर साल खंडणी ह्मणून इंग्लंदला द्यावी हें ह्मणणें दिसतें ठीक. पण कर वसूल करावयाचे ते करून खंडणी न देण्याचें आयरिश पार्लमेंटनें ठरविल्यास एकदम लढाईवरच बेतणार. हल्लींच्या स्थितींत साम्राज्यास आयर्लंदकडून जी खंडणी वसूल व्हावयास पाहिजे ती वसूल करण्यास पंचाईत पडत नाहीं. होमरूल दिल्यानें आयरिश पार्लमेंट सभा प्रथम प्रथम कदाचित् नम्रपणें वागेल, परंतु तिजमध्यें पूर्वीच्या स्वातंत्र्याचें वारें खेळूं लागलें ह्मणजे मग फिरून आयर्लंदच्या इतिहासापैकीं १७८२ व १८०० या सालांची पुनरावृत्तीच व्हावयाची कीं नाहीं ? एका सभेंत येऊन दोन राष्ट्रांचे प्रतिनिधी भांडणें हें वेगळें व दोन पार्लमेंट सभा एकमेकींशीं झगडणें हें वेगळें. पहिल्या प्रकारच्या तंट्याचा निकाल सभेंतील बहुमतानें करितां येतो; पण या दोन सभा भांडूं लागल्या ह्मणजे त्यांचा तंटा मिटण्यास तिऱ्हाईत कोण मिळणार ? व आयतें हातचें सोडून इंग्लंदनें आपली शेंडी विनाकारण तिसऱ्याच्या हातीं कां द्यावी ? सन १८०० सालापासून, ह्मणजे दोन पार्लमेंट सभा एक झाल्यापासून, आयर्लंदांत जीं बंडें झालीं तीं मोडण्यास पंचाईत पडली नाहीं. परंतु त्याच्यापूर्वी ह्मणजे बंडखोरांस स्वतंत्र पार्लमेंटांतील सभासदांचा पाठीराखेपणा असतां झालेलीं बंडें फार जाचलीं व तीं मोडणें कठीण गेलें. होमरूल आज दिला तर त्याच्यापुढची पायरी

आयरिश लोक मागणार नाहींत यास कोण जामीन ? आणि एक देणगी देऊन दुसरी मागें लावून घेण्यापेक्षां, केव्हां तरी नेट धरून आयरिश लोकांच्या मागणीस प्रतिरोध करावा लागणारच, तर मग तो प्रथमपासून केलेलाच बरा. आज आयरिश लोक इंग्रजाशीं भांडत आहेत ते उद्यां सत्ता हातीं येतांच आपआपसांत भांडूं लागतील व अल्पसंख्याक अशा प्रॉटे-स्टंट लोकांवर बहुसंख्याक असे क्याथोलिक लोक जुलूम करितील आणि देशांत यादवी सुरू होईल. आयरिश लोकांची अशी स्वतंत्र पार्लमेंट होती तेव्हां तरी काय झालें ? बरें आयर्लंदला स्वतंत्र पार्लमेंट देऊन शिवाय ग्लॅडस्टन साहेबांनीं १८९३ सालीं योजिल्याप्रमाणें कांहीं आयरिश सभासद इंग्लंदांतील सभेमध्यें बसूं द्यावयाचे तर मग स्कॉटलंद, वेल्स व वसाहती यांपैकीं कोणासही जो फायदा नाहीं तो फायदा एकट्या आयर्लंदासच मिळणार व तो तसा कां द्यां ? आज शंभर वर्षे ब्रिटिश पार्लमेंट सभेच्या न्यायबुद्धीवर व संरक्षणावर भिस्त ठेवून अलस्टर वगैरे प्रांतांत प्रॉटेस्टंट व्यापाऱ्यांनीं जें लाखो रुपये भांडवल व्यापारांत व उद्योग-धंद्यांत गुंतविलें आहे त्यास होमरूल दिल्यानें धक्का पोंचेल अशी भीति वाटते. तर त्यास जामीन कोण होणार ? तात्पर्य, होमरूल देणें ह्मणजे अंधारांत उडी घेणें, हातचें सोडून पळत्याचा पाठीशीं लागणें. व हें सर्व कशाकरितां, तर इंग्लंदास लोकांनीं सुधारलेलें राष्ट्र, व त्यांतील राजकर्त्या पुरुषांस मुत्सद्दी ह्मणावें ह्मणूनच कीं नाहीं ? अर्थात् लाभापेक्षां हानि फारच मोठी आहे. सबब त्या भानगडींत न पडतां हल्लींच्या स्थितींतच आयर्लंदास काय देतां येईल तो न्याय द्यावा व बरें ह्मणवून घ्यावें.'

एकदां हातीं सत्ता आली असतां ती दुसऱ्यास परत देणें कोणाही मनु-ष्यास जडच जातें. व मग तो आडवा तिडवा साधेल तसा युक्तिवाद करीत असतो; तो शोभेल कीं नाहीं याकडे तो पहात नाहीं. या सामान्य सिद्धांताचें वरील युक्तिवाद हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. येवढें ह्मणून हें प्रकरण येथेंच संपवूं.

---

# भाग ७ वा.

## बंडखोरीची चळवळ.

आयर्लंद व इग्लंद यांचा जो संबंध बाराव्या शतकापासून घडून आला, तो सर्व आयरिश लोकांस सर्व वेळीं सारखाच पसंत नव्हता. यामुळें हा संबंध तोडून टाकून आयरिश राष्ट्रास निर्भेळ स्वातंत्र्य मिळवून देण्याचे प्रयत्न अनेक लोकांनीं वेळोवेळीं आपापल्या बुद्धीप्रमाणें व शक्तीप्रमाणें केले. व बंडखोरीच्या या चळवळी इतक्या झाल्या कीं, आयर्लंदांत दर ५० वर्षांनीं बंड व्हावयाचें, अशी एक म्हणच पडून गेल्यासारखी झाली आहे. या सर्व बंडांची हकीकत खुलासेवार सांगणें इष्टही नाहीं; व ती थोडक्यांत सांगणें शक्यही नाहीं. यास्तव मागील तीन भागांत आयर्लंदांतील कायदेशीर चळवळीची त्रोटक हकीकत जशी आह्मीं सांगितली, तशीच बेकायदेशीर चळवळींची त्रोटक हकीकत या भागांत दिली आहे.

दुसऱ्या हेनरी राजानें बाराव्या शतकाचे मध्यभागीं इंग्लंदची सत्ता आयर्लंदवर बसविण्यास सुरुवात केली; व लगेच सुमारें ३५ वर्षांनीं आयरिश अमीर उमरावांचें पहिलें बंड झालें. १२५९ सालीं जिराल्डिन नांवाच्या आयरिश सरदारानें बंड करून इंग्रज लोकांची कत्तल केली. १३१४ सालीं स्कॉटलंदचा राजा रॉबर्ट ब्रूस हा इंग्रजांकडून पराभव पावून आयर्लंदमध्यें आश्रय घेण्यास गेला ती संधी साधून त्यास मदत करण्याकरितां व आयर्लंदचें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां १३१५ सालीं आयरिश लोकांचें बंड झालें. येथून पुढें बंडाच्या चळवळी वरचेवर होऊं लागल्या. सन १३३० सालीं लेनस्टर प्रांतांत बंड झालें, व किलडेर व डेस्मॉंड यांची बंडखोरीची चळवळ १३४८ पर्यंत चालू होती. १४६७ सालीं डेस्मॉंड घराण्यांतील प्रमुख गृहस्थावर राजद्रोहाचा आरोप येऊन त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. १४८७ ते १४९७ या दहा सालांत इंग्लंदच्या गादीला हक्क सांगणारे दोन तोतये निघाले, त्या दोघांनाही आश्रय

देऊन आयरिश लोकांनीं बंडखोरीचा डाव साधेल तितका साधून घेतला होता. १५३७ सालीं लॉर्ड थामस फिड्झरलड याचें बंड झालें. हा शूर उमराव किलडेरच्या घराण्यापैकींच होता. १५५९ ते १५६७ या आठ वर्षांत प्रसिद्ध आयरिश उमराव शेन ऑनिल याचें बंड गाजत होतें. व १५६८ पासून १५८६ पर्यंत मनस्टर प्रांतांतील आयरिश सरदारांनीं बंडाळी चावविली होती. १५७९ सालीं प्रसिद्ध जिराल्डिनच्या घराण्यापैकीं कित्येक लोकांनीं बंड केलें. १५९८ पासून १६०२ पर्यंत मनस्टर प्रांतांत बंडाळी चालू होती. पुढें १६४१ सालीं चार्लस राजाच्या तर्फे ऑरमॉंड सरदाराचें बंड झालें व १६४१ ते १६४८ या सात सालांत एकंदर आयरिश इतिहासांत अत्यंत गाजलेलें असे अलस्टर, मनस्टर व कॉनॉट या प्रांतांतील बंडें व कत्तली घडून आल्या. १६८९–९० सालीं दुसऱ्या जेम्सराजाच्या वतीनें टिरकॉनेल नांवाच्या सरदारानें बंड केलें. परंतु हें बंड मोडल्यापासून रोमन क्याथोलिक लोकांवर भयंकर कायद्यांची शिस्त चालू होऊन पुढें शंभर वर्षेपर्यंत आयर्लंदांत मोठी बंडखोरीची अशी चळवळ झाली नाहीं. किरकोळ दंगेधोपे वगैरे होत असत, व आयरिश शेतकऱ्यांच्या दंगेखोरपणास याच शतकांत सुरुवात झालेली होती. तथापि या दंग्याधोप्यांस फारसें राजकीय स्वरूप नव्हतें.

येथपर्यंत झालेल्या ह्मणजे वर नमूद केलेल्या बंडांत धर्मप्रीति, जप्त झालेल्या जमिनी परत मिळविण्याची इच्छा, अपमानाबद्दल सूड घेण्याची उत्कंठा व क्याथोलिक पंथी राजांविषयीं पक्षपात वगैरे हेतूंची बरीच सरमिसळ आयरिश बंडवाल्यांच्या मनांत झालेली आढळून येते. परंतु यापुढें झालेल्या चळवळींत धर्मापेक्षां राजकारणाचा हेतूच अधिकाधिक बळावत चाललेला आढळून येतो. केवळ राजकीय हेतूंनीं झालेलें यानंतरचें असें मोठें बंड ह्मटलें ह्मणजे १७९८ सालचें 'युनायटेड आयरिशमेन' नांवाच्या संस्थेच्या सहाय्यानें केलेलें वूल्फटोन व लॉर्ड एडवर्ड फिड्झरलड यांचें बंड होय. यानंतर पांच वर्षांनीं ह्मणजे १८०३ सालीं रॉबर्ट एमेट याचें लहानसें बंड झालें. यानंतरची बंडखोरीची चळवळ ह्मटली ह्मणजे फीनियन लोकांनीं केलेली. व ही चळवळ सुमारें १८४८ पासून १८६७ पर्यंत चालू होती. १८४८ सालीं जी चळवळ झाली, ती मुख्यतः 'तरुण

आयर्लंद ' नांवाच्या संस्थेंतील तरुण पुढाऱ्यांनीं केलेली होती. व या पुढाऱ्यांमध्यें कित्येक वर्तमानकर्ते व पार्लमेंटचे सभासदही होते. यांच्यापैकीं वजनदारपुढारी जो स्मिथ ओब्रायन नांवाचा होता, त्याचें अल्पचरित्र पुढें चरित्रमालेंत दिलेलें आहे. सन १८४८ च्या चळवळींत ओब्रायन शिवाय चार्लस डफी, डिलन, जॉन मिचेल, थॉमस मीघर, जॉन लॅलर, जॉन मार्टिन, मॅकमॅनस वगैरे तरतरीत लोक प्रमुख होते. १८४९ सालीं जोसेफ ब्रेनन यानें कॉर्क येथें बंड करण्याचा प्रयत्न केला; परंतु पुढें ९ वर्षांनीं फीनियन लोकांच्या चळवळीस खरी सुरुवात झाली. सर्व एकोणिसाव्या शतकांत फीनियन चळवळ हीच कायती बंडखोरपणाची मुख्य चळवळ आयर्लंदांत घडून आली. व ही चळवळ उपलक्षणादाखल घेऊन फक्त तिची हकिकत याखालीं आह्मी थोडक्यांत देतों. ह्मणजे तिजवरून आयर्लंदांतील बेकायदेशीर चळवळीच्या प्रकाराची थोडी बहुत कल्पना येईल.

फीनियन लोकांची चळवळ प्रथमतः सन १८५८ सालीं आयर्लंदमध्यें सुरू झाली. याच्याही पूर्वीं ह्मणजे सन १८४८ सालीं आयरिश लोकांत ग्रॅटनची परंपरा राखून कायदेशीर चळवळ करणारे लोक व वूल्फटोनची परंपरा राखून बंडावा करणारे लोक असे दोन पक्ष झालेले होते. या दुसऱ्या पक्षाचे लोकांनीं १८४८ सालीं आपला प्रयत्न करून पाहिला होता; परंतु तो फसला. या प्रयत्नांत ' नेशन ' पत्राचे संपादक लोक, स्मिथ ओब्रायन वगैरे मंडळी सांपडली होती. हें वर सांगितलेंच आहे. परंतु त्यांची पुढील कांहीं वर्षे कैदेंत गेलीं; व कैदेंतून परत आल्यापासून त्यांची अशी खात्री झाली कीं, आयर्लंद स्वतंत्र होणें हें जरी रास्त व न्याय्य असलें तरी ती स्वतंत्रता मिळविण्याचीं साधनें तूर्त लोकांजवळ नसल्यामुळें केवळ आत्मघातकी असे प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ओब्रायन व डफी ( ' नेशन ' पत्राचा संपादक ) हे ओकॉनेलच्या विरुद्ध होते; व शेवटीं शेवटीं त्याचा पक्ष सोडून त्याजवर रागावून ते निघूनही गेले. परंतु १८५८ सालीं फीनियन लोकांची जी चळवळ आयर्लंदमध्यें झाली, तीस हे दोघेही प्रतिकूल होते. ही चळवळ स्टीफन्स या नांवाच्या गृहस्थानें सुरू केली. स्किबेरीन नांवाच्या शहरीं एक वाचनालय व त्यांतच एक क्लब होता. त्याचें नांव ' फीनिक्स राष्ट्रीय वाचनालय

व वाङ्मय-सभा' असें होतें. या संस्थेमध्यें व्यापारी उदमी अशा प्रकारचीं तरुण मंडळी होती. सन १८५८ च्या मे महिन्यांत स्टीफन्स हा या क्लबांत गेला असतां, तेथील लोकांची स्वातंत्र्यप्रियता, उत्साह वगैरे गोष्टी पाहून त्यास असें वाटलें कीं, या क्षेत्रांत आपल्या बंडखोर चळवळीचें बीज चांगलें रुजेल. व ह्मणून क्लबांतील पुढारी जेरेमिया डोनोव्हन यास एकांती गांठून त्यानें त्यास असें भासवून दिलें कीं, आयर्लंदास स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां अमेरिकेंत जोराची खटपट सुरू असून जितके लोक आयर्लंदांत लढण्यास तयार होतील तितके अमेरिकेंतून मदतीस यावे असा ठराव होऊन, हत्यारें वगैरेही गुप्तपणें ठिकठिकाणीं सांटवून ठेवण्यांत आलीं आहेत. हें वर्तमान ऐकून डोनोव्हन हा भुरळून गेला व त्यानें क्लबांतील इतर लोक कटांत घेऊन एक गुप्त मंडळी स्थापिली, आणि आयर्लंदच्या स्वातंत्र्यार्थ देह वाहण्याच्या शपथा लोकांकडून घेण्याचा क्रम सुरू केला. परंतु जुळावी तितकी मंडळी जुळत नाहीं असें पाहून स्टीफन्सनें अशी युक्ति योजली कीं, तिच्या योगानें या गुप्त मंडळींत भराभर लोक सामील होऊं लागले. त्यानें असें सांगून दिलें कीं, स्मिथ ओब्रायन, चार्लस डफी, सुलिव्हन, मिचेल वगैरे पुढारी लोक या गुप्त कटाचे कार्यास अनुकूल आहेत, व त्यांना गुप्त मंडळाचे हेतु मान्य आहेत. वास्तविक ही गोष्ट निखालस खोटी होती. हळू हळू ही सर्व वार्ता सुलिव्हन याचे कानावर गेली, व आपलें अंग सदर कटांत नाहीं असें उघडपणें प्रसिद्ध करावें कीं नाहीं याचा त्यास मोठाच विचार येऊन पडला. कारण तसें करावें तर आपण होऊन पोलिसास अशा कटाची वर्दी दिल्यासारखें होतें, व मग जर अपराध्यांबरोबर निरपराधी लोक चिरडले गेले तर त्याचा दोष आपले माथीं येणार! बरें तसें न करावें तर खासगी रीतीनें स्टीफन्स हा आपलें नांव खुशाल बद्द करणार, व तरुण लोक विनाकारण फसले जाऊन पुढें मागें आपल्यावर बोल येण्याचा संभव आहे. परंतु त्यानें अखेरीस सदर गुप्त चळवळीचा उघडपणें निषेध करण्याचेंच ठरविलें. आणि ओब्रायन, मिचेल व तो स्वतः इतक्यांच्यातर्फे 'नेशन' पत्रांतून सुलिव्हन यानें गुप्त चळवळीबद्दल उघड इशारा देऊन तरुण मंडळीस त्यापासून सावध राहण्याचा उपदेश केला. सुलिव्हन हा

यावेळेस डफीचे जागीं ' नेशन ' पत्राचा संपादक असल्यामुळें त्याच्या लिहिण्याचा चांगलाच उपयोग झाला; व विनाकारण भ्रमांत पडून कटांत सामील होणारी तरुण मंडळी वेळींच सावध झाली. लोकांस शपथा देण्याचें काम हळूहळू थांबलें; व फीनियन चळवळ या वेळेपुरती दबली.

फीनियन चळवळीची फिरून उत्पत्ति उघडपणें सन १८६३ सालच्या नवंबर महिन्याच्या तेविसाव्या तारखेस उत्तरअमेरिकेंतील शिकागो शहरीं झाली. या चळवळीची कल्पना यापूर्वीं बरेच दिवस ह्मणजे पांच वर्षें प्रचालित झालेली होती, तरी कोणच्याही चळवळीस नामरूप येण्यास तिला अधिष्ठानभूत अशी एखादी संस्था लागते, व अशा प्रकारची संस्था वरील तारखेस विधिपूर्वक स्थापण्यांत आली. सदर संस्थेचा उत्पादक जॉन ओमेहॉने या नांवाचा आयरिशमन असून त्याचे भोंवतीं आयर्लें-दांतून देशत्याग करून आलेले अनेक असंतुष्ठ व अमेरिकेंत नुकत्याच झालेल्या लढाईमध्यें शिपाइगिरीचीं कामें केलेले, असे आयरिश लोक होते. सदरहू लोकांच्या प्रयत्नाची दिशा कितीही चूक असली तरी त्यांच्या स्वदेशभक्तीबद्दल शंका घेण्याचें कारण नव्हतें. वरील तारखेस संस्था स्थापन करून आयर्लंदमधील व इतर ठिकाणच्या आयरिश लोकांस उद्देशून ओमेहॉने व इतर सभासद यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यांत ' इंग्रजी राज्यसत्ता आयर्लंदांत कशी स्थापित झाली, व ती किती घातक आहे ' हें नमूद करून शिवाय असेंही सांगितलें होतें कीं, ' सन १७८२ सालीं आयरिश पार्लमेंटसभेस इंग्लंदनें स्वातंत्र्य दिलें व १८२९ सालीं रोमन क्याथोलिक लोकांवरचा बहिष्कार काढून घेऊन त्यांस समान हक्क बहाल केले, या दोन्ही गोष्टी आयर्लंदास संतुष्ट व अतएव दुबळें करण्याकरितां दिल्या, व त्याबद्दल खऱ्या देशभक्तांस वाईटच वाटलें पाहिजे !' कारण ' जोंपर्यंत संतोष मनांत नांदतो तोंपर्यंत स्वातंत्र्याकडे दुर्लक्ष होतें. व अशा रीतीनें अल्प क्षणिक सुखासाठीं मोठ्या व चिरंतन अशा सुखास राष्ट्रास मुकावें लागतें ! कोणतेही हक्क राष्ट्राचे अंगीं लागण्यास ते स्वार्थत्यागानेंच मिळवावे लागतात; व वरील दोन देणग्या त्या त्या वेळीं देऊन, आयरिश लोकांस आपले देह खर्चीं घालण्याची व त्या गोष्टी मिळविण्याची संधी आलेली असतां, इंग्लंदनें दुष्ट बुद्धीनें ती घालविली '

अशी सदर जाहिरनाम्यांत तक्रार केलेली होती! स्वार्थत्याग हा फक्त देहत्यागाशीं समानार्थक आहे, व देह टाकण्याखेरीज राष्ट्रास उपयोगी असा दुसरा स्वार्थत्यागाचा कोणताही प्रकार असूं शकणारच नाहीं हें ह्मणणें कदाचित् शिपाई गड्यासच शोभणारें असेल, मुत्सद्यास शोभणारें नव्हे. परंतु त्यावेळीं फीनियन लोकांच्या संस्थेमध्यें असे शिपाईगडीच जुळले होते! एकदां स्वदेशत्याग केलेल्या मनुष्यास, फिरून दुसरा कोणताही देश स्वदेशासारखा मानावयाचा नसल्यास, देहाची किंमतच नाहींशी होते. व चतुर्विध पुरुषार्थ साधण्याचें साधन असा जो देह तो फक्त एकच पुरुषार्थ साधण्याचे कामीं खर्ची पडला, तरी त्याचें त्यास कांहीं वाटत नाहीं. शिवाय अमेरिकेंत त्यावेळीं जे आयरिश लोक जुळले होते, त्यांच्या मनांत स्वदेशभक्ति जरी वास करीत होती तरी, त्यांची दृष्टि आसपासच्या भयंकर स्थितीचें अवलोकन करून अंध नाहीं तरी निदान धुंद झाली होती. व यामुळें रणकंदनाशिवाय त्यांचे मनांत दुसरा कांहीं विचार सहजच येत नव्हता.

फीनियन संस्थेच्या शाखा आयर्लंदांत लवकरच पसरल्या; व कालांतरानें त्यांचा प्रवेश इंग्लंदांतही झाला. 'आयरिश पीपल' या नांवाचें या संस्थेचें एक साप्ताहिक वर्तमानपत्र डब्लिन येथें निघूं लागलें, व त्याच्याद्वारें स्टीफन्स हा 'फीनियन' नांवाचीं हीं नवीन मतें उज्वल भाषेनें हजारों लोकांस समजावून देऊं लागला. कायदेशीर रीतीनें चळवळ करणाऱ्या लोकांचें ऐकूं नका, व राज्यकारणांत धर्मोपदेशकांस मानूं नका, असा उपदेश 'आयरिश पीपल' हें लोकांस करीत होतें. सुमारें दोन वर्षेपर्यंत अधिकाऱ्यांनीं हे वर्तमानपत्र चालूं दिलें; परंतु अखेर सन १८६५ च्या सप्टेंबरमध्यें सरकारी हुकुमावरून पोलिस अधिकारी 'आयरिश पीपल'च्या कचेरींत घुसले. त्यांनीं छापखाना जप्त केला व वर्तमानपत्राचा विध्वंस करून त्याच्या संपादक मंडळास कैद करून नेलें. या मंडळामध्यें ओलियारी, टॉमस लब्बी वगैरे जे लोक होते, त्यांची स्वतंत्र कमिशन नेमून चौकशी झाली, व त्यांस वीस वीस वर्षे काळ्यापाण्याच्या शिक्षा झाल्या. कटाचा पुढारी स्टीफन्स यानें तुरुंगांतून जेलर लोकांशीं संधान बांधून मोकळीक करून घेतली व तो निसटून गेला. यानंतर सदर कटांत व चळवळींत किती व कोण कोण सामील आहेत,

याची गुप्त चौकशी बरेच दिवस जारीनें सुरू होती, तिजवरून या संस्थेचीं पाळेंमुळें आयरिश समाजांत फार खोलपर्यंत गेलीं आहेत, असें अधिकाऱ्यांस आढळून आल्यावरून त्यांनीं वरिष्ठ सरकाराकडे रिपोर्ट करून नवीन अधिकार मागितले. शिवाय ओलियारी, लबी वगैरे लोकांच्या खटल्याची हकीकत वर्तमानपत्रद्वारें चोहोंकडे प्रसिद्ध झाली. त्यावरून त्यांची असामान्य बुद्धिमत्ता, अलौकिक धैर्य व अलोट देशभक्ति व्यक्त होऊन 'ते कोणी पापी गुन्हेगार नसून प्रतिष्ठित लोक होते,—मात्र त्यांचे हेतु चांगले असूनही ते भलत्या दिशेस वाहवले, व यामुळेंच त्यांनीं न्यायपीठासमोर जीं सणसणीत व हजरजबाबी भाषणें केलीं तीं त्यांस करतां आलीं' अशी लोकांची खातरी झाली. व त्यामुळें इंग्लंदांतील लोक आपल्या मनाशीं विचारूं लागले कीं, 'अशीं चांगलीं चांगलीं मनुष्यें अविचारी कां बनतात? त्यांचें देहभान कशानें जातें? सर्व जगांत मनुष्यास प्रिय असा जो प्राण तो एका फुंकरासरशीं घालवून टाकण्यास हे तयार होतात यांतील मर्म काय?' इकडे पोलिस अधिकाऱ्यांनीं झडत्या वगैरे घेऊन युद्धोपयोगी असें किती तरी सामान लोकांनीं ठिकाठिकाणीं लपवून ठेवलेलें हुडकून काढिलें. एका डब्लिन शहरांत भाले, बरच्या, गोळ्या व काडतुसें करण्याचे तीन कारखाने उघडकीस आले! चहूंकडे बंड होतें कीं काय अशी भीति पडली, व अधिकाऱ्यांस लष्कराची कुमक मागावी लागली. सन १८६७चे फेब्रुवारी महिन्याचे सतरावे तारखेस सर जॉर्ज ग्रे यानें पार्लमेंटपुढें अशी सूचना आणिली कीं, आयर्लंदांत कांहीं दिवसपर्यंत नागरिकांच्या स्वातंत्र्याचा कायदा रद्द करावा, ह्मणजे अधिकाऱ्यांस स्वेच्छेनें वाटेल त्या लोकांस कैद करतां येऊन बंडावा मोडेल. ही सूचना कॉमन्स व लॉर्डस या दोन्ही सभागृहांत एका दिवसांत पास होऊन दुसरेच दिवशीं त्यास राजाची संमतिही मिळाली. व अशा रीतीनें या फीनियन चळवळीचा सर्व इंग्लंदांत एकदम गवगवा होऊन आयर्लंदकडे इंग्रज लोकांचें लक्ष वेधलें.

त्याच सालीं सप्टेंबर महिन्यामध्यें मँचेस्टर येथें कीली व डीझी नांवाच्या दोघां फीनियन कैद्यांस पोलिसचे हातून सोडविण्याचा कट होऊन प्रत्यक्ष झटापटींत प्राणहानिही झाली. तारीख १८ सप्टंबर रोजीं पोलीस लोक या कैद्यांस गाडींत घालून पोलीस कोर्टाकडून तुरुंगाकडे नेत असतां

त्यांजवर फीनियन लोकांच्या एका टोळीनें हातांत पिस्तुलें घेऊन हल्ला केला. या धाडसाच्या कृत्यानें मँचेस्टरसेंच काय परंतु सर्व इंग्लंद व आयर्लंद दणाणून गेलें, आणि ऍलन व त्याचे साथीदार यांचेबद्दल कांहीं अकल्पित रीतीनें लोकांचा आदर बसून त्यांस फांशीं दिल्यावर त्यांच्या स्मशानयात्रेस सुमारें दीड लक्ष लोक गोळा झाले होते असें सांगतात! तसेंच पुढें डिसेंबर महिन्यामध्यें तेरावे तारखेस बॅरेट या नांवाच्या फीनियन माणसानें बर्क या नांवाच्या आपल्या स्नेह्यास तुरुंगांतून सोडविण्याकरितां 'डाइनेमाइट'च्या बारानें तुरुंगाची भिंत उडवून दिली. हे असे अपराध व गुन्हे एकामागून एक घडून आल्यामुळें पार्लमेंट सभेमध्यें आयर्लंदच्या प्रश्नाची चर्चा जोरानें सुरू झाली, व प्रॉटेस्टंट धर्ममंडळासंबंधानें नवीन कायदा करविणाऱ्या ग्लॅडस्टनसाहेबांनीं १८६८ व १८६९ या दोन सालांत फीनियन चळवळीस उद्देशून असे उद्गार काढिले कीं, 'आयरिश प्रश्नासंबंधानें पार्लमेंटचें नवीन धोरण बनविण्यास या चळवळीचा एका दृष्टीनें पुष्कळच उपयोग झाला.' फीनियन चळवळीमुळें आयरिश लोकांच्या मागण्यांचे व तक्रारींचे गुणदोष बदलले अगर वाढले असें नव्हे. परंतु नागरिकांच्या स्वातंत्र्याचा कायदा या चळवळीमुळें आयर्लंदांत रद्द करावा लागला; मोठमोठीं शहरें दणाणून गेलीं; लोकांस प्राण व संपत्ति हीं सुरक्षित नाहींशीं वाटूं लागलीं; व शांतताप्रिय अशा नागरिकांस स्वजनसंरक्षणाकरितां हत्यार घेऊन पहारा करावा लागला. अर्थात् आपली नेहमींची शिथिलता बाजूस ठेवून इंग्लंदांतील लोकांस आयर्लंदचा प्रश्न हातीं घेण्याची जरूरी भासूं लागली; व 'वाईट गोष्टींतूनही तत्त्वज्ञानी मनुष्यानें चांगलें कसें निवडून काढावें' याचें हें उदाहरण ह्मणून ग्लॅडस्टनसाहेबांनीं सन १८६८ सालीं मार्च महिन्याच्या तिसाव्या तारखेस पार्लमेंटांतील आपल्या भाषणांत दिलें. याच्यापूर्वीं जॉन ब्राईट यांनींही नागरिकांच्या हक्कांचा कायदा तहकूब करण्याचे वेळीं अशाच प्रकारचें भाषण केलें होतें, व पार्लमेंट सभेंतील मोठमोठ्या मुत्सद्यांस न्यायान्यायाचे प्रश्न हातीं घेण्यास असले भयंकर अनर्थापात होईपर्यंत बुद्धि होऊं नये ही गोष्ट त्यांच्या मुत्सद्दीगिरीस कमीपणा आणणारी आहे, असें बजावलें होतें. याबद्दल ग्लॅडस्टन व ब्राईट

या दोघांवरही त्यांच्या प्रतिपक्षांनीं गहजब करून सोडला, व हीं त्यांचीं भाषणें असल्या अनर्थापातास उत्तेजन देणारीं आहेत, असा उघड दोषारोपही केला. परंतु ग्लॅडस्टन किंवा ब्राईट हे दंग्याधोप्यास उत्तेजन देणारे असें ह्मणणें ह्मणजे दिवसास रात्र ह्मणण्यासारखें असल्याबद्दल सर्व जगाची खात्री होती, व ह्मणून असल्या दोषारोपास नुसतें उत्तर देण्याचेंही कारण त्या महात्म्यांस पडलें नाहीं. यापुढील फीनियन चळवळीचा इतिहास सविस्तर सांगत बसण्याचें कारण नाहीं. ही चळवळ यापुढें दहा वीस वर्षें ह्मणजे पार्नेलच्या वेळेपर्यंत थोडथोडी चालू होती, व पार्नेल हा या चळवळीस मदत करितो असा त्याजवर आरोपही आणण्यांत आला होता; परंतु त्या चळवळीचें अप्रत्यक्ष साहाय्य कायदेशीर चळवळीस कितीही झालें असलें तरी, या दोहोंप्रकारच्या चळवळी करणारीं मनुष्यें आणि त्यांच्या मनाचे पिंड व गुणधर्म खरोखरच अगदीं निरनिराळ्या प्रकारचे असल्यामुळें, फीनियन चळवळीस पार्नेल वगैरे पुढाऱ्यांच्या चळवळीला केव्हांही कायमचें ग्रासून टाकतां आलें नाहीं अगर फारसा अपायही करतां आला नाहीं.

# भाग ८ वा.

---oOo---

## सारासारविचार.

**मागील सहा भागांत** आयर्लंदचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास, व त्याचप्रमाणें आयरिश लोकांनीं केलेल्या कायदेशीर व इतर चळवळींची हकीकत थोडक्यांत दिली आहे. हा इतिहास व ही हकीकत लक्षांत घेऊन व्यापक अशा तात्त्विक दृष्टीनें जे सारासारविचार सुचण्यासारखे आहेत त्यांचें दिग्दर्शन प्रस्तुत भागांत करण्याचें आह्मीं योजिलें आहे.

**आयरिश इतिहासांतील युगांतरें.**—जगाच्या इतिहासाप्रमाणें राष्ट्रांच्या इतिहासांतही युगांतरें असतात. युगांतरें ह्मणजे अर्थात् कालविभाग. राष्ट्राच्या आयुष्यक्रमांतील ठळक ठळक अशा गोष्टी ज्या कालविभागांत घडून आल्या असतील, अथवा पूर्वीं घडलेल्या गोष्टींचे परिणाम पूर्णतेस पावले असतील त्यांस राष्ट्राचीं युगें ह्मणण्याची रीत आहे. या दृष्टीनें पाहतां आयर्लंदच्या इतिहासांत खालीं दिल्याप्रमाणें कालविभाग अगर युगांतरें होतात. ( १ ) पहिलें युग पांचव्या शतकापर्यंत. या युगांत आयर्लंदमध्यें अनेक जातीच्या लोकांची वसाहत कायमची होऊन सर्व लोक एकाच धर्मांत ह्मणजे ख्रिस्ती धर्मांत बांधले गेले व त्यांचें राष्ट्र बनलें. ( २ ) दुसरें युग बाराव्या शतकापर्यंत. या कालावधींत स्वदेशी आयरिश राजांनीं अनेक युद्धें व पराक्रम करून भविष्यकाळीं आपल्या वंशजांनीं पवाडे गावे व अभिमानपूर्वक उल्लेख करावा अशीं कृत्यें केलीं. विश्वविद्यालयांचीं स्थापना करून धर्मगुरूंनीं दिगंत कीर्ति मिळविली; आणि शेतकी उद्योग धंदे वगैरेंना सुरवात झाली. ( ३ ) तिसरें युग सोळाव्या शतकापर्यंत मोजतात. या युगांत प्रारंभीं आयर्लंदांत अंतःकलह सुरू होऊन इंग्रजांचा आयर्लंदांत प्रवेश झाला. व इंग्रजी सत्तेचा चढउतार होतां होतां तिची कायमची स्थापना झाली. व शेवटीं सोळाव्या शतकांत युरोपखंडांत धर्मक्रांति होऊन इंग्लंडच्या आठव्या

हेनरी राजानें पोपची सत्ता झुगारून दिली, आणि स्वतःस आयर्लंदचा राजा ही पदवी उघडपणें घेतली. ( ४ ) चवथें युग सन १७०३ पर्यंत मानितात. या शें सव्वाशें वर्षांत आयर्लंदमध्यें स्वातंत्र्यप्राप्तीकरितां व धर्मद्वेषामुळें एक दोन बंडें झालीं. परंतु त्यांत आयरिश लोकांचा पराभव होऊन, त्यांच्यावर इंग्रज लोकांचा कायमचा अंमल फिरून बसला. देशांत प्रॉटेस्टंट लोकांच्या जंगी वसाहती होऊन संख्येनें मोठे असे रोमनक्याथोलिक, आणि संपत्ती, सत्ता व राजाश्रय यांनीं प्रबळ असे प्रॉटेस्टंट लोक अशीं राष्ट्राचीं परस्परविरोधी दोन अंगें कायमचीं निर्माण झालीं; हजारो आयरिश लोक मारले जाऊन हजारो देशोधडीस गेले; बहुतेक सर्व जमीन प्रॉटेस्टंट इंग्रजी जमीनदारांच्या हातीं जाऊन क्याथोलिक लोक उपरी कुळें बनले; क्याथोलिकांवर सर्व बाजूंनीं कायद्यानें बहिष्कार घातल्यानें, विद्या, संपत्ती व मानमरातब या सर्वांस ते स्वदेशांत पारखे होऊन त्यांची योग्यता नादान गुलामांसारखी झाली. तसेंच व्यापारविषयक कायदे होऊन जो थोडा बहुत धंदा देशांत पूर्वीं होता तो नाहींसा झाला. अखेर १७०३ सालीं आयरिश पार्लमेंट इंग्रजी पार्लमेंटास जोडण्याची कल्पना निघाली असतां असें केल्यानें इंग्रजांचें नुकसान होईल या सबबीवर ती रहित झाली. हें युग आयरिश इतिहासांत फार भयाण होऊन गेलें ( ५ ) पांचवें युग इ. स. १७०३ पासून १८०१ पर्यंत फक्त अठ्याण्णव वर्षांचें. या युगांत आयर्लंदांत शांतता होती; प्रॉटेस्टंट व रोमन क्याथोलिक यांतील द्वेषबुद्धि कमी होण्यास याच युगांत सुरवात झाली; स्वदेशाभिमान हा स्वधर्माभिमानाहून अधिक श्रेष्ठ अशी बुद्धि जागृत होऊन आयरिश पार्लमेंटची सुधारणा करावी अशाविषयीं खटपट सुरू झाली. ग्रॅटन व फ्लड यांसारखे मुत्सद्दी व वक्ते याच युगांत उदयास येऊन आयर्लंदचें मुख उजळ झालें; नॅशनल व्हालंटिअर लोकांचीं पलटणें उभारलीं जाऊन देशाकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास लोक तयार झाले; व या दमावर व दहशतीवर आयरिश लोकांनीं १७८२ सालीं ' इंग्रजी पार्लमेंटचा व आयरिश पार्लमेंटचा कांहीं एक संबंध नाहीं; मात्र दोन्ही देशांचा राजा तेवढा एक ' असें उघड ठरवून घेतलें. व आयरिश पार्लमेंटची सुधारणा होण्यास खरी सुरवात होणार, तोंच दरम्यान

फ्रान्स व अमेरिका या देशांतील राज्यक्रांतीनें कित्येक आयरिश देशभक्तांचे डोक्यांत स्वातंत्र्याचे विचार घोळूं लागले; व फ्रान्सची कुमक घेऊन १७९८ सालीं वूल्फटोननें बंड केलें. तें मोडलें जाऊन आयरिश पार्लमेंटच्या स्वातंत्र्यावर गदा आली; पिटनें लाखों रुपयांचा व पदव्यांचा लांच देऊन आयरिश पार्लमेंटांतील सभासद फितूर करून घेतले; सन १८०१ सालीं आयरिश पार्लमेंट मोडून आयरिश लोकांचे प्रतिनिधी वेस्टमिन्स्टर येथें ब्रिटिश पार्लमेंटांत बसूं लागले; व डब्लिन येथें फक्त व्हाइसराय व इतर अंमलबजावणी करणारे अधिकारी राहून राज्यकारभाराचें मुख्य केंद्र लंदन येथें गेलें. (६) सहावें युग सन १८०० पासून १८९३ पर्यंत धरण्यास हरकत नाहीं. या युगांत रोमन क्याथोलिक लोकांस न्याय मिळाला; त्यांना प्रॉटेस्टंट लोकांबरोबरीचे हक्क मिळून त्यांच्या पैशांतून प्रॉटेस्टंट धर्ममंडळ पोसलें जात होतें तें बंद झालें; क्याथोलिक कुळांना जमिनीची मालकी देण्याची चळवळ बरीच सिद्धीस जाऊन होमरूलचा प्रश्न इंग्रजी मुत्सद्यांनीं आपले, हातीं घेतला आणि होमरूल जरी मिळाला नाहीं तरी स्थानिक स्वराज्याचे भरपूर हक्क आयरिश लोकांस मिळाले व सांपत्तिक स्थिति सुधारण्यास सुरवात झाली. १८९३ पासून आयर्लंदच्या इतिहासाचें नवीन युग सुरू झालें असें मानण्यास हरकत नाहीं. या युगांत होमरूलचा प्रश्न फिरून उदयास येणार हें उघड आहे. व आयर्लंदास स्वराज्य मिळणार हें स्पष्ट दिसतें. परंतु तें कोणच्या प्रकारचें अगर नमुन्याचें मिळणार याबद्दल विशेषसा तर्क चालणें शक्य नाहीं. यावरील सहा युगांतरांस नांवें द्यावयाचीं तर आमच्यामतें अशीं देतां येतील. पहिलें क्रांतियुग; दुसरें कीर्तियुग; तिसरें कलहयुग, चवथें दास्ययुग; पांचवें उत्साहयुग; व सहावें आकांक्षा युग. अशा प्रकारची युगपरंपरा इतर कित्येक राष्ट्रांच्या इतिहासांत असलेली आढळून येईल. जुनें असलेलें ऐश्वर्य आपल्या हातानें घालविल्यावर फिरून नवें ऐश्वर्य मिळणें ही फार कष्टसाध्य गोष्ट असते, व तें मिळेपर्यंत युगेंच्या युगें ही कदाचित् जावीं लागतात.

**आयर्लंद व स्कॉटलंद यांची तुलना**—आयर्लंद हा जसा संयुक्त ब्रिटिश राष्ट्राचा एक घटक आहे त्याचप्रमाणें, स्कॉटलंद व वेल्स हीं दोन राष्ट्रेंही घटक होत. हीं दुसरीं दोन राष्ट्रेंही प्रथमतः आयर्लंदप्रमाणेंच स्वतंत्र होतीं; परंतु कालांतरानें इंग्लंदनें त्यांस जिंकून तीं आपल्या राज्यास जोडून घेतलीं. वेल्सप्रांत सन १२८४ सालीं इंग्लंदच्या राज्यास जोडण्यांत आला. व इंग्लंदच्या युवराजास 'प्रिन्स ऑफ वेल्स' अथवा 'वेल्सचा राजपुत्र' असें ह्मणण्याची चाल तेव्हांपासून पडली. स्कॉटलंद व इंग्लंद हीं दोन राष्ट्रें सन १६०३ सालीं एका राजाच्या अमलाखालीं आलीं; व नंतर शंभर वर्षांनीं ह्मणजे सन १७०७ सालीं दोन्ही राष्ट्रांच्या पार्लमेंट सभा दोन्ही राष्ट्रांतील लोकांच्या संमतीनें एक करण्यांत आल्या. एकापक्षीं स्कॉटलंद व वेल्स, व दुसरेपक्षीं आयर्लंद यांच्या स्थितींत एक लक्षांत ठेवण्यासारखा फरक आहे. स्कॉटलंदच्या व इंग्लंदच्या दरम्यान एका लहानशा नदीखेरीज इतर व्यत्यय कांहीं एक नाहीं. व वेल्सप्रांत तर इंग्लंदला अगदीं जोडलेला असाच आहे. त्यांचा मुलूख एकसारखा लागलेला असून दरम्यानची सरहद्द लष्करी मोहिमेस फारशी कठीण नाहीं. उलटपक्षीं आयर्लंद व इंग्लंद यांचे दरम्यान सत्तर मैलांचा समुद्र असून वाटेंत जहाजांस आश्रय देण्यासारखीं बंदरें वगैरे नाहींत. आणि जेव्हां केवळ वाऱ्याचे साहाय्यानें जहाजें चालत अशा काळीं हें अंतर व ही अशा प्रकारची सरहद्द लष्करी मोहिमेस फारच प्रतिकूळ होती असें मानण्यास हरकत नाहीं. असें असतांही आयर्लंदचें राष्ट्र स्कॉटलंद व वेल्स यांचे आधीं इंग्लिश लोकांस जिंकतां आलें. वेल्स व स्कॉटलंद जिंकतांच जेते व जित हे एकजीव झाले व त्यांचे दरम्यान बेबनाव राहिला नाहीं. याचें एक कारण इंग्रजाच्या राजकीय धोरणांतील अंतर हें असलें तरी या राष्ट्रांतील लोकांचा स्वभाव विशेष हेंही एक कारण आहे. हीं कारणें समजण्याकरितां हें राजकीय धोरणांतील अंतर व आयरिश लोकांचे गुणदोष यांचें थोडेंसें विवेचन करणें जरूर आहे. आयर्लंदप्रमाणें स्कॉटलंदचेंही प्रथम प्रथम इंग्लंदशीं हाडवैर होतें. व तेराव्या शतकाचे अखेरीस इंग्रजांनीं स्कॉटलंदवर ज्या स्वाऱ्या केल्या त्यांतही आयर्लंद-

प्रमाणेंच प्रकार झाले; परंतु इंग्रजी अंमल दोघांवर होऊनही खालील कारणांमुळें स्कॉटलंद व आयर्लंद यांच्या स्थितींत एकंदरीनें बराच फरक पडला. ( १ ) स्कॉटलंदचीं व इंग्लंदचीं युद्धें आयर्लंदपेक्षां लवकर थांबलीं. ( २ ) एलिजाबेथ राणी नंतर स्कॉटलंदचा राजाच इंग्लंदच्या गादीवर बसला, व अशा रीतीनें हीं दोन राष्ट्रें एकजीव झालीं. ( ३ ) अखेर अखेरच्या युद्धांत स्कॉच लोकांचीच इंग्रजांवर सरशी होऊं लागली यामुळें इंग्रजांचा स्कॉटलंदच्या अंतर्भागांत फारसा प्रवेश होऊं शकला नाहीं. ( ४ ) आयर्लंदांत इंग्रजांची सरशी होतांच धर्मवैर सुरूं झालें. स्कॉटलंदचे लोक प्रॉटेस्टंट किंवा प्रेसबिटेरेनियन पंथाचे असल्यामुळें त्यांच्यांत व इंग्रजांत धर्मवैर माजण्याचें कारण नव्हतें. ( ५ ) आयर्लंदांत इंग्रजांनीं क्याथोलिक लोकांच्या सर्व जमिनी काढून घेतल्या; स्कॉटलंद-मध्यें तसें झालें नाहीं. यामुळें भांडणाचें एक मुख्य कारण उपस्थितच झालें नाहीं. ( ६ ) एकंदरीनें पाहतां इंग्लंदचें स्कॉटलंदशीं कायदेकानू व शिक्षण या बाबतींतलें धोरण आयर्लंदपेक्षां फार निराळें व शहाणपणाचें होतें, कारण इंग्रजांस स्कॉच लोक हे आयरिश लोकांप्रमाणें रानटी वाटत नसत. तात्पर्य, नुसते राजकीय फेरबद्दल झाल्यानें लोकस्थितीवर फारसे परिणाम घडत नाहींत; परंतु धर्म अगर भौतिक संपत्ति यांचा नाश होण्यासारखी जर कां नवीन परिस्थिति असली तर तिचे परिणाम अगदीं वरिष्ठ अमीर उमरावापासून तों तहत खोपटींत राहणाऱ्या माणसापर्यंत सारखे भोंवतात, व ती नवीन राजकीय परिस्थिति अप्रिय होते. आयर्लंदांत सतराव्या शतकांत जें प्रचंड बंड झालें त्यास या अप्रिय परिस्थितीनें गांजलेल्या लोकांनींच सुरवात केली होती.

**आयरिश लोकांचे गुणदोष**—आयर्लंदांतील लोकांचे अंगीं पाहूं गेलें असतां पुष्कळ सद्गुण आहेत परंतु त्याचबरोबर पुष्कळ दुर्गुणही आहेत. बारावे शतकांत जेव्हां इंग्लिश लोकांनीं आयर्लंद जिंकलें त्या-वेळीं आयरिश लोक बहुतेक रानटी स्थितींत होते. धर्मोपदेशकांखेरीज इतरांचे अंगीं सुशिक्षणाच्या अनुषंगानें राहणारे असे कोणतेच गुण नव्हते. लढणें व लूटमार करणें हा त्या वेळच्या आयरिश लोकांचा आवडीचा धंदा. द्रव्योत्पादक असा दुसरा उद्योग त्यांस माहीतच

नव्हता असें ह्मटलें तरी चालेल. शेतकी करणें हें नामर्द व कमकुवत पुरुषांचें काम ह्मणून, जी काय थोडीबहुत शेतकी होती ती पोरेंटोरें व ह्मातारीं कोतारीं यांचेवरच सोंपविलेली असे. जो कोणी ह्मणून तरुण असेल व ज्यास हातांत हत्यार वागविण्याचें बळ असेल त्यानें लुटालूट, युद्ध व शिकार करून आपला चरितार्थ चालवावा व नांवलौकिक मिळवावा. आयरिश लोक शूर खरे, परंतु त्यांच्या शौर्याचा मुख्य उपयोग निरंतर फक्त अंतःकलह प्रदीप्त ठेवण्याकडेच झाला; राष्ट्राच्या शत्रूंस हटविण्याकडे अगर जेरीस आणण्याकडे फारसा झाला नाहीं. याचें कारण त्यांची आपआपसांत कधींही एकी झाली नाहीं हें होय. आयर्लंदांत अनेक शतकेंपर्यंत लोक टोळ्या टोळ्या करून राहत; व प्रत्येक टोळीचा मुख्य उद्योग ह्मटला ह्मणजे दुसऱ्या टोळीच्या मुलखांत शिरून सांपडेल तें धान्य, गुरेंढोरें व द्रव्य लुटून आणावयाचें हा असे. परंतु सर्व पुढें टोळ्यांस परिणामीं सारखाच नाशक असा शत्रू उत्पन्न झालेला दिसत असतांही त्यांस आपसांतील तंटे मिटवून एकी करण्याची सुबुद्धि होत नसे. आजकालही इंग्रजी लष्करांतील व आरमारांतील निमे अधिक प्रसिद्ध योद्धे व वीर आयरिश आहेत. तथापि त्यांचें युद्धकौशल्य व शौर्य आयरिश लोकांच्या 'शत्रूच्या शत्रूं' चा पाडाव करण्याकडेच खर्च होत आहे. आयरिश लोकांसारखे शिस्तीनें वागणारे शिपाई सर्व ब्रिटिश सैन्यांत सांपडावयाचे नाहींत असें लष्करी अधिकाऱ्यांचें मत आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं या शिस्तीचा फायदा त्यांचे राष्ट्रीय कार्यास कधीं फारसा मिळालेला नाहीं. स्वदेशांत लढत असतां आयरिश शिपाई शिस्तवार वागला असें बहुधा होणें नाहीं, परंतु इंग्रजी अधिकाऱ्याच्या हाताखालीं तो काम करूं लागला असतां जणूं काय त्या त्याच्या गुणाचा पूर्ण विकासच होतो. आयरिश लोकांचे आंगीं कवित्वशक्ति व सहृदयता उत्तम प्रतीची आहे; वीं लष्करी बाण्याचीं देशभक्तिप्रेरित सुस्वर कवनें व पोवाडे करावे व ह्मणावे असे आयरिश लोकांनींच. परंतु पराक्रमास अत्यंत उपकारी अशा या कवनांनीं व पोवाड्यांनीं जरी त्यांच्या स्वातंत्र्यप्रियतेचा अग्नि प्रदीप्त होऊन त्यापासून ज्वाळाही निघूं शकतात, तरी एकी नसल्यानें त्या ज्वाळांपासून पारतंत्र्याचें जूं दग्ध करण्याचें काम घडून येत नाहीं. धर्माचे दृष्टीनें पाहतां त्यांच्या

अंगीं तेजास्विता व करारीपणा पुष्कळ आहे. पण क्याथोलिक लोकांवर त्यांच्या धर्मगुरूंचें व धर्मोपदेशकांचें कांहीं विलक्षण प्रकारचें वजन असतें. क्याथोलिक पंथ प्रॉटेस्टंट पंथाच्या मानानें कमी सुधारलेला आहे. ह्मणजे त्याच्यामध्यें विधिनियमांचें बंड मोठें असून शब्दप्रामाण्यावर सर्व धर्माची इमारत उभारली गेलेली आहे. यामुळें धर्मोपदेशक व उपाध्ये यांच्या हातीं शिष्यवर्गाची शेंडी पुरी गेलेली असते. अर्थात् धार्मिक बाबतींत ते जी आज्ञा करतील अगर जो न्याय देतील तो त्यांच्या शिष्य-वर्गास बिनतक्रार मानावा लागतो, एवढेंच नव्हे तर सामाजिक व राजकीय बाबतींतही धर्मगुरूंच्या मतास फार मान मिळतो. क्याथोलिक पंथ थोडासा एककल्ली ही आहे. आणि त्या पंथाच्या लोकांत करारीपणा थोडा जास्त व सहिष्णुता थोडी कमी असते. यामुळें त्यांची विधर्मी लोकांशीं गांठ पडली, व व्यवहारप्रसंग आला ह्मणजे त्यांजकडून नागरिकत्वाचे दृष्टीनें सार्वजनिक हिताच्या अशा कामांत जितकें मिळतें घ्यावयास पाहिजे तितकें त्यांस मिळतें घेतां येत नाहीं. ते दैववादी असतात, पण उद्योगानें मनुष्याचें व्यक्तित्त्व जसें कसलें जातें व कमावतें, तसें केवळ दैववादानें व शब्दप्रामाण्य मानून परावलंबी बनल्यानें होत नाहीं. धार्मिक बाबतींत क्याथोलिक पंथाचा मुख्य दोष ह्मटला ह्मणजे वर सांगितलेलें विधिनियमांचें बंड होय. सामाजिक बाततींत अविवाहित राहण्याविषयीं त्यांच्या धर्माज्ञेचा जो पक्षपात दिसून येतो त्याचे परिणाम वाईट होतात. शिक्षणाचे बाबतींत श्रद्धेवर भिस्त फार असल्यामुळें शिक्षण पावलेल्याही लोकांत असावा तितका चौकसपणा व युक्तिवादप्रियता दिसून येत नाहीं, व शिक्षण एकांगीं होतें. उद्योगधंद्यासंबंधानें पाहतां अविवाहित राहण्याची पद्धति व शब्दप्रामाण्य हीं द्रव्योत्पादनाचे मूळ तत्त्वांस विरोधी आहेत, व एकंदर राजकीय दृष्ट्या पाहिलें तर क्याथोलिक लोकांच्या अंगीं प्रगमनशीलता बरीच कमी असते. प्रॉटेस्टंट धर्मामध्यें यांतील बहुतेक दोष निघून गेलेले आहेत, व युरोपाचे इतिहासांत प्रॉटे-स्टंट धर्माचा फैलावा झाल्यापासून राजकीय सुधारणा व द्रव्योत्पादक उद्योगधंदे यांचें पाऊल पुढें पडलेलें आहे. आयर्लंदांत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट या दोन्ही पंथांचे समाज जवळ जवळ राहिलेले असल्यामुळें वर

वर्णन केलेल्या या गुणदोषांची प्रचीती तेथें चांगलीच पहावयास सांपडते. क्याथोलिक लोकांवर बरेच दिवसपर्यंत जुलमी कायद्यांचा अंमल होता ही गोष्ट खरी; तथापि हे कायदे रद्द झाल्यानंतरच्या इतिहासावरूनही वरील भेद निश्चित होतो. क्याथोलिक लोक एकलकोंडे, करारी परंतु भांडखोर, असहिष्णु, दैववादी, अल्पसंतुष्ट, मनुष्याचे व्यक्तिगुणाचा विकास करूं न देणारे, अदूरदृष्टि व राजकीय बाबतींत अनुदार असे दिसून येतात. तेच प्रॉटेस्टंट लोक सुधारलेले, चौकस, साहसी, खुल्या दिलाचे, उत्साही, उद्योगी, महत्वाकांक्षी, राजकीय बाबतींत प्रगति, स्वातंत्र्य व समता यांचे चहाते व भोक्ते, उद्योग धंदे वाढवून पुष्कळ पैसा मिळवून पुष्कळ पैसा खर्च करणारे असे असतात. यामुळें आयर्लंदचा उत्तरभाग, ह्मणजे जेथें प्रॉटेस्टट लोकांची मुख्यतः वस्ती आहे, व दक्षिणभाग ह्मणजे जेथें क्याथोलिक लोकांची विशेष वस्ती आहे, या दोहोंच्या स्वरूपांत पुष्कळच तफावत दिसून येते. आयरिश लोक धार्मिक आहेत; पण धार्मिकपणांत धर्मभ्रमाचें मिश्रण बरेंच असल्यानें तामसी गुण दाबून टाकून सात्विक व राजस विकारांचें प्राबल्य स्थापित करण्याचें काम त्यांच्या धर्मबुद्धीकडून होऊं शकत नाहीं. त्यांच्या मनावर कोणत्याही गोष्टीचा ठसा त्वरित उमटतो; परंतु तो फार खोल उमटत नाहीं व फार वेळ टिकतही नाहीं, यामुळें त्यांचीं काव्यें व कला, ललित या दृष्टीनें फारच सुंदर असतात; परंतु त्यांमध्यें प्रौढी, भारदस्तपणा अगर विचाराची गहनता अशी फारशी नसते. त्यांची कल्पकता दांडगी असते, परंतु तिला गंभीर व दृढ अशा संकल्पाचें पाठबळ नसल्यानें तिच्या हातून टिकाऊ असें काम फारसें होत नाहीं. आयरिश लोकांइतके प्रेमळ, विनोदी, ख्यालीखुशालीचे भोक्ते, असे लोक इतरत्र क्वचितच पाहावयास मिळतात; परंतु त्याच गुणांबरोबर, अविचारीपणा, अदूरदर्शित्व वगैरे दोषांची सांगड पडल्यामुळें त्या गुणांचें फळ मिळावें तसें मिळूं शकत नाहीं.

वरील प्रकारच्या गुणदोषांनीं आयरिश लोक परकीयांच्या ताब्यांत जाण्यास जितकी मदत झाली तितकीच तो ताबा कायम राहण्यासही झाली. इंग्रज लोकांचें राज्य आयर्लंदवर झाल्यापासून आयरिश लोकांस आपलें स्वातंत्र्य मिळवून घेण्याचे अनेक प्रसंग मिळाले. परंतु त्या सर्व

प्रसंगीं त्यांच्या गुणापेक्षां दोषच अधिक प्रभावी झाले. कोणत्याही प्रसंगीं आपसांत पूर्ण एकी करून त्यांनीं परकीयांचा मार्ग दुरतिक्रम केला असें झालें नाहीं. इंग्रजांस आपलें वर्चस्व कायम राखण्याचे कामीं आयरिश लोकांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी वर्गाची प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष मदत झाली नाहीं असेंही कधीं झाले नाहीं. स्वातंत्र्य नष्ट होण्याचे अव्वल प्रसंगीं जितक्या एकदिलानें व जोरानें आयरिश लोकांनीं लढावयास पाहिजे होतें तितक्या जुटीनें व जोरानें ते लढले नाहींत. या बाबतींत, स्कॉच व वेल्श लोक आयरिश लोकांहून अल्पसंख्याक असतां व इंग्लंदला त्यांजबरोबर युद्ध चालू ठेवण्यास फारसे प्रयास पडण्यासारखे नसतां, त्या दोन्ही राष्ट्रांतील लोकांनीं आयरिश लोकांपेक्षां अधिक नेट धरला. आयरिश लोकांनीं परराष्ट्राचें जूं प्रथमतः केवळ आपसांतील तंट्यामुळें आपल्या मानेवर ठेवून घेतलें. हें जूं मानेवर बसण्याचे वेळीं, पुढील सर्व परिणाम लक्षांत न आल्यामुळें ह्मणा अगर परकीयांपेक्षां स्वकीयांचा द्वेषच आयरिश लोकांच्या मनांत अधिक प्रबळ होता ह्मणून ह्मणा, कसेंही असलें तरी हें परकीय अमलाचें जूं मानेवरून वेळींच फेंकून देण्यास लागणारें ऐक्यबल राष्ट्रामध्यें उत्पन्न झालें नाहीं. आतां आयर्लंदपेक्षां इंग्लंद अधिक मोठें व अधिक प्रबळ असल्यामुळें दिवसेंदिवस हें जूं अधिकाधिकच जड होऊं लागलें ही गोष्ट खरी. तथापि सात शतकांत केव्हांही आयरिश लोकांनीं एकदिलानें व पोक्त विचारानें एखादी योजना करून परकीयांचा अंमल झुगारून देण्याचा प्रयत्न केला असें दिसून आलें नाहीं. इंग्लंदांत शांतता नांदत असतां व राष्ट्रावर इतर कोणचेंही संकट नसतां आयरिश लोकांनीं एक जुटीनेंही केलेलें बंड सिद्धीस जाण्याचा संभव अर्थातच नव्हता. परंतु 'आपल्या शत्रूची होळी तीच आपली दिवाळी,' आपल्या शत्रूचें संकट तीच आपली उत्कृष्ट संधि, या न्यायानें जरी आयरिश लोक वागते तरी इंग्रजी अमलाचें जूं झुगारून देण्यास त्यांना पुष्कळसे प्रसंग मिळण्यासारखे होते. या सातशें वर्षांतील सर्वच काळ इंग्लंडास सुखाचा गेला असें नाहीं. या अवधींत इंग्लंडांत दोन तीन वेळां यादवी माजली, गादीबद्दल तंटे होऊन राजवंशाची उलथापालथ झाली, व राजक्रांत्या झाल्या. हे सर्व प्रसंग इंग्लंडास यातनेचे व

चिंतेचे गेल्यामुळें आयरिश लोकांस स्वातंत्र्य मिळण्यास चांगले उपयोगीं पडण्यासारखे होते. परंतु त्यांचा जशा रीतीनें त्यांनीं फायदा घ्यावयास पाहिजे होता तसा घेतला नाहीं हें उघड आहे. सातवा हेनरी गादीवर येण्यापूर्वी 'गुलाब झेंड्याचें झुंज' या नांवानें प्रसिद्ध असलेलें युद्ध इंग्लंदांत इतकीं वर्षं माजलें होतें कीं, त्या अवधींत देशांतील बहुतेक लढाऊ तरुणपिढी खर्ची पडून इंग्लिशराष्ट्र अगदीं निःसत्त्व व निर्वीर बनलें होतें. अशा वेळीं आयरिश लोकांनीं आपला हात चालविला असता तर चालला असता. परंतु यावेळीं आयर्लंदकडे पहावें तों स्वतः आयरिश लोकांतच यादवी माजलेली होती. सुमारें नव्वद आयरिश यादव, प्रत्येक आपल्या सातआठशें अनुयायांसह एकमेकाशीं झगडत होते. एखाद्या तरुण योद्ध्यास आपला हात तरवारीवर चांगला चालतो असें वाटल्यास त्यानें लगेच आपल्या भोंवतीं जमतील ते शेंपन्नास राऊत जमवावे, व त्यांसह एखाद्या लहानशा बेटावर अगर रानांतील डोंगरावर अथवा मैदानांत गढी बांधून मिळेल तितकी जमीन आंखून घेऊन आपल्यापुरता 'सवता सुभा' स्थापन करावा व चिमुकला राजा बनावें, अशी त्यावेळची आयर्लंदची स्थिति इतिहासकारांनीं वर्णन केलेली आहे. अशा वेळीं अर्थातच राष्ट्रीयत्त्वाच्या कल्पनेचा उदय कसा होणार? यापुढील प्रसंग ह्मटला ह्मणजे पहिल्या चार्लस राजाच्या कारकीर्दीत इंग्लंदांत घडून आलेल्या राज्यक्रांतीचा होय. राजा व पार्लमेंटचे पुढारी यांजमध्यें बेबनाव होऊन युद्धास प्रारंभ झाला त्यावेळीं आयर्लंदांतील लोकांनीं उचल केली ही गोष्ट खरी; परंतु ही उचल स्वदेशाचें स्वातंत्र्य मिळविण्याकरितां मुख्यतः झालेली नव्हती. निदान प्रमथ प्रथम जरी तशा प्रकारची कल्पना त्यांच्या डोक्यांत आली असली तरी पुढें ती टिकली नाहीं खास. चार्लस राजा रोमन क्याथोलिक पंथाचा स्वीकार करील तर त्यास आयर्लंदचा राजा करावें व त्याजकरितां लढावें असें ओनीलप्रभृति कांहीं आयरिश सरदारांनीं योजिलें होतें, व त्याप्रमाणें राजाच्यातर्फे बंडाचा झेंडा उभारला जाऊन क्याथोलिक लोकांनीं प्रॉटेस्टंट वसाहतवाल्यांची कत्तलही केली. परंतु राजाच्यातर्फे लढणारा इंग्लिश सरदार ऑरमॉंड यास आयरिश लोकांनीं योग्य मदत न केल्यामुळें लवकरच ऑलिव्हर क्रॉमवेलचा

आयर्लंदांत प्रवेश होऊन त्यानें आपली तरवार चालविली. यानंतर दुसऱ्या जेम्स राजास इंग्लिश लोकांनीं गादीवरून काढिलें, तोही प्रसंग आयरिश लोकांनीं आपला फायदा करून घेण्यासारखा होता. परंतु त्याही-वेळीं त्यांनीं करावी तशी उचल केली नाहीं. व लवकरच विलियम राजानें चपळाई करून आयरिश लोकांनीं पुन्हां तोंड वर काढूं नये अशी त्यांची स्थिति करून सोडली. यापुढें दिवसेंदिवस इंग्रजांचा आयर्लंदावरील अंमल अधिक बळकट होत चालला. इकडे इंग्लंदची सत्ता व लष्कर वाढलें; व दुसरीकडे आयरिश लोक अन्यायी कायद्याखालीं चिरडून जाऊन निर्धन व निःसत्व झाले. त्यांच्या जवळचीं हत्यारेंपात्यारें गेलीं, व शिवाय त्यांच्या उरावर प्रॉटेस्टंट लोकांच्या वाढत्या वसाहती बसल्यामुळें त्यांना कोणत्याही प्रकारची उचल करितां येईनाशी झाली. सर्व राष्ट्राकडून अशी उचल करणें अशक्य असतांही व्यक्तिशः राष्ट्रभक्तांनीं बंडाचा झेंडा उभारला नाहीं असें नाहीं; परंतु ह्या बंडांच्या हकीकतीवरूनही, आयरिश लोकांच्या हातून राष्ट्रीयत्वाच्या स्फूर्तीनें कितपत उद्योग होत होता हें दिसून येतें. वूल्फटोन व रॉबर्ट एमेट यांनीं केलेल्या बंडांत लोकांची मदत त्यांस व्हावी तितकी झाली नाहीं. हें पुढें दिलेल्या चरित्रमालिकेंतील त्यांच्या चरित्रांवरून दिसून येईलच. फीनिअन लोकांनीं केलेलीं बंडें याच कारणाकरितां व्यर्थ गेलीं. यावरून असें वाटतें कीं एकतर या पुढाऱ्यांना आपल्या आसपासची लोकस्थिति चांगली कळलेली नव्हती. अगर समाज तरी आयत्यावेळीं विश्वासघात करीत होता. व कसेंही मानिलें तरी, ती गोष्ट सुमारच ह्मणण्यास हरकत नाहीं. स्वतःच्या अज्ञानानें फशीं पडून अगर लोकांची स्थिति माहीत असतां केवळ उत्साहानें उत्पन्न होणाऱ्या आशेवर भिस्त ठेवून ज्या महानुभाव रणशूर आयरिश देशभक्तांनीं आपले प्राण खर्ची घातले, त्यांची स्वतःची योग्यता व देशभक्ति याबद्दल मतभेद होणें शक्य नाहीं. मित्र व शत्रू दोघांसही त्यांच्या स्वार्थत्यागबुद्धीचें कौतुकच वाटेल. परंतु एकंदर समाज अगर राष्ट्र या दृष्टीनें पाहतां त्यांच्या कर्तबगारीबद्दल फारसें अनुकूल मत होत नाहीं असेंच ह्मणावें लागेल. शिवाय, आयर्लंदांत रणशूर व देशभक्त लोक जितके निर्माण झाले त्याहून घरभेदे हरामखोर अधिक पैदा झाले. आणि एकदिलानें व पोक्त विचारानें कोण-

चीही योजना व्हावी ती न होतां, उलट जी काय कधीं योजना होई तिची बातमी शत्रुपक्षास तेव्हांच लागे, यामुळें ती फसे व लोकांचे गळ्याभोंवतालचा गळफास अधिकच दृढ होई. परंतु एकदां स्वातंत्र्य नष्ट झालें असें पक्कें ठरल्यावर, आपल्या जेत्यांशीं पुढील वागणूक जितक्या शहाणपणाची व मुत्सद्दीगिरीची ठेवावयास पाहिजे तितकी आयरिश लोकांनीं ठेवली नाहीं. आपलें स्वातंत्र्य नष्ट झालें तें फिरून नुसत्या युद्धानें परत मिळण्याचा फारसा संभव नाहीं असें स्कॉच व वेल्श लोकांस दिसून येतांच त्यांनीं इंग्रज लोकांशीं शहाणपणानें आवरतें व मिटतें घेतलें; आणि उभयपक्षांस मान्य व फायदेशीर अशी एकी कोणत्या उपायांनीं होईल इकडे त्यांनीं लक्ष दिलें. परंतु आयर्लंदानें तो मार्ग आजपर्यंत केव्हांही स्वीकारला नाहीं. आयर्लंदला युद्ध करून आपलें राष्ट्र स्वतंत्र राखतां आलें असतें तर त्याच्या सुखास व ऐश्वर्यास पारावार राहिला नसता; आयर्लंदची भौतिक परिस्थिति स्वातंत्र्यास अनुकूळ अशा प्रकारची असल्यामुळें आपलें स्वातंत्र्य राखून इंग्लंद किंवा फ्रान्स यासारख्या राष्ट्राशीं स्नेह संपादून त्यास आपला फायदा करून घेतां आला असता. परंतु स्वातंत्र्य प्रथम नष्ट होण्याचे प्रसंगीं जी उत्तम प्रकारची चिकाटी आयरिश लोकांनीं दाखवावयास पाहिजे ती तर त्यांनीं दाखविली नाहींच; परंतु तें नष्ट झाल्यावर, जी एक गौण प्रकारची चिकाटी अंगीं होती तिच्या योगानें पांचशें वर्षेपर्यंत मनःक्षोभ व असंतोष कायम धुमसत ठेऊन, त्यांनीं राष्ट्राचें मन व शरीर पिचवून घेतलें. वेल्श व स्कॉच लोकांनीं स्वातंत्र्य नष्ट झाल्यावर जी थोडीशी पड खाल्ली, तिच्या योगानें त्यांना इंग्लिश लोकांचे हक्क लवकरच मिळून कालांतरानें त्यांचा एकजीव होऊन गेला. आयरिश लोकांनीं तसें केलें नाहीं. एक तर त्यांचा धर्म रोमन क्याथोलिक असल्यामुळें त्यांचा व इंग्लिश लोकांचा एकजीव होण्याचे मार्गांत अधिक अडचण होतीच. तथापि आपसांत पूर्ण एकी करून अनुकूल परिस्थितींत डोकें वर काढण्याची तयारी न करितां त्यांनीं फक्त तुरळक व फुटकळ बंडें केलीं. व ज्यावेळीं बंडेंही उभारतां आलीं नाहींत अशावेळीं जाळपोळ, लूटमार व गुप्तवध वगैरे करून, देशांतील अस्वस्थता

व असंतोष आणि राज्यकर्त्यांचा क्रोध नेहमीं प्रदीप्त ठेवला, यामुळें त्यांस स्वातंत्र्य परत न मिळतां त्यांचे दुस्थितींत दुःखाचीच मात्र भर पडली.

आयरिश लोकांच्या अंगचे हे गुणदोष व त्यांचा हा पूर्वेतिहास या सर्व गोष्टींमुळें ते राजकारणप्रिय बनलेले आहेत. राजकारणासारखें दुसरें कांहींही त्यांस आवडत नाहीं. मद्यप्यास जसें मद्य, जुगाऱ्यास जशी जुगार, तसेंच आयरिश लोकांस राजकारण होऊन बसलें आहे. तें नसलें ह्मणजे काय करावें हें त्यांस सुचत नाहीं. व असे प्रसंग वरचेवर येतात. कारण आयरिश राजकारण ह्मणजे निवळ अडवणूक. परंतु या अडवणुकीस स्वाभाविकच अशा कांहीं मर्यादा आहेत. अडवणूक ही स्वदेशांत अगर पार्लमेंटमध्यें करावयाची. पैकीं पार्लमेंट सभेसंबधानें पाहतां खुद्द पार्नेलच्या वेळीं जितकी अडवणूक करणें शक्य होतें तितकें तें आतां राहिलें नाहीं. कारण पार्नेल व त्याचे सहकारी यांनीं पार्लमेंटच्या नियमांचा फायदा घेऊन जो धुमाकूळ घातला त्यानें जागी होऊन व त्यावरून बोध घेऊन, पार्लमेंट सभेनें आपल्या वादविवादाचे नियम पुष्कळच बदलून टाकले आहेत. व या नवीन नियमांमुळें कोणाही सभासदास कोणच्याही विषयावरील वाद बेसुमार वाढवितां येत नाहीं. हा वाद कोणी बेसुमार वाढविण्यास लागला कीं, सभेचा अध्यक्ष, सभेचें मत घेऊन अगर आपल्या अधिकारानुरूप, त्यास आळा घालितो. व याच्याही पलीकडे मजल नेणाऱ्या सभासदास पार्लमेंटच्या चोपदारांकडून उचलबांगडी करून बाहेर घालवितां येतें. पार्लमेंटमधील अडवणूक ह्मणजे अर्थात् बोलून बोलून कंटाळा आणणें. त्यास ही अशी आडकाठी आहे. अडवणुकीचा दुसरा मार्ग ह्मणजे बहिष्कार, अशास्त्र प्रतीकार किंवा राजरोस गुन्हा व दंडेली. परंतु एक तर या असल्या गोष्टींचा एक प्रकारचा मोसम किंवा हंगाम असतो, त्यावेळींच त्या गोष्टी घडतात. त्या वर्षांतून ३६५ दिवस अगदीं सारख्या टिकत नाहींत. हीं असलीं घोर व वाईट कृत्यें सरकारी अधिकाऱ्यांच्या विवक्षित कायद्याचा वीट व राग येऊन होतात, पण हे कायदे प्रत्येक दिवसास नवे नवे होत नाहींत. आपल्या बाकीच्या सर्व व्यवसायांवर पाणी सोडून, स्वार्थत्याग करून, सरकारच्या कृत्यांचा केवळ गवगवा व्हावा येवढ्याकरितां वरील प्रकार करावयाचे; परंतु केवळ असा गवगवा व्हावा याकरितां आ-

पल्या संसारावर अंगार ठेवणारीं माणसें स्वाभाविकपणेंच थोडीं सांपडतात. दुसरें असें कीं शिक्षण व संस्कृति जितकी अधिक तितका तामसीपणा कमी. वरील प्रकार आयर्लंदांत शेतकरी वगैरे आडदांड कनिष्ठ प्रकारचे लोकच प्रत्यक्ष करीत आले होते. परंतु गेल्या दहापांच वर्षांत इंग्रज लोकांचें आयर्लंदच्या कारभाराचें धोरण बदललेलें आहे, ह्मणजे विशेषतः शेतकऱ्यांस सुखाचें व सोईचें असें तें धोरण झालें आहे. यामुळें शेतकरी वर्गाचे मनांतील असंतोष थोडासा कमी होऊन या दुसऱ्या प्रकारची आडवणूक मंदावली आहे. हल्लींचा हा प्रसंग केवळ होमरूलवर भिस्त ठेऊन इतर कांहीं न करणाऱ्या राजकारण व्यसनी अशा आयरिश पुढाऱ्यास काय करावें हें न सुचण्यासारखा आहे. व यामुळें या घटकेस ‘ राजकारण ’ थोडेंसें मंदावलें आहे. पण कदाचित् फिरून उद्यां कांहीं एखादी अशी नवीन गोष्ट घडून येईल कीं, राजकारणाची चळवळ सुरूं होईल. या कामीं आयरिश लोकांचें चित्त फार चंचळ आहे. तें केव्हां व कसें प्रदीप्त होतें याचा नियम नाहीं.

आयरिश लोक राजकारणप्रिय होण्यास कारणीभूत असा दुसरा एक दोष ह्मटला ह्मणजे त्यांचा पक्षाभिमान हा होय. उदाहरणार्थ, ज्या कुळांत अगर घराण्यांत ते जन्मले असतील त्याचा अभिमान ते प्राण गेल्यास सोडावयाचे नाहींत; व दुसरें घराणें कितीही चांगलें असलें तरी हीं दोन घराणीं एक व्हावीं असें त्यांचे मनांत कधींही यावयाचें नाहीं. यामुळें त्यांच्या अभिमानास पुष्कळ वेळां दुरभिमान हें नांव यथार्थतेनें लावावें लागतें. जें घराण्यास लागू तेंच पक्षास. एकदां पक्षाचा पुढारी ह्मटला ह्मणजे मग त्याच्यामागें मेंढरासारखे जातील व त्याजकरितां जीवही देतील. पण पुढाऱ्याचें ह्मणणें चुकीचें असेल अथवा त्याच्या मताविरुद्ध आपलें मत असलें तर तें स्पष्टपणें बोलून दाखवून त्याचें समर्थन करणें हा गुण त्यांचे अंगीं नाहीं. यामुळें वारकरी पंथाप्रमाणें त्यांच्या राजकीय पक्षाची स्थिति होते. पुढाऱ्यासही स्वतःचें मत खरें अगर खोटें हें तपासून पडताळून पहाण्याची बुद्धि होत नाहीं व कारण पडत नाहीं' तो बोलेल तो कायदा अशी अनुयायांची वागणूक असल्यानें त्याला अहंकाराचा मोह सहजच पडतो. नेता व अनुयायी यांचा हा असा मेळ

पडल्यानें सर्व गोष्टींत ठराविक धोरणानें कामें चालतात असें जरी दिसलें तरी वस्तुतः फारशी प्रगति होत नाहीं. कारण खरी प्रगति होण्यास विचारस्वातंत्र्य अवश्य पाहिजे. व तें आयरिश लोकांत कमी आहे. त्यांच्या राज्यकारणासंबंधानें दुसरीही अशी एक गोष्ट आहे कीं त्यांची टीका बहुधा प्रध्वंसनपर असते. परंतु या बाबतींत सर्व दोष त्यांचाच आहे असें मात्र ह्मणतां येणार नाहीं. ज्या पक्षास निरंतर दोष काढण्याखेरीज राज्यकारभारांत दुसरें कांहीं ही सरकारानें शिल्लक ठेवलें नाहीं त्यांनां घटनात्मक तरी टीका कशी करितां येणार? व उलटपक्षीं आयरिश लोक स्वतः फक्त होमरूलचें कष्टसाध्य असें 'ध्येय' डोळ्यांपुढें धरून बसल्यानें व कोणचीही नवीन घटना करावयाची जबाबदारी व अधिकार सर्व इंग्रज मंत्रिमंडळाकडेच असल्यानें आयरिश लोकांनीं संघटनेचे कागदी घोडे तरी नाचवून काय उपयोग ? इंग्रजी अधिकाऱ्यांनीं हें हवें कां तें हवें कां, असें भलत्या भलत्या गोष्टींबद्दल विचारीत बसावें; व आयरिश लोकांनीं एक 'नकोचा' मंत्र पाठ करून त्यापैकीं प्रत्येक गोष्टीस हरकत घ्यावी व तिचे दोष दाखवावे असें आज कितीक वर्षें तरी चाललें आहे. आपल्यामध्यें सासवासुनांची एक मजेदार गोष्ट हरदास सांगत असतात. सासू विधवा होऊन अंधारांत जाऊन बसली, तेव्हां पूर्वीच्या जाचाचा वचपा काढण्याकरितां सुनेनें एक खाशी युक्ति योजली. सासुबाई जवळ हळूच जाऊन 'कुंकूं हवें कां ? बांगड्या हव्या कां ?' असे प्रश्न सौभाग्यालंकाराच्या प्रत्येक जिनसाबद्दल सुनेनें विचारावे. व सासूनें चिडून जाऊन 'मेल्ये नकोग' असें ओरडून व जळफळून ह्मणावें. व मग सुनेनें कांगावा करून लोकांस ह्मणावें 'पहा कीं हो मीं सतरा जिन्नसांबद्दल हवें कां हवें कां असें विचारतें, पण यांचें आपलें एकच उत्तर, नको ह्मणतात आणि जळफळाट करतात.' आयर्लंद व इंग्लंद यांमधील संबंध जरी आयर्लंद सून व सासुरवास करणार इंग्लंद असा असला तरी, युक्ति तीच. आयर्लंदास होमरूल पाहिजे; तो देण्याचें सोडून कुठें म्युनिसिपालिट्याच हव्या कां कुठें अधिकार विभागणीच हवी कां असें कितीही विचारलें तरी, आयर्लंद नको नको ह्मणणार व चरफडणार. हा चरफडाट

सहसा लवकर थांबावयाचा नाहीं. तो थांबावयास एक तर होमरूल मिळाला पाहिजे किंवा आयरिश लोकांचा देहस्वभाव तरी बदलला पाहिजे.

**असंतोषाचें मर्म**—आयरिश लोकांचीं पाचशें वर्षें दास्यांत व दोन अडीचशें वर्षें चळवळींत गेलीं.तथापि नष्ट झालेलें राष्ट्रीयत्व फिरून मिळविण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा अजून गेली नाहीं; एवढेंच नव्हे,तर ती अद्यापि चांगलीच जागृत आहे. अशा तऱ्हेची महत्त्वाकांक्षा आयरिश(सेल्ट)रक्तांतच असली पाहिजे.कारण खुद्द आयर्लंदांत राहणाऱ्या लोकांच्या मनांतच नव्हे तर, आज शेंकडों वर्षें जे परदेशांत जाऊन घरें करून राहिले व ज्यांचा आयर्लंदाशीं अर्थाअर्थीं कांहीं एक संबंध उरला नाहीं अशा आयरिश वंशांतील लोकांचेही मनांत, राष्ट्रीय स्वातंत्र्याची कल्पना अद्यापि राहून राहून डोकावते, ती एरवीं डोकावतीना. ही कल्पना कितपत साध्य आहे याची ते चौकशी करीत बसत नाहींत. हिंदु लोक जसे कलंकी अवतार होणार असें मानतात, तसेंच आयरिश लोक—मग ते जगाच्या पाठीवर कोठेंही असोत—आयर्लंदच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा दिवस उगवावयाचा आहे हा भरंवसा धरून पदरास गांठ मारून बसलेले आहेत. सतराव्या व आठराव्या शतकांत प्रॉटेस्टंट अमलानें गांजून लाखो लोक इंग्लंदास शिव्याशाप देत देत स्वदेश सोडून मोठ्या कष्टानें व नाइलाज ह्मणून परदेशीं गेले. स्वदेश सोडून अशा रीतीनें आयर्लंदांतून जितके लोक आजपर्यंत परदेशीं गेले तितके इतर कोणत्याही देशांतून कोणत्याही काळीं व कोणत्याही कारणाकरितां गेले नाहींत. परदेशांत गेल्यावर तेथें त्यांना स्वदेशाहून अधिक सुख झालें, त्यांनीं कायमच्या वसाहती केल्या, घरेंदारें थाटलीं, उद्योगधंदे आरंभले व पैसाअडका मिळविला. इतकें झाल्यावर मग स्वदेश तरी आणखी अधिक सुख तें काय देणार? देशोधडीस लागलेले आयरिश लोक मुख्यतः फ्रान्स व अमेरिका येथें गेले, व तेथील राष्ट्रचरित्रांत त्यांनीं आपण मागें नांव ठेवण्यासारखीं कृत्यें केलीं व लौकिक मिळविला. अर्थात् या नवीन भूमीवर त्यांचें प्रेम बसलें. तथापि, दत्तक दिलेल्या मुलाला नव्या घरीं कितीही संपत्ति व ऐषआराम उपभोगण्यास सांपडला तरी आपल्या पहिल्या घरावर त्याची प्रेमदृष्टि राहतेच; व विशेषतः या पहिल्या घरीं जनक आईबाप व भावंडें द्रारिद्यांत

अगर विपत्तींत दिवस काढीत असलीं तरी तीच प्रेमदृष्टि पालवून त्यांस हातभार लावावा असें त्याच्या मनांत सहजच येतें. परदेशांत राहणाऱ्या आयरिश लोकांची हीच स्थिति आहे. आपल्या वाडवडिलांच्या जन्मभूमीची त्यांची आठवण अद्यापि धड आहे. तेथील आपल्या देशबांधवांचा ते अद्यापि चांगला परामर्ष घेतात; सर्व तऱ्हेच्या राष्ट्रीय चळवळींस द्रव्याची उत्कृष्ट मदत करितात; होमरूलसारखी चळवळ सुरू झाली ह्मणजे तिज-वरील चर्चा, स्वतःचें प्रत्यक्ष हिताहित तिजमध्यें असावें याप्रमाणें, कान लावून ऐकतात; व आज नाहीं तर उद्यां, उद्यां नाहीं तर परवां, परवां नाहीं तर शंभर वर्षांनीं, आयर्लंद अनायासानें राष्ट्र बनलें तर ठीकच आहे, परंतु तसें नच झालें व आयर्लंदला लढाई करावी लागली तर आपले नातू पणतू खापरपणतू कोणी तरी आयरिश लोकांच्या मदतीला धांवून जातील असा त्यांना उत्साह व भरंवसा आहे. सन १७९८ च्या बंडाचे वेळीं फ्रान्समधील आयरिश लोक वूल्फटोनच्या साहाय्यास आले होते; व एकोणिसाव्या शतकांत फीनिअन लोकांनीं जी राज्यक्रांतीची खटपट केली तिचा उगम व पाठपुरावा सर्व अमेरिकेंतील आयरिश लोकांकडूनच झाला ही गोष्ट मागें सांगितलीच आहे. आज मित्तीस होमरूलचा पुढारी जॉन रेडमंड हा बहुधा दर वर्षी अमेरिकेंत एक खेप करितो; व येतांना राष्ट्रीय पक्षाच्या फंडाला ‘अमेरिकन आयरिश’ लोकांनीं स्वसंतोषानें दिलेल्या वर्गणीची हजारों पौंडांची रक्कम खिशांत घालून परत येतो.

आयरिश लोकांचे मनांतील राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा व इंग्रज लोकांशीं जडलेल्या त्यांच्या वैराचा असा हा कार्यकारणसंबंध असल्यामुळें, जर ही कल्पना कधीं काळीं नाहींशी व्हावयाची असेल तर हा वैरभाव आधीं नाहींसा झाला पाहिजे; व हा वैरभाव नाहींसा होण्यास इंग्रज लोकांनीं आयरिश लोकांस इतक्या उदार बुद्धीनें वागविलें पाहिजे कीं, कृतज्ञतेचें दडपण वैरभावावर पडेल; व झाल्या गेल्या गोष्टी विसरून जाण्यास ते तयार होतील. आणि या झाल्या गेल्या गोष्टी कांहीं आजकालच्या नाहींत. त्यांचीं खातीं, या उभय राष्ट्रांच्या इतिहासाचे वहींत पांच शतकांपूर्वीच सुरू झालीं असून, तंटा मिटविण्याचे हेतूनें त्या खात्यांची रुजवात

घेण्यास नुकती अलीकडे कोठें सुरुवात झालेली आहे; व ही जुन्या खात्यांची रुजवात चालली असतां देण्याघेण्याचा नवीन व्यवहार अगदींच थांबला आहे असेंही नाहीं. सन १८०० शेंपर्यंत इंग्लंदचा आयर्लंदांतील राज्य-कारभार अत्यंत अन्यायाचा व जुलमाचा झाला, ही गोष्ट सर्व पक्षांचे इंग्लंदांतील लोक हल्लीं कबूल करूं लागले आहेत. १८०० सालीं आयरिश पार्लमेंटसभा निंद्य मार्गांचें अवलंबन करून इंग्रजी मुत्सद्यांनीं मोडली या नवीन अन्यायाची जुन्या अन्यायास भरच पडली. बरें, येथपर्यंत जम-लेल्या अन्यायाची झडती पुढें तरी उदारतेनें व्हावी ह्मटलें, तर तें एकाच बाजूस राहून दोन पार्लमेंटसभा एकत्र झाल्यापासून आयर्लंदचें फायद्या-पेक्षां नुकसानच अधिक झालें, अशी आयरिश लोक एकसारखी शंभर वर्षे तक्रार करीत आले आहेत. अशा स्थितींत जुन्या खातेबाकीची फेड होऊन उभयपक्षीं संमत असा नवीन संबंध सुरू होण्यास इंग्लंदनें आपल्या उदारपणाची कमालच केली पाहिजे तर हें होणार ! तोंपर्यंत हा वैरभाव कमी होण्याचा फारसा संभव नाहीं. आजपर्यंत आयर्लंदांत ज्या प्रकारची राजकीय चळवळ झालेली आहे त्याच्या मुळाशीं मुख्यतः हा वैरभावच जाचतो आहे असें दिसतें. आपल्या प्रत्येक चळवळीनें इंग्लंदचें प्रत्यक्ष असें फारसें नुकसान होईल अगर आपणा स्वतःस प्रत्यक्ष असा पुष्कळ फायदा होईल असें आयरिश लोकांस वाटण्याइतके ते बुद्धिमंद खास नाहींत. पण अस्सल दावेदार मरतांना सुद्धां निदान लाथ झाडून आपल्या शत्रूस जखमी करील, व तो जखमी झाला असें त्यास कळलें तर तो सुखानें मरेल, हा मनुष्यस्वभाव आहे. तसेंच कालिदासानें रघुवंशांत ह्मटल्याप्रमाणें:—

> ' अमर्षणः शोणितकांक्षया किं
> पदा स्पृशंतं दशति द्विजिव्हः ? '

साप मनुष्यास चावतो तो रक्त पिण्याकरितां नव्हे, तर आपल्या शेप-टीवर पाय देणाऱ्या शत्रूस अपकार घडावा ह्मणून. इंग्लंदचा पाय आयर्लंदच्या नुसत्या शेपटीवर पडून थांबला आहे असें नाहीं, तर त्या पायां-तील बुटाच्या टाचेनें त्याच्या डोक्याचीं शकलें होऊन आंगही रक्तबंबाळ झालेलें आहे. तेव्हां आयरिश लोक मनांत द्वेषानें कां जळत असावे हें

उघडच आहे. कित्येक इंग्रज ग्रंथकार मानभावीपणानें असें ह्मणतात कीं, झाल्या गोष्टी त्या झाल्या. त्या आयरिश लोकांनीं आतां आठवून उपयोग काय ? 'तूं पूर्वी असें केलेंस तेव्हां मीं आतां असें करणार' अशा उखाळ्यापाखाळ्या त्यांनीं काढाव्या व एकमेकांस दुःखच कां देत बसावें? परंतु हें ह्मणणें व्यर्थ आहे. राष्ट्रास व्यक्तीसारखींच स्मृति, जीव व आत्मा हीं असतात. जसें अनेक इंद्रियें मिळून मनुष्यव्यक्ति होते तसेंच अनेक मनुष्यव्यक्ती मिळून राष्ट्र बनतें. तेव्हां आयर्लंदास पूर्वींच्या गोष्टी आठवून त्याच्या वर्तनावर त्यांचा परिणाम व्हावा हें साहजिकच आहे. दुसरें असें कीं, आयरिश लोक ज्या गोष्टी आठवतात त्या कांहीं तशा फारशा जुन्या नाहींत. आयरिश साधू सेंट पॅट्रिक व इंग्रज साधू सेंट जॉर्ज यांच्यामधील पौराणिक काळांतलि काल्पनिक भांडण उकरून काढून थोडेंच आयरिश लोक भांडत आहेत ! मूळ तंट्यांतील कारणांचे उत्पत्तिस्थान जरी त्यांस आज डोळ्यांनीं दिसत नाहीं तरी त्या कारणांचीं कार्यें अद्यापि ते भोगीत आहेतच कीं नाहीं ? क्याथोलिक लोकांविरुद्ध अन्यायाचे कायदे करणारे इंग्रजी राजे व त्या कायद्यांचा छळ सोसलेले लोक शेंकडों वर्षांपूर्वी जमिनींत पुरून जाऊन त्यांच्या जड शरीरांच्या मृत्पिंडावर मेजवानी झोडणाऱ्या कृमिकीटकांनीं 'चट्टामट्टा' करून आजमितीस हातही झाडून टाकले असतील. परंतु शेंकडों वर्षें अन्यायाच्या वरवंट्याखालीं ठेंचलेल्या क्याथोलिक समाजाच्या जखमा अद्यापि वाहत आहेत, व त्यांचीं हाडें अद्यापि ठणकत आहेत, त्याची वाट काय करावयाची ? आयरिश व्यापाऱ्यांचे हातपाय मोडण्याकरितां जे कायदे सतराव्या शतकांत करण्यांत आले त्यांचे कर्ते भुईंत केव्हांच गाडून गेले. एवढेंच नव्हे तर ते कायदेही आजमितीस रद्द झाले आहेत; व अनियंत्रित व्यापाराच्या तत्त्वाचा टेंभा इंग्लंद मिरवीत आहे हें खरें. तथापि अनियंत्रित व्यापाराचा फायदा कोणाला ? ज्याचे हातपाय पहिल्यापासून धड आहेत त्याला ! पण एखाद्याला जन्मापासून तो तरुण होईपर्यंत निगडबद्ध करून अंधारांत ठेवून नंतर एखाद्या दिवशीं त्यास बाहेर काढून 'उघड मैदानांत शर्यतीस मजबरोबर धांव व तुझ्यानें न धांववलें तर त्याला मीं काय करूं' असें ह्मणणें काय, व इंग्लंदनें आयर्लंदास 'आतां तूं खुशाल व्यापार धंदा

कर व माझ्या इतका श्रीमान हो, न झालास तर दोष तुझा; तुझ्यावरची कराची वांटणी मात्र कमी होणार नाहीं ' असें ह्मणणें काय, दोन्ही सारखींच होत. अर्थात् आयर्लंदनें व्यापाराचे कायदे कसे विसरावे ? तीच गोष्ट पार्लमेंट सभेबद्दलची. आयर्लंदची स्वतंत्र सभा मोडून एकशें नऊ वर्षें होऊन गेलीं तथापि आयरिश संख्येच्या मानानें अल्पप्रमाण असे फक्त शंभर सभासद ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आयर्लंदला निवडून देतां येतात; या शंभरांतही फूटाफूट राहतेच; व शेवटीं राष्ट्रीय पक्षाचे असें फक्त पन्नास साठ सभासद काय ते, आपल्या हातून बहुमतापुढें कांहीं होणें शक्य नाहीं अशी खात्री झाल्यानें सुतक्यासारखे एक बाजूस बसून राहतात; ही गोष्ट आजच्या अनुभवाची असतां, आयरिश लोकांनीं आपल्या स्वतंत्र अशा जुन्या पार्लमेंटच्या वैभवास कसें विसरावें ? पण या सर्वांस एक उपाय आहे. या सर्व गोष्टींचें आयरिश लोकांस विस्मरण व्हावें इतक्या सढळतेनें व ममतेनें त्यांस वागविण्याइतका उदारपणा जेव्हां इंग्रज लोकांच्या हृदयांत येईल तेव्हांच हा वैरभाव लोपेल; व राष्ट्रीयत्वाची कल्पना दिवसेंदिवस अंधुक होत जाऊन आयरिश लोकांस इंग्रज व आपण एकाच देहाचे अवयव आहों अशी भावना उत्पन्न होईल; तों पर्यंत हा द्वेषाग्नी असाच धुमसत राहणार; व कृपण बापाला आजारी पडलेला पाहून उधळ्या मुलास ज्याप्रमाणें आनंद वाटतो त्याप्रमाणें इंग्लंदवर आत्मस्थ अगर परस्थ असें संकट वेळोवेळीं आलेलें पाहून आयर्लंदास आनंद वाटवा, व राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळण्याच्या आशेनें त्यानें हातपाय झाडण्यास सुरुवात करावी हें असेंच चालावयाचें. मग अखेर इंग्लंद हरो वा आयर्लंद हरो!

आयर्लंद जिंकल्यापासून आजपर्यंत इंग्लंदनें तेथें नुसता ' करनकऱ्याचा वसा' चालविला आहे, ह्मणजे आयरिश लोक करा ह्मणतील तें करावयाचें नाहीं, मागतील तें सुखानें द्यावयाचें नाहीं व नको ह्मणतील ते त्यांजत्यांजवर बळजबरीनें लादावयाचें हें मागें सांगितलेंच आहे. व हें सर्व मुख्यतः आयर्लंदांत जाऊन राहिलेल्या मूठभर प्रॉटेस्टंट लोकांकरितां. आयरिश लोक धर्मस्वातंत्र्य व स्वतंत्र पार्लमेंट इतक्या गोष्टी मागत होते; त्या त्यांस न देतां, त्यांना डोळ्यापुढेंही नको असें विधर्मी मंडळ व

विधर्मी शिक्षणपद्धती त्यांच्याच पैशावर चालवून, त्यांना क्षणोक्षणीं जाचणारी अशी जमीनदारीची पद्धति शेंकडो वर्षे त्यांचे डोक्यावर लादण्यांत आली होती. इंग्रज लोकांनीं आयर्लंदांत पाय घातल्यापासून पहिलीं शेंदोनशें वर्षे त्यांची जी वागणूक झाली तिजबद्दल त्यांस कदाचित् फारसें नांव ठेवतां येणार नाहीं. कारण आयरिश लोकही त्यांच्याशीं आडदांडपणानेंच वागत होते. हीं पहिलीं शेंदोनशें वर्षे इंग्रजी अंमल आयर्लंदांत पुरा बसण्यांतच गेली, व अंमल बसविण्याचा काल उभयपक्षांस कोणत्याही देशांत त्रासदायक असाच जातो. हातीं आलेला देश इंग्रजांनीं सोडून द्यावयास पाहिजे होता, असें कोणीही समंजस मनुष्य ह्मणणार नाहीं. व तो राखावयाचा तर त्यावर पूर्ण अंमल बसविणेंही जरूर होतें. अंमल गाजविण्यास तरवार उपसून बसावें लागतें, ती इंग्रजांनीं कायमची उपसून ठेविली होती; व आयरिश लोक स्वातंत्र्य गमावण्यास तयार नसल्यानें त्यांनींही प्रथम इंग्रजांस त्रास देण्याची शिकस्त केली. परंतु १६४१ त या वादाचा निकाल कायमचा लागला. यापुढें आयर्लंद आपल्या हातचें जाईल अशी भीति बाळगण्यास इंग्रजांस कारण राहिलें नाहीं. असें असतां त्यांस जितक्या सदयतेनें वागविण्यास पाहिजे होतें तितक्या सदयतेनें त्यांनीं वागविलें नाहीं, येवढेंच नव्हे तर या काळांत सुधारणेच्या नांवास काळिमा आणणारे असे कायदे चालू करून त्यांच्या चरकांत आयरिश लोकांचें राष्ट्रीयत्व चिरडून टाकण्याचा इंग्रजांनीं प्रयत्न केला; व अठराव्या शतकांत इंग्लंदसारख्या राष्ट्राचे अमलाखालीं असतां आयरिश लोक दरिद्री हीन दीन व जवळजवळ कंगाल बनण्याचे बेतांत आले, ही गोष्ट वाईट झाली, हें खुद्द इंग्रजांसही प्रांजलपणें कबूल करावें लागेल.

सन १७७८ सालापासून वारा उलट वाहूं लागला खरा; परंतु यापुढेंही इंग्रजांनीं दिलें तें मोठ्या कष्टानें दिलें. हौसेनें व स्वतः होऊन असें फार थोडें दिलें. चळवळीची शिकस्त होऊन प्रकरण अगदीं हातघाईवर यावें तेव्हां आयरिश लोकांची मागणी इंग्रजी मुत्सद्यांनीं कबूल करावी, असेंच पुष्कळ वेळां घडून आलें. १७७८ सालीं, क्याथोलिक लोकांस जमीन मालकी हक्कानें वापरतां येत नव्हती ती वापरतां येऊं लागली; परंतु

हें साल इंग्लंदास अमेरिकेंतील गडबडीमुळें चिंतेचें गेलें होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. साराटोगा येथें इंग्रजी सैन्याचा पराभव झाल्यानंतर इकडे आयर्लंदांत क्याथोलिक लोकांवरील कायदे ढिले होण्यास सुरुवात झाली. १७८२ सालीं आयरिश-पार्लमेंट स्वतंत्र आहे अशी कबुली ब्रिटिश पार्लमेंटनें दिली; परंतु त्यापूर्वी आयरिश राष्ट्रीय स्वयंसेवकांचें सैन्य कवाईत शिकून तयार झालें होतें, व त्यांनीं कायदेशीर रीतीनें कां होईना आपली कर्तबगारी व ओजस्विता निरनिराळ्या मार्गांनीं दाखविली होती. १७९३ सालीं क्याथोलिक लोकांस म्युनिसिपालिट्यांचे निवडणुकींत मत देण्याचा हक्क मिळाला. परंतु त्यापूर्वी जॉन कीओघ व वूल्फटोन या उभयतांनीं चळवळ करून, इंग्लंदास 'डेप्युटेशन' नेऊन, देश हालवून सोडला होता व अलस्टरप्रांतांतील खुद्द प्रॉटेस्टंट लोकांनींही डोळे वटारले होते. १८२९ सालीं क्याथोलिक लोकांस पूर्ण स्वातंत्र्य मिळालें खरें, परंतु त्याच्यापूर्वी आयर्लंदची स्थिति कशी होती हें त्या वेळचा मुख्य प्रधान सर रॉबर्ट पील यानें लिमरिक येथील धर्माध्यक्षास एके प्रसंगीं जें एक पत्र लिहिलेलें आहे त्यावरून चांगली व्यक्त होते. तो ह्मणतो:—“ हल्लीं इंग्लंदचें व कोणत्याही परराष्ट्राचें भांडण नाहीं. यामुळें आयर्लंदमध्यें शांतता राखण्याकरितां इंग्लंदच्या एकंदर सैन्यापैकीं पांचषष्ठांश इतकें सैन्य आज सहा महिनेपर्यंत आह्मांस ठेवतां आलें ही गोष्ट निराळी. परंतु प्रत्यक्ष बंडापेक्षां ही स्थिति कितपत चांगली अशी ह्मणतां येईल ? मी तर ती अधिक वाईट ह्मणतों. व शांततेच्या वेळची जर ही स्थिति तर युद्ध सुरू असतां काय होईल याची कल्पना आपणच मेहेरबानगीनें करा ! इंग्लंदांतील लोकांच्या खर्चानें पोसलेल्या सैन्यापैकीं निम्मा भाग जर आयर्लंदांत ठेवावा लागला तर तें त्यांस कसें पसंत पडेल ? १७८२ व १७९३ सालीं काय प्रकार होता हें आपणांस कसें विसरतां येईल ? ‘त्यावेळीं आयरिश लोकांच्या मागण्या इंग्लंदनें कबूल केल्या हीच मूळ चूक झाली’ असें आपण ह्मणाल खरें. परंतु आपण ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, त्या देणग्या सुखासुखी दिल्या असें थोडेच आहे ! त्या न दिल्यामुळें पूर्वींहून अधिक भयप्रद अशीं जीं संकटें राष्ट्रावर ओढवणार होतीं तीं वांचविण्याकरितांच त्या दिल्या ना !”

लॉर्ड मेलबोर्न याच्या कारकीर्दीत आयर्लंदास थॉमस ड्रमंडसारखा मुख्य सेक्रेटरी लाभून बरे दिवस आले होते. या थोड्याशा काळांत, केवळ न्यायबुद्धीमुळें इंग्रजी मुत्सद्दी प्रजेस न्याय देत आहेत, असें आयरिश लोकांस वाटू लागलें; व त्यावेळीं ओकॉनेल यानेंही मुत्सद्दीपणा दाखवून चळवळीचा भर कमी करून अधिकाऱ्यांस चिंता न राहील असें धोरण ठेवलें, आणि लिमरिकच्या तहानें आयरिश क्याथोलिक लोकांस जे हक्क खरोखर मिळावयास पाहिजे होते ते त्यांस यावेळीं ह्मणजे सुमारें १२५ वर्षांनीं मिळाले. परंतु लॉर्ड मेलबोर्न यास इंग्लंदांतील लोकांकडून फार त्रास झाला; व त्याच्या मनाप्रमाणें आयरिश लोकांचें कल्याण त्यास करतां आलें नाहीं तें नाहींच. लॉर्ड मेलबोर्न व थॉमस ड्रमंड यांचे मताप्रमाणें जर गोष्टी घडून येत्या व १८३५-४१ या सहा सालांत ओकॉनेल यानें, स्वतः थोडीबहुत अप्रियता सोसूनही, चळवळीची जी योग्य दिशा ठेवली व अधिकाऱ्यांस लोकमताचें जें योग्य पाठबळ हवें तें दिलें त्याचें जर योग्य चीज झालें असतें, तर मग १८४२ पासून १८४८ पर्यंत जीं अनिष्ट सालें गेलीं व अधिकारी आणि प्रजाजन या उभयतांसही या कालावधींत जो त्रास झाला तो झाला नसता. किंबहुना फीनिअन लोकांच्या चळवळीसही तेजी आली नसती. लॉर्ड मेलबोर्न यास जो त्रास सोसावा त्याचा परिणाम असा झाला कीं, पुढें १८६८ पर्यंत कोणच्याही प्रधानमंडळानें आयर्लंदचा प्रश्न हातीं घेऊन, ‘ आपल्या पायावर दगड पडला तरी फिकीर नाहीं, परंतु योग्य ती गोष्ट करावयाची ’ असें ह्मणण्याचें धैर्य धरिलें नाहीं. आयर्लंदला सुख देणें ही न्यायाची गोष्ट खरी, परंतु ती करितां येण्यास आपण अधिकारारूढ असूं तर हातून कांहीं तरी होईल, पण आपणच अधिकारभ्रष्ट झालों, तर मग हातून काय होणार ? या विचारानें न्यायप्रिय असे मंत्रीही आयर्लंदचा प्रश्न पुढें आला असतां जागच्या जागींच थबकत. आयरिश लोकांना न्याय दिलाच पाहिजे असा आग्रह धरणारे असे दोनच इंग्रज मुत्सद्दी पांचशें वर्षांत होऊन गेले. एक जॉन ब्राईट व दुसरे ग्लॅडस्टन. पैकीं ब्राईट यांना जबाबदार रीतीनें राज्यसूत्रें चालविण्याचे प्रसंग थोडेच येत; कारण ते अधिकाराची हांव न धरतां नुसतें सरळ दिसेल तें बोलत. ग्लॅडस्टन साहेबांस मात्र आपल्या मनाप्रमाणें

वागून आयर्लंदचें थोडेंबहुत हित करितां आलें. प्रॉटेस्टंट धर्ममंडळाचा खर्च बंद करणें व जमिनीबाबद कायदा करून आयरिश रयतेस जमीनदारांच्या जुलमापासून अंशतः मुक्त करणें याचें श्रेय त्यांस मिळालें. परंतु होमरूलच्या बाबतींत त्यांना लॉर्ड मेलबोर्नहूनही अधिक त्रास सोसावा लागला; व अखेर होमरूल बिल पास झालेलें पाहण्यापूर्वींच त्यांना हें जग सोडून जावें लागलें ! तात्पर्य, आपले हक्क मिळविण्यास आयरिश लोकांस स्वतःच्या चळवळींवरच भिस्त ठेवावी लागली.

**आयरिश चळवळींची मीमांसा**—आयरिश लोकांच्या 'चळवळींस' सतराव्या शतकापासून प्रारंभ झाला असें ह्मणतां येईल. कारण जरी आपण जिंकलों गेलों आहों तरी त्यांतूनही आपली स्थिति सुधारून आपणास राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे, अशी आकांक्षा त्यांचे मनांत याच सुमारास उत्पन्न झाली. तोंपर्यंतच्या त्यांच्या इतिहासांत, ' चळवळ ' हा आधुनिक सुधारणेचा शब्द ज्यांस लागू करितां येईल, असे उद्योग फारसे आढळून येत नाहींत. यापूर्वींच्या त्यांच्या इतिहासांत जे उद्योग घडून आले ते प्रायः व्यक्तिविषयक महत्त्वाकांक्षेमुळें झालेले असून त्यांस सार्वजनिक असें स्वरूप फारसें नव्हतें. चार मनुष्यें—मनुष्येंचशीं काय परंतु जनावरेंही—एकत्र जमून राहण्याचा प्रसंग आला असतां त्यांमध्यें जीवनकलह सुरू होतो; स्वहितबुद्धीच्या प्रेरणेनें एक व्यक्ति इतरांवर आपला शक चालविण्याचा उपक्रम करिते; व यामुळें विकारविलसितास प्रारंभ होतो. परंतु केवळ व्यक्तिविषयक स्वार्थबुद्धीमुळें झालेल्या उद्योगानें मनोरंजक असा इतिहास निर्माण होऊं शकत नाहीं. अशा प्रकारचा इतिहास निर्माण होण्यास स्वार्थबुद्धीस उदात्त व सार्वजनिक स्वरूप यावें लागतें. सर्व प्रवृत्तीचा उगम अहंकारामध्यें आहे असें घेऊन चाललें तरी, त्या अहंकाराचा विषय जितका मोठा तितका त्याचा व्याप मोठा, व जितका व्याप मोठा तितके त्याचे परिणाम मोठे असणार हें उघड आहे. ज्याच्या अहंकाराची मजल केवळ आपण स्वतः व आपलीं बायकापोरें अशा मूठभर संसारापलीकडे जात नाहीं त्याच्या हातून व्याप तरी कितीसा मोठा होणार ? परंतु याच अहंकारविषयाचा विस्तार प्रथम व्यक्ति, नंतर कुटुंब, नंतर ग्राम, नंतर जाति, नंतर प्रांत, नंतर देश, व नंतर जग—येथपर्यंत

वाढण्यास अवसर असतो; व जितक्या प्रमाणानें हा विस्तार मनुष्याचे बुद्धींत व कृतींत उतरेल तितक्या प्रमाणानें त्याचे हातून मोठें कार्य घडून येईल. स्वराज्यांत अगर परराज्यांत, दोहोंतही अहंकाराचा अशा रीतीनें विस्तार होणें शक्य असतें; परंतु या दोन परिस्थितींत व्यक्तींच्या अंगीं दोन निरनिराळ्या प्रकारचे गुण असावे लागतात. राष्ट्र नेहमीं स्वतंत्र असतां अहंकाराचा विस्तार मोठा असल्यामुळें लोकांनीं मोठे उद्योग केले, अशा प्रकारचीं ठळक उदाहरणें यूरोपखंडाचे इतिहासांत ज्याप्रमाणें इंग्लंद वगैरेमध्यें सांपडतात, त्याचप्रमाणें स्वातंत्र्य नष्ट होऊन पूर्वीं मनास न लागलेली अशा प्रकारची आंच लागल्यामुळें स्वहितबुद्धी पेक्षां सार्वजनिक हितबुद्धीचा अंमल ज्यांचे मनावर अधिक झाला अशा लोकांचीं उदाहरणें आयर्लंदच्या इतिहासांत सांपडतात. सतरावे शतका-पूर्वीं आयरिश इतिहासांत मुख्यतः अंतःकलहाचीं उदाहरणेंच आढळून येतात. परंतु त्यांत राजकीय प्रगतीच्या दृष्टीनें विशेष मनोरंजक असें फारसें कांहीं दिसून येत नाहीं. सतरावे शतकापासून पुढें आयरिश लो-कांचे मनांत राष्ट्रीयत्त्वाच्या कल्पनेचा उदय झालेला असल्यामुळें त्यांच्या उद्योगास ‘ चळवळी ’ हें नांव यथार्थतेनें लावतां येऊन त्यांचा यापुढील इतिहास मनोरंजक झालेला आहे.

आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें चळवळी दोन प्रकारच्या असतात, एकीस कायदेशीर व दुसरीस बेकायदेशीर असें नांव पडलेलें आहे. वस्तुतः या दोनही प्रकारच्या चळवळींचें साध्य एकच असतें, परंतु साधनभेदामुळें त्यांचें स्वरूप व अर्थात् त्यांचें नांवही बदलतें. कोणतीही चळवळ ह्मणजे साध्य साधण्याचा एक मार्ग होय. ह्या साधनानें तें साध्य शेवटीं साधो अगर न साधो; परंतु तें साधण्याकरितां ह्मणून व्यक्ति अगर राष्ट्र त्या साधनाचा आपणाकडून उपयोग करीत असतें. साधनाच्या योजनेंत, साध्य व परिस्थिति यांच्या संबंधानें व तसेंच साधकाच्या स्वभावानेंही फरक पडतात. किंबहुना स्वभाव हेंच या बाबतींत सर्वांत मुख्य असें वैचित्र्यकारण ह्मणण्यास हरकत नाहीं. आपल्या तात्त्विक परंपरेनें आपण मुख्य सृष्टिगुण तीन प्रकारचे मानतों. ते सत्व, रज व तम हे होत; व ज्या गुणाचा अवलेप मनुष्याच्या मनावर

असतो त्या गुणाप्रमाणें तो साध्य व साधन यांच्या औचित्याचा विचार करितो. खासगी कामें व सार्वजनिक कामें यांत जरी बराच भेद आहे, तथापि स्वभावाचे जे गुणदोष मनुष्याच्या खासगी वर्तनांत नेहमीं दिसून येतात तेच प्राय: त्याच्या सार्वजनिक वर्तनांत दिसून येतील असें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. या नियमास कित्येक अपवाद सांपडतात; नाहीं असें नाहीं. परंतु त्यांच्या योगानें वरील सामान्य नियमास बाध येईल इतके ते खचित नसतात. कायदेशीर व बेकायदेशीर हा भेद करितांना हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, कायद्याचें बंधन हें अर्वाचीन राजकीय इतिहासाचें एक व्यवच्छेदक असें लक्षण होऊन बसलें आहे; आणि राजसत्ताधारी व्यक्ति व वर्ग हे या बंधनास उघडपणें मान देऊं लागले आहेत. सुधारणेच्या पूर्वीच्या काळांत केवळ ‘ बळी तो कान पिळी ’ एवढाच न्याय लागू होता. हल्लींप्रमाणें पूर्वींही सर्व प्रकारच्या कायद्यांचें उत्पत्तिस्थान राजसत्ता हीच असे; तथापि कायद्यांचें स्वरूप अस्पष्ट व प्रवर्तन अनियमित असल्यानें राजाला वाटेल त्यावेळीं तो बोलेल तो कायदा अशी स्थिति असे; व कायदेशीरपणानें वागण्याची इच्छा असली तरी तसें वागणें प्रजेस अगदींच सुलभ नव्हतें. हल्लींच्या पालटलेल्या मनूंत कायदे लिहून काढण्याची पद्धति प्रचारांत असल्यामुळें, व राज्यकर्त्यांवर प्रजेचा थोडाना थोडा तरी दाब असल्यामुळें त्यांचें प्रवर्तनही अर्थातच नियमित होतें; व अमुक एक गोष्ट कायदेशीर अगर बेकायदेशीर आहे हें समजण्यास व ठरविण्यास स्थूलमानाचें तरी साधन मिळतें.

सतरावे शतकापासून आतांपर्यंत, सार्वजनिक अहंकारबुद्धीनें प्रेरित झालेल्या आयर्लंदांतील पुढाऱ्यांनीं कायदेशीर व बेकायदेशीर या दोनही सदरांखालीं पडण्यासारख्या चळवळी केलेल्या असून त्यांच्या योगानें गेल्या तीन शतकांतील या राष्ट्राचा इतिहास कसा घडून आला, व या लोकांची राजकीय स्थिति कोणत्या उपायांनीं कितपत सुधारली आहे हें आपणास थोडक्यांत पहावयाचें आहे. आयरिश लोकांना इंग्रजांविषयीं द्वेषाचें कारण कितीही असलें, व अमूर्त अशी त्यांची महत्त्वाकांक्षा कांहींही असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत व राजकीय वादविवादांत बोलतांना ते निर्भेळ स्वातंत्र्य अगर प्रजासत्ताक राज्यच मागतात, असें नाहीं.

सन १८९८ सालच्या बंडाच्या पूर्वी आयर्लंदांतील लोकमताची स्थिति कशी होती याविषयीं खुद्द वूल्फटोन यानें आपल्या आत्मचरित्रांत असें लिहून ठेविलेलें आहे कीं, या वेळीं ह्मणजे आयर्लंदला स्वतंत्र पार्लमेंट मिळाल्यावर व इंग्रजी प्रधानमंडळाची कारवाई अत्यंत तापदायक झाली असतांही, इंग्लंदचा व आपला संबंध सर्वस्वी तुटला पाहिजेच अशी आयरिश राष्ट्राची इच्छा नव्हती व टोन यानें स्वातंत्र्याचा प्रश्न मुद्दाम उपस्थित केला असतांही त्याला लोकांकडून विशेष प्रकारचें उत्तेजन मिळालें नाहीं. आयरिश राष्ट्राचे अद्यापि जबाबदार पुढारी ह्मटले ह्मणजे आयरिश लोकांनीं निवडून दिलेले पार्लमेंटचे सभासद होत; व हे जें बोलतात, व जें मत व्यक्त करतात तेंच राष्ट्राचें मत असें साधारणतः घेऊन चालण्यास हरकत नाहीं. ग्रॅटनपासून तो आज रेडमंडपर्यंतच्या ‘ पार्लमेंटरी ’ पुढाऱ्यांपैकीं कोणीही निर्मेळ स्वातंत्र्याचा झेंडा उभारला नाहीं. या पुढाऱ्यांचे हातून कांहीं होत नाहीं असें पाहून त्यांच्या संतापास आपल्या अविचाराची भर घालून समाजांतील कित्येक माथेफिरू लोक, ‘ बरें आहे, थोडें मागितलें तरी तुह्मी देत नाहीं, तर मग आतां सर्वच घेतों, सोडीत नाहीं ! ’ असे निराशेच्या धीराचे उद्गार काढतांना दिसतात खरे. परंतु सर्व राष्ट्राचे ते उद्गार नसतात. पौराणिक ‘ अहिसत्रांत ’ झालें तरी फक्त अपराधी जो तक्षक त्याच्याच आहुतीचा संकल्प यजमानानें प्रथम सोडला होता. पण इंद्रानें तक्षकाला जेव्हां पाठीशीं घातलें तेव्हां ‘ इंद्राय तक्षकाय स्वाहा ’ अशा द्विगुणित आहुतीचा संकल्प झाला ! त्याचप्रमाणें आयरिश ‘ राष्ट्राची ’ अशी नेहमींची मागणी स्वतंत्र पार्लमेंटपुरती; तीही इंग्रज देईनात, निदान ‘ होमरूल ’ तोही नाहीं; तेव्हां निसर्गसिद्ध असें जें स्वातंत्र्य तेंच पाहिजे—किरकोळ गोष्टींनीं भागणार नाहीं, असे निराशेच्या धाष्ट्र्यांचे उद्गार निघूं लागले. नुसता होमरूलही मागितला तरी पार्लमेंट व राजा आड येतात, तर मग हें पार्लमेंट व हा राजाच नको, असा हा युक्तिवाद केवळ ओघाओघानेंच उत्पन्न होणार आहे; व या दृष्टीनें पाहतां स्वातंत्र्य मागण्याच्या या उद्गारांची जबाबदारी आयरिश लोकांपेक्षां होमरूल देखील न देणाऱ्या राजकर्त्यांकडे अधिक आहे.

आयर्लंदच्या इतिहासाकडे स्थूलमानानें पाहणाराला कदाचित् बंडें, दंगेधोपे व अडवणुकीचे मार्ग यांनींच तो भरला आहे असें सकृत्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. परंतु सूक्ष्म विचार करणारास कांहीं निराळाच प्रकार भासेल. बंडें, दंगेधोपे वगैरेचें स्वरूपच असें असतें कीं, त्यांचा ठसा मनुष्याच्या मनावर शांततेच्या प्रकारांपेक्षां अधिक बसतो. परंतु कोणतीही गोष्ट जितकी मनावर ठसणारी असते तितकीच ती उपयुक्त व परिणामकारी असतेच असें मात्र नाहीं. सृष्टीच्या इतिहासांतील उत्पात, भूकंप, महापूर वगैरे गोष्टीच अधिक लक्षांत राहतात, परंतु सृष्टीच्या नित्य चरित्रक्रमास व विशेषतः तिच्या प्रगतीस उत्पातादिकांचा उपयोग फार थोडा असतो. सर्वध्वंसक अशा भूकंपाचें स्मरण आपण नीट ठेवतों; परंतु प्रत्यहीं दोन्ही तीरांवर मऊ मऊ अशा मातीचा कणाकणांनीं थर देऊन त्यावरील जमीन सुपीक करणाऱ्या नदीच्या कृतीची आठवण कोणी मुद्दाम होऊन आपणास करीपर्यंत ती होते काय? राष्ट्रांच्या इतिहासांतील लढायांनीं आपल्या स्मरणशक्तीची जितकी जागा व्यापलेली असते तितकी इतर कशानेंही नसते; परंतु खरोखर ज्या लढायांमुळें इतिहासाचा ओघच्या ओघच बदललेला आहे अशा किती तरी थोड्या सांपडतील ? फ्रान्समधील सेंट 'बार्थेलोम्यूच्या' कत्तलीचें स्मरण इतिहासवाचकांस नेहमीं राहतें; परंतु या कत्तली ज्यामुळें झाल्या त्या धर्मसुधारणेचें बीज लावणाऱ्या व्यक्तींचें नांवही आपणास माहीत नसतें. प्लासीच्या लढाईची तारीख आपल्या लहान मुलांसही तोंडपाठ असते; परंतु या लढाईहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे दिल्लीच्या बादशहांनीं इंग्रजांस दिवाणीची सनद दिली ही होय, तरी तिची माहिती थोरामोठ्यांस व सुशिक्षितांसही नसते. सुमेरसिंग गारदी नारायणराव पेशव्यांवर वार करीत असलेला देखावा आपल्या डोळ्यांपुढें ढळढळीत दिसतो; परंतु ओंकारेश्वराच्या वाळवंटांत लोकांचा डोळा चुकवून वाळूच्या शाळुंकेवर शपथ घेऊन बारभाईच्या कारस्थानास मराठे मुत्सद्दी प्रारंभ करीत आहेत, हा देखावा किती थोड्या लोकांच्या डोळ्यांपुढें येतो ? या सर्वांचें कारण असें आहे कीं, कार्य हें स्थूल ह्मणून तें दिसतें, व कारण सूक्ष्म ह्मणून तें दिसत नाहीं. परंतु खऱ्या तत्त्वज्ञाची

विचारसामुग्री दृश्यापेक्षां अदृश्य गोष्टींत व अलौकिकापेक्षां लौकिक गोष्टींतच अधिक असते.

आयर्लंदांतून असंतोष जरी कधींही नाहींसा झालेला नाहीं, आणि आयरिश इतिहासाकडे वरवर पाहणारास जरी कदाचित् असें वाटेल कीं, त्यांत अराजनिष्ठा व मारामारी यांशिवाय दुसरें कांहीं नाहीं, तरी हा निवळ भ्रम आहे. १६४१ चें बंड, १७९८ चें बंड, फीनीअन लोकांची चळवळ व १८४८ चे दंगेधोपे वाचकांस दिसावे व त्यांनीं मनावर ठसा उमटवावा; परंतु प्रत्येक पिढीच्या आयरिश पुढाऱ्यांनीं केलेली सनदशीर चळवळ दिसूंही नये, याचा दोष अशा निरीक्षकाच्या सहज स्वभावगुणाकडे अगर वर दिलेल्या कारणाकडे असला पाहिजे; आयरिश लोकांच्या इतिहासाकडे नाहीं. वर सांगितल्या चळवळीपैकीं १६४१ चें बंड हें धर्माखातर होतें, स्वराज्याकरितां नव्हतें. १७९८ चें बंड राजकीय हेतूनें झालेलें होतें; परंतु वूल्फटोन ( १७९८ ) व रॉबर्ट एमेट ( १८०३ ) यांस लोकसमाजाची फारशी अनुकूलता नव्हती. फीनीअन चळवळ व १८४८ चे दंगेधोपे हेही राजकीय हेतूनेंच घडले होते यांत शंका नाहीं. परंतु या प्रसंगीं तर, लोकांकडून पूर्वीं वुल्फटोनला जितकी मदत मिळाली होती तितकीही मिळाली नाहीं. अडणुकीच्या मार्गांत व शेतकऱ्यांच्या दंग्याधोप्यांत ज्या मारामाऱ्या झाल्या त्यांचा हेतु बोलून चालूनच राजकीय स्वातंत्र्यापेक्षां कमी दर्जाचा होता. तो हेतु ह्मटला ह्मणजे जमीनदार लोकांना भंडावून सोडून त्यांजकडून सवलती मिळविणें. अर्थात् त्यांत अराजनिष्ठेचा खरोखर कांहीं संबंध नव्हता. १८७६ सालीं पुणें प्रांतांत, अगर कांहीं थोडे वर्षांपूर्वीं नाशिक व जुन्नर प्रांतांत आणि खानदेशांत जे दंगे झाले त्यांस जितकें राजकीय स्वरूप होतें असें मानितां येईल त्याहून आयरिश लोकांच्या वरील दंग्यांस खास अधिक नव्हतें. 'ओकबॉईज,' 'व्हाईट बॉईज,' 'हार्टस् ऑफ स्टील,' 'रिबन सोसायटी,' वगैरे ज्या गुप्तसंस्था दंगे करण्याकरितां अवतीर्ण झाल्या होत्या, त्यांचा हेतू श्रीमंत जमीनदारांस जरब बसवून, त्यांस शिक्षा करून, व इतर हरतऱ्हांनीं गरीब शेतकरीवर्गाचीं गाऱ्हाणीं सरकारचे कानावर घालण्याचा होता. कित्येक प्रसंगीं राजनिष्ठापूर्ण असे अर्जही त्यांनीं अधिकाऱ्यांकडे पाठ-

विले होते हें कागदपत्रांवरून शाबीत करतां येतें. आणि 'फ्राऊड'सारख्या इतिहासकारांनीं, ह्मणजे ज्यांना आयरिश लोकांचा तिटकारा वाटतो व सहानुभूति बिलकूल नाहीं अशांनीं हें शाबीतही केलेलें आहे. अशा दंग्यांस लोकमत कितपत अनुकूल असतें हेंही पहावें लागतें; व या दृष्टीनें विचार करितांना असें दिसून येतें कीं, इंग्रज जमीनदार लोकांबद्दल आयरिश समाजास जरी कितीही तिटकारा वाटत असला, व गरीब शेतकरीवर्गाची कितीही कींव येत असली, तरी जे अत्याचार ते अत्याचार असेंच त्यांस वाटे; व ते त्यांचा नुसता निषेधच नव्हे तर प्रतिकारही करण्याची खटपट करीत. या खटपटींत रोमन क्याथोलिक व प्रॉटेस्टंट हा भेद सहसा राहत नसे, व हे दंगेखोर लोक सद्हेतूनें प्रेरित झालेले असले तरी त्यांच्या हातून अनन्वित कृत्यें घडत व जरब बसविण्याचे कामीं मर्यादा न राहून धर्म करितां कर्म उभें राही, यामुळें सर्व समंजस व विचारी पुढारी अशा अत्याचारांचा प्रतिकार शक्य तेथें एक दिलानें करीत असत.

आयर्लंदांत इंग्रजी अमलापासून ज्यांना खरोखरीचा व पुष्कळ त्रास झाला असे लोक ह्मटले ह्मणजे क्याथोलिकच. अराजनिष्ठा मनांत बाळगण्यास जर कोणास खरें कारण असेल तर त्यांनाच. कारण जमिनीचे कायदे, शिक्षणाचे कायदे, धर्माचे कायदे व नागरिकत्वाच्या हक्काचे कायदे या सर्वांपासून त्यांचा छळ झाला. क्याथोलिक लोकांप्रमाणें व्यापारविषयक कायद्यांपासून प्रॉटेस्टंट लोकांसही प्रथम प्रथम जाच झाला खरा, परंतु लवकरच तो संपला; आणि आयरिश पार्लमेंट बुडविल्यानें हानि झाली असेल तर ती क्याथोलिक व प्रॉटेस्टंट दोघांचीही सारखीच झाली. तात्पर्य, इंग्रजांस शत्रू या नात्यानें लेखण्याचें कारण मुख्यतः क्याथोलिक लोकांसच होतें; तथापि एकंदर इतिहासक्रमावरून पाहतां क्याथोलिक लोक हे फारसे 'अराजनिष्ठ' नव्हते असेंच दिसून येतें. आयरिश लोकांशीं ज्यांची पूर्ण सहानुभूति आहे, असा इतिहासकार ह्मटला ह्मणजे 'लेके' हा होय. याइतिहासकारानें आपल्या आयर्लंदच्या इतिहासांत असें स्पष्ट ह्मटलें आहे कीं, अठराव्या शतकांत क्याथोलिक लोकांत खरी 'अराजनिष्ठा' इतकी कमी होती कीं, ती

पाहून खरोखरच फार आश्चर्य वाटतें.याचें एक कारण असें होतें कीं,इंग्लंदच्या गादीवर क्याथोलिक राजे काय किंवा प्रॉटेस्टंट राजे असले काय, दोघेही त्यांस सारखेच वाटूं लागले होते. क्याथोलिक पंथी राजा दुसरा जेम्स याचा धर्माभिमानानें त्यांनीं पक्ष उचलला होता व त्याजकरितां ते लढावयास तयारही झाले होते; परंतु 'बॉईन 'च्या लढाईनंतरची त्याची चमत्कारिक वर्तणूक पाहून आपण फुकट त्रासांत पडलों, असें त्यांस वाटूं लागलें. अराजनिष्ठेचा व भयंकर चळवळीचा मुख्य गड्डा प्रॉटेस्टंट वसाहतवाले हेच असत; क्याथोलिक लोक मुख्यतः कायतें धर्मस्वातंत्र्य मिळालें असतां खूष होते. प्रजास्वातंत्र्याचें वारें प्रायः प्रॉटेस्टंट व प्रेसबिटरेनियन लोकांचे डोक्यांत होतें, व ह्मणून पार्लमेंट स्वतंत्र करण्याच्या चळवळींत त्यांनींच पुढाकार घेतला होता. तथापि प्रॉटेस्टंट लोक झाले तरी स्वतः होऊन स्वतंत्र रीतीनें बंड करतील असें मानण्यास फारसें कारण नव्हतें. वूल्फटोन हा स्वतः प्रॉटेस्टंट होता व कांहीं अंशीं आयर्लंदच्या उत्तरेकडील प्रॉटेस्टंट व प्रेसबिटरेनियन लोकांचें मन तो जाणत होता यांत संशय नाहीं. तथापि १७९८ सालीं फ्रेंच मुत्सद्यांपुढें आयर्लंदची खरी स्थिति मांडतांना आयरिश लोक आपण होऊन बंड करणार नाहींत, हें त्यास कबूल करावें लागलें. फ्रेंच सरकारानें आयर्लंदवर स्वारी करून हत्यारें-पात्यारें लोकांस पुरविलीं असतां, पुष्कळ क्याथोलिक लोक व प्रॉटेस्टंट येऊन मिळतील अशी त्यास आशा होती. परंतु प्रत्यक्ष वेळ आली तेव्हां हीही आशा विफल ठरली. कारण फ्रेंच आरमाराचा पहिला भाग आयरिश किनाऱ्याजवळ येऊन बरेच दिवस थांबला असतां लोकांकडून बंडाचा झेंडा उभारण्याचें चिन्हही दिसेना !

आयर्लंदांतील लोकमताचे स्वाभाविक पुढारी ह्मटले ह्मणजे देशांतील सुशिक्षित,विचारी व संपन्न लोक; व प्रत्येक पिढीच्या या पुढाऱ्यांकडे पाहिलें तर असें दिसून येतें कीं, शेंकडा ९० पुढारी प्रायः सनदशील चळवळ करणारे होते. बेकायदेशीर चळवळ करणारांपैकीं मुख्य ह्मटले ह्मणजे लॉर्ड फिटझरल्ड, टोन, एमेट, मिचेल, ओब्रायन इत्यादि प्रसिद्ध आहेत. परंतु सनदशील चळवळ करणारांची पिढीही अव्वलपासून आज तागायतपर्यंत

चालू असून, लोकमताचे दृष्टीनें पाहतां या दुसऱ्या प्रकारच्या पुढाऱ्यांस जितकें पाठबळ मिळालें, तितकें पहिल्या प्रकारच्या पुढाऱ्यांस मिळालें नाहीं. पहिल्या प्रकारचे पुढारी कांहीं कमी बुद्धिमान् होते असें नाहीं. टोन, एमेट, ओब्रायन हे आयर्लंदास ग्रॅटन व ओकॉनेल यांच्याप्रमाणेंच निरंतर भूषणभूत राहतील यांत शंका नाहीं. पहिल्या प्रतीच्या पुढाऱ्यांच्या देशभक्तीबद्दल केव्हांही वाद नव्हता, इतकेंच नव्हे, तर त्यांनीं त्या भक्तीखातर देहही खर्ची घातले. शिवाय कित्येक प्रकारच्या इतर दंगेखोरांप्रमाणें त्यांची नीति कमी दर्जाची नव्हती, तर ती फारच वरिष्ठ प्रतीची होती. परंतु त्यांचें करणें समाजास पसंत अगर सम्मत नव्हतें ह्मणून ह्मणा, समाजास त्यांचे पावलावर पाऊल टाकून जाण्यास लागणारें धैर्य नव्हतें ह्मणून ह्मणा, अगर समाजास त्या वेळीं त्यांच्या धाडशीपणाचा उपयोग नव्हता ह्मणून ह्मणा, हातून फारशी कार्यनिष्पत्ति न होतां त्यांना मरावें लागलें. उलटपक्षीं ग्रॅटन व ओकॉनेल यांसारख्या पुढाऱ्यांनीं जरी सनदशीर चळवळीचा राजरस्ता पत्करला होता तरी त्यांस आपल्या हातानें थोडेंबहुत प्रत्यक्ष कार्य घडवून आणण्याचें श्रेय मिळालें. कारण ग्रॅटन यास आयरिश लोक ‘ स्वतंत्रतेचा जनक ’ व ओकॉनेल यास क्याथोलिक–लोक–रक्षक—अवतार ’ असें ह्मणतात. शिल्पशास्त्राच्या शब्दांनीं बोलावयाचें तर टोन व एमेट यांचा उपयोग आयरिश राष्ट्राचे इमारतीस मेहरपीवर बसविलेल्या कुसरीच्या कामासारखा झालेला असून, ग्रॅटन, ओकॉनेल व पार्नेल यांचा उपयोग कुसर केलेल्या शोभिवंत अशा पायाचे चिऱ्यांसारखा झाला. पहिल्या प्रकारच्या देशभक्तांच्या योगानें त्या इमारतीस सौंदर्य व शोभा, व दुसऱ्या प्रकारच्या देशभक्तांच्या योगानें जशी शोभा तसाच आधारही मिळालेला आहे.

आयर्लंदांत कायदेशीर व बेकायदेशीर चळवळी यांची एक प्रकारें सरमिसळ झालेली आढळून येते. स्वभावगुणाप्रमाणें जो तो आपापला साधनमार्ग निश्चित करीत असतो हें मागें सांगितलेंच आहे; व आयरिश चळवळींच्या इतिहासाच्या प्रत्येक युगांत–( १ ) अव्वलपासून अखेरपर्यंत कायदेशीरच चळवळ करणारे, ( २ ) अव्वलपासून अखेरपर्यंत बेकायदेशीरच चळवळ करणारे, व (३) ज्यांनीं निरनिराळ्या वेळीं प्रसंगानुसार दोहोंचाही पुरस्कार

केला व अनुभव घेतला—अशा तिन्ही प्रकारचे लोक आढळून येतात. परंतु पहिल्या व दुसऱ्या प्रकारचे, ह्मणजे जन्मभर केवळ एकदेशीय विचारसरणीनेंच ज्यांची वर्तणूक नियमित झाली होती असे लोक फार थोडे; व तिसऱ्या प्रकारचे मात्र लोक फार दिसून येतात. याचें कारणही उघडच आहे. कायद्याचें अक्षर ह्मणजे केवळ श्रुतीच, त्याच्याबाहेर लवमात्रही जावयाचें नाहीं, किंवा एखादा स्वरही पालटावयाचा नाहीं, असें मानणारे 'कट्टे वैदिक' लोक पुढाऱ्यांमध्यें सांपडणें कठिण असतें. तसेंच कायदा व शासनपद्धति हें सर्वच निव्वळ थोतांड आहे, असें मानून उठल्याबसल्या बंदुक सरसावणाऱ्या व तरवारीच्या मुठीस हात घालणाऱ्या लोकांकडेही पुढारीपण आलेंच तर फार दिवस राहणें शक्य नसतें. 'केवळ कायद्याच्या अक्षरांच्या अनुरोधानेंच मी पाऊल टाकीत जाईन, व कायद्यानें घालून दिलेल्या मर्यादेच्याबाहेर मी आपल्या शरीराचा कोणताही भाग अगर झोंकही जाऊं देणार नाहीं,' अशी प्रतिज्ञा करण्यापूर्वी कार्यक्षम असा पुढारी दहापांच वेळ तरी विचार करील. कारण एकंदर मनुष्यस्वभावच अशा प्रतिज्ञेच्या विरुद्ध आहे व चूक होणें हा मनुष्यधर्म होय. आणि दुसरें असें कीं, अशा तऱ्हेची प्रतिज्ञा करणाऱ्या पुढाऱ्याचा सर्व लोकांस सारखा विश्वास पटत नाहीं. आट्यापाट्याच्या डावांत 'मीं आजपर्यंत कधींही मार खाल्ला नाहीं व पुढें कधींही खाणार नाहीं,' अशी प्रतिज्ञा करणाऱ्या गड्यास एक तर लोक हंसतील, किंवा त्यास खेळावयास कोणी घेणार नाहीं. कारण खेळाच्या भरांत तरतरीत गडी प्रतिपक्षाचे तावडींत एखादे वेळीं तरी चुकून सांपडणारच हें जसें त्यांस ठाऊक असतें, तसेंच एखादे वेळीं मार खाण्याचा धोका अंगावर घेऊनही खेळ रंगविण्याचें धाडस जो करणार नाहीं, असा गडी खेळास फारसा उपयोगीं पडण्याचा संभव नसतो, हेंही ते जाणतात. उलटपक्षीं जो गडी इतका अविचारी असतो कीं, खेळाच्या भराचा मद अनिवार्य होऊन, अथवा आपल्या तरतरीचें प्रदर्शन करण्याची हांव न आवरून, दरएक डावांत केव्हांना केव्हां तरी जो हटकून मार खाणार व अशा रीतीनें हातातोंडास आलेलें लोण हटकून फुकट चालविणार, अशा गड्याच्या तरतरीचेंही कौतुक एकाददुसऱ्या डावापलीकडे कोणी करीत नाहीं. तिसऱ्या वर्गातील पुढा-

ज्यांची मात्र गोष्ट वेगळी असते. केवळ कायदेशीर मर्यादेच्या बाहेर जन्मांत कधींही पाऊल टाकण्याचा प्रसंग मजवर येणार नाहीं अशी तो प्रतिज्ञाही करीत नाहीं; व अविचारानें, बेफामपणानें अथवा केवळ वृथाभिमानानें त्या रेषेचें उल्लंघनही सहसा त्याचे हातून होत नाहीं. नियमतः कायद्याचें उल्लंघन करूं नये असा त्याचा प्रमाणिकपणाचा प्रयत्न असतो; परंतु राजकारणाची चळवळ रंगारूपास आली असतां व कायदाच आपली मर्यादा उल्लंघून पावलापावलानें पुढें येऊं लागला असतां, केवळ परिणामाचे भीतीनें तो आपलें पाऊल मागेंही घेत नाहीं. आपण कायदेशीर रीतीनें वागत आहों असें निर्विकल्पक ज्ञान त्यास प्रथमपासून असतेंच, व तें त्याच्या मनास समाधान राहण्यास पुरेसें होतें. तथापि, परिस्थिति बदलल्यामुळें केवळ औपचारिक रीत्या आपल्या हातून कायद्याच्या मर्यादेचें उल्लंघन होण्याचा कदाचित् संभव आहे, असें सविकल्पक ज्ञान एखादे प्रसंगीं झालें असतांही तो, व्यक्तिशः आपणास अनिष्ट फळ भोगावें लागेल या भीतीनें, अंगीकृत कार्यापासून माघारा फिरत नाहीं. यामुळें नियमतः व हेतुपुरःसर कायदेशीरपणानें वागणारा, परंतु केवळ अपवादतः व उपाधिदोषामुळें बेकायदेशीरपणाची चूक न जाणून अगर जाणूनही हातून होणारा असा चळवळ्या पुढाऱ्यांचा वर्ग प्रत्येक प्रगमनशील राष्ट्रामध्यें आढळून आल्याशिवाय रहात नाहीं. हे अपवाद त्याच्या हातून प्रायः अशाच वेळीं घडून येतात कीं, केवळ राजसत्तेमुळें एखादा कायदा प्राणप्रतिष्ठित झाला असला तरी, तो न मानणें हें त्या कायद्याची उत्पत्ति सदोष आहे, हें जगास दाखविण्यास उपयोगी असतें व ह्मणून अशा कृत्यास नीतिशास्त्राची संमति मिळते. परंतु असे अपवाद ज्यांच्या हातून घडून येतात त्यांना त्या अपवादामुळें 'बेकायदेशीरपणानें वागणारे' असें नांव देणें चुकीचें होईल. प्रसिद्ध इंग्रजी देशभक्त हॅंपडन यानें 'शिप मनी' नांवाचा कर देण्याचें नाकारलें, अगर दक्षिण आफ्रिकेंत दे. भ. गांधी यांनीं 'नोंदणीचा कायदा' धाब्यावर बसवून अशा कायद्याचें अनुवर्तन करण्यापेक्षां तुरुंगवासच अधिक श्रेयस्कर ह्मणून तो पत्करला, तर या दोघांस बेकायदेशीर चळवळ करणारे असें ह्मणतां येणार नाहीं, हें कोणासही कबूल करणें भाग आहे.

वरील तत्त्वें आयरिश इतिहासास लावून पहातां असें दिसून येतें कीं, आयरिश पुढाऱ्यांपैकीं प्रचंड बहुमत नियमतः कायदेशीर चळवळ करण्याचे बाजूस असून केवळ बेकायदेशीर चळवळीचा पुरस्कार करणारे पुढारी बरेच थोडे निर्माण झाले. याठिकाणीं पुढारी हा शब्द 'ज्यांनीं लोकमत थोडेंबहुत तरी बनविलें अगर जे लोकमताचे निदर्शक ह्मणून यथार्थतेनें कांहीं कालपर्यंत तरी गणले जात होते' अशा व्यक्तींच्या अर्थींच योजिलेला आहे. वेळप्रसंग नसतां, केवळ आपल्या तरवारीची फेंक पाहून लोकांनीं कौतुक करावें अशा हेतूनें हत्यार परजणाऱ्या विक्षिप्त शिलेदारास कोणी नाईक किंवा पुढारी ह्मणत नाहींत. चार्लमॉंट, ग्रॅटन, फ्लड, क्यूरन, डॅनियल ओकॉनेल, जॉन किओघ, ऐझॅक बट, पार्नेल, डिलन, ओब्रायन, रेडमंड, वगैरे आयरिश पुढारी कायदेशीर चळवळ करणारे होत; व त्यांपैकीं कित्येकांस तुरुंगांत जावें लागलें एवढ्यामुळें त्यांच्या या वरील पदवीस बाध आला असें कोणी कधींही मानलें नाहीं. ज्याप्रमाणें चेंडुफळीच्या खेळांत, स्वतः हातचलाखी करून प्रतिपक्षाच्या काठ्या पाडणें, अगर 'अंपायर' ला निकाल विचारून त्याच्या चुकीचा फायदा घेणें ही जशी एक हुषार गड्याची युक्ति असते, त्याप्रमाणेंच त्रासदायक, अशा प्रजापक्षीय पुढाऱ्याच्या अंगाचा प्रत्यक्ष भाग नसला तर निदान तोल तरीं बाहेर गेला आहे, असा निकाल येनकेन प्रकारानें मिळवून त्याचे डोक्यावर बेकायदेशीरपणाचा छाप मारून त्यास सोडून द्यावयाचा, ही दक्ष व कुशल अशा राज्यकर्त्यांची एक ठराविक व अनुभवसिद्ध युक्ति असते. परंतु तेवढ्यामुळें, ज्याच्या मनाचा पिंड कायदेशीर चळवळ करण्याच्या प्रवृत्तीचाच असतो तो बेकायदेशीर चळवळ करणारा ठरूं शकत नाहीं. सन १७८२ चे सुमारास आयर्लंडांत राजकीय चळवळ फार जोरास आली होती; अमेरिकेंत घडून आलेल्या पराभवामुळें इंग्लंद कमकुवत व भित्रें झालें होतें; जवळच फ्रान्समध्यें राजसत्ता उलथून पडण्याचा रंग दिसून येण्यास सुरुवात झाल्यामुळें इंग्लंदचें तख्तही डळमळूं लागलें आहे कीं काय असा भ्रम इंग्रजी मुत्सद्यांना पडूं लागला होता; आयर्लंडमध्यें धर्मछळ कळसास पोंचून त्याचे पाठीमागून सहिष्णुतेचा उदय होऊन राष्ट्रीय कार्यांत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट

हा भेद मानणें मूर्खपणाचें आहे असें उभयपक्षास वाटूं लागलें होतें; आणि प्रॉटेस्टंटपंथी लोकांनीं स्वयंसेवक सैनिकांची पलटणें व तोफखाना कवाईत शिकवून तयार केला होता;–अशा वेळीं आयरिश पार्लमेंटचें स्वातंत्र्य इंग्लंदनें कबूल केलें तर बरी गोष्ट आहे, नाहीं तर मग काय होणें असेल तें होईल, असें ह्मणण्यापर्यंत ग्रॅटनची मजल स्वाभाविकपणेंच गेली होती; आणि कदाचित् इंग्लंदच्या हटवादीपणानें युद्ध जुंपलें असतेंच तर ग्रॅटन हा एखाद्या पलटणीचा कर्नल होऊन लढला ही असता, निदान पार्लमेंटमध्यें या देशभक्तसैन्याचा पुरस्कार व पाठपुरावा त्यानें पुढारी पणानें केला असता यांत काडीइतकी शंका नाहीं; तथापि खुद्द अशा प्रसंगींही त्यास कोणी बेकायदेशीर चळवळ करणारा ह्मटलें नाहीं. आयर्लंदचा अनभिषिक्त राजा ओकॉनेल याचा सर्व जन्म इंग्रजांस नांवें ठेवण्यांत, कोर्टांतून सरकाराविरुद्ध भांडण्यांत, जंगी जाहीरसभा भरविण्यांत, समाजांत खळबळ करून सोडण्यांत, समित्या, सभा व संस्था स्थापण्यांत, व पार्लमेंटमध्यें राजाधिकाऱ्यांवर तुटून पडून निकराचे हल्ले करण्यांत गेला; वर सांगितलेल्या ठराविक युक्तीनें सरकारानें त्याजवर बेकायदेशीरपणाचा छाप मारण्याचा दोन तीन वेळांपर्यंत प्रयत्न केला; व त्यापैकीं शेवटीं एक साधून कांहीं वेळ त्यास तुरुंगवासही भोगावा लागला. परंतु कायदेशीर चळवळीचा बाणा त्यानें स्वतः कधींही सोडला नाहीं. येवढेंच नव्हे तर तो राखण्याचे पायीं सर्व जन्मभर मिळविलेल्या लोकप्रीतीच्या पुण्याईचें उदक सोडून, त्याच्या एका शब्दाबरोबर जीव देण्यास तयार असणाऱ्या हजारों अनुयायांस 'शांततेचा भंग करू नका' असें सांगून व यःकश्चित् एका शिपायाचा हुकूम मानून त्यानें स्वतःस अटक करून घेतली व अखेर तुरुंगांत गेला. मनुष्याचें फक्त एक थेंब रक्त अन्यायानें सांडल्यानें सर्व राष्ट्रास राजकीय मोक्ष मिळण्याचा जरी संभव असला तरी त्या मोक्षावर लाथ मारली पाहिजे व तो रक्तबिंदु सांडण्याचा थांबविला पाहिजे. अशी त्याची प्रतिज्ञा असे; व सभांतून बोलतांना जरी तो बेफामपणें बोलतो आहे असें दिसे. कायदेशीर चळवळींचा पुरस्कर्ता हें त्याचें ब्रीद नष्ट झालें असें कोणी कधींही ह्मटले नाहीं. पार्नेल, डिलन, ओब्रायन वगैरे पुढाऱ्यांस अधिकाऱ्यांनीं शिक्षा ठोठावून तुरुंगवास पत्क-

रावयास लाविलें होतें हें प्रसिद्धच आहे; लँड लीग व नॅशनल लीग या संस्थांच्या चिथावणीमुळें आयर्लंदांतील बहुतेक गुन्हे होतात व पार्नेल वगैरे पुढाऱ्यांचें या गुन्ह्यांस गुप्त सहाय आहे असें शेंकडा नव्वद इंग्रज समजत असत; परंतु कोणीही न्यायी इतिहासज्ञ पार्नेलला बेकायदेशीर चळवळ करणारा ह्मणणार नाहीं. बेकायदेशीर चाळवळ करणारां पैकीं लॉर्ड फिडझरल्ड, वूल्फ टोन, रॉबर्ट एमेट, शीअर बंधू, मिचेल, स्मिथ ओब्रायन, मायकेल डेव्हिट वगैरे नांवें प्रसिद्ध आहेत. पैकीं टोन, ओब्रायन, मायकेल डेव्हिट ही मंडळी दुसऱ्यापेक्षां तिसऱ्या वर्गांतच अधिक पडतात. कारण वूल्फ टोन यानें सार्वजनिक कामास सुरुवात केली ती बंडाचा झेंडा उभारून केली नाहीं. तो स्वतः प्रॉटेस्टंट होता तरी क्याथोलिक लोकांच्या हक्काचा प्रश्न हातीं घेऊन त्यानें कायदेशीर चळवळीस सुरुवात केली. या चळवळींत त्यानें जॉन किओघ यास उत्तम सहाय केलें; व क्याथोलिक लोकांच्या वतीनें तो डेप्युटेशन घेऊन विलायतेस गेला होता. तो अत्यंत तरतरीत व बुद्धिमान् असून बॅरिस्टरची परीक्षा त्यानें दिलेली होती, आणि १७७६ ची अमेरिकेंतील व १७८९ ची फ्रान्समधील राज्यक्रांति घडून आली नसती आणि फ्रान्स व इंग्लंद यांचे दरम्यान युद्ध सुरूं होण्याचा संभव नसता तर बहुधा तो बंडाच्या भानगडींतच पडताना. स्मिथ ओब्रायन याचीं पहिलीं बरींच वर्षें कायदेशीर चळवळ करण्यांत गेली. परंतु डॅनियल ओकॉनेलच्या कायदेशीर चळवळीचा खेदकारक शेवट झालेला पाहून त्याच्या भोंवतालच्या तरुण मंडळीस केवळ परिस्थितीमुळें बेकायदेशीर मार्गाचें अवलंबन करण्यास उत्तेजन मिळालें. मायकेल डेव्हिट याच्या सार्वजनिक अयुष्यक्रमास सुरुवात होण्याचे सुमारास आयर्लंदांत फीनिअन लोकांच्या बंडखोर चळवळीची लाट आली होती; व तारुण्याचे उत्साहामुळें तो त्या लाटेंत सांपडला. परंतु दहा वर्षें काळेंपाणी भोगून परत आल्यानंतर लँड लीगची कायदेशीर चळवळ त्यानेंच सुरूं करून पार्नेलला त्या चळवळींत घेऊन तिला जोर आणिला. आणि मायकेल डेव्हिटचसा काय, पण फीनियन चळवळींत तरुण वयांत पडलेले अनेक आयरिश लोक बंडाळीच्या मार्गाचा नाद सोडून कायदेशीर चलवळीनें कार्य साधण्याकरितां पार्नेलला

मिळाले; आणि त्यांच्याच जोरावर व व्यावहारिक कर्तृत्वाचे साहाय्यानें पार्नेलला ब्रिटिश पार्लमेंटास आयर्लंदचा प्रश्न हातीं घेणें भाग पाडतां आलें.

चळवळीच्या या अंगासंबंधानें दुसरीही एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, आयर्लंदांत गुप्त मंडळ्यांचा प्रसार जरी वेळोवेळीं झाला तरी तो केव्हांही फार काळ टिकला नाहीं; व गुप्त मंडळ्यांचे कामास उघड सुरुवात होतांच थोड्याच काळांत अशा उद्योगास लोकमताची प्रतिकूलता व्यक्त होत असे. ही प्रतिकूलता व्यक्त करण्यास इतर मार्गांचें अवलंबन करणारांना आपला निषेध, क्रोधांध अशा सरकारी अधिकाऱ्यांच्याही नजरेस पडेल अशा रीतीनें, अलंकारिक शब्दांनीं मंडित करून व नसत्या आविर्भावानें खुलवून वेशीवर बांधावा लागत नाहीं. देशांतील एका वर्गाच्या लोकांच्या वर्तनाबद्दल दुसऱ्या लोकांचा निषेध व्यक्त होण्यास इतर शिष्टमान्य असेही पुष्कळ मार्ग आहेत. कारण राजकीय चळवळींत झालें तरी काय ? जें वाईट तें वाईटच. एरंडेल तेल औषधी असलें तरी जें घाण तें घाणच; तसेंच कोयनेलच्या गोळ्या घेतांना, 'यानीं कदाचित् आपला ताप कमी होईल' असें वाटणारा मनुष्यही त्यांना ' ह्या फार गोड आहेत ' असें सर्टिफिकीट देणार नाहीं ! गुप्तमंडळ्या व कट यांपासून धाडसी मनुष्यांना स्वदेशाभिमानाच्या ऊर्मींचा उपशम जरी झाल्यासारखा वाटतो, तरी अशा संस्थांच्या हातीं चळवळीचा पुढाकार गेल्यापासून होणारे तोटे तेव्हांच दिसूं लागतात. पार्नेल वगैरे उत्कट विचाराच्या पुढाऱ्यांनींही देशांतील चळवळींवर गुप्त मंडळ्यांचे गुप्तपाश पडण्याचे आधींच सावधगिरी ठेवून त्यांना त्या धोक्यापासून सोडविलें ही गोष्ट पार्नेल व त्याचे सहकारी यांजवर जें स्वतंत्र कमिशन नेमून मोठा मुकदमा करण्यांत आला त्यांतील पुराव्यावरून अगदीं उघड दिसून येत आहे. पार्नेलच्या शिष्याचा, ह्मणजे रेडमंडचा प्रतिपक्षी विलियम ओब्रायन—ज्याच्या खातर थोडे दिवसांपूर्वी आयरिश कन्व्हेन्शनमध्यें मोठी मारामारी झाली—त्यानें आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत गुप्तमंडळ्यांच्या विरुद्ध आपलें मत स्पष्टपणें नमूद केलेलें आहे. ओब्रायन हा ' कायदा ह्मणजे देव ' असें मानणा-

रांपैकीं मुळींच नाहीं; तथापि कायद्याची कास धरून जाण्यास जशी मर्यादा आहे तशीच देशभक्तीच्या नांवानें करावयाच्या गोष्टीलाही मर्यादा आहे असें मानणारा तो आहे. ओब्रायन हा फीनियन बंडाचे वेळीं लहान होता; परंतु त्याचा थोरला भाऊ या कटांत सामील असल्या कारणानें अद्भुतरम्य तारुण्याच्या देशभक्तिप्रेरित अशा या नादाचा आस्वाद घेण्यास त्यास सांपडला होता. पण पुढें पोक्त वयांत त्यानें असे उद्गार काढले कीं "राष्ट्रीय स्वातंत्र्याचें प्रचंड व अवजड काम व बंडखोरीचीं साधनें यांचें परस्पर प्रमाण पाहूं गेलें असतां केवळ गुप्त मंडळ्यांचे मार्गानें देशास स्वातंत्र्य मिळवून देण्याची कल्पना अगदीं अविचाराची व वेडेपणाची आहे अशी खात्री होते."

आयर्लंदांतील १८४०–५० मधील राष्ट्रीयचळवळीच्या उदयाचे वेळीं 'नेशन' पत्राच्या संपादक मंडळीवरही कायद्याच्या मर्यादेचें उल्लंघन करण्याचा प्रसंग आला होता; पण चार्लस गॅव्हनडफी आणि डेव्हिस या मूर्धाभिषिक्त राष्ट्रीय मतांच्या पुरस्कर्त्यांनीं स्वतःवर केवळ अत्याचार करणारांचा पगडा केव्हांही बसूं दिला नाहीं. ए. एम. सुलिव्हन, 'नेशन' पत्राचा एक वेळचा संपादक, यानें आयर्लंदांतील लोकांच्या मनाच्या स्थितीचें वर्णन 'नूतन आयर्लंद' नामक पुस्तकांत लिहून ठेवलें आहे; व तें आजच्या आयर्लंदच्या स्थितीसही लागू पडण्यासारखें असल्यामुळें येथें देतों. तो ह्मणतोः–कीं, "सर्व तऱ्हेच्या स्वभावाचे लोक आयर्लंदांत असल्यानें, त्यांपैकीं कित्येकांना उतावळेपणामुळें अगर निराशेच्या व देशभक्तीच्या तळमळीमुळें बेकायदेशीर प्रयत्न करण्याचीही ऊर्मी जबर येते यांत शंका नाहीं; परंतु एकंदर आयरिश समाजाचें लोकमत पाहिलें तर हातांत असलेली राजकीय सत्ता व तिच्या मदतीस मिळणारें लोकमत, असल्या प्रकारच्या हत्यारांचाच उपयोग करून आपलें राष्ट्रीय–स्वातंत्र्य मिळविण्याचा त्यांचा निश्चय आहे."

तथापि याच इतिहासावरून दुसरीही एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट होते; तीही कीं, केवळ कायदा हा श्रुतिप्रमाणें मानून चालण्यानें कोणत्याही पुढाऱ्याच्या ईर्षेनुरूप काम होणें शक्य नाहीं. देशहितासारखी अमोलिक वस्तु विकून आपल्याला चार पैसे मिळविण्यास ईश्वरानें देश दिलेला

आहे, याकरितां ईश्वराचे आभार मानणारे निर्लज्ज लोक आयर्लंदांत अठरावे शतकांत होऊन गेले. तसेंच एकोणिसाव्या शतकांतही, केवळ आपली चलती व बढती व्हावी याकरितां कायदेशीर देशसेवेचें सोंग आणणारे जॉन सॅडलिअर, विलियम कीओघ, एडमंड ओप्लहॅरटी वगैरे बरेच लोक झाले. अशा प्रकारचे लोक देशाचें नांव घेऊन व तें मळवून जी क्रिया उत्पन्न करितात, त्यास अवश्य अशी जी प्रतिक्रिया ती गुप्तकटवाले व अत्याचाराचा पुरस्कार करणारे धाडसी तरुण लोक यांजकडून निर्माण होते. परंतु खऱ्या प्रगतीस सर्वांत अधिक उपयुक्त असा मार्ग नेहमीं या दोन टोंकांच्या दरम्यान कोठें तरी असतो. कोणत्याही अत्याचारांचा निषेध करणें हें अत्यंत जरूरीचें आहे; तरी पण नुसता निषेध करण्यासारखें सोपें व स्वसंरक्षण-क्षम असें दुसरें कांहींच नसतें. हा आक्षेप त्या निषेधावर सहजच येतो. आपली कातडी शाबूत ठेवण्याकरितां अत्याचारांचा निषेध करणाऱ्यांच्या निषेधास कवडीचीही किंमत नाहीं. तर पार्नेल वगैरे ज्या लोकांनीं अत्याचारप्रिय तरुणांच्या मनांतून असदुद्दिष्ट काढून टाकून त्यांच्या धैर्याचा, देशभक्तीचा व उद्योगप्रियतेचा उपयोग होण्यास सदुद्दिष्ट यांजपुढें मांडलें; फुलझाडांच्या मुळांप्रमाणें, खऱ्या गुणांना धक्का न लावतां मानसिक अळ्यांमध्यें उगवलेलें तामस विचाराचें तृण उपटून काढलें; आणि शारीरिक सामर्थ्य व नैतिक सामर्थ्य यांचा मेळ घालण्याचे कामीं स्वतःच्या जिवाची काळजी केली नाहीं, व जरूर तर तुरुंगवास पत्करण्यासही जे तयार झाले, अशांच्या निषेधासच खरी किंमत आहे. आणि हिंदुस्थानांत काय, किंवा आयर्लंदांत काय, अशा प्रकारचे ओजस्वी परंतु सदय, उत्साही परंतु विचारी, अत्याचारशत्रु परंतु धीट, व स्वतःच्या बचावाची काळजी न करणारे—असे लोक जेव्हां निषेधास प्रवृत्त होतील, व एका गोष्टीच्या निषेधाबरोबरच तिच्यापेक्षां बऱ्या अशा देशसेवेच्या दुसऱ्या गोष्टीचें प्रवर्तन करतील तेव्हांच अत्याचार थांबतील !

**आयर्लंदातील लोकमताचे पुढारी**—प्रत्येक देशांत लोकमताचे पुढारी बहुधां मध्यम स्थितींतील वर्गांमध्येंच उत्पन्न झालेले आढळून येतात. याचें एक कारण असें आहे कीं, खऱ्या सुशिक्षित लोकांचा

भरणा याच वर्गांमध्यें मुख्यत: असतो. कनिष्ठ प्रतीचा वर्ग व अशिक्षित वर्ग यांची बहुधा समव्याप्तिच असते असें ह्मणण्यास हरकत नाहीं, व अशिक्षित मनुष्यांचे मनांत देशहितासारख्या व्यापक व उन्नत विचाराच्या गोष्टी येणें सहसा कठीण असतें. या वर्गास स्वराज्यापेक्षां सुराज्याचीच किंमत अधिक वाटते. त्यांना ज्याच्या अमलापासून तात्पुरतें सुख मिळेल तोच अधिकारी हवासा वाटतो; मग त्यांचा राजा, अधिराजा सगळा कायतो तोच. सुराज्य व स्वराज्य यांतील भेद मार्मिक व रसिक मनुष्यासच कळणें शक्य आहे. तसेंच स्वराज्याच्या अधिष्ठानाशिवाय सुराज्याचे पाय जमिनींत टेंकले तरी ते चिरकाल तग धरूं शकत नाहींत, हें अशिक्षित वर्गास कळण्यासारखें नसतें. आयर्लंदांत ब्रायन व कॉरमॅक राजापासून व हिंदुस्थानांत अजात-शत्रु धर्मराजापासून एडवर्ड बादशहापर्यंत झालेल्या निरनिराळ्या कारकीर्दींत, कोट्यावधि शेतकरी वर्गांच्या प्रत्यक्ष स्थितींत व सुखदु:खांत जो कांहीं फरक वेळोवेळीं पडलेला असेल त्याचा धागा कार्यकारणसंबंधानें थेट राजापर्यंत नेऊन भिडविण्याचें ज्ञान त्यांस केव्हांही होतें असें ह्मणतां येत नाहीं. खांद्यावर आसूड टाकून शेतकामांत अष्टौप्रहर खपणाऱ्या शेतकऱ्यास पोटभर भाकर ददातीशिवाय मिळाली ह्मणजे त्याची दिवाळी झाली. मग ती पोटभर भाकर ज्याच्या अमलाखालीं त्यास मिळाली तो राजा स्वदेशी असला तरी त्याचा त्यास फार हर्ष नाहीं, अगर परदेशी असला तरी त्याचा त्यास फार विषाद नाहीं. ही कनिष्ट व अशिक्षित वर्गांची स्थिति झाली. मानमरातब व धन-संपत्ति यांच्यामुळें ज्यांस श्रेष्ठ वर्ग असें मानतात, त्यांचीही गोष्ट एका अर्थी कनिष्ठ वर्गासारखीच असते. कनिष्ठ वर्गास शिक्षण महाग अतएव दुर्मिळ असतें यामुळें त्यांचे मनांत देशाविषयीं व्यापक व उन्नत विचार येत नाहींत; या ‘ श्रेष्ठ ’ वर्गास शिक्षण सर्वस्वीं सुलभ असतें, तथापि शिक्षणावांचून पोट भरण्याचें साधन त्यांस असल्यामुळें त्यांपैकीं पुष्कळांना शिक्षणाची जरूरी नसते व महत्त्वही वाटत नाहीं. शिवाय त्यांना प्रिय असा मानमरातब व धनसंपत्ति यांचीं पाळेंमुळें सद्य:स्थितींत खोल गेलेलीं असल्यामुळें ती स्थिति बदलली असतां अगर तींत बिघाड झाला असतां या पाळामुळांचें तोंड उघडें पडून, अगर तीं छाटलीं जाऊन

हळू हळू आपण निर्जीव होऊं अशी भीति त्यांस वाटते. यामुळें देश-कार्याविषयीं व्यापक विचार मनांत येण्याची पात्रता त्यांजमध्यें असली तरी ते विचार कृतींत उतरून प्रत्यक्ष देशकार्यांत पुढारीपण घेण्याचे कामीं स्वार्थबुद्धि त्यांचे आड येते. यास्तव देशकार्याचे चळवळींत अशा श्रेष्ठ वर्गांतील लोक पुढारीपणानें पडलेच तर ते, त्या चळवळीस परिणत रूप येऊन विजयश्रीचें तोंड दिसूं लागल्यावर मग पडूं लागतात. वेदांतांत शहाणपणाचें उदाहरण द्यावयाचें झालें ह्मणजे 'अळी' (तृणजलुके) चें देतात. ही अळी गवतावरून चालत असतां पुढच्या काडीवर पाय टाकून तो कायम केल्यावर मग मागचा पाय उचलते. अळी हा प्राणी प्रगमनशील नव्हे असें ह्मणतां येणार नाहीं; परंतु प्रगतीपेक्षां आपल्या आधाराचा व सुरक्षिततेचाच विचार तिच्या मनांत अधिक प्रबळ असतो; व मान-मान्यतेस सोकावलेले, आणि अनिष्ट अशा सद्यःस्थितींतही जें काय मिळेल तें तूप आपल्या पोळीवर ज्यांस ओढून घेतां येतें अशा प्रकारचे देशांतील ' श्रेष्ठ ' वर्गाचे लोक राजकारणांत या उपमानभूत अळीप्रमाणें होत. 'आहे याहून दुसरें एखादें कांहीं अधिक बरें असेल; परंतु आहे हेंही एका अर्थी बरेंच आहे ' अशा प्रकारची त्यांची विचारसरणी अ-सतें. परंतु मध्यम स्थितींतील लोकांची गोष्ट या दोन्ही वर्गांहून वे-गळी असते. कनिष्ठ वर्गापेक्षां ते अधिक सुशिक्षित असतात; आणि श्रेष्ठ वर्गांतील लोकांप्रमाणें मानमरातब व धनसंपत्ती यांच्या पंकांत त्यांचे पाय रुतलेले नसतात. यामुळें देशांतील लोकमताचे व राष्ट्रीय चळवळीचे पुढारी होण्यास तेच सर्वस्वीं लायख ठरतात. एकदां प्रस्था-पित झालेल्या राज्यकारभाराच्या ओघाची दिशा प्रजेस अधिक फाय-देशीर होईल अशा रीतीनें बदलणें हें कर्म कोणत्याही देशांत महाकठीण असतें; व राजकीय चळवळीच्या महापुरांत चार हात टाकून व परंपरेच्या प्रवाहाची धार तोडून पैलतीरास जाण्याचें धाडसी कर्तव्य अथवा हौसेचें धाडस करण्याचे कामीं पटाईत पोहणारे लोक कधीं दगावले नाहींत असेंही होत नाहीं. तथापि हें करण्यास, पोहणाराचे अंगावर स्वार्थाचें ओझें जितकें कमी असेल तितकें अधिक बरें असतें. सार्वजनिक चळ-वळींत मध्यम स्थितींतील लोक धनुष्यापासून सोडलेल्या एखाद्या तीरा-

प्रमाणें कार्यक्षम होतात याचें कारण असें आहे कीं, तीराच्या फळा-प्रमाणें त्यांचें डोकें शिक्षणानें तीक्ष्ण झालेलें असतें, व तीराच्या पंखाप्रमाणें त्यांच्या अंगावरचा भार हलका असतो. यामुळें त्यांना राष्ट्रीय कार्यांतील ' लक्ष्यवेध ' बराबर व जलद करितां येतो.

आयर्लंदचा काय किंवा हिंदुस्थानचा काय, कोणत्याही देशाचा इतिहास पाहिला तरी वरील सिद्धांताचीच सत्यता दिसून येते, आयर्लंदांतील कनिष्ठ वर्गांतील लोकांनीं सोसवेल तेथपर्यंत त्रास तरी सोसला; अगर तो सोसवेनासा झाला तेव्हां आडदांड लोकांप्रमाणें निवळ दंडुकें चालवून व अक्षम्य असा रक्तपात करून, आपल्या शोकक्षोभाचा, आपल्यास व दुसऱ्यास घातक अशा रीतीनें त्यांनीं उपशम केला. ओक बॉईज, व्हाईट बॉईज, पीप ऑफ डे बॉईज, हार्टस ऑफ स्टील, रिबन सोसायटी, डिफेंडर्स–वगैरे दंगेखोर व आडदांड लोकांचे अनेक प्रकार आयर्लंदांत झाले. या सर्वांना स्वतःस काय हवें हें बहुधा नेमकें नीट समजत नसे; व जेव्हां तें समजत असे तेव्हां त्यांची मागणी बहुधा सद्यःस्थितींत ताप देणाऱ्या एखाद्या किरकोळ गोष्टीबद्दल असे. त्यांनीं केलेला रक्तपात राष्ट्रीयत्व मिळविण्याकरितां होता असें ह्मणतां यावयाचें नाहीं. त्यांचीं दुःखें खरीं होतीं. परंतु त्यांच्या दंग्याधोप्यामुळें कित्येक वेळ निरपराधी लोकांचाही घात होई, व केवळ वड्याचें तेल वांग्यावर निघे. ' राष्ट्रीय ' अशी चळवळ त्यांच्या हातून होत नसे. उलट पक्षीं आयर्लंदांतील 'श्रेष्ठ' वर्गाचे लोक ह्मणजे धनाढ्य अमीर उमराव व जमीनदार, हे फक्त आपल्या जमीनदारीचें उत्पन्न खाऊन चैनींत रहात. राष्ट्रकार्याचें त्यांस स्वप्नही पडत नसे. वास्तविक ह्मटलें ह्मणजे जमीनदार, विशेषतः सुशिक्षित जमीनदार, यांनींच राष्ट्रकार्यांत पुढाकार घ्यावा. परंतु आयर्लंदांतील हे लोक अत्यंत जुलमी व व्यसनी असत. यांच्या घरीं लढाऊ बकरे, शिकारी कुत्रे, खिल्लारी वळू , शर्यतीचे घोडे, जुवेगारांचे ताफे, मस्त पैलवान आणि बेफाम लढवय्ये यांचे तांडे, फर्मासीचीं पक्वान्नें रांधणारे आचारी, आणि दारूचे रांजण हेंच सांपडावयाचें ! एखादें पोथीपुस्तक, किंवा सुशिक्षित स्नेही अथवा सात्विक व धार्मिक आश्रित अगर सल्लागार ह्मणाल तर मात्र औषधासही मिळाव-

याचा नाहीं. पण 'अपापाचा माल गपापा जायचा' अशी एक म्हण आहे. आयरिश जमीनदारांस कुळांवर जुलूम करून लाखों रुपये मिळत; पण त्यांचा या वर सांगितलेल्या रीतीनें अपव्यय होई. त्यांना दारूच्या निशेंत उद्यांची आठवण होत नसे; मग जें दृष्टीस पडण्याला पिढ्यानपिढ्यांच्या पलीकडे नजर द्यावी लागते तें राष्ट्रकार्य त्यांना कसें दिसणार ? वरील वर्णन वाचून आज हिंदुस्थानांत मोडकळीस आलेल्या कित्येक जुन्या घराण्यांची आणि 'तांबड्या व काळ्या शाईच्या' सरदारांची आठवण होऊन दुःख झाल्यावांचून रहात नाहीं. स्वाभाविकपणेंच ज्यांनीं पुढाकार घ्यावा त्यांची ही स्थिति असल्यामुळें, व पुढाऱ्याशिवाय पुढें पाऊल टाकण्यास लागणारें शहाणपण व धैर्य आयरिश लोकांचे अंगीं प्रथमतः नसल्यामुळें त्यांना, केवळ अपस्वार्थीपणानें राजकारणांत पडणाऱ्या दुय्यम प्रतीच्या पुढाऱ्यांची कास धरावी लागे, व त्यांच्या मागून जातांना ते नेमके खड्यांत पडत. आयर्लंदची ही स्थिति अठराव्या शतकाच्या मध्यभागापर्यंत होती. परंतु पुढें ती हळू हळू पालटली. धर्मसहिष्णुता वाढूं लागली; क्याथोलिक लोकांविरुद्ध केलेल्या कायद्यांचें बंधन शिथिल पडूं लागलें; शिक्षणाचा प्रसार होऊं लागला व अशा रीतीनें राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा कोंब हळू हळू वर येऊं लागल्यावर, सुशिक्षित असा जो मध्यम वर्ग त्याच्या हातांत राष्ट्रीय कार्यांतील पुढारीपणाचीं सूत्रें जाऊं लागलीं. तीं त्व्हांपासून आजपर्यंत अबाधितपणें त्यांच्याच हातांत राहिलीं आहेत, या गोष्टीमुळें बदललेल्या परिस्थितींत जमीनदारांचें वजन कमी होऊं लागलें. मध्यम व कनिष्ठ वर्ग यांच्या मनाचा मिलाफ बनूं लागल्यानें सरकारी कायदे होऊन जमीनदारांच्या जुलमास व लोभास आळा पडूं लागला. व त्यांच्या डोळ्यांवरची धुंदी जाऊन आतां कोठें ते हळू हळू राष्ट्रीय कार्यांत थोडथोडे मन घालूं लागले आहेत.

आयर्लंदच्या गेल्या दीडशें वर्षांच्या इतिहासांत राष्ट्रकार्यांतील पुढारीपण स्वतंत्र धंद्याच्या लोकांकडेच राहिलेलें आहे; व त्यांतही बारिस्टर, वकील व विद्याविषयक धंदा करणारे हेच प्रमुख आहेत. ग्रॅटन, फ्लड, शील, क्यूरन, ओकॉनेल, आयझॅक बट वगैरे कायदेशीर चळवळींचे

पुरस्कर्ते. व तसेंच टोन, शीअर्स बंधु वगैरे बेकायदेशीर चळवळीचे पुरस्कर्ते हे सर्व बॅरिस्टर होत. रॉबर्ट एमेट हा कॉलेजांतून घालवून दिलेला 'अंडर ग्रॅज्युएट' होता. ल्युकस हा ( एम. डी. ) वैद्य होता. स्विफ्ट, मॉलिनो, बार्क्ले, बर्क वगैरे पुढारी आपल्या विद्वत्तेमुळें जगप्रसिद्ध होते. टॉमस मूर हा प्रख्यात कवी होऊन गेला. आणि थोरला डिलन, डेव्हिस, डफी, सुलिव्हन, ओब्रायन, ओकॉनर, मॅकार्थी वगैरे लोक विद्वान् वर्तमानपत्रकर्ते व लेखक ह्मणून प्रसिद्ध आहेत. जॉन कीओघ हा सुखवस्तु व्यापारी व पार्नेल हा सुखवस्तु जमीनदार होता. स्वतः श्रीमंत असून देशकार्यांत पुढारीपण घेणाऱ्या अशा अर्ल ऑफ चार्लमांट, लॉर्ड फिटझरल्ड, स्मिथ ओब्रायनसारख्या लोकांची नांवें क्वचितच आढळतात; व या गोष्टीचें कारण वर सांगितलेंच आहे. आयर्लंदच्या इतिहासाच्या प्रारंभीं ओनील, एडमॉड, वगैरे शूर संस्थानिक लढाया व बंडें करून राष्ट्राच्या इतिहासांत नांव ठेवून गेले; तथापि तो त्यांचा काळ इंग्रजी राज्यसत्ता पूर्णपणें स्थापित होण्याच्या पूर्वीचा होता; व ह्मणून राष्ट्रीय चळवळीच्या या संबंधांत त्यांचा नामनिर्देश आह्मीं विशेष रीतीनें केला नाहीं. स्विफ्ट, मॉलिनो यांनीं प्रत्यक्ष राजकीय चळवळींत कधींही पुढाकार घेतलेला नव्हता; परंतु यांचे लेख विद्वत्तापूर्ण, मुद्देसूद व कडक असत; आणि त्यांचे योगानें समाजांत मोठी चळवळ उडून जात असे. मॉलिनो हा शास्त्रज्ञ व खरा तत्त्ववेत्ता होता; तथापि त्याचे मनांत उज्वल देशभक्ति असल्यामुळें त्यानें 'इंग्रजी कायद्यानें झालेली आयर्लंदची स्थिति' नांवाचें पुस्तक १६९८ सालीं लिहिलें व तें राजास अर्पण केलें. त्याच्या योगानें इंग्लंदमध्यें मोठी चळवळ उडून गेली; व सदरहू पुस्तक राजद्रोही असें ठरवून तें चवाठ्यावर जाळून टाकावें असा ब्रिटिश पार्लमेंटनें हुकूम केला. स्विफ्ट हा मुत्सद्दी नसून धर्मोपदेशक होता; तथापि त्यानें 'ड्रेपीअरचीं पत्रें' नांवाचे जे लेख प्रसिद्ध केले त्यांत इंग्रजी राज्यकारभारावर बराच ताशेरा झाडला असल्यामुळें त्यांच्या लेखकावर खटला करण्याचें ठरवून, तो कोण हें हुडकून काढण्याकरितां आयर्लंदमधील व्हाईसरायसाहेबांनीं तीन हजार रुपयांचें बक्षीस लावलें होतें. डॉ. ल्युकस याच्याही लेखांवर राजद्रोहाचा व बंडखोरपणाचा छाप

पडून तेही चवाठ्यावर जाळण्यांत आले होते; व अधिकाऱ्यांनीं त्यास कोणच्या तरी रीतीनें गुन्हेगार ठरवून तुरुंगांत टाकण्याची शपथ वाहि-ल्यामुळें त्याला कांहीं दिवस आयर्लंड सोडून इंग्लंदांत वैद्यकीचा धंदा करावा लागला. त्याजविषयीं ग्रॅटननें असें ह्मटलें आहे कीं, आयर्लंदांत ' राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या कल्पनेचा पाया ल्यूकस यानें घातला. आयर्लंद-च्या त्या तशा पडत्या काळांत स्विफ्टनंतर ' स्वातंत्र्य ' या भयंकर शब्दाचा धीटपणानें उच्चार करणारा असा ल्यूकसच होऊन गेला.' एड-मंड बर्क हा इंग्लंदमध्यें रहात होता. तरी आयरिश लोकमताच्या प्रमुख पुढाऱ्यांमध्येंच त्याची गणना होते. अमेरिकेंतील स्वातंत्र्याकरितां युद्ध होण्यास तो बऱ्याच अंशीं कारणीभूत झाला, व पुढें फ्रान्समधील राज्यक्रांतिकारक लोकांविरुद्ध त्यानें जो आक्रोश केला त्याचे योगानें स्वातंत्र्याचा भक्त व मित्र अशा प्रकारच्या त्याच्या कीर्तीस मुळींच बाध येत नाहीं. ग्रॅटन याचा सर्व कटाक्ष नेहमीं, पार्लमेंटमधील एक पक्ष आपल्या देशाचे कार्यास अनुकूल राहील असें नेहमीं वर्तन ठेवावयाचें व केव्हांही फंदफितुरीत न पडतां केवळ कायदेशीर रीतीनें चळवळ करा-वयाची असा होता. तथापि हाच मुत्सद्दी, १७८२ चे सुमारास आयरिश पार्लमेंटच्या स्वातंत्र्याची मागणी निकरावर आली असतां जर इंग्लंद आयर्लंदची मागणी कबूल न करील तर मग काय होणें असेल तें होईल असें ह्मणण्यास तयार झाला होता. तसेंच अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें पाहतां जन्मभर कायदेशीरपणानें व नेमस्तपणानें वागलेल्या या मुत्सद्यावर, इंग्लं-दच्या अडचणीचा फायदा घेऊन, पार्लमेंटचें स्वातंत्र्य मिळतांच प्रतिबंधक व्यापाराचे कायदे रद्द करावे अशी नवीन मागणी करण्याबद्दल, लिबरल पक्षाच्या या मित्रावर तो ' कृतघ्न ' व ' भयंकर बडखोर ' आहे असा आरोप इंग्लंदनें लादण्यास सोडला नाहीं, कारण याच सुप्रसिद्ध प्रसंगीं या नेमस्त मुत्सद्यानें इंग्लंदला खालील उत्कृष्ट शब्दांनीं रोखठोक जबाब दिलेला होता. तो ह्मणाला—' कोणाचे कितीही डोईजड उपकार झाले असले तरी त्यांचे पायीं पुरुषास आपली सदसद्विवेकबुद्धि, स्त्रीस आपलें पाति-व्रत्य व राष्ट्रास आपलें स्वातंत्र्य गमावण्यास तयार हो असें ह्मणणें या-सारखा अधमपणा जगांत दुसरा कोणताही नसेल.' १७९८ सालच्या

आयरिश बंडाच्या धामधुमीचे वेळीं या नेमस्त मुत्सद्यावर ' युनायटेड आयरिशमेन ' या नांवाच्या गुप्त मंडळींत सामील झाल्याच्या आरोपावरून खटला होण्याची अगदीं तयारी झाली होती. परंतु तो प्रसंग मोठ्या शर्थीनें टळला. अधिकाऱ्यांच्या संशयास फक्त आधार काय तो इतकाच होता कीं, या गुप्त मंडळींतील नीलसन नांवाचा एक पुढारी ' आपण मंडळीचे सभासद व्हाल काय ' असें विचारण्यास ग्रॅटन याजकडे गेला; व सभेचें उद्देशपत्रक त्यानें ग्रॅटनचे टेबलावर ठेवून दिलें तें तसेंच राहून गेलें. परंतु 'मी सभासद होत नाहीं.' असें ग्रॅटन यानें त्याच वेळीं निक्षून सांगितलें होतें, आणि १७९८ व १८०१ सालच्या बंडासंबंधानें निषेधाचे उद्गारही त्यानें स्वच्छ काढले होते. परंतु केवळ गुप्त पोलिसांचा रिपोर्ट त्याजविरुद्ध होता एवढ्यावरून अधिकाऱ्यांनीं तो रिपोर्ट प्रसिद्ध केला, व त्यामुळें राजानें त्याचें नांव प्रिव्हीकौन्सिलच्या पटावरून काढून टाकलें. एवढेंच नव्हे तर १७८२ सालीं ज्यांनीं त्यास मानपत्रें दिलीं व त्याच्या तसबिरा सभागृहामध्यें लाविल्या त्याच ' राजभक्त ' परंतु विचारशून्य अशा भित्र्या हरीच्या लालांनीं त्याच्या तसबिरा काढून कोठांत फेंकून दिल्या, त्यास अर्पण केलेले बहुमान परत घेतले, व ज्या रस्त्याला त्याचें नांव दिलेलें होतें त्या रस्त्याच्या नांवाची पाटीही काढून फेंकून देण्यांत आली. पण हा मनुष्य खरोखर इतका निस्पृह, शहाणा, कडक पण कायदेशीर बोलणारा व कायदेकानूंस मान देणारा होता कीं, पुढें ब्रिटिश पार्लमेंटचा तो सभासद झाल्यावर मोठमोठे इंग्रजी मुत्सद्दीही निरंतर त्याजकडे पाहून बहुमानानें माना लववीत. फ्लड हा लोकपक्षाचा पुढारी मानला जातो, व पार्लमेंटमधील वादविवादांत त्याच्या कडक टीकेची व राजकर्त्यांस नांवें ठेवण्याची मजल केव्हां केव्हां ग्रॅटनपुढेंही जाई; त्याच्या बोलण्यावरून तो बंडाचा पुढारीही होईल असें वाटे. तथापि १७८०–८२ सालीं आयरिश स्वयंसेवकांच्या सैन्याचे अंगांत लष्करी आविर्भाव संचारण्याच्या ऐनवेळीं तो मागें पडला; प्रधानमंडळांतील अगर त्यांचे ताब्यांतील एकादी वरिष्ठ पगारी नोकरी मिळण्याची हाव त्यानें जन्मभर धरली होती. शील व क्यूरन हे वक्ते असून लोकपक्षाचे वतीनें ते पार्लमेंटमध्यें अधिकाऱ्यांशीं नेहमीं विरोध करीत, व ते

लोकमताचे पुढारी मानले जात. तथापि र्शील यानें पुढें न्यायाधीशाची जागा पत्करली; व क्यूरन हा १८०१ सालच्या बंडास इतका प्रतिकूल होता कीं, आपल्या मुलीचा प्रियकर व भावी जामात, रॉबर्ट एमेट, याजवर बंडाबद्दल खटला झाला तेव्हां त्यानें त्याचें वकीलपत्रही घेण्याचें नाकारिलें! या दोघांही वक्त्यांच्या वक्तृत्वाचा उपयोग वकील या नात्यानें अनेक राजकीय गुन्हेगारांस झाला, तथापि वरील कारणांमुळें त्यांस आमच्या इकडील हल्लींच्या भाषेनें काय ह्मणावें हें समजत नाहीं. आयझॅक बट यास मात्र कदाचित् खरा नेमस्त ह्मणतां येईल. कारण त्यानें स्वतः कायदेशीर मार्गांचें अतिक्रमण कधींही केलें नाहीं, व तो पार्नेलच्या अडवणुकीच्या मार्गासही विरुद्ध होता. तथापि उलटपक्षीं पाहतां या नेमस्तानें फिनिअनसारख्या भयंकर चळवळ करणाऱ्या कटवाल्यांचे खटले जोरानें चालविले; फीनिअन लोकांस सरोस क्षमा करण्यांत यावी असे अर्ज त्यानें केले; आणि ब्रिटिश पार्लमेंटकडून आयरिश लोकांस न्याय मिळण्याचें त्याचें सुखस्वप्न वीस वर्षांच्या अनुभवानें ओसरल्यावर आपल्या उतारवयांत आयरिश पार्लमेंट स्वतंत्र करण्याच्या चळवळींत त्यानें पुढाकार घेतला. डॅनियल ओकॉनेल यास नेमस्त अगर जहाल ह्मणावें याविषयीं तर अत्यंत गूढ पडतें. कारण आपला सर्व जन्म त्यानें न्यायाधीश व अधिकारी यांची फटफजीती व त्यांजवर कडक टीका करण्यांत घालविला होता; शेंकडो संस्था स्थापून, हजारों व्याख्यानें देऊन व लक्षावधी लोकांच्या जंगी जाहीरसभा भरवून एखाद्या राज्यक्रांतीची पूर्व तयारी करावी त्याप्रमाणें त्यानें असंतोष सर्व देशाच्या कान्याकोंपऱ्यांत पसरून राष्ट्रीय चळवळ अगदीं रंगास आणिली होती; स्वतः द्वंद्वयुद्धें खेळून निदान एक वेळ तरी त्यानें आपल्या प्रतिपक्षाचा जीव घेतला होता; लोक आपण होऊन जरी अधिकाऱ्यांवर कधींही हल्ला करणार नाहींत, तरी अधिकाऱ्यांनीं आपली मर्यादा सोडून कुरापत काढिली असतां 'ईश्वरकृपेनें व राष्ट्राच्या नशिबानें काय बनेल तें खरें!' असें उघड ह्मणणारांपैकीं तो एक असून अवघा लष्करी शब्दांचा कोश घेऊन, राष्ट्रीय चळवळींतील अंगांचा व उपांगांचा नामकरणविधि त्यानें त्याचे साहाय्यानें तयार केला होता. तथापि, कायदेशीर अशा कामाकरितां 'न भूतो न

भविष्यति ' अशा प्रकाचा लाखों लोकांचा समुदाय क्लॉनटार्फ येथील इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं भरणाऱ्या जंगी जाहीरसभेंत जमविण्यासंबंधानें संकल्प सुटलेला असून, सभेच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं सरकारी हुकुमानें सभा प्रतिबंधाचे बाबतींत प्रसिद्ध झालेल्या बोटभर चिठींतील मजकूर पाहून त्यानें सभा तहकूब केली, व अखेर खटल्यांत शिक्षा झाल्यावर त्यास केवळ यःकश्चित् शिपायाच्या पाठोपाठ तुरुंगांत जावें लागलें, ही हकीकत मागें सांगितलीच आहे. तसेंच निरपराधी रक्ताचा फक्त एक बिंदू सांडल्यानें जरी राष्ट्रास मोक्ष मिळण्यासारखा असला तरी तो रक्तपात करूं नये हें त्याचें सिद्धांतिक वचनही लोकविश्रुतच आहे. त्याच्या कार्यक्रमांत, ब्रिटिश पार्लमेंटसभेकडून नुसता न्याय मिळविणें व स्वतंत्र पार्लमेंट मागणें या दोन विरोधी गोष्टींचा समावेश निरनिराळ्या वेळीं झालेला होता. डेव्हिस, डिलन, डफी व सुलीव्हन हे पुढारी 'नेशन' पत्राचे संपादक होते. त्यांनीं त्या पत्राचे द्वारें आयरिश लोकांस सर्वोत्कृष्ट तऱ्हेचा ' राष्ट्रधर्म ' शिकविला; ते ओकॉनेल यास नेमस्त ह्मणून नांवें ठेवीत. तथापि डेव्हिस हा राष्ट्रधर्माचा मुख्य उपदेशक असूनही स्वतः घातपात व गुप्त मसलती यांस तो विरुद्ध असे.

तथापि कायदा ह्मणजे एक श्रुतिवचनच आहे असें मानणारी ही कोणीही मंडळी नव्हती, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ' नेशन ' पत्राचा संपादक, डफी, याजवर तीन वेळां खटले झाले. परंतु अखेर तो अमेरिकेंत जाऊन एका इंग्रजी वसाहतीचा मुख्य प्रधान झाला व नंतर सरकारांतून ' सर ' हा किताबही त्यास देण्यांत आला. सुलीव्हन हा डफीनंतर ' नेशन ' पत्राच्या संपादक मंडळावर असून अखेर मुख्य संपादक झाला; व त्यानेंही त्या पत्रांतून राष्ट्रधर्म उत्तम प्रकारचा शिकविला. परंतु त्याच्या वेळीं झालेल्या फीनियन चळवळींत तो सामील नसून डोनोव्हन रॉसा वगैरे फीनियन लोकांनीं गुप्त कटांत त्याचें नांव सामील केलें, असें कळल्याबरोबर त्यानें उघडपणें आपल्या वर्तमानपत्रांत कटाचा निषेध करून तरुण मुलांचें मन त्या चळवळीपासून पराङ्मुख केलें होतें. मायकेल डेव्हिट हा फिनीयन कटांत सामील होता; व परदेशांतून शस्त्रास्त्रें आयर्लंडांत उतरविण्याचे खटपटींत तो पकडला जाऊन दहा वर्षें

काळ्यापाण्यावर गेला. तेथून परत आल्यावर त्यानें लँड लीगची चळवळ केली, व याही चळवळीबद्दल त्याजवर फिरून खटला झाला. तथापि पार्नेलप्रमाणें त्यानेंही गुप्त कटांपासून यापुढें आपलें अंग अलिप्त ठेवलें होतें. पार्नेलइतका इंग्रजी राज्याचा द्वेष करणारा दुसरा कोणी झाला असेल कीं नाहीं, याची शंकाच आहे; आणि लँड लीग व नॅशनल लीग वगैरे कामांत फीनियन लोकांशीं उघड संबंध ठेवून त्यांच्या हातून त्या कायदेशीर चळवळींत होईल तें काम करवून घेण्यास तो कधींहि विन्मुख नसे. तथापि हाईडपार्कमध्यें झालेल्या खुनाशीं सहानुभूति असल्याचा खोटा आरोप जेव्हां त्याजवर 'टाईम्स' पत्रानें आणला, तेव्हां त्यास अत्यंत तळमळ लागून ह्या आरोपाची प्रसिद्धपणें चौकशी व्हावी अशी मागणी भर पार्लमेंटमध्यें त्यानें केली; आणि नंतर कमिशनपुढें झालेल्या चौकशींत त्याच्या वकिलानें तो कोणत्याही गुप्तवधाच्या कटांत नव्हता हें सिद्ध करून घेतलें. पार्नेल नंतर झालेल्या आयरिश पुढाऱ्यांची मजल बहिष्कार ह्मणजे विवक्षित व सार्वत्रिक बहिष्कार—येथपर्यंत गेली आहे. तथापि हाईडपार्कमधील खुनानंतर राजकीय स्वरूपाचे असे अत्याचार आयर्लंदांत गेल्या तीस वर्षांत फारसे झालेले नाहींत.

आयरिश लोकमताचे जे पुढारी होऊन गेले त्यांचा एकंदर वृत्तांत पाहिला ह्मणजे इतर अनेक गोष्टीही दृष्टोत्पत्तीस येतात. निरनिराळ्या आयरिश पुढाऱ्यांच्या निरनिराळ्या कृतींचीं उदाहरणें आह्मीं दिलीं, त्यांवरून सार्वजनिक काम करणाऱ्या व्यक्तींच्या धोरणाला नेहमीं एकच नांव देतां येत नाहीं, असें दिसून येईल. मुत्सद्दीगिरी ही मुळीं अशीच आहे कीं, राजनीतिप्रमाणें तिलाही अनेक रूपें धरावीं लागतात, व आपल्या चारित्र्याचीं मूलतत्त्वें मनानें कायम ठेऊन वागणाऱ्या मुत्सद्याचेही कृतीला स्थळ, काळ, प्रसंग यांचे योगानें निरनिराळें रूप आल्यासारखें दिसतें. एक तर स्वतः मुत्सद्याच्या स्वभावांत, त्याच्या बुद्धिवैभवांत व त्याच्या कार्यक्षमतेमध्यें वयमानाप्रमाणें फरक पडण्याचा संभव असतो; व जगांतील कोणत्याही राष्ट्रामध्यें असा एकही कार्यकर्ता मुत्सद्दी सांपडावयाचा नाहीं कीं, समाजापुढें येऊन त्यानें केलेलें पहिलें भाषण व लेख, टाकलेला पहिला डाव व शेवटचा डाव हे अगदीं एकाच कसास उतरतील. त्याची स्वदे-

शाबद्दलची कळकळ, निर्लोभता व त्याचें दाक्षिण्य या सर्व गोष्टी त्याच्या चरित्राचे सुरवातीस व अखेरीस सारख्याच कायम असतील; परंतु ज्या सार्वजनिक कृत्यास आज बरें नांव मिळेल त्यासही उद्यां लोक वाईट ह्मणतील. व त्यास कदाचित् फिरून उद्यां तेच चांगलें ह्मणतील. दुसरें असें कीं, परिस्थिति बदलल्यानें अगर आपल्या चुका आपणास कळून आल्यानें मनुष्य आपली मतें कधीं कधीं बदलतोही; व तो प्रामाणिक आणि निर्भीड असेल तर आपली मतें बदललीं असें उघडपणें बोलून दाखविण्यास तो भीत नाहीं. तसेंच पुष्कळ वेळां कार्यकर्त्या लोकांची मुख्य दृष्टि कार्यावर असते, व आपल्या स्वतःच्या सुसंगतपणाच्या लौकिकापेक्षां कार्यसिद्धीसच ते अधिक महत्त्व देतात. ग्लॅडस्टनसाहेब प्रथम ' टोरी ' ह्मणून पार्लमेंटांत शिरले व अखेर ते पक्के ' लिबरल ' झाले. याच्या अगदीं उलट प्रकार चेंबरलेन साहेबांचा झाला. लॉर्ड रोजबरी हे प्रथम आयरिश होमरूलचे पुरस्कर्ते असून पुढें ते बडे ' साम्राज्यवादी ' व होमरूलचे शत्रू बनले. हे सर्व फेरबदल केवळ स्वहितबुद्धीनें अगर मनोधैर्याचे अभावामुळें घडले असें कोणासही ह्मणतां येणार नाहीं. आयरिश पुढाऱ्यांपैकीं बहुतेक प्रत्येकावर विसंगततेचा आरोप आणतां येण्यासारखा होता, व या विसंगततेची उदाहरणें दोनच द्यावयाचीं झालीं तर डॅनिअल ओकॉनेल व आयझॅक बट यांचीं देतां येतील. तसेंच सार्वजनिक काम करणाराला लोक जो पुष्कळ वेळां मान देतात तो त्याच्या हातून होणाऱ्या प्रत्यक्ष कार्यसिद्धीला देतात; त्याच्या प्रयत्नाला व परिश्रमाला देत नाहींत. कारण परिणामविरहित प्रयत्न व फलविरहित कर्म याची जरी एक प्रकारची विशेष योग्यता असते, तरी ती समजण्याइतकी मनाची संस्कृति सर्वसाधारण जनतेच्या ठिकाणीं असत नाहीं. कर्मफलाची अपेक्षा धरूं नये असें सांगणें सोपें खरें, परंतु कोणालाही तें प्रत्यक्ष आचरणांत आणण्यास फार दुर्घट असतें, व जनतेला तर तें फारच कठीण. आणखी अशीही एक गोष्ट आहे कीं, सार्वजनिक काम करणाराच्या विजयश्रीचें व लौकिकाचे तेज चिरकाल सारखें टिकत नाहीं; त्याला वारंवार उजळा द्यावा लागतो. परंतु आपल्या कीर्तीची लखाखी कायम राहील अशा प्रकारचा उजळा वेळोवेळीं देण्यास लागणारीं कार्यें, प्रसंग व यश हीं कांहीं कोणाच्या

हातचीं नसतात. यामुळें इतिहासांत दोन प्रकारचे पुढारी पाहावयास सांपडतात. एक प्रकारच्या पुढाऱ्यांचे हातून जन्मांत एखादें महत्कृत्य असें घडून येतें कीं, त्यावेळीं उपमाच नाहीं अशी कीर्ति त्यांना मिळते. परंतु या यशाच्या महापुराचें पाणी बारमास टिकणारें नसल्यामुळें लवकरच नशीब उलट खातें, व पुढें जन्मभर रावत असतांहि त्यांना साधारण कृतज्ञताही कोणी दाखवीत नाहीं. दुसऱ्या प्रकारच्या पुढाऱ्यांचे अंगीं अलौकिक असें कृत्य करण्याची पात्रता नसते ह्मणा अगर तशी त्यांस संधी मिळत नाहीं ह्मणा—त्यांच्या हातून लोकांचे डोळे जरी दिपले नाहींत, तरी त्यांच्या यशोनिर्झराचें पाणी बारमास कायम राहून लौकिक दृष्टीनें व स्वतःचे मनानें थोडेंबहुत देशकार्य करीत बसण्याचें श्रेय त्यांना जन्मभर मिळतें. पहिल्या प्रकारचे पुढारी एका दृष्टीनें पाहतां अवतारी होत; मात्र अवतारकृत समाप्त झाल्यानंतरचा काल लोकांस व त्यांस दोघांनाही कंटाळवाणा जातो. यासंबंधांत दोन तीन उदाहरणें आयरिश इतिहासांत ठळक आहेत. सन १७८२ सालीं, ह्मणजे ग्रॅटनच्या प्रयत्नानें आयरिश पार्लमेंट स्वतंत्र झालें झालें त्या वेळीं तो वयाच्या तिशीच्या आंत बाहेर होता. परंतु असा कांहीं चमत्कारिक योगायोग घडून आला कीं, देशांत राष्ट्रीय चळवळीस नांवरूप येण्यास, प्रॉटेस्टंट लोकांच्या मनांतील धर्मवैर नाहींसें होऊन राष्ट्रीयत्वाचा उदय होण्यास व अमेरिकेंत इंग्रजांचा पराभव होण्यास एकच गांठ पडली, ग्रॅटनसारखा तरतरीत मुत्सद्दी व वक्ता पार्लमेंटमध्यें शिरतांच तो बोलेल तें होत गेलें; आणि पार्लमेंटच्या स्वातंत्र्याची मागणी आयरिश लोकांचे तोंडून येतांच ती ब्रिटिश पार्लमेंटनें त्यांस दिली. अर्थात् ग्रॅटन यास ' राष्ट्रजनक ' ही पदवी लोकांनीं एकमतानें दिली; एवढेंच नव्हे तर त्याला यापुढें बॅरिस्टरचा धंदा न करतां स्वस्थपणानें बसून फक्त देशकार्याकडे मन घालतां यावें ह्मणून आयरिश पार्लमेंटनें एकमतानें त्याला एक लक्ष पौंडाची, ह्मणजे त्या काळीं दहा लक्ष रुपयांची रक्कम बहाल करण्याचा ठराव केला! परंतु ग्रॅटनच्यानें एवढी रक्कम घेववेना; व शेवटीं मोठ्या मिनतवारीनें निदान पन्नास हजार पौंडांची रक्कम तरी त्यानें घ्यावी असा त्याजवर जुलूम झाला व त्यानें ती घेतली ! त्यानंतर वकिलीचा वगैरे सर्व धंदा

सोडून देऊन त्यानें सर्व जन्म फक्त लोकसेवेंत घालविला. परंतु हें अवतारकृत झाल्यानंतर पुढें आयुष्याचीं सुमारें तीस वर्षें त्यानें घालविलीं; त्या अवधींत त्याचा स्वतःचा कांहीं दोष नसतां त्याच्या यशास ओहोटी लागून तें बहुधा नामशेष झालें. वास्तविक त्यानें या अवधींत अत्यंत महत्त्वाचें असें काम केलें. १७८२ सालीं पार्लमेंट स्वतंत्र झाल्यावर पुढें १८ वर्षेंपर्यंत त्यानें त्या पार्लमेंटची सुधारणा करण्याचे कामीं अविश्रांत श्रम केले; परंतु या सुधारणेस इंग्रज जमीनदार, लांचलुचपतीस लाचावलेले मेंबर लोक व इंग्रजी प्रधानमंडल इतकी मंडळी विरुद्ध असल्यामुळें, त्याची निराशा झाली. सन १७९८ सालीं वूल्फटोनचें बंड होऊन त्यानें चालविलेल्या शांततेच्या चळवळीस धोका आला; व १८०१ सालीं आयरिश पार्लमेंट मोडून ब्रिटिशपार्लमेंटास जोडण्यांत आलें. १७९८ नंतर ग्रॅटन उद्विग्न होऊन कांहीं दिवस देशत्याग करून राहिला होता; या अवधींत त्याला राजद्रोहक कटांत सामील असल्याच्या खोट्या संशयावरून पुष्कळ त्रास झाला; पुढें शांतता झाल्यावर तो पुष्कळ वर्षें ब्रिटिश पार्लमेंटचा सभासद होऊन काम करीत असे; व इंग्रजी मुत्सद्दीही त्याला मान देत असत. तरी १७८२ चा ग्रॅटन व आतांचा ग्रॅटन यांत लोकदृष्टया जमीनअस्मानची तफावत होती. वास्तविक स्वतः प्रॉटेस्टंट असून १७८२ नंतरचीं सर्व वर्षें रोमन क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कामीं अत्यंत परिश्रम करण्यांत त्यानें घालविलीं. आयरिश लोकांचे मित्र व शत्रू दोघांकडूनही देशभक्तीबद्दल सारखाच धन्यवाद कोणाला मिळाला तर तो ग्रॅटन यासच होय. असें असतां पुढें पुढें स्वतः आयरिश लोक त्यास मान देईनासे झाले. त्याच्या मृत्युचे आधीं थोडीं वर्षें झालेल्या निवडणुकींत दंगा होऊन त्यास जखमही झाली, व अखेर आयरिश स्वातंत्र्याविषयीं निराश होत्साता खिन्न होऊन त्यास मरण आलें! डॅनियल ओकॉनेल इतका लोकप्रिय पुढारी आयर्लंदांत आजपर्यंत झालेला नाहीं. हा आयरिश लोकांचा अनभिषिक्त असा राजाच होता; तथापि तीही उणीव राहूं नये म्हणूनच कीं काय इतिहासप्रसिद्ध अशा स्थळीं भरलेल्या एका जंगी जाहीरसभेंत त्याच्या भक्तांनीं त्याच्या डोक्यावर राष्ट्रीय चिन्हांचा राजमुकुट प्रत्यक्ष घातला ! परंतु मागें सांगितल्या-

प्रमाणें क्लॉनटार्फ येथील प्रचंड सभेस प्रतिबंध करून सरकारानें जाहीरनामा प्रसिद्ध केला व तो त्यानें मान्य केला. त्याबरोबर सर्व जन्मभर मिळविलेल्या लोकप्रियतेचें त्याचें पुण्य क्षणार्धांत खलास झालें; व मग त्यानें काय वाटेल तें केलें तरी विसकटलेली घडी फिरून बसली नाहीं. ओकॉनेल याची लोकप्रियता पुष्कळ अंशीं सकारण होती. शंभर वर्षे लाथा खाऊन पायमाल झालेल्या क्याथोलिक लोकांतला पहिला बॅरिस्टर व पहिला पार्लमेंटचा सभासद ओकॉनेल हाच होता. परंतु आपल्या कारकीर्दींत त्यानें वकिलीचें चातुर्य, वक्तृत्व, धैर्य व परोपकारबुद्धि यांच्या योगानें समाजावर विलक्षण छाप बसविली. सरकारी जुलमानें गांजलेल्या अनाथांचा नाथ कैवारी काय तो ओकॉनेल अशी त्याची ख्याति झाल्यानें त्यानें आरंभिलेल्या कार्यास वजन आलें, व क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या त्याच्या भगीरथ प्रयत्नास १८२९ सालीं यश आलें त्यावेळीं त्याच्या कीर्तीचा कळस झाला. आपण आतां हातीं घेऊं ती कसलीही चळवळ साध्य झालीच पाहिजे, या अहंकारानें त्यानें चळवळ सुरू केली, व तिला पुष्कळ ऊतही आला. परंतु त्याचा अवतार १८२९ मध्येंच खरोखर समाप्त झाला होता; यामुळें या पुढची त्याची चळवळ फसली व अधिकाऱ्यांना त्याला तेव्हांच तोंडांत टाकतां आलें. १८४४ सालीं त्याजवर खटला होऊन त्यास नऊ महिन्यांची शिक्षा झाली; तेव्हां त्याच्या शब्दाला मान डोलविणाऱ्या व त्याच्या डोक्यावर मुगूट घालणाऱ्या लक्षावधि लोकांपैकीं एकानेंही त्याच्याकरितां हत्यार उपसलें नाहीं. तरुण पिढी त्यास ' मवाळ ' ह्मणूं लागली व त्याची शिक्षा अपीलांत रद्द झाली तरी त्याची लोकप्रियता एकदां गेली ती गेलीच. पार्नेलचीही गोष्ट अशीच आहे. या पुढाऱ्यानें लँड लीग व नॅशनल लीग या बाबतींत केलेले प्रयत्न फार महत्त्वाचे होते. तसेंच पार्लमेंट सभेमध्यें अडवणुकीच्या मार्गाचें अस्त्र त्याला साध्य झाल्यामुळें, पूर्वीं कोणाही पुढाऱ्याला ब्रिटिश पार्लमेंटमध्यें जें यश मिळालें नाहीं तें त्यास मिळालें. हें यश, हाईड पार्कमध्यें झालेल्या खुनाशीं त्याचा जो संबंध जोडण्यांत आला व त्यावर जें कमिशन बसलें त्याच्या योगानें द्विगुणित झालें; व शेवटीं कमिशनचा निकाल त्याला अनुकूल असा झाला त्या दिवशीं त्या-

च्या कीर्तीचा कळस झाला. परंतु लवकरच एका घटस्फोटाच्या प्रकरणांत त्याच्या यशास धक्का बसून गाडें जें एकदां उलटलें तें उलटलेंच. ग्लॅडस्टन व इतर लिबरल होमरूलर मुत्सद्दी यांनीं त्यास सोडलें, इतकेंच नव्हे तर त्याच्या पक्षाच्या लोकांनींही त्यास पुढारीपणापासून पदच्युत केलें व त्याचा अंत दुःखांत व अपयशांत झाला. आज अनेक वर्षांनंतर केवळ इतिहासदृष्टया विचार करणारांस ग्रॅटन, ओकॉनेल व पार्नेल यांची योग्यता, त्यांच्या उतारकाळांत खुद्द त्यांच्या देशबांधवांना वाटली त्यापेक्षां अधिक वाटेल यांत शंका नाहीं. तथापि सार्वजनिक काम करणाऱ्या पुढाऱ्याचें चरित्र हें एकाद्या नदीच्या प्रवाहाप्रमाणें कित्येक वेळां भासतें. आज तिचा प्रवाह एका दिशेस वहात असून दुसऱ्या दिशेस वाळवंट मोकळें पडलेलें दिसावें; तर उद्यां पहावें तों जेथें वाळवंट असावें तेथें पाणी मारे जोरांत व खळखळ वहात असून पाण्याच्या जागीं कोरडें रुक्ष वाळवंट दृग्गोचर होतें. अशी स्थिति असतां ज्यांना आपलें धोरण व आपलीं तत्त्वें, आपलें उद्दिष्ट व आपली कार्यसिद्धि या सर्वांचा प्रवाह, प्रारंभापासून अखेरपर्यंत, खडक फोडून त्याच्या तीरामधून वाहणाऱ्या नदीप्रमाणें स्वच्छ, निर्मळ, एकमार्गी व अनिरुद्ध असा ठेवतां येईल ते खरोखरच फार धन्य. पण हा धन्यवाद लाभणारीं माणसें मात्र बहुधा दुर्मिळ होत.

# आयर्लंद व हिंदुस्थान

यांचें परस्पर प्रमाण.

लोक संख्येचें प्रमाण.


१ : ६४




क्षेत्रफळाचें प्रमाण.

१ : ४८




ग्रीनलंद
आयर्लंद
यूरोप
रशियन एम्पायर.
आशिया
हिंदुस्थान
आफ्रिका
उत्तर अमेरिका
दक्षिण अमेरिका
ऑस्ट्रेलिया
१०० ८० ६० ४० २० ० २० ४० ६० ८० १०० १२० १४०

# भाग १ वा

## आयर्लंद व हिंदुस्थान.

**साम्यदर्शन**—येथवर आयर्लंदचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास आह्मी सांगितला. त्या पैकीं कोणत्या भागांत हिंदुस्थानचें व आयर्लंदचें साम्य विशेष आहे, हें वाचकांचे लक्षांत आलें असेलच. मात्र आयर्लंदचा इतिहास हा केवळ स्थूल उपमानादाखल घ्यावयाचा आहे. अर्थात् प्रत्येक बाजूनें व किरकोळ गोष्टींतही साम्य हुडकित बसणें हें, ही स्त्री गजगामिनी आहे असें रूपक केलें असतां, ' तर मग तिचा शुंडादंड कोठें आहे तो दाखवा ' असें विचारण्या इतकेंच अयुक्तिक होईल. सृष्टीमध्यें जितकें साम्य तितकेंच वैषम्यही भरलेलें आहे, व कोट्यानकोटी मनुष्यांमध्यें अगदीं हुबेहुब सारख्या चेहऱ्यांच्या दोन व्यक्ती ज्याप्रमाणें सांपडणें कठिण, त्याप्रमाणेंच वस्तुतः अगदीं तंतोतंत सारख्या इतिहासांचीं अशीं दोन राष्ट्रेंही सांपडणें कठिण आहे. तथापि मनुष्यस्वभाव चोहोंकडे एकच असतो व पृथ्वीच्या निरनिराळ्या भागांत भौतिक उपाधि पुष्कळ वेळां समानलक्षणात्मक असतात. यामुळें वस्तुतः नसलें तरी स्वरूपतः भ्रम उत्पन्न होण्याइतकें साधर्म्य व्यक्तीप्रमाणें राष्ट्रांतही आढळून येण्यासारखें आहे. साधर्म्य व वैधर्म्य हे संबंध हुडकून काढण्यास एक प्रकारची मार्मिकता लागते; व मनुष्य मार्मिक असला तर भेद न विसरतां साधर्म्य पाहण्याचें काम तो करूं शकतो. हिंदुस्थान व आयर्लंद यांच्यामधील साधर्म्य व वैधर्म्य पाहण्याचें हें काम मार्मिकपणानें व केवळ सत्यान्वेषणदृष्टीनेंच केलें पाहिजे, नाहीं तर फसगत व्हावयाची. असो; आतां प्रथमतः आपण साधर्म्याविषयीं विचार करूं.

सुधारणेचीं अंगें व उपांगें यांचे दृष्टीनें पाहतां आयर्लंद व हिंदुस्थान यांजमध्यें पुष्कळच साम्य आहे. सेल्ट व ट्यूटन हे दोन्ही प्रकारचे लोक

'यूरोपियन' या एका नांवाखालीं मोडतात खरे. तथापि स्वभावगुणांच्या दृष्टीनें त्यांच्यामध्यें फार फरक आहे. आयरिश लोक हे सेल्ट शाखेपैकीं असून इंग्रज लोक टयूटन शाखेपैकीं आहेत; व आयरिश मानवकुल हें भाषा, स्वभावगुण व चारित्र्य यांचे दृष्टीनें इंग्रज मानवकुलापेक्षां भरत खंडांतील आर्य मानवकुलासच अधिक जवळ आहे. आयरिश भाषा फार सफाईदार असून संस्कृतप्रमाणें मृदुव्यंजनपूर्ण आहे. इतकेंच नव्हे तर, तुलनात्मक भाषाशास्त्रकोविदांचें असें मत आहे कीं, आयरिश भाषा ही, रूप विकृति वगैरेंच्या दृष्टीनें संस्कृत भाषेस वस्तुतः जितकी जवळ आहे तितकी ती युरोपियन भाषांनाही जवळ नाहीं. सुधारणेच्या प्रगतीच्या बाजूनें विचार करितां आयरिश लोक व भरतखंडवासी लोक या दोघांचेही गुणदोष एकाच स्वरूपाचे आहेत. जगाच्या इतिहासांत दोन तऱ्हेचे लोक आढळून येतात. एक प्रकारच्या लोकांत सुधारणेचा जन्म फार लवकर होतो; परंतु कांहीं विवक्षित इयत्तेपर्यंत मजल गेल्यावर तिची वाढ खुंटते. तेंच दुसऱ्या प्रकारच्या लोकांत सुधारणेचा जन्म उशीरा होतो; परंतु ती सुधारणा एकदां सुरू झाली ह्मणजे तिची प्रगती एकसारखी वाढत्या प्रमाणावर होत जाते. कांहीं मुलें लहानपणी फार तरतरीत असतात व त्यांची बुद्धि लवकर पक्व होते; तेंच दुसरीं कांहीं मुलें लहानपणीं जड वाटतात, परंतु त्यांचा बुद्धिगुण एकसारखा वाढत जातो. दोन्ही वर्गांच्या मुलांसंबंधानें लहानपणच्या अनुभवारून केलेले तर्क पोक्त वयांत खोटे ठरतात, व त्यांच्या चरित्रक्रमांत ढळढळीत फरक पडतो. हिंदुस्थानाप्रमाणेंच आयर्लंदमध्यें सुधारणेचा उदय फार प्राचीनकाळीं झाला. इंग्लंदांतील लोक अंगास रंग लावून व कातडीं पांघरून रानावनांत ज्यावेळीं भटकत होते त्यावेळीं हिंदुस्थानांतील ऋषि गहन धर्मविचारांमध्यें निमग्न असून, ऐहिक प्रवृत्तींचे लोकही उत्तम तऱ्हेच्या संसारसुखाचा आस्वाद घेत होते. आयर्लंदमध्येंही परकीलोकांच्या स्वाऱ्या होण्याचेवेळीं सेल्टिक मानववंशांतील लोक पुष्कळच सुधारलेले होते. नॉर्मन लोकांपेक्षां आयरिश लोकांची भाषा अधिक प्रौढ व अर्थपूर्ण, कविता अधिक सरस व संगीत अधिक गोड होतें. परंतु राजकीयदृष्ट्या आत्मसंरक्षण व प्रगति होण्यास जे गुण लागतात ते आयरिश लोकांमध्यें

असावे तितके नव्हते. हिंदुस्थानांतही मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांच्या काळीं हिंदुलोकांस हे परकी लोक, सुधारणेच्या दृष्टीनें पाहतां आजास नातू याप्रमाणें शोभण्यासारखे होते. परंतु राजकीय पराक्रम व सुधारणा यांच्यामध्यें नेहमींच मेळ पडलेला जगाच्या इतिहासांत दिसून येत नाहीं. निदान दोहोंच्या प्रगतींचे नियम वेगळे वेगळे खास आहेत, व ह्मणून रानटी लोकांनीं सुधारलेल्या लोकांस जिंकण्याचा जो चमत्कार पांचव्या व सहाव्या शतकांत दक्षिण यूरोपांत घडून आला तोच अकरावे शतकांत आयर्लंद व हिंदुस्थान या देशांमध्यें पहावयास सांपडला.

राज्यें मिळविण्याचे मार्ग इतिहासांत प्रायः एकाच स्वरूपाचे असतात; व ज्याप्रमाणें स्त्रीविषयक लोभ इंग्रजांचें पाऊल आयर्लंदांत पडण्यास कारणीभूत झाला, त्याचप्रमाणें स्त्रीकर्तृक लोभ हिंदुस्थानच्या निदान एका भागांत तरी त्यांचा प्रवेश होण्यास कारणीभूत झाला. परस्त्रीलंपट मॅकडरमॉट व स्वस्त्रीलंपट रघुनाथराव पेशवे यांचें साम्य कोणालाही तेव्हांच दिसून येईल. तसेंच प्रजाजनांत भेद राखून अगर वाढवून राजसत्ता प्रबळ करण्याची युक्ति इतिहासांत कांहीं नवीन नाहीं. आयर्लंदमध्यें प्रॉटेस्टंट व क्याथोलिक यांच्यामधील धर्मवैर इंग्रजी राज्यकर्त्यांस किती उपयोगाचें झालें, आणि विजातीय जमीनदार लोकांचें ठाणें तेथें कायमचें बसविण्यापासून स्वातंत्र्याभिलाषी आयरिश प्रजेवर दडपण कसें पडलें हें पाहिलें ह्मणजे, हिंदुस्थानांत आमच्या मुसलमान बंधूंस इंग्रजसरकार इतकें कां कुरवाळतात व गोंजारतात आणि आसामसारख्या प्रांतांत इंग्रजी वसाहतवाल्यांच्या स्वैरवर्तनाकडे ते इतका कानाडोळा कां करितात, हें कळून येईल. आयर्लंदांतील ‘ यादवांनीं ’ आपआपसांत भांडून परक्यांचें हित कसें साधूं दिलें हें पाहिलें ह्मणजे हिंदुस्थानांतही ‘ आत्मैवरिपुरात्मनः ’ ह्या दैवी वचनाची सत्यता आपणांस तेव्हांच पटते. तसेंच आयरिश संस्थानिकांचे मनांत स्वतंत्र होण्याची इच्छा उत्पन्न झाली असतांही निरनिराळ्या वेळीं ते आपापल्या मनगटाचे जोरावर परंतु केवळ आपापलाच हात साधण्याकरितां फुटून फुटून कसे लढले, व इसापनीतींतील ‘ ह्मातारा व त्याचे लेंक ’ या गोष्टीची प्रतीति त्यांनीं जगास कशी आणून दिली हें पाहिलें ह्मणजे, हिंदुस्थानांतही पेशवे, शिंदे, होळकर, मोंगल, अमीर

व शीख, यांनीं निरनिराळ्या वेळीं केलेल्या व ह्मणून फसलेल्या प्रयत्नांचें प्रतिबिंबच आपण आयरिश इतिहासांत पहात आहों कीं काय असें वाचकांस वाटतें. आयर्लंदांतील १६४१ चें व हिंदुस्थानांतील १८५७ चें बंड यांत बरेंच साम्य आहे. दोहोंतही धर्मवेड आणि जातिद्वेष यांचा पुढाकार असून प्रच्छन्न राजकीय हेतूंचा त्यांस मागून पाठिंबा होता; परंतु तो पुरेसा नव्हता असेंच दिसून येतें. दोहोंतही उभयपक्षांकडून सारखींच निंद्य व अनन्वित कृत्यें घडून आलेलीं असून दोहोंमध्यें विशिष्ट वर्गाच्या देशी लोकांनीं त्वेषाचे भरांत आपल्या शौर्याची कमाल केली, तथापि अखेर स्वतः इंग्रजांच्या धिमेपणाच्या अमोलिक गुणामुळें व दुसऱ्या एका वर्गाच्या देशी लोकांच्या साहाय्यामुळें त्यांस ह्या बंडांचा मोड करितां आला. सतरावे शतकांत आयर्लंदमध्यें जे अन्यायाचे व्यापारविषयक कायदे इंग्रजांनीं केले त्यांना हिंदुस्थानांत थोडेंबहुत साम्य ह्मटलें ह्मणजे बंगाल व मद्रास या प्रांतांत 'ईस्टइंडिया कंपनी' च्या अव्वल अंमलाच्या कालांत सांपडण्यासारखें आहे, हें बाबू रमेशचंद्र दत्त यांच्या पुस्तकावरून वाचकांचे लक्षांत येईल. परंतु या विशिष्ट बाबतींत साम्य फारसें ढळढळींत नाहीं, हें कबूल करणें जरूर आहे. आयर्लंदांतील प्रॉटेस्टंट जमीनदारांचे जागीं हिंदुस्थानांत खुद्द इंग्रज सरकार आहे असें मानलें असतां, जमिनीबाबत जी चळवळ दोन्ही देशांत चालू आहे तिजवरून त्यांच्या इतिहासांतील एका अंगाच्या साम्याची प्रतीति होईल. स्वराज्य ह्मणजे कमी अधिक प्रमाणानें स्वतंत्र अशा पार्लमेंटचे अधिकार, व ते मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेचे बाबतींत हिंदुस्थानचे लोक व आयरिश लोक यांच्यामध्यें पुरेंच साम्य आहे. आणि हें अंतिम साध्य मिळविण्यासंबंधानें लिबरल पक्षावर भिस्त ठेवून अर्ज, डेप्युटेशन वगैरेचे योगानें विलायतेंतील लोकमत वळवून त्याच्या जोरावर पार्लमेंट सभेकडून सुधारणा करवून घेण्याच्या साधनमार्गानें आयर्लंदचें व हिंदुस्थानचें साम्य जें पूर्वींचें होतेंच तें, गेल्या दोन तीन सालांत सुदैवानें नांवारूपास आलेली राष्ट्रीय चळवळ व दुर्दैवानें घडून आलेलीं माथेफिरू लोकांची अननुकरणीय अशीं आततायीपणाचीं धाडसी कृत्यें यांच्या योगानें अधिकच पूर्ण व समर्पक झालें आहे.

या दोन देशांचें ‘ समीकरण ’ मांडावयाचें असतां असें दिसून येईल कीं, या समीकरणांत इंग्रजी राजसत्ता—ह्मणजे एडवर्ड बादशहाचा नियमित अधिकार, पार्लमेंट सभेचा अनियमित अधिकार, स्टेट सेक्रेटरी व व्हाइसरॉय यांची प्रत्यक्ष हुकमत, प्रजेचें सर्वस्वीं पारतंत्र्य वगैरे गोष्टी दोन्ही देशांत अगदीं सारख्या एवढेंच नव्हे, तर प्रत्यक्ष एकच आहेत. दोन्ही देश अकल्पित रीतीनें एकाच साम्राज्याचे अवयव झाले, व दोघांनाही प्रस्तुतच्या स्थितीविषयीं पूर्ण समाधान वाटत नसून, स्वतःच्या तंत्रानें आपला बराच कारभार आंवरण्याची आकांक्षा त्यांच्या मनांत उत्पन्न झालेली आहे. दोघांनाही इंग्लंदच्या राजाचें अधिराज्य कबूल आहे, व कायद्यानें जी राजसत्ता प्रस्थापित झालेली आहे ती उलथून पाडण्याची त्यांची इच्छा नाहीं. परंतु ज्या यंत्राच्या योगानें राजसत्तेचा अंमल होत आहे त्याच्या रचनेंत फरक होऊन तें यंत्र अधिक लोकोपयोगी व्हावें, व त्याची गति, दिशा वगैरे गोष्टी ठरविण्यामध्यें प्रजाजनांचा हात हल्लीं आहे त्याहून अधिक चालावा, असें या दोन्ही राष्ट्रांतलि लोकांच्या आकांक्षेचें साधारण स्वरूप आहे. वसाहतीचें स्वराज्य हिंदुस्थानास हवें अशी जी आजकालची मागणी आहे तिच्याविरुद्ध कांहीं लोक असा आक्षेप घेतात कीं, साम्राज्यांतील निरनिराळ्या भागांची परिस्थिति वेगवेगळी असल्यानें ‘ वसाहतीचें स्वराज्य ’ च हवें हें मागणें वेडेपणाचें आहे; व एका दृष्टीनें पाहतां हा आक्षेप बरोबरही आहे. कारण आयर्लंद व हिंदुस्थान या दोघांनाही स्वराज्य हवें आहे तरी, अमुक एका वसाहतीच्या स्वराज्याचा नमुना बिलकुल फेरबदल न करतां त्या दोघांपैकीं कोणासही उपयोगीं पडेल असें वाटत नाहीं. खुद्द आयर्लंदच्या स्वतःच्या स्वराज्याच्या मागण्यांत गेल्या शंभर वर्षांत दोन तीन वेळां फेरबदल झाले. ग्रॅटन [ १७८२ ], ओकॉनेल [ १८४४ ] आयझॅक बट [ १८७३ ] व पार्नेल [ १८८०–९० ] यांनीं मागितलेलीं स्वराज्यें हीं प्रत्येकांपासून थोडथोडीं वेगवेगळीं होतीं. फार काय पण खुद्द ग्लॅडस्टन साहेबांनींच १८८६ व १८९३ या दोन सालीं जीं दोन होमरूल बिलें पार्लमेंटपुढें आणलीं, त्यांमध्येंही बराच फरक होता. आणि हिंदुस्थानासंबंधीं विचार करितां स्वराज्य, अर्थात् अधिकउण्या रीतीनें स्वतंत्र चालणारें असें पार्ले-

मेंट देण्याची वेळ आली असतां या सर्वांहूनही कदाचित् एखादा निराळाच नमुना योजावा लागेल. परंतु हे सर्व नमुने सूक्ष्म दृष्टीनें पहातां जरी कितीही वेगळे असले तरी, त्यांचें स्थूल स्वरूप एकच असणार. व तें स्वरूप ह्मणजे असें कीं, बादशाही सत्ता ही ' सोन्याच्या साखळी ' प्रमाणें इंग्लंद व हिंदुस्थान या दोहोंस जोडणारी अशी अबाधित राहिली तरी, कर बसविणें, वसूल केलेल्या करांचा खर्च करणें, कायदेकानू बनविणें व राज्यकारभारांतील चुकांकरितां अधिकारीवर्गावर जबाबदारी बजावतां येणें इतक्या गोष्टी–ह्मणजे ज्यांचा खऱ्या स्वराज्यांत समावेश होतो–त्या कमीअधिक प्रमाणानें आयर्लंद व हिंदुस्थान मागत आहेत. आयर्लंदची स्वतःची अशी स्वतंत्र पार्लमेंट पूर्वी होती ती १८०१ सालीं मोडली; ती किंवा तिच्यासारखी दुसरी एखादी आयरिश लोक मागत आहेत. हिंदुस्थानास पार्लमेंट ही वस्तु नवीन आहे. परंतु ती त्यांस हवी अशी वाटूं लागली आहे. मात्र उभयराष्ट्रांची ही आकांक्षा केव्हां फलप्रद होईल ती होवो !

राजकीय बाब सोडली तरी, आयर्लंद व हिंदुस्थान यांमधील साधर्म्य इतर अनेक रीतींनीं ठळकपणें दृष्टोत्पत्तीस येण्याजोगें आहे. दोन्ही देशांत देखावे व हवापाणी बरेंच सारखें आहे. दोन्ही देशांत लोकांचा उदरनिर्वाह मुख्यतः शेतकीवरच चालतो, व दोहोंतही उद्योगधंदे फार कमी आहेत. दोहोंतही जमीन करणारीं कुळें फार दरिद्री असून त्यांस दुष्काळाची बाधा त्वरित होते व फार जाचते. दोन्ही देशांत लोकांची धर्मावर श्रद्धा अतिशय व धर्मोपदेशकांचें प्राबल्य मोठें आहे. आयरिश लोकांचा क्याथोलिक धर्म व सर्वसाधारण हिंदुधर्म यांत विधि, नियम, शब्दप्रामाण्य व मूर्तिपूजा यांच्यामुळें बरेंच साम्य आढळून येतें; व प्रत्यक्ष धर्मव्यवहारांत हिंदुस्थानांतील लोकांप्रमाणेंच आयरिश लोकही करारी, निग्रही, श्रद्धाळू, भाविक व भूतदयापूर्ण असे आहेत. दोन्ही देशांतील लोकांच्या अंगच्या गुणदोषांत तर कांहीं विशेषच प्रकारचें साधर्म्य दिसून येतें. आयरिश लोक बुद्धिमान् परंतु चंचल, उत्साही परंतु उतू येणारे, प्रेमळ परंतु मऊ, वक्ते परंतु वक्तृत्वलुब्ध असे आहेत. हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत पहावयाचें असलें तर आयरिश लोकांच्या मनाची ठेवण पुष्कळ

अंशीं बंगाली लोकांच्या मनाच्या ठेवणीप्रमाणें आहे. त्यांच्या मनावर कोणत्याही गोष्टीचा ठसा त्वरित उमटतो; परंतु तो फार खोल उमटत नाहीं व उमटला तरी फार वेळ टिकत नाहीं. त्यांचीं काव्यें व कला ललित या दृष्टीनें सुंदर असतात, परंतु त्यांमध्यें भारदस्तपणा अगर विचाराची गहनता फारशी नसते. त्यांची कल्पनाशक्ति दांडगी असते, परंतु तिला गंभीर व दृढ अशा संकल्पाचें पाठबळ नसल्यानें तिच्या हातून टिकाऊ असें काम होत नाहीं. आयरिश लोकांइतके प्रेमळ, विनोदी व ख्याली-खुशालीचे भोक्ते असे लोक इतरत्र क्वचितच सांपडतील. परंतु त्याच-गुणांबरोबर बोलकेपणा, अविचार, अदूरदर्शित्व वगैरे दोषांची सांगड पड-ल्यामुळें त्या गुणांचें फळ मिळावें तसें मिळूं शकत नाहीं. आयरिश लोक जात्या रणशूर आहेत. आजकाल इंग्रजी लष्करांतील व आरमारांतील निम्मेअधिक प्रसिद्ध योद्धे रणवीर आयरिश आहेत. तथापि त्यांचें युद्ध-कौशल्य व शौर्य यांचा त्यांच्या स्वदेशापेक्षां परदेशासच अधिक फायदा आजपर्यंत झालेला आहे. तसेंच आयर्लंडांत रणशूर देशभक्त असे लोक जितके निर्माण झाले तितकेच घरभेदे व चहाडखोरही निर्माण झाले; आणि एकदिलानें, जुटीनें व पोक्त विचारानें योजून सिद्धीस नेलेल्या गोष्टीपेक्षां अविचारानें केलेल्या व साधण्यापूर्वी प्रतिपक्षाकडे चहाडी झाल्यामुळें फसलेल्या अशाच योजना त्यांचे इतिहासांत अधिक सांपडतात.

**विरोधदर्शन**—आयर्लंड व हिंदुस्थान यांजमधील साधर्म्याप्रमाणें वैध-र्म्याच्या बाबीही महत्त्वाच्या व लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. पैकीं पहिली बाब अशी कीं, हिंदुस्थानांत इंग्रजांकडून धर्मछल असा केव्हांच झाला नाहीं. फ्रान्समध्यें क्याथोलिक राजांनीं प्रॉटेस्टंट लोकांचा किंवा आयर्लंड-मध्यें प्रॉटेस्टंट राजांनीं क्याथोलिक लोकांचा जो छळ केला तो पाहिला ह्मणजे, विधर्मी व विजातीय लोकांच्या ताब्यांत आपण हिंदुस्थानवासी लोक गेलों असतां त्यांजकडून आयर्लंडप्रमाणें येथें छळ झाला नाहीं, या गोष्टीबद्दल आपणांस समाधानच वाटलें पाहिजे. वाईट गोष्टींबद्दल जर इंग्रज राज्यकर्त्यांस आपणांस नांवें ठेवावयाचीं असतील तर त्यांच्या हातून ज्या चांगल्या गोष्टी घडल्या अगर ज्या वाईट गोष्टी घडल्या नाहींत त्यांजबद्दल त्यांचा योग्य तो गुण घेणेंही जरूर आहे; एरवीं आपल्या निषेधास

किंमतच येणार नाहीं. निव्वळ एकांगी अगर एकपक्षीय निंदा काय किंवा स्तुति काय दोहोंचीही किंमत सारखीच. मुसलमानी राजे या देशांत रहात व संपत्ति येथल्या येथेंच ठेवीत, आणि हिंदूनां सरकार दरबारांत मोठमोठ्या नोकऱ्याही देत. परंतु धर्मछळाचें लांछन त्यांना लागलें होतें. इंग्रज सरकार संपत्ति परदेशांत नेतात आणि मुलकी व लष्करी खात्यांत हिंदुस्थानवासीयांस सवतीच्या मुलांप्रमाणें वागवितात ही गोष्ट जशी खरी आहे, तशीच धर्माचे बाबतींत त्यांनीं सहिष्णुता व समता राखिली हीही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. यामुळें धर्माखातर आयर्लंदांत जशा कत्तली झाल्या तशा हिंदुस्थानांत कधींही झाल्या नाहींत; व यामुळें आयरिश लोकांस इंग्रजांचा द्वेष वाटण्याचें जें एक मुख्य कारण तेथें घडून आलें तें येथें घडून आलेलें नाहीं. अँग्लोइंडियन लोक नेटिवांशीं उन्मत्तपणानें वागतात व त्यांचा अपमान करितात हें खरें आहे; तथापि त्याचा थोडाबहुत प्रतिकार ताबडतोब करण्याचे नेटिवांनीं मनांत आणलें असतां तें शक्य असतें. हिंदुस्थानांत 'क्रिमिनल प्रो० कोड,' हत्यारांचा कायदा व तुरुंगाचे नियम वगैरे बाबींखेरीज, नेटिव व इंग्रज यांजमध्यें भेदभाव दाखविण्यास कायद्याचा असा आधार फारसा नाहीं ही गोष्ट कबूल करणें भाग आहे. आतां कायद्याच्या अंमलबजावणींत हा फरक व्यक्त होतो, आणि सरकार दरबारच्या नोकऱ्या व बहुमानाच्या आणि किफायतीच्या जागा यासंबंधानें तर उघड उघड पक्षपातही दिसून येतो. परंतु आयर्लंदांतील 'पीनल कोडा' मुळें क्याथोलिक लोकांची जी स्थिति झाली होती तिजपेक्षां आमची स्थिति बरी आहे असें ह्मणणें भाग आहे. हिंदुस्थानांत धर्मछल न होण्याचीं कारणें उघड आहेत. मुख्य कारण असें आहे कीं, इंग्रजांची धर्मवेडेपणाची व धर्मछलाची लाट नाहींशी झाल्यानंतर इंग्रजी साम्राज्य हिंदुस्थानांत स्थापलें गेलें. हा गुण कालाचा आहे, व्यक्तीचा नव्हे. शिवाय एका मुख्य धर्माच्या दोन पंथांत जितकें वैर असतें तितकें, मूलतः भिन्न अशा दोन धर्मांमध्यें असत नाहीं, असा साधारणतः नियम आहे. दुसरें असें कीं, आयर्लंदांत जाऊन ज्याप्रमाणें प्रॉटेस्टंट इंग्रजांनीं कायमची वसाहत केली होती व क्याथोलिक लोकांचा शेजारीपणा पत्करला होता त्याप्रमाणें हिंदुस्थानांत स्थिति नव्हती. इकडे इंग्रज लोक प्रथम

आले ते व्यापारी ह्मणून आले. त्यांस कायमचीं घरेंदारें करून रहावयाचें नव्हतें; व व्यापाराच्या कामास जितका सलोखा लागतो तितका कुळाकडून जमिनीचा सारा वसूल करण्यास लागत नाहीं. शिवाय हिंदु लोक क्याथोलिक लोकांइतके निग्रही व स्वधर्मनिष्ठ असले तरी त्यांच्याहून ते अधिक सहिष्णुही आहेत. या सर्व कारणामुळें हिंदुस्थानांत इंग्रजांकडून धर्मच्छल झाला नाहीं.

जमिनीच्या बाबतींत आयर्लंदांतील प्रॉटेस्टंट लोकांच्या जागीं हिंदुस्थानांत स्वतः इंग्रज सरकार आहे हें लक्षांत घेतलें ह्मणजे आयर्लंद व हिंदुस्थान यांजमध्यें वैधर्म्यापेक्षां आजच्या घटकेस साधर्म्यच अधिक भासतें खरें. तथापि एक गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. ती ही कीं, शेंकडों वर्षांच्या चळवळीनें आयरिश रयतेला सुधारलेली अशी जी स्थिति आज प्राप्त झाली आहे तीच स्थिति हिंदुस्थानच्या रयतेची आज असून, इंग्रजी अमलाखालींच पण पूर्वीं ती याहूनही बरी होती. रयतेची जमिनीवर मालकी असावी हें तत्त्व आयर्लंदांत अगदीं अलीकडे ठरलें आहे. परंतु हिंदुस्थानांत हें तत्त्व फार जुन्या काळापासून अमलांत असून, मुंबई इलाख्यांत 'सर्वे आक्टा'नें—विशेषतः १९०१ च्या लँड रेव्हिन्यू बिलानें—या तत्त्वावर थोडाबहुत घालाच घातल्यासारखा झाला, असें यथार्थरीत्या मानण्यांत येतें. आयर्लंदांतील जमीनदार इंग्रज असल्यानें त्यांच्या धाऱ्याच्या मागणीस कांहीं तरी आळा असावा, व ही मागणी फाजील असल्यास यथायोग्य धारा किती हें सरकारानें ठरवावें, या साध्या गोष्टीही कायद्यानें अंमलांत येण्यास आयरिश लोकांत शेंकडों वर्षें चळवळ व प्रसंगविशेषीं रक्तपात करावा लागला. परंतु हिंदुस्थानांत निव्वळ रयतेच्या दृष्टीनें पाहतां खासगी जमीनदारांविरुद्ध त्यांना जो न्याय मिळण्याची अपेक्षा असते तो त्यांस या पूर्वींच व विशेष त्रास केल्याशिवाय मिळून चुकलेला आहे. बंगाल प्रांत व मध्यप्रांत यांमध्यें 'टीनन्सी लॉज' या नांवाचे कायदे अमलांत असून, त्यांच्या योगानें, रयतेच्या मगदुरावरून पाहतां त्यांजकडून जमीनदारानें किती धारा घेणें रास्त होईल, हें ठरविणें न्यायकोर्टाकडे सोंपविण्यांत आलेलें आहे; व या कायद्यांचा अमलही जारीनें सुरू आहे. तसेंच मुंबई इलाख्यांत साव-

काराविरुद्ध कायदे सुरू होऊन आज जवळ जवळ तीस वर्षें झालीं. आयर्लंदांतील जमीनबाबीसंबंधीं सर्वांत अत्यंत समाधानकारक असा जो कायदा १८८१ सालीं ग्लॅडस्टन साहेबांच्या खटपटीमुळें करण्यांत आला त्याच्या आधीं दोन वर्षें महाराष्ट्रांतील रयतेस त्यांच्या बचावाचा कायदा मिळाला. १८८१ चा कायदा पदरांत पडेपर्यंत आयर्लंदांत सुमारें दीडशें वर्षेंपर्यंत ज्या मारामाऱ्या व जो रक्तपात झाला त्यांच्या मानानें सन १८७६ सालच्या दुष्काळांत व त्यानंतर महाराष्ट्रांत शेतकऱ्यांनीं केलेला रक्तपात हा खंडीस रति या मानानें तरी भरेल कीं नाहीं याची शंकाच वाटते. आतां सावकार व जमीनदार लोकांना या कायद्यापासून अन्याय होत आहे किंवा नाहीं, अगर होत असेल तर कितपत होत असेल हा प्रश्न वेगळा. तसेंच जो न्याय सरकार सावकारांना व जमीनदारांना लावतें तो तें स्वतःस कितपत लावून घेतें, अगर तें स्वतः आपल्या रयतेस जो धारा मागतें तो तरी रास्त असतो कीं नाहीं, व हा रास्तपणा ठरविण्यास त्यांच्या व रयतेच्या दरम्यान कोणी तिऱ्हाईत असणें इष्ट आहे कीं नाहीं—हा प्रश्न वेगळा. परंतु आयरिश रयत व हिंदुस्थानांतील रयत यांच्यासंबंधानें पाहातां, एकाची जी आजची स्थिति अनायासें आहे व जी असली तर पूर्वींहून कदाचित् थोडीबहुत बिघडलेलीच आहे असें त्यास वाटतें, ती मिळण्यास दुसऱ्यास शेंकडों वर्षें चळवळ करावी लागलेली आहे; व हो वैधर्म्याची एक बाब ह्मणून लक्षांत ठेवण्याजोगी आहे. आतां सरकारचें धोरण आहे असेंच कायम राहिल्यास, अनेक वर्षांपूर्वीं आयर्लंदांत रयतेमध्यें ज्या कारणांमुळें असंतोष माजला होता तींच कारणें इकडेही अनेक वर्षांनीं अस्तित्वांत येण्याचा कदाचित् संभव आहे; नाहीं असें नाहीं. तथापि प्रस्तुतच्या बाबतींत आयरिश रयतेच्या व हिंदी रयतेच्या स्थितींत फरक असून तो फरक एकवेळ हिंदी रयतेच्या हिताचा होता, हा या ठिकाणीं मुख्य मुद्दा आहे. या बाबतींत आयर्लंदच्या इतिहासावरून जर बोध घ्यावयाचा असेल तर तो गतकालापेक्षां भविष्यकालासच अधिक लागूं पडण्यासारखा आहे. देशी रयतेची जमीन विधर्मी व विजातीय जमीनदारांच्या अगर सावकारांच्या हातीं गेल्यापासून अत्यंत हानि होते. असा प्रसंग हिंदुस्थानांत आसाम वगैरे प्रांतांखेरीज इतर ठिकाणीं

सुदैवानें यापूर्वी फारसा आलेला नाहीं. परंतु तो यापुढें सरकारानें न आणूं देण्याची सावधगिरी ठेवली पाहिजे, ही गोष्ट मात्र आयरिश इतिहासावरून कळण्यासारखी आहे ! आमच्याहीपेक्षां आयरिश इतिहास इंग्रज सरकारास अधिक अवगत आहे. कारण आह्मी तो फक्त वाचतों व तो त्यांच्या स्वतःच्या हातून घडून आलेला आहे; ह्मणून ही गोष्ट सरकारानें अधिक दक्षपणानें लक्षांत ठेवली पाहिजे.

शिक्षणाचे बाबतींत आम्ही आयरिश लोकांपेक्षां एकंदरीनें मागें आहों. पण आयर्लंदचा चारशें वर्षांचा इतिहास व हिंदुस्थानचा फक्तशंभर वर्षांचा इतिहास, या दृष्टीनें आह्मीं अधिक बऱ्या स्थितींत आहों असेंच ह्मणणें रास्त होइल. धर्म व शिक्षण यांचा अत्यंत निकट संबंध असतो, व या संबंधामुळें आयर्लंदांत इंग्रज सरकाराकडून शिक्षणास फारशी मदत झाली नाहीं, व आयरिश लोकांसही धर्मव्यतिरिक्त असें शिक्षण दिलें तरी नको होतें. यामुळें शिक्षणाचा सर्व भार आयरिश लोकांनीं पहिल्यापासून आपला आपणच संभाळला आहे. पीनलकोड अमलांत होतें तोंपर्यंत हा भार संभाळण्याचे कामीं त्यास फार व्यत्यय आला कारण स्वधर्मास धरून त्यांनीं शिक्षण देणें हाच मुळीं गुन्हा मानला गेला होता ! परंतु १८२९ पासून हे सर्व कायदे रद्द झाले आहेत. इकडे हिंदुस्थानांतही धर्मशिक्षण देण्यास सरकाराकडून प्रत्यक्ष मदत मिळत नाहीं. धर्माचे बाबीस अनुकूळ अगर प्रतिकूळ न रहातां फक्त ऐहिक प्रवृत्तीसच धरून शिक्षण देण्याचा प्रघात सरकाराने प्रथमपासून घातला व तो लोकांसही मान्य झाला आणि खासगी रीतीनें धर्मशिक्षण देण्याची मोकळीक असल्यानें आयर्लंदप्रमाणें हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रश्न धर्माच्या संबंधानें पूर्वी कधीं वादग्रस्त झाला नाहीं व पुढेंही होण्याचा संभव नाहीं. हिंदुस्थानांत शिक्षणसंबंधीं वाद आहे तो राष्ट्रीय शिक्षणाबद्दल; व अर्थात् या वादास शिक्षणविषयापेक्षां राजकीय दृष्टीनेंच अधिक महत्व आलेलें आहे. पूर्वी आयर्लंदांत जसा रोमन क्याथोलिक शिक्षण संस्थांचा अगर थोडेदिवसांपूर्वी फ्रान्समध्यें धर्मशिक्षणसंस्थांचा छळ झाला; तसा हिंदुस्थानांत राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्थांचा छळ होण्यास हल्लीं सुरवात झालेली असून संशयग्रस्त सरकारचे हातून तो दिवसेंदिवस कदाचित् अधिकच होईल अशी

भीति वाटत आहे. हिंदुस्थानांतील लोकांस जसें राष्ट्रीय शिक्षण हवें तसेंच आयरिश लोकांस धार्मिक शिक्षण हवें आहे, व पूर्वी आयरिश लोकानीं सोसलेला शिक्षणविषयक छळ यापुढें कदाचित् आमच्या वाट्यास येऊन आयरिश लोकांस मात्र धर्मशिक्षण देणारी युनिव्हर्सिटी हवी आहे ती लवकरच मिळण्याचा संभव आहे.

धर्मसंबंधीं आयरिश लोकांचें एक दुसरें गाऱ्हाणें होतें तें १८६७ सालीं ग्लॅडस्टनसाहेबांच्या अनुग्रहानें संपलें. आयर्लंदांतील शेंकडा ७५—८० लोकांचा धर्म क्याथोलिक असतां प्रजेच्या तिजोरींतील लाखो रुपये दरसाल खर्च करून इंग्रज सरकारानें त्यावर प्रॉटेस्टंट धर्ममंडळ पोसलें होतें. अर्थात् हा केवळ अन्याय होता; परंतु आयरिश लोकांना प्रत्यक्ष अंगास लावून झोंबणारी व अधिक चीड आणणारी अशी एक विशेष गोष्ट होती. ती ही कीं रोमन क्याथोलिक शेतकऱ्याला शेताच्या पिकांतला दहावा हिस्सा देऊन त्यावर आपल्या गांवच्या प्रॉटेस्टंट भिक्षुकांची व धर्मोपदेशकांची वृत्ति चालवावी लागत असे. शेतांत पीक उभें असलें ह्मणजे प्रत्येक नऊ कणसें टाकून दहावें आपलें असा हक्क सांगण्याचा अधिकार या भिक्षुकांस असे व हक्कदारीचा वसूल करणारे मक्तेदार दलाल फार जुलूम करीत. आपल्या इकडील दाखला द्यावयाचा असतां असें ह्मणतां येईल कीं, समजा उद्यां सरकारानें कायदा करून यज्ञेश्वरभट दीक्षितांचें अग्निहोत्र चालावें ह्मणून इब्राहीम खतीबाच्या घरच्या कंदुरीचा अंश वसूल करण्याचा अधिकार पिऱ्या मांगास द्यावा असें ठरविलें, अगर दर्ग्यामध्यें निवांत बसून काजीसाहेबास कलमा पढतां यावा अगर कुराणाचें पुराण सांगतां यावें याकरितां सरकारी कायद्यानें गांवांतील सर्व ब्राह्मणांच्या घरच्या हविष्यान्नावर त्यांस वृत्ति उत्पन्न करून दिली—तर तें किती अन्यायाचें होईल! क्याथोलिक शेतकऱ्यांच्या पिकाचा दहावा हिस्सा प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकांस देवविणें हें तितकेंच अन्यायाचें व चीड आणणारें असतां हा प्रघात शंभरांहून अधिक वर्षेंपर्यंत आयर्लंदांत चालू होता! हा प्रकार १८३७ चे सुमारास बंद झाला व १८६७ सालीं सरकारी पैशावर प्रॉटेस्टंट धर्ममंडळ पोसण्याचेंही बंद झालें. अशा तऱ्हेचें गाऱ्हाणें आपणाकडे केव्हांही नव्हतें. हिंदुस्थानच्या ति-

जेरींतून खिस्ती धर्ममंडळाचा थोडाबहुत खर्च चालतो हें खरें आहे, परंतु इतर खर्चांच्या मानानें हा फार थोडा असल्यामुळें तो हिंदी प्रजेच्या डोळ्यांवर येत नाहीं. शिवाय खिस्ती धर्ममंडळाप्रमाणें हिंदुमुसलमान देवस्थानेंही इंग्रजसरकार चालवितें, यामुळें त्या खर्चांचा आपणास फारसा विषादही वाटत नाहीं. अशा रीतीनें धार्मिक अशी कोणचीही बाब राज्यकर्ते व प्रजा यांच्या नित्य अगर अनित्य संबंधांत आह्मास फारशी नडत नाहीं. हा वैधर्म्याचा मुद्दा महत्वाचा आहे.

आतां राजकीय दृष्ट्या विचार करितां या दोन देशांचे स्थितींतील वैधर्म्य मात्र आह्मांस वाईट वाटण्यासारखें आहे. आयरिश लोक व इंग्रज हे जरी आपापलें राष्ट्रीयत्व निरनिराळें मानितात तरी आयरिश लोक हिंदुस्थानवासी लोकांपेक्षां इंग्रजांस पुष्कळच जवळचे आहेत. इंग्लंदांतील बहुजनसमाजाचा धर्म जरी प्रॉटेस्टंट व आयर्लंदांतील बहुजन समाजाचा धर्म जरी क्याथोलिक असला तरी दोन्ही राष्ट्रें खिस्ती आहेत. एवढेंच नव्हे तर हिंदुस्थानांतील प्रॉटेस्टंट खिश्चन लोकांपेक्षां आयर्लंदांतील क्याथोलिक इंग्रज लोकांस अधिक जवळचे असे वाटतात. इंग्लंदांतही रोमन क्याथोलिक लोक मुळींच नाहींत असें नाहीं. लॉर्ड रिपन व ड्यूक ऑफ नार्फोक अशासारखे लोक रोमन क्याथोलिकच आहेत. नुकतेंच लंदन शहरांत रोमन क्याथोलिक लोकांचें जें बडें संमेलन भरविण्यांत आलें होतें त्या वेळीं प्रॉटेस्टंट व क्याथोलिक लोकांच्या मिरवणुकीसंबंधानें विरोधाची चकमक जरा थोडिशी उडाली होती; तरी अखेर सदरहू संमेलनासंबंधानें इंग्रजी प्रॉटेस्टंट लोकांनीं किती सहिष्णुता दाखविली हें चांगलें व्यक्त झालें. आयरिश रोमन क्याथोलिक व हिंदी प्रॉटेस्टंट यांजमध्यें इंग्रजांच्या दृष्टीनें जमीनअस्मानची तफावत आहे; व युरोपियन आणि एशियाटिक यांमध्यें सूक्ष्म भेद कल्पून दक्षिण आफ्रिका व कॅनाडा या देशांत एशिआटिक लोकांस मज्जाव होण्यास जें कारण घडतें तेंच आयरिश व हिंदी खिश्चन यांच्यामध्यें पांक्तिप्रपंच करविण्यास हटकून कारणीभूत होतें. दुसरें असें आहे कीं, इंग्रज व आयरिश लोक यांमध्यें रोटीव्यवहार तर सर्रास होतोच, परंतु बेटीव्यवहारही होण्याचा योग असतां धर्ममतांतर होऊन तो योग घडून येण्यास फारसा

वेळ लागत नाहीं. कारण जातिभेद नसल्यामुळें, फक्त धर्मपंथाचा भेद राहतो; आणि तोही विशेषतः हल्लींसारख्या सहिष्णुतेच्या काळांत तादृश जाचक होऊं शकत नाहीं. सहिष्णुतेनें वैरभाव कमी होऊन गुणग्राहकता वाढते; व प्रसंगविशेषीं धर्ममतांतर सहजच होऊं शकतें. आज आयर्लेदांत एकाच घराण्यांतली एक शाखा क्याथोलिक तर दुसरी प्रॉटेस्टंट असेंही आढळून येतें. क्याथोलिक लोकांचा धर्म प्रॉटेस्टंट पंथाच्या मानानें कसाही असला तरी त्यांच्यांत उपपंथ नाहींत. व आयर्लेदातील शेंकडा पंच्याहत्तर इतकी लोकसंख्या आपल्या धर्मगुरूच्या सूत्रानें एकत्र बांधली गेल्याप्रमाणें आहे. हिंदुस्थानांत याच्या उलट स्थिति असून एका हिंदु धर्मांत शेंकडो जाति व शेंकडो पंथ आहेत. शिवाय मुसलमान, खिस्ती वगैरे इतरधर्म आहेत ते वेगळेच. इतक्या भेदभावाचें दडपण असतां त्यांतूनही हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्वाची कल्पना डोकें वर काढीत आहे, हें खरें; परंतु या कल्पनेचा हल्लीं नुकता कोठें उदय झालेला आहे. ती मध्यान्हीस येऊन सर्व राष्ट्रावर एकसारखा उज्वल प्रकाश पाडील तो सुदीन ! राष्ट्रीय सभेमध्यें एखादा मुसलमान आलेला दिसला कीं, आपण त्याचें मोठें कौतुक करितों ही गोष्ट वेगळी. परंतु आज २५ वर्षें ‘ राष्ट्रीय नांवाची सभा भरत असून तिला मुसलमान लोक अद्यापि ‘ हिंदूंची ’ सभा ’ मानितात, ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे.

राजकीय शिक्षणासंबंधानें पहातां असें दिसून येतें कीं, आयर्लंदचे स्वतंत्र असें पार्लमेंट जरी आज मित्तीस नाहीं तरी, अशा प्रकारचें त्यांचें पार्लमेंट पूर्वीं एक वेळीं होतें, व हल्लींही आयर्लंदतर्फे शंभर सभासद ब्रिटिश पार्लमेंटमध्यें निवडून दिलेले असतात. जर आपण आज पार्लमेंट सभेच्या स्वरूपाच्या संस्था आपलें उद्दिष्ट ह्मणून मागत आहों व आपणास त्या मिळणें हें अद्यापि दूर आहे, तर अशा संस्थांशीं ज्या लोकांचा प्रत्यक्ष परिचय आज शेंकडों वर्षांचा आहे त्यांचें राजकीय शिक्षण आमच्या मानानें फार पुढें गेलेलें असून आपण त्या बाबतींत अद्यापि फार मागें आहों, हें कोणासही प्रांजलपणें कबूल करावें लागेल. ग्रॅटन, फ्लड, ओकॉनेल, पार्नेल यासारखे वक्ते. पार्लमेंटचे सभासद व पुढारी होण्यास लायख असे लोक आजही हिंदुस्थानांत थोडेबहुत आहेत व दिवसेंदिवस ते

अधिक निर्माण होतील असा दृढ भरंवसा आहे. परंतु पात्रता व प्रत्यक्ष अनुभव यांमध्यें पुष्कळ अंतर असतें. एखाद्या कामास लागणारे गुण अंगीं असणें वेगळें, व ते गुण असून तें काम प्रत्यक्ष हातून घडून येणें हें वेगळें. 'पार्लमेंटरी' पुढारी जरी आज आपणांत थोडेबहुत सांपडणें शक्य आहे, तरी आपल्या लोकांस 'पार्लमेंटरी' संस्थेचा अनुभव अद्यापि नाहीं. पात्रता भरपूर आहे पण अनुभव कमी आहे. आतां अनुभव येण्यास अंगावर काम पडलें पाहिजे; व जितकें काम आमच्या अंगावर पडावें तितकें न पडल्याचा दोष सरकाराकडेच आहे यांत शंका नाहीं. उदाहरणार्थ, मोर्लेसाहेबांनीं आपल्या कौंसिलांत दोघा हिंदी गृहस्थांची नेमणूक थोड्या दिवसांपूर्वी केली, व येवढ्याशा थोड्या मुदतींतही त्यांनीं आपलें काम उत्कृष्ट रीतीनें केलें असें नुकतेंच बोलूनही दाखविलें. अर्थात् आज या विवक्षित बाबतींत तरी पात्रता प्रत्ययास आणून अनुभव मिळवून देण्याचें श्रेय मोर्लेसाहेबांकडे आहे; व उद्यां सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौंसिलाप्रमाणें छोट्या व बड्या लाटसाहेबांच्या कौंसिलांतही जर हिंदी लोकांची नेमणूक होईल तर तेथेंही त्यांची पात्रता आपोआप सिद्ध होऊन अनुभवही पदरीं पडूं लागेल. केल्याशिवाय कांहीं येत नाहीं, व जबाबदारीनें राज्यकारभार करण्याची संधी हिंदी लोकांस वारंवार न येण्याचा दोष सरकाराकडे आहे. तरी पण अंगीं अनुभव नसल्याचा जो कमीपणा ह्मणून आहे तो अनिच्छेनें कां होईना आपल्या पदरीं राहतोच. हें अधिकाराच्या जागांसंबंधानें झालें. परंतु अधिकाराच्या जागांस हिंदी लोक लायख आहेत असें ह्मणणारे लॉर्ड मोर्लेही, 'पार्लमेंटरी संस्था वापरण्याला ते लोक अद्यापि लायख नाहींत व पुढेंही अनंत युगें लायख होणार नाहींत,' असें उघडपणें आज ह्मणत आहेत! हें ह्मणणें वस्तुतः खरें नसून तें कालांतरानें टिकणार नाहीं, व हिंदी लोकांची योग्यता केवळ मोर्लेसाहेबांच्या मतावर अवलंबून नाहीं ही गोष्ट खरी. तरी पण ज्या पार्लमेंटरी संस्थांचा आयरिश लोकांस प्रत्यक्ष अनुभव तीन चारशें वर्षें आहे त्यांचें आह्मांस दर्शन होणेंही आजच्या स्थितीस फार दूर आहे; व ह्मणून आयरिश लोकांच्या मानानें राजकीय शिक्षणांत आपण फार मागें आहों हें उघड आहे.

परंतु ब्रिटिश पार्लमेंट सभेंत बसणाऱ्या या शंभर सभासदांचा उपयोग आयरिश लोकांस फक्त राजकीय शिक्षणच मिळवून देण्यापुरता होत असेल असें मानणें चूक आहे. या शंभर सभासदांस आपला डाव जरी प्रत्यक्ष व हटकून साध्य करितां येणें शक्य नसलें तरी तो अप्रत्यक्ष रीतीनें त्यांना केव्हां केव्हां साध्य करितां येतो. त्यांना आपलें नाक शाबूत ठेऊन स्वतःस जरी शुभ शकून करितां आला नाहीं तरी तें कापून दुसऱ्यास अपशकून करितां येतो! त्यांना आपली नाव जरी तारतां आली नाहीं तरी केव्हां केव्हां दुसऱ्याची नाव त्यांना बुडवितां येते. व यामुळें जें कोणी प्रेमानें देण्यास तयार नाहीं तें दहशतीनें केव्हां केव्हां त्यांस मिळवितां येतें. ब्रिटिश पार्लमेंटांतील राज्यकारभार राजकीय पक्षांचे बलाबलावर अवलंबून असतो हें वाचकांस माहीत असेलच, व यामुळें आयरिश सभासदांच्या मतांस केव्हां केव्हां फारच महत्व येतें. एखाद्या दगडास एरवीं जरी महत्व नसलें तरी तागडींत पासंग घालावयाच्या वेळेस, अगर दुसऱ्याचे डोक्यावर प्रहार करावयाचा असतां तो जवळ नसला तर हुडकून आणावा लागतो. त्याचप्रमाणें एखाद्या प्रश्नावर बहुमत करून पार्लमेंटमधील अधिकाराचें पारडें फिरविण्यास आयरिश सभासदांची मदत पुष्कळ वेळां मागण्यांत आलेली आहे, व ‘ योग्य मोबदला ’ घेऊन ती त्यांनीं दिलेलीही आहे. आयरिश सभासदांशीं संगनमत अगर ‘ तह ’ केल्याचा आरोप फॉक्स व पिट यांचे काळापासून आजमित्तीपर्यंत कॉन्झरव्हेटिव्ह पक्षानें लिबरल पक्षावर पुष्कळ वेळां आणला आहे. पार्नेलच्या अमदानींत आयरिश पक्षांत जूट असल्यानें नेहमीं हे आयरिश सभासद, कॉन्झरव्हेटिव्ह व लिबरल पक्षाचें युद्ध बराच वेळपर्यंत तटस्थपणें पहात बसत; व अगदीं आयत्या वेळीं पेंढाऱ्यांप्रमाणें गर्दी करून कोणत्या तरी एका पक्षावर, लूट मिळण्याचें संधान पाहून, तुटून पडत व एका क्षणांत जयापजयाचें पारडें फिरवीत! ग्लॅडस्टनसाहेबांनीं होमरूलचा प्रश्न इतक्या नेटानें हातीं घेण्यास त्यांची स्वाभाविक न्यायबुद्धि व उदारता हीं तर कारणीभूत झालींच यांत शंका नाहीं; परंतु लिबरल पक्षाचें पारडें पार्लमेंट सभेमध्यें जड करून ठेवण्यास आयरिश सभासदांची त्यांस मदत होई हें कारण ही कांहीं अगदींच गौण नव्हतें.

खुद्द ग्लॅडस्टनसाहेबांचाही पराभव कित्येक वेळां आयरिश सभासदांच्या प्रतिकूलतेमुळेंच घडून आलेला होता. व पार्नेल हा किलमाईनहॅम येथें तुरुंगांत असतां त्याच्याशीं तह ठरवून, त्याची मुक्तता करून, आयरिश सभासदांची मतें आपल्या बाजूस वळवून घेतलीं, असा कॉन्झरव्हेटिव्ह पक्षानें या लिबरल मुत्सद्यावर अगदीं भरसभेंत दोषारोप केला होता. तात्पर्य, आयर्लंदचे प्रतिनिधी ब्रिटिश पार्लमेंट सभेमध्यें असल्यानें त्यांचीं सर्वच कामें जरी हटकून साधत नाहींत व आयर्लंदची सर्व दुःखें जरी निवारण होत नाहींत, तरी आयर्लंदच्या स्थितीकडे सभेचें लक्ष बळजबरीनें ओढतां यावें इतकी 'सनदशीर बंडाळी' व अडथळा या सभासदांस करितां येतो. परंतु हिंदुस्थानास अशा प्रकारचा फायदा मुळींच मिळत नाहीं. हिंदुस्थानचा प्रतिनिधी पार्लमेंटमध्यें एकही नसल्यामुळें सभेचें लक्ष हिंदुस्थानाकडे वेधण्यास कोणा तरी युरोपियन सभासदाची मदत घ्यावी लागते; व त्यास या देशासंबंधीं माहिती फारच थोडी असल्यानें, कोणा तरी माहितगार मनुष्यानें ती मुद्दाम करून द्यावी लागते. परंतु ही उसनी शिधोरी प्रत्यक्ष वादविवादांत फारशी उपयोगी पडत नाहीं असें अनेक वेळां अनुभवास आलेलें आहे. कॉन्झरव्हेटिव घ्या किंवा लिबरल घ्या, कोणत्याही पक्षाचें हिताहित हिंदुस्थानाच्या अनुकूलतेवर अगर प्रतिकूलते-वर अवलंबून नाहीं, व यामुळें केवळ न्यायबुद्धीच्या प्रेरणेनेंच हिंदु-स्थानाकडे त्याचें काय लक्ष जाईल तें खरें. परंतु ज्याचा आपला प्रत्यक्ष संबंध येत नाहीं अशा लोकांचें काम कितीही न्यायाचें व खरें असलें तरी केवळ न्यायबुद्धीच्याच स्फूर्तीनें त्याजकडे लक्ष जाणें ही गोष्ट विरळा. न्यायबुद्धीचें सोंग आणून दोन्ही पक्ष पुष्कळ वेळां हिंदुस्थानच्या हिताच्या आड येण्यास व अँग्लोइंडियन अधिकाऱ्यांचें प्रिय करण्यास मिलाफी होतात. पण हा मिलाफ पाहून असें मनांत येतें कीं, 'पांथस्थाच्या दशम्या' वाटून घेण्याचें कामीं यांचा तंटा चालावयाचा तो चालून, दशम्या विटा-ळून आपल्या पदरांत पाडून घेण्याच्या कामीं मात्र यांचा मिलाफ होतो.

ब्रिटिश पार्लमेंटसभेमध्यें प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क हिंदुस्थानास नसल्यामुळें अप्रत्यक्ष असेही तोटे पुष्कळ होतात. एक तर या गोष्टीमुळें 'कमअस्सल दर्जाचा' छाप अगर तत-मुद्रा जी हिंदी लोकांचे

डोक्यावर पडते, ती त्यास जगांत कोठेंही गेलें तरी बाधकच होते. हा अनुभव आफ्रिका, कानडा, युरोप वगैरे देशांत आह्मी हिंदी लोक गेलों असतां आपणास रोखठोक पटतो, व असें होणें स्वाभाविकच आहे. आपल्यामध्यें अशी एक ह्मण आहे कीं, नवऱ्यानें बायकोस रांडे ह्मटलें तर शेजारिणी बायाही 'रांडाबाई' ह्मणून हाक मारणार. व ही ह्मण या ठिकाणीं बरोबर लागू पडते. आमचे राज्यकर्ते आह्मांस जें सर्टिफिकीट देणार त्याच्याच जोरावर बहुधा आह्मास परदेशांत मान मिळणार; व त्यानींच जर पार्लमेंटादि संस्थांस हिंदी लोक नालायख व नादान आहेत असें सार्टिफिकीट दिलें तर मग परदेशांत आह्मांस कोण विचारितो ? आयरिश लोकांची स्थिती याहून वेगळी आहे. त्यांस होमरूल मिळो वा न मिळो; ब्रिटिश साम्राज्याचे एक घटक व स्वराज्याचे एक वेळचे भोक्ते असा मान त्यांस आजपर्यंत पृथ्वीचे पाठीवर सर्वत्र मिळत आला आहे व अद्यापही मिळत आहे. आयरिश लोक अमेरिकेंत जाऊन तेथें मोठमोठ्या दर्जास चढल्याचीं उदाहरणें आहेत, व आजच्या घटकेस अमेरिकन राजकारणांत आयरिश लोकांचें प्रस्थ बरेंच माजलेलें आहे. तीच गोष्ट फ्रान्ससंबंधानें. नेपोलियन बोनापार्ट याची आणि वूल्फटोन व रॉबर्ट एमेट यांची गांठ पडल्याचें प्रसिद्धच आहे. लिमरिक येथें क्याथोलिक लोकांच्या तरवारीची कीर्ति राखणारा सार्सफिल्ड व त्यानंतर टोन यांस फ्रेंच लष्करांतील जनरलच्या जागा मिळाल्या होत्या; आणि त्याचप्रमाणें मान मिळण्यास आजही अवसर आहे.तसेंच आयरिश लोकांस खुद्द इंग्लंद-मध्यें, वसाहतींत व हिंदुस्थानांत सर्वांत श्रेष्ठ अशा हुद्यांच्या जागा मिळू शकतात. ड्यूक ऑफ वेलिंगटन व लॉर्ड रॉबर्टस हे दोघेही इंग्लंदचे सेनाधिपती आयरिश होते. हिंदुस्थानांतील व वसाहतींतिल सिव्हिल सर्विसमध्यें आयरिश, इंग्रज व स्कॉच हा भेद नाहीं. अलाहाबादचे माजी लेफ्टेनेंट गव्हर्नर सर ॲन्टनी मॅकडॉनेल हे आयरिश आहेत. तात्पर्य, आयरिश लोकांनीं होमरूल मागण्याचा तेवढा हट्ट सोडला ह्मणजे मग त्यांस इंग्रजी साम्राज्याचा कोणताही फायदा दुष्प्राप्य आहे असें नाहीं. व हा हट्टही पुढेंमागें पुरण्याचा संभव आहे. उलटपक्षीं हिंदुस्था-नाकडे पहावें तों पार्लमेंट सभेंत प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क हिंदी

लोकांस नाहीं; एवढेंच नव्हे, तर अशा हक्काची लालसा मनांत धरणें ह्मणजे आभाळांतील चांदोबा खेळावयास मागण्यासारखें होय असें सर्वोत्कृष्ट लिबरल तत्वज्ञानी ह्मणतात. अधिकाराच्या जागांसंबंधानेंही पाहतां लष्करांत दोन अडीचशें रुपयांच्या सुभेदारीपलीकडे आमची मजल गेलेली नाहीं. जहाजावर तेलाच्या बुदल्या साफ करणें, अगर दोरखंड गुंडाळणें एवढेंच काम आह्मांस मिळतें. व मुलकी खात्यांत डेप्युटी कलेक्टरीपलीकडे आमचा हात सहसा पोहोंचत नाहीं. येऊनजाऊन निरुपद्रवी अशा न्यायखात्यांत काय ती आह्मांला हायकोर्टजज्जाची एखादी जागा मिळते. परराष्ट्रांत आह्मांस शिफारस मिळणें तर दूरच, परंतु आमचा आह्मी आपल्या गुणानें तेथें कदाचित शिरकाव करून घेऊं ह्मटलें तर आमचें संशयी सरकार तेवढाही फायदा आह्मांस पचूं देण्यास तयार नाहीं !

शेवटीं वैधर्म्याचा एक विशेष मुद्दा घेऊन आपण प्रस्तुत विषयाच्या या अंगाचें विवेचन पूर्ण करूं. हा मुद्दा ह्मटला ह्मणजे आयर्लंद व हिंदुस्थान यांजमधील आकारमान व लोकसंख्या वगैरे बाबतींत असलेल्या फरकासंबंधाचा होय. आयर्लंदचें क्षेत्रफळ व लोकसंख्या हीं दोन्ही हिंदुस्थानांतील सर्वांत लहान प्रांताइतकीही भरतील किंवा न भरतील हें आह्मी पहिल्या भागांत दर्शविलेंच आहे. असें असतां एकाच अमलाखालीं असलेल्या या दोन देशांच्या राजकीय सुधारणेंत अत्यंत अंतर असावें, याचें कारण लक्षांत घेण्यासारखें आहे.आमच्या मतें हें कारण असें आहे कीं, हिंदुस्थान देशाचा प्रचंड विस्तार व त्यांतील प्रचंड लोकसंख्या हीं हिंदुस्थानास उपकारापेक्षां अपकारासच अधिक कारणीभूत झालेलीं आहेत. राष्ट्रीयत्वाची मीमांसा जगाच्या अनुभवावरून अगर तत्वतःही जरी आपण करूं लागलों तरी एक मुख्य सिद्धांत आपल्या नजरेस दिसून येतो. तो हा कीं, राष्ट्रीयत्वाची कल्पना केंद्रीभूत होऊन ती प्रभावी बनण्यास क्षेत्र जितकें अधिक लहान तितकें चांगलें. अलीकडे आह्मांस सर्व हिंदुस्थान देशाचा संकीर्णरूपानें विचार करण्याची संवय लागलेली आहे. हिंदुस्थानसरकार आपल्या राज्यरक्षणाच्या सोईकरितां अगर अभिनव महत्वाकांक्षेच्या समाधानार्थ जसजसे हातपाय पसरूं लागलें व नवीन प्रांत जिंकून

आपल्या राज्यास जोडूं लागलें, तसतशी ' हिंदुस्थान ' या भूवर्णन-विषयक शब्दाची व्याप्तीहि वाढूं लागली. आणि असें होतां होतां सह्याद्रीखालचें कोंकण व चीनच्या सरहद्दीवरील ब्रह्मदेशाचा भाग या दोन प्रदेशांतील लोकांस ते ' एका राष्ट्राचे अवयव ' असें ह्मणण्यापर्यंत मजल येऊन ठेपली. परंतु अशा औपचारिक नामकरण विधीनें राष्ट्रांतील लोकांचा खरा एकजीव होणें शक्य नाहीं हें अगदीं उघड आहे. राष्ट्र ह्मणजे कांहीं पाणिनीचें व्याकरणसूत्र नव्हे, कीं त्यामध्यें श्वन् ( कुत्रा ), युवन् ( तरुण मनुष्य ), मघवन् ( इंद्र ) इत्यादि निरनिराळी मंडळी केवळ ' समानांत ' ह्मणून एका दावणीस बिनतक्रार बसतील अगर समान रूपकरण करून घेतील. किंवा राष्ट्र ह्मणजे शेक्सपीयरच्या मॅकबेथ नाटकांतील चेटकिणीची कढई नव्हे, कीं त्यांतील रसई बनविण्याकरितां ओलेंवाळलें, सजीवनिर्जीव, बरेंवाईट, काय वाटेल तें आंत आणून टाकिलें तरी चालेल. अथवा राष्ट्र ह्मणजे कांहीं ' शाकांबरी ' व्रताच्या उद्यापनाचें जेवण नव्हे, कीं त्यांत पांचपन्नास प्रकारचा भाजीपाला शिजवून त्याचें अद्भुत पक्वान्न बनवावयाचें. राष्ट्राच्या घटनेस कांहीं विशेष प्रकारचे नियम लागू आहेत; व त्यांत धर्म, भाषा, वंशविस्तार, ऐतिहासिक परंपरा व प्रत्यक्ष राजकीय हिताहित, इ० अनेक गोष्टी प्रमुख आहेत. परंतु वर सांगितल्याप्रमाणें सह्यांद्रिखालचे कोंकण व चीनच्या सरहद्दीवरील ब्रह्मी लोक यांमध्यें वर नमूद केलेल्या गोष्टींपैकीं कोणतीही समान नसून, केवळ ब्रिटिशसरकारची महत्वाकांक्षा अगर त्याची कायदेशीर सत्ता यांखेरीज दुसरें साधारण अधिष्ठान असें कोणतेंच नाहीं. अर्थात् हिंदुस्थानांत ' राष्ट्र ' या दृष्टीनें विचार करण्याचे वेळीं ब्रिटिश सरकार राज्यमर्यादेच्या बाजूनें विचार करितें, परंतु तो तसा न करितां या प्रचंड राज्यविस्तारामध्यें यदृच्छेनें एकत्र समाविष्ट झालेल्या प्रत्येक घटकाच्या परिस्थितीच्या बाजूनेंच विचार करणें जरूर आहे. मद्रासी, महाराष्ट्रीय, पंजाबी, गुजराथी, बंगाली व ब्रह्मी या निरनिराळ्या लोकांस मिळून राष्ट्रीयत्वाचीं वर सांगितलेलीं लक्षणें कोणकोणतीं व कितपत लागू पडतात याचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, या सर्व लोकांचें एकराष्ट्र बेमालूमपणें बनविणें अवघड आहे. व तें तसें बनवितां

येईपर्यंत या निरनिराळ्या लोकांनीं आपण आपल्या पुरतें तरी राष्ट्र आहों असें मानूं नये असा निर्बंध करणें सर्वथैव चुकीचें होईल. या सर्वांचें एकराष्ट्र होईपर्यंत स्तब्ध बसण्यास सांगणें ह्मणजे फाटक्या पंचांत आवाळ्यांची मोट बांधून होईपर्यंत, अगर एखाद्या पुलाचा पाया घालावयाचे असतां ओढ्यांतील खळखळ वाहणारें पाणी सर्व ओसरून जाईपर्यंत थांबण्यास सांगण्यासारखेंच असमंजसपणाचें आहे.

आयर्लंदचें राष्ट्र बनण्यास त्याचा अल्पविस्तार, आयरिश लोकांची भाषा, धर्म व पूर्वपरंपरा वगैरे गोष्टी फार उपयोगी पडलेल्या आहेत. व इतकें असूनही उत्तर आयर्लंदातील लहानशी प्रॉटेस्टंट वसाहत, राजकीय संबंधांत थोडासा विरोध असल्याकारणानें, पोटांत जाऊन बसलेल्या कांचेच्या तुकड्याप्रमाणें पचनींही पडत नाहीं व बाहेरही निघत नाहीं, तर आपली जागा धरून आयरिश राष्ट्राच्या आंतड्यास इजा मात्र करीत आहे. हें लक्षांत घेतलें ह्मणजे हिंदुस्थानांतल्या आपल्या या निरनिराळ्या जाती, त्यांच्यामध्यें पूर्वींच असलेले स्वाभाविक विरोध व ते विरोध वाढविण्याचें राज्यकर्त्यांचें धोरण इत्यादि गोष्टींच्या स्मरणानें, हिंदुस्थान हें सर्व एकराष्ट्र होऊन मग त्याचा उदय होईल, अशी सदिच्छा धारण करणाऱ्या भाविक मनुष्याचे डोळ्यावर निराशेची झापड पडल्यावांचून राहणार नाहीं. आपापल्या सोईप्रमाणें क्षेत्र आंखून घेऊन हिंदुस्थानांतील निरनिराळ्या लोकांनीं राष्ट्रीयत्त्वाच्या बागेची मशागत करण्यास लागलें पाहिजे ही गोष्ट मनावर ठसेल तर मात्र उद्योगास उमेद येण्याचा संभव आहे. बंगाल प्रांताचें उदाहरण घेतलें असतां आह्मीं ह्मणतों ही गोष्ट कोणासही पटेल. आमच्या मतें बंगाली राष्ट्राचें ' राष्ट्रीयत्त्व ' आज जें ढळढळीतपणें दिसूं लागलें आहे, तेंही आयरिश लोकांप्रमाणें मर्यादित क्षेत्रांमध्यें कल्पनाबीज रुजल्यामुळेंच होय. संयुक्त बंगाल प्रांत हा क्षेत्रफळ अगर लोकसंख्या यांचे मानानें जरी हिंदुस्थानांतील इतर कोणत्याही प्रांतापेक्षां मोठा असला तरी, दुसऱ्या कोणत्याही प्रांतास ज्या कांहीं गोष्टी दुर्लभ त्या बंगाली लोकांस अनुकूल आहेत. उदाहरणार्थ, संयुक्त बंगालप्रांत हा भूवर्णनदृष्ट्या अखंड असून एका बिहारी लोकांखेरीज, बाकी जवळ जवळ चार कोटी बंगाली लोकांची भाषा, धर्म व ऐतिहासिक परंपरा या एकच

आहेत. या टापूंतील लोकांस एकाच प्रकारचें शिक्षण मिळालेलें आहे, व वंगभंग होण्यापूर्वींपर्यंत ते सर्व एकाच अमलाखालीं होते. धर्माचे बाबतींत त्यांजमध्यें भेदभाव नव्हता; व पूर्वबंगाल प्रांतामध्यें जरी मुसलमानी लोकांची वस्ती पुष्कळच आहे, तरी ती सर्वथा अशिक्षित असल्याकारणानें हिंदी राष्ट्रीयत्त्वाच्या कल्पनेच्या आड येण्यासारखी नव्हती. बंगाली लोकांची जशी भाषा व विद्या एक, तसें त्यांचें सुखदुःख व मानापमान हीं एकच होतीं. 'बंगाली' ह्मणून नाक मुरडणें, अगर सांपडेल तेथें नेभळा ह्मणून त्याचा उपमर्द करणें या गोष्टी संयुक्त बंगालच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत वाटेल त्या मनुष्यास सोसाव्या लागत. ह्मणून आपलें नांव उजळ व्हावें ही महत्त्वाकांक्षा व परिणतबुद्धि जेव्हां बंगाली लोकांच्या मनांत उद्भवली तेव्हां तिचा फैलावही या टोंकापासून त्या टोंकापर्यंत हां हां ह्मणतां एकदम झाला; व वंगभंगाचे योगानें राष्ट्र दुभंगावें तें न दुभंगतां उलट त्याच्या साखळीचे दुवे अधिकच दृढ झाले. असो; अशा रीतीनें प्रत्येक हिंदी राष्ट्रानें आपापल्या राष्ट्रीयत्वाचा जसा अभिमान बाळगला पाहिजे तसेंच इतर जातींवरही प्रेमभाव ठेवून तो वाढविला असतां, ब्रिटिश अमलाखालीं इतरत्र आहेत त्याप्रमाणें एक हिंदुस्थानांतही राष्ट्रसंघ बनण्याची वेळ येईल. परंतु आज प्रत्यक्ष पाहूं गेलें तर आयर्लंद व हिंदुस्थान यांचे दरम्यान क्षेत्रफळ व लोकसंख्या यांमध्यें जो फरक आहे तो आमच्या संकीर्ण राष्ट्रीयत्त्वास प्रतिकूल असाच आहे. आणि या दोन देशांच्या वैधर्म्याचा विचार करितांना, आह्मीं हिंदु लोक पुष्कळ आहों व आमचा देश अफाट आहे, ही गोष्टच आह्मांस बाधक आहे; व ह्मणून फ्राऊडसारच्या इतिहासकारास 'इंग्रजांस हिंदुस्थानावर राज्य करतां येतें, आयर्लंदावर राज्य करितां येत नाहीं' असे उद्गार काढतां आले. व ही वैधर्म्याची बाब फार महत्त्वाची म्हणून लक्षांत ठेवली पाहिजे.

**उपसंहार**—'आयर्लंदचा इतिहास' या विषयावरील त्रोटक माहिती व त्यासंबंधीं आमचे स्वतःचे जे विचार येथपर्यंत वाचकांपुढें ठेविले त्यांच्या उपसंहारादाखल दोन शब्द लिहून हा भाग पुरा करूं. आयर्लंदचा मनन करण्यासारखा इतिहास सुमारें पांचशें वर्षांचा, आणि त्यांपैकीं

शेंदीडशें वर्षांचा इतिहास तर हिंदुस्थानच्या आजच्या स्थितीला बराच लागू व बोध घेण्यासारखा आहे. तथापि कोणचाहि विषय कितीही महत्वाचा अगर मनोरंजक असला तरी, त्यासंबंधानें किती लिहितां येईल याला स्वाभाविक मर्यादा असतेच. ह्मणून सदरहू इतिहासांतील फक्त ठळक गोष्टीच सांगून, व तो हिंदुस्थानच्या इतिहासाला कितपत उपमानभूत होऊं शकतो याचें स्थूल दिग्दर्शन करून आह्मांस हात आखडता घेणें भाग आहे. आयरिश इतिहासांतील युद्धें, लढाया, तह, बंडें, तो मोडतांना इंग्रजी अधिकाऱ्यांनीं योजलेले उपाय व केलेले छळ, आयर्लंदांतील राज्यघटना व शासनपद्धति, साम्राज्य व स्थानिकस्वराज्य यासंबंधींचे कायदे, समाजरचना, विद्या व कला, लोकस्वभाव व आयरिश पुढाऱ्यांच्या हातून आजपर्यंत झालेल्या चळवळी—या सर्वांचा पद्धतशीर असा इतिहास द्यावयाचा ह्मटलें तर तो एक प्रचंड ग्रंथच होईल. तथापि आह्मीं मागील सात आठ भागांत त्या इतिसाचा जेवढा भाग दिलेला आहे, तेवढ्यावरून आयरिश लोकांचे इंग्रजांशीं पूर्वापर संबंध कसे बनत गेले, त्यांचें राजकीय ध्येय काय आहे, व हें ध्येय मिळविण्यास त्यांनीं आजपर्यंत कशा प्रकारच्या मार्गांचें अवलंबन केलें, या विषयींच्या विचाराची दिशा वाचकांस कळली असेल अशी आह्मांस आशा आहे. आतां ज्या कारणाकरितां प्रस्तुत विषय हिंदुस्थानच्या दृष्टीनें महत्त्वाचा, त्याच कारणाकरितां हिंदुस्थानांतील मुद्रणस्वातंत्र्याच्या आजच्या स्थितीच्या दृष्टीनें तो विवेचन करण्यास थोडासा नाजूक असा होता यांत शंका नाहीं. परंतु कोणच्याही लोकोपयोगी अशा विषयावर एखाद्याचे विचार ठाम बनले असले ह्मणजे मग त्याच्या विवेचनाचे बाबतींत नसती मर्यादा मागें लावून घेणें नीट नाहीं. व त्याच नियमास अनुसरून, दडपशाहीचें कुंड पेटलेलें असतां, इंग्रजराज्यकर्त्यांस संतापकारक अशा आयर्लंदच्या इतिहासाची माहिती व आठवण आमच्या वाचकांस आह्मीं करून दिली त्याचें कारण हेंच कीं, आयर्लंदचा इतिहास हा हिंदुस्थानास कित्येक बाबतींत अगदीं आदर्शासारखा असून राज्यकर्ते व हिंदुस्थानचे लोक या दोघांनींही त्याचें शांतपणें मनन करून बोध घेण्यासारखा आहे. जगांत कोणत्याही दोन व्यक्ति जरी कधींही सोळा आणे सारख्या नसतात तरी, प्रत्यक्ष

व्यवहारांत 'भ्रांति-कृत चमत्कार' उत्पन्न होण्याइतका सारखेपणा असलेला पुष्कळ वेळां आढळून येतो. मनुष्य स्वभाव येथून तेथून एक असल्यामुळें 'जगांत इतिहासाची पुनरावृत्ती होत असते' हा सिद्धांत खरा ठरण्याइतकें निरनिराळ्या व दूरदूरच्या देशांच्याही इतिहासांत साम्य सिद्ध होतें. परंतु मागें एके ठिकाणीं आह्मी दाखविल्याप्रमाणें हिंदुस्थान व आयर्लंद यांच्यामध्यें जुळ्या भावाप्रमाणें कांहीं विशेषच साम्य आहे; आणि आयर्लंदच्या इतिहासावरून पटण्यासारखा बोध असेल तर तो हाच कीं, जरी केवळ तामसी वृत्तीनें केलेले अत्याचार राष्ट्रोद्धार करण्यास उपयोगी पडत नाहींत, तरी राष्ट्रीयत्वाची भावना ही सर्वस्वी सात्विक आहे; व राज्यकर्त्यांनीं कितीही दडपशाहीचें दडपण घातलें तरी त्यांतून ती आपलें डोकें वर काढल्याशिवाय कधींही राहत नाहीं. प्रजेचें अंतिम ध्येय काय आहे हें राज्यकर्त्यांस आपल्या स्वतःच्या मनाच्या साक्षीनेंच जसें कळत असतें, तसेंच हातीं असलेली राज्यसत्ता घालविण्यास राज्यकर्ते नाखूष कां असतात हें प्रजाजनांनाही आत्मौपम्याचे तत्वानें कळण्यासारखें आहे. परस्परांचें अंतिम साध्य नुसतें तोंडानें कबूल करूनच जर सर्व तंटा मिटणें शक्य असतें, तर मग चळवळी व दडपशाही हे शब्दच अस्तित्वांत आले नसते. परंतु अनुभवाशिवाय अथवा साक्षात्काराशिवाय जसें ब्रह्मज्ञान मिथ्या, तसेंच प्रतीतिलेशाशिवाय राजकीय अंतिम साध्यही मिथ्याच होय. याचमुळें व्यावहारिक राजकारणांत रणें पडतात, आणि अंतिम साध्याचें ध्यान व उच्चार पदोपदीं करण्याचा प्रयत्न जशी प्रजा करिते, तसेच राज्यकर्तेही ही प्रवृत्ति हाणून पाडण्याचा प्रयत्न पावलोपावलीं करीत असतात. या द्वंद्वांत प्रत्येक देशाभिमानी मनुष्यास 'मी सर्व प्रजाजनांचा प्रतिनिधी आहे' असें वाटतें, व राज्य संभाळण्याचा सर्व भार मजवर आहे असा अभिनिवेश प्रत्येक राजनिष्ठ सेवकास उत्पन्न होतो. एखाद्या अत्याचारी मनुष्यास आपला बॉंब अगर आपलें पिस्तुल यशस्वी झालें असें पाहून 'इंग्रजी राज्याच्या अभेद्य प्राकारांत मीं खिंडार पाडलें,' किंवा एखाद्या पोलीस अधिकाऱ्यानें खोट्या पुराव्यानें एखादा गुन्हा रंगवून लोकांस शिक्षा करविल्यास 'मी राजद्रोहाचें पेकाट चांगलेंच मोडलें,' असें जर वाटूं शकतें, तर स्वदेशी व बहिष्कारासारखी

चळवळ उत्पन्न करणाऱ्या देशभक्तास ‘ एका व्यक्तीला करतां येईल इतका राष्ट्रोद्धार मी केला ’ असें वाटावें, किंवा कायदेकौन्सिलें वाढवून थोड्याबहुत हिंदी लोकांस वरिष्ठ जागांवर नेमल्यामुळें ‘ न भूतो न भविष्यति ’ अशा प्रकारचा मुत्सद्दीपणा दाखवून मीं राज्य राखलें ’ असें एखाद्या स्टेटसेक्रेटरीस वाटावें यांत नवल नाहीं ! राजा व प्रजा या उभय पक्षांकडील व्यक्तींनीं अशा रीतीनें अभिनिविष्ट होऊन केलेल्या उद्योगानेंच राष्ट्रीय राजकारणाचा इतिहास बनत असतो. आयर्लंदांत जसा तो बनला आहे तसाच जवळ जवळ तो हिंदुस्थानांत बनत आहे हेंच दाखवावयाचा आमचा हेतु होता, व तो अल्पांशानें तरी सिद्धीस गेला असेल अशी आह्मांस उमेद आहे.

आयर्लंदमध्यें राष्ट्रीयत्त्वाच्या कल्पनेचा उदय झाल्यापासून आजवर ज्या चळवळी झाल्या त्यांचा नामनिर्देश वेळोवेळीं करण्यांत आलेला आहेच. पण त्यांचा समग्र इतिहास देणें शक्य नाहीं. विहंगम दृष्टीनें पाहतां असें दिसून येईल कीं, आयरिश लोकांच्या मुख्य तीन मागण्या होत्या, त्यां पैकीं दोन त्यांस मिळाल्या असून तिसरी अद्यापि वादग्रस्त स्थितींत आहे. या मागण्या ह्मणजे १ धर्मस्वातंत्र्य, २ जमिनीची मालकी, व ३ स्वराज्य ( होमरूल ) या होत. पैकीं पहिली मागणी १८२९ सालीं देण्यांत आली. धर्मस्वातंत्र्याप्रमाणें धर्मशिक्षणस्वातंत्र्य हेंही आयरिश लोक मागत आहेत, परंतु क्याथोलिक लोकांची अशी स्वतंत्र युनिव्हर्सिटी अद्यापि उत्पन्न व्हावयाची आहे. मात्र ती पुढेंमागें होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. जमिनीच्या मालकीसंबंधाची मागणी अंशतः देण्यास प्रथम १८७० सालीं सुरुवातझाली, व १९०३ सालीं कॉनझरव्हेटिव प्रधानमंडळ अधिकारारूढ असतां जो जमिनीबाबद कायदा झाला त्याच्या योगानें या देणगीस बरेंच पूर्णत्व आलें. आयर्लंदांतील जमिनीचे मालक आयरिश लोकच असले पाहिजेत हें तत्त्व १८७० च्या कायद्यानें प्रथम कबूल केलें. परंतु इंग्रजी जमीनदारांकडून आपल्या जमिनी सोडवून घेण्यास आयरिश शेतकऱ्यांस कशा रीतीनें मदत करावयाची हा प्रश्न आज चाळीस वर्षें हळूहळू सुटत असून, सरकारी तिजोरींतून या कामीं शेतकऱ्यांस मदत करावी हें तत्त्व आतां ठरून चुकलें आहे. नुकतेंच गेल्या आगष्ट महिन्यांत पार्लमेंटमध्यें जमीन-

बाबत कायद्याची एक पुरवणी जोडण्यांत आली असून, आयरिश शेतकरी आपल्या वाडवडिलांच्या जमिनीचे निखालस मालक होणें हा आतां फक्त थोड्याशा कालावधीचाच प्रश्न आहे. राजकारणाचें युद्ध करण्यास राष्ट्रांतील लोकांचे अंगीं जी एक प्रकारची सामाजिक सुस्थिति प्रथमतः असावी लागते ती वरील दोनही मागण्या देण्यांत आल्यानें आयरिश लोकांचे अंगीं हल्लीं आली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य, राजकीय बाबतींत समान हक्क, शिक्षण आणि आपल्या मालकीचें असें चरितार्थाचें साधन—इतक्या गोष्टी असल्या ह्मणजे मग यापुढील राजकारणाचे प्रश्न प्रजेच्या स्वाभिनास सुसंगत अशा रीतीनें हळू हळू सुटतात. सुराज्य व सुस्थिति असल्यावर मग एखाद्या राष्ट्रांतील लोक कोणच्या विशिष्ट प्रकारच्या स्वराज्याचा हट्ट धरतील हे सांगणें कठिण आहे. तथापि एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, आयर्लंदांत दारिद्रय व आपत्ति यांचें साम्राज्य असल्याचे वेळीं, ह्मणजे उदाहरणार्थ, एकोणिसाव्या शतकाचे मध्यभागीं, निर्भेळ स्वराज्य मागण्याचा जो हट्ट दिसून येत होता तो आजमित्तीस ह्मणजे वरील कारणांनीं थोडीबहुत सुस्थिति आल्यावर दिसून येत नाहीं. सुमारें पंधरा वर्षांपूर्वीचें आयरिश लोकमत ध्यानांत घेतलें तर असें दिसून येईल कीं, त्या वेळीं होमरूल ह्मणजे 'विशिष्ट स्वराज्य' हींच आयरिश राष्ट्रभक्तांची जास्तीत जास्ती मागणी होती. सन १८८६ अगर १८९३ सालीं जें होमरूल बिल पार्लमेंटपुढें आलें व ज्यास आयरिश सभासदांनीं पाठिंबा दिला होता त्यांत जें स्वराज्य आयर्लंदास देऊं केलें होतें तें—१७८२ सालीं, म्हणजे सुमारें शंभर वर्षांपूर्वी आयर्लंद ज्या स्वराज्याचा प्रत्यक्ष उपभोग घेत होतें त्याच्याहून एक कलेनें मागें किंवा अपूर्ण होतें; व १७८२ चें स्वराज्यही खऱ्या निर्भेळ स्वराज्याहून एक कलेनें अपूर्ण होतें. तात्पर्य, आणेवारीच्या भाषेंत बोलावयाचें तर १८९३ सालीं आयरिश लोक एकमतानें चौदा आणे स्वराज्य मागत होते; व सहानुभूति पूर्ण इतिहासकार लेके यानें लिहिल्याप्रमाणें, दैवगतीनें आयरिश लोकमतांत सन १८०० व १८९३ त्यांचे दरम्यान असा कांहीं विलक्षण फेरबदल झाला कीं, जो लोकपक्ष १७८२ सालीं पंधरा आणे स्वराज्याकरितां लढण्यास तयार झाला होता त्याचेच

वंशज १८९३ सालीं चौदा आणे स्वराज्यही मागण्यास तयार नसून, इंग्लंद व आयर्लंद यांच्या संयोगापासून जे फायदे राष्ट्रास मिळण्यासारखे आहेत तेच अधिक मौल्यवान आहेत असें त्यांस वाटूं लागलें होतें. पण असे हे फेरबदल समाजांत होतच असतात. त्यांत कांहीं विशेष नाहीं. व्यक्तीच्या अगर वर्गांच्या मतांत फेरबदल झाला तरी चौदा आणे कां होईना पण स्वराज्य मागणारा असा एक तरी वर्ग आयर्लंदांत आजमित्तीस आहे, एवढेंच नव्हे तर लोकमताची सत्ता आज त्याच्याच हातीं आहे. १८९३ पर्यंत जे आयरिश पुढारी झाले त्यांचा, स्विफ्ट किंवा बार्क्ले यांच्यापैकीं कोणाना कोणाच्या तरी शिष्यशाखेंत अगर संप्रदायांत समावेश होतो; व स्विफ्ट किंवा बार्क्ले यांपैकीं कोणीही निर्मेळ स्वराज्यवादी नव्हता. तथापि स्विफ्ट हा राजस तत्वज्ञानाचा व राजस राष्ट्रीय सिद्धांताचा प्रतिपादक असून त्याच्या शिष्यसांप्रदायांत ल्यूकस, ग्रॅटन, फ्लड, ओकॉनेल व पार्नेल यांचा समावेश होतो तो. बार्क्ले हा सात्विक तत्ववादी असून त्याच्या शिष्यशाखेंतलि विद्यमान पुढारी ह्मणजे सर होरेस प्लंकेट हा होय. १८९३ चें होमरूल बिल नापास झाल्यानंतर होमरूलच्या पक्षाची थोडीशी पिच्छेहाट होऊन त्याच्या दोन अंगांस दोन इतर पक्ष प्रबळ होऊं लागले. एक पक्ष 'गॅलिक अमेरिकन लीग' चा व दुसरा सर होरेस प्लंकेट याचा. पहिल्या पक्षाचीं मतें फीनियन लोकांसारखीं असून, पार्नेलनंतर झालेला राष्ट्रीय पक्षाचा ऱ्हास व १८९३ सालीं होमरूलच्या रणक्षेत्रावर झालेला ग्लॅडस्टनसाहेबांचा पराभव, या कारणांनीं त्या पक्षाच्या एकांतिक स्वातंत्र्यवादास इल्लीं थोडेंसें तेज आलेलें आहे. दुसऱ्या पक्षाचा सिद्धांत बार्क्लेच्या सिद्धांताप्रमाणें असून त्याचें मत असें आहे कीं, आयरिश लोकांस खरी सुस्थिति येण्यास राजकीय चळवळीबरोबरच, किंबहुना कांकणभर जास्तच, उद्योगधंदे, शेतकी सराफी, व उदीम यांचें ज्ञान अवश्य असून त्यांनीं स्वावलंबनाचे तत्वावर आपली सांपत्तिक स्थिति सुधारली पाहिजे. जमिनी बाबद झालेले अखेरअखेरचे कायदे हे या पक्षाच्या चळवळींचेंच फळ असून या कायद्यांनीं या पक्षाचे मतास दिवसेंदिवस अधिकाधिक अनुयायी मिळत चालले आहेत. वर सांगितलेल्या पहिल्या पक्षास अमेरिकेंत जितकें तेज आहे तितकें आयर्लंदांत नाहीं.

परंतु राजकीय सुधारणेविषयींची निराशा व एकांतिक स्वातंत्र्याची मागणी यांचे सामानाधिकरण्य अथवा समान व्याप्ती ही आयरिश इतिहासांतील निरनिराळ्या काळच्या अनेक उदाहरणांवरून सहज सिद्ध करून देतां येईल. १७९८ किंवा १८४४ सालप्रमाणें बंड करून स्वातंत्र्य मिळविण्याच्या या पक्षाच्या साध्यास दिवसेंदिवस अडचणीच जरी अधिक येत आहेत, व आयर्लंदावर परचक्र येणें किंवा देशांतच बंड होणें या गोष्टी पूर्वींहून जरी अधिक अवघड झाल्या आहेत, तरी परदेशाशीं लढतांना इंग्लंदचा पराभव झाला तर अशा संकटाचे वेळीं कदाचित् आयर्लंदांत ही एखादें बंड होण्याचा संभव आहे. अर्थात् हा पक्ष प्रबळ होऊं देणें अगर न देणें हें इंग्लंदच्या मुत्सद्दिगिरीवर अवलंबून राहील. दुसरा पक्ष प्रबळ व्हावा अशी इंग्लंदची स्वतःची इच्छा आहे, व तो प्रबळ झाला तर आयर्लंदची सांपत्तिक स्थिति तरी चांगली सुधारेल, आणि लोकांस सुराज्यानें व आज असलेल्या आठ आणे स्वराज्यानें जें काय सुख मिळेल तें तरी उपभोगावयास सांपडेल. तात्पर्य, अशा दोन प्रतिपक्षांमध्यें आजमित्तीस होमरूलचा पक्ष सांपडलेला आहे. एकीकडे ‘ होमरूल ’ च्या स्वराज्याचें निदान चौदा आणे ध्येय आणि तीक्ष्ण राजकीय चळवळीचा मार्ग हीं शाबूत राखून, व दुसरीकडे ‘ गॅलिक अमेरिकन लीग ’ चें निर्भेळ स्वातंत्र्याचें सोळा आणे ध्येय व सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग या द्वयीच्या पचनीं न पडतां, रेडमंड वगैरे होमरूलच्या पक्षाच्या पुढाऱ्यांस वाट चालावयाची आहे. दोन वर्षांपूर्वी सुमारें दहा आण्यांचें स्वराज्य ‘ अधिकारविभागणी ’च्या स्वरूपानें लिबरल प्रधानमंडळानें होमरूलच्या पक्षास देऊं केलें होतें तें त्यानें साफ नाकारलें; व यामुळें या दहा आण्याऐवजीं चौदा आण्याचें स्वराज्य पुढेंमागें होमरूलपक्षास मिळतें किंवा कालवशात् हें दहा आण्याचेंही दृष्टिआड होतें हें पाहणें आहे. परंतु इंग्लंदांतील राजकारणाचें एकंदर धोरण पाहतां आयर्लंदास अगदीं स्वतंत्र असें पार्लमेंट मिळणें हें जसें कठीण दिसतें, तसेंच पण आयरिश लोकांचें तूर्त समाधान होईल असा होमरूलचा एखादा विशिष्ट प्रकार त्यांस लवकरच मिळावा अशीं ही चिन्हें खास आहेत.

वरील हकीकतीवरून आयर्लंदांतील राष्ट्रीय चळवळ बरीच यशस्वी झालेली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जें राष्ट्र जिवंत राहतें का समूळ नष्ट होतें अशी भीति सुमारें साठ वर्षांपूर्वी वाटत होती त्यास आजची ही अर्धवट समाधानकारक अशी स्थिति कां होईना पण ती येऊन त्याचें राष्ट्रीय जीवित काळजीच्या टापूंतून बाहेर पडलें याचें कारण आयरिश लोकांची निःसीम राष्ट्रभक्ति व उज्वल स्वार्थत्याग हें होय. आयरिश लोकांच्या आंगीं जे उपजत दोष असतील—आणि असे दोष अनेक आहेत—त्यामुळें त्यांच्या उद्योगाच्या फलप्रदतेस थोडासा कमीपणा आला असेल; परंतु जर त्यांच्या आंगचे दोष काय आहेत हें समजून घेऊन ते टाळतां आले तर हिंदुस्थानच्या लोकांसही निराश होण्याचें कारण नाहीं. परमेश्वराची आयर्लंदवर मेहेरबानगी आहे व हिंदुस्थानावर इतराजी आहे असें थोडेंच आहे! व दोघांसंबंधानें पाहतां दारूबाजपणा वगैरे दोष आयरिश लोकांपेक्षां हिंदुस्थानच्या लोकांत खचित कमी आहेत. जें काय पाहिजे आहे तें हेंच कीं ऐक्य, उद्योग व स्वार्थत्याग. व हे गुण जर कां हिंदुस्थानच्या लोकांस आपल्या अंगीं आणतां आले तर मग हिंदुस्थानाला स्वराज्य मिळविण्याचे कामीं, इंग्लंदच्या संबंधानें पाहतां, आयर्लंदपेक्षां अनुकूल अशा गोष्टीच अधिक भरतील हें आपोआप आढळून येईल. अशा स्थितींत स्वराज्याचे कामीं आयर्लंदास अघाडी मारूं न देण्याची सात्विक परंतु प्रबळ आकांक्षा हिंदुस्थानानें धरली तर ती त्यास खास शोभण्यासारखी आहे! ईश्वर करो व ही भूषणभूत आकांक्षा सफल होवो!

---

# भाग १० वा.

# चरित्रमाला.

कोणत्याही देशांतील लोकांच्या चारित्र्याची कल्पना त्या देशांतील ठळक व्यक्तींच्या चरित्रांवरून करितां येण्यासारखी असते. व आयर्लंदसंबंधानें तर ही गोष्ट विशेषच लागू पडते. कारण आयर्लंदचा इतिहास हा संस्थांचा इतिहास नसून व्यक्तींचाच इतिहास आहे असें ह्मटलें तरी चालेल. आयरिश राष्ट्रांतील लोकांच्या गुणदोषांचें वर्णन मागें आठव्या भागांत थोडेंबहुत करण्यांत आलेलेंच आहे; व पुढील चरित्रमाला वाचतांना, समष्टिरूप समाजांतील गुणदोष व्यष्टिरूपानें या निरनिराळ्या सुप्रसिद्ध व्यक्तींमध्यें कसे उतरले होते हें वाचकांनीं नीट न्याहाळून पहावें. ही चरित्रमाला कालानुक्रमानें दिलेली आहे व त्याचें कारण उघडच आहे. परंतु दुसऱ्याही एका रीतीनें तींतील व्यक्तींचा अनुक्रम लावितां येतो; व तो राजकीय चळवळीच्या पद्धतीच्या दृष्टीनें. या अनुक्रमाच्या तत्त्वाप्रमाणें पाहतां आयझॅक बट हा प्रथम येतो, त्यानंतर चार्लमाँट, नंतर ग्रॅटन, नंतर डॅनियल ओकॉनेल, नंतर पार्नेल, नंतर स्मिथ ओब्रायन, नंतर वूल्फटोन व शेवटीं रॉबर्ट एमेट असे येतात. व अशा रीतीनें अगदीं शास्त्रशुद्ध व निर्भेळ अशी कायदेशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांपासून अगदीं निर्भेळ व शास्त्रशुद्ध बेकायदेशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांपर्यंतची मालिका तयार होते. वास्तविक चारित्र्य, दानत, शहाणपण किंवा देशभक्ति यांचे दृष्टीनें पहातांही वरीलच अनुक्रम सुलट किंवा उलटही लागेल असें मात्र नाहीं. परंतु कोणत्याही रंगाच्या जशा निरनिराळ्या छाया असतात, व त्यांपैकीं एक दुसरीपेक्षां हटकून चांगली असें सप्रमाण सिद्ध करण्यास साधन नसतां रुचिवैचित्र्यामुळें त्यांपैकीं कोणास एक तर कोणास दुसरी छाया जशी पसंत पडते, तोच प्रकार वरील चरित्रमालेंतील निरनिराळ्या पुष्पांच्या आवडीनावडीसंबंधानें घडण्याचा संभव उघड आहे.

दधि मधुरं मधु मधुरं द्राक्षा मधुरा सुधापि मधुरैव
तस्य तदेव हि मधुरं यस्य मनो यत्र संलग्नम्.

हें एकजात मधुर पदार्थांसंबंधानें झालें. परंतु जेवणांत आपण असाही प्रकार पाहातोंच कीं नाहीं कीं, कोणास अगदीं गोड गोड अदमुऱ्याचें कालवण आवडत, तर कोणास तीन तीन दिवसांचें आंबट ताक असल्याशिवाय चालत नाहीं. वरील सर्व व्यक्तींस देशभक्ति हा धर्म साधारण होता असें घेऊन चाललें म्हणजे मग त्यांनीं पत्करलेल्या निरनिराळ्या मार्गांतील भेदांस केवळ रुचिवैचित्र्याशिवाय दुसरें कांहीं कारण नाहीं असेंच ह्मणावें लागतें. परंतु ग्रॅटन यानें केवळ कायदेशीर चळवळीचा पुरस्कार केला ह्मणून त्याची देशभक्ति कमी प्रतीची होती, व रॉबर्ट एमेट यानें एकदम बंड करण्यास धांव घेतली म्हणून त्याची देशभक्ति श्रेष्ठ दर्जाची होती असा मात्र अर्थ नाहीं. मूर्खपणाच्या उतावळ्या धाडसाला ज्याप्रमाणें कित्येक वेळां उज्ज्वल देशभक्तीचें खोटें श्रेय मिळण्याचा संभव असतो, त्याचप्रमाणें खऱ्या व कळकळीच्या दूरदर्शीपणावर भ्याडपणाचा व्यर्थ दोषारोप येण्याचाही संभव असतो. देशप्रीति हा गुण मनुष्याच्या केवळ एखाददुसऱ्या कृत्यावरून पारखावयाचा नसून त्याच्या एकंदर जीवितक्रमावरूनच तो त्याचे अंगीं आहे अगर नाहीं हें ठरवावें लागतें.

प्रस्तुत चरित्रमालेंत आयर्लंदच्या इतिहासांतील सन १७४० पासून १८९० पर्यंत ह्मणजे १५० वर्षांच्या काळांतील सर्व प्रमुख पुढाऱ्यांचा समावेश केलेला असून त्या सर्वांची मिळून एक प्रकारची सांखळी बनलेली आहे. चार्लमॉंट व ग्रॅटन हे समकालीन होते. ग्रॅटनच्या मध्यवयाचे सुमारास वूल्फटोन व एमेट यांचीं बंडें झालीं. ग्रॅटनला डॅनियल ओकॉनेल यानें पाहिलें होतें, व या वृद्धतरुण देशभक्तांच्या जोडीचीं संभाषणेंही झालेलीं होतीं. स्मिथ ओब्रायन हा ओकॉनेलचा प्रतिपक्षी व अर्थात् समकालीन होता. आयझॅक बट हा ओकॉनेल यास नातवासारखा शोभणारा पण समकालीन होता. आणि पार्नेल यानें आयझॅक बटच्या उतारवयांत त्यास आयरिश पक्षाच्या पुढारीपणापासून पदच्युत केलें होतें. अर्थात् या आठ व्यक्तींचा इतिहास म्हणजे आयर्लंदचा १५० वर्षांचा इतिहास होय.

# (१) अर्ल ऑफ चार्लमॉंट.

अठरावे शतकाचे अखेरीस आयर्लंदांत झालेल्या राष्ट्रीय चळवळीमध्यें ज्या राष्ट्रभक्तांनीं पुढाकार घेतला होता त्यांपैकीं चार्लमॉंट हा एक प्रमुख सरदार होता. ग्रॅटन, फ्लड, वगैरे मुत्सद्दी वक्ते या नात्यानें प्रसिद्ध होते, तरी चार्लमॉंट याचा समाजांतील उच्च दर्जा, त्याची श्रीमंती वगैरे गोष्टींमुळें त्यास एक प्रकारचें विशेष महत्त्व स्वाभाविकपणें आलेलें होतें. श्रीमंत घरंदाज वगैरे लोक सार्वजनिक कामांत सहसा पडत नाहींत, परंतु खऱ्या मनानें जर ते अशा कामांत पडले तर त्यांस अग्रपूजेचा मान मिळण्यास मुळींच विलंब लागत नाहीं हा अनुभव सर्वत्र आहे. मोठ्या घराण्यांतील लोकांस त्यांच्या हातून कांहीं होत नसतांही बहुमान देण्याची प्रवृत्ति साधारणतः जनसमाजांत नेहमींच आढळते. मग त्यांतूनही लोकहिताकडे लक्ष घालणारा एखादा लक्ष्मीपुत्र अगर संस्थानिक अगर अमीर उमराव निघाला तर त्याच्या लोकसेवेचें चीज व कौतुक इतरांहून अधिक व्हावें यांत नवल नाहीं. एक तर असे लोक अशा कामांत पडत नाहींत, यामुळें अपूर्वाई वाटते; सार्वजनिक कामांत पडल्यापासून मनुष्याची जी स्वहिताची हानि प्रायशः होते ती, मोठ्यांचें सर्वच मोठें या न्यायानें, अशा लोकांची इतरांहून अधिक होते; शिवाय कार्यसिद्धीच्या दृष्टीनें पहातांही अशा लोकांनीं हातीं धरलेल्या कामास नामरूप इतरांपेक्षां फार त्वरित येतें. अर्ल ऑफ चार्लमॉंट यानें केलेल्या राष्ट्रकार्याकडे वरील दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे.

चार्लमॉंटचा जन्म दब्लिन येथें सन १७२८ सालीं झाला. याच्या घराण्यामध्यें व्हायकाउंटची पदवी पूर्वीं चार पिढ्यांपासूनची चालत आलेली होती व घरचा जमीनजुमला मोठा असल्यामुळें हें घराणें फार धनसंपन्न असे. चार्लमॉंट याच्या गर्भश्रीमंतीस विद्याभिरुचीची जोड मिळाल्यामुळें लहानपणापासूनच त्याचें चरित्र सतेज व लोकचित्ताकर्षक असें झालें होतें. त्यानें आपले तारुण्याचे दिवस सर्व युरोपखंडभर प्रवास करण्यांत व प्रत्येक देशांतील प्रमुख विद्वान् लोकांचा स्नेह संपादण्यांत घालविले. तो स्वतः सुबुद्ध, हरहुन्नरी, अष्टपैलू, विद्या व कला यांचा मार्मिक भोक्ता व आश्रयदाता असल्यामुळें त्याची छाप सर्व लोकांवर पडत असे. विद्वान् मनुष्य श्रीमंत व स्वतंत्र

असला ह्मणजे अर्थात् दुधांत साखर पडल्यासारखेंच होतें. प्रवासाहून परत आल्यावर त्याच्या वयाचे सव्विसावे वर्षींच विद्यापीठाकडून त्यास एल. एल. डी. ची पदवी मिळाली, व आर्मा या प्रांताचा त्यास गव्हर्नर नेमण्यांत आलें. परंतु अधिकार गाजविण्यापेक्षां लोकसेवा करण्याची त्याला अधिक आवड होती यामुळें लवकरच तो त्या वेळच्या आयरिश लिबरल पक्षांत सामील झाला. सन १७६० सालीं आयर्लंदच्या उत्तरभागांत बंड झालें त्या वेळीं आपल्या स्वामिनिष्ठेस अनुसरून आपलें स्वतःचें असें लहानसें सैन्य जमवून बेलफास्ट शहराचें रक्षण करण्यास त्यानें मदत केली. तो मनाचा मोठा असल्यामुळें प्रॉटेस्टंट लोकांप्रमाणें क्याथोलिक लोकांवरही ते स्वदेशबांधव ह्मणून तो प्रेम करी. आणि त्यांना लष्करी शिक्षण द्यावें, व लष्करांत त्यांचा समावेश व्हावा याविषयीं त्यानें बरीच खटपट केली. सन १७६२ सालीं फिरून उत्तर आयर्लंदांत प्रॉटेस्टंट लोकांचें बंड झालें. त्या वेळीं फिरून त्यानें राजपक्षास चांगली मदत केली. व त्याच्या कामगिरीकरितां त्यास 'अर्ल' ही पदवी देण्यांत आली. परंतु राजनिष्ठेपेक्षां त्याची लोकनिष्ठाच अधिक बलवत्तर होती. व त्यामुळें आयरिश पार्लमेंटची सुधारणा व्हावी, कांहीं कालावधीनें जुने सभासद रद्द होऊन नवे निवडून देण्यांत यावे, सभासद निवडून देण्याचा हक्क पुष्कळ लोकांस व त्यांच्या महत्त्वाच्या प्रमाणानें मिळावा, अशाविषयीं होणाऱ्या वादविवादांत व खटपटींत त्यानें प्रजापक्षीय पुढाऱ्यांस उघडपणें मदत दिली, व राजपक्षास नाखुष करण्याचें धाडस केलें. सन १७७३ सालपर्यंत इंग्लंद व आयर्लंद या दोन देशांत तो जाऊन येऊन रहात असे. व इंग्लंदांत असतां बर्क, जॉन्सन, ह्यूम, गोल्डस्मिथ रॅनॉल्डस, होगार्थ, वगैरे प्रसिद्ध विद्वान् व कलाभिज्ञ लोकांच्या निकट परिचयांत त्याचा नित्य काल जाई.

परंतु या सालापासून पुढें तो बहुधा आपला सर्व काळ स्वदेशांतच घालवूं लागला. कारण आयर्लंदांतील राष्ट्रीय चळवळ याच सुमारास चांगली जोरावर आली होती. आयरिश राष्ट्रभक्तांच्या मनांत आपली पार्लमेंट स्वतंत्र असावी अशी आकांक्षा उत्पन्न होण्यास, व अमेरिकेमध्यें पराजय होऊन इंग्लंदास पायबंद लागण्यास एकच गांठ पडली. अर्थात् आपली चळवळ नेटास लावण्याची खरी हीच वेळ आहे, असें जाणून गरीब व श्रीमंत, क्याथोलिक व प्रॉटेस्टंट,

लिबरल व कॉनझर्व्हेटीव या सर्वांचा मिलाफ होऊं लागला. अमेरिकेंत कुमक पाठविण्याची आवश्यकता असल्यामुळें होतें नव्हतें तें इंग्रज सैन्य आयर्लंदांतून प्रधानमंडळानें काढून नेलें होतें, एवढेंच नव्हे तर खुद्द आयर्लंदवरही परचक्र येतें कीं काय, अशी भीति असल्यामुळें देशांतल्या देशांत राजनिष्ठ अशा स्वयंसेवकांचें सैन्य उभारल्याशिवाय गत्यंतर नाहीं असेंही त्यांना दिसून आलें. व हें सैन्य उभारण्याचें एकदां ठरल्याबरोबर देशभक्तीची लाट उसळून हां हां ह्मणतां ह्मणतां साठ हजार स्वयंसेवकांचें सैन्य जय्यत तयार झालें. लवकरच त्यांना कवाइत शिकविण्याची वगैरे व्यवस्था झाली. त्यांच्या पलटणी बनविल्या गेल्या, त्यांचे स्वयंसेवक अधिकारी नेमले गेले, व अनेक वर्षांच्या परिश्रमानेंच जणूं काय तयार झालेलें हें सैन्य एकसूत्री बनून देशकार्याच्या वाटेल त्या योजनेंत गारद होण्यास तयार झालें. यानंतर लवकरच असें दिसून आलें कीं, देशांत बंड वगैरे होण्याची अगर परचक्राची भीति उरलेली नाहीं. तथापि हें सैन्य उभारणें जितकें सोपें होतें, तितकें तें मोडणें सोपें नव्हतें. या सैन्यांत पगारदार लोकांची खोगीरभरती नव्हती, तर हे स्वयंसेवक आपलें खाऊन देशाचें काम करण्यास प्रवृत्त झालेले होते. त्यांनीं हातीं शस्त्र घेतलें होतें त्यास राजाज्ञेपेक्षां स्वदेशभक्ति व स्वयंस्फूर्ति हींच अधिक कारणीभूत होतीं. हें सैन्य जमविल्यानें पुष्कळ राजकार्य तर झालेंच; परंतु लोककार्य त्याहून अधिक झालें. कारण स्वदेशाखातर देहपतनापर्यंत हानि सोसण्यास साठ हजार लोकांचा जमाव होऊं शकतो, हें लोकांचे लोकांस पूर्वी कळलें नव्हतें तें आतां कळून आलें. हा जमाव जमतांना सैनिकांनीं राजकार्य करण्याची शपथ घेतली होती, परंतु त्याजबरोबर देशकार्य करूं नये अशी शपथ मात्र त्यांनीं घेतलेली नव्हती. अर्थात् राजकार्य सिद्ध झाल्यावर ह्मणजे आयर्लंदवरील परचक्राची भीति नाहींशी झाल्यावर राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं या नवीन संघटनेचा फायदा देशकार्याकडे करून घ्यावा असें सहजच ठरविलें. या सैन्याच्या अधिकारी वर्गांत राष्ट्रांतील बहुतेक पुढारी सामील असून आपापल्या योग्यतेप्रमाणें निरनिराळ्या हुद्यांच्या जागा त्यांनीं पत्करिल्या होत्या. व दिवसा हातांत लेखणी घेऊन उत्कृष्ट लेख लिहिणारा अगर रात्रीं पार्लमेंटमधील वादविवादांत आपल्या वक्तृत्वानें इतरांस दिपवून टाकणारा असा आयरिश देशभक्त, सकाळीं पहावें तों मैदानावर कमरेस तलवार लटकावून आपल्या कनिष्ठांकडून

कवाईत व सलामी घेत आणि वरिष्ठांस कवाईत व सलामी देत उभा असलेला दृष्टीस पडे. अशा लोकांनीं जर राजकीय स्वातंत्र्य मागितलें तर तें वावगें असें तरी कोण म्हणेल ? व तें देण्यास नाकबूल तरी कोणास कसें होतां येईल ? या सैन्याचा व त्याच्या अधिकाऱ्यांचा असा निश्चय ठरलेला होता कीं, ज्याप्रमाणें आपण परचक्राची भीति नाहींशी केली, त्याचप्रमाणें आपल्या पार्लमेंटची ही गुलामगिरी देशांतून नाहींशी करूं तेव्हांच शस्त्र खालीं ठेवूं. व एकंदर परिस्थितीच्या मानानें हा त्यांचा मनोरथ सिद्धीस जाण्याची बळकट आशा होती. अशा या सैन्याचा मुख्य पुढारी व चालक चार्लमाँट हा होता. सन १७८० सालीं त्यास या सैन्याचा अधिपति निवडण्यांत आलें व पुढें हें सैन्य आस्तित्वांत असेपर्यंत हा अधिकार त्याजकडेसच होता. चार्लमाँट ह्याचा या वेळचा मुख्य सहायकर्ता ग्रॅटन हा होता, व अशा या दोन देशभक्तांच्या मैत्रीनें राष्ट्रकार्यास विशेषच बळकटी आलेली होती. या दोघांच्या सल्लामसलतीनें व पुढाकारानें पुढें कांहीं दिवसपर्यंत स्वयंसेवक सैन्याच्या सभा, कॉन्फरन्सें वगैरे भरून अखेर सन १७८२ सालीं आयरिश पार्लमेंटला स्वातंत्र्य मिळून व्यापारविषयक कायदे रद्द करवितां आले.

परंतु स्वयंसेवकांचें हें अवतारकृत्य संपल्याबरोबर या सैनिकांच्या उत्साहास अर्थातच कमीपणा येऊं लागला; व नंतर क्याथोलिक लोकांना स्वातंत्र्य देण्याच्या बाबतींत आयरिश पुढाऱ्यांच्यामध्यें मतभेद माजल्यामुळें स्वयंसेवक सैन्याच्या घटनेचीं बंधनेंही शिथिल झालीं. पार्लमेंटचें स्वातंत्र्य मिळवूं व ती सुधारूं असा चार्लमाँट वगैरे लोकांचा जो संकल्प होता, त्यापैकीं फक्त पहिला भाग साध्य होऊन स्वतंत्र झालेली पार्लमेंट सुधारण्याचे पूर्वीं हें सैन्य बरखास्त झालें. लोकपक्षांत थोडीशी शिथिलता आलेली पहातांच अधिकाऱ्यांनीं संधि साधली. 'पार्लमेंटच्या डोक्यावर नागवी तलवार अहोरात्र खडी ठेवणारें हें सैन्य कोण ? तसें करण्यास त्याला काय अधिकार ? व तलवारीच्या दहशतीनें मागितलेली मागणी कबूल करणें हा नादानपणा असल्यामुळें आह्मी ती कधींही देणार नाहीं !' असा कांगावा राजपक्षाचे लोक करूं लागले. हें स्वयंसेवकांचें सैन्य व हा पुढाऱ्यांचा मेळ जर आणखी कांहीं दिवस टिकता तर क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य पांचपंचवीस वर्षें आधीं मिळतें, १७९८ सालीं झालेलें वूल्फटोनचें

बंड झालें नसतें, व आयरिश पार्लमेंट सभा मोडली ती मोडली नसती असें कित्येक विचारी ग्रंथकारांचें मत आहे. परंतु या गोष्टी घडून येणें हें एकावरच अवलंबून नव्हतें. शिवाय पुढें पुढें ग्रॅटन व चार्लमाँट यांचेंही पटेनासें होऊन त्यांचा बरेच दिवसांचा स्नेह तुटला. व अशाश्वततेच्या ठराविक कारणामुळें, १८ व्या शतकाच्या अखेरीस झालेल्या राष्ट्रीय चळवळीमुळें आयर्लंड व इंग्लंड यांचा संबंध कदाचित् कायमचा तुटावयाचा तो कायमचाच जडला. १७९१ सालीं चार्लमाँट यानें वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं न बनल्यामुळें आर्मा प्रांताच्या गव्हर्नरच्या जागेचा राजीनामा दिला. याच सुमारास सुप्रसिद्ध ‘ व्हिग क्लब ’ या नांवाच्या लिबरल संस्थेची त्यानें स्थापना केली. प्रथम कांहीं दिवसपर्यंत या क्लबाचा सभासद या नात्यानें वूल्फटोन हा चार्लमाँटचा सहकारी असे. परंतु एडमंड बर्कप्रमाणें चार्लमाँट याच्या मनावरही फ्रान्समधील राज्यक्रांतीच्या योगानें विपरीत परिणाम घडला. या राज्यक्रांतीच्या योगानें मनुष्यस्वातंत्र्याच्या खऱ्या तत्त्वाची वाढ न होतां त्यांतील अत्याचारांनीं त्या तत्त्वाची पीछेहाट होण्यासच अधिक मदत झाली असा चार्लमाँट याच्या मनाचा ग्रह झाला. शिवाय या राज्यक्रांतीस क्याथोलिक लोकांचें धर्मवेड कारणभूत आहे असें वाटून आयरिश क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य देण्याचे कामीं त्याचें मन कचरूं लागलें. व या अनेक कारणांमुळें त्याच्या हातून सार्वजनिक कार्य हळू हळू कमी होऊं लागलें. कारण कोणाच्याही उत्साहास अखेर ओहोटी लागतेच. परंतु देशसुधारणेचे आपले प्रयत्न व्हावे तितके सफल झाले नाहींत या विचारानें त्याचे मनावर निराशेचें पटल आलें. १७९८ सालीं झालेलें बंड व त्यामुळें झालेली देशाची वाताहत पाहून तर त्याचें प्रेमळ मन अगदीं विदीर्ण झालें. मात्र आयरिश पार्लमेंट मोडून आयरिश राष्ट्राचें सौभाग्य चिन्ह पुसून टाकलेलें डोळ्यांनीं पाहण्याचें दुःख जें पुढें वाढून ठेविलें होतें, व जें ग्रॅटन वगैरे त्याच्या इतर सहायकर्त्यांस भोगावें लागलें, त्याची वेळ येण्यापूर्वींच सुदैवानें १७९९ सालीं चार्लमाँट याचा अंत झाला. अखेरपर्यंत त्याची विद्याभिरुचि, त्याचा विविधकलाव्यासंग, लोकसेवा करण्याची बुद्धि, लोकप्रियता वगैरे कायम राहिलीं होतीं. परंतु सर्व जन्मभर एकाच प्रकारचा अनुभव येणें व कोणत्याही प्रकारच्या यशाची दिवसानुदिवस अबाधित बढती

होणें ही गोष्ट मनुष्य कोटींतील प्राण्यांच्या लागीं नसल्यामुळें इतर लोकां-प्रमाणें नशिबाच्या चढउताराचा अनुभव चार्लमॉंट यासही घ्यावा लागला. परंतु विद्या, पैसा स्वतंत्रता व समाजांतील उच्च दर्जा यांचा उपयोग चार्ल-मॉंट याचे हातून देशकार्याकडे निरपेक्षबुद्धीनें जितका झाला, तितका झाल्या-वर मग कोणाही मनुष्यव्यक्तीस जगांतील इतर अनुभव कसेही आले असले तरी मरतांना स्वतःस सुखी व धन्य ह्मणवून घेण्यास कांहीं हरकत आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

---

## ( २ ) हेनरी ग्रॅटन.

सनदशीर रीतीनें चळवळ करणाऱ्या आयरिश राष्ट्रभक्तांत हेनरी ग्रॅटन याची प्रमुखत्वानें गणना करितात. याचा जन्म सन १७४६ सालीं झाला. जॉन ग्रॅटन, प्रस्तुत चरित्रनायकाचा बाप, हा राजकीय पक्षाचा असून त्याचे वेळीं चालू असलेल्या स्वातंत्र्याचे चळवळीस तो प्रतिकूल होता. हेनरी ग्रॅटन याचा विद्याभ्यास आयर्लंदांतच झाला. विद्यार्थी या नात्यानें तो मेहनती, हुषार व तरतरीत असून बालपणापासून निश्चय व करारीपणा यांबद्दल त्याची ख्याती असे. असें सांगतात कीं, लहानपणीं त्याचा स्वभाव थोडासा भित्रा असे; व या गोष्टीची लाज वाटून, हा दोष काढून टाकण्या-करितां, तो रात्रीं अपरात्रीं श्मशानांत जाई व थडग्यांवर बसून बराच वेळ काढी. या युक्तीनें त्यानें आपल्या अंगचा भित्रेपणा निश्चयानें काढून टाकिला. भाषाविषय हा त्याचा आवडता असे व विद्यार्थीदशेंत ग्रीक व लॅटिन ग्रंथकारांचीं केलेलीं पारायणें पुढें वक्ता या नात्यानें त्यास फार उप-योगीं पडलीं. ग्रॅटन याचा बाल्यावस्थेंतून तारुण्यावस्थेंत प्रवेश होण्याचे वेळीं डॉक्टर ल्यूकस व हेनरी फ्लड हे सार्वजनिक कामांतील पुढारी होते. व 'फ्रीमन्स जर्नल' या नांवाच्या उत्तम वर्तमानपत्राच्या द्वारें त्या वेळच्या तरुण पिढीस राजकीय शिक्षण मिळत असे. फ्लड हा ग्रॅटनपेक्षां वयानें दहा-पंधरा वर्षें वडील असून या वेळीं तो आपल्या तरतरीच्या ऐन उमेदींत होता. यामुळें ग्रॅटनला फ्लडबद्दल कांहीं विलक्षण आदर व प्रेम वाटे, परंतु पुढें कांहीं वर्षांनीं कर्मधर्मसंयोगानें असें घडून आलें कीं, फ्लड व ग्रॅटन यांच

पूज्यपूजकसंबंध जाऊन त्याचे जागीं प्रतिपक्षीयांचा संबंध आला; व आयरिश पार्लमेंटमध्यें हे दोघे देशभक्त दोन पक्षांचे पुढारी या नात्यानें परस्परांशीं विरोधभक्तीनें व हेव्यादेव्यानें बरींच वर्षे वागले. प्रसंगविशेषीं एकमेकांनीं एकमेकांवर इतकी बेसुमार कडकपणाची, अन्यायाची व अपशब्दपूर्ण टीका केली कीं, पुढें तिची त्यांनाही लाज वाटूं लागली. राजकीय वादविवादांत व इतर सार्वजनिक कामांत लोक पडले ह्मणजे त्यांच्यांतील नुसता वयाचा भेदचसा काय, परंतु इतर अनेक प्रकारचे उच्चनीचपणाचे भेदही नाहींसे होऊन ते सर्व एकाच पायरीवर येतात! व हा अनुभव कोणत्याही राष्ट्रास, कोणत्याही पिढींत आढळून येईल. असो. डॉक्टर ल्यूकस हा प्रजापक्षीय होता एवढेंच नव्हे, तर त्या वेळचा अग्रगण्य जहाल होता. अर्थात् त्याच्या मताचा पगडा आपल्या मुलावर बसलेला जॉन ग्रॅटन यास पहावेना. परंतु केवळ आपल्या बापास खुष करण्याकरितां आपलीं राजकीय मतें सोडून देण्यास अगर लपवून ठेवण्यास हेनरी ग्रॅटन हा तयार नसल्यामुळें बापलेकांचा बेबनाव झाला, व बापानें आपल्या मिळकतीवरील मुलाचा वारसा रद्द करून टाकला. सन १७६७ सालीं ग्रॅटन हा इंग्लंदमध्यें कायद्याचा अभ्यास करण्याकरितां गेला. परंतु बॅरिस्टरीच्या 'टर्मस' भरीत असतां कायद्यापेक्षां त्याचें लक्ष इतर अनेक विषयांकडे वेधलेलें होतें. एक तर त्याला नाटकें, काव्य व संगीत यांचा फार नाद असे. व त्याहूनही विशेष ह्मटलें ह्मणजे राजकारणाचा नाद तर त्यास बेसुमारच होता. कायद्यावरील व्याख्यानें ऐकण्याचें होतां होईं तों टाळून तो पार्लमेंटच्या सभागृहांत जाऊन तेथील वादविवाद ऐकण्यांत तासांचे तास घालवी. आणि घरीं परत आल्यानंतर, चांगलीशी चांदणी रात्र असल्यास, बागेंत हिंडतां हिंडतां आपल्याशींच संभाषण करीत, व केव्हां मौजेखातर तर केव्हां वक्तृत्व शिकण्याचे हौसेनें, एखाद्या लठ्ठशा वृक्षाच्या खोडाला अथवा मोठ्याशा दगडाला सभाधिपति कल्पून त्यास उद्देशून आवेशयुक्त अशीं मोठमोठीं भाषणें करी. ही त्याची लीला पाहून ज्या कित्येकांस तिचें मर्म कळत नसे, त्यांस हा खरोखरच भ्रमिष्ट झाला असें वाटे. याच कालावधींत त्याचा व फ्लड याचा परिचय झाला. अशा तऱ्हेनें कांहीं काल अप्रस्तुत व्यवसायांत व कांहीं मनाच्या उदासीनतेमध्यें काढून, परंतु अखेरीस बॅरिस्टरीची परीक्षा देऊन, सन १७७२ सालीं

तो आयर्लंदास परत गेला. परंतु वकिलीच्या धंद्याचा त्याला मनापासून तिटकारा असे. अगदीं पहिला खटला त्यानें घेतला त्यांत त्यास अपयश आलें, ह्मणून त्यानें अशिलाकडून घेतलेले निम्मे पैसे परत केले; व राजधानीचें शहर सोडून स्वभावतः प्रिय अशा एकांतवासांत राहण्याकरितां कोठें तरी निघून जावें असें त्यानें ठरविलें. एकांतवासांत राहिल्यानें जी शांतता, जें समाधान व जो आनंद प्राप्त होतो, त्याचा तो भोक्ता होता व यास्तव, कांहीं आकस्मिक कारणांनीं लवकरच त्याचा राजकारणांत प्रवेश झाला नसता तर, त्याचें पुढील आयुष्य कशा प्रकारें गेलें असतें हें सांगणें कठिण आहे.

सन १७७५ सालीं आयरिश पार्लमेंटमध्यें नव्या निवडणुकी झाल्या, त्या वेळीं देशभक्तिपूर्ण व प्रतिष्ठित जमीनदार चार्लमाँट याचे साहाय्यानें ग्रॅटनची निवडणूक अनायासानें झाली. या नवीन पार्लमेंटांत फ्लडला त्याच्या योग्यतेनुरूप मंत्रिमंडळांत जागा मिळाली होती, व ग्रॅटन हा प्रजापक्षाकडे असल्यानें फ्लडची नेहमींची जागा रिकामी झाली ती ग्रॅटन यास मिळाली. कारण पार्लमेंट सुरू होतांच अल्पकाळांत ग्रॅटन याचें वक्तृत्व व राजकारणपटुत्व यांची छाप लोकांवर पडून, पार्लमेंट सभेमध्यें लोकपक्षाचा पुढारी होण्यास हाच लायख आहे असें आपोआपच ठरून गेलें. हा विवक्षित काल इंग्लंद व आयर्लंद यांच्यामधील झटापटीचा होता. इंग्लंदच्या प्रधानमंडळानें केलेले व्यापारविषयक कायदे अन्यायाचे असून आयरिश कारागिरांस ते दुःसह झाले होते. व आपली अप्रीति व्यक्त करण्याकरितां त्यांनीं इंग्रजी मालावर बहिष्कार घातलेला होता. आयर्लंदवर परचक्र येण्याची भीति असून, मनांतून ज्यांची बंडाकडे प्रवृत्ति आहे अशा कित्येक आयरिश देशभक्तांचें व फ्रान्समधील स्वातंत्र्यप्रिय पुढाऱ्यांचें सूत याच वेळेस जमलेलें होतें; व देशांत स्वयंसेवक सैनिकांचीं पलटणें तयार होऊन त्यांच्या कवाइती उघडपणें व पद्धतशीर रीतीनें चालू असून हरप्रयत्नानें वर सांगितलेले व्यापारसंबंधीं कायदे रद्द करवून देशी कारागिरांचें हित साधावें अशाविषयीं प्रजापक्षीय पुढाऱ्यांमध्यें बहुधा एकमत झालेलें होतें. या प्रसंगीं ग्रॅटन याचें मत असें होतें कीं, काय वाटेल तें झालें तरी हें भांडण हातघाईवर आणूं नये, व बेकायदेशीर-

पणा व रक्तपात याविरुद्ध त्यानें आपला अभिप्राय देऊन तशा आशयाचीं उघड भाषणेंही केलीं. सुदैवानें रक्तपाताचा हा प्रसंग टळला. व लॉर्ड नॉर्थ या मुत्सद्याचे शहाणपणानें हे अन्यायाचे कायदे रद्द होऊन आयरिश कारागिरांचे जे हात आज सुमारें शंभर वर्षेपर्यंत जखडले गेले होते ते मोकळे झाले. आयर्लंद देशामध्यें लोकांचा समज मात्र असा पक्का होऊन राहिला कीं, हे कायदे रद्द होऊन देशी कारागिरीच्या पायांतील बिडी तुटली, ती वास्तविक इंग्रजी प्रधानमंडळाच्या उदारबुद्धीनें नसून केवळ आयरिश स्वयंसेवकांच्या सैन्यानें आपल्या म्यानांतील तलवार अर्धीअधिक उपसून दाखविल्यामुळें. अशा रीतीनें आत्मनिष्ठतेचें फळ त्यांस गोड लागल्यामुळें त्यांच्या मानासिक धैर्यांत व उत्साहांत भर पडली. अशा उत्साहाचे प्रसंगीं राष्ट्राची मजल एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर व दुसरीवरून तिसरीवर त्वरित जाते. 'आयरिश कारागिरांना आज स्वतंत्रता मिळाली खरी, परंतु चंचल मनाच्या इंग्रजी प्रधानमंडळाचें घ्या काय ? रद्द झालेले कायदे उद्यां हे फिरून अमलांत आणून पुन्हां देशी कारागिरीचे पायांत जुनी बिडी अडकाविणार नाहींत कशावरून ? तेव्हां हे कायदे नुसते रद्द होऊन भागणार नाहीं, तर फिरून ते अमलांत आणले जाणार नाहींत अशाबद्दल कांहीं तरी लायख जामिनकी मिळाली पाहिजे. आयरिश पार्लमेंट सभेस आयर्लंदमधील लोकांच्या सुखदुःखाच्या संबंधाचे कायदे आपल्या मुखत्यारीवर करतां यावे व या बाबतींत इंग्रजी प्रधानमंडळाचा शक अगर त्यांची सत्ता चालूं नये असें होण्यास आयरिश पार्लमेंटसभेचें स्वातंत्र्य ब्रिटिश पार्लमेंट सभेनें कबूल केलें पाहिजे.' अशी कल्पना आयरिश पुढाऱ्यांचे डोक्यांत आला व हीच युक्ति खरोखर बिनतोड आहे अशी त्यांची खात्री झाली. ग्रॅटन यास ही कल्पना आवडली इतकेंच नव्हे, तर ती प्रत्यक्ष घडवून आणण्याचे मागें एकदम लागलें पाहिजे असें तो प्रतिपादन करूं लागला. कित्येक मुत्सद्यांच्या मतें ही वेळ आयरिश लोकांनीं फक्त कृतज्ञता व्यक्त करण्याची होती, अधिक मागण्या मागण्याची नव्हती. ग्रॅटनचा आग्रह पाहून एडमंड बर्क यास ग्रॅटन हा कोणी वेडापीर आहे असें वाटलें. त्यानें आपला आग्रह सोडावा अशाबद्दल मोठमोठे लोक त्यास भिडा घालूं लागले; परंतु त्या ऐकण्याची ग्रॅटनची इच्छा नसल्यामुळें, त्यांचें मन दुखविण्याचा

प्रसंगच येऊं नये ह्मणून, तो पार्लमेंटच्या सुटींत दब्लिन शहर सोडून लांब एकांतवासांत जाऊन राहिला. ‘ कृतज्ञतेच्या दिखाऊ सोंगांत कांहीं अर्थ नाहीं व कांहीं कांहीं गोष्टींबद्दल कृतज्ञा वाटली तरी राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या उद्योगाचे आड कृतज्ञता येऊं शकत नाहीं; पूर्वी दिलेल्या देणग्यांबद्दल कृतज्ञता वाटली तर ती खुशाल व्यक्त करा; परंतु पूर्वीच्या देणग्या खरोखर उपयुक्त करण्यास आणखी इतर देणग्यांची जर अवश्यकता असेल तर त्या मागण्यास मागेंपुढें पाहण्याचें कारण नाहीं ’ असें त्याचें मत असे.

पार्लमेंटच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आयरिश पार्लमेंटमध्यें सन १७८१ सालीं त्यानें प्रथम आणला; परंतु स्वयंसेवकांच्या सैन्याचे मदतीशिवाय त्याच्या प्रयत्नास यश आलें नसतें. स्वयंसैनिकांचा कायदेशीरपणानें वागण्याचा बाणा असे; परंतु त्यांची सर्वदेशभर पसरलेली घटना, त्यांची लष्करी कवाइत, व त्यांचा मेळ पाहून अधिकाऱ्यांस दहशत वाटूं लागली होती. पार्लमेंटच्या स्वातंत्र्यासंबंधानें लोकमताचें एकीकरण करण्याकरितां देशांतील स्वयंसेवक प्रतिनिधींची एक सभा १७८२ च्या फेब्रुआरीच्या पहिल्या तारखेस दब्लिन येथें भराविण्यांत आली. या सभेस १४३ निरनिराळ्या संस्थांकडून २४४ प्रतिनिधी आले होते. सभेंत दंगाधोपा होऊं नये व भलतेसलते फाजीलपणाचे ठराव आणले जाऊं नयेत याबद्दल आगाऊ खासगी रीतीनें तरतूद करण्यांत आली होती. व शेवटीं पार्लमेंटचें स्वातंत्र्य व क्याथोलिकांचे हक्क याविषयीं ठराव पास करण्यांत आले. १७८२ च्या एप्रिल महिन्यामध्यें हा विषय आयरिश पार्लमेंटमध्यें निघून ग्रॅटनची सूचना १६ व्या तारखेस पास झाली. व हा दिवस जसा ग्रॅटनच्या आयुष्यांत त्याचप्रमाणें आयर्लंदच्या इतिहासांत अजरामर होऊन राहील यांत शंका नाहीं. कारण या दिवशीं आयर्लंद देशामध्यें लोकमताचें जितकें ऐक्य दिसून आलें, तितकें त्यापूर्वी अगर त्यानंतर केव्हांही दिसून आलें नाहीं. आयर्लंदच्या पार्लमेंटचें स्वातंत्र्य नष्ट झालें होतें तें परत मिळविण्याकरितां ग्रॅटन, चार्लमॉंट व स्वयंसेवक यांची ही सर्व खटपट होती, ती आयर्लंदमध्यें तर साधलीच; परंतु ब्रिटिश पार्लमेंटनें आपण केलेला कायदा आपण होऊन रद्द केल्याशिवाय नुसत्या आयरिश पार्लमेंटनें केलेल्या ठरावास किंमत काय ? परंतु सुदैवानें या वेळीं इंग्लंदांत फॉक्स हा मंत्रिमंडळांत असून आय-

लँदचा स्टेट सेक्रेटरीही होता. ग्रॅटन व फॉक्स यांचा स्नेह असून ते उभयतां एकमेकांचे चहाते होते. ग्रॅटन यानें खाजगी पत्र लिहून फॉक्स यास स्पष्टपणें असें कळविलें कीं, बऱ्याबोलानें ब्रिटिश पार्लमेंटनें पूर्वींचा कायदा रद्द केला तर बरी गोष्ट आहे, नाहीं तर हत्यार हातीं घेण्यास मीं स्वयंसेवकांचे सैन्यास मोठ्या नाखुषीनें सल्ला देईन व मग काय होणें असेल तें होईल. फॉक्स हा मनानें उदार होता व त्याचें सर्व आयुष्य स्वतंत्रतेच्या पवित्र कार्याकरितां पार्लमेंटमध्यें राजपक्षाशीं भांडण्यांत खर्च झालें होतें. त्याच्या सांगणीवरून पूर्वींचा कायदा रद्द करून आयरिश पार्लमेंटच्या स्वातंत्र्याबद्दलचा हक्क ब्रिटिश पार्लमेंटनें मान्य केला, व यामुळें आयर्लंदांत जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. लोकांनीं दीपोत्साह केले, मिरवणुकी काढल्या, व राष्ट्रास स्वातंत्र्याची सनद मिळवून दिल्याबद्दल ग्रॅटनचे सर्व राष्ट्रानें जाहीर रीतीनें आभार मानले येवढेंच नव्हे, तर त्याला देणगीदाखल पन्नास हजार पौंड रक्कम पार्लमेंट सभेनें मंजूर केली. ग्रॅटन हा अशा प्रकारची देणगी स्वीकारण्यास कबूल नव्हता; परंतु ‘ तुह्मीं वकिलीचा धंदा जर करीत नाहीं, तर तुमच्या निर्वाहाचें कायमचें साधन प्राप्त करून देण्याचें राष्ट्राचें कर्तव्य आहे; व यापुढें इतर व्यवसाय न करतां अखंड चित्तानें राष्ट्रकार्य करण्यास तुह्मांस मोकळा वेळ मिळावा, व तुह्मांस कोणावर अवलंबून राहण्याचें कारण पडूं नये हा काय तो सदरहु देणगी देण्यांत राष्ट्राचा हेतु आहे, ’ असें त्याच्या वजनदार मित्रांनीं त्यास समजावून सांगितल्यावर त्या देणगीचा त्यानें स्वीकार केला. त्या पैशानें त्यानें एक जमीनदारी विकत घेतली. पुढें लौकरच त्याचा विवाह झाला; आणि तो व त्याची पत्नी हीं दोघं पार्लमेंट चालू असतां दब्लिन येथें व सुट्टीमध्यें या जमीनदारीच्या गांवीं येऊन राहूं लागलीं.

या वेळीं ग्रॅटन याचें वय अवघें छत्तीस वर्षांचें होतें व पार्लमेंट सभेंत त्याचा प्रवेश होऊन फक्त सातच वर्षें झालीं होतीं. या स्वल्प कालावधींत तो लोकप्रियतेच्या शिखरावर चढला असें म्हणण्यास हरकत नाहीं. यापुढें त्याच्या आयुष्याचीं आणखी बरींच वर्षें गेलीं व मरेपर्यंत एकसारखा तो सार्वजनिक काम करण्यांत गढलेला होता. परंतु १७८२ सालची त्याची लोकप्रियता पुढें अव्याहत टिकली नाहीं. याचें कारण उघड आहे. १७८२

सालीं कर्मधर्मसंयोगानें सर्व राष्ट्राचें एकमत झालेलें होतें व सर्व राष्ट्रास प्रिय अशी गोष्ट त्याचे हातून सिद्धीस गेली. परंतु शुक्लपक्षांत पौर्णिमेचे दिवशीं सर्व सोळा कलांचा अवतार झाल्यावर त्यापुढेंही प्रत्यहीं पूर्णबिंब असाच चंद्र दृष्टीस पडावा अशी आपली इच्छा असते; तथापि तसें घडून येऊं शकत नाहीं. राष्ट्रांतील अगर समाजांतील पुढाऱ्यांच्या सत्कीर्तीची व लोकप्रियतेची गोष्ट अशीच आहे. सन १७८२ सालीं आयरिश पार्लमेंट सभेस स्वातंत्र्य प्राप्त होऊन लोकांनीं ग्रॅटनचे आभार मानिले, त्याचे धन्यवाद गाइले, व 'नवीन स्वतंत्र पार्लमेंट सभेचा जनक' असें त्याचें नांवही पडलें. परंतु यानंतर थोडे दिवस जातात न जातात तोंच त्याच्या उपकाराचा विसर पडून लोकांमध्यें असंतोष उत्पन्न झाला व कुरबुर सुरू झाली. कित्येकांस ग्रॅटनचा हेवा वाटूं लागला, व त्यानें केलेल्या राष्ट्रकार्याचें महत्त्व ज्या कोणत्या उपायांनीं कमी होईल ते उपाय ते योजूं लागले. त्यांनीं असा एक नवीन बूट काढिला कीं, ज्याच्यायोगानें आयरिश पार्लमेंट सभेला स्वातंत्र्य मिळालें असें ह्मणणें आहे, तो तरी ब्रिटिश पार्लमेंट सभेनें केलेलाच कायदा कीं नाहीं ? सन १७४६ चा कायदा त्यांनीं होऊन नवीन उपस्थित केला होता तोच आतां फक्त रद्द केला, याहून अधिक तें काय मिळालें ? आज सकृद्दर्शनीं पार्लमेंटला मिळालेलें स्वातंत्र्य जर खरोखरच निरंतर टिकावें असें असेल, तर ब्रिटिश पार्लमेंट सभेनें आपणांस 'आयरिश लोकांवर बंधक होईल असा कायदा करण्याचा आपल्यास बिलकुल अधिकार नाहीं व या बाबतींत आयरिश पार्लमेंट सभा निखालस स्वतंत्र आहे,' असें स्पष्ट नवीन कायदा करून ठरवावें ! हा अशा प्रकारचा युक्तिवाद करणाऱ्यांचा वर्ग हळू हळू वाढत चालला. व प्रसिद्ध पुढारी हेनरी फ्लड हाही याच वर्गांत सामील झाला. असें करण्यांत फ्लडचे हेतु अनेक होते. एक तर ग्रॅटनबद्दल त्यास निःसंशय हेवा वाटत होता. ग्रॅटनच्यापूर्वी पार्लमेंटमधील पुढारीपणा फ्लड याजकडे होता व तो दोघांमध्यें वडील होता. असें असतां ग्रॅटन हा मागाहून येऊन पुढें सरसावला व लोकप्रियतेची आणि विजयश्रीची माळ वास्तविक आपल्या गळ्यांत पडावयाची ती ग्रॅटन याचे गळ्यांत पडली, याबद्दल त्यास विषाद न वाटणें अशक्य होतें. परंतु असंतुष्ट वर्गाचा पुढाकार घेण्यांत याहून अधिक चांगला असा त्याचा दुसराही एक हेतु होता. तो हा कीं, पार्ल-

मेंटच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाची वेळींच कड लावून न घेतली तर पुढें मागें तो हातचा जाईल, यास्तव तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे असें त्याच्या मनानें घेतलें. मात्र हा तवा तापण्यास लोकमताची ज्वाला पेटविण्याचे कामीं त्यानें ग्रॅटनइतका खरोखर पुढाकार घेतला नव्हता. वेळ पडल्यास आयरिश स्वयंसेवकांस हातांत शस्त्र धारण करण्याची सल्ला देण्यापर्यंत ग्रॅटनची एक वेळ मजल गेली होती, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. या अशा आणीबाणीचे वेळीं फ्लडनें निःसंशय कचर खाल्ली होती, ह्मणून राजकारणाचा तवा तापविण्याचें श्रेय त्याकडे तितकें येत नाहीं. परंतु एवीतेवीं तवा तापला आहे खरा व ग्रॅटननें त्याजवर एक पोळी भाजून घेतली आहे, तेव्हां आपण तरी दुसरी पोळी भाजून कां घेऊं नये असें फ्लड यास वाटणें साहजिक होतें. केवळ कायद्याचे दृष्टीनें पाहतां त्याची बाजू सयुक्तिकही होती. ती अशी कीं, आयरिश पार्लमेंट सभेस स्वातंत्र्य देण्याचें ब्रिटिश पार्लमेंट सभेच्या मनांत जर खरोखरीच होतें, तर आयर्लंदसंबंधीं कायदे करण्याचा आपल्यास अधिकार नाहीं असा स्पष्ट व विधायक कायदा करण्यास तिला कांहींच हरकत नव्हती. अशा प्रकारचा कायदा हीच आयरिश पार्लमेंटच्या स्वातंत्र्याची खरी व कायदेशीर जामीनकी होती. परंतु ग्रॅटन याचें ह्मणणें वेगळें होतें. तो ह्मणे कीं, जुना कायदा रद्द करणें व फ्लडच्या ह्मणण्याप्रमाणें स्पष्ट असा नवीन कायदा करणें या दोहोंची फलश्रुति वास्तविक एकच आहे. जुना कायदा रद्द झाला या गोष्टीचा भरपूर फायदा घेऊन तो आपण पचनीं पाडला ह्मणजे मग पार्लमेंटच्या स्वातंत्र्याविरुद्ध ब्र काढण्याची कोणाचीही छाती होणार नाहीं. शिवाय वरिष्ठाकडून कनिष्ठास स्वातंत्र्य मिळावयाचें असतां तें कांहीं गौरवानें, कांहीं गूढार्थानें असेंच मिळवावें लागतें. केवळ हमरीतुमरीवर येऊन, कायद्याचें साल काढून, अगर अर्थाचें ताक घुसळून मिळविण्याचे भरीस सहसा पडूं नये, कारण त्याचा परिणाम चांगला होत नाहीं. अप्रत्यक्ष शब्दांनीं व कृतीनें, ह्मणजे जुना कायदा रद्द करून, स्वातंत्र्याची देणगी देणें हेंच ब्रिटिश पार्लमेंटला जितकें जड गेलें, त्याहूनही आपला पराभव स्पष्ट शब्दांनीं कबूल करणें हें अधिक जड जाईल! पहिल्या गोष्टीनें ब्रिटिश पार्लमेंट सभेच्या हातचा फक्त अधिकार गेला, परंतु दुसरीनें आपला अपमान झाला असें कदाचित् तिला वाटण्याचा संभव आहे.

कायद्याच्या दृष्टीनें फ्लडचें म्हणणें बरोबर असेल, परंतु व्यवहाराचे दृष्टीनें आपलें म्हणणें अधिक सयुक्तिक आहे अशी ग्रॅटनची तक्रार होती. हा वाद एक वर्षभर जारीनें चालला होता. फिरून पूर्वीसारखी स्वयंसेवकांची चळवळ सुरू झाली, सभा भरूं लागल्या, अर्ज झाले व अखेर लोकमतास मान देण्याकरितां आणि आयरिश लोकांच्या मनांत विनाकारण शंका व अविश्वास राहूं नये म्हणून सन १७८३ सालीं ब्रिटिश पार्लमेंट सभेनें स्पष्टार्थक असा नवीन कायदा करून आयरिश पार्लमेंटचें स्वातंत्र्य कबूल व जाहीर केलें. अशा रीतीनें सुमारें शंभर वर्षांपूर्वीं म्हणजे सन १६८८ सालीं इंग्लंडांत जी एक प्रकारची राजकारणांतील क्रांति घडून आली, तशाच प्रकारची ही आयर्लंडांतील क्रांति घडून आली.

परंतु या क्रांतीचें फळ आयरिश लोकांस फार दिवस उपभोगण्यास सांपडलें नाहीं. जें पार्लमेंट स्वतंत्र झालें, त्यांतील कित्येक सभासदांनींच त्याचें शत्रुत्व आरंभिलें. शिवाय आयरिश पार्लमेंट सभेच्या दोऱ्या कांहीं अंशीं इंग्रजी प्रधानमंडळाच्या हातीं पूर्वींप्रमाणेंच राहिल्या. कारण प्रत्यक्ष हुकूम करून जें साधण्यासारखें नव्हतें, तें लांचलुचपत वगैरे देऊन व इतर रीतींनीं आयरिश सभासदांस वश करून घेऊन त्यांस साधतां येत असे. आयरिश लॉर्डांच्या सभेंत नवीन लॉर्ड नेमणें ही सर्वस्वी राजाच्या स्वाधीनची गोष्ट होती. तसेंच आयरिश हाउस ऑफ कॉमन्स सभेंतील सभासद नेमून देण्याच्या कित्येक 'वार्डांत' अगदीं थोडे म्हणजे केव्हां केव्हां दहा पांचही मतदार असल्यामुळें त्यांस वश करून घेऊन त्यांजकडून राजपक्षास अनुकूल असे सभासद निवडून आणणें हेंही अगदीं सोपें काम होतें. याच सुमारास आयरिश पार्लमेंटची सुधारणा करण्याची चळवळ सुरू झाली. या सुधारणेचा अर्थ असा होता कीं, देशांतील जितक्या अधिक लोकांस मत देण्याचा हक्क मिळवून देतां येईल तितका द्यावा. व मतदारांच्या निरनिराळ्या वर्गांकडून होतां होईतों संख्येशीं यथाप्रमाण इतके सभासद निवडून देतां यावे. म्हणजे सभेंतील प्रतिनिधित्वाचा फायदा देशांतील लोकांस सरसकट सारखा मिळावा. एकाचेच अगर थोड्यांचे हातीं पुष्कळ सत्ता असा प्रकार होऊं नये. हें सुधारणेचें तत्त्व ग्रॅटन, फ्लड, चॉर्लमाँट या सर्वांस सारखेंच पसंत होतें. परंतु किरकोळ गोष्टींवर त्यांचें ऐकमत्य

होईना. याच सुमारास ग्रॅटन व फ्लड यांजमधील चुरस व बेबनाव अधिकच वाढला व शेवटीं मजल येथपर्यंत गेली कीं, भर पार्लमेंट सभेमध्यें त्यांनीं एकमेकांस कधींही वापरूं नये असे शब्द वापरले. त्यांचें हत्यारें घेऊन द्वंद्व युद्धच व्हावयाचें; परंतु तें उभय पक्षांच्या मित्रमंडळाचे मध्यस्थीनें वांचलें. या वेळीं स्वयंसेवकांचें चालकत्व चार्लमाँट याजकडे होतें. त्याचा व ग्रॅटन याचा संबंध हळू हळू सुटत चालला होता. सन १७८३ सालीं सप्टंबरच्या आठव्या तारखेस पूर्वीप्रमाणें स्वयंसेवकांचें जंगी संमेलन भरलें. या संमेलनास त्यांच्या २७२ पटलटणांकडून पांचशें प्रतिनिधी आले होते, व या सभेनें पार्लमेंट सभेच्या सुधारणेसंबंधानें केलेले ठराव पार्लमेंट सभेपुढें मांडण्यास फ्लडची नेमणूक केली. अशा रीतीनें ग्रॅटन हा अर्थात्च मागें पडला. खुद्द पार्लमेंटमध्यें ग्रॅटन ह्यानें उदार मनानें फ्लडच्या वतीनें व सुधारणेच्या तत्त्वास अनुकूल असेंच भाषण केलें, परंतु फ्लडची सूचना पार्लमेंट सभेनें नामंजूर केली. स्वयंसेवकांनीं केलेल्या चळवळीचा असा मोड झाला व आपला हेतु तडीस नेण्याचे कामीं त्यांनीं यापुढें योग्य ती चळवळ चालू न ठेविल्यामुळें सुधारणेचें काम तसेंच पडून राहिलें. स्वयंसेवकांबद्दल लोकांमध्यें जो एक प्रकारचा आदर, बहुमान व आब वाटत होता, तो नाहींसा होऊन लवकरच ग्रॅटन व चॉर्लमाँट यांचा फार दिवसांचा स्नेहही तुटला. याच सुमारास आयर्लंदमधील ब्रिटिश लष्कर वाढविण्यासंबंधाच्या मंत्रिमंडळाच्या सूचनेस ग्रॅटन ह्यानें आपलें कर्तव्य म्हणून संमति दिली व त्यामुळें तर लोकांच्या मनांतुन तो बराच उतरला.

सन १७८२ पासून पुढें आयरिश पार्लमेंटास स्वातंत्र्य मिळाल्यामुळें तिच्या रचनेंत सुधारणा होऊन तिची कीर्ति व कार्यकुशलता वाढावी ती न वाढतां सुधारणेच्या वादाच्या भोंवऱ्यांत सांपडून अठरा वर्षांच्या आंतच ती रसातळास गेली व अखेर सन १८०० सालीं नामशेष झाली. हा अनिष्ट परिणाम घडून येण्यास प्रधानमंडळाकडून होणाऱ्या लाचलुचपतीचीं भरती हें एक कारण तर खरेंच, परंतु देशांतील पुढाऱ्यांचा आपसांतील बेबनाव व त्यांनीं परस्परांच्या महत्त्वाची केलेली हानि हेंही एक कारण होतें. यानंतर व्यापारविषयक कायद्याचा वादही फिरून उपस्थित झाला. आपल्या नूतन स्वातंत्र्याचा उपयोग करून इंग्लंदाहून येणाऱ्या मालावर जकात वगैरे बसवून

संरक्षणाचे तत्त्वावर आयरिश कारागिरीस मदत करावी, असें फ्लड याचें ह्मणणें होतें. परंतु ग्रॅटनचें ह्मणणें असें पडलें कीं, इंग्लंदांतील मंत्रिमंडळास पराभूत करावयाचें तर आयरिश लोकांनीं लिबरल पक्षाशीं सूत व संधान राखिलें पाहिजे. व ज्या अर्थी हल्लीं लिबरल पक्ष अनियंत्रित व्यापार पद्धतीच्या बाजूस आहे, त्या अर्थी आयरिश लोकांनींही ती बाजू सहसा सोडूं नये. इंग्लंदशीं होतां होईतों मैत्री राखावी. त्या देशांतील सर्वच पक्षांशीं वांकडे होणें नीट नव्हे असें तो आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत असे. परंतु इंग्लंदांतील दोन्ही पक्ष सारखेच लबाड आहेत, व आयरिश लोकांना भोळे समजून त्यांच्या हातांवर गुळखोबरें देऊन ते आपला कार्यभाग साधितात, व हें त्यांचें कपट ग्रॅटनसारख्या मंदबुद्धि पुढाऱ्यांस कळत नाहीं, असें फ्लड याचें ह्मणणें होतें. अखेरीस आयात मालावर कर बसविण्याची सूचना फ्लड यानें पार्लमेंटपुढें आणिली व ती नामंजूर झाली. सुधारणेची चळवळ व आयात मालावर जकात बसविण्याची सूचना या दोन्ही गोष्टींमुळें मुख्य मंत्री विलियम पिट हा रागावून ईर्षेस चढला; आणि भस्मासुराप्रमाणें, स्वतंत्र आयरिश पार्लमेंटाचा घातक हस्त तिच्याच डोक्यावर ठेवून तिचा नाश करण्याचा त्यानें संकल्प केला. ग्रॅटन हा स्वतः प्रॉटेस्टंट पंथाचा होता; परंतु क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य व समान हक्क द्यावे या मताचा तो प्रथमपासून असून मागें एके ठिकाणीं सांगितलेला टाईथचा कर रद्द करण्याबद्दलची सूचना त्यानेंच प्रथम आयरिश पार्लमेंट सभेपुढें आणिली, परंतु ती नापास झाली. अशा रीतीनें आयरिश लोकांच्या हिताच्या प्रत्येक कार्यास या स्वतंत्र पार्लमेंटाचे हातून पदोपदीं अडथळाच होऊं लागला. व इतक्या श्रमानें मिळविलेल्या स्वातंत्र्याचें चीज होईना, यामुळें पार्लमेंट सभेविषयीं लोकांची अनास्था व अप्रीति वाढूं लागली. इकडे ही सभा समूळ नाहींशी करण्याचे पिटचे प्रयत्न जोरावर येऊं लागले. याच सुमारास फ्रान्समध्यें क्रांतिकारक तत्त्वांचा फैलाव होऊं लागून त्या तत्त्वांबद्दलचें प्रेम आयर्लंदच्या उत्तर भागांतील प्रॉटेस्टंट लोकांत दिसून येऊं लागलें व धर्मद्वेष थोडथोडा कमी होऊं लागला. धर्माहूनही अधिक ईश्वरसंमत अशा राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उदय लोकांमध्यें होऊं लागल्यामुळें धर्मपंथांतील क्षुद्र भेदांचा त्यांना विसर पडूं लागावा हें स्वाभाविकच होतें; परंतु धर्मद्वेषा-

चा हा निरास पाहून मंत्रिमंडळास भीति व विषाद वाटूं लागला. आणि सरकाराबद्दल लोकांचा ग्रह चांगला होऊन त्यांजमधील परस्पर वैमनस्य कायम रहावें या हेतूनें ' क्याथोलिक लोकांस योग्य हक्क देण्यास आह्मीं कधीं मागें घेत आहों ? ते आह्मीही देणारच आहोंत, ' असें बोलण्यास त्यांना सुरुवात केली. इकडे धर्माच्या बाबतींत एकी होण्याची वेळ आली तों राजकीय मतांत लोकांमध्यें फूट पडण्यास आणखी एक कारण उत्पन्न झालें. लिबरल व कॉंझर्व्हेटिव्ह, सुधारणावादी व सुधारणाद्वेष्टे, सनियंत्रित व अनियंत्रित व्यापाराचे भोक्ते, क्याथोलिक स्वातंत्र्याचे शत्रु व मित्र, असे हे भेद पूर्वींचे होतेच; परंतु फ्रान्समधील राज्यक्रांतीमुळें क्रांतिवादाचे शत्रु व मित्र, ह्मणजे राजसत्ताक व प्रजासत्ताक राज्यपद्धतीचे पुरस्कर्ते, अशा प्रकारचें नवीन एक भेदलक्षण उत्पन्न झालें. या संधींत त्यांतल्यात्यांत सुखाचे असेही दोन दिवस निघून गेले. हिंदुस्थानांतील लोकांस ज्याप्रमाणें लॉर्ड रिपन हे प्रिय आहेत, त्याचप्रमाणें आयरिश लोकांस प्रिय असलेले व्हाइसरॉय लॉर्ड फिझ्झ विलियम यांची व्हाइसरॉय या नात्यानें आयर्लंदांत नेमणूक झाली, व त्यांचे अमदानींत ग्रॅटन हा कांहीं दिवस आयर्लंदांतील प्रधानपदावर आरूढ झाला. फिझ्झ विलियम याच्या मनांत ग्रॅटनबद्दल अत्यंत आदरबुद्धि होती, व आयर्लंदच्या राज्यकारभारांत मनःपूर्वक मदत करण्याचें अभिवचन त्यानें इंग्लंदाहून येण्याचे पूर्वींपासून ग्रॅटनकडून घेतलें होतें. परंतु फिझ्झ विलियम याचा व पिटचा बेबनाव झाल्यामुळें त्यांस लवकरच आपली जागा सोडून परत जाणें भाग पडलें. फिझ्झ विलियम व ग्रॅटन यांचा मिलाफ असतांही त्यांचे हातून आयरिश पार्लमेंटकडून रोमन क्याथोलिक लोकांचें अगर आयरिश राष्ट्राचें हित साधेल असें कोणतेंही काम करवून घेतां येईना. सन १७९२ सालीं क्याथोलिक लोकांस हक्क देण्याचें बिल आयरिश सभेपुढें आणिलेलें तिनें नामंजूर केलें, यामुळें क्याथोलिक लोकांनीं चिडून दंगा केला. क्याथोलिक व प्रॉटेस्टंट लोकांच्या मारामाऱ्या होऊन अधिकारीवर्गानें प्रॉटेस्टंट लोकांची कड घेऊन सुमारें तेराशें क्याथोलिक लोकांस इनसाफ न करतां हद्दपार केलें. पुढील सालीं अधिकारीवर्गानें नवीन अधिकार घेण्यासंबंधाचें बिल आणिलें व पास करून घेतलें. या बिलाचा ग्रॅटन व त्याचे साहाय्यकर्ते यांनीं अत्यंत जो-

राचा निषेध केला व असं स्पष्ट बोलून दाखविलें कीं, देशांतील असंतोष कमी व्हावा असें असेल तर असले दडपशाहीचे कायदे करून चालणार नाहीं, तर ज्यांस हक्क नसतील त्यांस हक्क व जे न्याय मागतील त्यांस न्याय दिला पाहिजे. क्याथोलिक लोकांस समान हक्क देण्यासंबंधानें ग्रॅटन ह्यानें फिरून एक बिल पुढें आणिलें; व तें फिरून नामंजूर झालें. पुढील सालीं वूल्फटोन यानें बंड केलें व फ्रेंच लोकांचें आरमार घेऊन तो आयर्लंदावर आला; परंतु वादळ होऊन हें आरमार उध्वस्त झालें आणि आयर्लंदांतील लोकांकडून वूल्फटोनचा पाठपुरावा व्हावा तसा झाला नाहीं. ग्रॅटन हा बंडाविरुद्ध होता व त्याचा तो उघडपणें निषेधही करी; परंतु 'ही परिस्थिति लक्षांत घ्या व अजून तरी डोळे उघडा,' असें तो अधिकारीवर्गास सांगे; तथापि त्याचा कांहींएक उपयोग होईना. या स्थितीस तो इतका कंटाळला कीं, पुढील सालीं पार्लमेंटच्या नव्या निवडणुकी झाल्या तेव्हां तो पार्लमेंट सोडून देऊन घरीं बसला; परंतु एवढ्यानेंही अधिकारीवर्गाचें समाधान होईना. तो बंडांत सामील असल्याचा कसा तरी पुरावा करून त्यास गोत्यांत आणण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले. शेवटीं देशांत राहणें त्याला इतकें धोक्याचें झालें कीं, आर्थर ओकॉनेल या नांवाच्या त्याच्या मित्रावर खटला चालू असतां त्याच्यातर्फेनें तो इंग्लंदांत साक्ष देण्याकरितां गेला, ही संधि पाहून त्याच्या मित्रांनीं त्यास तेथेंच ठेवून घेतलें. सन १७९९ सालीं बंडाची धामधूम मोडल्यावर तो आयर्लंदांत परत गेला. पार्लमेंटांत प्रवेश करण्यास प्रथम त्यास कांहीं दिवस अडचण पडली, परंतु अखेर सुमारें बाराशें पौंड खर्च करून 'विकलो' येथील वार्डाकडून त्यानें आपली निवडणूक करून घेतली. पुढील सालीं आयरिश पार्लमेंट सभेचे स्वातंत्र्यावर किंबहुना अस्तित्वावर पिटनें उघड घाला घातला. आपल्या हातानें महत्प्रयासानें रोविलेल्या स्वातंत्र्यरूपी वृक्षावर अधिकारीवर्ग निर्दयपणें कुऱ्हाड चालवीत आहे, हें पाहून ग्रॅटननें आपलें सर्व वक्तृत्व, सर्व शक्ति व सर्व आवेश खर्चीं घालून आयरिश पार्लमेंट मोडण्याच्या प्रयत्नास प्रतिरोध केला; परंतु पिटनें चारलेल्या लाचानें आयरिश सभासदांचें तोंड मिटलें होतें एवढेंच नव्हे, तर त्यांच्या कानठळ्याही बसल्या होत्या. यामुळें ग्रॅटन याचें दिव्य व अमोघ वक्तृत्व पालथ्या घड्यावरील पाण्याप्रमाणें फुकट गेलें. या वादविवादांत त्यानें मंत्रिमंडळाचीं सर्व

र्विगें बाहेर काढून, लाचलुचपतीच्या साहाय्यानें त्यांनीं आरंभिलेल्या कुकर्मांचा हिडिसपणा व्यक्त करून दाखविला. हें दोषाविष्करण मंत्रिमंडळास इतकें झोंबलें कीं, त्यांच्यातर्फे कॉरी या नांवाच्या प्रधानानें दुसरे दिवशीं ग्रॅटन यास द्वंद्व युद्धास बोलाविलें. ग्रॅटन हा जसा सभाशूर तसाच रणशूरही होता. त्यानें द्वंद्व युद्धाचें निमंत्रण स्वीकारलें व कॉरी यास जखमी केलें. तारीख १ आगस्ट सन १८०० रोजीं ग्रॅटन याच्या निराशेचा कळस झाला. १६० विरुद्ध ११७ मतें पडून आयरिश पार्लमेंट सभेनें आत्मघाताचा ठराव पास केला, व अशा रीतीनें शंभर कोसांवरून सूत्रें चालविणारा मायावी सूत्रधार विलियम पिट याच्या प्रयत्नास यश येऊन आयर्लंडची पार्लमेंट सभा सुधारण्याच्या ऐवजीं कायमचीच नष्ट झाली.

पार्लमेंट सभा आयर्लंडांतून गेल्यावर ग्रॅटन हा चार वर्षें घरींच राहिला. स्वदेशी पार्लमेंट मोडल्यावर ब्रिटिश पार्लमेंट सभेंत शिरावें किंवा कसें यासंबंधानें त्याचें मन बरेंच संशयग्रस्त झालें होतें. परंतु शेवटीं 'आयर्लंडांत स्वस्थ बसून तरी करावयाचें काय? तिकडे गेल्यास झाला तर कांहीं उपयोगच होईल'! असा निश्चय करून सन १८०५ सालीं यॉर्क कॉउन्टींतील एका वार्डातर्फे तो पार्लमेंटमध्यें निवडून आला. तेथपासून त्याच्या मरणापर्यंत मुख्यतः दोन चळवळी पार्लमेंटांत व आयर्लंडांत चालू होत्या. एक क्याथोलिक लोकांच्या हक्कांबद्दल व दुसरी नष्ट झालेली आयरिश पार्लमेंट सभा फिरून प्रस्थापित करण्याबद्दल. यांपैकीं एकही चळवळ ग्रॅटनचे डोळ्यांदेखत पूर्ण यशस्वी झाली नाहीं. मात्र पहिल्या चळवळीस बरेंच रूप आलें होतें. सन १८०५ पासून १८१८ पर्यंत बहुधा प्रत्येक वर्षी क्याथोलिक लोकांच्या हक्कांचा प्रश्न अर्ज, ठरावाची सूचना अगर बिल यांपैकीं कोणत्याना कोणत्या तरी रूपानें वाद्विवादास निघे. पकीं ठरावाच्या सूचना कित्येक वेळां पास झाल्या, कायदा असा त्याचे हयातींत झाला नाहीं.मात्र या तेरा वर्षांच्या चळवळीनें इतका फायदा झाला कीं, या प्रश्नास अनुकूल असें मत पार्लमेंट सभेंत दिवसेंदिवस बळावूं लागलें. सन १८१४ चे सुमारास कायदाही होण्याचा रंग आला होता, परंतु क्याथोलिक पंथाचे बिशप राजानें नेमावे किंवा रोम येथील पोपनें नेमावे, यासंबंधानें ग्रॅटन व ओकॉनेल प्रभृति क्याथोलिक पुढारी यांमध्यें मतभेद होऊन बिल पास होण्यास हरकत आली.

सन १८१८ सालीं आपसांतील हा मतभेद मिटला व ग्रॅटन हा दब्लिनतर्फे वीन निवडणुकींत निवडून आला. या निवडणुकीचे दिवशीं घरीं परत येत असतां वाटेंत दंगा होऊन कोणी एका बदमाष मनुष्यानें ग्रॅटन यास लांकूड फेकून मारिलें, त्यामुळें त्यास बरीच जखम झाली; परंतु ' हा सगळा धर्मवेडाचा परिणाम ' असें ह्मणून त्यानें तें प्रकरण उदारपणें तसेंच सोडून दिलें. दरम्यान सन १८१० सालीं दब्लिन येथें सभा भरून नष्ट झालेली पार्लमेंट सभा फिरून प्रस्थापित करण्यासंबंधानें चळवळ सुरू झाली. या सभेस ग्रॅटन हजर होता, परंतु या अखेरअखेरच्या सालांत त्याच्या मनावरील निराशापटल इतकें वाढत गेलें कीं, या चळवळीस यश येईल असें त्याची मनोदेवता त्यास सांगेना ! सन १८१८ सालानंतर ग्रॅटनची प्रकृति दिवसेंदिवस फारच क्षीण झाली. शेवटीं शेवटीं उभें राहवत नसल्यामुळें बसून बोलण्याची परवानगी अध्यक्षाकडून घेऊन तो पार्लमेंट सभेमध्यें भाषणें करी; परंतु अखेरपर्यंत त्यानें आपलें कर्तव्य निश्चयानें बजाविलें.

ग्रॅटनच्या अंगचे मुख्य गुण ह्मटले ह्मणजे अत्युत्कट देशाभिमान, तीव्र बुद्धिमत्ता व पराकाष्ठेचा निःस्पृहपणा. देशकार्यासाठीं त्यानें वकिलीचा धंदा पहिल्यापासून जन्मभर सोडून दिला, हें मागें सांगितलें आहेच. परंतु त्याहून लक्षांत ठेवण्याची गोष्ट ती ही कीं, लाचलुचपतीनें बुजबुजलेल्या त्या काळामध्यें आयरिश पार्लमेंट सभेमधून ग्रॅटनइतका निर्मळ व निकोप असा त्याचा तोच निघाला. पार्लमेंट सभेंतील त्याच्या कारकीर्दीच्या बहुतेक भागांत प्रधानमंडळापैकीं एखाद्या प्रधानाइतकें वजन त्याच्या शब्दाला व मताला नेहमीं असे. परंतु प्रत्यक्ष प्रधानकीचें काम असें त्यानें फक्त एकच वेळ केलें. पण प्रजापक्षीय पुढाऱ्यांच्या नाशिबीं नुसती टीका व चळवळ करीत बसण्याचें यावें, प्रत्यक्ष राज्यकारभाराचा अनुभव त्यांस फारसा मिळू नये, हा अनुभव परकीय अंमलाखालीं असणाऱ्या देशभक्तांस सर्व देशांत नेहमींच येणारा आहे. तो निःस्पृह असल्यामुळें अधिकारीवर्गाची मर्जी संपादन करण्याकडे जितकें त्याचें दुर्लक्ष असे, तितकेंच लोकप्रियता संपादण्याकडेही त्याचें दुर्लक्ष असे. कोणत्याही बाबतींत त्याचीं मतें चोख व ठाम असत, व तीं बोलून दाखविण्यास तो कधींही मागें घेत नसे. मग त्याचेयोगानें अधिकारीवर्ग व समाज यांचा राग

होवो वा लोभ होवो. मात्र त्याचीं मतें चोख व स्पष्ट असत ह्मणून तो दुराग्रही होता असें नाहीं. कोणत्याही मतभेदाचे प्रसंगीं प्रत्यक्ष कृतीच्या संबंधांत शक्य तितकें मिळतें व मिटतें घ्यावें, असें त्याचें नेहमीं धोरण असे. परंतु प्रतिपक्षाचा केवळ राग अगर खासगी स्नेह्यांची भीड यांस त्यानें कधींही भीक घातली नाहीं. सार्वजनिक कामकाजांत तरतरीत बुद्धीप्रमाणें उज्ज्वल अशा वक्तृत्वाची त्यास मदत होई; व आज मितीस सर्व आयरिश वक्त्यांमध्यें त्याची गणना प्रमुखत्वानें करितात. त्याच्या शरीराची ठेवण व रूप यांत अलौलिक असें कांहींच नव्हतें. आवाज असावा तितका गोड नव्हता व केव्हां केव्हां त्याचे हातवारे हसूं येण्यासारखे होत. पण त्याच्या भाषणप्रसंगीं पहिलीं दोनचार मिनिटें प्रस्तावनेदाखल जाऊन, मग उत्कृष्ट अलंकार व रम्य विचारसरणी यांनीं ओतप्रोत भरलेल्या अशा त्याच्या अमोघ वक्तृत्वाचा अस्खालित प्रवाह एकदां सुरू झाला, ह्मणजे श्रोतृवृंद तासांचेतास तल्लीन होऊन ऐकत बसे. त्याचें वक्तृत्व अशिक्षितांपेक्षां सुशिक्षितांनाच अधिक आवडण्यासारखें होतें; कारण त्यामध्यें ग्राम्यपणा मुळींच नसून सुसंस्कृतीची लकाकी भरलेली असे, व ब्रिटिश पार्लमेंटमधील नांवाजलेले वक्तेही त्याचें भाषण ऐकतांना प्रेमानें तल्लीन होत. त्याची कल्पनाशक्ति फारच विशाळ होती, व भाषेंतील अलंकार योजणें हा त्याच्या हातचा नुसता मळ होता. यामुळें कोणत्याही विषयासंबंधानें उत्कृष्ट शब्दचित्र रेखाटून त्यांतील देखावे कोटीबाज व खुसखुशीत शब्दांनीं त्याला दाखवितां येत असत. ग्रॅटन हा आयरिश मुत्सद्दी व वक्ते यांमध्यें मूर्धाभिषिक्तच होऊन गेला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

## ( ३ ) वूल्फटोन.

इंग्रजांशीं निव्वळ दंडेली करून आपल्या राष्ट्रास निर्भेळ स्वातंत्र्य मिळवून देण्याची आकांक्षा ज्या कांहीं थोड्या अविचारी अशा आयरिश देशभक्तांनीं मनांत धरून प्रत्यक्ष उद्योग केला होता, अशांमध्यें वूल्फटोन हा मुख्य आहे. वूल्फटोनचा जन्म सन १७६४ मध्यें झाला. त्याचें शिक्षण समाप्त

झाल्यावर तो लवकरच राजकारणांत शिरला, आणि त्याची बुद्धिमत्ता, उद्योगप्रियता, धैर्य, साहसबुद्धि व घटनाशक्ति हीं कांहीं अलौकिक असल्यामुळें ज्या गोष्टी त्याच्या बरोबरीच्या अथवा त्याच्याहून वडील व अनुभवी अशा लोकांच्या मनाला आकलन करतां आल्या नाहींत, त्यांची स्फूर्ति त्याच्या मनांत होऊन टोन यानें उद्योगांत सर्वांच्याही पुढें भरारी मारली. सन १७९१ सालीं त्यानें बेलफास्ट येथें ‘ संयुक्त आयरिश राष्ट्रमंडळ ’ या नांवाची सभा स्थापित केली. प्रथमतः या सभेचा उद्देश व तिनें योजिलेला कार्यक्रम केवळ कायदेशीर पद्धतीनें देशांतील राज्यकारभारांत सुधारणा घडवून आणण्यासंबंधाचा होता. तिनें आपल्या हातीं जें पहिलें काम घेतलें तें, रोमन क्याथोलिक लोकांचा छळ करणारे जे अमानुष कायदे त्या वेळीं अस्तित्वांत होते त्यांविरुद्ध चळवळ करून ते रद्द करविणें हें होय. टोन हा स्वतः प्रॉटेस्टंट पंथाचा होता, तथापि तारुण्याच्या उत्साहानें आणि शुद्ध स्वदेशभक्तीनें त्याचें मन उज्ज्वल झालेलें होतें, यामुळें राष्ट्राच्या पुनर्जीवनाकडे पहातां, आपल्या देशबांधवांपैकीं एका मोठ्या वर्गाचीं दुःखें प्रथम त्याच्या दृष्टीस पडलीं व तीं घालविण्याचा उपक्रम करून राष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून देण्याचा खरा प्रारंभ आपण केला असें त्यास वाटलें, व ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ज्यांस निव्वळ माथेफिरू किंवा अराजक असें ह्मणतां येईल अशांपैकीं टोन हा नव्हता; त्याच्या मनावर खऱ्या स्वातंत्र्यप्रेमाचा संस्कार उत्कृष्ट घडलेला होता. परंतु सामाजिक दुःखनिवारण करण्याच्या कामाच्या मार्गांत ज्या अडचणी सभेस येऊं लागल्या, त्या टोन यास दुःसह वाटल्या; आणि जगांत इतरत्र राजकारणामध्यें ज्या प्रचंड घडामोडी त्यावेळीं सुरू होत्या, त्याजकडे त्याचें लक्ष वेधलें.

कायदेशीर चळवळ करणारी सभा असें जें लक्षण ‘ संयुक्त आयरिश राष्ट्रमंडळा ’ चें ह्या वेळेपर्यंत कायम होतें, त्यापासून तें हळूहळू भ्रष्ट होऊं लागलें. यावेळीं आयरिश पार्लमेंटची स्थिति फारशी चांगली नव्हती. ग्रॅटनसारख्या सात्विक देशभक्तानें यापूर्वीं पंधरा सोळा वर्षांपासून पार्लमेंट सुधारण्याचे जे प्रयत्न चालविले होते, ते जवळ जवळ निष्फळ होऊन तिच्यांतील सभासदांवर ग्रॅटनच्या वक्तृत्वापेक्षां पिटच्या लाचलुचपतीचाच परिणाम अधिक झाला होता. यामुळें अशा पार्लमेंटच्या हातून देशसुधारणा कसची

घडून येणार ? असें वाटून निराशेच्या शल्यानें त्याचें मन विदीर्ण झालें असतां, त्यांतच फ्रान्स व अमेरिका या देशांतील चळवळी पाहून निर्भेळ स्वातंत्र्य मिळविण्याच्या अद्भुतरम्य अशा कल्पनेचें बीज रुजलें गेलें. जी गोष्ट अमेरिका व फ्रान्स या देशांमध्यें लोकांस साध्य झाली, तीच आयरिश लोकांसही साध्य झाली पाहिजे असा त्यानें तर्क केला, परंतु आपल्या भोंवतालच्या विशेष प्रकारच्या परिस्थितीची अटकळ त्यास बरोबर न करतां आल्यामुळें त्याचा तर्क अखेर खोटा ठरला. ' संयुक्त आयरिश मंडळा ' च्या स्थापनेपासून तीन वर्षांतच तिच्या स्वरूपांत स्थित्यंतर झालें, व सन १७९४ सालीं सभेमध्यें वादविवाद व मतभेद होऊन नेमस्त मताची मंडळी तींतून निघून गेली, व बाकी राहिलेल्यांनीं सभेस क्रांतिकारक गुप्तमंडळी बनविलें. या नवीन मंडळांत टोन, टॉमस एमेट, निलसन, रसेल, नॅपर टॅन्डी, आणि तसेंच डब्लिन वगैरे प्रमुख शहरांतील कांहीं तरुण लोक प्रमुख होते. टोन हा स्वतः प्रॉटेस्टंट असल्यामुळें अल्स्टर वगैरे प्रांतांत, ह्मणजे जेथें राजनिष्ठ प्रॉटेस्टंट लोकांचें वर्चस्व होतें, तेथेंही सदर सभेस बरेच अनुयायी मिळाले. या सभेचा सभासद होण्यास गुप्त शपथ घ्यावी लागे, व ही शपथ देऊन नवीन सभासद मिळविण्याची जबाबदारी जुन्या सभासदांवर असे.

कर्मधर्मसंयोगानें सन १७९४ सालीं प्रजासत्ताक अशा फ्रेंच राजमंडळा-कडून विलियम जॅकसन या नांवाचा एक गृहस्थ आयर्लंदमध्यें आला. तो स्वतः प्रॉटेस्टंट धर्मोपदेशक असल्यामुळें त्यानें आणलेला क्रांतिकारक संदेश ' संयुक्त राष्ट्रमंडळा ' स विशेषच ग्राह्य वाटला. परंतु जॅकसन हा भोळवट व उथळ मनाचा असल्यामुळें, त्याचे सर्व बेत कोकेन नांवाच्या गृहस्थास कळले व कोकेन हा लोभी असल्यामुळें अर्थात् अधिकारीवर्गाकडून त्याची नेमणूक गुप्त पोलिसांत झाली. सन १७९४ चे एप्रिलांत जॅकसन यास अधिकाऱ्यांनीं कैद करून फांशी देण्याचें ठरविलें, परंतु त्यानें स्वतःच विष खाऊन आत्महत्या केली. टोन व जॅकसन यांचा गुप्त संबंध अधि-काऱ्यांस माहीत असल्यामुळें टोन याजवरही फांशीचाच प्रसंग यावयाचा; परंतु तो अमेरिकेस निघून गेला व नंतर तेथेंच त्यानें आपल्या कामास सुरुवात केली. या ठिकाणीं त्यास त्याच्या आयरिश साथीदारांकडून उत्साहपूर्ण व आशाजनक अशीं पत्रें येऊं लागल्यामुळें त्यान फिलाडेलफिया येथून फ्रेंच

राजमंडळाशीं पत्रव्यवहार सुरू केला; व फ्रेंच सैन्य आयर्लंदांत पाठविण्यांत येईल तर आयरिश लोकांकडूनही उचल होईल असें त्यानें त्यांस सुचविलें. इतर आयरिश लोकांप्रमाणें टोन हा अमेरिकेंत जाऊन कामधंदा करून अगर सैन्यांत नोकरी धरून राहता तर हटकून नांवारूपास आला असता. परंतु त्यानें आरंभिलेला उद्योगच त्यास अधिक प्रिय वाटून तो आपल्या पराक्रमी स्त्रीसहवर्तमान पॅरिस येथें आला; व त्या वेळचा फ्रेंच युद्धमंत्री कार्नो याच्याशीं त्यानें बोलणें लाविलें. टोन यानें कार्नो याची अशी खात्री करून दिली कीं, जर करितां फक्त वीस हजार फ्रेंच सैन्य आयर्लंदांत उतरेल तर आयरिश लोकांच्या बंडास जरूर तेवढी मदत होऊन आयर्लंद स्वतंत्र होईल. कार्नो यानें ती गोष्ट मान्य करून सैन्य पाठविण्याचें ठरविलें. सन १७९६ चे डिसेंबरचे १६ तारखेस ब्रेस्ट येथून लहान मोठीं अशीं तीस जहाजें, पंधरा हजार सैन्य, आयरिश लोकांस पुरविण्याकरितां हत्यारें घेऊन आयर्लंदवर स्वारी करण्यास निघालें. टोन यास फ्रेंच सैन्यांतील ॲडज्यूटंट जनरल असा हुद्दा देण्यांत आला होता. आरमारावर ॲडमिरल हॉच नांवाचा अधिकारी मुख्य होता. हें सर्व सैन्य आयर्लंदच्या किनाऱ्यावर जाऊन पोहोंचतें तर कदाचित् टोन याच्या कल्पनेप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्याही असत्या. परंतु आरमाराच्या दोन भागांची चुकामूक झाली. एक भाग टोन व हॉच यांसह बॅन्ट्रीबे नांवाच्या उपसागरांत येऊन बरेच दिवस मुक्काम करून राहिला; पण या एकाच भागांतील सहा सात हजार लोकांनीं किनाऱ्यावर उतरून आपल्या कामास प्रारंभ करावा किंवा नाहीं, याविषयीं कांहीं दिवस वाटाघाट चालली. इतक्यांत मोठें वादळ झालें, जहाजांचे नांगर तुटले व या आरमारास फ्रान्स येथें परत यावें लागलें. यामुळें टोन याची अत्यंत निराशा झाली; परंतु त्यानें धीर सोडला नाहीं. सन १७९७ सालीं डच लोकांनीं स्थापिलेल्या प्रजासत्ताक मंडळानें टोन यास मदत देण्याचें कबूल करून पूर्वींएवढें आरमार व सैन्य त्याचे स्वाधीन केलें. परंतु फिरून पूर्वींप्रमाणेंच वाऱ्याच्या प्रतिकूलतेमुळें स्वारी करण्याचा बेत फसला. फिरून १७९७ सालीं फ्रान्स येथील मंत्रिमंडळानें इंग्लंदवर स्वारी करण्याकरितां सैन्य तयार करून त्यावर जनरल बोनापार्ट यास मुख्य नेमिलें. हें पाहून तर टोन यास अधिकच आशा उत्पन्न झाली, आणि त्याच्या

व बोनापार्ट याच्या कित्येक भेटी होऊन संभाषणही झालें. परंतु अगदीं आयत्या वेळेस इंग्लंदवर स्वारी करण्याचा बेत रहित होऊन पुढील सालीं मे महिन्यांत, जमलेलें सैन्य घेऊन बोनापार्ट हा इजिप्तवर स्वारी करण्यास निघून गेला. यामुळें टोन यास 'बंडलंबूक इव दूरमुत्क्षिप्य पातितः' असें होऊन तो निराशेनें जवळजवळ वेडा झाला. आयर्लंदांतील अधिकाऱ्यांनींही, कांहीं तरी तजवीज लवकरच केली पाहिजे, नाहीं तर बंडावा फैलावेल, असा विचार करून लॉर्ड एडवर्ड फिडझरल्ड व टोन याचे आणखी कित्येक सहकारी पकडले. इकडे आयरिश शेतकऱ्यांमध्यें बेबंदशाही माजली होती व त्यांजवर होणारा जुलूम व जाच त्यांना असह्य वाटूं लागला होता. या सर्व कारणांचा एकदम परिणाम होऊन बोनापार्ट हा इजिप्तवर स्वारी करण्यास निघाल्यापासून तीन दिवसांचे आंत आयर्लंदमध्यें उघड रीतीनें बंड सुरू झालें, व टोन हा उताविळ होऊन 'हीच वेळ आहे, तरी या वेळेस काय मिळेल तें सैन्य आयर्लंदवर धाडा' असें सांगण्याकरितां फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांकडे खेपा घालूं लागला. फिरून स्वारी करण्याच्या बेताची वाटाघाट होऊं लागली. जनरल हम्बर्ट नांवाचा एक फ्रेंच लष्करी अंमलदार थोडीशी युद्धाची सामग्री घेऊन टोनसहवर्तमान अधिकाऱ्यांच्या हुकुमाची वाट न पाहतां फक्त एक हजार सैन्यानिशीं आयर्लंदच्या किनाऱ्यावर जाऊन उतरला, व तोंड देण्यास आलेल्या इंग्रजी सैन्याचा पराभव करून तो पुढें चाल करून जाऊं लागला. परंतु जनरल लेक हा वीस हजार सैन्यानिशीं आडवा येऊन त्यानें त्याचा पराभव केला. हें पाहतांच आणखी पांच हजार सैन्य देऊन हारडी नांवाच्या सरदारास टोन याजबरोबर आयर्लंदास पाठविण्यांत आलें. या छोट्या आरमाराची व इंग्रजी आरमाराची गांठ पडून तुंबळ युद्ध झालें, व शेवटीं फ्रेंच आरमाराचा पराभव झाला. मुख्य जहाजावर टोन हा फ्रेंच लष्करी अधिकाऱ्याचा पोषाख घालून लढत होता व आपल्या हातानें तोफांस सरबत्ती देत होता. टोन यास प्रथम कोणी न ओळखिल्यानें त्यास इतर फ्रेंच अधिकाऱ्यांप्रमाणें प्रथमतः लष्करी सन्मानानें वागविण्यांत आलें. परंतु दुर्दैवानें लवकरच त्याच्या एका आयरिश मित्रानें त्यास ओळखिलें, व लगेच आयरिश बंडखोर या नात्यानें टोन यास वागविण्यास सुरुवात होऊन त्यांनीं त्याच्या पायांत बिड्या घातल्या. पण यांत फ्रेंच लष्करी पोषा-

त्याचा अपमान होत आहे तो होऊं नये म्हणून त्यानें तो अंगावरून काढून फेंकून दिला, व ' सन्मानाच्या किताबाचा बिल्ला लटकविणाऱ्या सोन्याच्या साखळीपेक्षां मला स्वदेशहिताकरितां पायांत पडलेल्या बिड्याच अधिक प्रिय वाटतात, ' असें ह्मणून त्या लोखंडी सांखळ्यांचें त्यानें चुंबन घेतलें.

सन १७९८ च्या नवंबरचे दहावे तारखेस त्याची दब्लिन येथें लष्करी कोर्टामार्फत चौकशी होऊन त्यास देहांत शिक्षा ठरविण्यांत आली. सदर चौकशीचे वेळीं दोषारोपांतील सर्व गोष्टी त्यानें एकदम कबूल केल्या व लिहून आणलेलें सणसणीत भाषण कोर्टापुढें वाचून दाखविलें. तें भाषण अत्यंत प्रेमळ व आवेशयुक्त असें होतें. त्याच्या भाषणांतील मुख्य मुद्दा असा होता कीं, " मी स्वदेश स्वतंत्र करण्याकरितां उघड लढाई केली ही गोष्ट खरी आहे, परंतु हें सर्व मीं देशांत चाललेले मूर्ख अत्याचार, गुप्त वध वगैरे बंद व्हावे एवढ्याकरितांच आरंभिलें होतें. मी वाशिंग्टनप्रमाणें यशस्वी झालों असतों तर मला खचित कोणीं नांवें ठेविलीं नसतीं. परंतु माझे प्रयत्न केवळ निष्फळ झाले एवढ्याकरितांच मला बंडखोर अगर गुप्त वध करणारा वगैरे अपमानकारक विशेषणें लावणें गैर होईल. " हें भाषण चाललें असतां न्यायपीठावर बसलेले लष्करी अधिकारी व टोन यांजमध्यें बरींच प्रश्नोत्तरें झालीं, व त्यावरून टोन याचा पाणीदारपणा कळून आला. तसेंच आपल्या भाषणांत त्यानें क्याथोलिक लोकांविषयीं जी अत्यंत कळकळ व जो प्रेमभाव उदारपणानें व्यक्त केला, तो पाहून या आयरिश देशभक्ताच्या देशभक्तीचा विस्तार खरोखर किती व्यापक होता, व त्याचें मन किती मोठें होतें हें कोणासही तेव्हांच दिसून येईल. अखेर शिक्षा सांगण्याचे वेळीं आपणास गोळी घालून मारण्याचा लष्करी मान तरी मिळावा अशी त्यानें कोर्टाची विनवणी केली, परंतु शेवटीं त्यास फांशी देण्याचीच शिक्षा लॉर्ड कॉर्नवालीस यानें ठरविली. दुसरे दिवशीं सकाळीं म्हणजे तारीख १२ रोजीं त्यास फांशी देणार तों, आदले दिवशीं रात्रीं तुरुंगाच्या अंधार कोठडींत कोणास न कळत त्यानें चाकूनें आपली रक्तवाहिनी शीर कापण्याइतकी जबर जखम गळ्यास करून घेतली, व भयंकर रक्तस्राव होऊन तो उजाडेपर्यंत आसन्न-मरण होऊन पडला. ही बातमी बाहेर कोणास कळली नाहीं. इकडे १२ वे तारखेस सकाळीं त्या वेळचा प्रसिद्ध वक्ता व वकील क्यूरन हा गडबडीनें

हायकोर्टापुढें उभा राहून त्यानें अशी तक्रार केली कीं, टोन याचा गुन्हा बंड करण्याचा जरी असला, तरी त्याची चौकशी लष्करी कोर्टामार्फत होणें हें बेकायदेशीर आहे; व ही तक्रार मान्य करून हायकोर्टानें टोन यास तुरुंगांतून काढून आपणासमोर हजर करण्याबद्दल ‘ शेरिफ ’ यास तातडीचा हुकूम व वारंट सोडलें. कारण कीं, कदाचित् हुकूम पोहोंचण्याचे आधींच फांशीच्या शिक्षेची अंमलबजावणी व्हावयाची ! शेरिफ तुरुंगांत जाऊन पहातो तों, टोन जखमी होऊन पडलेला. ही बातमी हायकोर्टास लागतांच हायकोर्टाच्या चीफ् जज्जानें त्याच्या फांशीची शिक्षा तहकूब केली, व नंतर सात दिवस-पर्यंत अत्यंत कष्ट होऊन तो तारीख १९ नवंबर सन १७९८ रोजीं तुरुंगांतच मरण पावला. अशा रीतीनें आयर्लंदचा एक उत्कृष्ट देशभक्त मोहरा अकालीं खर्ची पडला.

टोन यानें आपल्या वयाच्या पंचविसाव्या वर्षी बॅरिस्टरीची परीक्षा दिली होती. परंतु वकिली वगैरे न करतां सार्वजनिक कामास वाहिलेल्या त्याच्या आयुष्याचा अंत पुढें नऊ वर्षांतच अशा अद्भुत व अकल्पित रीतीनें व्हावा असा ईश्वरी संकेत होता व तसेंच घडून आलें.

---

## ( ४ ) रॉबर्ट एमेट.

याचा जन्म १७७८ त झाला. याचा बाप डॉक्टर एमेट हा प्रख्यात व लोकमान्य असा वैद्य असे. याचा विद्याभ्यास ट्रिनिटी कॉलेजांत झाला, त्या वेळीं याचा सहाध्यायी व परम मित्र थॉमस मूर हा होता. हा मूर पुढें आयर्लंदांतील उत्कृष्ट कवि ह्मणून प्रसिद्धीस आला. एमेट हा आपल्या वेळीं कॉलेजांतील अत्युत्कृष्ट वक्ता ह्मणून नाणावला होता. परंतु त्याचीं राजकीय मतें अत्यंत प्रखर असल्यामुळें त्यास कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं कॉलेजांतून काढून टाकलें होतें. आपणाविषयीं सरकारास संशय आला असें वाटल्या-वरून तो युरोपांत गेला, व तेथें त्यास पुष्कळ राजकीय गुन्हेगार भेटले. सन १८०० सालीं आयरिश पार्लमेंट सभा मोडल्याचें ऐकून त्यास फार वाईट वाटलें. एमेट हा फ्रान्समध्यें गेला तेव्हां बोनापार्टची व त्याची गांठ पडली; व फ्रान्स व इंग्लंद यांजमध्यें युद्ध सुरू होतांच फ्रेंच सैन्य आयर्लंदांत

उतरेल असें बोनापार्ट यानें एमेट यास सांगितलें. १८०२ च्या आक्टोबर महिन्यांत एमेट हा आयर्लंडास परत आला. व तें युद्ध सुरू होतांच मोठ्या आशेनें त्यानें हत्यारें व दारुगोळा यांची जमवाजमव करण्यास सुरुवात केली. ता. २३ जुलै १८०३ रोजीं बंडास सुरुवात व्हावयाची, परंतु इतर ठिकाणीं लोकांची जमवाजमव न झाल्यामुळें दब्लिन येथें बंडास सुरुवात झाल्यापासून एक तासाचे आंतच त्याची परिसमाप्ति झाली. त्या दिवशीं सायंकाळीं त्याच्या लोकांनीं चरकी बाण सोडून ठरलेली इशारत दिली, व तितक्यांत मुख्य न्यायाधीश लॉर्ड किलवारडेन हा त्यांच्या हातीं चुकून सांपडतांच त्यांनीं त्याचीच कत्तल केली. अर्थात् चहूंकडे धराधरी झाली व रात्रींचे दहा वाजण्याचे आंतच हें बंड संपलें ! रॉबर्ट एमेट यास गुप्त स्थळीं छपून रहावें लागलें. तो तसाच एक महिनाभर लपून होता; परंतु प्रख्यात वकील क्यूरन याची मुलगी व एमेट यांचें परस्पर प्रेम होतें, तिला भेटून मग देशांतर करावें, अशा विचारांत तो असतां फसगमतीनें पकडला जाऊन ठराविक रीतीनें त्याचा शेवट झाला. त्यानें कोर्टास उद्देशून केलेलें भाषण अत्यंत वक्तृत्वपूर्ण व धैर्यशीलपणाचें आहे. त्यास ता. २० सप्टेंबर १८०३ रोजीं फांशी देण्यांत आलें. आपल्या भाषणांत त्यानें लोकांस अशी विनंति केली कीं, ‘ माझ्या थडग्यावर कोणी कांहीं लिहूं नये, मला कीर्ति व नांव यांची चाड नाहीं ’ व लोकांनींही त्याच्या इच्छेप्रमाणेंच केलें.

---

## ( ५ ) डॅनियल ओकॉनेल.

कायदेशीर चळवळ करणाऱ्या आयरिश पुढाऱ्यांपैकीं ग्रॅटनच्या तोडीचा परंतु कांहीं निराळ्या प्रकारचा असा डॅनियल ओकॉनेल हा प्रख्यात देशभक्त होऊन गेला. ग्रॅटनला जरी सर्व लोक मान देत, तरी त्याचा अनुयायी वर्ग म्हटला म्हणजे फक्त सुशिक्षित व वरिष्ठ प्रतीचे लोक हे होते. ओकॉनेल हा स्वतः या वर्गांपैकींच एक होता, तरी त्याचे अनुयायी वरिष्ठ वर्गापेक्षां कनिष्ठ वर्गांतच अधिक होते. ओकॉनेल ह्याचा पोटाचा धंदा वकिली हा असल्यामुळें एक तर त्याला समाजांतील सर्व दर्जाच्या लोकांमध्यें मिसळावें लागत असे, परंतु विशेषतः त्याच्या बोलण्याची ढब, मनाची ठेवण व

चळवळीचें धोरण समाजांतील वरिष्ठ वर्गापेक्षां मध्यम व कनिष्ठ वर्गास अधिक पसंत पडेल असेंच होतें. एका दृष्टीनें पाहतां ग्रॅटनपेक्षां ओकॉनेल यानेंच लोकशिक्षणाचें काम अधिक केलें व लोकसमाज अधिक खळबळून सोडला. ग्रॅटन यास जसा ‘ पार्लमेंट सभेचा जनक ’ अशी बहुमानाची पदवी समाजाकडून मिळाली, तशीच क्याथोलिक लोकांचा ‘ उद्धारकर्ता अवतार ’ अशी पदवी ओकॉनेल यास देण्यांत आलेली आहे.

ओकॉनेल याचा जन्म तारीख ६ आगस्ट सन १७७५ सालीं आयर्लंदचे नैर्ऋत्येस समुद्रकांठीं एका लहानशा गांवीं झाला. त्याचें घराणें शेंदोनशें वर्षांचें असून क्याथोलिक धर्माचे कट्टे अभिमानी अशी या घराण्यांतील पुरुषांची ख्याति असे. आयर्लंदांत धर्मच्छळास सुरुवात झाल्यानंतर समुद्र-कांठीं ग्लेन कॅार्लचे आसपास उंच डोंगराळ प्रदेशांत लहानशी जमीनदारी करून, प्रॉटेस्टंट लोकांचा त्रास होऊं नये म्हणून डॅनियलचा आजा रहात असे. ह्या घराण्यांपैकीं मॉर्गन व मॉरीस या भावांपैकीं, डॅनियल हा मॉर्गनचा मुलगा त्याचा चुलता मॉरीस यानें दत्तक घेतला. त्या दोघांचीही व्यापारानें व इतर रीतीनें कमावलेली मिळकत डॅनियल यास मिळाली. लहानपणा-पासून डॅनियल याची तरतरीतपणाबद्दल प्रख्याती असे. त्याची स्मरणशक्ति उत्कृष्ट असून बुद्धि तीव्र असे. सगळें धूळाक्षर तो अवघ्या दीड दिवसांत शि-कला. दहावे वर्षी त्यानें एक चिमकुलें नाटक लिहिलें. सन १७८८ चे सुमारास क्याथोलिक लोकांस शाळा घालण्याची अर्धवट सवलत मिळाल्यामुळें नवीन उघडलेल्या एका शाळेंत त्याचें दुय्यमप्रतीचें शिक्षण झालें. परंतु वरिष्ठ शिक्षणाची सोय स्वदेशांत नसल्यामुळें तो आपल्या भावासह सन १७९१ सालीं फ्रान्समध्यें सेन्ट ओमर नांवाच्या कॉलेजांत शिकण्याकरितां गेला. फ्रान्समधील राज्यक्रांतीची धामधूम अद्यापि थांबली नव्हती. व फ्रान्समध्यें असतांना या धामधुमीचा कांहीं भाग डॅनियल यास प्रत्यक्ष आपल्या डो-ळ्यांनीं पाहतां आला. परंतु जी धामधूम त्यानें पाहिली, तिजमध्यें स्वातंत्र्य-प्रियतेपेक्षां बदमाषगिरीच त्याला अधिक दिसून आली, यामुळें कांहीं अंशीं राजपक्षास अनुकूल अशींच त्यांचीं मतें बनलीं. सन १७९३ सालीं फ्रान्स-हून परत आल्यावर तो कायद्याचा अभ्यास करण्याकरितां इंग्लंदास गेला, व हा अभ्यास करतांना इंग्लंदांतील राजकारण वगैरेंचें सूक्ष्म निरीक्षण

करून सन १७९८ सालीं आयर्लंदमध्यें बॅरिस्टरीच्या धंद्यास त्यानें सुरुवात केली.

पहिलीं तीनचार वर्षें त्याचा धंदा विशेष चालला नाहीं. या सालांत त्याच्या प्राप्तीची मजल सालीना दोनतीनशें पौंडांपलीकडे गेली नाहीं. परंतु वकिलीच्या धंद्याची त्याला मनापासून आवड असल्यामुळें त्या धंद्यास तो तसाच चिकटून राहिला व पुढें लवकरच उदयास आला. कोर्टांतील न्याय इनसाफाच्या कामीं गम्मत वाटणें व वादीप्रतिवादींचा खेळ खेळून त्यांत आनंद मानणें हें कोणत्याही समाजाच्या अवनतीचें एक लक्षण ह्मणून खुशाल समजावें. व हें लक्षण आयरिश समाजावर या वेळीं पूर्णपणें उमटलें होतें. कधीं देवळांत अगर नाटकगृहांत जी गर्दी जमावयाची नाहीं, ती कोर्टांतून जमलेली आढळून येई व वादीप्रतिवादींची छकड, साक्षीदारांचे डावपेंच व विनोद, वकिलांच्या कोट्या व वक्तृत्व वगैरेपासून श्रोत्यांस व प्रेक्षकांस अगदीं अस्सल सुखाचा गड्डा आपणांस उपभोगावयास मिळाला कीं काय असें वाटे. अर्थात् हुशार व तरतरीत वकील जितका लोकप्रिय, तितका समाजांत दुसरा कोणीही लोकप्रिय असणें शक्य नव्हतें. सार्वजनिक कामांतील पुढाकारही वकीलवर्गाकडेच असे. यामुळें या वेळच्या तरुण बॅरिस्टर व वकील लोकांना स्वार्थ व परमार्थ यांचा उत्कृष्ट मेळ घालतां येई, व ते समाजाचे पुढारी स्वाभाविकपणेंच बनत. डॅनियलच्या अंगीं वकिलीस लागणारे सर्व गुण पुरे होते. वक्तृत्व हा त्याचा हातचा मळ असून प्रसंगानुसार सर्व कोर्टास खदखदां हंसावयास किंवा ढळढळां रडावयास लावण्याचें सामर्थ्य त्याच्या वाणींत व नाटकी अंगविक्षेपांत होतें. शिवाय साक्षीदाराची उलटतपासणी करण्यांत त्याचा हातखंडाच असे कसलाही बिलंदर साक्षीदार पुढें आला तरी त्याला पापडासारखा भाजून, किंवा त्याच्याशीं गोडीगुलाबीनें वागून व त्याच्या पोटांत शिरून त्याला तो तेव्हांच आपलासा करी. व मग त्याचे तोंडून काय वाटे तें काढून घेई परंतु याहूनही दुसरे एकदोन गुण त्याच्या लोकप्रियतेस कारणीभूत झाले होते. पैकीं एक हा कीं, जरूरीप्रमाणें खुद्द न्यायाधिशाचे अंगावरही बेमुरवत तोंड टाकण्याचें त्याचें धैर्य होई व वकीललोकांचें जीवित न्यायाधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून असतें व त्यांतूनही आपण रोमन क्याथोलिक पंथाचे व म्हणून

आपलासा करी व मग त्याचे तोंडून काय वाटेल तें काढून घेई. परंतु याहू-नही दुसरे एक दोन गुण त्याच्या लोकप्रियतेस कारणीभूत झाले होते. पैकीं एक हा कीं, जरूरीप्रमाणें खुद्द न्यायाधिशाचे अंगावरही बेमुरवत तोंड टाकण्याचें त्यास धैर्य होई. वकील लोकांचें जीवित न्यायाधिकाऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून असतें, व त्यांतूनही आपण रोमन क्याथोलिक पंथाचे ह्मणून सर्वथा निराश्रित असें असतां उगाच तोंड टाकून आपल्या पायावर कुऱ्हाड घालून कां घ्यावी, अशा तऱ्हेचा विचार त्याच्या मनास केव्हांही शिवला नाहीं. तो कसें, केव्हां व कोणावर तोंड टाकून त्याला लोळवील याचा नेम नसल्यानें, पक्षकारापासून तों न्यायाधिकाऱ्यांपर्यंत सर्व लोक त्यास भिऊन वागत. दुसरा विशेष गुण म्हटला म्हणजे गरीब लोकांचीं कामें तो केव्हां केव्हां फुकट चालवी. काम खरें व बाजू न्यायाची, आणि त्यांतल्या त्यांत अधिकारीवर्गावर चार शिंतोडे उडण्यासारखी अशी त्याची खात्री झाली ह्मणजे, दीन व अनाथ अशा लोकांस तो एक पैही न घेतां मदत करी. यास्तव थोड्या दिवसांतच लोकांत अशी प्रसिद्धी होऊन गेली कीं, ज्या कोणास वाली नसेल त्याचा वाली ओकॉनेल, त्याजकडे जावें व आपलें काम खुशाल करून घ्यावें. अधिकाऱ्यांच्या शिरजोरपणाच्या व धर्मच्छलाच्या अशा त्या काळीं जनतेचा असा एखादा वाली हवाच होता, व ती उणीव ओकॉनेल यानें निःसंशय भरून काढली होती. त्यावेळीं दब्लिन शहरांत 'वकील' याचा अर्थ डॅनियल ओकॉनेल असाच असे, व शहराचे कोणत्याही भागांत 'वकिलांचं घर कोठें आहे ?' असें कोणीं विचारलें ह्मणजे ते ओकॉनेल-च्या घराचा पत्ता सांगत.

ओकॉनेल याचें लक्ष स्वार्थाइतकेंच परार्थाकडेही होतें. सार्वजनिक कामाची त्याला स्वभावतः मोठी हौस असे; व वकिलीच्या धंद्यामुळें जी लोकप्रियता व जें वजन त्याला मिळालें, त्याचा उपयोग त्यानें सार्वजनिक कामाकडे प्रामाणिकपणानें केला. सार्वजनिक कार्यकारी या नात्यानें त्याच्या आयुष्यांतील पहिलीं पहिलीं वर्षे त्याचें धोरण ठरलेलें नव्हतें. या वेळीं ग्रॅटन, फ्लड व चार्लमॉंट हे लोकांचे पुढारी असून ओकॉनेल हा त्यांचा चाहता भक्त होता. परंतु या लोकांशिवाय वूल्फटोन प्रभृति लोक दुसऱ्या पक्षाचे पुढारी असून या पक्षाची खटपट स्वातंत्र्य मिळविण्यासंबंधाची होती. प्रथम

प्रथम कोणत्या पक्षास मिळावें याविषयीं त्याचा निर्णय व निश्चय होईना. परंतु एकदम संपूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याची खटपट नुसत्या सनदशीर चळवळीपेक्षां अननुभवी मनुष्यास तारुण्याच्या ऐन उमेदीच्या काळीं अधिक उदात्त व ग्राह्य वाटावी हें स्वाभाविकच असल्यामुळें ‘ युनाइटेड आयरिश-मेन ’ अथवा ‘ संयुक्त आयरिश मंडळ ’ या नांवाची जी एक स्वातंत्र्यवादी पक्षानें सभा स्थापन केल्याचें मागें सांगितलें आहे, तिची शपथ घेऊन ओकॉनेल हा तिचा सभासदही झाला. परंतु लवकरच त्याचें मन विटण्यासारख्या एक दोन गोष्टी त्याचे नजरेस पडल्यामुळें, त्याच्या मनानें माघार घेतली. वर सांगितलेल्या मंडळामध्यें हजारों तरुण मुलांचा समावेश झालेला होता. यांपैकीं कांहीं मुलें एके दिवशीं रस्त्यानें जाणाऱ्या एका गरीब मुलीची टवाळी करीत आहेत असें त्याला आढळलें. अर्थात् तिला त्यांच्यापासून सोडविण्याकरितां ओकॉनेल हा पुढें झाला. तेव्हां त्या टारग्या पोरांनीं त्याजवर हल्ला करून इतकें बेदम मारिलें कीं, जखमा होऊन त्यास कांहीं दिवस अंथरुणांत पडून रहावें लागलें; नंतर हीं टवाळ मुलें संयुक्त आयरिश मंडळांतील आहेत असें त्यास कळल्यावर त्याला फार खंती वाटली. तसेंच या मंडळाचीं गुप्त कारस्थानें काय आहेत व देशभक्तीच्या नांवावर त्यांच्या हातून अचरटपणाचीं कसकशीं कामें होतात, यांच्या कृतीचे काय परिणाम होतात, याची त्याला चांगलीशी माहिती नव्हती, तीही त्याच्या घरवाल्यानें त्यास करून दिली. परंतु हें सर्व होण्याच्यापूर्वींच त्याचे हातून मंडळाचा सभासद या नात्यानें थोडेंबहुत काम होऊन गेलें होतें. प्रत्येक सभासदास कांहीं तरी नवीन सभासद आपल्या खटपटीनें मिळवावयाचे असत; व असे कांहीं सभासद ओकॉनेल यानें शपथा देऊन मिळविलेही होते. पुढें बंडाची भुमका उठून देशांत जारीनें चौकशी सुरू झाली. गुप्त पोलिसांचा सुळसुळाट झाला. या अशा धामधुमींत तो अवचित एखादे वेळीं पकडला जाण्याचा संभव होता. परंतु त्याच्या सुदैवानें तो त्याच सुमारास आजारी झाला, व बरेच दिवस अंथरुणास खिळून पडला होता यामुळें बाहेर फिरकणें टळलें. या अवधींत पोक्त विचाराअंतीं बंडाच्या चळवळीविरुद्ध त्याचें मत बनलें. बरा होतांच त्यानें मंडळाचा सभासदपणा सोडून दिला, इतकेंच नव्हे तर देशाचें रक्षण करण्याकरितां खासगी लोकांचें स्वयंसेवक एक सैन्य उभारलें

गेलें, त्यामध्यें दब्लिन येथील लोकांनीं तोफखान्याची एक तुकडी तयार केली, तिजमध्यें ओकॉनेल हा सामील झाला.

बंडाचा मोड झाल्यानंतर शांततेचे दिवस आले व शांततेच्या दिवसांत सनदशीर चळवळीचा फिरून उपक्रम झाला. या वेळीं चळवळीचा सर्व भर क्याथोलिक लोकांस समान हक्क व धर्मस्वातंत्र्य मिळवून देण्यावर होता. आणि ओकॉनेल हा स्वतः क्याथोलिक धर्माचा असल्यामुळें स्वधर्मीयांना मदत करण्यास त्यास सहजच स्फूर्ति झाली. या चळवळीस सन १७६० सालीं प्रथम सुरुवात झाली, व त्या सालीं ‘ क्याथोलिक असोसिएशन ’ नांवाची सभा स्थापन होऊन उघड व पद्धतशीर रीतीनें क्याथोलिक लोकांच्या हक्कासंबंधीं वादाचा पूर्वपक्ष करण्यांत येऊं लागला. या सभेच्या उद्योगानें व लोकमतांत थोडाबहुत फरक पडत चालल्यानें सन १७७६ सालीं कांहीं कांहीं बाबतींत कायद्यानें क्याथोलिक लोकांचीं बंधनें ढिलीं होण्यास सुरुवात झाली. या काळचा क्याथोलिक लोकांचा पुढारी जॉन किओघ या नांवाचा एक मोठा अब्रूदार व निस्सीम देशभक्त असा श्रीमंत व्यापारी होता. त्यानें सन १७६० पासून पुढें सुमारें वीसपंचवीस वर्षेंपर्यंत पैसे मिळविण्याचा आपला सर्व धंदा सोडून क्याथोलिक लोकांच्या वतीनें चळवळ करण्याचा उद्योग पत्करला. त्यानें आयर्लंदांत लोकमत जागृत केलें एवढेंच नव्हे, तर इंग्लंदास खेपा घालून तेथील पुढाऱ्यांमार्फत प्रधानमंडळाच्या मुलाखती घेऊन आपली बाजू त्यांच्या कानावर घातली, व त्यांजकडून ‘ प्रिव्ही-कौन्सिल ’ मार्फत आयरिश पार्लमेंटास कायद्याचीं बिलें धाडून किरकोळ बाबतींतील क्याथोलिक लोकांचीं बंधनें तोडण्याचा उद्योग चालविला. व त्या बिलांस अनुसरूनच पुढें सन १७७६, १७९१, १७९३ वगैरे सालीं आयरिश पार्लमेंट सभेचे कायदे होऊन क्याथोलिक लोकांचा जाच पुष्कळ कमी झाला. या बाबतींत वास्तविक १७९३ सालच्या कायद्यानें इतकें काम झालें होतें कीं, त्या मानानें पुढें ओकॉनेल याचे हातून होण्याचें काम फारच थोडें राहिलें होतें असें ह्मणण्यास हरकत नाही. परंतु किओघ यानें वीसपंचवीस वर्षें त्यास शक्य तितकी खटपट करून शक्य तितकें फळ मिळविलें असतांही पुढें त्याचा वृद्धापकाळ झाल्यामुळें त्याच्या हातून पुढारीपणाचें काम होईना. शिवाय लोकमताची मजल पुढें गेली असल्यामुळें या जुन्या पुढा-

त्याचें धोरण तरुण लोकांस भित्रेपणाचें असें वाटूं लागलें, व त्यानें पूर्वी केलेल्या कामगिरीची त्यांची आठवण हळूहळू बुजत जाऊन त्याजबद्दलची कृतज्ञताही मावळूं लागली ! क्याथोलिक लोकांकरितां सर्व बाबतींत प्राटेस्टंट लोकांच्या बरोबरीनें हक्क मिळविणें हें त्या वेळच्या चळवळीचें अंतिम साध्य होतें. असें असतां, किओघ हा हें साध्य साधण्याकरितां ह्मणून इंग्लंडास लोकांच्या वतीनें गेला व तेथील मुत्सद्यांच्या बहुमानास व गुळचट थापांस भुलून फक्त स्थानिक स्वराज्याचें गुळखोबरें पदरांत घेऊन हात हालवीत परत आला असा तरुणमंडळींनीं त्याजविरुद्ध गिल्ला केला. अशा या संधीस क्याथोलिक लोकांस नवीन पुढारी हवा असें वाटूं लागणें स्वाभाविक होतें, व कर्मधर्मसंयोगानें तसा पुढारी त्यांस मिळण्यासारखाही होता. व हा पुढारी डॅनियल ओकॉनेल हा होय. डॅनियल ओकॉनल याचा तोंड टाकून बोलण्याविषयीं हातखंडा होताच. त्यानें [सभांमधून जॉन किओघच्या नेभळ्या धोरणाची टर उडविण्यास सुरुवात केली. व या वृद्धतरुण देशभक्तांच्या अंगची उद्योगशीलता व त्यांच्या मतांमधील तत्कालीन ओजस्विता यांतील फरक पाहून लोकांनीं सहजच ओकॉनल यास पुढें ओढलें व किओघ यास मागें सारलें. ग्रॅटन हा या वेळचा पुढारी होताच, व आपल्या परीनें त्याचीही खटपट क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याची चालूच होती. परंतु त्याचें सर्व काम पार्लमेंट सभेमध्यें होई. समाजांत वावरण्यास व लोकांत मिसळण्यास एखाद्या तरुण पुढाऱ्याची व विशेषतः स्वतः रोमन क्याथोलिक पंथी मनुष्याची गरज होती. ती गरज ओकॉनेलसारखा पुढारी मिळाल्यानें भागणारी होती. शेवटीं सन १८०९ सालीं एक नवीन क्याथोलिक असोसिएशन स्थापन करून ओकॉनेल यानें स्वतः होऊन पुढारीपणास हात घातला, व सन १८११ सालीं क्याथोलिक लोकांचा यापुढें पुढारी कोण याविषयींचा संशय नाहींसा झाला.

पुढारीपणाच्या कामाबरोबर त्याच्या स्वार्थत्यागासही सुरुवात झाली. व नवीन स्थापिलेल्या सभेचा खर्च त्यानें तीन वर्षेपर्यंत अंगावर सोसला. परंतु १८११ सालीं ही सभा बेकायदेशीर असें ठरवून तिच्या सभासदांच्या निवडणुकीस अधिकाऱ्यांनीं ठिकठिकाणीं प्रतिबंध केला. हे अन्यायाचे हुकूम क्याथोलिक लोकांनीं निमूटपणें मानले; मात्र लगेच एक जाहीर

सभा भरवून सदरहु हुकुमांचा त्यांनीं निषेध केला. क्याथोलिक लोकांचें भांडण इकडे इतर लोक पार्लमेंट सभेंत भांडतच होते. त्यांत ग्रॅटन वगैरे आयरिश व लॉर्ड ग्रॅनव्हिल, क्यानिंग वगैरे इंग्रजी मुत्सद्दी प्रमुख होते. १८१२ सालीं क्याथोलिक लोकांसंबंधाचा जो ठराव क्यानिंगनें पार्लमेंट सभेपुढें आणिला तो पास झाला, व त्याचे बाजूस १२९ मतें उलट बाजूहून अधिक मिळालीं. इतकें मोठें बहुमत आजपर्यंत या प्रश्नास कधींही मिळालेलें नव्हतें, व अशा रीतीनें इंग्लंदांतील लोकमत हळूहळू अनुकूळ होत चालल्यानें क्याथोलिक लोकांच्या त्रासाच्या राहिलेल्या बाबी लवकरच दूर करतां येतील अशी ग्रॅटन यास आशा वाटूं लागली. दुसरीही एक गोष्ट क्याथोलिक लोकांस या वेळीं अनुकूळ होती ती अशी. ही वेळ नेपोलियन बोनापार्टाच्या भाग्योदयाची होती. त्याचा सर्व युरोपखंडावर दरारा बसून गेला होता व त्याच्या सैन्यांत इंग्लंदवर नाराज झालेल्या सर्व प्रकारच्या लोकांची भरती होत चालली होती. या लोकांमध्यें आयरिश क्याथोलिक लोकांचा भरणा बराच होता. व इंग्लंदवर पुढें मागें स्वारी होण्यास हे लोक कारणीभूत होतील अशी पिट वगैरे मुत्सद्यांस भीति पडल्यानें, क्याथोलिक लोकांस संतुष्ट राखण्यांतच इंग्लंदचें हित आहे असें त्यांना वाटूं लागलें होतें. व यामुळें क्याथोलिक लोकांस त्यांचे हक्क या संधीस सर्वच मिळून जावयाचे; परंतु तिसरा जॉर्ज हा करारी, द्वेषी व धर्मवेडा असल्यामुळें जेव्हां जेव्हां क्याथोलिक लोकांच्या हिताची कोणतीही गोष्ट प्रधानमंडळ पुढें आणी, तेव्हां तेव्हां त्यांच्या आड तो येई, व प्रधान लोकांनीं आपला हट्ट नच सोडला तर त्यांचा राजीनामा घेऊन बेलाशक दुसरे प्रधान नेमीत असे. यामुळें ती इष्ट गोष्ट इतकी लांबणीवर पडली. सन १८१३ सालीं ग्रॅटननें क्याथोलिक लोकांबद्दल पार्लमेंट सभपुढें बिल आणिलें, त्यावेळीं मुख्य वाद बिशप लोकांची नेमणूक कोणीं करावी, राजानें किंवा पोपनें, याविषयीं निघाला; व तो फारच माजला. एवढ्याशा किरकोळ बाबतींत क्याथोलिक लोकांनीं ग्रॅटन याचें ऐकलें असतें व प्रधानमंडळाच्या इच्छेप्रमाणें बिशप लोकांची नेमणूक राजानें करण्यास संमति दिली असती, तर पुढें पंधरा वर्षांनीं त्यांस जें पूर्ण स्वातंत्र्य मिळालें तें तितकें आधीं मिळतें. परंतु ओकॉनेल यास पुढें करून क्याथोलिक लोकांनीं

असा आग्रह धरला कीं, काय वाटेल तें झालें तरी बिशप लोकांची नेमणूक पोपनेंच केली पाहिजे. त्यांची नेमणूक करण्याचें काम राजाकडे राहिलें म्हणजे तो होतांहोईतों दुबळे, नेभळे, हरामखोर, क्याथोलिक लोकांचे हितशत्रु असेच बिशप नेमील व मग धर्माचा नाश होईल, असा युक्तिवाद त्यांनीं चालविला. ग्रॅटनला प्रधानमंडळाच्या अनुकूलतेची अवश्यकता वाटल्यामुळें त्यानें ओकॉनेलचें ह्मणणें अमान्य केलें. तेव्हां ओकॉनेलनें ग्रॅटनची उघड निंदा आरंभिली. आणि ग्रॅटन व पार्लमेंटांतील मूठभर लोक यांना क्याथोलिक राष्ट्रासंबंधानें बोलण्याचा काय अधिकार पोंचतो असा प्रश्न उपस्थित केला. हा युक्तिवाद ग्रॅटन याची निंदा करण्यास सोईचा वाटून क्याथोलिक लोकांनीं ठिकठिकाणीं सभा भरवून ग्रॅटन याचा निषेध सुरू केला; व देशांत दुफळी माजून राहिली. इकडे प्रधानमंडळानें क्याथोलिक लोकांवर अन्य रीतींनीं वजन पाडण्याकरितां थेट पोपशीं राजकारण सुरू केलें. व त्याच्या सल्लागारास वश करून घेऊन त्याजकडून असें आज्ञापत्र आणविलें कीं, क्याथोलिक लोकांस जर संपूर्ण स्वातंत्र्य मिळणार असेल तर मग-बिशप लोकांना नेमण्याची बाब जर राजा आपणाकडे रहावी असा हट्ट धरीत असेल तर-ती त्याजकडेसच रहाण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें प्रत्यक्ष पोपची संमति मिळाल्यावर तरी क्याथोलिक लोकांनीं थांबावयाचें होतें. परंतु उलट पोपवरच आग पाखडण्यास त्यांनीं सुरुवात केली. व ज्या पोपच्या अधिकाराच्या अभिमानाखातर त्यांनीं लढा माजविला होता, तो अधिकार आतां स्वतःच धाब्यावर बसविण्याचा त्यांनीं निश्चय केला ! ते म्हणूं लागले कीं आपला स्वयंसिद्ध अधिकार नाहींसा करण्यास पोपला अधिकारच नाहीं. शिवाय या बाबतींत त्याला जातीनें कांहीं करतां येत नाहीं, त्याच्या सल्लागार मंडळानें अशा प्रकारच्या आज्ञापत्रास अनुमति दिली पाहिजे. व सर्वांहून मुख्य हें कीं, सदरच्या आज्ञापत्रावर त्याची स्वदस्तुरची सही नाहीं, त्याच्या कारभाऱ्याची आहे. तात्पर्य, ' शंकराचार्य खरे, पण सशास्त्र ठराव देतील तो मात्र आह्मांस कबूल ' अशा युक्तिवादानें शंकराचार्यांचा अधिकार न जुमानण्याची युक्ति क्याथोलिक लोकांनीं केली. एवढ्यावर ते थांबले नाहींत. त्यांचाही वशिला पोपच्या दरबारीं होता, तेव्हां त्याचा फायदा घेऊन पूर्वीचें आज्ञापत्र रद्द करण्याची त्यांनीं खटपट

केली व ती सिद्धीसही गेली; व ओकॉनेलला आपल्या पक्षास आतां अमोघ शक्ति उत्पन्न झाली असें वाटूं लागलें.

परंतु दैवाचा खेळ निराळ्या रीतीनें चालला होता, तो ओकॉनेल यास काय ठाऊक ? कारण हें सर्व होतें तों इकडे नेपोलियनचा पराभव झाला; युरोपियन राष्ट्रांचें सैन्य पॅरिसमध्यें शिरलें; इंग्लंदवर स्वारी होण्याची भीति नाहींशी झाली; प्रधानमंडळाच्या मनावर ज्या चिंतेचा अहोरात्र ताण पडला होता तो लयास गेला; व असें होतांच ' तुह्मांस निमेंशिमें घ्यायचें नाहीं तर मुळीं कांहींच देत नाहीं जा ' असा धिःकारपूर्वक जबाब त्यांना क्याथोलिक लोकांस निर्भयपणें देतां आला ! क्याथोलिक असोसिएशन ही बेकायदेशीर कामाकरितां भरलेली सभा आहे, असा जाहीरनामा लावून ती त्यांनीं पार उधळून टाकिली, व ओकॉनेल आणि क्याथोलिक लोक यांस निव्वळ चुरमुरे खात बसण्याची पाळी आली. या वेळीं दुफळी झाल्यामुळें कार्याची जी घडी एकदां बिघडली ती फिरून तशी बसण्यास चौदा वर्षें लागलीं, व या गोष्टीबद्दलचा दोष व जबाबदारी विचारी इतिहासकर्ते व ओकॉनेलचे चरित्रकार त्याच्याच पदरीं बांधितात. ओकॉनेलच्या तर्फे असें सांगण्यांत येतें कीं, या वेळीं वाद न मिटता घेण्याचें तसेंच कांहीं कारण होतें. वाद मिटता घेतला असता तर क्याथोलिक लोकांस त्यांचें पूर्ण स्वातंत्र्य चौदा वर्षें आधीं मिळालें असतें हें खरें; परंतु हा वाद न मिटतां चालू रहावा हेंच आयरिश लोकांस त्या वेळीं इष्ट होतें. त्यांना क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्यापलीकडे मजल मारावयाची होती, ही मजल मारण्यास लोकांच्या अंगीं त्वेष व आवेश शिल्लक राहणें अवश्य होतें, वाद मिटता घेतला असता तर त्यांचें समाधान होऊन हा आवेश शिल्लक राहताना, व स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधतेंना ! परंतु हा युक्तिवाद बरोबर नाहीं. केवळ पुढील एका कारणाकरितां आवेश पाहिजे ह्मणून आज होणारी सुधारणा पदरांत पाडून घ्यावयाची नाहीं व असंतोषाचा ' हाचा ' अंक अशा रीतीनें धरून ठेवावयाचा ही गोष्ट नेहमींच योग्य असते असें नाहीं. शिवाय एका कामाचा आवेश दुसऱ्या कामास उसना घेतलेला कधींही उपयोगी पडत नाहीं; ज्या त्या प्रश्नाच्या गुणदोषाप्रमाणेंच ज्या त्या वेळीं जरूर तितका आवेश उत्पन्न व्हावा लागतो, व वास्तविक

मागणें सयुक्तिक असेल तर तो उत्पन्न होतोही. परंतु कृत्रिम व शिलकी राखिलेल्या आवेशाची हंडी शिंक्यावर चढूं शकत नाहीं, हें पुढें ओकॉनेल यास च स्वानुभवानें कळून आलें. असो; या आवेशाचा फायदा घेऊन, सन १८०० चा कायदा रद्द होऊन आयर्लंडास पूर्वीप्रमाणें स्वतंत्र पार्लमेंट मिळावें अशाविषयीं त्यानें नवीन चळवळ सुरू केली. परंतु एका कार्याचा आवेश जरी दुसऱ्या कार्यास उपयोगी पडत नाहीं तरी एका कार्यांत झालेली दुफळी मात्र दुसऱ्या कार्याच्या आड आल्याशिवाय राहत नाहीं हा अनुभव सर्व देशांत एकसारखाच येणारा आहे. क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्यापेक्षां पार्लमेंटच्या स्वातंत्र्यासंबंधानें राष्ट्राचा मतभेद कमी असावा; परंतु वास्तविक तो तसा असतांही, पूर्वी माजलेल्या दुहीमुळें नवीन चळवळीसंबंधानें लोकांचा मिलाफ होईना. ग्रॅटन हा क्याथोलिक लोकांचाच प्रश्न अद्यापि घेऊन बसल्यामुळें त्याच्या अनुयायांनीं आयर्लंडांत सभा भरविण्याचें काम सुरू ठेविलें होतें. परंतु अशा या सभा भरवून खोटें लोकमत हे मूठभर लोक जाहीर करतात, या सबबीवर अशा सभांत घुसून त्या उधळून लावण्याचें त्यानें योजिलें. सन १८१७ च्या फेब्रुवारी महिन्यांत अशा प्रकारची सभा भरविण्यांत आली असतां ओकॉनेल हा आपले कांहीं अनुयायी घेऊन सभेंत घुसला. सभेच्या दिवाणखान्याच्या दारांत त्यास असें बजावण्यांत आलें कीं, बिशप लोकांची नेमणूक राजानें करण्यास हरकत नाहीं असें मत ज्यांचें असेल अशा लोकांचीच ही सभा आहे, इतरांस येण्यास मनाई आहे. तथापि ओकॉनेलनें आपलें पाऊल मागें घेतलें नाहीं. त्यानें सभेंत शिरून दणकावून भाषण केलें व अशा रीतीनें सभेच्या कामांत बखेडा झाला. परंतु ओकॉनेलच्या या दांडगाईनें त्याच्या कृत्यास कांहीं फायदा झाला नाहीं व १८१७ हें साल क्याथोलिकांस निराशेचें असेंच गेलें.

पुढील सालीं ओकॉनेलच्या लोकप्रीतींत भर पडण्यास आणखी एक कारण झालें. कांहीं प्रसंगानें डब्लिनच्या म्युनिसिपल कमिटीसंबंधानें बोलतांना त्यानें अपमानकारक असे शब्द वापरले. तेव्हां कमिटींतील एक सभासद डीएसटेरी नांवाचा एक माजी लष्करी अंमलदार होता तो रागावून त्यानें ओकॉनेल यास द्वंद्वयुद्धास पाचारण केलें. ओकॉनेल यास या भानगडीची

मनापासून हौस नव्हती, यामुळें त्यानें आपल्या प्रतिपक्षाच्या दोन तीन पत्रांस उत्तरच पाठविलें नाहीं. तेव्हां डीएसटेरी यानें असें प्रसिद्ध केलें कीं, कमिटीचें बदनाम करणाऱ्या या भ्याड भागुबाईस आपण एक दोन दिवसांत गांठ पडेल तेथें वेताच्या छडीनें अंगभर मार देणार आहों. तेव्हां ओकॉनेल यानेंही या धमकावणीला भीक न घालतां 'मीं द्वंद्व युद्धास तयार आहें' असें जाहीर केलें. तेव्हां मॅजिस्ट्रेटनीं शांततेचा भंग न करण्याबद्दल त्याजपासून भक्कम जामीन मागितला. परंतु त्याच्या प्रतिपक्षाचें समाधान होईना. शेवटीं दब्लिनपासून १२ मैलांवर एका जमीनदाराच्या बागेंत कोणास नकळत जाऊन युद्ध करावें असें दोघांनीं ठरविलें व त्याप्रमाणें दोघांनीं दोन दोन पिस्तुलें घेऊन एकमेकांवर बार काढले. पैकीं ओकॉनेलची गोळी डीएसटेरी याच्या मांडींत शिरून बसली व रक्तपातामुळें तो बेशुद्ध झाला. ओकॉनेल हा गुप्तपणें परत येणार तों युद्धाची बातमी लोकांत आगाऊ पसरून हजारों लोक त्यास वाटेंत भेटले, व त्यांनीं त्याचा जयजयकार करण्यास सुरुवात केली. लोकांनीं त्या दिवशीं रात्रीं गांवांत वाद्यें वाजविलीं व दीपोत्सवही केला. दुसरे दिवशीं डीएसटेरी यावर शस्त्रप्रयोग करण्यांत आला, परंतु गोळी न निघाल्यामुळें तो मरण पावला. या गोष्टीबद्दल ओकॉनेल यास फार वाईट वाटलें, व फिरून द्वंद्व युद्ध करावयाचें नाहीं अशी त्यानें शपथ वाहिली. परंतु लोकांस टाकून बोलावयाचें नाहीं अशी शपथ त्याचबरोबर घ्यावयास तो विसरला व यामुळें लोकांचा अपमान करण्याचे व त्यांनीं त्यास द्वंद्व युद्धास पाचारण करण्याचे पुष्कळ प्रसंग पुढें आले. खुद्द इंग्लंदचा मुख्य प्रधान पील याचें व ओकॉनेलचें द्वंद्व युद्ध होण्याची एकदां वळ आली होती, परंतु अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळें तो प्रकार टळला. इतर कित्येक प्रसंगीं त्यानें मुळीं निमंत्रणेंच पत्करलीं नाहींत व यामुळें त्यास कित्येक लोक भ्याड, भित्रा वगैरेही म्हणत. परंतु तें न जुमानतां त्यानें यापुढें युद्ध न करण्याचा शहाणपणाचा निश्चय कायम ठेविला.

सन १८२० सालीं ग्रॅटन हा मृत्यू पावला व पार्लमेंटमधील आयरिश पुढाऱ्याच्या जागीं प्लंकेट याची योजना झाली. पुढील सालीं क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्याचा आणखी एक हप्ता मिळाला. या वेळीं इंग्लंदांतील परिस्थिति पाहतां कामकरीवर्ग पुढें येत चालला आहे, सबब त्याची सहा-

नुभूति मिळवावी असा ओकॉनेल हा क्याथोलिक लोकांस उपदेश करूं लागला. परंतु इंग्लंदांतील कोणत्याही पक्षावर अवलंबून रहाण्यांत अर्थ नाहीं असें क्याथोलिक लोकांचें मत असल्यामुळें, ओकॉनेल यानें मागें ग्रॅटन याची निंदा चालविली होती, तशीच शीलनामक तरुण पुढाऱ्यानें ओकॉनेलची निंदा चालविली. व अशा रीतीनें दुफळी कायम राहिली. याच सुमारास चौथा जॉर्ज राजा आर्यलंदांत आला त्या वेळीं दब्लिन येथें लोकांनीं त्यास मानपत्रें वगैरे दिलीं. त्यांत क्याथोलिक लोकांनींही एक दिलें. तें अर्पण करतांना ओकॉनेलनें गुडघे टेंकून राजास पुष्पहार समर्पण केला; व राजा निघून गेल्यावर, फिरून येऊन त्यानें आर्यलंदांत रहावें याकरितां आयर्लंदांत राजवाडा बांधण्याची चळवळ त्यानें सुरू केली व फंड गोळा करण्याचें ठरविलें. परंतु साधारण एखाद्या भिकार नाल्यावर पूल बांधितां येईल इतकीही वर्गणी त्या फंडास जुळली नाहीं. कशी जुळणार ? कारण हॅनोवर घराण्याचे सर्व राजे क्याथोलिकांचे कट्टे शत्रू असत व ओकॉनेलला जें क्षणभर राजभक्तीचें भरतें आलें त्याचेयोगानें लोकांत त्याचें हंसें मात्र झालें. बरें, राजा तरी सुप्रसन्न झाला म्हणावें, तर तसेंही नाहीं. कारण लवकरच पुढें ओकॉनेल हा लंदनला गेला असतां राजाच्या ( लेव्हीला ) धूळभेटीच्या समारंभास गेला. त्या वेळीं राजानें नाक मुरडलें व ‘ हा रे बदमाष सैतानाचा अवतार इथें कशाला आला ? ’ असें लोकांस ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें बोलून दाखविलें !

सन १८२३ सालीं ओकॉनेलनें आणखी एक नवी क्याथोलिक सभा काढली. ही काढण्याचा उद्देश असा होता कीं, कनिष्ठ प्रकारच्या व गरिब लोकांनींही तिचे सभासद व्हावें, व वर्गणी देऊन तिच्या कामकाजांत लक्ष घालावें. एक दीड वर्षभर तिच्याकडे कोणी ढुंकूनही पाहीना व वार्षिक सभेस तिचें ‘ कोरम ’ न झाल्यामुळें ओकॉनेल यास रस्त्यांतील लोक धरून आणून कोरमची भरती करून घ्यावी लागली. सभेचा हा असा थाट पाहून लोक हंसूं लागले. परंतु आणखी एक वर्ष खटपट करतांच त्याची ही नवी सभा लोकप्रिय झाली, व दरआठवड्यास सभेची वर्गणी सातशें पाड जमूं लागली. या सभेच्या बैठकींतून व इतर ठिकाणीं ओकॉनेल हा जोराजोरांत येऊन बोलूं लागला. कायदेशीरपणा व बेकायदेशीर-

पणा यांचा बेमालुम सांधा जुळविण्याची हातोटी त्याला अत्युत्तम साधली होती, व क्याथोलिक लोकांनीं जरूर तर, परंतु केव्हांही केवळ आत्मसंरक्षणाकरितां आपल्या शक्तीचा उपयोग करून आपलें स्वातंत्र्य व हक्क मिळवावे असें तो या भाषणांतून लोकांस सांगे. अर्थात् अधिकाऱ्यांचा त्याजवर डोळा राहून खटला करण्याचा त्यांनीं निश्चय केला. तारीख १६ दिसेंबर १८२४ रोजीं एका जाहीर सभेमध्यें नेहमींप्रमाणें त्यानें भाषण केलें, व लगेच दुसरे दिवशीं राजद्रोहासंबंधानें खटला करण्याकरितां त्याला अटक करून त्याजकडून जामीन घेण्यांत आला. पुढें सरकारतर्फे पुरावा आणण्याकरितां वर्तमानपत्राच्या रिपोर्टरांच्या साक्षी काढण्यांत आल्या; परंतु रिपोर्टर सरकारी नसल्यानें कांहीं रिपोर्टरांनीं कानावर हात ठेवले; कांहींनीं सांगितलें कीं, ओकॉनेल हा अतिशय जलद बोलणारा असल्यामुळें आह्मांस मुळीं टिपणेंच करतां आलीं नाहींत; कांहीं ह्मणाले कीं, फिर्यादींतील शब्द बोलण्याची वेळ आली त्या वेळीं आह्मांस मुळीं झोंपच आली ! तात्पर्य, कोणी कांहीं कोणी कांहीं सांगून रिपोर्टर लोकांनीं ओकॉनेलचा बचाव केला.

पुढील सालीं इंग्लंदास क्याथोलिक लोकांचेतर्फे डेप्युटेशन गेलें, त्यांत ओकॉनेल हा एक होता. डेप्युटेशनच्यातर्फे त्यानें पार्लमेंटपुढें वकील या नात्यानें उत्तम भाषण केलें. त्यास मेजवान्या झाल्या व बॅरिस्टर या नात्यानें लॉर्डांच्या अपील कोर्टापुढें त्यानें कांहीं खटलेही चालविले. फिरून क्याथोलिक लोकांची चळवळ बळावून 'सभाविध्वंसक' कायदा करण्यांत आला; परंतु या कायद्याची फजीती करण्याचा या वेळीं त्यानें निश्चय केला. नवीन कायद्याखालीं एक सभा मोडली कीं लगेच दुसरें नांव देऊन त्यानें दुसरी सभा स्थापावी. तीही नोटीस काढून मोडली कीं तिसरी, असा अधिकाऱ्यांकडून सभा मोडण्याचा व नांवें बदलून दुसऱ्या सभा स्थापण्याचा ओकॉनेलचा क्रम कित्येक दिवसपर्यंत चालू होता. शेवटची सभा स्थापन केली तिचें नांव 'कायद्यानें निषिद्ध न केलेलें कार्य करणारी सभा' असें होतें. हेतु हा कीं, त्या सभेस नांवाच्या गुणावरून कोणास कांहींच हरकत घेतां येऊं नये. शिवाय एक ठिकाणची सभा मोडली तरी निरनिराळ्या ठिकाणीं एकसमयावच्छेदेंकरून १५०० वर लहान सभा भराव्या इतकी क्याथो-

लिकांची चळवळ करण्याची तयारी होती. क्याथोलिक फंडही पन्नास हजार पौंडांपर्यंत जमला व आठ लक्ष सह्यांचा एक अर्ज तयार झाला. लॉर्ड कॅनिंग यानें खासगी रीतीनें ओकॉनेलला असें कळविलें कीं, इंग्लंदांत पार्लमेंटमध्यें क्याथोलिक लोकांचे वतीनें मीं चळवळ चालू ठेवली आहे, तरी मला मदत ह्मणून तुह्मीं एवढें करा कीं, क्याथोलिक असोसिएशनचें काम जरा नेमस्तपणानें चालवा; परंतु क्याथोलिक लोक तें ऐकेनात.

या सुमारास क्लेअर नांवाच्या आयरिश परगण्यांतलि पार्लमेंटच्या सभासद्ची जागा खालीं झाली तेव्हां अधिकाऱ्यांविरुद्ध असणाऱ्या अशा क्याथोलिक गृहस्थाची निवडणूक, तेथील प्रॉटेस्टंट जमीनदार फिड्झरल्ड याच्या नाकावर टिचून आपण करूं अशी तेथील प्रमुख मतदारांनीं ईर्षा धरली. व हा बेत सिद्धीस जाण्यास सर्वांत अधिक लोकप्रिय असा क्याथोलिक उमेद्वार उभा राहणें जरूर आहे असें ठरल्यावरून ओकॉनेलनें उभें राहावें असा आग्रह झाला. आपण निवडून आलों तरी पार्लमेंट सभेमध्यें प्रत्यक्ष प्रवेश होण्यास शपथेची अडचण येणार, हें ओकॉनेल याम माहीत असल्यामुळें, प्रथम त्याचें मन घेईना. परंतु पुढें काय होईल तें होईल, उमेद्वार तरी आपल्या मतासारखा निवडून देऊं, असा लोकांनीं आग्रह धरल्यावरून तो कबूल झाला. मग काय विचारतां ! क्याथोलिक धर्माच्या उमेद्वाराची ही पहिलीच निवडणूक असल्यामुळें सगळा समाज दणाणून गेला. क्लेअर परगण्यामध्यें तर धामधूम व दंगेही सुरू झाले, परंतु निवडणुकीच्या कामीं कोणीही मारामारी वगैरे करून इष्ट कार्य नासूं नये अशी ओकॉनेल यानें आपल्या स्नेह्यांस सक्त ताकीद दिली. त्याच्या निवडणुकीच्या खर्चाकरितां दब्लिन शहरांत पहिल्या दिवशीं दोन हजार व पुढील दहा दिवसांत मिळून चौदा हजार पौंड वर्गणी जमा झाली. निवडणुकीच्या जागेच्या आसपास एखाद्या सैन्याचा तळ पडल्याप्रमाणें झालें होतें. निवडणुकीचें काम पांच दिवस चाललें होतें; कारण मतदारांची संख्या सुमारें आठ हजार होती. व्यवस्थेकरितां जागेवर तीनशें पोलीस व दोन हजार लष्करी शिपाई ठेवण्यांत आले होते. पांचव्या दिवशीं प्रतिपक्षीय उमेद्वार ‘पोल’ सोडून निघून गेला; व मग विजय पावलेल्या ओकॉनेलच्या लोकांनीं किती मिरवणुकी काढल्या, समारंभ काय केले, शिखरें

काय पाजळलीं व मेजवान्या किती दिल्या, याची गणनाच नाहीं ! हा क्याथोलिक पक्षास नवीन जय मिळाल्यावर लवकरच पार्लनें एक नवीन बिल पास करून क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्याचा आणखी एक हप्ता दिला व त्याच्या भिडेस्तव राजानें त्यास आपली संमतिही दिली. हा कायदा पास झाल्यानंतर ज्यांची निवडणूक झाली त्यांस पार्लमेंटमधील शपथेची अडचण उरली नाहीं. परंतु ओकॉनेलची निवडणूक कायदा पास होण्याचे आधीं झाल्यामुळें त्याला या नवीन कायद्याचा फायदा घेतां येण्यासारखा नव्हता. तथापि पार्लमेंटमध्यें बसण्यास जावें, मग तेथें काय होईल तें होईल असें ओकॉनेल यानें ठरविलें. त्याप्रमाणें लंदन येथें जाऊन तो हाउस ऑफ कॉमन्स सभेमध्यें स्पीकर ( सभाधिपति ) याचे समोर जाऊन उभा राहिला. परंतु ठराविक शपथेचा कागद त्याजपुढें टाकण्यांत आला, त्याप्रमाणें शपथ घेण्याचें त्यानें नाकारलें. अर्थात् सभागृह सोडून जाण्याचा त्यास हुकूम करण्यांत आला. तेव्हां वकील लोकांच्या बोलण्याच्या जागेवर उभें राहून त्यानें भाषण केलें; तथापि त्यानें ठराविक शपथ घेतल्याशिवाय त्यास सभासद होतां येत नाहीं असें १९० विरुद्ध ११६ मतें पडून ठरलें. प्रधान पक्षास असें वाटलें कीं, फिरून ओकॉनेलची निवडणूक मतदारांकडून कसची होणार ? परंतु तावडतोब ओकॉनेल आयर्लंडास परत आला; क्याथोलिक सभेनें त्याच्या निवडणुकीकरितां पांच हजार पौंड वर्गणी देऊं केली; फिरून धामधूम होऊन पूर्वींच्याच वॉर्डाकडून त्याची निवडणूक झाली; व १८३० सालीं तो पार्लमेंटचा सभासद या नात्यानें काम करूं लागला. परंतु त्याचे आधीं एक वर्षभर १८२९ सालीं पार्लमेंटनें व्यापक असा कायदा करून क्याथोलिक लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देऊन टाकलें !

१८३१ सालीं फिरून एक सभाविध्वंसक कायदा पास करण्यांत आला, व कोणत्याही नांवाखालीं हक्कांकरितां भांडणाऱ्या सभा स्थापूं नये असें ठरविलें गेलें. ‘ फक्त कायद्यानें प्रतिबंध न केलेल्या कामाकरितां स्थापलेली सभा ’ हें किंवा असलीं नांवें घेऊन चालविलेल्या सभाही यापुढें चालणें शक्य नव्हतें. तेव्हां ओकॉनेलनें निराळीच युक्ति योजिली. त्यानें आपल्या घरीं ३०० लोकांस जेवावयास बोलाविलें; परंतु जेवण हा मुख्य उद्देश

नसून सभा भरविणें हाच मुख्य उद्देश होता व मेजवानीच्या मिषानें सभा भरविली, या आरोपावरून सरकारानें त्याजवर खटला केला. लोकांत चळवळ झाली. त्याच्या बचावाकरितां सात हजार पौंड ( सत्तर हजार रुपये ) फंड जमला. डिफेन्सतर्फे कांहीं कांहीं वादग्रस्त गोष्टी प्रांजळपणें कबूल करण्यांत आल्या. मंडळी बोलावली होती व तेथें अमूक एका प्रकारचें कामही करण्यांत आलें असें ओकॉनेलनें कबूल केलें; परंतु घडलेल्या गोष्टी बेकायदेशीर नाहींत व त्यांवरून आरोप लागू होत नाहीं अशी तक्रार त्यानें केली. जूरीपुढें खटल जाऊन त्यावर दोषारोप लागू होतो असा अभिप्राय पडला. मात्र निकाल सांगण्याचें काम न्यायाधिशानें पुढें टाकलें. या अवधींत ओकॉनेल हा लंदन येथें गेला. लिबरल पक्षाच्या पुढाऱ्यांच्या व त्याच्या गांठी पडल्या; व सरकारतर्फे खासगी रीतीनें असेंही कळविण्यांत आलें कीं, स्वतंत्र पार्लमेंट मागण्याची खटपट व चळवळ जर ओकॉनेल सोडून देण्याचें वचन देईल, तर त्याजवरचा खटला काढून घेण्यांत येईल. परंतु त्यानें ती गोष्ट साफ नाकबूल केली. या अवधींतच पार्लमेंट सभेची बैठक असल्यामुळें त्यानें त्या सभेंत सभासद या नात्यानें भाषणेंही केलीं. या वेळीं ब्रिटिश पार्लमेंट सभेची सुधारणा करण्याचें बिल ( १८३२ चें ) पार्लमेंटपुढें होतें. त्यावर ओकॉनेलनें अत्यंत सुंदर असें भाषण केलें, त्यामुळें प्रधानमंडळाचाही ग्रह त्याजबद्दल चांगला झाला. व त्याजवरील खटला काढून घेण्याचें आंतल्याआंत ठरून न्यायाधिशानें अशा बेतानें निकालाची तारीख लांबविली कीं, दरम्यान सभाविध्वंसक कायद्याची मुदतच संपली व ही मुदत संपल्यानें त्या कायद्याअन्वयें केलेला खटला रद्द करावा लागला. अशा रीतीनें ज्यूरीनें प्रतिकूल निकाल सांगितला-असतांही शिक्षेच्या गंडांतरांतून ओकॉनेल हा कर्मधर्मसंयोगानें सुटला.

यानंतर टाइथचा कर ( मागें ६३ व्या पृष्ठांत याचें वर्णन आलेंच आहे ) व प्रॉटेस्टंट धर्ममंडळ यांसंबंधानें ओकॉनेलनें चळवळ सुरू केली. ता. १४ जुलई १८३२ रोजीं 'नॅशनल पोलिटिकल असोसिएशन' ला पत्र लिहून त्यानें प्रसिद्धपणें असा उपदेश केला कीं, टाइथचा कर कोणीही आपखुषीनें देऊं नये, अगर तो कर आपखुषीनें न दिल्या कारणानें अधिकाऱ्यांनीं कोणाची

मिळकत जप्त केली असतां ती मिळकत लिलावांत कोणीं घेऊं नये; व अशा रीतीनें, टाइथच्या कराचा अन्याय लोकांच्या व सरकारच्या नजरेस आणावा. ही सूचना होतांच लोकांनीं तिचा अम्मल करण्यास एकदम सुरुवात केली; व मग असें होऊं लागलें कीं, आपखुषीनें असा कोणीही कर देईना व करवमुलीकरितां कोणाच्या मालाची जप्ती केली असतां तो कोणी विकत घेईना. एके दिवशीं अशीही गंमत झाली कीं, एका कुळाची गाय जप्त केल्याची बातमी पसरतांच आतां पुढें काय होतें हें पहाण्याकरितां लोकांची गर्दी जमली; आपल्या हातून बळजबरीनें लोक गाय सोडवून घेऊन जातील या भीतीनें जप्तीदारांनीं पोलीस बोलाविले; पोलीस आल्याबरोबर आणखी लोक जमले; आणखी लोक जमल्यामुळें लष्करचे शिपाई बोलावले; व ते जप्तीदार, ते शिपाई, ते पोलीसचे जवान, ते लोक, व ती गाय हा सगळा घोळकाचा घोळका गुरांच्या बाजाराकडे गेला. बाजारांत ते बराच वेळ तिष्ठत उभे राहिले तरी गिऱ्हाईक कोणी येईना व गाय मागेना. जप्तीचा माल म्हटला म्हणजे त्या चळवळीच्या वेळीं लोकांस प्लेगसारखा वाटे व ते त्यापासून पळून दूर जात. कित्येक ठिकाणीं याहून भयंकर प्रकारही होत. १८३२ सालीं एका जिल्ह्यांत टाइथच्या कराचे पायीं ९ हजार गुन्हे नेहमींहून अधिक झाले व त्यांपैकीं दोनशें तर नुसते खून होते.

यानंतर पार्लमेंटच्या नवीन निवडणुकी झाल्या. त्या वेळीं ओकॉनेल यानें फार मेहनत घेऊन लहान लहान पत्रें व पत्रकें प्रसिद्ध करून लोकांस आपलीं नांवें मतदारांच्या यादींत कशीं नोंदवून घ्यावीं व मतदार या नात्यानें आपले हक्क कसे बजावावे यांविषयीं त्यांस चांगलें शिक्षण दिलें. तो स्वतः, त्याचे दोन मुलगे व त्याचे दहावीस हस्तक इतकी मंडळी त्या निवडणुकींत निवडून आली. किंबहुना आयर्लंदांत निवडून आलेल्यांपैकीं निमे सभासद त्याचे हस्तक होते म्हटलें तरी चालेल. नवीन पार्लमेंटनें प्रथमच दडपशाहीच्या कायद्याचें बिल पुढें आणलें व तें पासही झालें. परंतु ओकॉनेलच्या उपसूचनेवरून चार दिवस वादविवाद गाजत होता. पार्लमेंटनें नांवाला क्याथोलिक लोकांचीं बंधनें कमी केलीं खरीं, परंत त्यांस दिलेल्या वचनांचा प्रत्यय आणून देण्याचे नांवानें मात्र आंव-

ल्याएवढें पूज्य. क्याथोलिक मनुष्यास वाटेल ती जागा देण्यास हरकत नाहीं असें कायद्यानें ठरलें, परंतु नांव घेण्यासारखी एकही जागा क्याथोलिक मनुष्यास आज इतक्या दिवसांत त्यांनीं दिली नाहीं; तोंडानें मात्र क्याथोलिकांस समान हक्क देण्यांत आले आहेत असें ह्मणण्यास इंग्रज मोकळे आहेत ही गोष्ट त्यानें पार्लमेंट सभेच्या नजरेस आणली. त्याचा व लॉर्ड स्टॅनेल याचा खूप खडाजंगीचा वाद झाला. परंतु बिल पास झालें. या बिलामुळें अधिकाऱ्यांना पुष्कळ नवीन अधिकार मिळाले. जिल्हेचे जिल्हे दंगेखोर ह्मणून ठरविणें, व अशा जिल्ह्यांत सर्व तऱ्हेच्या सभा बंद करणें, दिवस मावळल्यावर कोणास रस्त्यांत हिंडूं न देणें, हत्यारांकरितां झडती घेणें, लष्करी कायदा सुरू करणें, कोर्टमार्फत न्याय न करतां लष्करी इनसाफ करून शिक्षा देणें वगैरे गोष्टी अधिकाऱ्यांस आपल्या इच्छे-प्रमाणें करण्याची मोकळीक मिळाली.

परंतु सन १८०० पासून पुढें तीस वर्षेंपर्यंत स्वतंत्र आयरिश सभासदांचा असा पक्ष अस्तित्वांत आलेला नव्हता, तो १८३४ सालीं या सर्वांमुळें प्रथम अस्तित्वांत आला. या पक्षाचे जोगवर सुटीनंतर पार्लमेंट उघडतांना, ओकॉनेल यानें राजास विनंति करण्याकरितां ह्मणून सूचना आणली. या सूचनेसंबंधानें त्यानें पार्लमेंट सभेमध्यें सात तास भाषण केलें. इंग्लंदकडून आज ३४ वर्षांत आयर्लंदास न्याय मिळाला नाहीं, व पुढेंही तो मिळण्याची आशा नाहीं सबब, आयर्लंदास पूर्वीचें स्वतंत्र पार्लमेंट बहाल करावें, अशा अर्थाची ही विनंति उर्फ सूचना होती. ही सूचना पुढें मांडतांना तिच्या समर्थनार्थ, त्यानें असें सिद्ध केलें कीं, इंग्लंदची व आयर्लंदची पार्लमेंट सभा एक झाल्यापासून आयर्लंदचा सर्वस्वीं तोटा व इंग्लंदचा सर्वस्वी नफा झालेला आहे. या अवधींत आयरिश लोकांवरील कराचा बोजा दुप्पट वाढला व लोकसंख्या मात्र कमी झाली. आयर्लंदचें कर्ज वाढलें, व पत कमी झाली. देशांत दारिद्र्याची वाढ झाली, व त्राण कमी झालें. इंग्लंदच्या लोकांवरील ४$\frac{3}{4}$ कोटी पौंडांचा बोजा या चौतीस वर्षांत कमी झाला; या अवधींत आयर्लंदच्या स्थितीची चौकशी करण्याकरितां साठ सबकमिट्या व एकशें चौदा कमिशनें नेमण्यांत आलीं, परंतु आयर्लंदच्या दुःस्थितीचें निराकरण होण्याचा ओनामाही गिरविल

गेला नाहीं. चौतीस वर्षांपैकीं जवळ जवळ पंचवीस वर्षें आयर्लंदांत कायद्याचें बंधन नसल्याप्रमाणें अधिकाऱ्यांनीं वर्तन केलें. इंग्लंदला फायदेशीर असा हा संयोग घडून यावा याकरितां आयर्लंदांत १७९८ सालीं बंड होणार त्याची कच्ची माहिती त्यांच्या हातांत असतां अधिकाऱ्यांनीं मुद्दाम बंड होऊं दिलें, व बंडाचा फायदा घेऊन सभासदांस, लांच चारून आयर्लंदची सभा मोडून टाकली इत्यादि गोष्टी त्यानें वक्तृत्वपूर्ण भाषेनें पार्लमेंट सभेस ऐकविल्या, परंतु त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. त्यांच्य बाजूस फक्त ३८ मतें मिळालीं व त्या अडतिसांत फक्त एकच काय तो इंग्रज होता; विरुद्ध मात्र ५२३ होते.

यानंतर लवकरच आयर्लंदांतील ' ॲटर्नी जनरल ' ह्मणजे ' ॲडव्होकेट जनरल ' ची जागा रिकामी पडली व ती ओकॉनेल यास देण्याची बोलवा होती. व मिळती तर ओकॉनेलनें पत्करलीही असती असें ह्मणत. कारण त्या जागेमुळें त्याला स्वतःला जरी फारसा मान मिळण्यासारखा नव्हता, तरी अशा जागीं क्याथोलिक मनुष्याची नेमणूक होणें यांत कांहीं विशेष मुद्दा आहे असें त्याचें मत होतें. परंतु राजाचे कानावर या नेमणुकीची बातमी गेली व त्यानें त्या गोष्टीस हरकत घेतली. यामुळें ती रहित झाली. तथापि लॉर्ड मेलबोर्न या लिबरल पक्षाच्या प्रधानाचें ओकॉनेलबद्दल मत चांगलें होतें, व त्याच्या अमदानींत आयर्लंदासंबंधानें कोणताही प्रश्न निघाला तरी तो त्यावर डॅनियल ओकॉनेलचें मत खासगी रीतीनें नेहमीं घेत असे. यास्तव या वेळच्या प्रधानमंडळास त्याच्या प्रतिपक्षानें ' ओकॉनेलचें प्रधानमंडळ ' असें नांव थट्टेनें दिलें होतें; व खरोखरच आयर्लंदांतील हुद्याच्या व मोठ्या पगाराच्या जागांवर मनुष्यें नेमण्याचें काम या वेळीं जवळ जवळ ओकॉनेलच्याच शिफारशीवर अवलंबून असे. लॉर्ड मेलबोर्न यास मदत करण्याकरितां ओकॉनेल हा स्कॉटलंदमध्यें कांहीं दिवस फिरत होता, व त्यानें पुष्कळ ठिकाणीं प्रधानमंडळाच्या वतीनें भाषणें केलीं व त्याचा बहुमानही झाला. परंतु कॉन्सर्व्हेटिव्ह अगर लिबरल यांपैकीं कोणाच्याही कच्छपीं लागावयाचें नाहीं व स्वतंत्र राहून अडवणुकीच्या मार्गानेंच आपलें कार्य साधावयाचें, असें त्यानें नुकतेंच यापूर्वी जाहीर केलें असल्यामुळें आयरिश लोकांचा त्याजवर राग होत

चालला. ते ह्मणूं लागले कीं, हा बुडत्याचा पाय खोलांत जात आहे. आधींच फूट व दुफळी याचें आयरिश लोकांस बाळकडू. त्यास कांहीं तरी निमित्त मिळालें कीं पुरे. लोक ह्मणूं लागले कीं, ' दहा वर्षांत यानें बारा सभा स्थापल्या व बारा मोडल्या. याचा भरंवसा काय धरावा ? व आतां तर हा लिबरलपक्षाच्या गोटांतच शिरूं पहातो; प्रथम स्वतंत्र पार्लमेंट पाहिजे असा आग्रह धरून फिरून लवकरच आयर्लंदास कोणीकडून तरी न्याय मिळाला ह्मणजे झालें अशी अल्पसंतुष्टवृत्ति तो दाखवूं लागला. जमीनदार ह्मणूं लागले कीं, ' याचें क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याचें व स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचें वेड येऊनजाऊन आमच्या मुळावर मात्र आलें; आह्मांस बाजूस सारून आमच्या जागीं धर्मवेड्या भिक्षुकवर्गास स्थापून कुळांना सधन व उपयोगी असा धनी होता त्याचे जागीं दरिद्री धनी करून दिला यांत राष्ट्राचा तो काय फायदा झाला ? ' भिक्षुकवर्ग ह्मणूं लागला कीं, ' टाईथबिलाचे कामीं दाखवावा तितका नेट ओकॉनेलनें न दाखविल्यामुळें नुकसान झालें. ' कारागीर ह्मणूं लागले कीं, ' आह्मीं आपापसांत संप करून आपला बचाव करितों त्याविरुद्ध ओकॉनेलनें कां बोलावें ? कायदेशीरपणाची याला एवढी हौस कशाकरितां ? ' व शेतकरी ह्मणूं लागले कीं, ' पार्लमेंट स्वतंत्र असो वा परतंत्र असो, आमच्या मागचें कराचें ओझें व आमचें दारिद्र्य हीं रतिमात्र कमी न होतां उलट दडपशाहीचे कायदे होऊन अपराध्याबरोबर निरपराधी चिरडून जातात यास ओकॉनेलकडून कांहींच प्रतिबंध कसा होत नाहीं ? ' तात्पर्य, लोकप्रियतेचा कांटा फार नाजूक असतो; तो वाऱ्यानें किंवा फुंकरानें उडणाऱ्या केरानेंही चंचल होतो. आपलें वजन कमी होत आहे असें पाहून ओकॉनेलनें लोकांमध्यें चळवळ उत्पन्न करण्याची दुसरीच तोड काढली. त्यानें इंग्लंदच्या मालावर बहिष्कार घालण्याचा उपदेश सुरू केला. हा बहिष्कार फार थोडे दिवस टिकला. कारण श्रीमान् लोक आयरिश माल वाईट म्हणून घेईनात; गरीब लोक तो महाग म्हणून घेईनात; व बहिष्काराच्या चळवळीचा फायदा घेऊन इंग्रज व्यापारी 'आयरिश' ( स्वदेशी ) असा छाप मारून वाटेल तो माल आणून आयर्लंदांत विकून नफा मिळवूं लागले. तेव्हां हळू हळू बहिष्कारही मागें पडला. अशी ही स्थिति १८४० पर्यंत टिकली.

परंतु ओकॉनेलच्या चरित्रनाटकापैकीं शेवटचा व कांहीं अंशीं विशेष मनोरंजक व बोधप्रद असा अंक अद्यापि व्हावयाचा राहिला असून तो १८४० पासून पुढें चार वर्षेंपर्यंत होत होता. ओकॉनेलची लोकप्रियता व अप्रियता यांच्या लाटा एकामागून एक उठत असत. १८४० चे सुमारास तो बराच अप्रिय झाला होता. परंतु फिरून त्याच्या लोकप्रियतेची लाट उठली. त्यानें पुन्हां एकवार एक 'रिपील असोसिएशन' स्थापिली. एक वर्षभर कसेंबसें काढल्यावर एकदम ती सभा लोकप्रिय होऊं लागली, व नवीन नवीन लोक येऊन तिला मिळूं लागले. प्रथम प्रथम दर आठवड्यास १५० पौंड वर्गणी जमत असे, ती आतां दोन दोन हजार जमूं लागली. व सभेचें इतकें मोठें प्रस्थ माजलें कीं, तिच्या ऑफिसांत अठ्ठेचाळीस कारकून कामास लागत. पत्रव्यवहार व कागदपत्र यांचे भारेच्या भारे जमले. पांच हजार लोक जमूं शकतील एवढी जागा आठवड्याच्या सभांकरितां भाड्यानें घेतली गेली. रिपील सभेनें आपले स्वतःचे पोलीसही ठेविले, व तिच्या मदतीनें ठिकठिकाणीं खासगी लवाद कोर्टें चालू लागून सरकारी न्यायकोर्टें ओस पडण्याची वेळ आली. सभेचा नवीन सभासद होणें हा एक बहुमानाचा समारंभ होऊन बसला. या सभासदांच्या सनदेवर स्वदेशी कलाकुसरीचें उत्कृष्ट काम केलेलें असून ही सनद म्हणजे एक संग्राह्य अशी वस्तु करण्यांत आली. स्वदेशी नांवें, पदव्या, निशाणें, कविता, पवाडे वगैरे निर्माण होऊं लागून रिपील सभेकडून त्यांचा सररास उपयोग होऊं लागला. व जंगी जाहीरसभांची सुरुवात होऊन एकाहून दुसऱ्या सभेस गर्दी, दुसरीहून तिसरीस, अशी श्रोत्यांची व प्रेक्षकांची संख्या भराभर वाढूं लागली. या सभा एकंदर पंधरा महिने चालू होत्या; व त्यांपैकीं शेवटीं सात महिने या सभांस नुसता ऊत आला होता. सभेस दहा किंवा पांच हजार लोक जमणें म्हणजे कांहींच नाहीं असें होऊन गेलें. अखेर अखेर सभेच्या प्रेक्षकांची संख्या पांच लाखांपर्यंतही गेली होती. तारागडावरील सभेंत साडेसात लाख लोक जमले होते असें ह्मणतात. या सभेचें वर्णन वाचतांना असें वाटतें कीं जणूं काय पंढरपूरच्या दोन तीन यात्रांची गर्दी एकत्र जमली होती! परंतु इतकी गर्दी जमूनही लोक अगदीं शांतपणानें, शिस्तीनें, कांहीं एक दंगा

धोपा न होतां कायदेशीरपणानें वागत ! तारागडच्या सभेंत शेंकडों ठिकाणीं उपासनापीठें मांडून त्यावर धर्मोपदेशक प्रार्थना करीत होते. सभा जवळ जवळ दिवसभर चालली होती. तिसरे प्रहरीं ओकॉनेल हा दहा हजार घोडेस्वारांच्या लव्याजम्यानिशीं सभेस आला, व शेवटचा अर्धकोश चालून जाऊन सभास्थानास पोंचण्यास त्याला दोन तास लागले ! व या सभेनंतर राथ गांवच्या सभेचें काम संपल्यानंतर आयर्लंदच्या या अनभिषिक्त राजाचा राहिलेला तेवढा अभिषेकाचा समारंभ करून टाकून त्याच्या भक्तांनीं त्याच्या लोकप्रियतेची व बहुमान्यतेची पूर्णता केली ! कांहीं उत्साही तरुण मंडळींनीं अस्सल स्वदेशी तऱ्हेचा हिरव्या रंगाचा असा एक मुकुट किंवा किरीट तयार करून त्याचे मस्तकावर घातला. परंतु दैवयोगानें त्या दिवशींचा मुकुटधारणसमारंभ हाच त्याच्या आयुष्यांतील शेवटचा असला मोठा समारंभ ठरला.

या सभांमधून ओकॉनेल जीं भाषणें करी तीं, एक पाय कायद्याचे सीमेच्या आंत व दुसरा पाय त्या सीमेवर ठेवून करी. व ती मर्यादा उल्लंघिल्याचा त्याला भास झाला कीं तें तो लगेच आंत घेई. अशा प्रचंड सभांमध्यें उभें राहून बोलतांना कायद्याचें भान रहाणें अर्थातच कठिण असतें; परंतु ओकॉनेल यास कायद्याच्या ज्ञानाप्रमाणें वक्तृत्वही वश असल्यामुळें कायद्याच्या तारेवर नाचण्याची कसरत डोळे न फिरतां तो करूं शके. ' रिपील 'च्या सभेचा अध्यक्ष व पुढारी जरी तो स्वतः होता तरी, सभेमध्यें ' नेशन ' वगैरे राष्ट्रीय आणि स्वातंत्र्यवादी पक्षाचे तरुण पुढाऱ्यांचें प्राबल्य फार होतें. वर्तमानपत्रांतून, खासगी भाषणांतून वगैरे सर्वत्र ' रिपील ' बरोबर स्वातंत्र्याचीही चर्चा सररास होत असल्यामुळें श्रोत्यांचे कानास तेंच ऐकण्याची संवय झाली होती. ' लाखों लोक एकदिलाचे झाले व अमुक एक गोष्ट त्यांच्या मनानें हवी असें घेतलें ह्मणजे मग इंग्लिश पार्लमेंट सभेस ती नाहीं म्हणतां येणें कठिण आहे. या लाखों लोकांचे मनांत कायद्याचें उल्लंघन करण्याचें अगर हातीं शस्त्र घेण्याचें नाहीं, परंतु अधिकारीवर्ग आपण होऊनच जर दांडगाई करूं लागला व कायदा मोडूं लागला तर लोकांस आत्मसंरक्षणार्थ जरूर ते सर्व उपाय योजावे लागणें स्वाभाविक आहे'-अशी या सभेंतील लोकांच्या मनांतली विचारसरणी असे. व सभेंतील वक्तेही

त्याच गोष्टीचा उघड अनुवाद करीत. ' नेशन ' वगैरे वर्तमानपत्रांनीं ही विचारसरणी घोटघोटून इतकी उत्कृष्ट शिकविली होती कीं, ती सोडून किंवा तिला बाधक असें अथवा रतिभर कमीपणाचें असें यत्किंचितही बोलण्याची वक्तृत्वाची सोय नसे. परंतु या विचारसरणीचीं मनावर पुटावर पुटें बसल्यानें अधिकारीवर्ग व लोक यांच्यांतील हा तंटा कोणत्या वेळेस हातघाईवर येईल याचा नियम नसून, पुढें मागें लवकरच तो हातघाईवर आलाच पाहिजे आणि राष्ट्रास आत्मरक्षणार्थ शस्त्र हातीं घ्यावें लागणार अशी ज्याच्या त्याच्या मनास खात्री वाटूं लागली होती. या होणाऱ्या गोष्टी लक्षांत घेऊन, लढाई जुंपली असतां देशांत माऱ्याच्या बिकट जागा कोणत्या, शत्रूस जेर कोठें करतां येईल, घोडेस्वार व पायदळ यांस अनुकूळ व प्रतिकूळ अशा गोष्टी कोणत्या, शस्त्रांचा पुरवठा कमी पडल्यास ती उणीव तात्पुरती कशानें भरून निघते, वगैरे बाबींची चर्चा पत्रांतून निमित्तानें व प्रसंगानुसार होऊं लागली. लाखों आयरिश लोकांस डोळ्यांसमोर असें दिसूं लागलें कीं, लवकरच अधिकारीवर्गाकडून आगळीक होणार व मग लोकांच्या निश्चयाचें व बलाचें पाणी दाखविण्याकरितां ' आतां वेळ आली आहे, पुढें व्हा, माघार घेऊं नका ' असा हुकूम ओकॉनेल हा फर्मावणार. परंतु ओकॉनेल हा खरा शांततावादी होता हें त्या बिचाऱ्यांस काय ठाऊक ? कायद्याच्या तारेवर उभें राहून त्यानें केलेल्या कसरतीवरून त्यांचें त्याजबद्दल कांहीं निराळेंच मत झालें होतें; व त्या मताप्रमाणें त्यांच्या स्वतःवर जी जबाबदारी पडावयाची ती संभाळण्यास व पुरी पाडण्यास त्यांची स्वतःची तयारी होती. कारण ओकॉनेलनें हातांत शस्त्र धरण्यास सांगण्याचा अवकाश कीं त्यांनीं तें धरलेंच; मग परिणाम कांहींही होवो, असा त्यांचा आपले ठिकाणीं भरंवसा होता.

परंतु लोकक्षोभाची तार चढविणें जितकें सोपें असतें तितकें ती उतरविणें सोपें नसतें, व आयर्लंदच्या दुर्दैवानें या गोष्टीचा प्रत्यय ओकॉनेल यास व त्याच्या अनुयायांस लवकरच आला. सात आठ महिन्यांपर्यंत या जंगी जाहीरसभांचा धुमाकूळ आयर्लंदांतील अधिकाऱ्यांनीं निमूटपणें सहन करून घेतल्यावर त्यांनीं आपल्या वरिष्ठांकडे कागाळी केली. पार्लमेंट सभेंत प्रश्न होऊन सदर सभांस प्रतिकूळ अशीं उत्तरें प्रधानमंडळा-

कडून देण्यांत येऊं लागलीं. व इतर काय वाटेल तें संकट येवो तें आपण सोसूं, परंतु आयर्लंदास स्वतंत्र पार्लमेंटसभा देऊन एकजीव झालेल्या राज्याचीं शकलें करण्यास आपण केव्हांही तयार होणार नाहीं असें सरकारी रीतीनें जाहीर करण्यांत आलें. ज्या ऑनररी मॅजिस्ट्रेट लोकांनीं रिपीलच्या सभांतून वगैरे काम केलें होतें, त्यांस एकदम बडतर्फ करण्यांत आलें. रिपीलच्या जाहीरसभांस फ्रान्स व अमेरिका या देशांमध्यें जाऊन राहिलेल्या आयरिश लोकांच्या झुंडीच्या झुंडी आयर्लंदांत येऊं लागल्यामुळें बंडाव्याचा वणवा केव्हां पेटेल याचा नियम नाहीं अशा समजुतीनें इंग्लंदमधून आयर्लंदमध्यें पसतीस हजार सैन्य पाठविण्यांत आलें. आयर्लंदांतील गड, किल्ले, गढ्या, बुरूज, पाणवठे वगैरे सर्व माऱ्याच्या व आश्रयाच्या ठिकाणांची डागडुजी करण्यास सुरुवात झाली. अशा धामधुमीच्या वेळीं जाहीरसभा भरविणें हें धोक्याचें आहे असें ओकॉनेल यास स्वतःस हळूहळू वाटूं लागलें होतें; परंतु या सभा कोणत्या सबबीवर थांबवाव्या हेंच त्यास कळेना. शेवटीं त्यानें व त्याच्या अनुयायांनीं असें ठरविलें कीं, आजपर्यंत न झालेली अशी आणखी एक जंगी जाहीरसभा भरवून मग सभांचें काम कांहीं दिवस थांबवावें, व त्याप्रमाणें पुढील सभा क्लॉनटार्फ या इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं लवकरच भरविण्याचें मुक्रर ठरून देशोदेशीं निमंत्रणचिठ्या जाऊन लोक येऊंही लागले. ही सभा शेवटची असली तरी खास बंद करावयाची असें अधिकाऱ्यांनीं ठरवून पुढील योजनेचे गुप्त हुकूम सोडले. सभेचा जो कार्यक्रम पूर्वीं प्रसिद्ध करण्यांत आला होता, त्यामध्यें स्वयंसेवकांच्या घोडेस्वारांच्या पलटणीनें सभेचे प्रसंगीं कसें वागावें याविषयीं हुकूम देण्यांत आले होते. त्याचा फायदा घेऊन या सर्व लष्करी थाटाचा हेतु जमाव जमवून सरकारास दहशत घालण्याचा आहे, सबब सभा बेकायदेशीर ठरवितां येते अशी सल्ला सरकारच्या कायदेपंडितांनीं दिली. परंतु त्या सल्ल्याप्रमाणें सभेस प्रतिबंध करण्याचा जाहीरनामा फार वेळ आगाऊ प्रसिद्ध केला तर गंमत बिघडणार, यास्तव सभेच्या आदले दिवसापर्यंत हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला नाहीं. परंतु सभेस अटक होणार ही बातमी आधीं एक दोन दिवस दाट पसरली होती व पुढें काय करावें या विवंचनेंत ओकॉनेल हा पडला. वेळ पडल्यास लढण्याची

ज्यांची तयारी अशा लोकांच्या सभेस प्रतिबंध, व तोही बेकायदेशीर प्रतिबंध होण्याची अफवा; व अशीही नुसती अफवा उठल्याबरोबर सभा कशी थांबवावी ? बरें, न थांबवावी तर क्षणोक्षणीं लोकांचा जमाव अधिकाधिक जमत चालला असून सभा होणार या भिस्तीवर तयारीही कडेकोट होत चालली आहे ! परंतु प्रत्यक्ष जाहीरनामा प्रसिद्ध होईपर्यंत काम आहे तसेंच चालू ठेवावें असा निश्चय करून सभेच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं रिपीलच्या कचेरीच्या खलबतखान्यांत ओकॉनेल व सभेची चालक मंडळी चिंतेनें व गंभीरपणानें वाटाघाट करीत बसली होती. इतक्यांत एकजण हातांत एक अर्धवट ओला व नुकताच छापलेला असा कागद घेऊन धांवत धांवत आला, व धापा टाकीत त्यानें तो कागद मंडळीसमोर टेबलावर टाकला व पहातात तो सभाप्रतिबंधाचा जाहीरनामा ! बराच वेळपर्यंत कोणाच्याही तोंडून शब्द निघेना. परंतु तेथें जमलेल्या तरुण मंडळीचे उद्गार लवकरच बाहेर पडूं लागले. सभा भरविलीच पाहिजे मग काय होईल तें होवो असें मत ते प्रतिपादन करूं लागले. तीस वर्षेपर्यंत कायदेशीर चळवळीचा उघडपणें अंगीकार व बेकायदेशीरपणाचा निषेध केलेल्या आणि साठी उलटून सत्तरी जवळ आलेल्या या महानुभव देशभक्ताचें मन या वेळीं विद्युच्चंचल अशा विचारतरंगांनीं भरून गेलें असल्यास नवल नाहीं. परंतु अखेर मनुष्यचरित्रांत अत्यंत दुरतिक्रम ह्मणून प्रसिद्ध असलेला जो स्वभाव त्याचीच सरशी होऊन ओकॉनेल यानें आपली वळलेली मूठ मेजावर आपटून निकाल सांगितला. ‘ सभा बंद झालीच पाहिजे. पुढील गोष्टींचा विचार पुढें ! ’ इतकें बोलून तो कामास लागला. प्रथम दोन मनुष्यें सभेच्या जागीं पाठवून सभेकरितां तयार केलेला जंगी ‘ प्लॅटफॉर्म ’ उखळून टाकण्याचा त्यानें हुकूम केला. व ‘अमुक अमुक कारणाकरितां सभा भरविण्याचें रहित केलें आहे, सबब यापुढें कोणीही सभास्थानीं जाऊं नये व जात असतील अगर गेले असतील त्यांनीं परत फिरावें, अशी चालकांची विनंति आहे ’ अशा आशयाचीं हस्तपत्रकें व मोठमोठ्या जाहिराती छापवून, व जासूदजोड्या रवाना करून मशाली लावून रातोरात क्लॉनटार्फच्या आसपास दहा वीस मैलपर्यंत चवाठ्यावर त्या डकविण्याची त्यानें योजना केली. इकडे अधिकारीवर्गानेंही आपली तयारी कडेकोट ठेविली होती. पोलीस

व लष्करच्या तुकड्या ठिकठिकाणीं उभ्या करून सभास्थानाच्या जवळ एक सबंद पलटण उभें केलें असून, सर्वांस चोवीस तास पुरण्याइतकें अन्न व भरपूर काडतुसें वगैरे वांटण्यांत आलीं होतीं. सभास्थानावर मारा करतां येईल अशा ठिकाणीं दोन तीन तोफाही आणवून, घोडे सोडून ठेवून दिल्या होत्या. परंतु या सर्व तयारीचा उपयोग होण्याचें कारण पडलें नाहीं. सभेचा बेत चालकांनीं रहित केला ही बातमी तारायंत्राप्रमाणें हातोहात तेव्हांच पसरली. यामुळें कांहीं लोक जागच्याजागींच थबकले, कांहीं निम्म्या वाटेवरून परतले व कांहीं सभास्थानापर्यंत जाऊन जागेस पाय लावून सभा होत नाहीं ह्मणून निराशेनें खिन्न होऊन परत आले. अशा रीतीनें एका टीचभर कागदानें चालत्या बोलत्या अशा लाखों लोकांच्या उत्साहाचा समुद्र शोषून टाकिला !

ओकॉनेल ह्यानें केलेली गोष्ट वाजवी अगर गैरवाजवी याचा निर्णय आज करणें फारसें कठिण नाहीं; परंतु सभाबंदीनंतर प्रथम प्रथम कांहीं दिवसपर्यंत या बाबतींत मतभेदाचीं रणें पडावीं, व साधकबाधक विचारांचा पाऊस पडावा हे स्वाभाविकच आहे. ‘ रिपील ’ सभेंतील तरुण मंडळीस ओकॉनेलचा विचार अर्थातच पसंत पडण्यासारखा नव्हता. ते म्हणूं लागले कीं, ‘या लाखों लोकांच्या जंगी जाहीर सभा भरविण्यांत अर्थातच कांहीं तरी हेतु होता; ती कांहीं निव्वळ गंमत ह्मणून केलेली नव्हती किंवा तो खेळ खेळावयाचा नव्हता. सभा भरविणें हें कायदेशीर असलें तर प्रतिबंध करणें हें बेकायदेशीर असलेंच पाहिजे. निदान आज इतके महिने चाललेल्या सभा कायदेशीर असतां आजच एकाएकीं त्या बेकायदेशीर कशा झाल्या ? सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं, सभा कायदेशीर असोत, अगर बेकायदेशीर असोत, राष्ट्रानें अंगीकृत केलेल्या रिपीलच्या चळवळीचें जर सभा हें एक मुख्य अंग आहे तर तें केवळ अधिकाऱ्यांना पसंत नाहीं एवढ्याकरितां छाटून टाकावें कीं काय ? प्रतिबंधाचा जाहीरनामा लाविला असतांही सभा भरविली तर कोणाचें करणें अन्यायाचें अगर बेकायदेशीर हें ठरविण्यास संधि तरी मिळेल; पण ती नच भरविली तर जाहिरनामा बेकायदेशीर होता असा दावा मांडण्यास फिर्यादीस कारण कसें घडणार ? अधि-

कार्यांनीं लष्करी सामर्थ्याच्या जोरावर सभा उधळून टाकिली असती हें खरें आहे; परंतु पूर्वीच्या धोरणाप्रमाणें पाहिलें तर निदान तेथपर्यंत तरी मजल येऊं देणें जरूर होतें. त्याच्यापूर्वीच मोहरा फिरविण्यांत कमीपणा येणारा होता, व शेवटीं गोष्ट हातघाईवर येतीच तर प्रजापक्षाकडे लाखों लोक असल्यामुळें फार तर कांहीं बळी पडते; परंतु अखेर संख्याबलाचाच विजय होऊन हत्यारांचें कांहीं चालूं नये असा प्रकारही संभवनीय होता. रक्तपात होऊं नये हें उत्तम; परंतु एवढी मोठी व इतक्या थराला आलेली राष्ट्रकार्याची चळवळ केवळ रक्तपाताच्या भीतीनें टीचभर जाहीरनाम्याच्या बुजगावण्यास भिऊन खड्ड्यांत लोटून द्यावी, हें शहाणपण कोठचें ? अशा अर्धवटपणानें कोणत्याही चळवळीपासून राष्ट्रकार्याची मजल पुढें जाण्याच्या ऐवजीं मागेंच येतें ! ' ओकॉनेल यानें लोकांच्या चित्तक्षोभाची तार ज्या रीतीनें हळू हळू चढवीत नेली होती, त्या रीती-वरून विचार करतां त्याच्या तरुण आक्षेपकांचें ह्मणणें थोडेंबहुत सयुक्ति-कही होतें. ही तार चढवितांना शेवट मजल कदाचित् कोठवर जाईल याचा अजमास ओकॉनेल यानें आपल्या मनाशीं केला नसेल असें नाहीं. परंतु त्यानें केलेला अजमास मात्र चुकला यांत शंका नाहीं. त्याच्या बोल-ण्यावरून व आवेशावरून त्याच्या अनुयायांनीं केलेलाच अजमास अधिक बरोबर होता, व ते अनुयायी स्वतः जें बोलत व प्रतिपादन करीत त्याप्र-माणें काय वाटेल तें झालें तरी आचरण करण्यास ते तयार होते. अशा रीतीनें एका बाजूस प्रामाणिक, सुसंगत परंतु अननुभविक असें तरुणपिढीचें मत, व दुसरे बाजूस अनुभवानें व कायद्याच्या शिक्षणामुळें हवें तें मत हवें तेव्हां, हवें तसें सजवून सयुक्तिक भासविण्याचें सामर्थ्य अंगीं येण्याइतक्या कसलेल्या तीव्र बुद्धीच्या त्यांच्या पुढाऱ्यांचें मत—असा हा मोठा कठिण व दुर्धर असा विरोध उत्पन्न झाला. या विरोधाच्या तीक्ष्ण धारेमुळें क्लॉनटार्फच्या सभेच्या तारखेचे सुमारास लोकमता-च्या तंतूची जी भरीव व पीळदार अशी रेशमी दोरी वळून गेली होती तिचे दोन तुकडे झाले. ओकॉनेलच्या तरुण अनुयायांस सभा बंद झा-ल्याचें वाईट वाटलें, परंतु आपल्या जबाबदारीवर फिरून त्यांनीं सभा भर-विल्यास फिरून लोक येतील असें राष्ट्रांत त्यांचें वजन नव्हतें. राष्ट्राला

पुष्कळ दिवस काम केलेला मनुष्य माहीत असतो व त्याचे धोरणावर त्यांचा विश्वास रहातो. प्रसंगविशेषीं त्याच्याही धोरणांत चूक होऊन त्याशीं विरोध करणाऱ्या एखाद्या तरुण मनुष्याचें धोरण अधिक बरोबर ठरण्याचा संभव असतो. परंतु खऱ्याखोट्याचा व युक्तायुक्ताचा असा सूक्ष्म भेद करून पूर्वी मळलेलें वळण एका क्षणांत बदलून अननुभविक तरुणांस आपले पुढारी करण्यास समाज कधींही कबूल होत नाहीं. यामुळें या प्रसंगीं सभेच्या चालकांपैकीं तरतरीत मंडळीचें मत जरी ओकॉनेल याच्या मताविरुद्ध होतें, तथापि त्याच्या मताप्रमाणेंच निर्णय ठरून सभा मोडली.

परंतु झालेल्या गोष्टीचें ओकॉनेल यासही वाईट वाटलें. अधिकाऱ्यांचा टीचभर जाहीरनामा व लोकमताचा समुद्र यांच्या प्रत्यक्ष बलाबलासंबंधानें जो एका क्षणांत त्याला अनुभव आला त्याचें अंजन डोळ्यांत पडून त्याची अंतर्दृष्टि साफ झाली. परंतु त्या दृष्टीनें त्याला स्वतःचा झालेला अपमान दिसूं लागला. व तो अपमान त्याच्या मनांत खुपूंही लागला. गेली बाजू पुन्हां सांवरावी याविषयीं त्यानें अत्यंत परिश्रम चालविले. झाला प्रकार हा कांहींच लक्षांत घेण्यासारखा नाहीं असें आपलें मत आहे असें सफाईनें लोकांस भासवून त्यानें दर आठवड्यास होणाऱ्या ‘ रिपील ’ सभेच्या बैठकीस सुरुवात केली. परंतु ‘ बुंदसे गयी हौदसे आती नहीं ’ या म्हणीप्रमाणें त्याच्या उद्योगाचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. एक मोठी सभा भरूं देत नाहींत असें पाहून पुष्कळ ठिकाणीं एकदम लहान सभा भरण्याची युक्ति त्यानें काढली. परंतु त्या फुटकळ सभांसही जोर येईना. कर्तासवरता वीस वर्षांचा तरुण मुलगा हवा अशी इच्छा असणाऱ्या बापास वीस वर्षांचे एका मुलग्याऐवजीं दोन मुलगे दहा दहा वर्षांचे घेऊन चालीव असें म्हटलें तर त्याचें समाधान कसें होणार ? तात्पर्य, उडालेली छाप बसण्याकरितां ओकॉनेलनें पुष्कळ खटपट केली, परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

इकडे ओकॉनेल लोकांचे मनांतून उतरला असें पाहून त्याचा फायदा घ्यावा व त्याला तुरुंगांत पोंचवावें म्हणजे त्यास व इतर लोकांस चांगलाच वचक बसेल अशा हेतूनें त्याजवर खटला करण्याची अधिकाऱ्यांनीं तयारी केली. ता. १४ ऑक्टोबर १८४३ रोजीं ओकॉनेल यास

वॉरंटानें पकडून त्याचा जामीन घेण्यांत आला. त्याजबरोबर त्याचा मुलगा जॉन, त्याचे दोन तीन मदतगार, नेशन पत्राची मंडळी, वगैरे इतर आठ मंडळीवरही खटला करण्यांत आला. ‘ ग्रॅन्ड ज्यूरी ’ कडून खटला ‘ सेशन्स कमिट ’ झाल्यावर ता. १५ जानेवारी १८४४ रोजीं तीन जज्ज व बारा ज्यूरर य.च्यासमोर खटल्यास सुरुवात झाली. व तीन आठवडेपर्यंत खटल्याचें काम सुरू होतें. निरनिराळ्या आरोपींवर एकंदर ४३ कृत्यें मिळून अकरा गुन्हे केल्याचे आरोप ठेवण्यांत आले, व सर्वांस एका माळेंत गोंवून एकत्र चौकशी व्हावी म्हणून, सरकारास दहशत घालण्याचा कट केल्याचा आरोप सर्वांस लागू केला होता. आरोप ठेवण्याचा कागद (चार्ज–शीट) हाच कित्येक यार्ड लांब होता. उभय पक्षांकडून प्रसिद्ध प्रसिद्ध असे बॅरिस्टर देण्यांत आले होते. सरकारी वकिलानें सुरुवातीचें भाषण करण्यास दोन दिवस घेतले. पुराव्याचें काम सात दिवस जहालें. डिफेन्सतर्फे भाषणास सात दिवस लागले. व सरकारी वकिलानें उत्तरादाखल केलेल्या भाषणास तीन दिवस घेतले. अखेरच्या दिवशीं ज्यूरीला खटला समजावून देतांना फार उशीर झाला व ज्यूरीचा निर्णय होण्यास रात्रीं बारा वाजले ! तोंपर्यंत कोर्टांतील एकही माणूस हालला नाहीं. ज्यूरी आपलें मत बनवून आली, परंत ९ आरोपी, ११ गुन्हे व ४३ कृत्यें इतक्यांचा मेळ ज्यूरीस बसवितां येईना. कोणी ह्मणे रात्र झाली आतां खटला तहकूब करा, कोणी ह्मणे खटला तहकूब करणें बेकायदेशीर होईल; कोणी ह्मणे ज्यूरीला कोंडून ठेवा. शेवटीं खटला तहकूब करून ज्यूरीस घरीं जाण्यास परवानगी मिळाली. पुढच्या तारखेस ज्यूरीनें सर्वांवर आरोप शाबीद असा निकाल दिला. परंतु शिक्षा सांगण्याचें काम न्यायाधिशानीं लांबणीवर टाकलें, व जामिनावर असलेले आरोपी आपापल्या घरीं गेले. खटल्याचे अखेरीचे दिवशीं ज्यूरीचा अभिप्राय ऐकून त्याची बातमी लंदनला नेण्याकरितां ‘ किंग्स टाऊन ’ बंदरांत स्पेशल आगबोट तयार होतीच, तिनें ताबडतोब ज्यूरीच्या अभिप्रायाची बातमी लंदनला पोंचाविली; व दुसरे दिवशीं ती लंदन टाइम्समध्यें प्रसिद्ध झाली.

ज्यूरीचा अभिप्राय व निकाल यांजमध्यें बरेच महिने गेले. त्या अवधींत ओकॉनेलनें ‘ रिपील ’ सभेच्या बैठकी ठराविक रीतीप्रमाणें भर-

विण्याचें काम सुरू केलें. खटल्यासंबंधानें या बैठकींतून बराच वादविवाद झाला, व वर्तमानपत्रकार सभेचे सभासद असतां वाटेल तें आपल्या वर्तमानपत्रांत लिहितात व त्याचा परिणाम सभेला भोगावा लागतो अशी ओकॉनेलनें तक्रार केली. त्यावरून भांडण होऊन नेशन पत्राच्या व इतर वर्तमानपत्रांशीं संबंध असलेल्या सभासदांनीं सभासदांच्या जागांचे राजीनामे दिले. तसेंच, यापुढें सभा व खासगी लवाद कोर्टें यांचाही संबंध ठेऊं नये असें ठरविण्यांत आलें. तेव्हां लवाद कोर्टें वेगळीं केलीं. परंतु 'रिपील' सभेच्या लोकप्रियतेवर सदर कोर्टांचीही लोकप्रियता अवलंबून असल्यामुळें वर वर्णिलेल्या घटस्फोटानें या कोर्टांचा मुख्य आधार जाऊन तीं मोडलीं. अशा रीतीनें सभेची वाताहात होण्यास सुरुवात झाली. नंतर ओकॉनेल हा इंग्लंदास गेला. तेथें त्यास मेजवान्या वगैरे देण्यांत आल्या. तो तेथें असतां एक मुद्दा इंग्लंदांत विशेष चर्चेस निघाला. खटल्यांत सरकारानें एकंदरीनें जी गैरवर्तणूक केली ती इंग्लंदांतील न्यायप्रिय मनुष्यांस पसंत पडली नाहीं. मुख्यतः ज्यूरीची याद तयार करतांना शेरिफच्या 'ऑफिसां'त जो दगलबाजपणा झाला त्याची तर त्यांस चीडच आली. ज्यूरर लोकांची याद तयार होतांना शेंकडों मनुष्यांचीं नांवें त्यांतून मुद्दाम गाळण्यांत आलीं होतीं. व त्यामुळें सर्व बाराचे बारा ज्यूरर लोक प्रॉटेस्टंटच निवडून आले. हे लोक धर्मदृष्ट्या ओकॉनेलचे प्रतिपक्षी असल्यामुळें त्यांनीं निःपक्षपातीपणानें निकाल देणें शक्य नव्हतें, व ह्मणून या खटल्यांत न्यायाचा खून झाला, असें ते उघड ह्मणूं लागले! झालेल्या खटल्याचें काम रद्द होऊन फिरून नवीन काम चालावें असाही कोणीं मुद्दा काढला. परंतु अखेर त्या प्रकारची विशेष कांहीं खटपट न होतां ठराविक तारखेस कोर्टापुढें आरोपीस आणून कोर्टानें शिक्षा सांगितली. शिक्षा सांगण्याचें काम बर्टन नांवाच्या जज्जाकडे आलें. बर्टन हा ओकॉनेलच्यापुढें पोर शोभेल असा होता. शिवाय तो पूर्वीं बॅरिस्टर असल्यानें केव्हां ओकॉनेलच्या बाजूस त्यानें मदत केलेली व केव्हां प्रतिपक्षी होऊन त्याजबरोबर दोन हात केलेले असा त्यांचा पूर्वींचा संबंध असल्यामुळें, बर्टन यास शिक्षा सांगतांना गळा भरून रडूं आलें. शिक्षा सांगतांच ओकॉनेल हा उठून उभा राहिला, व त्यानें दोन तीन वाक्यांचें लहानसें

भाषण करून असें सांगितलें कीं, ' कोर्टानें निकाल दिल्यावर न्यायमूर्तीस उत्तर द्यावें अगर निकालावर टीका करावी असा माझा हेतु नाहीं; परंतु झाला हा न्याय झाला नाहीं एवढें मात्र सांगणें जरूर आहे व मी तें उघडपणें सांगतों. '

ओकॉनेल यास एक वर्ष साधी कैद, दोन हजार पौंड दंड व पांच हजार पौंडांचा पांच वर्षें चांगल्या वर्तणुकीबद्दल जामीन अशी शिक्षा फर्मावण्यांत आली. इतर आरोपींस नऊ नऊ महिने शिक्षा झाल्या. ओकॉनेल यांस शिक्षा होतांच अधिकाऱ्यांना आपणास काय हवें होतें तें मिळालें असें वाटलें, व त्यांचें समाधान होऊन पुढील क्रमांत मात्र ओकॉनेल यास त्रास द्यावयाचा नाहीं असें त्यांनीं ठरविलें. सर्व आयर्लंडांतील वाटेल तो तुरुंग तुम्ही पाहून पसंत करा असें त्यास खासगी रीतीनें सांगण्यांत आलें. व त्याप्रमाणें त्याच्या स्नेह्यांनीं रिचमंड येथील तुरुंग पसंत केला. याचें कारण असें होतें कीं, रिचमंडच्या तुरुंगाची व्यवस्था दब्लिन येथील म्युनिसिपालिटीकडे व तिच्या पैशांतुन होत असे. व ओकॉनेल हा दब्लिन म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष ऊर्फ लॉर्ड मेयर असल्यानें या तुरुंगांत त्याची व्यवस्था उत्तम राहील हें सांगावयास नकोच होतें. खटला चालू असतां ओकॉनेल हा लॉर्ड मेयरच्या रथांत बसून मागेंपुढें म्युनिसिपालिटीचे पट्टेवाले घेऊन दणदणत कोर्टांत येत असे. व शिक्षा झाल्यावरही तो तसाच तुरुंगांत गेला. त्याजबरोबरच्या इतर कैद्यांसही त्याच्याचबरोबर रिचमंड तुरुंगांत ठेविलें होतें. ओकॉनेल तुरुंगांत जाण्याचे सुमारास तुरुंगाचे कचेरींत ' व्हिजिटर ' लोकांची सभा अनायासेंच भरली होती, तेव्हां त्यांनीं ओकॉनेल यास अर्थातच सभेंत बोलाविलें. तो येतांच उठून त्यांनीं त्याचा सत्कार केला. तुरुंगांत जी कोणती सोईची व चांगली जागा असेल ती त्यास द्यावी असें ठरविलें. व जेलर यासच त्याचे बंगल्यांतून दुसरीकडे घालवून जेलरचा बंगला ओकॉनेल व त्याचे लोक यांचे स्वाधीन करण्यांत आला. मग या ठिकाणीं त्यांचा ऐटदार संसार थाटला. या राजमान्य कैद्यांस बाहेरून सर्व खाना उत्तम प्रतीचा तयार होऊन येत असे. चहा, फराळ, फळफळावळ यांची नित्य चंगाळी उडे. ओकॉनेलकडून ' मी पळून जाणार नाहीं, व मला दिलेल्या सवलतीचा दुरुपयोग कर-

णार नाहीं,' असें वचन तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं घेतल्यावर सर्व तुरुंगाचे आवारांत त्यास अनिरुद्धपणें संचार करण्यास मोकळीक मिळाली. तुरुंगांतील बाग त्यास व्यायाम घेण्याकरितां व करमणूक करण्याकरितां बहाल करण्यांत आला होता. व तेथें तो आपलीं नातवंडें घेऊन फुलांच्या ताटव्यांत खेळत बसे. त्यास भेटण्याकरितां नित्य लोकांची गर्दी जमे, व त्याच्या भेटी करविणें हेंच तुरुंगावरील अधिकाऱ्यांचें मुख्य काम होऊन बसलें होतें. बागेंत बसून तो टपाल वगैरे वाची आणि भेटण्यास आलेल्या लोकांच्या गांठी घेई, व त्यांस चहापार्ट्या करी. रोज नवा धर्मोपदेशक येऊन त्याची सकाळ संध्याकाळची धर्मोपासना चालवी. व मी आधीं, मी आधीं, अशी या कामास जाण्यासंबंधानें धर्मोपदेशक मंडळांत अहमहमिका सुरू झाली होती. तुरुंगांतल्या अधिकाऱ्यांनीं नाहीं म्हणावयाला एका गोष्टीस हरकत घेतली. कॉर्क, वॉटरफर्ड, लिमरिक, किलकेनी वगैरे शहरांच्या म्युनिसिपालिट्यांनीं ओकॉनेल यास मानपत्रें देण्याचें ठरवून तीं सुंदर करंड्यांत घालून सभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे हातीं त्यास तुरुंगांत सादर करण्यास पाठविलीं होतीं. परंतु तुरुंगांतील कैद्यांस मानपत्रें घेऊं देणें म्हणजे तुरुंगवासाची अगदीं उघड थट्टा केल्यासारखीच होईल या हेतूनें अधिकाऱ्यांनीं हे मानपत्रसमर्पणाचे समारंभ करूं दिले नाहींत. ओकॉनेलबरोबरच्या इतर कैद्यांसही सर्व तऱ्हेची सवलत देण्यांत आलेली होती. त्यामध्यें वर्तमानपत्राच्या धंद्यांतले बरेच लोक असल्यामुळें, त्यांनीं तुरुंगांतल्या तुरुंगांत 'जेलखाना–गॅझेट' नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें. जाहीरसभांवांचून त्यांस चैन पडण्यासारखें नसल्यानें बागेंतल्या एका उंचवट्यास 'तारागड' हें नांव देऊन फावल्यावेळीं त्यावर एकानें उभें राहून बोलावें, व इतरांनीं खालीं उभें राहून तें भाषण ऐकावें असा क्रम त्यांनीं चालवून दुधाची हौस कशी तरी ताकावर भागवून घेतली ! या सर्व सरदारी कैद्यांवर बाहेरून चहात्या भक्तांकडून व मित्रांकडून भेटींचा व देणग्यांचा वर्षाव होत असे. एका संगीतप्रिय मनुष्यानें, तुरुंगांतल्या या आपल्या मित्रांचा आत्मा गायनवादनाच्या ओलाव्याविणें सुकून जाईल असें समजून, प्रत्येकीं एक एक अशी हार्मोनिअमची पेटी नजर पाठविली. इतक्या विचारानें व

प्रेमानें पाठविलेल्या भेटींचा सत्कार तसाच होणें जरूर होतें. या हार्मो-नियमच्या पेट्या तुरुंगांत जाऊन पोंचतांच त्या नऊही पेट्या त्यांनीं एक-दम उघडून वाजविण्यास सुरुवात केली. व आपल्या बंदी जनांच्या आपत्तीची ही सुरेल वार्ता कानीं पडतांच हा काय प्रकार आहे ह्मणून तुरुंगाचे अधिकारी पहावयास धांवून आले !

ओकॉनेल वगैरे कैदी तुरुंगांत असतां त्यांचें अपील इंग्लंदांतील अपील-कोर्टाकडे दाखल करण्यांत आलें होतें. वरिष्ठ कोर्टाच्या वकिलांनीं मुद्दे काढण्याची शर्थ केली. चार्जच्या प्रत्येक वाक्यागणीक एक एक मुद्दा निघाला होता म्हटलें तरी चालेल. ज्यूरीचे बाबतींत झालेल्या अन्या-याचा डंका सर्व इंग्लंदभर आगाऊच वाजला होता. शिवाय ' रिपील ' सभेचें काम थांबल्यामुळें राजकारणसंबंधीं पूर्वीची भीति प्रधानमंडळास उरली नव्हती. यामुळें आरोपीस अपिलाचें काम सोपें झालें. लॉर्ड लो-कांत मतभेद झाला व खालील कोर्टाची शिक्षा ज्या ज्यूरीचे निकालावर अवलंबून होती ती ज्यूरीच मुळीं गैरवाजवी रीतीनें निवडली गेली होती सबब शिक्षा रद्द असें अखेर मत ठरून त्याप्रमाणें निकाल सांगण्यांत आला. अपीलकोर्टाचा निकाल आयर्लंदांतील लोकांस लवकर कळवि-ण्यांत यावा याकरितां बंदरांत स्पेशल बोट ठेविली होती. तिजमध्यें ओ-कॉनेलचा सॉलिसिटर क्षणाचाही विलंब न करतां उडी मारून बसला व बोट चालू झाली. जातां जातां त्यांनीं बोटीवर निशाण चढविलें व ' ओ-कॉनेल दोषमुक्त झाला ' अशीं अक्षरें कातरून त्या फडफडणाऱ्या निशा-णावर लाविलीं. दब्लिन येथें पोंचतांच तो सॉलिसिटर धांवत धांवत तुरुंगांत गेला व ओकॉनेल व इतर मंडळी भोजनास बसली होती त्यांस पाहून ' दोषमुक्त ' अशीं अक्षरें त्यानें दुरूनच ओरडून उच्चारलीं. त्याच रात्रीं कैद्यांची बंधमुक्तता झाली. परंतु समारंभाकरितां फिरून त्यांस तुरुं-गाकडे नेऊन त्यांची मिरवणूक तेथून काढून गांवभर मिरविण्यांत आली ! ओकॉनेलच्या उघड्या गाडीवर, जुनीं आयरिश राष्ट्रीय गीतें व पवाडे ह्मण-णारा एक गवई व सारंग्या बसविलेला असून, मागें पुढें दब्लिनमधील छप्पन्न धंद्यांचे लोक चालत होते, व ओकॉनेलच्या जयजयकाराबरोबरच ब्रिटिश न्यायदेवतेच्या जयजयकाराचा प्रचंड ध्वनि, आपण काय करता

याचा विसर पडूनच कीं काय, त्या मिरवणुकींत हजारों लोकांच्या तोंडांतून बाहेर पडत होता. अशा रीतीनें तो आनंदाचा दिवस ओकॉनेलच्या भक्तांनीं उत्साहपूर्वक साजरा केला. परंतु या उत्साहाचा शीण उतरतांच दुसरे दिवसापासून, त्यांस क्लॉनटार्फच्या सभेची आठवण होऊं लागली. व सभाबंदीच्या जाहीरनाम्याच्या एका पुर्ज्यानें ओकॉनेल व रिपील यांच्या अवतारसमाप्तीचें जें थोडेंबहुत काम खटल्याच्या धामधुमीच्या दिवसांत शिल्लक ठेवलें होतें, तें ब्रिटिश न्यायदेवतेचा जयजयकार व धन्यवाद यांनीं पुरें करून टाकलें. इंग्लंडांतील अपीलकोर्टानें न्याय केला, परंतु त्या दिवसापासून ओकॉनेल हा जगांत आहे व नाहीं सारखाच झाला. रिपील सभेचा नाश होण्यास इतरही कित्येक, परंतु याहून अधिक चमत्कारिक कारणांची मदत झाली. मुख्य प्रधान पील यानें जमिनीसंबंधाचें बिल पुढें आणून जमीनदार व कुळें यांमध्यें विरोध उत्पन्न केला. क्याथोलिक लोकांच्या संस्थांस मदत करण्याकरितां एक लक्ष पौंड देऊं केले यामुळें क्याथोलिक लोकांच्या तोंडास पाणी सुटलें. व हातचें सोडून पळत्याचे पाठीमागें लागण्यांत फायदा नाहीं असें त्यांस वाटूं लागलें. आयरिश कॉलेजांसंबंधानें बिल पुढें आलें. त्याबद्दल ओकॉनेल व नेशनपत्राची संपादक मंडळी यांजमध्यें धार्मिक कोण व अधार्मिक कोण हाच वाद माजून शिक्षणाचा प्रश्न बाजूस पडला. व ओकॉनेल हा धर्मवेडा असून म्हातारपणीं आतां त्यास क्याथोलिक लोकांचें वर्चस्व स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली असें त्याचे प्रॉटेस्टंट प्रतिपक्षी त्याचेवर आरोप करूं लागले. इंग्लिश पार्लमेंटमधील लिबरल पक्षास आयरिश सभासदांनीं मिळावें कीं नाहीं याबद्दलचा जुना वाद पुन्हां सुरू झाला. परंतु इतकें होऊनही जो कांहीं थोडाबहुत मेळ रिपील सभेंत राहिला होता तो ओकॉनेलचा मुलगा जॉन यानें आपल्या मूर्खपणानें नाहींसा करून टाकिला. त्यानें ‘ रिपील ’ सभा सोंवळी करण्याचें हेतूनें नवीन एक शपथ तयार केली व ‘ मी कधींही सनदशीरपणा सोडून कोणतीही चळवळ करणार नाहीं ’ अशी शपथ प्रत्येक सभासदानें घेतली पाहिजे असा ठराव तिजकडून पास करून घेतला. या शपथेमुळें सभेंतून बरीच मंडळी निघून गेली व सभा मोडली. याच सुमारास बटाट्याचे पिकाबर

ळीत बसण्यापेक्षां गुणच घ्यावे अशा प्रकारचा तो मनुष्य होता यांत शंका नाहीं. चरित्रक्रमास सुरुवात होण्याचे वेळीं तो दरिद्री नव्हता; साधारण संपन्नच होता ह्मटलें तरी चालेल. त्याच्या एक दोन चुलत्यांकडून त्यास बरीच इस्टेट मिळाली होती. पुढें पुढें त्यास वकिलीचे धंद्यांतही चांगलेच पैसे मिळूं लागले. ह्मातारपणीं तो बेताचे खटले व पुष्कळ फी घेत असे. परंतु जशी जमा तसाच त्याचा खर्च असे. त्याची राहण्याची पद्धति थाटदार असे. पहिल्यापासून त्यानें घरची गाडी ठेविलेली असून उत्तम पोषाख करून ही स्वारी तींतून दब्लिनचे राजरस्त्यानें हिंडावयास निघाली कीं, ‘ वकीलसाहेबांची स्वारी निघाली ’ असें ह्मणून लोक त्याजकडे आदरानें एकमेकांस बोटें दाखवीत. त्याच्या घरचा खर्च फारच मोठा असे. दब्लिनमध्यें एक, लंडन येथें एक व खेड्यास एक अशीं त्याचीं तीन घरें व तीन संसार असत. घरची मंडळीही पुष्कळ. चार मुलगे व तीन मुली अशीं त्याचीं स्वतःचीं मुलें होतीं. शिवाय मामे, काके सुमारें पंचवीस होते व लग्न झालेल्या बहिणी सात असा हा मोठाच प्रपंच होता. सकाळ संध्याकाळ घरचा बाहेरचा, आला गेला, मिळून सुमारें तीस पानें भोजनास बसत. पैशाचे कामांत ओकॉनेल हा दक्ष नसे. तो खर्चिक तर खराच, पण हिशेबीही नव्हता. त्यास कर्जवाम नाहीं असें बहुधा झालें नाहीं, ह्यामुळें व हिशेबठिशेब असावे तितके चोख नसत यामुळें त्याजवर लोक तो सार्वजनिक पैशांतील पैसा खातो असा आरोप केव्हां केव्हां करीत. व कांहीं कांहीं गोष्टी त्यांनीं असा आरोप केला असतां सकृद्दर्शनीं शोभतील अशाच होत्या. उदाहरणार्थ, तो रिपील सभेची वर्गणी व इतर पैसे आपल्या नांवें आपल्या बँकेंत ठेवी व त्यांतून सभेचा खर्च आपल्या मनाला येईल तसा करी. सभेच्या जमाखर्चाचे हिशेब तो वेळच्या वेळीं प्रसिद्ध करीत नसे, याबद्दल सभेचे लोक त्याजवर नाखुष असत. पार्लमेंटच्या निवडणुकी करविणें पुष्कळ वेळां त्याचे हातीं असे, व उमेदवारांस मदत करून त्यांजकडून तो पैसे घेतो असाही एक वेळ त्याजवर आरोप आला होता. दुसरी एक गोष्ट त्याच्यासंबंधानें कित्येकांस गौण अशी वाटत असे, ती ही कीं, आपल्याकरितां साल दरसाल लोकांकडून वर्गणी जमवून तिचा तो स्वीकार करीत असे. तिला ‘ ओकॉनेलची वर्गणी ’ असें ह्मणत. साल दर-

साल त्याच्या चहात्या भक्तांपैकीं कोणी तरी पुढाकार घेऊन ही वर्गणी वसूल करण्याची खटपट करी. वर्गणीची वेळ आली कीं, एखाद्या उत्तम लेखकास पैसे देऊन त्याजकडून ओकॉनेलच्या स्तुतीनें भरलेला असा उत्तम लेख तयार करून वांटावयाचा व मग वर्गणी गोळा करण्यास निघावयाचें असा परिपाठ असे. या वार्षिक वर्गणीचे दरसाल सुमारें पंधरा हजार पौंड जमत. त्यांतील खर्चवेंचाचे सुमारें पांच हजार पौंड वजा जाऊन त्यास दहाएक हजार पौंड सालीना रहात. या गोष्टीस अनुलक्षून त्याच्या प्रतिपक्षीयांनीं ओकॉनेल याचें नांव 'बडा भिकारी' असें ठेविलें होतें. अशा तऱ्हेनें सालोसाल लोकांकडून आपल्या नांवानें वर्गणी जमवून त्या पैशाचा उपयोग आपल्या प्रपंचाकडे करणें हें फारसें शिष्टसंमत होईल असें आह्मांस वाटत नाहीं; व या गोष्टीमुळें ओकॉनेलविषयीं त्याच्या स्वतःच्या व विरुद्ध पक्षांतील, विशेषतः इंग्लंदांतील, लोकांचे मनांत त्याजविषयींच्या मान्यतेस कमीपणा आलेला होता. क्याथोलिक लोकांस पूर्ण स्वातंत्र्य मिळाल्यावर ओकॉनेल यानें परकार्यांत पांचपंचवीस वर्षें देह झिजवून अत्यंत मेहनत घेतली या त्याच्या उपकारऋणाचें थोडेंबहुत तरी उतराई व्हावें या हेतूनें क्याथोलिक लोकांनीं पन्नास हजार पौंड वर्गणी जमवून ती रक्कम पूर्वींच त्यास नजर केली होती. परंतु त्याबद्दल कोणी आक्षेप घेत नसे. कारण विशेष कामगिरीकरितां विशेष बक्षीस देण्याची रीत सर्वत्रच आहे. निरनिराळ्या देशांतूनही अशा प्रकारच्या देणग्या दिल्या घेतल्याचीं अनेक उदाहरणें सांपडतात. सार्वजनिक काम करण्यास ज्यानें खरोखर आपला सर्व काळ वाहिलेला आहे, व खासगी प्रपंचाची चिंता ज्याचे मागें राहिली असतां त्यांत एकंदरीनें त्या व्यक्तीपेक्षां समाजाचेंच अधिक नुकसान आहे, अशा व्यक्तीच्या निर्वाहाची सोय परस्पर करून, पोट भरण्यापेक्षां अधिक महत्त्वाचें काम करण्यास त्याचे हात मोकळे ठेवणें या व्यवस्थेंत फारसें नांव ठेवण्यासारखें कांहीं नाहीं. कोणावरही एक पैसा भार न घालतां स्वकष्टानें चरितार्थ चालवून वरतीं लोकसेवा साधणें हा अर्थातच उत्तमपक्ष. याच्या खालोखालची पायरी ह्मटली ह्मणजे लोकांनीं आपल्या चरितार्थाची योजना करावी व केवळ निर्वाहास अवश्य ह्मणून हा मोबदला स्वीकारून त्यांची सेवा सर्व वेळ व सर्व शक्ति खर्चून करणें ही होय. अशा प्रकारचीं उदा-

हरणें खुद्द आयर्लंदांतच ओकॉनेलच्या पूर्वी व नंतर घडून आलेलीं होतीं. सुप्रसिद्ध आयरिश देशभक्त ग्रॅटन यास व पुढें पार्नेल यास त्यांच्या कामगिरीबद्दल अशीच पन्नास व तीस हजार पौंडांची देणगी सार्वजनिक पैशांतून देण्यांत आलेली होती. परंतु ती घेतल्यावर पुढें ग्रॅटन हा बॅरिस्टरी वगैरे करून पैसे मिळविण्याचे आशेस गुंतला नाहीं. ओकॉनेल याची गोष्ट वेगळ्या प्रकारची होती. एकदम मिळालेली पन्नास हजार पौंडांची देणगी तर त्यानें घेतलीच; परंतु वर सांगितल्याप्रमाणें सालोसाल उभारलेली वर्गणीही तो निःशंकपणें घेत असे. व इतक्यानेंही तृप्ति न होतां वकिलीचा धंदाही त्यानें चालू ठेविला होताच. या सर्व गोष्टींचा मेळ उत्तम रीतीनें बसण्यासारखा नसल्यामुळें कांहीं कांहीं लोक त्यास सहजच नांवें ठेवीत. आतां दुसऱ्या बाजूस एकच गोष्ट जमेस धरण्यासारखी आहे; व ती ही कीं, ओकॉनेल यास तीस पसतीस वर्षेंपर्यंत त्यानें अंगीकारलेलें हें सार्वजनिक काम पुढारीपणा घेऊन करावें लागलें. कर्तृत्ववान् आणि हौशी अशा पुढाऱ्यास आपल्या कामांत पैसा पाण्यासारखा खर्च करावा लागतो, व कित्येक वेळां तर पैशाचा हात आखडून धरला असतां कार्य नासतेंही. ओकॉनेल याचा स्वभाव हिशेबी नव्हता, एवढी त्याच्या स्वभावासंबंधानें मुख्य अशी गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे तो ' रिपील ' सभेचे पैसे पेढीवर आपल्या नांवानें कां जमा करीत असे, वेळच्यावेळीं हिशेब कां प्रसिद्ध होत नसत, व वार्षिक वर्गण्यांचा स्वीकार तो कां करीत असे, या सर्व गोष्टींचा उलगडा बहुधा होण्यासारखा आहे.

ओकॉनेल हा क्याथोलिक पंथाचा होता व खरोखरच त्याचे ठिकाणीं धर्मश्रद्धा होती. तो स्वतः मोठा कर्मठ होता असें नाहीं—परंतु धर्माच्या बाबतींत भाविक होता. धर्मोपदेशक वर्गावर त्याची मनापासून भक्ति असे. मात्र धर्मश्रद्धेचा सामाजिक नीतिमत्तेशीं मेळ ज्यांत नाहीं अशा प्रकारचा मनुष्यस्वभावाचा नमुना अनेक ठिकाणीं दृष्टीस पडतो. व ओकॉनेल याच्या मनाची रचनाही याच नमुन्याबरहुकूम झालेली होती. तरुणपणीं चरित्रक्रमास सुरुवात होण्याच्या वेळीं तो विषयी व चैनी असा होता; व लवकरच सार्वजनिक कामाची हास त्याला न लागती तर मद्यपा-

नाच्या संवयीचा पगडा त्याच्या मनावर बसण्याचा संभव होता. तरुणपणीं स्त्रीमोहाचें फळ ह्मणजे अपत्यही त्यास प्राप्त झालें होतें. परंतु त्या दुर्दैवी अपत्याचा व त्याच्या मातेचा परामर्ष उदारपणानें त्यानें घ्यावयास पाहिजे होता तसा घेतला नाहीं असा त्याजविरुद्ध एक लोकापवाद असे. पैशाचे बाबतींत त्याचें मन नाजूक नसून ढोबळ असे हें वर सांगितलेंच आहे. नीतिदृष्ट्या तिसराही एक दोष त्याजमध्यें असे तो हा कीं, खऱ्याखोट्याची चाड त्याच्या योग्यतेच्या मनुष्यानें जितकी धरावी तितकी त्यास नसे. प्रतिपक्षाशीं वाद करितांना, 'मी त्याजवर दोषारोप करितों ते कदाचित् खोटे असतील' असा संशयही त्यास येत नसे व आला तरी तो मानीत नसे. शिवाय तोंड टाकून बोलणें व शिव्या देणें ही संवय तर अगदीं त्याच्या हाडास खिळलेली होती. रस्त्यांत तोंडाळ बागवानीण अगर घोड्यावर चढलेला मद्यपी यांच्याशीं भांडावयाचें असो, अगर भर पार्लमेंट सभा बसली असतां तिजमध्यें मुख्य प्रधानावर हल्ला करावयाचा असो, त्याची जीभ सारखीच चाले. कोणास काय बोलूं अगर कोणतीं विशेषणें लावूं याचा विचारही त्याचे डोक्यांत येत नसे. मग शब्दाचें औचित्य अथवा सौष्ठव हें साधण्याकडे वेळ खर्च कोण करणार? त्याचें तोंड म्हणजे एक शिव्यांचें मोठें गटारच होतें. त्यांतून वेळीं अवेळीं काय वाहील याचा नेम नसे. अथवा तें तोंड ह्मणजे आतषबाजीचा एक घडाच होता; एकदां आंत ठिणगी पडली ह्मणजे मग घडा फुटून त्यांतून एक-बारीपासून सातबारीपर्यंत किती फटाके किंवा तोटे निघतील याचा नियम नसे. या त्याच्या तोंडाळपणाला प्रतिपक्षी स्वाभाविकपणें थोडेबहुत वच-कत; परंतु त्याच्या शिव्यांमध्यें कायमचा डाग लावण्याची अगर घरें पाड-ण्याची शक्ति असल्यामुळें त्यानें अनेक शत्रू करून घेतले होते; व त्या काळीं द्वंद्वयुद्धाची चाल असल्यामुळें त्याजकडून अपमान पावलेल्या शत्रूंकडून त्यास युद्धाचीं बरींच बोलावणीं आलीं; व तीं नाकारण्याचा निश्चय पहि-ल्यापासून त्यानें केला नसता तर त्याच्या चरित्राची परिसमाप्ति कदाचित् तरुणपणींच झाली असती!

परंतु ओकॉनेलचा एकंदरीनें स्वभाव गोड होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याच्या घटनेमध्यें सत्वगुणापेक्षां रजोगुण व तमोगुण अधिक होता.

तो उत्साही असून लहान मुलांचा साधेपणा व केव्हां केव्हां पोरकटपणाही त्याचे अंगीं दिसून येई. अहंकारानें तो बराच अवलिप्त असे. तथापि किरकोळ बाबतींतील मतभेदाकडे दुर्लक्ष करून कमी दर्जाच्या सहकाऱ्यांस तो होतां होईतों संभाळून घेई. परंतु स्वतंत्रपणें अगर निर्भीडपणें त्याजवर कोणीं टीका केली असतां मग तेथें क्षमा न होतां आगीचा, शिव्यांचा वगैरे वर्षाव होऊन त्याचा छळ करण्यास सुरुवात होई. एरवीं तो गोडीनें वागे.

त्याचा नित्यक्रम ह्मटला म्हणजे पहांटे चार वाजतां उठून आपल्या हातानें विस्तव पेटवून चहा वगैरे घेऊन पांच वाजतां कामास बसावयाचें. दहा वाजण्याचे सुमारास अल्पाहार करून कोर्टांत न्यायाधीश येण्याचे बेताला दोन मैल जलद् चालत जाऊन तो पोहोंचत असे. कोर्टांतील काम आटोपून चार वाजण्याचे सुमारास परत येतां येतां सार्वजनिक कामकाजाच्या कचेरींत जाऊन किरकोळ कामकाज उरकून तो घरीं येई. नंतर तास दोन तास मुलांमाणसांत घालवून फिरून कामकाज पाहून दस घंट्याला आंथरुणांत पडून घोरावयासही लागे. त्याचें तोंड सुंदर असे, परंतु नाक आंखूड असल्यामुळें एकंदरीनें हा मनुष्य बुद्धिवान्, तेजस्वी परंतु थोडासा लफंगा व हलका असा वाटे. तो शरिरानें खूप बळकट असे. त्याची उंची जवळ जवळ सहा फूट असून खांदे पिळदार व छाती भरीव असल्यामुळें त्यास पाहतांच त्याजबद्दल उग्रता व भीति वाटे. तरुणपणीं वकिलीचे कामावर बाहेरगांवीं जावयाचें असल्यास तो घोड्यावरून एका दमानें साठ साठ मैल मजल मारून जाई. अगदीं वृद्धपणापर्यंत त्यानें शिकारीचा क्रम कायम ठेविला होता. सुटीच्या दिवसांत मित्रमंडळी घेऊन खेड्यावर त्याचा मुक्काम असतां, पहांटे सर्वांचे आधीं उठून भली मोठी काठी हातांत घेऊन पाहुण्यांना आंथरुणांतून ओढून काढण्यास स्वारी स्वतः जावयाची. अशा रीतीनें सत्तर वर्षेंपर्यंत त्यानें सुखाचें आयुष्य भोगलें.

या सत्तर वर्षांपैकीं सुमारें पसतीस अगर चाळीस वर्षें सार्वजनिक काम करण्यांत त्यानें घालविलीं असून सुमारें पंचवीस वर्षेंपर्यंत तरी मूर्द्धाभिषिक्त पुढारी या नात्यानें सर्व कार्यभार त्यानें आपल्या अंगावर घेतलेला होता. चळवळ करण्याचा एक नवीन पंथच त्यानें स्थापिला असें ह्मणण्यास हर-

कत नाहीं. या पंथाचें मुख्य लक्षण हें कीं, ‘सार्वजनिक चळवळ करण्याचे कामीं फक्त वरिष्ठ दर्जाचे लोकांवर भिस्त न ठेवतां ती थेट समाजाच्या कनिष्ठ वर्गापर्यंत नेऊन भिडवावयाची व तिजमध्यें सर्व तऱ्हेच्या लोकांचा समावेश करावयाचा.’ अज्ञ समाजास भुलविण्यास योग्य असें वक्तृत्व त्याजपाशीं असल्यामुळें सुशिक्षितांपेक्षां अशिक्षित वर्गांतच त्याचे अनुयायी अधिक असत व लोकाराधन करण्याची हातोटी त्यास चांगली साधली होती. धीर, निश्चय, आत्मप्रत्यय वगैरे गुण त्याचे अंगीं असल्यामुळें एकदा हातीं घेतलेलें काम काय वाटेल तें झालें तरी तडीस नेण्याची उमेद तो बाळगी व पुष्कळ वेळां तडीस नेईही. त्याच्या हातून पुष्कळ चुका झाल्या. १८४० सालापासून स्वतंत्र पार्लमेंट परत मिळविण्याची जी चळवळ त्यानें अंगीकारली, व ज्या रीतीनें ती चालविली ती सर्व चुकांची एक परंपराच होती. परंतु एका गोष्टीच्या अनुभवावरून सारासार विचार न करतां मनुष्य दुसरीही गोष्ट तशीच करण्याचे भरीस पडला असतां अशा तऱ्हेची चूक सहजच होते. क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याबद्दल त्यानें केलेली चळवळ यशस्वी झाली, परंतु स्वतंत्र असें पार्लमेंट मिळविण्याची त्याची चळवळ फसली, याचें मुख्य कारण असें आहे कीं, क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न पूर्वींच शिजून तयार झालेला होता, व त्याची पूर्णता करण्यास ओकॉनेल यानें केलेली खटपट उपयोगी पडली व ती सफळही झाली. क्याथोलिक लोकांस इतरांप्रमाणें समान हक्क असावे हें तत्त्व आयर्लंदांतील त्यांचे प्रतिपक्षी प्रॉटेस्टंट लोक, व तसेंच ईग्लंदमधील लोक यांना बहुतेक मान्य झालेलें होतें. जी काय अडचण उरली होती ती इतकीच कीं, राजाची व तशीच कॉनझर्व्हेटीव्ह पक्षांतील कांहीं लोकांची प्रतिकूळताही धाब्यावर बसवून केवळ बहुमताचे जोरावर क्याथोलिक लोकांस पूर्ण स्वातंत्र देण्याचा कायदा पार्लमेंट सभेमध्यें पास होणें ही. परंतु स्वतंत्र पार्लमेंट मिळविण्याचा प्रश्न याहून फार बिकट होता. त्या कामीं ईग्लंदमधील सर्व लोकांची प्रतिकूळता होती एवढेंच नव्हे, तर खुद्द आयर्लंदमध्येंही या बाबतींत एकमत झालेलें नव्हते, व यास्तव ओकॉनेल यास लाखों लोकांच्या सभा जरी भरवितां आल्या, तरी त्यांवरून लोकमताची खरी स्थिति समजण्यासारखी नव्हती. शिवाय ओकॉनेलचें चळ-

वळीचें धोरण भलत्याच दिशेनें गेलें. क्याथोलिक लोकांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे असे वजनदार पुढारी ब्रिटिश पार्लमेंटमध्यें होते व यांपैकीं कांहीं खुद्द प्रधानमंडळांतही समाविष्ट होण्याच्या लायकीचे होते. परंतु रिपीलच्या चळवळीस ब्रिटिश पार्लमेंट सभेंत कांहीं आयरिश लोकांखेरीज कोणीही अनुकूल नव्हतें. अशा स्थितींत केवळ लाखों लोकांच्या सभा भरवून त्यांजमध्यें धाकदपटशा दाखविण्याचीं भाषणें करणें यापासून फारसें हित साधण्याचा संभव नव्हता. सर्वांत विशेष गोष्ट ही कीं, अधिकारीवर्गानें प्रकरण हातघाईवर मुद्दाम होऊन आणलें असतां लोकांनीं कोठपर्यंत जावयाचें हें ओकॉनेल यानें सयुक्तिक रीतीनें स्वतःच्या मनाशीं अगर लोकांशीं ठरविलें नव्हतें. यामुळें प्रत्यक्ष प्रसंग आल्यावर त्याच्या मनानें कचर खाल्ली, व लोकांची फसगंमत होऊन चळवळीचा पोकळपणा व पुढाऱ्यांचा कमकुवतपणा त्यांचे नजरेस अशा रीतीनें आला कीं, फिरून ती चळवळ पुढें हातीं घेण्यास त्यांचें त्यांना कसेंसेंच वाटूं लागलें. अशा प्रकारची ही ढोबळ चूक ओकॉनेलच्या हातून घडल्यामुळें पूर्वचरित्रांत त्यानें मिळविलेल्या यशावर व कीर्तीवर बरेंचसें पाणी पडलें. हेतु, भाषा व आचरण ह्यांतील विसंगतपणा कुशाग्र बुद्धीच्या मनुष्यास अघळपघळ युक्तिवादानें कितीही सफाईनें अगर बेमालूमपणानें झांकून टाकता आला, तरी कालांतरानें तो लोकांच्या प्रत्ययास आल्याशिवाय रहात नाहीं. ओकॉनेलच्या या चळवळींतील भाषणांत हातावर शिरकमल घेऊन युद्धास निघालेल्या वीराची ऐट त्याची नेहमीं असे; व सभांतील समाज हें एक लष्करी सैन्यच आहे अशी आपल्या भाषणानें तो भावना उत्पन्न करी. परंतु सभाबंदीचा टीचभर पुरजा भिंतीस डकलेला पाहतांच त्यास कायदा आठवला. हातावरील शिरकमल फिरून खांद्यावर जाऊन बसलें व आपण वाघ, लांडगे आहोंत अशी भावना लोकांच्या मनांत ज्यानें होऊन उत्पन्न केली, त्यानें होऊनच त्यांस, युद्धाचा क्षण प्राप्त होतांच, निरुपद्रवी मेंढ्या होण्याची सल्ला द्यावी, आणि लाखों लोकांच्या समक्ष लाक्षणिक राजमुकुट धारण करणाऱ्या राजानें, एका पोलिस शिपायानें आपली करंगळी वर उचलल्याबरोबर, मांत्रिकानें भारलेल्या मनुष्याप्रमाणें त्याचे मागें जेलखान्यांत जाऊन पडण्यास तयार व्हावें—या सर्व व्यवहारांत अनुभवास

येणारी विसंगतता इतकी ढोबळ होती कीं, लोकांस ओकॉनेलची अगर त्याच्या मागून जाणाऱ्या स्वतःची क्षणभर लाज वाटली असल्यास नवल नाहीं. राजकीय चळवळींत निरपराधी मनुष्याचें एक थेंब रक्त सांडल्यानें राष्ट्रास कायमचें स्वातंत्र्य मिळणारें असेल तरीही तें त्याज्य होय असें उघडपणें किंबहुना दिखाऊपणें प्रतिपादन करणें यामध्यें उत्तम नीतिमत्ता व उदात्तपणा हीं निःसंशय आहेत. परंतु हें उच्च तत्त्व प्रतिपादन करणाऱ्यानें, केवळ बुद्धिमत्तेच्या जोरावर आत्मरक्षणाचा शब्द मधून मधून वापरून वस्तुतः लोकांस बंड करण्यास प्रवृत्त करणें हें कधींही शोभणार नाहीं व ह्मणूनच ओकॉनेललाही तें शोभलें नाहीं आणि अशा रीतीनें अपेशाचें किंबहुना मूर्खपणाचें माप पदरीं न घेतां १८२९ सालीं, रोमन क्याथोलिक लोकांस स्वातंत्र्य मिळवून देण्याची चळवळ यशस्वी करितांच त्याच्या चरित्राचा शेवट होता तर फार चांगलें होतें असे त्याच्या कित्येक स्नेह्यांनीं व भक्तांनीं उद्गारही काढलेले आहेत. परंतु एकंदरीनें पहातां ओकॉनेलच्या चुका लक्षांत घेऊनही आयर्लंडच्या अर्लीकडील इतिहासांत तो एक कर्ता व अलौकिक असा पुरुष होऊन गेला असेंच कोणालाही ह्मणावें लागतें.

---

## ( ६ ) विलियम स्मिथ ओब्रायन.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यभागीं आयर्लंडमध्यें जी चळवळीची मोठी लाट येऊन गेली, तिच्यांतील प्रमुख पुढाऱ्यांपैकीं ओब्रायन हा एक होता. याचें घराणें मोठें असून वयाचे तेविसावे वर्षापासून ( १८२६ ) त्यास पार्लमेंटच्या सभासदाची जागा मिळाली होती. १८३० सालीं त्यानें आयर्लंडांतील 'दारिद्र्य' या विषयावर एक उत्तम लेख प्रसिद्ध केला होता व पुढील चौदा वर्षांत हळूहळू तो पुढारी या नात्यानें प्रसिद्धीस आला. १८४० चे सुमारास डॅनियल ओकॉनेल यानें सुरू केलेली रिपीलची चळवळ उदयास येऊं पहात होती, परंतु खुद्द ओकॉनेल याजबद्दल ओब्रायन याचे मनांत फारसा आदर नसल्यामुळें तो सदर चळवळींत एकदम सामील झाला नाहीं. परंतु एखाद्या चळवळींत लोकप्रियतेचें तत्त्व इतकें कांहीं चमत्कारिक

असतें कीं, ती उदयास आल्याखेरीज रहात नाहीं; व हा तिचा उदयकाल जवळ येतांच राष्ट्रांतील निरनिराळ्या पुढाऱ्यांचे सूक्ष्म मतभेद लयास जाऊन लोकमताच्या ओघांत सर्व सारखेच सामील होतात. १८४४ सालीं रिपीलचे चळवळीस ओब्रायन हा येऊन मिळाला; व यापूर्वीं प्रतिकूल परिस्थितीशीं आपण निश्चयानें जो झगडा केला त्याचें फळ ओब्रायन आल्यानें मिळालें असें ओकॉनेल यास वाटलें. ओब्रायन याचें वजन लोकांत स्वतः ओकॉनेलच्या खालोखाल होतें; व या दोघांच्या उद्योगानें ही चळवळ इतकी नेटास लागली कीं, १८४४ सालीं सरकारास तिजमध्यें हात घालणें जरूर वाटलें. ओकॉनेल तुरुंगांत जाऊन आल्यानंतर या चळवळीचे वाताहतीस प्रारंभ झाला व अखेर १८४६ सालीं आयर्लंदांतील तरुण मंडळीनें ओकॉनेलवर नाखुष होऊन व त्यास मवाळ ठरवून सदर चळवळींतून आपलें अंग काढून घेतलें. या तरुण मंडळींत सुप्रसिद्ध 'नेशन' पत्राशीं संबंध असलेले तरतरीत लोक असून ओब्रायन हा त्यांचा पुढारी झाला; व पुढें दोन वर्षेंपर्यंत दुष्काळ वगैरे आपत्तींनीं आयर्लंदांतील लोक फार गांजून गेल्यामुळें व रिपीलसारख्या कायदेशीर चळवळीची सरकारी अधिकाऱ्यांनीं दडपशाही कायद्याचे योगानें वाताहत केल्यामुळें निराशेचा जो ठराविक परिणाम व्हावयाचा तो होऊन १८४८ सालीं युरोपांतील इतर देशांप्रमाणें आयर्लंदमध्येंही बंडाळीचा उपक्रम झाला. या नवीन चळवळीचा थोडाबहुत पुरस्कार करण्याकरितां ओब्रायन, मीघर वगैरे पुढारी पॅरिस येथें गेले, व लॅमार्टिन वगैरे प्रजापक्षीय पुढाऱ्यांकडून आयर्लंदास कुमक मिळविण्याची त्यांनीं खटपट केली. सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं वूल्फटोन याची फ्रान्सकडून मदत मिळण्याबद्दल जशी निराशा झाली, तशीच या वेळेस स्मिथ ओब्रायन याचीही झाली. फ्रान्समधून परत जातांना ओब्रायन हा इंग्लंदला गेला, व आपण चालविलेल्या खटपटीसंबंधानें पार्लमेंटमध्यें त्यानें उघडपणें असें सांगितलें कीं, 'इंग्लंदच्या राणीची सत्ता मला कबूल आहे, परंतु इंग्रजी पार्लमेंटची आयर्लंदवरील सत्ता मला कबूल नाहीं, व ती नाहींशी करून आयर्लंदची स्वतंत्र अशी पार्लमेंट पुन्हां स्थापित करण्याचे कामीं मी जन्मभर खटपट केल्याशिवाय रहाणार नाहीं. मग त्या कामीं मला प्राण खर्ची घालावे लागले तरी फिकीर नाहीं.' १८४८ सालच्या मे महिन्यामध्यें

लोकांस बंड करण्यास उत्तेजन येण्यासारखीं भाषणें करण्याबद्दल त्याजवर खटला करण्यांत आला; परंतु ज्यूरीमध्यें मतभेद होऊन तो सुटला. परंतु नंतर लौकरच अधिकाऱ्यांचे अधिकार वाढविण्यासारखे नवीन कायदे पार्लमेंटनें पास करून दिल्यामुळें, सरकारचा ज्यांच्यावर वहीम होता अशांचे अंगावर हात टाकून त्यांना आपल्या मार्गांतून कांहीं दिवसपर्यंत काढण्याची सहजच सोय झाली. पण क्रियेबरोबरच प्रतिक्रियाही वाढत जाते, व दडपशाहीच्या कायद्यास लोकांनीं प्रत्यक्ष बंडाळी करून रोखठोक जबाब दिला. ओब्रायन, डिलन, ओगार्मन, मीवर वगैरे पुढाऱ्यांनीं लोकांस हातांत शस्त्र धरण्याचा उपदेश उघडपणें सुरू केला. जुलई महिन्यामध्यें सुमारें तीन चार हजार लोकांचा जमावही त्यानें तयार केला; परंतु यांपैकीं हत्यारें अशीं फक्त तीनचारशें लोक.जवळच काय तीं होतीं व द्रव्याची अनुकूलताही असावी तशी नव्हती. ओब्रायन ह्यानें स्वतःजवळ होता नव्हता तेवढा पैसा खर्च केला; परंतु अशा कामास एक व्यक्तीचा पैसा कितीसा पुरवणार ! या देशभक्त सैन्यास लवकरच उपास काढण्याची पाळी येऊं लागली, व कोणी तरी पुढाकार घेतला असतां त्यास एकंदर जनसमाजाचें पाठबळ मिळेल अशी ओब्रायन वगैरेंची जी अटकळ होती ती खोटी ठरली आणि या बंडाची अखेर एक दोन दिवसांच्या चकमकीनें झाली. प्रत्यक्ष लढाईचे वेळीं ओब्रायन याजजवळ फक्त दोनशें लोकच उरले होते, व ही लढाई ह्मणजे तरी त्याला पोलिस व लष्करी लोकांनीं पकडण्याच्या वेळची झटपट ही होय. या झटपटीचे अखेरीस ओब्रायन हा आपला बचाव करण्याकरितां निसटून गेला. सरकारनें त्यास धरून देण्याबद्दल पांचशें पौंडांचें बक्षीस जाहीर केलें. ता लपूनछपून रहात असतां वेळोवेळीं त्याच्या हालचालीची बातमी देऊन पुष्कळ लोकांनीं आपलें कल्याण करून घेतलें, व शेवटीं अज्ञातवासाचा कंटाळा येऊन राजरोसपणें तिकिट घेण्याकरितां रेल्वेस्टेशनावर तो आला असतां पकडला गेला. पुढें त्याचा इनसाफ होऊन त्यास फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. परंतु ती रद्द होऊन त्यास काळेपाण्यावर धाडिलें. मेरिया नांवाच्या बेटांत असतां सुटून जाण्याचा त्यानें प्रयत्न केल्यावरून त्याजवरचा पहारा अधिक कडक झाला, व अखेर प्रकृति नीट नसल्यामुळें मी

पळून जाणार नाहीं अशी शपथ घेऊन त्यास आपली तात्पुरती मोकळीक करून घ्यावी लागली. पुढें १८५४, सालीं १८४८ सालच्या बंडांतील लोकांस माफी देण्याचा उपक्रम झाला, व ओब्रायन यास माफी मिळाल्यामुळें तो स्वदेशास परत आला. वाटेंत मेलबोर्न येथें इंग्रज लोकांनीं त्याचें मोठें स्वागत करून एक हजार पौंडांचे किंमतीचा एक सोन्याचा प्याला त्यांनीं त्यास नजर केला. १८५६ सालीं युरोपांत कांहीं दिवस घालवून त्यानें राजकीय विषयावर एक दोन पुस्तकें लिहिलीं. १८५६ च्या मे महिन्यांत त्याजवरील सर्व बंधनें नाहींशीं होऊन त्यास सर्वस्वी माफी मिळाली व तो आयर्लंदांत फिरून दाखल झाला. यापुढें त्याचे हातून प्रत्यक्ष कार्य असें फारसें झालें नाहीं; तथापि त्याचीं मतें अद्यापि कायम होतीं व एक वर्ष-पर्यंत अमेरिकेंत हिंडून व व्याख्यानें देऊन तीं तेथील वसा-हतवाल्या आयरिश लोकांस समजावून देण्याचा उद्योग त्यानें केला व अखेर १८६४ सालीं तो मरण पावला. ओब्रायन हा जरी मोठा वक्ता नव्हता, तरी स्वभावानें उदात्त व मनानें सुसंस्कृत आणि मोकळा अस-ल्यामुळें लोकांना तो फार आवडे व त्याच्या देशभक्तीबद्दल कोणास कधींही शंका येण्यासारखी नसल्यामुळें त्याचें वजन अर्थातच फार बसलें होतें. तो जसा देशभक्त तसाच स्वार्थत्यागीही होता. १८४८ सालचे सुमारास, आपल्या आयुष्यक्रमास येथून निराळी दिशा लागण्याचा संभव आहे असें पहातांच त्यानें आपली सगळी मिळकत पंचांचे स्वाधीन करून दिली, व तिच्या उत्पन्नांतून स्वतःकरितां सालीना फक्त हजार रुपये खर्चाकरितां घ्यावयाचे असें ठरविलें. सुप्रसिद्ध इतिहासकार 'लेके' यानें ओब्रायनविषयीं फार चांगलें मत दिलें आहे. त्यानें असें ह्मटलें आहे कीं, १८४८ सालीं ओब्रायन हा बंड करण्यास प्रवृत्त झाला ही त्याच्या हातून चूक झाली हें तर खरेंच, तथापि हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, खऱ्या मनानें व कळकळीनें काम करणाऱ्या मनुष्याची इतर अनेक तऱ्हेनें निराशा झाली असतां,अशा चुका त्याचे हातुन केव्हां केव्हां स्वाभाविकपणें होतात. ओब्रायनची खटपट खऱ्या मनाची व स्वार्थत्यागाची होती; व स्वहित साधण्याकरितां देशाचें अनहित करणाऱ्या लोकांचा जसा त्यास तिटकारा असे, तसाच देशभक्तीचे नांवावर वृथा वल्गना व बडबड कर-

णारांचाही तो तसाच निषेध करी. अखेर अखेर त्यास असें दिसून येऊं लागलें होतें कीं, फ्रेंच लोकांची मदत घेऊन अगर क्याथोलिक लोकांच्या धर्मगुरूचें नसतें प्रस्थ माजविल्यानें देशाचा फायदा नसतां उलट तोटाच आहे. हीं त्याचीं मतें त्या काळीं लोकप्रिय होण्यासारखीं नाहींत हें उघड दिसत असतांही खरें दिसलें तेंच सांगण्यांत त्यानें जन्मभर मिळविलेली लोकप्रियता गमावण्याचा संभव दिसत होता तरी, तो धोका आनंदानें पतकरून आपलीं प्रामाणिकपणाचीं मतें लोकांस शिकविण्याचा क्रम त्यानें अबाधितपणें ठेविला होता.

---

## ( ७ ) आयझॅक बट.

ओकॉनेलचा अस्त व पार्नेलचा उदय या दरम्यानच्या काळीं ज्या पुढाऱ्याकडे पार्लमेंटमधील आयरिश पक्षाचें नेतृत्व होतें त्याचें नांव आयझॅक बट. याचा जन्म १८१३ सालीं झाला. हा एका प्रॉटेस्टंट धर्मोपदेशकाचा मुलगा होता. याचें शिक्षण डब्लिन येथें ट्रिनिटी कॉलेजांत झालें व तें मिळवीत असतांच त्याची बुद्धि, तरतरी वगैरे गुण दृष्टोत्पत्तीस आले. वयाचे विसावे वर्षीच त्यास डब्लिन विश्वविद्यालयांतील अर्थशास्त्राच्या प्रोफेसरीची जागा मिळाली. १८३८ सालीं तो बॅरिस्टर झाला व १८४२ सालीं त्याला ‘ क्वीन्स कौन्सेल ’ ही पदवी मिळाली. वयाच्या २९ वे वर्षीं ज्यास ही पदवी मिळाली असा हाच काय तो एक झाला. कॉलेजांत असल्यापासूनच कायदा व राजकारण यांची त्यास गोडी होती व तो वक्ताही चांगला असे. १८४४ सालीं ओकॉनेल यानें डब्लिन येथील म्युनिसिपालिटीपुढें ‘रिपील’चा प्रश्न वादविवादाकरितां आणला त्या वेळीं आयर्लंड व इंग्लंड यांचें ऐक्य आहे तसेंच रहावें हें प्रतिपादन करणाऱ्या लोकांचें पुढारीपण आयझॅक बट याजकडे देण्यांत आलें होतें. व ओकॉनेलसारख्या अनुभविक, प्रसिद्ध व लोकप्रिय वक्त्याच्या भाषणास बट यानें जें उत्तर दिलें तें इतकें उत्तम होतें कीं, ओकॉनेलचा प्रतिपक्षी या नात्यानें प्रॉटेस्टंट व ‘ यूनिअनिस्ट ’ पक्षाचा कायमचा पुढारीपणा त्याजकडे गेला. मात्र त्याच्या मनाची रचना व युक्तिवादाची सरणी लक्षांत आणून वादविवादाचे अखेर

ओकॉनेलनें त्याची उघड स्तुति केली; पण असें भविष्यही केलें कीं, पुढेंमागें ज्या कार्याचा प्रतिपक्ष मंडित करण्याचें काम आज बट याजकडे आलें आहे, त्याच पक्षाचें खंडन करून स्वतंत्र पार्लमेंट मागणाऱ्या लोकांचें पुढारीपण त्याजकडे एक दिवस खास येणार ! व हें भविष्य १८७० सालीं ह्मणजे पुढें सव्वीस वर्षांनीं खरें झालें.

१८५२ सालीं बट हा पार्लमेंटमध्यें शिरला, परंतु प्रथम प्रथम त्याचा भर वकिलीकडे असे व त्या धंद्यांत त्यानें पहिल्या प्रतीचें नांव व हवा तितका पैसा मिळविला. १८४४ व १८४८ या सालीं राजकीय स्वरूपाचे जे खटले आयर्लंदांत झाले त्यांत बहुधा प्रत्येक आरोपीच्या तर्फे त्याचें वकीलपत्र दाखल असे. व फिरून १८६०–७० यांचे दरम्यान फीनियन लोकांचे गुन्हे झाले त्या प्रसंगीं कांहीं कांहीं आरोपींचें काम त्यानें थोडाबहुत स्वार्थत्याग करून केलें. कारण, एक तर या दंग्याधोप्यांचे दिवसांत पुष्कळांवर खोटे आरोप येत, व बट हा व्यक्तिस्वातंत्र्याचा भोक्ता असल्यानें कोणाही मनुष्यावर अधिकाऱ्यांकडून नाहक जुलूम होऊं नये याविषयीं त्याचा फार कटाक्ष असे. तसेंच, फीनियन लोक जरी अत्याचार करीत, तरी त्यांच्यासंबंधानें बटसारख्या कायदेशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्याचे मनांतही एक प्रकारची सहानुभूति कांहीं काळ उत्पन्न झाली होती. याचें कारण असें कीं, साठ वर्षेपर्यंत आयरिश व ब्रिटिश पार्लमेंट सभांचें ऐक्य झालें असूनही त्याचे चांगले परिणाम लोकांच्या दृष्टोत्पत्तीस येण्यासारखे मुळींच झाले नव्हते. यामुळें आयरिश लोकांच्या मनांत अत्यंत असंतोष उत्पन्न झाला होता, व देशकार्याकरितां ह्मणून जे अग्निकुंडांत उडी घालण्यास तयार झालेले दिसत, त्यांजबद्दल लोकांस स्वाभाविकपणेंच आदर वाटे. बट हा सनदशीर चळवळ करणारा होता. पार्लमेंट, त्यांतील कामकाज करण्याची रीति, व एकंदर कायदाकानू याजबद्दल बट याचे मनांत नेहमीं आदर असे; व त्या सभागृहांत त्याची विचारीपणाची, गंभीरपणाची अशी जी वागणूक असे, तिच्यायोगानें पार्लमेंट सभेंतील सभासदांच्या मनांत त्याजबद्दल फार आदर उत्पन्न होई. आयझॅक बट बोलावयास उठला असतां सर्व सभागृह मोठ्या शांतपणानें व लक्ष लावून त्याचें भाषण ऐकत असे. त्याच्या मागें अनुयायी वर्ग जरी मोठासा नव्हता,

तरी त्याच्या भाषणापासून प्रत्यक्ष असा फायदा बराच होई. अशा रीतीनें सनदशीर चळवळीचा पुरस्कर्ता असें नांव पडलेलें असतांही १८६८ सालीं पुष्कळ फीनियन लोकांचे खटले त्यानें चालविले, व एक प्रकारचा तो त्यांचा वालीच होऊन बसला. शेंकडों लोक तुरुंगांत गेल्यामुळें राजकीय गुन्हेगारांना सरसकट माफी मिळावी अशाविषयीं खटपट करण्याकरितां १८६९ सालीं 'ॲमनेस्टी असोसिएशन' या नांवाची सभा आयर्लंदांत स्थापन झाली, तेव्हां तिचें अध्यक्षस्थान त्यानें उत्साहानें पत्करलें व लगेच पुढील सालीं रिपीलच्या चळवळीचाही तो पुढारी बनला. १८६७–६९ सालीं प्रॉटेस्टंट धर्ममंडळाचा खर्च बंद करण्यासंबंधाची जी मोठी चळवळ झाली, तिच्यायोगानें खुद्द प्रॉटेस्टंट लोकांचे मनावरही चांगला परिणाम झाला. व आजपर्यंत धर्माखातर क्याथोलिक व प्रॉटेस्टंट यांनीं परस्पर विनाकारण घातपात व रक्तपात केला व राष्ट्रीयत्वाची हानि करून घेतली तेवढी बस्स झाली असें उभय पक्षांचे मनानें घेतलें. व उभयतांनीं मिळून राष्ट्राचा उद्धार केला तरच तो होणार आहे अशा खात्रीनें त्यांनीं त्या मंगलकार्यास हात घातला.

१८७० सालीं मेच्या १९ वे तारखेस दब्लिन येथील बिल्टन हॉटेल नामक उपाहार–गृहांत एक खासगीसारखी सभा भरली. तिला उभय पंथांचे प्रतिष्ठित व्यापारी, उदमी, धंदेवाले व सुखवस्तु लोक आले होते. त्यांच्यापुढें आयर्लंदच्या राजकीय स्थितीचा विचार करणें हाच मुख्य प्रश्न होता. तेथें जो वादविवाद व संभाषणें झालीं त्यांत असें दिसून आलें कीं, आततायीपणाचा व बंडाळीचा मार्ग जरी कोणास प्रिय नव्हता तरी, राष्ट्रीयत्वाच्या स्वातंत्र्याची कल्पना सर्वांसच सारखी प्रिय होती. आयर्लंदची इतिहास-परंपरा अगर त्रिकालाबाधित असा ईश्वराचे घरचा न्याय, कोणत्याही दृष्टीनें पाहतां हें विशिष्ट स्वातंत्र्य आयरिश लोकांना मिळणें हेंच योग्य आहे; तें मिळविण्याचा त्यांचा हक्क आहे; व तें मिळविण्यास इंग्रजी राजाची सत्ता झुगारून देण्याची गरज नसल्यामुळें त्या वादांत न पडतां, किंवा अराजानिष्ठ न होतां, पूर्वीं जशा प्रकारचें स्वतंत्र पार्लमेंट आयर्लंदमध्यें होतें, तशा प्रकारचें पार्लमेंट परत मिळविण्यास सर्व पक्षांनीं व पंथांनीं मिळून कंबर बांधली पाहिजे असें सर्वानुमतानें ठरलें. या वादविवादांत ज्यानें

पुढाकार घेतला व स्वतंत्र पार्लमेंट मागण्याविषयीं आग्रहपूर्वक प्रतिपादन केलें, तोच ओकॉनेलला रिपीलच्या चळवळींत विरोध करणारा आयझॅक बट हा होय. व या रीतीनें ओकॉनेलचें भविष्य 'अघटित घटनाप्रिय' अशा कालाच्या कलाटणीनें खरें ठरलें. सदर सभेंत फीनियन लोकांच्या चळवळीचा उल्लेख झाला, त्यास अनुलक्षून बट यानें सणसणीत व कळकळीचें भाषण केलें. तो ह्मणालाः-" राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या गोष्टी सर्व लोक बोलूं लागले ह्मणजे कित्येकजणांनीं अविचार करावा असेंही होत नाहीं असें नाहीं. म्हणून त्याकरितां त्या गोष्टीच बोलूं नये असें मात्र नाहीं. त्या गोष्टी बोलून शिवाय त्या अमलांत आणण्यास योग्य व कायदेशीर अशा उपायांची योजना करून राष्ट्रांत जोम उत्पन्न करण्याचें काम पुढाऱ्यांचें आहे. पण तें काम नाजूक असल्याकारणानें करूंच नये असें ह्मणण्यापेक्षां सावधगिरीनें व होतां होईतों बिनचूक करण्याचा प्रयत्न करावा असेंच म्हणणें अधिक सयुक्तिक होय, व पुढाऱ्यांचें पुढारीपण याजवरच अवलंबून असतें. फीनियन लोक अत्याचारी झाले ही गोष्ट वाईट झाली खरी; पण ते तसे कां झाले ? तर सनदशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांनीं आपली जबाबदारी ओळखून आपलें कर्तव्य करावें तितकें नेटानें व उद्योगशीलतेनें केलें नाहीं म्हणून ! " बटच्या या एका भाषणानें सर्व काम झालें. स्वतंत्र पार्लमेंट मागण्याचा ठराव तेथें जुळलेल्या निरनिराळ्या पंथांच्या, धर्मांच्या व पक्षांच्या लोकांनीं एकमतानें 'टाळ्यांच्या गजरानें' पास केला व त्या तारखेस 'होम रूल' च्या चळवळीचा जन्म झाला.

१८७३ सालीं हजारों आयरिश गृहस्थांच्या सह्या घालून एक निमंत्रणपत्र प्रसिद्ध झालें, व त्यावरून ता. १८ नोव्हेंबर रोजीं व पुढें चार दिवस राष्ट्रीय संमेलन भरविण्यांत आलें. शंभर वर्षांपूर्वीं चार्लमाँटच्या अध्यक्षतेखालीं याच दिवाणखान्यांत स्वयंसैनिकांचें संमेलन भरून आयर्लंदांत त्या वेळीं विद्यमान असलेल्या पार्लमेंटवरील ब्रिटिश पार्लमेंटची हुकमत नाहींशी करण्याची चळवळ झालेली होती. संमेलनास देशांतून नऊशें प्रतिनिधी आले होते. व याप्रसंगीं जुनी 'होम गव्हर्मेंट' नांवाची सभा मोडून 'आयरिश होम रूल' नांवाची नवीन सभा स्थापण्यांत आली. १८७४ सालीं झालेल्या नवीन निवडणुकींमध्यें होमरूलच्या पक्षाचे साठ सभासद निवडून आले; त्यांपैकीं

बट, जॉन मार्टिन, मिचेल, हेनरी विलियम शॉ, सर जॉन ग्रे वगैरे प्रमुख असून त्यांचें पुढारीपण आयझॅक बट याजकडे होतें. क्याथोलिक व प्रॉटेस्टंट हा भेदभाव नाहींसा झाला, व लिबरलपक्षाशीं मिळून अगर दूर राहून केव्हां देऊन केव्हां घेऊन जमेल त्या रीतीनें होमरूलचा गाडा पुढें ढकलण्यास सुरुवात झाली. पण बट हा वृद्ध झालेला असून त्याचे हातून नेटानें काम होईनासें झालें व पार्लमेंटमधील परिस्थितिही काम करण्यास फारशी अनुकूल नव्हती. यामुळें पार्लमेंटमध्यें काम करण्याच्या रीतीबद्दल जरी अद्यापि आयरिश लोकांत हौस उरली होती तरी, बटबद्दलचा लोकांचा सद्ग्रह हळू हळू कमी होत चालला होता. व अखेर पार्नेलसारखा तरुण नेता मिळतांच बटला पार्लमेंटरी पक्षाचे पुढारीपणापासून पदच्युत व्हावें लागलें. ह्यासंबंधाची हकीकत पुढें पार्नेलच्या चरित्रांत दिलेलीच आहे. ही पदच्युति व वार्धक्य यांच्यामळें क्षीण होऊन तो ता. ५ मे १८७९ रोजीं वारला.

---

## पार्नेल.

एकोणिसाव्या शतकांत ओकॉनेलनंतर आयरिश लोकांचा नामांकित असा पुढारी पार्नेल हाच झाला. पार्नेलचें घराणें पुष्कळ जुनाट असून त्याच्या पूर्वजांमध्यें उत्कृष्ट कवि व मुत्सद्दी होऊन गेले होते. आयरिश पार्लमेंटच्या ऐन भरभराटीच्या काळीं पार्नेलचा एक पूर्वज प्रधानमंडळांत असून, आयरिश लोक व इंग्रजी प्रधानमंडळ या दोहोंच्याही विश्वासास तो सारखाच पात्र झाला होता. या त्याच्या पूर्वजानें आयरिश पार्लमेंटसभा मोडण्याचे प्रसंगीं राजपक्षाशीं निकरानें टक्कर दिलेली होती. पार्नेलचा आजा हा आपल्या भावि नातवाप्रमाणेंच इंग्रजांचा पराकाष्ठेचा द्वेष्टा असून त्यानें ओकॉनेल यास धर्मस्वातंत्र्याचे चळवळींत पुष्कळ मदत केली होती. खुद्द पार्नेलची आई ही मोठी हुषार, धाडसी व राजकारणी स्त्री होती व तिच्या माहेरघरचे वाडवडील बरेच दिवस अमेरिकेंत राहिल्यानें त्यांच्या मनांत इंग्रजांचा द्वेष अगदीं खोल मुरला होता. खुद्द पार्नेल याजमध्यें या द्वेषबुद्धीचा अखेर कळस झाला. व वास्तविक सूक्ष्मदृष्टीनें त्याचें चरित्र

पहाणाराला असें कबूल करावें लागेल कीं, पार्नेलच्या अंतःकरणांत खऱ्या राष्ट्रभक्तीपेक्षांही इंग्रजांचा द्वेषच अधिक प्रभावी झालेला होता !

पार्नेलची वडिलार्जित संपत्ति बरीच होती. त्याचें घराणें जमीनदारांचें असून त्याच्या वांटणीस जमीनजुमल्याचें उत्पन्न इतकें येण्यासारखें होतें कीं, पोट भरण्याकरितां कोणताही धंदा करण्याचें त्यास कारण नव्हतें. त्याच्या जमीनदारीचा गांव राथड्रम नांवाचा असून आयर्लंदची राजधानी जें दब्लिन शहर तेथून या गांवीं सुमारें दीड तासांत आगगाडीनें जातां येतें. हें गांव विकलो नामक जिल्ह्यांत असून सर्व आयर्लंदमध्यें सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें उत्कृष्ट असा कांहीं भाग या गांवचे आसपास पहाण्यास मिळतो. या गांवापासून जवळच 'ॲव्हानडेल' नांवाची वाडी असून त्यांत पार्नेलच्या वाडवडिलांचें घर आहे. घरापासून सुमारें पांच सात मिनिटांचे रस्त्यावर एक नदी असून चोहों बाजूंस झाडींनें हिरव्यागार दिसणाऱ्या टेंकड्या आहेत. याच वाडीमध्यें पार्नेल हा सन १८४६ मध्यें जूनच्या २७व्या तारखेस जन्मला. लहानपणापासूनच तो गंभीर व मितभाषणी असा असे. त्याला घर सोडून खेळगड्यांत मिसळणें आवडत नसे; तथापि घरच्या बहीणभावंडांशीं तो मन मोकळें करून खेळे. शाळेंत असतांना तो आळशी व निरुद्योगी असा बहुतेक काळ घालवी, इतर मुलांचें व त्याचें पटत नसे. शिक्षकांशींही तो बेपर्वाइनेंच वागे. आपण ह्मणूं तें खरें व त्याचेंच समर्थन करावयाचें हा जो त्याचा गुण किंवा दुर्गुण, तो लहानपणींही त्याचे अंगीं इतका दृढ होता कीं, वेळ पडल्यास आपले शिक्षक व सर्वमान्य ग्रंथ हे साफ चुकले आहेत, असें ह्मणण्यासही त्यास दिक्कत वाटत नसे. शिक्षणांत गणित व खेळांत चेंडूफळी हे त्याचे आवडीचे विषय असत. लहानपणापासून झोंपेंतून उठून चालूं लागण्याची त्यास खोड असे, व या खोडीचा अंश मोठेपणींही त्याचे अंगीं थोडाबहुत राहिला होता. जात्या तो शूर असे; परंतु प्रसंगविशेषीं कोठेंही एकटें रहाण्याचें त्याला भय वाटे व मोठेपणीं देखील ही गुप्त भीति कांहीं अकल्पित कारणानें त्याचे डोक्यांत खिळून राहिलेली एखादे वेळीं दिसून येई !

सन १८६९ सालीं केंब्रिज येथील कॉलेज सोडून पदवी वगैरे न घेतां शिक्षणक्रम पूर्ण होण्याचे आधींच पार्नेल परत घरीं येऊन राहिला. केंब्रिज

येथें असतांना कांहीं स्नेह्यांबरोबर तो एक वेळ फिरावयास गेला होता, त्या प्रसंगीं दारू पिऊन धुंद झालेल्या कांहीं इसमांशीं त्याची मारामारी झाली, व न्यायाधीशानें त्यास मारामारीबद्दल दोषी ठरविलें. यास्तव, कॉलेजच्या अधिकाऱ्यांनीं पार्नेल यास कांहीं दिवस कॉलेज सोडून घरीं बसण्याची शिक्षा दिली, व या शिक्षेमुळें तो जो एकदां घरीं आला तो फिरून गेलाच नाहीं. अशा रीतीनें त्याचा शिक्षणक्रम कोणत्याही दिशेनें विशेष शिक्षण न मिळतां संपला व पोटाकरितां शिकण्याचें त्यास कारण नसल्यामुळें तो संपवावा अशीही कळकळ त्यास नव्हती; शिवाय मनानेंही तो विद्येचा मोठा भोक्ता होता असें नाहीं. चालचलाऊ शिक्षण मिळवून घरच्या जमीनदारीची वहिवाट करून ख्यालीखुशाली व शिकार यांजमध्यें सुखानें दिवस घालवावे, यापलीकडे त्याची महत्त्वाकांक्षा कधींही गेली नव्हती. तो इंग्रजांचा द्वेष्टा होता खरा; तथापि आपला देश म्हणजे काय, त्याचा पूर्वेतिहास कसा आहे वगैरे साधारण गोष्टीसुद्धां त्यास चांगल्याशा माहीत नव्हत्या. आयरिश राष्ट्राच्या इतिहासाचें त्याचें अज्ञान इतकें कांहीं भयंकर होतें कीं, कोणास तें सांगितलें असतां खरेंही वाटणार नाहीं. देश राहिला; परंतु खुद्द आपल्या वाडवडिलांनीं काय काय केलें हें समजावून घेण्याचाही प्रयत्न त्यानें कधीं केला नाहीं. सन १७९८ सालीं कांहीं आयरिश देशभक्तांनीं बंड केलें होतें, ही गोष्ट त्यास नुसती ऐकून माहीत होती. आपल्या आयुष्याचीं पहिलीं वीस वर्षें त्यानें केवळ ख्यालीखुशालींत घालविलीं. चेंडूफळीच्या खेळांत तो आपल्या टीमचा 'कॅप्टन' होई व रानांत शिकार करणें, मासे मारणें वगैरे गोष्टींत तो प्रवीण असे; परंतु साधारण लहान मुलांमध्येंही जी एकप्रकारची उथळ कां होईना, परंतु उज्ज्वल देशभक्ति असते, तिचा लवलेशही पार्नेलमध्यें वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत दिसून आला नाहीं. राजकारणाच्या गोष्टी बोलणें हें विद्यार्थ्यांस फार आवडतें; तथापि पार्नेल यास या गोष्टींचें अगदीं वावडें असे.

अशा मनोवृत्तीचा मनुष्य पुढें लवकरच राजकारणांत पडून राष्ट्रीय पुढारी बनावा, ही एक केवळ अघटित घटनाच म्हणण्यास हरकत नाहीं. पार्नेलचें लक्ष राजकारणांत प्रथम जाण्यास आयर्लंदमधील फीनियन

लोकांची चळवळ मुख्यतः कारणीभूत झाली. सन १८६७ सालीं मँचेस्टर येथें मारामाऱ्या, खून, फांशी वगैरे प्रकार घडून आल्याचें वर्णन पूर्वी सातव्या भागांत आलेलेंच आहे. येथें मुख्यतः सांगावयाची गोष्ट हीच कीं, मँचेस्टर येथें घडलेल्या या प्रकारांनीं सर्व आयर्लंडदेशभर मोठीच खळबळ उडून गेली. कित्येक दिवसपर्यंत लोकांचे तोंडीं बोलण्यास दुसरा विषयच नव्हता. मँचेस्टर येथें घडलेल्या प्रकारांचें इंग्रज लोक 'खून' या तिरस्कारदर्शक शब्दानें वर्णन करीत; परंतु या गोष्टीची आयरिश लोकांस मोठी चीड येई. ते ह्मणत दिवसाढवळ्या सशस्त्र व सावध असलेल्या पोलिसांशीं लगट करून आपले सोबती सोडवून घेण्याचे प्रयत्नांत जर फीनियन लोकांकडून प्राणहानि झाली, तर त्यास खून ह्मणणें गैरशिस्त होईल. अशा शूर आयरिश लोकांस खुनी हें नांव ठेवून आयरिश लोकांबद्दलचें आपलें वैर मात्र इंग्रज लोक निष्कारण प्रकट करीत आहेत असें ते ह्मणत; व जर कोणीं खून केला असेलच तर तो या फीनियन लोकांस शिक्षा देणाऱ्या न्यायाधीशांनींच केला असाही कोटिक्रम ते लढवीत. पार्नेल यास राजकारण जरी अवगत नव्हतें, तरी वरील वादांत त्याचें मत आयरिश लोकांप्रमाणेंच होतें, व वादाचा प्रसंग आला असतां तो फीनियन लोकांचें समर्थन मोठ्या आवेशानें करी. तथापि फीनियन चळवळीनें त्याच्या मनांत उत्पन्न झालेली राजकारणाची आवड क्षणिकच होती असें ह्मणण्यास हरकत नाहीं. १८७३ सालीं पार्लमेंटसंबंधीं नवीन निवडणुकी झाल्या, त्या वेळीं पार्नेल व त्याचा भाऊ जॉन यांच्या मनांत राजकारणांत पडण्याची कल्पना एक वेळ येऊन गेली. याच सालीं होमरूलच्या चळवळीचा नामकरणविधि झाला होता. फीनियन चळवळीनंतर थोडे दिवसांनीं गुन्हेगारांस सरसकट माफी मिळण्यासंबंधाची चळवळ आयर्लंडांत झाली व या चळवळींत नेमस्त, मवाळ, जहाल, प्रागतिक, स्वामिभक्त या सर्व प्रकारच्या व पक्षांच्या लोकांनीं आपापले भेदभाव विसरून जाऊन एकदिलानें खटपट केली होती. यामुळें राष्ट्रीय ऐक्याची ज्योत आयर्लंडांत प्रदीप्त होऊन, राष्ट्रास स्वतंत्र पार्लमेंट मिळावें अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली व आयझॅक बट यानें पुढाकार घेऊन होमरूलच्या चळवळीचा पाया घातला. या चळवळीचें काम खुद्द आयर्लंड-

प्रमाणें ब्रिटिश पार्लमेंटमध्येंही व्हावयाचें असल्यामुळें पार्लमेंटच्या निवडणुकीस कांहीं विशेष प्रकारचें महत्व या सुमारास अर्थातच आलें होतें. १८७४ सालीं होमरूलला अनुकूळ असे ५९ सभासद आयर्लंदमध्यें निवडले गेले; व ब्रिटिश पार्लमेंटमध्यें काम करण्याची हौस आयरिश लोकांमध्यें इतकी उत्पन्न झाली कीं, 'पार्लमेंटरी चळवळीपासून कांहींएक निष्पन्न होणार नाहीं व जो काय कार्यभाग होणें तो युद्ध करूनच होईल,' असें ह्मणणारा फीनियन लोकांचा पक्ष या वेळीं मागें पडला. व अशा या निवडणुकीची धामधूम सुरू असतां कांहीं आकस्मिक कारणानें पार्लमेंटमध्यें शिरण्याची स्फूर्ति पार्नेल यास झाली.

पार्नेल हा इंग्रजांचा कट्टा द्वेष्टा होता, हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. द्वेष हा साधारणतः दोषच होय, यांत शंका नाहीं. परंतु पार्नेल यास तो गुणाप्रमाणें उपयोगी पडला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण, पार्लमेंटमध्यें शिरून काम करण्याविषयीं आयरिश लोकांच्या मनामध्यें एक प्रकारची उत्सुकता जरी उत्पन्न झालेली होती तरी तिच्याच बरोबर हेंही सांगितलें पाहिजे कीं, लिबरल पक्षावर भिस्त ठेऊन राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेल अशा भरवंशाचे दिवस गेले होते आणि ब्रिटिश पार्लमेंट ही संस्था जरी परकीय होती, तरी तिजमधील सभासद या नात्यानें आपले जे काय हक्क असतील ते हरतऱ्हेनें बजावून साधेल तो कार्यभाग साधून घ्यावा, असें वाटण्याचे दिवस आले होते. आयझॅक बट हा होमरूलच्या चळवळीचा व पार्लमेंटमधील आयरिश सभासदांचा जरी अभिषिक्त पुढारी होता तरी तो असावा तितका लढाऊ नसल्यानें, पार्लमेंटमध्यें आयरिश सभासदांचें कांहींएक चालत नाहीं व यामुळें ते असून नसल्यासारखे होतात, अशी तक्रार त्या वेळीं प्रचलित होती. बट हा चारित्र्यानें प्रतिष्ठित व दिलदार असून त्याचे स्वभावांत एक प्रकारचा गोडवेपणा होता व त्याचे हातून प्रतिपक्षास निकरानें व टाकून बोलवत नसे. आयरिश पार्लमेंटसभा मोडण्यामध्यें इंग्रज लोकांनीं अत्यंत अन्याय केला, असा जरी त्याचा पक्का भरवंसा होता तरी, पार्लमेंट सभेमध्यें शिष्टाचारानें वागण्याच्या नियमांचें जें दडपण पडे त्यांतून त्यास आपली मान वर काढतां येत नसे. ही मान वर काढण्याचें काम, ज्याचे मनांत इंग्रजांविषयीं पक्का द्वेष व

तिरस्कार बिंबलेला असेल, अशासच त्या वेळीं साधण्याजोगें होतें. पार्नेलच्या अंगचा द्वेषाचा हा गुण व वेळेचा गुण हे दोन्ही एकवटल्यामुळें पार्लमेंटमध्यें शिरल्यापासून लवकरच तो पुढारीपणास पात्र झाला.

सन १८७४ सालीं पार्नेल हा दब्लिन शहरातर्फे एक उमेदवार ह्मणून उभा राहिला; परंतु त्यास या प्रसंगीं यश आलें नाहीं. सार्वजनिक काम करण्यास तो या वेळीं अगदीं अनभ्यस्त होता. उमेदवार या नात्यानें मतदारांच्या सभेपुढें उभा राहून त्यानें जें पहिलें भाषण केलें तें अत्यंत गचाळ होतें. सुसंगत रीतीनें त्यास धड चार शब्दही बोलतां येईनात, व राजकीय प्रश्नासंबंधाचें त्याचें अज्ञान केवळ अगाध होतें. यामुळें सार्वजनिक आखाड्यांतील त्याची ही पहिली कुस्ती पाहून लोकांना एक प्रकारें त्याची कींवच आली. कोणी ह्मणूं लागले कीं, अरे हा मुखस्तंभ ठोंब्या पार्लमेंटमध्यें शिरून काय दिवे लावणार? तर दुसरे कित्येक ह्मणत कीं, हे बोवा पार्लमेंटमध्यें शिरल्यावर वाघाच्या शिकारीची तयारी करून कसेंबसें तरी एखादें कोल्हें मारतील. अर्थात् यांचें पहिलं भाषण होऊन गेलें ह्मणजे पुढें या बुवांचे बहुधा कोणास नांवही ऐकूं येणार नाहीं! परंतु पार्नेलची निवडणूक केवळ त्याच्या भाषणावर अवलंबून नव्हती. त्याच्या जिल्ह्यांत त्याच्या घराण्याला फार मान होता व पुढील ह्मणजे १८७५ सालीं मीथ या भागाचेतर्फे त्यानें आरंभलेली उमेदवारी साधून त्याचा पार्लमेंटमध्यें प्रवेश झाला. या वेळीं होमरूलकरितां मत देण्याची शपथ घेतलेले असे ५९ आयरिश सभासद ब्रिटिश पार्लमेंटमध्यें निवडून आलेले होते व आयझॅक बट हा त्यांचा पुढारी होता. पार्लमेंटसभेमध्यें कांटेतोल शिस्तीनें वागणें हें आपलें कर्तव्य आहे, असें बट यानें भर पार्लमेंटमध्यें बोलून दाखविलें असल्यानें इंग्रज सभासदांची त्याजवर मर्जी असे; परंतु या मर्जीचा प्रत्यक्ष प्रसाद अगर फळ आयझॅक बट यास आपल्या राष्ट्राला आजपर्यंत मिळवून देतां आलें नव्हतें. शिवाय केवळ गोड स्वभावाच्या मनुष्याबद्दल कालांतरानें आदरमिश्रित असा एक प्रकारचा अनादर हळू हळू उत्पन्न होत असतो तसा पार्लमेंटमध्यें आयझॅक बट याजबद्दल उत्पन्न होऊं लागला होता. ही एकंदर परिस्थिति सर्व आयरिश सभासदांना पसंत होती असें नाहीं; परंतु बट यास जशी पार्लमेंट-

सभेची शिस्त मोडणें अवघड वाटत असे, त्याचप्रमाणें त्याच्या अनुयायांनाही बटच्या विरुद्ध वागण्याचें व उघड बोलण्याचें अवघड वाटे. तथापि या एकूणसाठांमध्यें एक आयरिश सभासद कर्मधर्मसंयोगानें असा होता कीं, त्यास कोणालाही टाकून बोलणें हा केवळ तळहाताचा मळ वाटे. याचें नांव जोसेफ बिगर असें होतें. कालांतरानें पार्नेल यानें बिगरपुढेंही आघाडी मारली. तरी प्रारंभीं बिगर हा पार्नेललला गुरुस्थानीं होता. बिगर हा निस्पृह व स्पष्टवक्ता तर होताच; परंतु स्पष्टवक्तेपणापेक्षांही त्याच्या स्वभावांतील धैर्य व भाषेंतील आडमुठेपणा, याचाच उपयोग प्रसंगविशेषीं अधिक होई. एवढी मोठी प्रतिष्ठित पार्लेमेंट सभा, पण ती त्याला निर्माल्यवत् वाटे ! या इंग्रज लोकांनीं आपलें ऐकावें अशी इच्छा कोणास असेल तर त्याचा गोड बोलून कधींही निभाव लागणार नाहीं; शब्दाचे दोन दणके देण्यास व घेण्यास त्यानें कंबर कसली पाहिजे, व जो सारासार विचार या इंग्रजांचे अंगीं कांटेरीजिभेच्या खराऱ्यानें घांसून भिनवितां येईल, तेवढाच कायतो त्यांच्या कातडीखालीं उतरेल—या इंग्रजांशीं मऊ बोलणें व पालथ्या घागरीवर पाणी ओतणें दोन्हीही सारखींच फलप्रद आहेत, असा बिगर याचा सिद्धांत ठरून चुकला होता. इंग्रजलोक व त्यांच्या संस्था यांजबद्दल त्यास काडीचाही आदर वाटत नसे, व यामुळें वेळअवेळ दोन्ही समान लेखून शिष्टाचाराच्या नियमांस धाब्यावर बसवून कोणीकडून तरी या इंग्रजांचे बोडक्यावर एक तडाका कसा मारतां येईल, याची संधि तो पहात असे. त्याचे अंगीं वक्तृत्व मुळींच नव्हतें; सुसंगत बोलणें कशाशीं खातात हें त्याच्या गांवींही नव्हतें. पुस्तकांतील आधार देणें हें रिकामटेकड्या लोकांचें काम असून, लोकांच्या विचारांचा आधार आपल्या भाषणास घेण्यांत पुरुषार्थ तो कोणता, असें तो ह्मणे. येऊन जाऊन त्याजवळ दोन मुख्य गोष्टी होत्या; एक धिटाई व दुसरी चिकाटी. या दोन गुणांच्या जोरावर पार्लमेंटमध्यें त्यानें थोडीबहुत चळवळ उडवून दिली होती, आणि शिष्ट व अशिष्ट यांची अवचित् गांठ पडली असतां जो एकप्रकारचा गोंधळ उडून जातो, तशाप्रकारचा गोंधळ बिगर याच्या भाषणानें पार्लमेंटमध्यें केव्हां केव्हां उडून जाई; व असा गोंधळ उडलेला पाहिला ह्मणजे आपण आज कृतकृत्य झालों, राष्ट्राची आपल्या हातून

थोडीबहुत सेवा घडली खास, असें त्यास वाटे. बिगर बोलावयास उठला म्हणजे इंग्रज सभासद कपाळास आंठ्या घालीत, खांदे उडवीत, तोंडानें संतापदर्शक चीत्कार करीत व आपापल्या जागीं चुळबुळत; परंतु सभासद बोलावयास उठला ह्मणजे त्यास थांबविण्याचा अधिकार कोणासच नसल्यामुळें बिगर याचें कडू भाषण कडू औषधाप्रमाणें तोंड वाईट करीत परंतु गटागटा त्यांना प्यावें लागे. बट व बिगर हीं दोन निरनिराळ्या प्रकारचीं ठळक उदाहरणें पार्नेल याच्या डोळ्यांपुढें पहिल्यापासून असल्यामुळें त्यांपैकीं कोणाचें अनुकरण करावें, याविषयींची त्याची शंका फार वेळ टिकली नाहीं. त्याला स्वतःला पार्लमेंटसभेंतील वादविवादाचे नियम चांगलेसे माहीत नव्हते; तथापि नियमांचें उल्लंघन करणें हा त्या नियमांचें शिक्षण घेण्याचा एक राजमान्य मार्गच आहे, असा युक्तिवाद आपल्या मनाशीं करून बिगर यानें घालून दिलेल्या मार्गानेंच जावयाचें, असा पार्नेल यानें लवकरच निश्चय केला.

पार्नेल यानें सन १८७५ सालीं एप्रिलच्या २२ व्या तारखेस पार्लमेंटचा सभासद या नात्यानें शपथ घेतली; परंतु तारीख ३० जूनपर्यंत त्यास सभेच्या कामांत कांहीं विशेष बोलण्याची संधि मिळाली नाहीं. सदरहु तारखेस आयझॅक बट याच्या होमरूलसंबंधाच्या ठरावावर वादविवाद चालला असतां सर मायकेल हिक्स बीच यानें मँचेस्टर येथें घडलेल्या प्रकारास उद्देशून फीनियन लोकांना खुनी असें उघड ह्मटलें, व या वेळीं मात्र पार्नेल याच्यानें गप्प बसवेना. व तो 'छे, छे, तो शब्द बरोबर नाहीं,' असें एकदम मोठ्या आवेशानें ओरडून ह्मणाला. त्याबरोबर सर्व सभागृह दचकल्यासारखें झालें. हिक्स बीच हा गहनगांभीर्याचा आविर्भाव आणून पार्नेल याजकडे बोट दाखवून खोल आवाजानें ह्मणाला, 'खुनाचें समर्थन करणारा असा एक सभासद या सभागृहांत आहे, याबद्दल मला खेद होतो.' व तो हे शब्द बोलतांच सर्व सभागृहांतून पार्नेल यास उद्देशून 'आपले शब्द परत घ्या, आपले शब्द परत घ्या.' असा एकदम ध्वनि उठला. परंतु या वादळास न जुमानतां पार्नेल हाही गंभीरपणानें उभा राहिला व म्हणाला, 'मँचेस्टर येथें घडलेल्या प्रकारांत कांहींही झालें असलें तरी तेथें कोणीही कोणाचाही खून केलेला नाहीं असें माझें ठाम मत आहे.

हें माझें मत यापुढेंही कायम राहील, व हें माझें मत जितक्या प्रसिद्धपणें मला बोलून दाखवितां येईल तितक्या प्रसिद्धपणें मी तें बोलून दाखविण्यास नेहमीं तयार असेन.' पार्नेलच्या या उत्तराचें सर्व आयरिश सभासदांनीं टाळ्यांच्या गजरानें समर्थन केलें, व इतकी झटापट झाल्यानंतर तो विषय तसाच सोडून देऊन हिक्स बीच होमरूलसंबंधानें पुढें बोलूं लागला.

या लहानशा प्रसंगानें पार्नेल याचें एक मोठेंच कार्य घडून आलें. तें असें कीं, पार्लमेंटमधील इंग्लिश सभासद व आयर्लंदमधील फीनियन लोक या दोघांचेंही लक्ष त्याजकडे एकदम वेधलें व या दोहोंचाही उपयोग त्याला पुढारीपण मिळण्याचे कामीं झाला. इंग्रज सभासदांस असें दिसून आलें कीं, जोसेफ बिगर या विक्षिप्त व्यक्तीची परंपरा चालविणारा एक नवीन प्राणी उत्पन्न झाला. इकडे फीनियन लोकांसही बटसारख्या गोडव्या पुढाऱ्याचा कंटाळा आलेला असल्यानें त्याचें उघडपणें समर्थन करणारा एक सभासद मिळाल्यामुळें त्यांस आनंद झाला. वर वर्णन केलेल्या प्रसंगाबद्दल फीनियन लोकांमध्यें पार्नेलसंबंधानें बरीच अनुकूल चर्चा झाली, व हा तरुण मनुष्य देशाचे कार्यास बराच उपयोगी पडेल अशी त्यांनीं आपल्या मनाशीं गांठ घालून यापुढें त्याजवर नेहमीं लक्ष ठेविलें. सन १८७६ च्या नोव्हेंबर महिन्यांत लिव्हरपूल येथें भाषण करतांना त्यानें असें उघड बोलून दाखविलें कीं, आयरिश लोकांमध्यें आत्मप्रत्यय असावा तितका नाहीं, एवढ्यानेंच सर्व नडतें आहे. तो उत्पन्न झाला असतां होमरूल मिळण्यास कांहीं एक अडचण पडणार नाहीं व तो मिळविल्याशिवाय कोणाही आयरिश मनुष्यानें संतुष्ट रहातां कामा नये.

इ. स. १८७७ सालीं पार्नेल हा पार्लमेंटमधील वादविवादांत अधिकाधिक मिसळूं लागला. त्यानें आपलें मुख्य धोरण असें ठेविलें होतें कीं, सभेच्या कामास होतां होईल तितका—पण पद्धतशीर रीतीनें—अडथळा करावयाचा. तो आपल्या सूचना व उपसूचना अशा खुबीदार रीतीनें सजवी कीं, सहज पहाणारास असें वाटावें कीं इंग्रज लोकांविषयीं हितबुद्धि मनांत बाळगूनच त्या तयार केलेल्या आहेत. तसेंच आपल्या भाषणांतही तो असा आविर्भाव आणी कीं, येऊन जाऊन सभेपुढें आलेल्या कामाची

चांगली शहानिशा होऊन तें तडीस लागावें, इतकाच काय तो वाद वाढविण्यांत आपला हेतु आहे; परंतु खरें वर्म वेगळेंच असे. कोणीकडून तरी सभेचा वेळ मोडावा, कोणत्याही कामीं अनेक तर्ककुतर्क निघावे व सभासदांस कामाचा कंटाळा यावा, एवढीच त्याची व बिगर याची इच्छा असे. ही अडवणुकीची पद्धति बट यास पसंत नव्हती, व तिचा भर पार्लमेंटमध्यें निषेध करून, आयरिश पक्षाचा पुढारी या नात्यानें आपल्या अनुयायांवर शिस्त चालवून हा निव्वळ अडवणुकीचा प्रकार बंद करावा असाही त्यानें प्रयत्न करून पाहिला; परंत आपलें करणें शिस्तीस सोडून नाहीं व आपण अनुयायी असलों तरी आपणासही मतस्वातंत्र्य असलें पाहिजे असें प्रतिपादून त्यानें आपलें समर्थन केलें.

हा असा प्रकार कांहीं दिवस चालल्यावर पार्लमेंटमधील वादविवादाच्या नियमांत दुरुस्ती केल्याशिवाय भागत नाहीं, असें इंग्रजी प्रधानमंडळास वाटूं लागलें; आणि दक्षिण आफ्रिकेसंबंधीं एका बिलावरील वादविवादांत 'वरील कारणाकरितां प्रधानमंडळाच्या हेतूचे सिद्धीस हरतऱ्हेनें अडथळा करण्यांत मला विशेष प्रकारचें समाधान वाटतें' या त्याच्या तोंडून निघालेल्या शब्दांचा फायदा घेऊन सर स्टॅफर्ड नॉर्थकोट यानें वादविवादाचे नियमांत फेरबदल करवून घेतले. शिस्त सोडून वागणाऱ्या सभासदास बाहेर घालवून देतां यावें व विनाकारण अडथळा करण्याच्या हेतूनें आणलेल्या सूचना वगळतां याव्या, अशी त्याची योजना होती. तथापि या योजनेचा फारसा उपयोग झाला नाहीं. कारण, कायदा मोडणारांचें चातुर्य नेहमीं कायदा करणाऱ्यांच्या चातुर्यापुढें धांव घेत असतें असा नेहमींचाच अनुभव आहे. वरील योजनेनंतर चारच दिवसांनीं जो एक वादविवाद झाला, त्यामुळें पार्लमेंट सभेची बैठक एकसारखी सव्वीस तासपर्यंत घोळली. या व अशा गोष्टीमुळें ते पार्नेलचा द्वेष करूं लागले. व अर्थात त्याचप्रमाणानें आयर्लंदमध्यें त्याची लोकप्रियता वाढूं लागली. पुढील ह्मणजे १८७८ सालीं आयरिश होमरूलसभेचें अध्यक्षस्थान आयझॅक बट याजकडून निघून पार्नेलकडे आलें. हें स्थित्यंतर होण्यास फीनियन लोकांची त्यास पुष्कळ मदत झाली. वास्तविक तो स्वतः फीनियन नव्हता; तथापि, फीनियन लोकांच्या चळवळीपासून ही जी अंतःस्फूर्ति

उत्पन्न होते तिचा फायदा पार्लमेंटमध्यें चळवळ करणाऱ्या लोकांनीं घेतला पाहिजे, दोहोंचीं प्रत्यक्ष कार्यें व साधनें जरी भिन्न असलीं तरी राष्ट्राचे कार्यास दोघेही आपापल्या समजुतीप्रमाणें व शक्तीप्रमाणें मदत करीत असतात. एकाचें काम जरी दुसऱ्यास साधणार नाहीं, म्हणून एकानें दुसऱ्याचे कामांत ढवळाढवळ करूं नये हें जरी योग्य असलें तरी दोघांनींही एकमेकांचें शत्रुत्व करतां कामा नये, व विनाकारण गैरसमज उत्पन्न न होऊं देतां एकापासून दुसऱ्यास जेवढी मदत मिळणें शक्य असेल तितकी त्यानें जरूर घ्यावी, असें त्याचें मत होतें. यामुळें पार्नेल हा स्वतः केव्हांही जरी फीनियन सभांचा सभासद झाला नाहीं, व पार्लमेंटच्या कामांत त्यानें फीनियन लोकांस फारशी ढवळाढवळ करूं दिली नाहीं, तरी त्यांशीं मिळून मिसळून वागण्याचें अथवा त्यांची स्फूर्ति व त्यांचा उद्योग यांचा राष्ट्रीय चळवळीस फायदा करून घेण्याचें त्यानें केव्हांही नाकारलें नाहीं. फीनियन लोकांच्या मतें पार्लमेंट हें एक निव्वळ खेळणें असून तेथील काम व वादविवाद हा एक प्रकारचा चावटपणा किंवा वेळ दवडण्याचा उपाय आहे असें ते म्हणत. पार्नेल असें म्हणे कीं, 'नुसत्या बेकायदेशीर चळवळीनें तरी कोणतें कार्य आजपर्यंत नांवारूपास आलें अगर सिद्धीस गेलें ? केवळ दांडगाईच्या चळवळी आयर्लंडांत आजवर फसल्याच कीं नाहीं ? तात्पर्य, तुमचा मार्ग तुम्ही चालवा, आमचा आम्ही चालवितों. तुमच्या मार्गांत जशी आम्ही आडकाठी आणीत नाहीं, तशी आमच्या या उघड चळवळीच्या मार्गांत तुम्हीही अडथळा आणूं नये.' आयझॅक बट व ओकॉनेल यांनींही जवळजवळ असेंच म्हटलें असतें; परंतु फीनियन लोकांशीं सार्वजनिक कामांत मिसळण्यास ते भीत व देशाचे हितशत्रु असल्याप्रमाणें त्यांस वागवीत. पार्नेलचा प्रकार वेगळा होता. समाजांतील अवयव या नात्यानें तो त्यांच्याशीं खुशाल दळणवळण ठेवी व आपल्या चळवळींत त्यांचा बिनदिकत उपयोग करून घेई; तथापि त्यांचा पगडा आपल्यावर बसूं नये, अशी तो चांगली खबरदारी घेई. यामुळें कोणास अंगीं लावतां येईल, अशा रीतीचा संसर्ग फीनियन लोकांशीं न ठेवितांही त्यांचें प्रेम पार्नेल यास संपादन करतां आलें. या सुमारास डिव्हॉय व डेव्हिट या दोन फीनियन पुढाऱ्यांशीं पार्नेल

याचें दळणवळण सुरू झालें. तथापि वर सांगितल्याप्रमाणें आपली छाप त्यांच्यावर ठेवून त्यानें आपल्या म्हणजे उघड चळवळीकडेसच त्यांस ओढलें. इंग्रजांना त्रासच द्यावयाचा व बाऊच दाखवावयाचा; परंतु तो पार्लमेंटमधील वादविवाद व आयर्लंदमधील उघड चळवळ यांच्यायोगानेंच आपण दाखवूं, अशी त्यानें फीनियन लोकांची समजूत घातली. आजपर्यंत राष्ट्रीय चळवळ ह्मणजे येऊन जाऊन हत्यार उपसून उठणें, अशी जी फीनियन लोकांची समजूत होती ती त्यानें घालविली. हत्यार उपसणें म्हणजे जिवावर उदार होणें व जिवावर उदार होणारे लोक कोणत्याही समाजांत केव्हांही थोडेच असणार. थोड्या लोकांनीं केलेली चळवळ साध्य होत नाहीं, व बहुजनसमाजाला केवळ मानसिक ध्येय पटत नसून त्यांच्या बऱ्यावाईटाचा ज्यांत प्रत्यक्ष संबंध आहे, अशी चळवळ केली तरच ती त्यांना समजते, व तींतच ते अंशभागी होऊं शकतात. यास्तव आयरिश शेतकरीवर्ग हातीं घेऊन केलेली चळवळच गेली तर सिद्धीस जाईल, असा युक्तिवाद मनाशीं करून सन १८७९ सालीं आक्टोबरचे २१ व्या तारखेस आयरिश लँडलीग नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेचा हेतु आयरिश शेतकऱ्यांवरील बोजा कमी करून इंग्रज जमीनदारांपासून त्यांचें रक्षण करावयाचें व ते कालांतरानें आपल्या जमिनींचे मालक होतील असे कायदे पार्लमेंट सभेकडून करवावयाचे, असा होता.

पुढील सालीं पार्नेल हा लँडलीगचीं तत्त्वें समजून सांगण्याकरितां अमेरिकेंत गेला. या सफरींत दोन महिन्यांचे अवधींत त्यानें सुमारें अकरा हजार मैल जमिनीवरील प्रवास केला, बासष्ट शहरीं व्याख्यानें दिलीं व तेथून आपल्या संस्थेस सुमारें चार लक्ष रुपये वर्गणी गोळा करून आणली. ठिकठिकाणीं लोकांनीं व अमेरिकन अधिकाऱ्यांनीं त्याचा बडेजाव व सत्कार केला. व अखेर अमेरिकेमध्यें लँडलीगची एक शाखा स्थापन करून तो आयर्लंदास परत आला. त्याच सालीं एप्रिल महिन्यामध्यें पार्लमेंटच्या नवीन निवडणुकी झाल्या, त्यामध्यें मीथ, मेयो व कॉर्क या तीन शहरांनीं पार्नेल यास आपला सभासद म्हणून निवडून दिलें. नंतर लगेच पार्लमेंटमध्यें त्यानें आयरिश शेतकऱ्यांचे विषयाची चर्चा सुरू केली. या चळवळीस आयर्लंद-

मधील लँड लीग सभेच्या चळवळीची फार मदत झाली. तारीख १९ सप्टेंबर १८८० रोजीं एनिस येथें शेतकऱ्यांच्या स्थितीबद्दल भाषण करतांना, शेतकऱ्यांच्या हितशत्रूंस लोकांनीं कसें वागवावें याची त्यानें चर्चा केली; व अशा लोकांस सार्वत्रिक बहिष्कार घालावा असें सांगितलें. या उपदेशाचा प्रथम परिणाम कॅप्टन बॉयकॉट नांवाच्या एका जमीनदाराच्या मुखत्यारावर झाला. तो असा कीं, खुद्द त्याच्या चाकरांनींही त्याजवर बहिष्कार घातला. सर्व समाज आपणास एखाद्या महारोग्याप्रमाणें दूर ठेवीत आहे व अस्पृश्य मानीत आहे अशी प्रतीति त्यास पटली. या एका उदाहरणामागून अशींच शेंकडों उदाहरणें होऊं लागलीं. आयरिश शेतकरी व त्यांचे साहाय्यकर्ते यांस आपल्या हातीं एक अश्रुतपूर्व असें अस्त्रच लाधलें असें वाटूं लागलें. सर्व देश सभा व बहिष्काराचीं व्याख्यानें यांनीं खळबळून गेला. व या चळवळीची अधिक उपेक्षा करतां येत नाहीं असें ठरवून पार्नेल, डिलन, बिगर वगैरे चवदा असाम्यांवर बेकायदेशीर कृत्यास चिथावणी दिल्याचे आरोपावरून खटला करण्यांत आला. हा मुकद्दमा दोन न्यायाधीश व ज्यूरी यांजपुढें एकवीस दिवस चालून, तारीख २५ जानेवारी १८८१ रोजीं ज्यूरींतील १२ पैकीं १० असामींनीं आरोपी निर्दोषी आहेत असा अभिप्राय दिला, अर्थात् सर्व आरोपींस सोडून द्यावें लागलें. यामुळें न्याय कोर्टाखेरीज अन्य रीतींनीं लोकांस पकडून तुरुंगांत टाकतां यावें असे अधिकार आयर्लंदचे व्हाइसरॉय लॉर्ड कूपर यांनीं पार्लमेंटाकडून मिळविले व त्यांच्या जोरावर आयरिश अधिकाऱ्यांनीं १८८१ सालीं शेंकडों आयरिश गृहस्थांस तुरुंगांत घातलें.

मुख्य प्रधान ग्लॅड्स्टन यास आयर्लंदची स्थिति माहीत नव्हती असें नाहीं. व त्यानें आपण होऊन आयरिश शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरितां १८८० सालीं जमिनीबाबत कायदा पार्लमेंटमध्यें पास करून घेतलेला होता; तथापि त्यांतील कलमें आयरिश लोकांस सर्वस्वी मान्य नसल्यामुळें, त्या कायद्यांत दिलेल्या सवलतींचा फायदा होतां होई तों न घेतां शेतकऱ्यांनीं आपल्या जुन्या म्हणजे स्वावलंबनाच्या पद्धतीनें आपला न्याय करवून घ्यावा अशी शिकवणी लँड लीगच्या चालकांनीं दिल्यावरून फिरून पर्ववत् अस्वस्थता माजली व दंगेधोपे सुरू झाले. पार्नेलच्या या कृत्याचा ग्लॅड्-

स्टन यानें जोरानें निषेध केला; व पार्नेल वगैरे मंडळीस तुरुंगांत घातल्याशिवाय नवीन कायद्याची अंमलबजावणी नीट होणार नाहीं, असें मनाशीं ठरविलें. तारीख १२ आक्टोबर १८८१ रोजीं वारंटावर सह्या होऊन लगेच त्यास पकडून किल्माईनहॅम येथील तुरुंगांत टाकण्यांत आलें. पार्नेल व त्याचे साथीदार यांस तुरुंगांत टाकल्यानें आयर्लंदांत शांतता होईल असें अधिकाऱ्यांस वाटत होतें; परंतु ही त्यांची अटकळ चुकली. पार्नेलनेंही तुरुंगांतून आपल्या लोकांस असा निरोप पाठविला कीं, माझी सुटका तुरुंगांतून लवकर झाल्यास आयरिश लोकांनीं आपलें कर्तव्य बजाविलें नाहीं असें मी समजेन. पार्नेल यास तुरुंगांत घालून कांहीं दिवस लोटतात तोंच शेतकऱ्यांनीं जमीनदारांस मुळीं धाराच देऊं नये, अशा शिकवणीचा जाहीरनामा लॅंडलीगच्या चालकांनीं प्रसिद्ध केला. त्यावर पार्नेल वगैरे पुढाऱ्यांच्या सह्या असल्यामुळें त्याला महत्त्व आलें. तुरुंगांत गेलेल्या आपल्या पुढाऱ्यांची ही एक पवित्र आज्ञाच असें समजून लोकांनीं त्या जाहिरनाम्याप्रमाणें वर्तन सुरू केलें. अधिकाऱ्यांच्या वर्तनामुळें त्वेष येऊन कुलस्त्रियाही या चळवळींत सामिल झाल्या. दडपशाहीच्या कायद्यापूर्वी राजकीय गुन्हे घडत ते या कायद्यानें न थांबतां त्यांची संख्या उलट तिप्पट वाढली. ठिकठिकाणीं लॅंडलीगच्या शाखा स्थापन होऊन इतकी जोरानें चळवळ सुरू झाली कीं, एक मनुष्य कैद झाल्याबरोबर त्याच्या पावलावर पाऊल ठेऊन तेंच काम चालविण्यास दुसरा मनुष्य आपोआप उत्पन्न होऊं लागला व अखेर खुद्द ग्लॅड्स्टन यांसही आपलें धोरण बदलावें असं वाटूं लागलें. पार्नेल व ग्लॅड्स्टन दोघांसही, तोडजोड करावी अशी एकसमयावच्छेदेंकरून इच्छा उत्पन्न होऊन मध्यस्थांच्या खटपटीनें उभयतांचा तह ठरला. या तहाचीं मुख्य कलमें तीन होतीं. १८८० सालच्या जमीनबाबदच्या कायद्याची व्याप्ति पूर्वीहून अधिक विस्तृत करावी; शेतकऱ्यांचे डोक्यावरचा शिलकी खंडाचा बोजा खरोखर असह्य असल्यामुळें त्याची फेड परस्पर होईल अशी वाटेल ती तोड अधिकाऱ्यांनीं काढावी; व वरील दोन गोष्टी ग्लॅड्स्टनसाहेब करण्यास तयार असतील तर पार्नेलप्रभृतींनीं शेतकऱ्यांनीं खंड न देण्यासंबंधाचा काढलेला जाहिरनामा परत घ्यावा.

अशा रीतीचा तह झाला असतां दंगेधोपे आपोआपच कमी होतील असें पार्नेल याचें ह्मणणें होतें. स्वतःची सुटका होणें ही एक अट ह्मणून जरी या तहांत घातली नव्हती, तरी अशा रीतीनें सलोखा झाल्यानंतर पार्नेल यास तुरुंगांत ठेवणें बरोबर होणार नाहीं असें ग्लॅडस्टनसाहेबांस वाटणेंही स्वाभाविक होतें. हा तह ठरल्यावर पार्नेल याची सुटका करण्याचा ब्रिटिश प्रधानमंडळानें हुकूम सोडला व त्याची सुटका झाली. परंतु ही गोष्ट आयरिश सेक्रेटरी मि. फॉर्स्टर यास पसंत न पडल्यामुळें त्यानें आपल्या प्रधानकीच्या जागेचा राजीनामा दिला. परंतु इतक्या महत्प्रयासानें घडून आलेला हा तह फार दिवस टिकला नाहीं. कारण, तारीख ६ मे रोजीं आयर्लंदचा नवीन मुख्य सेक्रेटरी लॉर्ड फ्रेड्रिक क्याव्हेंडिश व मि. बर्क या गृहस्थांचे, फिनिक्स पार्क नांवाच्या बागेंत सरकारी बंगल्याजवळ दिवसाढवळ्या कोणीं दुष्टांनीं सुऱ्या चालवून खून केले. व या खुनांनीं सर्व इंग्लंडभर क्रोधाची आग इतकी जबरदस्त उठली कीं, तिच्या ज्वालांनीं व धुरानें शत्रु, मित्र यांचीं मनें धुंद होऊन जाऊन प्रगतीचा मार्ग एकदम खुंटला. वास्तविक या क्षणीं पार्नेल याच्या सुयशाचा कळस झाला होता. कारण, आपल्या चळवळीच्या सामर्थ्यानें त्यानें मुख्य प्रधानाचें धोरण सर्वस्वी बदलून टाकलें होतें, आयरिश लोकांस खुष करण्याकरितां प्रधानमंडळाला आपल्यांपैकीं एक मोहरा खर्चीं घालणें भाग पडलें होतें, व प्रगतीचा मार्ग किंचित् उजळला होता. या स्थितीचा फायदा शांतता टिकती तर पार्नेल यास चांगलाच घ्यावयास सांपडला असता; परंतु पार्नेलच्या सिद्धिरूपी अमृताच्या पेल्यांत अगदीं आयत्या वेळीं अशा रीतीनें विष कालविलें गेलें. बेजबाबदार माथेफिरू लोकांनीं क्याव्हेंडिश व बर्क यांजवर खरा घाला घातला नसून तो आपल्यावर घातला गेला, असें वाटून त्याच्या मनास फार मोठा धक्का बसला. या खुनानें आपण रचलेली सर्व इमारत ढांसळून जाणार, असें त्यास वाटलें. अशा अघटित घटना दैव घडवून आणूं लागलें तर मनुष्यप्रयत्न कोठवर सुरळीत चालणार ? पुढाऱ्यांनीं हरप्रयत्नांनीं एक पाऊल पुढें टाकावें, तर अनुयायी म्हणविणाऱ्या भलत्याच लोकांनीं दुसरें पाऊल मागें ओढावें ! तस्मात् हें पुढारीपणही नको व ही सार्वजनिक चळवळही नको, ही सोडून देऊन घरीं जाऊन स्वस्थ बसावें असें वाटण्या-

पासही झालें ! तथापि पार्नेलच्या मनावरचा खुनाचा परिणाम अद्यापि कमी झाला नव्हता. व आयर्लंदांत परत येतांच राजकीय चळवळ कांहीं दिवस तरी बंद करण्याची ही वेळ आहे, असा आपल्या अनुयायांस त्यानें आग्रहानें उपदेश केला.हा त्याचा उपदेश त्याच्या सहकारी लोकांस पसंत पडला नाहीं. कित्येक लोक त्यास ‘ आतां हा मवाळ बनला-याचें अवतारकृत्य संपलें-हा जळता निखारा पिचून याची राख झाली-यापुढें दुसरा एखादा जहाल पुढारी पाहिला पाहिजे ’ असें म्हणू लागले. कित्येक फीनियन लोक तर त्याच्या शांततेच्या धोरणास कंटाळून अमेरिकेंत निघून गेले. तथापि पार्नेल याचा अगदींच स्वस्थ बसण्याचा विचार नव्हता. जमिनी-बाबतची चळवळ कांहीं दिवस थांबवून तिच्या ऐवजीं राष्ट्रीय स्वातंत्र्याची अर्थात् होमरूलची चळवळ फिरून सुरू करावी असें त्यानें योजिलें. ता. १६ आगस्ट रोजीं दब्लिन येथील म्युनिसिपालिटीनें त्यास नागारकत्वाचे हक्क नजर केले, त्या वेळीं आपली योजना लोकांपुढें उघड रीतीनें त्यानें मांडली. ही योजना सफल करण्याकरितां ता. १७ आक्टोबर १८८२ रोजीं नॅशनल लीग ( राष्ट्रीयमंडळ ) नांवाची संस्था स्थापण्यांत आली. स्वतंत्र पार्लमेंट व जमिनीची मालकी हें या संस्थेचें साध्य व सनदशीर राजकीय चळवळ हें तिचें साधन, असें यथाविधिपूर्वक प्रसिद्ध करण्यांत आलें. इंग्रज लोक काय म्हणतील याबद्दल त्यानें केव्हांही फिकिर केली नाहीं; परंतु राजकीय चळवळींत पुढाऱ्याचें काम बेजबाबदार अनुयायांनीं आपल्या हातीं घेतलें ह्मणजे मात्र धडगत नाहीं असें तो ह्मणे. परंतु डिलन व डेव्हिट हे दोघेही यावेळीं पार्नेलपेक्षां अधिक जहाल होते; व पार्नेलनें अशा वेळीं चळवळीच्या यंत्राचा वेग कमी केला ही गोष्ट त्यांस आवडली नाहीं. १८८२ सालापासून पुढें त्याचें व आत्यंतिक जहाल लोकांचें याच कारणावरून मधून मधून भांडण होऊं लागलें. तो लिबरल पक्षाच्या कह्यांत गेला, असल्या प्रकारचा आरोप त्याजवर आणणें शक्य नव्हतें; तसेंच त्याच्या पाठीवर हात फिरवून व त्याला गोंजारून त्याच्या अंगावरचे कांटे काढून टाकण्यास व अशा रीतीनें त्याला निरुपद्रवी करण्यास मी समर्थ होईन असें कोणाचे स्वप्नींही येत नव्हतें; तथापि गाणाऱ्याला अगर वक्त्याला ज्याप्रमाणें आपल्या स्वरांत चढउतार करावा

लागतो, त्याचप्रमाणें राजकीय पुढाऱ्यांसही वेळवखत पाहून चळवळीच्या यंत्राची गति कमजास्त करावी लागते, ही गोष्ट अदूरदर्शी अनुयायांच्या लक्षांत न आल्यामुळें ते पुढाऱ्यांस नांवें ठेवतात; व तोच प्रकार पार्नेलचाही झाला.

पार्लमेंट सभेमध्यें फॉर्स्टरप्रभृति लोकांनीं पार्नेलवर उघड व आडून वृथारोपाच्या बऱ्याच गोळ्या झाडल्या. परंतु या आरोपास त्यानें तुच्छ लेखिलें व त्यास उत्तर देण्याच्या भानगडींत तो फारसा पडला नाहीं. किंबहुना असें म्हणतां येईल कीं, वर सांगितलेल्या जाहिरनाम्यामध्यें थोडक्याच परंतु शेलक्या व सणसणीत शब्दानीं अत्याचारांचा जो निषेध केला होता, त्याखेरीज भाषणानें अगर लेखनानें निषेधाची भर घालण्याचे भरीस तो पडला नाहीं. अत्याचारांचा निषेध व्यक्त करणें हें जरी राजकीय पुढाऱ्यांचें कर्तव्य असलें, तरी उठल्या सुटल्या तेंच रडगाणें दिवसभर त्यांनीं गात बसावें हें त्यास पसंत नव्हतें. देशांत शांतता राखणें अगर गुन्ह्यांचा निरोध करणें हें सरकारचें काम आहे व त्या बाबतींत लोकांची अपेक्षा कांहीं मर्यादेपलीकडे सरकारनें करणें अगर ते करीत नाहींत म्हणून लोकांस नांवें ठेवणें हें योग्य नाहीं असें त्याचें मत होतें. असो; पार्लमेंटमधील एकतर्फी वादविवादावरच सर्व थांबलें. पुढील सालीं पार्लमेंटच्या निवडणुकीचे व इतर खर्च भागविण्याकरितां आयरिश लोकांनीं वर्गणी करून ३० हजार पौंडाची थैली पार्नेल यास नजर केली व अशा रीतीनें पुढारी या नात्यानें त्यानें केलेल्या कामाबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली. सन १८८५ सालीं आयरिश मतदारांचा वर्ग नवीन निवडणुकीमध्यें होमरूलला अनुकूल असे जावयाचे तितके सभासद निवडून दिले गेले. परंतु पार्लमेंटमध्यें टोरीपक्षाचें बहुमत झालें ही गोष्ट आयर्लंदास एका प्रकारें फायद्याचीच झाली. कारण त्यास विरोधी असे ग्लॅडस्टन, चर्चिल व चेंबरलेन वगैरे पुढारी असून त्यांच्या हातून आयरिश राष्ट्रीय पक्षास फायदेशीर अशीं कामें चुरशीनें घडून येण्याचा संभव होता व ही गोष्ट लवकरच प्रत्ययासही आली. ही स्थिति लक्षांत घेऊन लिबरल पक्षाच्या मदतीनें टोरी प्रधानमंडळास त्रास देण्यास पार्नेल यानें सुरुवात केली. या सुमारास टोरी व लिबरल हे पक्ष जवळ जवळ समबल असून आयरिश पक्षाचें वजन ज्या पारड्यांत

पडेल तें पारडें जड व्हावयाचें अशी वस्तुस्थिति असल्यामुळें, आळी-पाळीनें प्रत्येक पक्षास मदत करून चढउताराची लीला करण्यांत पार्नेल यास मौज वाटे व त्यांत त्याच्या राष्ट्राचा फायदाही होई. सन १८८५ मध्यें अधिकारारूढ झालेल्या टोरी प्रधानमंडळानें आयरिश-पक्षाचे उपकार स्मरून दडपशाहीच्या कायद्यांची वार्षिक पुनरावृत्ति केली नाहीं. हा फायदा पदरांत पाडल्यानंतर लॉर्ड कार्नेरव्हॉन यांचेमार्फत होम-रूलासंबंधाची वाटाघाट लिबरलपक्षाशीं करण्यास त्यानें सुरुवात केली. लवकरच पार्लमेंटरी निवडणुकीची फिरून तयारी झाली व मतदारांस उद्देशून लिबरल मुत्सद्यांनीं व विशेषतः ग्लॅडस्टनसाहेबांनीं जे जाहिरनामे प्रसिद्ध केले त्यांजवरून होमरूलचा प्रश्न पार्लमेंटपुढें लवकरच येणार असें उघड दिसूं लागलें. सदर निवडणुकींत ३३५ लिबरल व २४९ कान्झरव्हेटिव असे सभासद निवडून आले. अर्थात् ग्लॅडस्टनसाहेबांच्या पक्षास ८६ मतें म्हणजे सभासद अधिक होते. परंतु याच निवडणुकींत १०३ आयरिश सभासदांपैकीं ८५ होमरूल पक्षाचे व एकजुटीनें काम करणारे असल्यामुळें पार्नेल हा ज्या पक्षास मिळेल त्याचीच सरशी होणार हें उघड होतें. अर्थात् लिबरल पक्षास मिळालेली सत्ता गमवावयाची नसेल तर त्यांनीं होमरूलच्या प्रश्नाचें समर्थन केलें पाहिजे याशिवाय गत्यंतर नव्हतें व अखेर १८८६ सालीं एप्रिलच्या ८ व्या तारखेस ग्लॅडस्टनसाहेबांनीं होम-रूल बिल पुढें आणिलें. परंतु पार्नेलच्या मार्गांत अनपेक्षित अशी एक अडचण आली. कित्येक लिबरल मुत्सद्यांस होमरूलचा प्रश्न इतका अप्रिय झाला कीं, लिबरल प्रधानमंडळ फिरून स्थानभ्रष्ट झालें तरी बेहत्तर आहे, परंतु आयर्लंडला स्वतंत्र पार्लमेंट म्हणून द्यावयाचें नाहीं असा नि-श्चय त्यांनीं केल्यामुळें लिबरल पक्षांत फूट झाली व तारीख ७ जून रोजीं ३१३ विरुध्द ३४३ मतें पडून होमरूल बिल नापसंत झालें. लिबरल प्रधान-मंडळानें राजीनामा दिला व फिरून निवडणुकीची धामधूम सुरू झाली. या पराभवामुळें पार्नेलच्या मनांत अत्यंत खिन्नता आली. तथापि एकंदर लोकमताच्या दृष्टीनें झालें इतकेंही कार्य कांहीं थोडें नाहीं व यापूर्वीं ८० वर्षेंपर्यंत आयरिश पुढाऱ्यांच्या हातून जितकी कामगिरी झाली नव्हती तितकी एकट्या पार्नेलनें १० वर्षांत केली असें शत्रु व मित्र हे दोघेही

ह्मणूं लागले. नवीन निवडणुकींत होमरूल पक्षास अनुकूल असे ८५ सभासद फिरून निवडून देण्यांत आले आणि नवीन पार्लमेंट सभेंत जमिनीचा व होमरुलाचा असे दोन्ही प्रश्न फिरून वादविवादासाठीं आणण्याची तयारी झाली. जमिनीसंबंधाचें पार्नेलनें आणलेलें बिल पार्लमेंटनें नापास केल्यामुळें स्वतः पार्नेल जरी फारसा अनुकूल नव्हता तरी विलियम ओब्रायन वगैरे तरुण पुढाऱ्यांनीं फिरून चळवळ सुरू केली. दुर्दैवानें त्याच सालीं धान्य स्वस्त झाल्यामुळें शेतकरी लोकांचा तोटा होऊन किरकोळ दंग्याधोप्यास फिरून सुरुवात झाली; परंतु मुख्य चळवळीला जोर राहिला नाहीं.

सन १८८७ सालीं पार्नेलची मान्यता वाढण्यास एक बाह्य आगंतुक कारण उत्पन्न झालें. लंडन टाईम्स हें प्रमुख वर्तमानपत्र पार्नेलचें पहिल्यापासून हितशत्रुत्व करीत होतें, हें शत्रुत्व साधण्याची मुख्य विद्या अशी होती कीं, देशांत घडणारे अत्याचार व देशांतील राजकीय पुढारी यांचा संबंध आहे असें हरप्रयत्नानें दाखवावयाचें. टाईम्सचें धोरण असें असल्यामुळें त्याचा फायदा घेऊन पार्नेलवर सूड उगवावा व आपलीही तुंबडी भरावी, अशा दुहेरी हेतूनें पिगट नांवाच्या एका देशद्रोही अधमानें कांहीं बनावट पत्रें तयार केलीं. त्यांतील एक दोन पत्रांवर पार्नेलच्या खोट्या सह्या बनवून, फिनिक्स पार्कमध्यें झालेले खून त्यास मनांतून पसंत होते असें सिद्ध करण्यासारखा मजकूर त्यांत लिहिलेला होता. हीं पत्रें हातोहात लांबतां लांबतां आपणास अमेरिकेंत महत्प्रयासानें मिळालीं, असें पिगट यानें टाईम्सच्या व्यवस्थापकास भासवून या बनावट पत्रांचें मूल्य वाढविलें व अखेर ८५० पौंडास तीं त्यास विकलीं. असलें अमोघ शस्त्र हातीं येतांच त्याचा पार्नेलवर उपयोग टाईम्स पत्रानें मोठ्या आढ्यतेनें केला. पार्नेलचीं खुद्द स्वदस्तुरचीं पत्रें प्रसिद्ध झाल्यामुळें अत्याचारी लोकांस तो सहाय्य करितो हा जो त्याच्यावर आक्षेप होता, त्याच्या पुराव्याचें माप त्याच्या पदरांत बिनतोड बांधलें गेलें. असें झाल्यानें सर्व देशभर एकच चळवळ उडून गेली. या बनावट पत्रांपैकीं एकांतील मजकूर खालीं लिहिल्याप्रमाणें होता.

" विनंति विशेष—आपले स्नेही रागावले याचें मला कांहीं आश्चर्य

वाटत नाहीं; परंतु ते काय व तुम्ही काय दोघांनींही हें ध्यानांत आणिलें पाहिजे कीं, खुनांचा उघड निषेध करण्याखेरीज मला दुसरा मार्गच नव्हता. खुनांचा निषेध तत्काळ करणेंच त्या वेळीं खरें शहाणपण होतें, हें अगदीं उघड आहे. परंतु मी तुह्मांस असें सांगतों कीं, लॉर्ड क्याव्हेनडिश यांना जो विनाकारण अपघात झाला, त्याजबद्दल जरी मला खेद होतो, तरी बर्क यास मात्र झालें तें शासन यथायोग्य झालें; त्यांत कांहींएक वावगें झालें नाहीं असें माझें मत आहे. व माझें हें असें मत असल्याबद्दल ज्यांना ज्यांना ह्मणून कळविण्याचें अगत्य असेल त्यांस तुम्हीं खुशाल कळवा. आणि तसेंच जे तुमच्या विश्वासांतले असतील, त्यांना हें पत्र खुशाल दाखवा, त्यास माझी कांहीं हरकत नाहीं. तथापि, माझा पत्ता मात्र कोणासच कळूं देऊं नका. आपला,

चार्लस् स्टुअर्ट पार्नेल."

हें पत्र तारीख १८ एप्रिल रोजीं प्रसिद्ध झालें. व त्या एका पत्रानें सर्व होमरूलच्या चळवळीचें कांडांत काढलें असें जो तो ह्मणूं लागला. त्या दिवशीं संध्याकाळपयर्त पार्नेलला त्या पत्राची बातमीच समजली नव्हती. संध्याकाळीं पार्लमेंटमध्यें गेल्यावर त्यानें तें पत्र पाहिलें; व लगेच 'हें पत्र निखालस बनावट आहे व हें अगर अशा अर्थाचें दुसरें एखादें पत्र मी केव्हांही कोणासही लिहिलेलें नाहीं,' असें गंभीर शब्दांनीं त्यानें जाहीर केलें. पार्नेलच्या शत्रूसही हें त्याचें विधान निव्वळ खोटें असें मानण्याची छाती नसल्यामुळें सकाळीं पत्र प्रसिद्ध झाल्यापासून त्यास प्रतिकूल अशी जी मानसिक क्रिया लोकांमध्यें सुरू झाली होती, तिला पार्नेलच्या तोंडच्या या उत्तरानें एकदम आळा बसला व प्रतिक्रियाही सुरू झाली. तथापि पार्नेल व टाईम्स या दोघांचीही इभ्रत सारखीच असल्यामुळें या दोहोंतून कोणी तरी एक खोटा असें सप्रमाण शाबित झाल्याशिवाय या कोड्याचा उलगडा होणें शक्य नाहीं, हें उघड होतें. हें कोडें कसें उलगडणार व या दोन महारथ्यांपैकीं कोण पडणार याकडे सर्व लोकांचे डोळे लागून राहिले. तथापि पुढें पाऊल कोणच्या रीतीनें टाकावें याचा निर्णय लवकर होईना, यामुळें सुमारें तीन महिनेपर्यंत विशेष म्हणण्यासारखें कांहीं एक घडून आलें नाहीं. परंतु ओडॉनेल या नांवाच्या एका आयरिश सभासदानें टाईम्स-

विरुद्ध केलेल्या अब्रुनुकसानीच्या फिर्यादीच्या कामीं सरकारी वकील सर रिचर्ड वेबस्टर यांनीं फिरून पार्नेलवर जुने आरोप आगले व आयरिश पुढारी लोक अत्याचारांस मदत करतात असा उघड सवाल टाकला. त्यावरून आतां अधिक उपेक्षा करितां कामा नये असा पार्नेल यानें निश्चय करून पार्लमेंट सभेनें पोट कमिटी नेमून माझ्यावरील आरोपांची प्रसिद्धपणें चौकशी करावी, अशी उघड मागणी केली. परंतु पोट कमिटीचे ऐवजीं तीन न्यायाधिशांचे स्वतंत्र कमिशन नेमण्याचें सभेनें ठरविलें व एकंदर राजकीय चळवळ व अत्याचार यांचा संबंध कितपत सिद्ध करितां येतो हें पुराव्यानें ठरविण्याचें काम त्यांजकडे दिलें.

बाकीच्या आरोपांबद्दल पार्नेल यानें फारशी फिकिर केली नाहीं. ते शाबीद झाले काय किंवा नाशाबीद झाले काय, त्याची त्यानें फारशी पर्वा केली नाहीं. परंतु वर दिलेल्या पत्रासंबंधानें मात्र त्याच्या मनाला अत्यंत रुखरुख लागून राहिली होती व हा बनावट कागद करणारा गुन्हेगार कसा सांपडेल, या गोष्टीकडे त्याचें सर्व लक्ष लागून राहिलें होतें. पत्रांत कांहीं अक्षरें पार्नेलच्या हस्ताक्षराहून अगदीं निराळ्या वळणाचीं होतीं व एक दोन शब्द तर अगदीं अशुद्ध लिहिलेले होते. ह्या गोष्टीवरून गुन्हेगाराचा पत्ता लागावा असा अजमास होता व तोच खरा ठरला. पार्नेलचा सहकारी व लँडलीगचा एक सेक्रेटरी पॅट्रीक ईगन नांवाचा आयरिशमन होता. त्याजजवळ पिगट यानें लिहिलेलीं दुसरी कांहीं पत्रें होतीं व त्या पत्रांमध्यें नेमक्या वर सांगितलेल्या चुकाच केलेल्या होत्या. या गोष्टीवरून पिगटवरील आपला संशय ईगन यानें पार्नेल व त्याची मित्रमंडळी यांना सांगितला. त्यावरून पिगट यास प्रतिवादीतर्फे साक्षीसमन्स काढण्यांत आलें तारीख २० फेब्रुवारी १८८९ रोजीं पिगट याची कमिशनपुढें साक्ष झाली. त्या प्रसंगीं पार्नेलचा वकील सर चार्लस रसेल यानें पिगट यास उलट तपासणीमध्यें पापडासारखा भाजून काढिला. आपण हीं पत्रें बटावट केलीं ही गोष्ट स्पष्ट नाहीं तरी पर्यायशब्दानें त्यास कबूल करावी लागली. व पिंजऱ्यांतून खालीं उतरतांना त्याचा निःस्तेज व घामानें डबडबलेला चेहरा पाहतांच कोर्टांतील प्रत्येक मनुष्यानें खटल्याचा निकाल आपल्या मनाशीं दिला. त्या दिवसापासून पुढें खटला ऐकण्यास कोर्टांत जी गर्दी

वर्षांच्या कारकीर्दींत राजकीय पुढारी या नात्यानें त्यानें जी कामागिरी केली तिच्यायोगानें मिळालेल्या कीर्तीच्या सोपानपरंपरेनें तो शत्रु व मित्र यांच्या मनांत मान्यतेच्या शिखरास जाऊन पोहोंचला.

मात्र त्याच्या यशाचा हा कळसच झाला. कारण, लवकरच या यशाचे ऱ्हासास सुरुवात झाली. यापुढील त्याच्या मृत्यूपर्यंतचा काळ जरी अवघा दोन वर्षांचा होता, तरी तो फार त्रासांत व दुःखांत गेला, कारण, ता. २४ डिसेंबर १८८९ रोजीं कॅप्टन ओशिया नामक आयरिश सभासदानें आपल्या बायकोवर घटस्फोटाचा दावा कोर्टांत आणून त्यामध्यें पार्नेल यास प्रतिवादी केलें होतें. अर्थात् पिगटच्या साक्षीनंतर लोकमताचा प्रवाह त्याला अनुकूल अशा दिशेनें जितक्या जोरानें वाहूं लागला होता तितक्याच जोरानें त्यानें आतां उलट खाल्ली व खोट्या राजकीय आरोपामुळें सहानुभूतीचें जें माप पार्नेलच्या पदरीं पडलें होतें तें सव्याज सव्वापटीनें आतां परत मिळणार हें पाहून त्याच्या शत्रूस आनंद झाला. सदरहु नवीन दाव्यांतही पार्नेल आपल्या बचावाचा प्रयत्न करील, अशी लोकांची अर्थातच अपेक्षा होती; परंतु त्यानें या कामीं अखेरपर्यंत मौन स्वीकारलें व कोर्टानें वादीचा दावा देवविला. तेव्हां लोक आश्चर्यचकित झाले. त्या तारखेपासून त्याच्या प्रत्येक हितशत्रूनें आपल्याला उचलवेल तेवढा मोठा दगड घेऊन त्याजवर टाकण्यास सुरुवात केली. जिकडून तिकडून पार्नेल यानें आयरिश पक्षाच्या पुढारीपणाचा राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यांत येऊं लागली व होमरूल पक्षाचा पुढारी या नात्यानें त्याच्याशीं संसर्ग ठेवणें म्हणजे होमरूलच्या पवित्रकार्यास अपाय करण्यासारखें आहे असें मानभावी लोक दिमाखानें ह्मणूं लागले. या बाबतींतील कित्येक पापभीरु लोकांच्या शंका खऱ्या मनानें घेतलेल्या होत्या व अशा लोकांमध्यें ग्लॅड्स्टन हा प्रमुख होता. खासगी व सार्वजनिक वर्तनाचा संबंध जोडण्यास कांहीं नियमित मर्यादा अर्थात असलीच पाहिजे; परंतु होमरूलसारख्या महत्त्वाच्या प्रश्नाचा व पार्नेलसारख्या प्रमुख पुढाऱ्याचा लोकांच्या डोळ्यांवर येणारा हितसंबंध गुंतला गेल्यामुळें या प्रसंगीं ही मर्यादा ठरविणें स्वाभाविकपणें कठिण तर होतेंच; परंतु होमरूलच्या सर्व प्रकारच्या शत्रुंनीं हा प्रसंग साधून एकदिलानें लगट केली व ग्लॅड्स्टनसारखा सच्छील व पापभीरु मनुष्य

त्यांच्या हातीं मिळाल्यामुळें पार्नेल व त्याचबरोबर होमरूल दोन्ही रसातळास पोहोंचविण्याचें त्यांचें काम सोपें झालें. पार्नेल याच्या मनांत पुढारीपणाचा राजीनामा द्यावयाचें नव्हतें. त्यास तो तीन मुख्य कारणें सांगे. आजपर्यंत त्यानें देशाची जी चाकरी केली, ती लक्षांत घेतली असतां लोकांनीं होऊन त्यास राजीनामा देण्यास सांगणें योग्य नव्हतें. कारण, राजकीय बाबतींत सारासार विचाराची पात्रता त्याजमध्यें अद्यापि होती, असें गृहित धरून चालणें जरूर होतें. दुसरें कारण असें कीं, पार्नेलनें राजीनामा द्यावा असें इंग्रज ह्मणत होते, त्याचा अनुवाद आयरिश लोकांनीं करणें हें कमकुवतपणाचें लक्षण होतें. इंग्रजांना काय? त्यांचें त्यांत हितच होतें. आयरिश लोकांनीं मात्र आपल्या घरचा विचार आपण नीट करावयास पाहिजे होता. तिसरें कारण असें कीं, होमरूलची चळवळ इतक्या आणीबाणीला येऊन पोहोंचलेली असल्यामुळें तिच्या चालकाचें काम अशा वेळीं एकाकडून काढून दुसऱ्यास देणें ही गोष्ट त्या चळवळीला अहिताची होती. परंतु या युक्तिवादांत खरोखर सत्य कितपत होतें व तो पार्नेलच्या आत्महितबुद्धीनें कितपत दूषित झाला होता, हें ठरविणें या वेळीं कठिण होतें. कसेंही असलें तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, या मुद्यावर त्याच्या अनुयायांमध्येंच दोन तट झाले. घटस्फोटाच्या दाव्याचा निकाल लागल्याबरोबर त्याच्या अनुयायांचा पहिला विचार त्याला पदभ्रष्ट करूं नये असाच होता. डिनल, ओब्रायन, ओकॉनर, मॅकार्थी, हीली वगैरे सर्व दुय्यम प्रतीचे पुढारी वरील मताचे होते. परंतु लवकरच आयर्लंद व इंग्लंद या दोन्ही देशांत सद्धर्मशीलतेकरितां प्रसिद्ध असलेल्या बऱ्याच लोकांनीं उचल केली व जॉन मॉर्ले वगैरे लोकांमार्फत ग्लॅडस्टन याचें मन वळविण्याची व पार्नेल यास पदभ्रष्ट करण्याचे कामीं त्यांचेकडून पुढाकार घेण्याविषयींची खटपट त्यांनीं केली व ती सिद्धीसही गेली. ग्लॅडस्टन यानें प्रथम खासगी रीतीनें खटपट करून पाहिली; परंतु तिचा कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहिल्यावर त्यानें आपल्या सहीवर स्टँडर्ड पत्रामध्यें एक पत्र प्रसिद्ध केलें. या पत्रानें आयरिश लोकांच्या मनावर विलक्षण परिणाम होऊन कच्च्या मनाच्या पुष्कळ लोकांनीं पगडी फिरविली. यामुळें भांडण विकोपास गेलें. ग्लॅडस्टनच्या पत्रास पार्नेल

यानें ता. २९ नोव्हेंबर रोजीं एक लांबलचक व जळजळीत उत्तर लिहिलें. परंतु वास्तविक पाहतां 'शेषं कोपेन पूरयेत्' या वचनाप्रमाणें वादाचा मुख्य मुद्दा सोडून तो ग्लॅडस्टनवर व लिबरल पक्षावर विनाकारण घसरला. त्याचा परिणाम असा झाला कीं, ता. १ डिसेंबर रोजीं पार्लमेंटच्या इमारतींतील एका बाजूच्या दालनांत आयरिश सभासदांची एक सभा मुद्दाम भरविण्यांत आली. अध्यक्षस्थानीं पार्नेल याचीच योजना झालेली होती. एका सभासदानें 'पार्नेलच्या पुढारीपणाची मुदत संपली' असा ठराव पुढें आणला; परंतु कांहीं औपचारिक सबबीवर पार्नेलनें तो लाथाडून टाकिला. नंतर वादग्रस्त गोष्टीचा विचार डब्लिन येथें सभा भरवून करावा, अशी सूचना झाली, तीही बहुमतानें नामंजूर झाली व अखेर 'पार्नेल यास पदभ्रष्ट केल्यामुळें ग्लॅडस्टन हा आयरिश लोकांस देणार तरी काय ? हें शक्य असेल तर नक्की करावें आणि मग पार्नेलच्या पुढारीपणाचा प्रश्न फिरून वादास काढावा,' असें ठरलें. परंतु ही वादामध्यें दिशाभूल करण्याची एक युक्ति होती, इतकेंच काय तें. कारण, होमरूलसंबंधानें यापुढें आपले बेत अमुकच आहेत, ही गोष्ट ग्लॅड्स्टनसाहेब उगाच वाटेच्या वाटसराला सांगावयास तयार होतील, हें शक्य नव्हतें. व कोणीकडून तरी खुंटीस गवाळें अडकावून द्यावें एवढाच पार्नेल याचा हेतु होता व तो कांहीं अंशानें सिद्धही झाला. कारण, ठरल्याप्रमाणें ग्लॅड्स्टन याचें मत समजून घेण्याकरितां त्याजकडे एक डेप्युटेशनही पाठविण्यांत आलें; परंतु नवीन होमरूल बिल पुढें आणण्याची वेळ आली असतां त्यांतील कलमें योग्य वेळीं तुह्मांस कळविण्यांत येतीलच, असें मोघम आश्वासन त्यानें दिलें. यानंतर वादग्रस्त प्रश्नाचा विचार करण्याकरितां आयरिश सभासदांची सभा पुन्हां भरविण्यांत आली; परंतु तींत तंटे होऊन जस्टिन मॅकार्थी व त्याजबरोबर आणखी २६ सभासद सभा सोडून निघून गेले. अशा रीतीनें पार्नेलचा जय झाला; परंतु या जयानें वादाचा खरा निकाल लागण्यासारखा नव्हता. व ज्या घातक अंतःकलहप्रियतेविषयीं आयरिश लोकांची ख्याति आहे, ती सर्व आर्लंदभर यापुढें दिसून येऊं लागली. डेव्हिट, डिलन वगैरे लोकांनीं यापूर्वींच पार्नेलचा पुढारीपणा झुगारून दिलेला होता. ज्या ज्या लोकांच्या मनांत पार्नेलविषयीं यत्किंचितही द्वेषबुद्धि होती, त्यांनीं या वेळीं आ-

पला डाव साधून घेतला. आयर्लंदमध्यें त्यास तरुण फीनियन लोकांचा मात्र आधार होता; व रेडमंडसारखे कित्येक अनुयायी पार्नेल मरेपर्यंत त्यास सोडण्यास तयार नव्हते. यामुळें दर गांवीं पार्नेलच्या पक्षाचे व त्याच्या विरुद्धपक्षाचे असे दोन तट होऊन यादवी सुरू झाली. डेव्हिटसारखे स्वतः एकवेळ फीनियन चळवळींत पडलेले लोकही पार्नेल हा फीनियन लोकांस उत्तेजन देतो व त्यांची मदत घेऊन बेबंदशाही माजवितो असा उघड आरोप करूं लागले. कोणाच्या हातांत कोणचा सार्वजनिक फंड आहे, तो कोण कसा खर्चतो व त्यावर तावा कोणाचा असावा, असले व्यक्तिविषयक नवीन मुद्देही अशा वेळीं पुढें निघावयाचेच, ते निघून भांडणास पुष्टि येऊं लागली. परंतु यापुढें एक वर्षभर अंतःकलहाचा आयर्लंदात जो बुजबुजाट होऊन गेला, त्याचें आविष्करण करण्यापेक्षां त्याजवर पांघरूण टाकलेलेंच बरें. व्यक्तिविषयक भांडणाची फार मोठी देणगी ईश्वरानें आयरिश लोकांस दिलेली आहे व तिचा उपयोग या वर्ष सव्वावर्षांत त्यांनीं भरपूर केला एवढें सांगितलें असतां पुरें होईल. या मुदतींत पार्नेल यानें शेंकडों ठिकाणीं जाऊन सभांतून व्याख्यानें देऊन व भांडणें भांडून आपली पदभ्रष्टता टाळण्यासाठीं नुसतें जीवाचें रान केलें. परंतु बिसकटलेली घडी फिरून बसण्याचा संभव फारच कमी होता. व अशा स्थितींतच त्याचा अंत झाल्यामुळें पुढें होणाऱ्या त्याच्या यातना बऱ्याच टळल्या. दगदगीनें व काळजीनें त्याचे शरीरावर आधींच परिणाम झालेला होता. व तारीख ३१ सप्टेंबर १८९१ रोजीं तो जो अंथरुणास खिळून राहिला तो फिरून उठला नाहीं. तारीख १० आक्टोबर रोजीं त्यास ब्रायटन येथें मृत्यु आला. त्याच्या स्नेह्यांनीं त्याचा देह तारीख ११ आक्टोबर रोजीं आगबोटींत घालून डब्लिन येथें नेला व त्याच दिवशीं प्रसिद्धपणें लाखों लोकांसमक्ष त्याचा दफनविधि करण्यांत आला.

पार्नेलच्या अंगीं असलेल्या मुख्य गुणावगुणांचें दिग्दर्शन वरील हकीकतींत झालेलेंच आहे. तो घरचा जमीनदार व त्याचें घराणें प्रसिद्ध असल्यामुळें सार्वजनिक कामांत त्यानें पडण्याची इच्छा केल्याबरोबर त्यास पार्लमेंटचा सभासद होतां आलें. तरी पण सभासद झाल्यापासून अवघ्या पांच चार वर्षांत तो एकंदर आयरिश पक्षाचा राष्ट्रीय पुढारी कसा झाला ही गोष्ट

मात्र सकृद्दर्शनीं आश्चर्य करण्याजोगी आहे. पार्नेल अत्यंत सुबुद्ध होता; तथापि वक्तृत्वगुणाच्या दृष्टीनें पूर्वकालीन पुढारी ओकॉनेल अगर समकालीन पुढारी आयझॅक बट याच्या पासंगासही तो पुरण्यासारखा नव्हता. विद्वत्ता म्हणावी तर ती त्याचे अंगीं मुळींच नव्हती. कारण त्याचें शिक्षण अपुरें होतें व एरवींही त्यास विद्याव्यासंग असा मुळींच नव्हता. राजकीय पुढाऱ्यास पूर्वकालीन इतिहासाची जी माहिती लागते, तिच्या नांवानें त्याचेजवळ आंवळ्याएवढें पूज्य होतें. असें असतां आयझॅक बटसारख्या पुढाऱ्यास बाजूस सारून त्याला पुढारीपणाची जागा इतक्या लवकर पटकावितां आली, याचें कारण फक्त एकच आहे व तें हें कीं, पार्नेल याजमध्यें नखशिखांत इंग्रज लोकांचा द्वेष भरलेला होता व तो सार्वजनिक कामांत पडला ती वेळ अशीच कांहीं होती कीं, जो कोणी इंग्रजद्वेष्टा असेल त्याच्या म्हणण्यासच लोकांकडून मान मिळणें शक्य होतें. किरकोळ चिल्लर लोकांच्या मनांतही इंग्रजांचा द्वेष पार्नेलप्रमाणेंच होता; परंतु सर्व प्रकारच्या आयरिश राष्ट्रीय चळवळींचें मुख्यस्थान व सर्व व्यक्तींच्या महत्त्वाचें केंद्र म्हटलें ह्मणजे पार्लमेंटचें सभागृह हें होतें. अर्थात् ह्या ठिकाणीं जो कोणी हा द्वेष व्यक्त करून दाखविण्याची छाती करील, त्याची पाठ आयरिश लोकांनीं थोपटली असती हें उघड आहे. इकडे पार्लमेंटरी चळवळीला आयरिश लोक जरी कंटाळून गेले होते, तरी त्या पार्लमेंटची थट्टा व तिची उघड अवहेलना करणें एवढाच कायतो उपाय त्यांस राहिलेला होता. हा उपाय पार्नेल यास सर्वस्वी संमत होता व त्यानें तो प्रथमतः धाडसानें व चातुर्यानें अमलांत आणला. अशा रीतीनें आपल्याच कामांत गर्क व मग्न असणाऱ्या ब्रिटिश पार्लमेंटचें तोंड त्यानें खेंचून आयर्लंदकडे वळाविलें हीच त्याची मुख्य देशसेवा होय. तो पुढें येईपर्यंत ब्रिटिश पार्लमेंटमधील लिबरल व कान्झरव्हेटिव या पक्षांच्या आपमतलबी भांडणाच्या नगाऱ्यापुढें आयरिश सभासदांच्या चळवळीची टिमकी कोणास ऐकूच जात नसे. हा नगारा कांहीं वेळ बंद पाडून उलट ही टिमकीच त्यानें कांहीं काळपर्यंत जगास ऐकावयास लाविली, ही गोष्ट एका दृष्टीनें पाहतां खरोखरच फार महत्त्वाची होती. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें आयरिश सभासद म्हणून कोणी असतात किंवा

नसतात, अशी जी अपमानास्पद स्थिति होऊन राहिली होती, ती पार्नेल यानें घालविली व आयरिश हिताहिताच्या प्रश्नाविषयीं पार्लमेंटच्या समरभूमीवर तुंबल रणें माजावीं व प्रधानमंडळें उलथींच्यापालथीं व्हावीं, इतकें महत्त्व पार्नेल यानें त्या प्रश्नास कांहीं काळ आणून दिलें ही गोष्ट खरोखरच कौतुक करण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. हें सर्व घडवून आणण्यास पार्लमेंटला तुच्छ लेखणारा, गवगव्याची भीति न बाळगतां उलट तो होईल तितका बराच असें मानणारा, आपल्या सभोंवार आपला द्वेष करणारे व आपल्याविषयीं वाईट मत असणारे शेकडों लोक बसलेले आहेत या जाणीवेच्या योगानें खेदापेक्षां समाधानच अधिक मानणारा व आयरिश सभासदांच्या बाजारबुणग्यांवर सेनापतीप्रमाणें करडी हुकमत गाजविणारा—असा एवंगुणविशिष्ट कोणी तरी पुढारी यावेळीं हवा होता व कर्मधर्मसंयोगानें पार्नेल या व्यक्तीमध्यें हे सर्व गुण एकवटले होते, हीच कायती त्याच्या सर्व सुयशाची गुरुकिल्ली होय असें ह्मणावें लागतें. लोकनायक होण्यास त्याला बऱ्याच गोष्टी अनुकूल होत्या. कोणतीही गोष्ट त्याच्या लक्षांत चट्दिशीं भरे. परिस्थितीचें मर्म ताडणें व तिला सर्वांत अधिक अनुकूल अशा उपायाची योजना करणें, या कलेंत त्याचा हातखंडाच होता. फार बोलण्याचा त्यास कंटाळा असे, यामुळें अर्थात् तो जे थोडे शब्द बोले त्यांत कांहीं विशेष व अनिर्वाच्य महत्त्व आहे, असें मानण्याची संवय त्यानें लोकांस लाविली होती. त्याचे स्वतःचे विचार ठरेपर्यंत ते कोणास कळत नसत, पण तोंडांतून ते बाहेर पडले ह्मणजे ते वज्रलेप होत. पार्नेल याचें मन वळविण्याचा असा प्रयत्न कोणी करीत नसे व केल्यास तो फारसा कोणास साधत नसे. केवळ स्वतःच्या सारासार बुद्धीनें तर—च्या मतांस तो जो काय मान देईल तेवढाच मिळावयाचा. त्यानें नेहमीं लोकांस हुकूम करावा, त्याला हुकूम करण्याची महत्वाकांक्षा कोणी बाळगूं नये, अशी स्थिति त्यानें लवकरच करून सोडली. पार्लमेंटमध्यें आयरिश सभासदांचा एक गठ्ठा करून, त्याला व्यक्तिशः शिस्तीचा पीळ घालून, आजपर्यंत वाऱ्यावारी दशदिशांना भुरभुर उडणाऱ्या दोऱ्यांचें त्यानें दोरखंड बनविलें. या दोरखंडाच्या काचणीची रग ब्रिटिश पार्लमेंट सभेस जेव्हां सोसेनाशी झाली, तेव्हां मात्र थांबून मागें वळून पाहून, ‘ तुह्मांला हवें तरी

काय? तुमचा संतोष तरी कशानें होणार'? असें आयर्लंडच्या प्रतिनिधींना विचारण्याची तिला बुद्धि झाली. हे गुण त्याच्या अंगीं नसते तर पार्नेल या नांवाचा कोणी सभासद पार्लमेंटमध्यें आहे किंवा नाहीं, हें इतर ग्लॅडस्टनसारख्या सभासदांच्या लक्षांतही कदाचित् आलें नसतें. कुचेष्टेशिवाय प्रतिष्ठा वाढत नाहीं, ही मराठी ह्मण पार्नेल यानें आयरिश राजकारणास अक्षरशः लाविली व परिणामावरून पहातां ती उत्कृष्ट लागूही पडली.

एवढें सांगितलें असतां पार्नेलच्या महत्त्वाच्या मीमांसेविषयीं दुसरें कांहीं सांगण्याचें कारण नाहीं. व मौज अशी आहे कीं, एवढें सांगून झालें असतां त्याच्या महत्त्वाविषयीं सांगण्यासारखें असें शिल्लकही कांहीं उरत नाहीं. राजकीय बाब सोडली असतां लोकांनीं त्यास बहुमान द्यावा अगर त्याजवर प्रीति करावी असे गुण त्याजमध्यें बहुधा नव्हते असें म्हटलें तरी चालेल. द्वेष, द्वेष, द्वेष! या एकतारीचा एकेरी आवाज मात्र त्याच्या हृदयांत घुमत होता व या आवाजाशिवाय दुसरें कांहीं त्याला स्वतःला अथवा दुसऱ्याला ऐकूं येण्यासारखें नव्हतें. विद्या, कला, धर्म, नीति, परोपकार, तत्वज्ञान, व्यावहारिक लोकोपयोग इत्यादि बाबतींत त्याच्या मनाची फारशी गति नव्हती व असली तरी ती कोठेंही फलद्रूप झाल्याचा पुरावा दिसत नाहीं. त्याचीं चरित्रें वाचणारास या एकेरी राजकारणाखेरीज समाजहितसंबंधीं इतर अमूक एका गोष्टीशीं त्याची सहानुभूति असावी असें दिसूनच येत नाहीं; व कांहीं अंशीं तो मनुष्यसमाजद्वेष्टा होता, असेंच उलट दिसून येतें. या सर्व गोष्टींमुळें त्याचा देशाभिमान कोणत्या दर्जाचा होता, याविषयीं त्याच्या हयातींत व त्याच्या मरणोत्तर पुष्कळ लोकांनीं उघड शंका काढल्या, व चिकित्सक बुद्धीनें चर्चाही केली. परंतु त्यानें जें केलें तेवढें त्याच्या राष्ट्रास उपयोगी पडलें; ही मात्र गोष्ट निर्विवाद आहे!

ओकॉनेल व पार्नेल यांच्यामधील साधर्म्य व वैधर्म्य लक्षांत ठेवण्यासारखें आहे. दोघेही मुख्यतः पार्लमेंटांत कायदेशीर असेंच काम करणारे होते. आपलें कार्य अखेर पार्लमेंटाच्या द्वारें व तिच्याच हातून घडून येणार असा त्यांचा भरंवसा होता व तेंच घडवून आणण्याची त्यांची महत्वाकांक्षा होती. परंतु पार्लमेंट ही शत्रुपक्षाचे प्रतिनिधींनीं भरलेली सभा आहे; सबब त्यांजकडून आपखुषीनें असें काहीं मिळणार नाहीं;

व याकरितां त्यांच्याशीं कायद्यांस धरून तो ओढून ताणूनही भांडलें पाहिजे असें दोघांसही वाटे. दोघांनींही पार्लमेंट सभेला आपण भितों अगर तिचा आपणाला बाऊ वाटतो असें कधींही दाखविलें नाहीं. तर आपणास नांवें ठेवणाऱ्या, निंदा करणाऱ्या व पाण्यांत पाहणाऱ्या पांचशें सभासदांवर ते दोघेही तुटून पडत व 'लांडगेतोड' करीत. दोघांचीही इछाशक्ति, करारीपणा व धैर्य हीं कांहीं विलक्षण होतीं; परंतु या दोघां-मध्यें फरकही पुष्कळ होता. ओकॉनेल हा अधिक बुद्धिवान् व लोकांत खरोखर मिळूनमिसळून काम करणारा होता. ओकॉनेलच्या पाठीमागें सर्व आयर्लंद् असे; तथापि प्रत्यक्ष पार्लमेंटमध्यें त्याला आपल्या बरोबर मत देण्यास ३०।४० पेक्षां अधिक आयरिश सभासद सहसा मिळत नसत. परंतु पार्नेलच्या शब्दाबरहुकूम वागण्यास व तो सांगेल तशी कवाईत करण्यास कमींतकमी ८० सभासद नेहमीं सज्ज असत. ओकॉनेल आपल्या वक्तृत्वानें आयरिश लोकांस नुसता नाचवीत असे, व कित्येक वेळां आपल्या मनाच्या लहरीप्रमाणें त्यांजकडून परस्पर विसंगत अशा गोष्टीही करवी. आज त्याच्या भाषणाचा ओघ राजरस्त्यानें वळला, आणि अधिकार, कायदेकानू, सनदशीर चळवळीचे मार्ग वगैरे गोष्टींविषयीं तो बोलूं लागला म्हणजे सर्व समाजांत राजनिष्ठेचा पूर आल्यासारखा दिसून आयरिश लोक अधिकारी लोकांचा सत्कार करून, केवळ प्रेमानें त्यांच्याशीं भांडत असून मोहबतीनेंच काय मिळेल तें घेतील असें वाटे. परंतु दुसरे दिवशीं जर तो ओघ जरा निराळ्या दिशेनें वळला व अधिकारी लोकांच्या कृष्ण कारस्थानांचें तो आविष्करण करूं लागला, ह्मणजे मग समाज खळबळून जाऊन चार दोन दिवसांत बंडाचा झेंडा उभारण्यांत येणार अगर लढाईचें बिगुल फुंकलें जाणार असें वाटे. पार्नेलचें धोरण नेहमीं एकाप्रकारचें असे. पार्लमेंट व अधिकारीवर्ग हे आयर्लंदचे हितशत्रु असून अडवून घेतल्या-शिवाय काडीइतकेंडी कांहीं कधीं ते देणार नाहींत अशी त्याची पक्की खात्री असे. त्यांच्या विरुद्ध त्याची तलवार नेहमीं उपसलेली असे, तथापि कायदेशीर अगर सनदशीर मार्ग सोडून आपण कधींही कांहीं करणार नाहीं असें त्याचें ब्रीद होतें. कारण बंडाळी वगैरे करण्यास देश असावा त्या स्थितींत नाहीं—ह्मणजे लोकांत संपत्ति, त्राण, ऐक्यबळ व भांडणास

लागणारी इतर सामग्री नसून केवळ बंडाळीनें लोकांचीं दुःखें मात्र वाढतील असें त्यास वाटे. फिनीयन वगैरे लोकांशीं मिळून तो लँड लीगचें काम करी. कारण जो तो मनुष्य आपापल्या पुरता जबाबदार असतो, आपलें कर्म व कर्मफळ याचा ज्याचा तो मालक व मुखत्यार असतो असें तो ह्मणे. लँडलीग हा कायदेशीर आहे, सबब त्यांत मिळून जो त्या संस्थेचें कार्य करील त्यास तींत घेण्यास तो कांहीं प्रत्यवाय करीत नसे. ओकॉनेलचें तसें नव्हतें. बेकायदेशीर अशा कोणत्याही चळवळींत कोणी उघडपणें अगर गुप्तपणें काम करीत असला तर त्याच्याशीं ओकॉनेल हा संबंध ठेवण्यास राजी नसे व आपल्या 'रिपील' सभेंत अशा माणसांचा शिरकाव होऊं नये अशाविषयीं त्याचा मोठा कटाक्ष असे. पार्नेलचें ह्मणणें असें असे कीं, काम झाल्याशीं कारण मग तें कोणीही करो. ओकॉनेल हा आपल्या मताप्रमाणें लोकमतास वळण लावण्याचा प्रयत्न करी. पार्नेल लोकमतास धरून चाले व लोकांस आपणापेक्षां बरें वाईट अधिक कळतें, त्यांस सांगायला नको असे तो ह्मणे. ओकॉनेल हा पार्लमेंटसभेंत भांडणारा खरा, तरीपण होतां होईतों लिबरल पक्षास मिळून व संभाळून काम करणारा होता. पार्नेल यानें लिबरल पक्षास स्वतः होऊन कधींही अनुकूलता दाखविली नाहीं; तर आपल्या बाजूस बहुमत व्हावें म्हणून अगर आयर्लंडच्या हिताकरितां पुढें आणलेल्या बिलास आयरिश लोकमत अनुकूल व्हावें ह्मणून लिबरल प्रधानमंडळच त्याची खुशामत करी असें दिसे. ओकॉनेल हा पार्लमेंटमध्यें एकादे वेळेस तरी ख्यालीखुशालींत व खेळीमेळींत येई. पण पार्नेल हा नेहमी रुसलेला, उद्विग्न व घाव घालण्यास हत्यार सांवरून बसलेला असा असे. ओकॉनेलला संधि मिळती तर तो प्रधानमंडळांत शिरता, अगर विशिष्ट कार्याकरितां नोकरीही धरता. एक वेळ जवळ जवळ तसा प्रसंग आलाही होता; परंतु पार्नेल हा जर प्रधानमंडळांतील एखादें पद स्वीकारता तर त्यास लोकांनीं बहुधा शेणमारच केला असता. इतकें पार्लमेंटविरुद्ध त्याच्या वेळीं आयरिश लोकमत क्षुब्ध झालें होतें! ओकॉनेलचा असा प्रयत्न असे कीं, आपल्या मताखेरीज इतर मत देशांत प्रचलित असूंच नये. पार्नेलचें तसें नव्हते. तो लोकमताचा मुख्य प्रवाह तेवढा धरून बसे. मग अवांतर कोणी

कांहीं ज्याच्या त्याच्या मताप्रमाणें केलें तर त्यांत तो मन घालीत नसे. ओकॉनेलला प्रामाणिकपणानें असे वाटे कीं, इंग्लंदचा व आयर्लंदचा संबंध राहणें यांतच आयर्लंदचें खरोखरच हित आहे. पार्नेल या बाबतींत मुळीं लक्षच घालीत नसे. तो ह्मणे कीं अमुक एक गोष्टी आयर्लंदास मिळाल्या पाहिजेत—मग त्या हा संबंध राहून मिळोत अगर त्या मिळण्यांत हा संबंध तुटण्याचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं. ओकॉनेलच्या मताप्रमाणें 'रिपील' करणें अगर न करणें ही गोष्ट उभय राष्ट्रांच्या सलोख्यानें होतां होईतों व्हावी; पार्नेल ह्मणे कीं, आयर्लंदचें स्वतंत्र पार्लमेंट इंग्लंदनें बुडविलें त्याअर्थी आयरिश लोकांना काय हवें व काय नको हें त्यांचें त्यांनीं ठरविलें पाहिजे व ते मागतील तें इंग्लंदनें दिलें पाहिजे. ओकॉनेल हा गुप्तमंडळ्यांचा उघड निषेध करी व त्या त्यास मनापासून आवडतही नसत. पार्नेल यासही गुप्त मंडळ्या व गुप्त वध यांचा मनापासून तिटकारा असे; परंतु त्याचें धोरण असें असे कीं तो त्यांजविरुद्ध मुद्दाम होऊन उघडपणें बोलत नसे. तो ह्मणे तें काम सरकारचें आहे, आपलें नाहीं. 'आयरिश लोकमताच्या पुढाऱ्यांची मदत घेतल्याशिवाय अधिकाऱ्यांस, तीनशें वर्षें अमल चालवूनही, जर शांतता राखितां येत नाहीं तर त्यांनीं आपल्या कामाचा राजीनामा द्यावा व राज्यकारभाराचें काम या पुढाऱ्यांकडे सोंपवावें. परंतु आपण अधिकार गाजविणार व त्याच्या दुष्परिणामापासून होणारा शांतताभंग वाचविण्याचा प्रयत्न करून पुढाऱ्यांनीं मात्र आपणास लोकनिंदेस पात्र करून घ्यावयाचें हा न्याय कुठला'? असें तो विचारी. ओकॉनेल याला आपण नुसता पुढारी नसून राजा आहे असें वाटे व लोकांवर निग्रहानुग्रह करण्याचा अधिकार पुढाऱ्यास येतो असें तो समजे. पार्नेलचें मत असें होतें कीं, पुढाऱ्यांनीं चळवळ करण्याचें आपलें काम आपण करावें. 'जोपर्यंत अनुग्रह करण्याचें साधन आपलें हातीं नाहीं तोंपर्यंत पुढाऱ्यांनीं निग्रह करण्याचें भानगडींत तरी कां पडावें ?'

पार्नेलच्या वेळीं आयरिश पक्ष पार्लमेंटांत जितका प्रबल होता तितका तो पूर्वीं कधींही नव्हता. १८९० सालीं आयरिश पक्षांत भांडणें होईपर्यंत पार्नेलनें आयरिश सभासदांची अशी कांहीं विलक्षण जूट ठेविली होती कीं, ते सर्व मिळून पार्लमेंटसभेस केव्हां केव्हां भारी होत. त्याच्या अनुयायांत

त्या वेळीं बिगर, विलियम ओब्रायन, हॅरिंगटन, रेडमंड, टिमहिली, सेक्स्टन, बॅरी, मॅकार्थी, ओकॉनर, जॉन डिलन, सलिव्हन, वगैरे निवडक मंडळी असत. हे बहुतेक लोक हुषार वक्ते, वादविवादांत पटाईत व कसलेले लेखक असे असत. ओकॉनेल हा स्वतःच कामकाजांत वाघासारखा असे, परंतु तो एकटा असल्यामुळें त्याच्या हल्ल्यांचा परिणाम केव्हां केव्हां होत नसे. परंतु पार्नेलच्या अनुयायांची ही टोळी मोठी कठिण होती. व तिला हल्ल्यांत यश आलें नाहीं असें सहसा कधीं होत नसे. पार्लमेंट सुरू झालें ह्मणजे मग काम असो नसो, ही आयरिश मंडळी आपापल्या जागीं दबा धरून बसे, व केव्हां गनिमी काव्यानें तर केव्हां उघड एकजमावानें तोंड देऊन काय साधेल तो हात ते साधून घेत. त्यांचा पुढारी पार्नेल याला पार्लमेंटच्या कामकाज करण्याच्या कायद्यांतील बिंगेंनाबिंगे माहीत असत, व कोठें संधि सांपडेल तेथें डाव साधण्यास तो डोळ्यांत तेल घालून टपून बसे. योग्य संधीचा इषारा मिळतांच त्याची मंडळी वादांत घुसून, केव्हां टाळ्या वाजवून, केव्हां हास्यकारक उद्गार काढून, केव्हां भाषणें करून, केव्हां पार्लमेंटचें काम थांबविण्याच्या सूचना पुढें आणून अशा रीतीनें चालत्या गाड्यास ते खीळ घालीत. पार्लमेंटमध्यें नेहमींच बहुधा वादविवाद चालावयाचा, त्यांत आयर्लंडचा संबंध नसावयाचा, व अर्थात् कोणास जय मिळाला व कोणाचा पराभव झाला याजबद्दल त्यांस काळजी करण्याचें कारण नसे. यामुळें त्यांचें अडवणुकीचें काम म्हणजे कोरडी गंमत असे. खुशाल हवें तें बोलावें, हव्या त्या सूचना आणाव्या व हवें तसें मत द्यावें. मात्र या सर्वांत एक मुख्य हेतु साधला ह्मणजे त्यांचें काम झालें. तो हेतु हा कीं कोणीकडून तरी पार्लमेंटच्या कामास उशीर लागावा, अडथळा व्हावा, व अशा रीतीनें प्रधानमंडळानें त्रासून जाऊन आयरिश लोकांच्या मागण्याकडे लक्ष द्यावें. या अडवणुकीचे कामीं ही आयरिश फौज वाटेल तेव्हां गनिमी काव्यानें भराऱ्या मारून नुसती भालेराई करण्यास, किंवा कंपू करून जमीन धरून चारी बाजूंनीं तोंड देऊन लढाई देत देत एक एक पाऊल पुढें सरण्यास तयार असे. त्यांची कवाईत पुरी बसलेली होती व या सर्व कवाइतीचें श्रेय पार्नेल याजकडे होतें.

समाप्त.

# IRISH CHOW-CHOW.

" A Nation's liberty could not be meted and parcelled out in gratitude. No man could be grateful at the expense of his conscience ; no woman at the expense of her honour ; no nation at the expense of its liberty."

H. GRATTAN.

" Even the complete emancipation of a whole nation is not worth having if it is to be purchased with a single drop of innocent blood."

D. O'CONNELL.

" Mr. Gladstone said that Fenianism taught him the intensity of Irish disaffection. It taught me more and better things. It taught me the depth, the breadth, the sincerity of that love of fatherland, that misgovernment had tortured into disaffection, and misgovernment, driving men to despair, had exaggerated into revolt. The conviction forced itself upon every one that the men whom they saw meet their fate with heroism and dignity were not a mere band of assasins actuated by base motives, but real earnest patriots, moved by unselfish thoughts and risking all in that which they believed to be their country's cause. The lofty faith of their principles and their cause, which breathed through the words of many of them as they braved the sentence which closed upon them all hope, made it impossible for any one to doubt their sincerity—difficult even for those, who most disapproved of their enterprise, to withhold from them the tribute of compassion and respect. "

ISSAC BUTT.

" Parnell appreciated the energy and earnestness of the Fenians, but turned these qualities to the account of his own movement. He did not try to weaken the force of Fenianism but he diverted it into a channel of his own choosing. Had he attempted to break up Fenianism he would have gone to pieces. He therefore leant on it. He walked on the verge of treason-felony and so won the hearts of many of the rank and file.

" Parnell had the strongest sympathies for Fenianism, but he was resolved not to be managed by the Fenians—nor indeed by any force whatever. He believed profoundly in Fenian help but saw the danger of Fenianism swamping the constitutional movement. He certainly had

no objection to an alliance between Fenianism and Constitutionalism; but he was determined that he should be master of the alliance."

B. O'BRIEN.

"I was convinced of the almost ridiculous inadequacy of the means to the ends; and the results, when compared with the perils incurred, convinced me of the folly and deeply embedded evils of secret conspiracies as a means of freeing Ireland.

"If properly regarded the adhesion of Fenian men to a policy of friendly compromise was a consummation worth more to England than one of her most victorious battles or one of her most opulent dependencies. We (Mr. Parnell and his followers) succeeded in bringing the most fiery advocates of absolute independence to the ways of friendly alliance and conciliation; and in after years the Fenians became the pivot-men of Parnell's battallions and the most reliable of his Parliamentary lieutenants.

"For Parliamentary agitation, represented by dishonest patriots, the young men, who risked their lives and liberties in the rising without a pang, entertained a mingled feeling of ferocity and contempt, which it took many years of *honest moderation* to eradicate, and which would indeed have never been eradicated at all, only that those, who strove to wed the moral and physical force elements together for high and magnanimous national purpose, had to prove their own sincerity by undergoing imprisonment, calumny and death as freely as if they were fighting with arms in their hands."

W. O'BRIEN.

"No greater anxiety can fill the mind of an Irishman than that which surrounds the question as to how and in what temper the Irish at home and in England may use the powers within their reach. Here and there, we may be sure, some errors of impulse, unreason or passion will occasionally be seen and that impatience of result, so characteristic of our race, will betimes break forth. There are men in Ireland, in America and in England, few but not less determined, some of them more desperate than ever, who hope in the breakdown of public effort to have another chance for the resorts of violence. But there are abundant proofs that the great body of the Irish people, in sober but resolute purpose, are determined to work out their national policy by the agencies of public opinion and the weapons of political power."

A. M. SULLIVAN.

"No material improvement or industrial development can ever satisfy Ireland, until Irish laws are made and administered upon Irish soil by Irishmen.

"Though we may obtain and probably will obtain further land reform and educational reform and other advantages for our country by the way, the end and aim of all our policy and all our action is the freedom of our country.

"Let Englishmen understand once and for all that if they can not govern Ireland by methods of freedom they will not be able to govern Ireland at all."

W. REDMOND.

"The Irish Union was atrocious in its principles and abominable in its means."

C. J. FOX.

"I know no blacker or fouler transaction in the history of man than the making of the union between England and Ireland.

"The union with Ireland has no moral force. It has the force of law no doubt, but it rests on no moral basis.

"I could not of course support Butt's movement. I had no evidence that Ireland was behind it. Parnell's movement was very different. When people express their determination in that decisive way you must give them what they ask."

W. E. GLADSTONE.

"The Act of Union is a nullity which no man in Ireland is bound to obey."

PLUNKETT.

"The time has come to substitute the present political policy by one akin to that pursued by the Hungarians, by the Finns, the Poles and other peoples, in political circumstances like to ours."

SINN FEIN.

"We many stop at some half-way house on the way, but Home Rule stands at the end of the road."

J. BRYCE.

"There was an unhappy time when the British Parliament thought itself well employed in crushing out Irish manufactures. It was a cruel and it has proved to be a stupid policy."

A. BALFOUR.

"We can govern India; we can not govern Ireland. Be it so. Then let Ireland be free. She is miserable because she is unruled.

"Ireland would neither resist courageously nor would she honourably submit."
J. A. FROUDE.

"In the history of Ireland, we may trace with singular clearness the perverting and degrading influence of great legislative injustices and the manner in which they affect in turn every element of national well-being.

"The Union has not made Ireland either a loyal or a united country."
W. E. H. LEKY.

"Government without the consent of the governed is the very definition of slavery."
DEAN SWIFT.

"Whatever may be the ultimate verdict of history upon the long struggle of the majority of the Irish people for self-government, the picture of a small country with large aspirations giving of its best unstintingly to the world, while gaining for itself little beyond sympathy, will appeal to the imagination of future ages long after the Irish question has been buried. It may then perhaps be seen that the aspirations came to nought because they were opposed to the manifest destiny of the race, and that it should never have been expected or desired that the Dark Rosaleen should reign and reign alone. Nevertheless the fidelity and fortitude with which the national ideal has been pursued would command admiration, even if the ideal itself were to be altogether abandoned, or if it were to be ultimately realised in a manner which showed that the methods by which its attainment had been sought were the cause of its long postponement. Whatever the future may have in store for the remnant of the Irish people at home, the continued pursuit of a separate national existence by a nation which is rapidly disappearing from the land of all its hopes, and the cherishing of these hopes not only by those who stay but by those who go, will stand as a monument to human constancy."
*Sir H. Plunkett.*

"All was over with the Celtic nation. Its political annihilation had been completed by Caesar, its national annihilation was already begun and in regular progress. This was no accidental destruction, such as destiny sometimes prepares even for a people capable of development, but a self-incurred and in some measures a historically necessary catastrophe. When the establishment of foreign rule was in contemplation, only single districts offered energetic resistance. When the foreign rule was absolutely established, the attempts to shake it off

were either undertaken altogether without judgment or they were to an undue extent the work of prominent leaders and nobles and were, therefore, immediately brought to an end with the death or capture of their leader. The seiges and guerilla warfare in which elsewhere the whole moral depth of a nation's struggle displays itself were and remained in the Celtic struggle of a peculiarly pitiful character. Every page of Celtic history confirms the pitiful saying that the "Celts boldly challenge future danger but lose their courage before its presence."

*Mommsen.*

"The commercial restraints sapped the industrial instinct of the people, an evil which was intensified in the case of the Catholics by the working of the Penal Laws. When these restrictions upon Irish industries had been removed, the Irish, not being trained in industrial habits, were unable to adapt themselves to the altered conditions produced by the industrial revolution as did the people in England. And as for commerce, the restrictions, which had as little moral sanction as the Penal Laws and which invested smuggling with a halo of patriotism, had prevented the development of commercial morality without which there can be no commercial success. It is not, therefore, the destruction of specific industries or even the sweeping of our commerce from the seas about which most complaint is now made. The real grievance lies in the fact that something had been taken from our industrial character, which could not be remedied by the mere removal of the restrictions. Not only had the tree been stripped, but the roots had been destroyed. If ever there was a case in which President Kruger's 'moral and intellectual damages' might fairly be claimed by an injured nation, it is to be found in the industrial and commercial history of Ireland during the period of the building up of England's commercial supremacy.

*Sir H. Plunkett.*

"The cultivation of a spirit of individual independence and self-respect would eventually do more to make Ireland a nation than all the agitations which have ever been. A man is unworthy of the gift of reason who can not form an independent opinion for himself, and who can not respect the independent opinion of another. National division is national disgrace. We have had too much of it in the past; let us see that we avoid the cause of it in future. We can not fight our battles in broken columns."

"Division has been the curse of Ireland. It has accomplished what no foreign foe or Penal Law could have effected. Division and

difference of opinion are two different matters. If we expect to have national Home Rule we must begin by having domestic Home Rule. We must have the harmony of respect for the opinions of others, and we must begin a more prudent, if not a more civilised, course by never enforcing our own views, political or otherwise, by broken heads. We must have less of the old clan and faction spirit and more of unity. What is true of a family is true of a nation. If the various members of a family do not respect each other, they will certainly not be respected by their neighbours.

"Centuries of depression have induced a national deficiency in an essential matter. Yet we have much in our own power. If we wish Ireland to take her place as a nation we must make her a nation. If we wish for position we must work for it. If wish for national advancement, we must make individual efforts to attain it.

"It is easier, though it may be questioned whether it is pleasant, to have our greatness made for us than to make it for o urselves. The very virtues of our race are our present embarassment. Our national loyalty has led us to follow those who promise much and do little. Our national pride has made us condone treachery where it has not been too overt. Our national love of ease and indifference to personal discomfort has been a bar to steady industry. Our national vanity has led us to suppose that an old name and an old pedigree are the better for genteel idleness. How then can there be commercial, or what is the same, national prosperity ?"

*Cusack.*

"Would it not be more reasonable to mend our state than complain of it?"

*Berkley.*

"Personal bravery, unequalled among ancient nations, a spirit, free, impetuous, open to all impressions, remarkable intelligence,—side by side with this an extreme susceptibility, want of perseverence, marked dislike to the idea of discipline and order, extreme ostentation and in fine perpetual dissension, the fruit of excessive varrity-these are the traits of Irish character."

*M. Thiers.*

# पुणें, चित्रशाळा छापखान्यांत विक्रीस तयार असलेलीं

# पुस्तकें.

—— ० ——

## शालोपयोगी पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| * मोडी पहिलें | ( रा. सा. सिताराम विश्वनाथ पटवर्धनकृत ) | ०—२—६ |
| * मोडी दुसरें | " | ०—३—० |
| * मोडी तिसरें | " | ०—५—० |
| * मुंबई इलाख्याचा भूगोल | " | ०—१—० |
| * हिंदुस्थानचा भूगोल | " | ०—१—० |
| * चारी खंडाचा भूगोल | " | ०—१—९ |
| * पुणें जिल्ह्याचा भूगोल | " | ०—१—० |
| * इसापनीति सचित्र | ( रा. छत्रेकृत ) | ०—१०—० |
| * अंकगणित भाग १ | " | ०—३—६ |
| * " भाग २ | " | ०—६—० |
| * " भाग ३ | " | ०—८—० |
| * " भाग १ | ( रा. गोखलेकृत ) | ०—३—६ |
| * " भाग २ | " | ०—६—६ |
| * " भाग ३ | " | ०—१२—० |
| * " भाग १ | ( रा. लिमयेकृत ) | ०—३—६ |
| * " भाग २ | " | ०—६—६ |
| * " भाग ३ | " | ०—१४—० |

| | |
|---|---|
| * लांगमन कॉपी बूक ( नं. १ ते ४ प्रत्येकीं किंमत ) | ०—२—० |
| लांगमन कित्त्याप्रमाणें ४ नंबरचीं आखलेलीं कोरीं बुकें ( प्रत्येकीं पानें १६ ) | ०—०—६ |
| * तोंडचे हिशेब भा. १ | ०—१—३ |
| * तोंडचे हिशेब भाग २ | ०—२—३ |
| * युक्लिडकृत भूमिती पहिलें बूक | ०—४—० |
| * महत्त्वमापन | ०—४—६ |
| * देशी जमाखर्चपद्धति | ०—२—६ |
| दीक्षितकृत सृष्टचमत्कार | ०—२—० |
| * वृत्तदर्पण | ०—२—० |
| * व्युत्पत्तिप्रदीप | ०—३—० |
| * आरोग्यमार्ग | ०—१—६ |
| * शेतकी वाचनपाठ भाग १ | ०—०—९ |
| * सदर भाग २ | ०—१—० |
| * सदर भाग ३ | ०—१—६ |
| * नवनीत | ०—१३—० |

---

## लहान मुलांकरितां फारच उपयोगी पुस्तकें.

सुलभाक्षरज्ञान—मुलांना थोडक्यांत अक्षरओळख होण्याजोगें मनोरंजक सचित्र पुस्तक. ( सहा प्रतींस ट. ख. ०।।- ) किं. प्र. ०-०—६

मुळाक्षरांचे चित्रयुक्त रंगीबेरंगी पत्ते:—या प्रत्येक पत्त्यावरील वस्तूंचीं वगैरे सुरेख चित्रें काढिलीं आहेत; त्यापासून मुलांस जोडाक्षरांसुद्धां सर्व अक्ष-

रांची व आंकड्यांची माहिती सुलभ रीतीनें व लौकर होईल. व पत्त्याप्रमाणें व्यवस्था केल्यामुळें खेळांत खेळ व शिक्षणांत शिक्षण अशी सोय केली आहे. प्रत्येक जोड सुंदर कागदी पेटींत घातला आहे. किं. ०—४—०

| | |
|---|---|
| सचित्र अक्षरबोध | ०—६—० |
| सचित्र अक्षरलिपि | ०—२—० |
| कानडी सचित्र अक्षरलिपि | ०—२—० |
| हिंदुस्थानी सचित्र अक्षरलिपि | ०—२—० |
| सचित्र मुंबई इलाख्याचें वर्णन | ०—१—० |
| चिमुकल्या गोष्टी भाग १ ला | ०—४—० |
| वस्तुपाठमाला भाग १ ला (गोखलेकृत) | ०—५—० |
| वस्तुपाठमाला भाग २ रा " | ०—८—० |
| वस्तुपाठमाला भाग ३ रा " | ०—८—० |
| वस्तुपाठ कसे शिकवावे ( रा० भि० जोशीकृत ) | ०—४—० |
| शालोपयोगी कवाईत पुस्तक १ लें. | ०—१—० |
| किंडरगार्टनचे देणग्यांसंबंधीं सोपीं गाणीं | ०—२—० |
| शारदीय वाचनपाठमाला ( पंडिता रमाबाईकृत भाग १ ) | ०—१—६ |
| पशुपक्षिवर्णनांचीं रंगीबेरंगी चित्रयुक्त बुकें एकंदर १० ( १ आण्यांत १० पुस्तकें पोष्टांतून जातात )प्रत्येकास किं० | ०—१—० |
| भातकुली ( लहान मुलींस फारच उपयोगी ) | ०—४—० |
| शिक्षणसार ( ह० कृ० दामलेकृत ) | ०—९—० |
| बालोद्यानशिक्षणमार्गदर्शिका ( २० देणग्यांची माहिती सांगितली आहे. ) बोरवणकरकृत | ०—१०—० |

तेरा देणग्यांचें स्पष्टीकरण ०—४—०
एकभाषा ( हिंदुस्थानांत एक भाषा होईल किंवा नाहीं, झाल्यास कोणती, याविषयीं विचार. कै० शं० रा० हतवळणेकृत ०—४—०

---

बालशिक्षण भाग १ रा. आपटे कृत ) ०—६—०
" भाग २ " ०—७—०
पदार्थपाठमाला भाग १ ला. " ०—८—०
" भाग २ रा. " ०—८—०
ड्राईंगचीं कोरीं बुकें ( १२ पानांचे बुकास ) ०—१—०

## इतर शालोपयोगी पुस्तकें.

मुंबई इलाख्याचें भूगोलपत्रक ०—०—९
चित्रलेखन-मूलतत्त्व ( ड्राईंग शिकणारास फारच उपयोगी ) ०—२—६
संस्कृत-इंग्लिश-व्याकरण ( कृष्णाजी गो० ओककृत ) १—२—०
साक्रेतिसाचें चारित्र ( कै. कृ. शा. चिपळूणकरकृत ) ०—४—०
वाङ्मयविषय निबंध ( कै. वि. कृ. चिपळूणकरकृत ) ०—११—०
हिंदुस्थानच्या इतिहासाचा सनसमूह ०—४—०
वाक्यमीमांसा अथवा वाक्यांचें पृथक्करण (कै. आगरकरकृत ) ०—९—०
रासेलस ( कै. कृ. चिपळूणकरकृत ) ०—९—०
वाचनपाठमाला भाग १ १—०—०
" भाग २ १—०—०
काव्यदोहन ( कृ. पां. लिमयेकृत. ) १—४—०
भारतीय युद्ध सचित्र ( एकंदर १२ चित्रें दिलीं आहेत. ) १—०—०
मुक्तमाला काव्य ( मोरोपंताचें ) ०—४—०
अनेकविद्या-मूलतत्त्वसंग्रह ( कै. कृ. चिपळूणकरकृत ) १—८—०

मेघदूत ( के. बी. फाटक बी. ए. कृत. ) ०--१२--०
पद्यरत्नावली ( कृ. शा. चिपळूणकरकृत. ) ०—८—०
व्यायामशास्त्र ( रा. ज. गोखले बी. ए.कृत ) ०—८--०
डंबेल्स पुस्तक (हात कसे करावे याची माहिती) ०—२--०
मुलांचे शिक्षणाची अहवाल (शाळेंतील अभ्यासाचा रिपोर्ट )०—०—६
धि इंग्लिश टीचर भाग २ १—४—०
मोडी किते शेंकडा ( नंबर १ पासून ५ नंबर पर्यंत) १—४--०

## शालोपयोगी नकाशाचीं बुकें व सुटे नकाशे.

पूर्वगोलार्ध व पश्चिमगोलार्ध आशिया, युरोप,
आफ्रिका, मध्यप्रांत, हिंदुस्थान, युनायटेड स्टेट्स्,
साऊथ अमेरिका, नार्थ अमेरिका, इंग्लंड
व वेल्स, स्काटलंड, आयर्लंड( या देशांचे नकाशे १०॥×१४
लांबीरुंदीचे असून विलायतीबरहुकूम रंगांत छापलेले आहेत.
प्रत्येकास ८१. १३नकाशांचे बुकास.८१३) ०—१३—०
हिंदुस्थानचा ऐतिहासिक नकाशा ( रुळपट्टीसह ) २—०--०
हवेली तालुक्याचा नकाशा ( साधा ८२ ) रूळपट्टीचा ) ०—६--०
पुणें जिल्ह्याचा नकाशा (साधा ८२ ) ( रूळपट्टीचा) ०—६--०
पृथ्वीचा मोठा नकाशा (६०×३० रूळपट्टीचा व वार्निसासह )४—०—०

## ऐतिहासिक पुस्तकें.

ऐतिहासिक गोष्टी( कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरकृत. )
" भाग १ ला. " ०—२—६
" भाग २ रा. " ०—३--०
विजापूरवर्णन ( विजापुरांतील इमारतींचे देखाव्यासह ट. ह. सह. )१-२--०
लेखरत्नमाला ( महादजी शिंदे व नाना फडनवीस यांचीं पत्रें ) ०--६--०

ग्रांड डफच्या इतिहासावरील टीका. ( चिपळूणकरकृत. ) ०—८—०
रायगड किल्ल्याचें वर्णन ०—८—०
इतिहासावरील निबंध( एकंदर सर्व निबंधामध्यें अतिशय उत्तम )०—८—०
शिवजन्मोत्सव. ०—४—०
मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें. भाग ४ था.
( वि. का. राजवाडे बी. ए. कृत ) १—०—०
,, ,, ,, ,, भाग १० वा २—०—०

## मनोरंजक पुस्तकें.

मोरोपंताचा प्रभुद्रोह (अन्योक्तिपर कविता कृ. पां. लिमयेकृत) ०—२—०
घासीराम कोतवाल १—०—०
सद्वर्तन ०—४—०
करमणूक( यांत मनास आल्हाद देणाऱ्या लहान लहान
गोष्टी आहेत. ) ०—७—०
विनोदमहदाख्यायिका( निबंधमालेंतील ) ०—१२—०
सुभाषित ( निबंधमालेंतील अति उत्तम वेंचे ) ०—१२—०
रूपनगरची राजकन्या (रा. ह. ना. आपटेकृत ऐतिहासिक
सचित्र कादंबरी. ) १—१२—०
साम्र बाण कादंबरी ( पारखी शास्त्रीकृत ) १—८—०
कांचनगडची मोहना नाटक—(रा. खाडिलकर बी. ए. कृत. )०—१२—०
कीचक-वध ,, ,, ०—१२—०
बायकांचें बंड ,, ,, ०—१२—०
भाऊबंदकी ,, ,, ०—१२—०
सवाईमाधवराव यांचा मृत्यु ,, ०—१२—०

| | |
|---|---|
| सचित्र वेणीसंहार ( बर्वेकृत. ) | ०–१२–० |
| दुर्गाताईची ओवाळणी ( एक लहानशी गोष्ट ) | ०—१–० |
| हार्मीरमहाकाव्य ( संस्कृत कविता न्यायचंद सूरिकृत ) | १—८–० |
| आरेबियन नाइट्स् ( कै चिपळूणकर व रा० दामलेकृत आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टीचे ९ भाग एकत्र करून जाड टाइपांत छापिलेला मूळचा सचित्र समग्र ग्रंथ ( टपाल खर्च १२ आणे. ) | ६—०–० |
| सचित्र आरेबियन नाइट्स् ( नवीन आवृत्ति ) | ३—०--० |
| परशरामकवीच्या लावण्या ( शं. तु. शालिग्रामकृत ) | १—०–० |
| रामजोशीकृत लावण्या ,, | ०—८–० |
| अनंत फंदीकृत ,, ,, | ०—६–० |
| होनाजी बाळकृत ,, ,, | ०—८–० |
| नारायणराव आणि गोदावरी ( सचित्र अत्युत्तम कादंबरी ) | १—०–० |
| चित्रमय जपान ( सचित्र पुस्तक ) | १—०–० |
| चित्रमय बर्मा ,, | ०—८–० |
| राजा रविवर्मा यांचीं चित्रें वर्णनयुक्त पुस्तक. | १—०–० |

---

## चरित्रें.

| | |
|---|---|
| उत्तररामचरित्र ( मराठींत ) | ०—८–० |
| जॉन ब्राइट चरित्र | ०—१–० |
| कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र. ( सद्वर्तनप्रवर्तकमंडळीनें बक्षीस दिलेलें. साधें बाईंडिंग ) | १—४–० |
| डा. आनंदीबाई जोशी यांचें चरित्र | १—८–० |
| गलिव्हर याचा वृत्तांत | ०—९–० |

| | |
|---|---|
| माणिकप्रभूचरित्र ( हुमणाबादकर ) | १—०—० |

## धार्मिक पुस्तकें.

| | |
|---|---|
| धर्मपर व नीतिपर व्याख्यानें ( वा. आ. मोडककृत ) | १—८—० |
| मानवधर्मसार ( संक्षिप्त मनुस्मृति, रा. ब. चिं. वि. वैद्यकृत ) | ०—२—० |
| निळोबाचा गाथा ( विष्णुबुवा जोगकृत ) | १—०—० |
| दाशरथीरामचरित्र | ०—४—० |
| गीतगोविंद ट. ख. १ आणा | ०—७—० |
| गोविंद तारकगीत ट. ख. १ आणा | ०—६—० |
| शिवलीलामृत रेशमी बाइंडिंग | ०—७—० |
| " ( साधें ) ट. ख. २ आणे | ०—४—० |
| गणेशपुराण ट. ख. २ आणे | १—०—० |
| मदालसाचंपु ( त्रिविक्रमकविकृत ) | १—०—० |

---

# १०० प्रतीस एक रुपया.

## प्रतीस पाव आणा ! प्रतीस पाव आणा !!

# देशभक्तांचे फोटो.

१ दादाभाई नवरोजी. २ सर फेरोजशा मेथा. ३ डी. ई. वाच्छा. ४ लो. बा. गं. टिळक. ५ ना. गो. कृ. गोखले. ६ दे. लाला लजपतराय. ७ बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी. ८ दे. गणेश श्रीकृष्ण खापर्डे. ९ बाबू बिपिनचंद्र पाल. १० कै. ज. म. गो. रानडे.

११ पंडित मदनमोहन मालवीय. १२ सर रोमेशचंद्र दत्त. १३ दे. जी. सुब्रम्हण्यम् आयर. १४ दे. शिवराम महादेव परांजपे. १५ कै. विष्णु कृष्ण चिपळूणकर. १६ ना. आनंदा चार्लु. १७ रँगलर परांजपे. १८ डा. मो. गो. देशमुख. १९ राजा सर टी. माधवराव. २० सर डा. भालचंद्र. २१ दि. आर. रघुनाथराव. २२ दे. जसवंतराव व आठवले. २३ कै. रणछोडलाल छोटालाल. २४ कै. प्रेमचंद रायचंद, मुंबई. २५ कै. गणेश वासुदेव जोशी. २६ कै. गोपाळ गणेश आगरकर. २७ कै. वामन शिवराम आपटे. २८ दे. नरसिंह चिंतामण केळकर. २९ दे. बाबासाहेब खरे, नासिक ३० ना. सय्यद हुसेन बिलीग्रामी. ३१ लाला दिनानाथ, एडिटर हिंदुस्थान. ३२ कै. वासुदेव बाळकृष्ण केळकर. ३३ कै. प्रो. जिनसीवाले. ३४ श्रीस्वामी रामतीर्थ. ३५ ना. विठ्ठलदास ठाकरसी. ३६ शेट मनमोहनदास रामजी. ३७ दे. विष्णुबोवा जोग. ३८ कै. विश्वनाथ नारायण मंडलिक. ३९ कालीमाताजी, कलकत्ता. ४० श्रीस्वामी विवेकानंद. ४१ श्रीहंसस्वरूप योगीराज महात्मा. ४२ श्रीगुरु माणिकप्रभु. ४३ श्रीगुरुमार्तंड माणिकप्रभु. ४४ अश्विनी कुमार दत्त, बारिसाल. ४५ जे. चौधरी, कलकत्ता. ४६ रामभुज दत्त, लाहोर. ४७ प्रफुल्लचंद्र चर्की. ४८ दे. चिदंबरम् पिले. ४९ डॉ. भांडारकर, पुणें. ५० मि. हैदर रेझा, दिल्ली. ५१ दे. लाला मुरलीधर, अंबाला. ५२ लियाकतहुसेन, कलकत्ता. ५३ ना. एन्. सुबराव, मद्रास. ५४ दे. फडके, एडिटर विहारी. ५५ कै. जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञीक. ५६ कै. म. ब. नामजोशी. ५७ कै. ईश्वरचंद विद्यासागर. ५८ ना. पी. माधवराव, म्हैसूरचे दिवाण. ५९ दे. अजितसिंह, लाहोर. ६० दे. किसनसिंह, लाहोर. ६१ दे. अरविंद घोस. ६२ बिरेंद्रकुमार घोस. ६३ डॉ. राशबिहारी घोस.

६४ दे. पी. कीरय्या प्लीडर, बेझवाडा. ६५ कै. ब्रम्हबांधव उपाध्याय. ६६ कै. पंडित अयोध्यानाथ. ६७ कै. ज. का. त्रिं. तेलंग. ६८ दे. टी. पी. पित्रे. धारवाड. ६९ दे. नारायणराव बर्वे, धारवाड. ७० खुदीराम बोस. ७१ बाबू मनमोहन घोस. ७२ कै. वासुदेव बळवंत फडके. ७३ कै. शंकर मोरो रानडे. ७४प्रो. विजापूरकर. ७५ दे. कृ. प्र. खाडिलकर. ७६ दे. बक्षी जैसीराम. ७७ काटकरबोवा, पंढरपुर. ७८ दे. लिमये व सायन्ना नरसू स्वराज्यपत्राचे कर्ते, सोलापूर. ७९ बॅ. गांधी, ट्रान्सवाल. ८० कै. प्रतापचंद्र मुजुमदार. ८१ नरेंद्र गोस्वामी. ८२ सत्येंद्रनाथ बोस. ८३ कै. आनंदमोहन बोस. ८४ कै. कालीचरण बानर्जी. ८५ डॉ जे. बोस, कलकत्ता. ८६ श्रीशेषाचल महाराज, अगडी. ८७ श्रीरामकृष्ण परमहंस, कलकत्ता. ८८ श्रीब्रह्मानंदस्वामी गंगनाथ, बडोदें. ८९ शेट लक्ष्मणदासजी मथुरावाले. ९० श्रीस्वामी देवकीनंदन. ९१ श्रीस्वामी दयानंद सरस्वती. ९२ महासाधु तुकाराम. ९३ श्रीरामदासस्वामी. ९४ श्रीमच्छंकराचार्य. ९५ श्रीस्वामी अभेदानंद. ९६ रणछोडलालजी महाराज, पोरबंदर.

---

# राजेरजवाडे व इतर सरदार.

१ बादशहा सातवे एडवर्ड. २ राणी अलेक्झांड्रा. ३ अफगाणिस्थानचे अमीर. ४ जपानचे राजा व राणी. ५ श्रीछत्रपती शिवाजी. ६ सयाजीराव गायकवाड, बडोदें. ७ महाराणी, बडोदें. ८ नेपाळचे महाराज. ९ मिरजचे अधिपति. १० शिंदेसरकार, ग्वालेर. ११ म्हैसूरचे महाराज. १२ राजा रविवर्मा. १३ होळकर

कार, इंदोर. १४ प्रिन्स रणजितसिंहजी. १५ रामदास आणि शिवाजी. १६ नानासाहेब पेशवे. १८५७. १७ हैदराबादचे निजाम १८ तात्या टोपी. १९ दुर्भंगाचे महाराज. २० सवाई माधवराव पेशवे. २१ अहिल्याबाई होळकर २२ झांशीची राणी, लक्ष्मीबाई. २३ मैमनसिंगचे महाराज, २४ म्हैसूरचे माजी महाराज. २५ कै. श्री. अप्पासाहेब जमखिंडीकर. २६ त्रावण-कोरचे महाराज.

## देवादिकांचीं चित्रें.

१ श्री विठ्ठल, पंढरपूर. २ रखुमाबाई, पंढरपूर. ३ श्री शिव-पंचायतन. ४ श्री गणपति. ५ रामवनवास. ६ उषास्वप्न. ७ श्री दत्तात्रय. ८ श्री दत्तात्रय. (निराळा) ९ श्री दत्तात्रय. ( निराळा ) १० श्री तुकाराम. ११ श्री रामपंचायतन. १२ श्री हनुमान.

## राजा रविवर्मा याचीं चित्रें.

### भाग १.

१ श्री विष्णु गरुडवाहन. २ श्रीलक्ष्मी. ३ मोहिनी. ४ गंगा-रण. ५ सरस्वती. ६ अहिल्या. ७ हरिश्चंद्र-तारामती. जविलाप. ९ दमयंती. ( १ ) १० दमयंती ( २ ) ११ नल-ती. १२ दमयंती. ( ३ ) १२ ( अ ) शिवधनुर्भंग. सीतास्वयंस्वर. १३ ( अ ) जटायूपक्षच्छेद. १४ सीता. कवनांत बसलेली) १४ ( अ ) राजा रुक्मांगद आपलया पुत्राचा छेद करीत आहे. १५ विश्वामित्र-मेनिका. १६ शकुंतला व ा सख्या. १७ शकुंतला-पत्रलेखन. १८ भरत. १९ गंगा. शंतनुमत्स्यगंधा. २१ कंसमाया. २२ कृष्णदृष्ट. २३ गोदो-

हन. २४ मृत्तिकाभक्षण. २४ ( अ ) वसुदेव-देवकी-बंध
२५ कुंजवनांतील राधा. २६ राधामाधव. २७ अर्जुन-
२८ सैरंध्री नं. ३. २९ सैरंध्री नं २. ३० सैरंध्री नं १. ३१ क-
सैरंध्री. ३२ द्रौपदीवस्त्राहरण. ३३ कृष्णशिष्टाई. ३४ लाल ख.
३५ बेगमचा स्नानविधि. ३६ हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या या.
३७ महाराष्ट्रसुंदरी. ३८ वैष्णवकन्या. ३९ मद्रासी सुंदर स्त्री.
४० मद्रासी मुलगी. ४१ मल्याळी स्त्री. ४२ मलया स्त्री. ४३ मलय-
सुंदरी. ४४ मल्याळ सुंदरी. ४५ गोवेंकरीण. ४६ राजा र वर्मा.

## मोठे लोक.

१ सर हेनरी कॉटन. २ जोसेफ म्याझिनी. ३ ग्यारिबॉल्डी. ४ ग्ल-
स्टन ५ सालिसबरी. ६ सर डब्ल्यू. वेडरबर्न. ७ मि. ाडला.
८ अडमिरल टोगो. ९ अनिबेझंट. १० क. अलकॉट. १
हार्डी. १२ सर जमशेटजी जिजीभाई. १३ प्रो. मॅक्समुल

---

# १०० प्रतीस दोन रुपये

प्रत्येकीं. ०॥ ] साईज ८×१० [ प्रत्येकीं.

१ सातवे एडवर्ड सहकुटुंब. २ श्रीमच्छंकराचार्य. ३ लाल-पा
४ गौरजहान.( बंगाली गाणारीण.) ५ नवीन मताचे चार

## ऐतिहासिक स्त्रीपुरुषांच्या तसबिरा.

## मोंगल बादशहा व सरदार.

१ तैमूरलंग. २ बाबर. ३ हुमायून. ४ अकबर. ५ ज
६ नूरजहान. ७ शहाजहान. ८ मुमताजमहाल. औ